१०४

# गांधी : कार्य व विचारप्रणाली

अनु. प्रा. भा. रा. बापट

डॉ-०६पी-पुक-२८३

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
प्र/९०४
९
ग्रंथालय

भाषांतर माला क्र. १७

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती
मंडळ ग्रंथालय सचिवालय
०३२

| रजिस्टर नंबर | वर्गीकरण नंबर |
|---|---|
| | |

# गांधी : कार्य व विचारप्रणाली

श्री. निर्मलकुमार बोसलिखित

**Studies in Gandhism**

या पुस्तकाचा मराठी अनुवाद

अनुवादक

भास्कर रामचंद्र बापट

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई

आवृत्ती : १९७३, शके १८९४

प्रकाशक :
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ
सचिवालय, मुंबई ३२.

स्वाक्षरी
तपासले

© प्रकाशक

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

मूल्य ७ रुपये

# निवेदन

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा; इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे; इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे प्रमुख स्थान आहे तसे स्थान महाराष्ट्रातील विद्यापीठात मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृति मंडळाने वाङ्मय निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश– अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथाचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस्, ॲरिस्टोफोनीस्, युरीपीडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस् ॲक्वाइनस्, न्यूटन, डार्विन, रूसो, कान्ट, हेगल, जॉन स्टूअर्ट मिल, ग्योथे, शेक्सपीअर, टॉलस्टॉय्, दोस्तएव्स्की, स्तानिस्लाव्स्की, बर्ट्रान्ड रसेल, रूथ बेनेडिक्ट, रायशेनबाख, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनव्स्की, कॅसिरेर, गार्डन् व्ही. चाइल्ड् इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, ' भरताचे नाट्यशास्त्र ', ' संगीत रत्नाकर ', ' ध्वन्यालोक ', प्राकृतातील " गाथासप्तशती " त्रिपिटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

मंडळाच्या भाषांतर योजनेखाली मंडळाने आतापर्यन्त १६ अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टूअर्ट मिलचे ' ऑन् लिबर्टी ', रूसोचे ' सोशल कॉंट्रॅक्ट ', एम. एन. रॉयचे ' रीझन्, रोमॅंटिसिझम् ॲंड रीव्हल्यूशन् ', कै. पां. वा. काणे यांचे ' हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र ', निखिलानंद भारतीचे ' होली मदर ', स्तानिस्लाव्स्कीचे ' ॲन ॲक्टर प्रिपेअर्स ', पं. शिवनाथशास्त्री यांची ' आत्मजीवनी ', कोरलॅंडचे ' म्यूझिक ॲंड इमॅजिनेशन ' इत्यादी ग्रंथांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

प्रस्तुत भाषांतर हे म. गांधींचे एका काळचे सचिव व मानवशास्त्रज्ञ कै. प्रा. निर्मलकुमार बोस यांनी लिहिलेल्या "Studies In Gandhism" या पुस्तकाचा अनुवाद असून तो प्रा. भा. रा. बापट, वारणानगर यांनी सुबोध मराठीत अनुवादित केला आहे. मंडळाच्या भाषांतर योजनेखाली सदर अनुवाद "गांधी : कार्य व विचारप्रणाली" या शीर्षकाने प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रकाशित करण्यास महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळास परवानगी दिल्याबद्दल मूळ ग्रंथाचे प्रकाशक कै. प्रा. निर्मलकुमार बोस यांच्या वतीने श्री. आर. एन. बोस, कलकत्ता यांचे हार्दिक आभार मानतो.

वाई :
कार्तिक ३, १८९५
२५ ऑक्टोबर, १९७३

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई.

# प्रस्तावना

तरुण आज क्रांतीची भाषा करीत आहे. त्याच्या जीवनात पसरत चाललेला भयाण अंधार क्रांतीच दूर करू शकेल असे त्याला वाटत आहे. तो हताश आहे आणि संतप्त आहे. जे काही आहे ते चोळामोळा करून फेकून द्यावे, जाळून टाकावे असे त्याला वाटत आहे.

क्रांतीची भाषा आणि क्रांती करण्याची शक्ती यांतले अंतर कसे कापावयाचे ते मात्र त्याला माहीत नाही. एका बाजूला त्याची भाषा अधिकाधिक जहाल होत आहे, वेळी अवेळी त्याच्या हातून विध्वंस घडत आहे, तर दुसरीकडे त्याच्या अगतिकतेला सीमा राहिलेली नाही.

बंडखोर व क्रांतिकारक गांधींची या तरुणाशी गाठ घालून देण्याची आज नितान्त आवश्यकता आहे.

गांधी आणि माओ या आधुनिक काळातील दोन अलौकिक क्रांतिकारक व्यक्ती होत.* दिसायला ही दोन माणसे विरुद्ध टोकाची भासतात. 'पॉवर ग्रोज आउट ऑफ द बॅरल ऑफ ए गन' असे म्हणणाऱ्या माओचे गांधींशी काय साम्य असे प्रथमतः वाटते. वरील वचनामध्ये माओ शासनसत्तेविषयी विलक्षण जागरूकता दाखवितो; सामाजिक व्यवहारात सत्ता कोणाच्या हाती आहे हा मोक्याचा प्रश्न असतो हे स्पष्ट करतो. गांधी अराज्यवादी म्हणून ओळखले जातात. पण त्यांनी सत्याग्रहाचा जो विचार मांडला त्यातही सत्तेविषयी हीच जागरूकता दिसून येते. माओच्या वचनाच्या शेजारी 'पॉवर ग्रोज आउट ऑफ द सफरिंग ऑफ द पुअर' हा गांधींचा विचार ठेवता येईल. सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर गांधी व माओ हे दोघेही बलोपासक आहेत ही गोष्ट ध्यानी येईल. बलाच्या उपासनेचे दोघांचे मार्ग भिन्न होते आणि बळ राबविण्याच्या दोघांच्या पद्धतीही भिन्न होत्या, हा मुद्दा अर्थातच विसरता येत नाही. तरी पण दुबळ्या लोकांच्या ठायी एका जगड्व्याळ साम्राज्यसत्तेला यशस्वी टक्कर देता येईल इतके सामर्थ्य उत्पन्न करण्याचा उपक्रम गांधींनी आयुष्यभर केला, आपण बलवान होऊन ब्रिटिशांशी लढल्याखेरीज ब्रिटिश नमणार नाहीत हे जाणले, हे साम्य महत्त्वाचे आहे. सत्याग्रहाने सतत आत्मशुद्धी करावयाची ती त्याचे आत्मबल वाढविण्यासाठी ही गोष्टही लक्षात घेण्यासारखी आहे.

---

* लेनिनचाही समावेश करता येईल व लेनिन व गांधी यांचीही तुलना इतक्याच अर्थपूर्णरीत्या करता येईल.

ज्यांच्या हाती समाजातली साधनसंपत्ती व सत्ता एकवटलेली आहे ते सुखासुखी आपल्या स्थानावर व उपभोगावर पाणी सोडीत नसतात; त्यासाठी तीव्र संघर्ष करावाच लागतो. ज्यात माणसांचा स्वार्थ खोलवर गुंतलेला असतो त्या बाबतीत बुद्धीला गोष्टी पटवून देऊन भागत नाही, याचेही भान गांधींच्या ठिकाणी आढळते. दक्षिण आफ्रिकेत असताना प्रारंभी काही वर्षे त्यांचा भर बुद्धिनिष्ठ व सनदशीर घटनात्मक मार्गावर होता. पण या मार्गाची मर्यादा व अंतिमतः व्यर्थता त्यांना लौकरच अनुभवास आली. स्वार्थ सोडण्यास प्रतिपक्षीयास प्रवृत्त करावयाचे असेल तर केवळ बौद्धिक समजुतीने भागत नाही संघर्ष करावा लागतो, हा पाठ ते शिकले. गांधी हे वर्गसमन्वयवादी होते, हृदयपरिवर्तनावर त्यांचा सारा भर होता असे सर्रास म्हटले जाते, व त्याचा आधार घेऊन गांधी संघर्ष टाळण्यास महत्त्व देत असे ठाम मत मांडले जाते. गांधींचे उभे आयुष्य संघर्षामध्ये गेले या वस्तुस्थितीचा मग उलगडा होत नाही. खरी गोष्ट बरोबर उलट आहे. जीवनात संघर्ष पावलोपावली अटळ आहे हे गृहीतकृत्य सत्याग्रहाच्या साऱ्या मांडणीच्या बुडाशी आहे. कधी माणसांचे स्वार्थ परस्परविरोधी असतात म्हणून, तर कधी त्यांचे सत्याचे आकलन परस्परविरोधी असते म्हणून; पण सामाजिक व्यवहारात माणसांना संघर्ष टाळता येत नाही. क्वचित केव्हा संघर्षाची पाळी येत असते असे मानणाऱ्यास हिंसेचा आश्रय घेऊन तो ' सोडविण्या 'ची कल्पना रास्त वाटले तर आश्चर्य नाही. पण संघर्ष ही नित्याची व अटळ गोष्ट आहे असे गांधी मानीत, आणि म्हणूनच त्यांना हिंसेचा मार्ग टाळून प्रतिकाराच्या अन्य मार्गाचा विचार करण्याची गरज भासली ही खरी वस्तुस्थिती आहे. तेव्हा, या अंगाने पाहिल्यास संघर्षवादी असण्यात गांधी हे माओपेक्षा रेसभरही मागे नाहीत असे म्हणणे अधिक युक्त ठरेल.

गांधी आणि माओ या दोघांच्यातली आणखी पुष्कळ साम्यस्थळे दाखवून देता येण्यासारखी आहेत. दोघांची कमालीची साधी राहणी हा अपघाती योगायोग नाही. त्यामागे वैचारिक बैठक आहे. दोघांनीही रूढ व शिष्टमान्य सिद्धान्त व मार्ग यांची बांधिलकी न पत्करता आपली मूलभूत निष्ठा आणि देशकालपरिस्थिती यांचा संयोग साधून परिस्थितीला अनुरूप असा क्रांतीचा व लढ्याचा माग अनुसरला. सत्तेवर आल्यापासन माओने आर्थिक विकासाच्या क्षेत्रात, राजकीय व्यवस्थच्या संदर्भात, लोकांचे नीतिधैर्य व सामर्थ्य उभारणीच्या क्षेत्रात जी पावले उचलली आहेत त्यातही त्याची ही बंडखोरी व अभिजातता ( ओरिजिनॅलिटी ) प्रत्ययास येते. आणि या पावलांचे वळण, त्यामागील दृष्टी या गोष्टी माओ व गांधी यांच्यातले साम्य पुन्हा एकवार मनावर ठसवितात. उदाहरणार्थ, चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या व शासकीय यंत्रणेच्या संदर्भात ' ग्रेट कल्चरल रेव्हल्युशन 'द्वारा त्यांची शुद्धी करण्याचा माओने केलेला प्रयत्न आणि मृत्युसमयी काँग्रेसच्या पुनर्घटनाची गांधींनी मांडलेली योजना— ते जगले असते तर

त्यांनी ती राबविली असती— यांच्यातली जवळीक पाहण्यासारखी आहे. असो.

गांधी व माओ यांच्यातला भेद एक वर्गसमन्वयवादी आणि दुसरा वर्गसंघर्षवादी असा नाही. अगदी खोलवर जाऊन पाहिले तर गांधींचा माणसांच्या ठिकाणची सदसद्विवेकबुद्धी जागी करता येते या गोष्टीवर क्रियाशील विश्वास आहे, तर लोकांच्या ठिकाणी सदसद्विवेकबुद्धी जागी करता येण्यावर विसंबून राहायला माओ तयार नाही. लोकांच्या, विशेषतः प्रतिपक्षीयांच्या ठिकाणी सद्भाव व न्यायबुद्धी जागृत करता येतच नाही असे माओ मानीत असेल असे नाही; पण अंतिमतः दंडाचा वापर करण्याची शक्ती आपल्या हाती राखण्याचा त्याचा आग्रह स्पष्ट दिसतो. त्याहीपुढे जाऊन असे म्हणता-येईल की, क्रांती घडवून आणावयाची तर अंतिमतः हिंसेचा वापर करून प्रतिपक्षीयांवर मात करावी लागते, असेही माओने मानलेले आहे. लोकांची सदसद्विवेकबुद्धी जागी करण्यावर विसंबून राहता येत नाही हा अंतिम निष्कर्ष असल्याने माओच्या विचारात राज्यसत्ता काबीज करून ती कायम आपल्याच हाती राखण्यावर भर आहे. ' पॉवर ग्रोज आउट ऑफ द बॅरल ऑफ ए गन ' ही माओची उक्ती या त्याच्या निष्कर्षाशी सुसंगत आहे. याउलट व विरोधी असा गांधींचा निष्कर्ष आहे. माणसांची सदसद्विवेकबुद्धी जागी करता येत असेल तर मग राज्यसत्ता आपल्याच हाती असण्याचा आग्रह ठेवण्याचे कारण राहात नाही. ज्या कोणाच्या हातात सत्ता असेल त्याच्या ठिकाणची सदसद्विवेकबुद्धी जागी करण्याची शक्ती आपल्या ठिकाणी निर्माण करण्यावर व ती शक्ती कायम टिकवून ठेवण्यावर गांधींचा भर असावा ही गोष्ट गांधींच्या अंतिम निष्कर्षाशी सुसंगत आहे. म्हणून गांधी म्हणतात ' पॉवर ग्रोज आउट ऑफ द सफरिंग ऑफ द पुअर. '

ब्रिटिशांसारखे लिबरल विचारसरणीच्या प्रभावाखालचे राज्यकर्ते प्रतिपक्षीय असल्यामुळे गांधींचा सत्याग्रह खपू शकला, हिटलर वा स्टालिन यांच्यासारख्या हुकमशहांविरुद्ध सत्याग्रहाचा विचार व्यर्थ आहे, अशी टीका नेहमी केली जाते. त्याचा थोडा विचार केला पाहिजे. गांधी वा माओ दोघांच्याही विचारास सामाजिक परिमाण आहे आणि त्याला एक कालाचेही परिमाण आहे, या गोष्टी ध्यानात घेतल्या पाहिजेत. माणसे मर्त्य असतात, पण कुटुंब, जमात, समाज, वंश यांसारख्या समष्टी अ-मर्त्य असतात. ज्या व्यक्ती मिळून समाज बनलेला असतो त्या व्यक्तींखेरीज समाज ही एक स्वतंत्र अस्तित्व असलेली वस्तू नाही हे खरे, पण समाजाचे सातत्य हीदेखील तरीही वस्तुस्थिती आहेच; आणि ती महत्त्वाची आहे. नातवंडे फळे खातील म्हणून अक्रोडाचे झाड लावण्यात अर्थ आहे. सशस्त्र क्रांतीचा मार्ग अनुसरणाऱ्यांनाही हे गृहीत धरावे लागते की, ज्या व्यक्ती क्रांतीच्यासाठी आपले सर्वस्वार्पण करणार त्यांतील प्रत्येकाला व्यक्तिशः क्रांती पाहावयास मिळणार नाही. बोलिवियाच्या जंगलात आत्माहुती देतानाचे गवाराला आपल्या बलिदानाने उद्याच्या क्रांतीचे पाऊल पुढे पडणार आहे असे खचितच वाटले

व त्याचे हे वाटणे चुकीचे नव्हते. तात्पर्य असे की, सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात कोणत्याही विचारधारेची युक्तायुक्तता तपासून पाहावयाची असेल तर कोणत्याही एका मार्गाने वाटचाल करू लागल्याबरोबर परिणाम दिसणार नाहीत, आणि परिणाम हाती येण्यापूर्वी व्यक्तिशः अनेकांचा बळी पडणार या दोन्ही गोष्टी धरून चालाव्या लागतात.

हिटलर वा स्टालिन यासारख्यांच्या हुकूमशाही राजवटींमध्ये गांधींचा मार्ग प्रभावी ठरला असता की नाही ? हिटलर वा स्टालिन यांच्या उत्कर्षाला एक विशिष्ट पार्श्वभूमी होती ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. तत्कालीन राजकीय गटांपैकी कोणीच गांधींचा विचार मानणारे नव्हते; आणि सर्वसाधारण लोकांमध्येही सत्याग्रहाचा विचार रुजविण्याचा प्रयत्न होत नव्हता. अशा परिस्थितीत गांधींचा विचार प्रभावी ठरण्यास बराच कालावधी लागला असता. आणि दरम्यानच्या काळात अनेकांचे बळी पडले असते. या दोन्ही गोष्टी स्पष्ट आहेत. गांधींचा विचार स्वीकारलेला नव्हता तरी हिटलर सत्तेवर येत असताना व नंतरही मोठ्या प्रमाणावर हत्याकांड हे घडलेच. प्राण जायचे तर काही राहिले नाही; पण हेच प्राण जर सत्याग्रही भूमिकेतून दिले गेले असते तर हिटलरच्या सत्तेवर प्रचंड दडपण निर्माण झाले असते यात शंका नाही. अलीकडे १९६८ साली चेकोस्लोवाकियामध्ये तेथील जनतेने चेक कम्युनिस्ट नेत्यांच्या नेतृत्वाखाली रशियन आक्रमणाचा अत्यंत प्रभावी निःशस्त्र प्रतिकार केल्याचे आपण पाहिले आहे. चेक नेते व जनता यांपैकी कोणीच अहिंसेच्या विचाराचा स्वीकार केलेला नव्हता. रशियन सैन्याविरुद्ध शस्त्र हाती घेणे निष्फळ ठरणार आहे हे ओळखून निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग त्यांनी निवडला. तोही अत्यंत प्रभावी ठरला. कम्युनिस्ट पक्षातली एकजूट भंग पावली तेव्हाच रशियाला चेक जनतेवर कुरघोडी करता आली; त्यांच्या शस्त्रबळाचा त्यांना काही उपयोग झाला नाही, ही गोष्ट उद्बोधक आहे. सांगावयाचा मतलब असा की, गांधींचा मार्ग केवळ लिबरल व सौम्य प्रकृतीच्या राजवटींविरुद्धच प्रभावी ठरणारा आहे हा आक्षेप योग्य नाही.

माओचा मार्ग अधिक श्रेष्ठ, योग्य व व्यवहार्य, की गांधींचा ? प्रत्यक्षात कोणत्याही विशिष्ट समाजात कोणता मार्ग अनुसरला जाईल ही गोष्ट त्या समाजाची परंपरा, तत्कालीन परिस्थिती आणि त्या समाजात प्रभावी असलेल्या विचारसरणी यांवर अवलंबून राहील. जगात आज बहुतेक समाजांमध्ये शस्त्र हाती घेण्याकडे प्रवृत्ती आहे याचे कारण सत्याग्रही विचारधारा तशी कोठेच अद्यापि रुजलेली नाही. पण वरील प्रश्नाचे उत्तर शोधीत असताना या वस्तुस्थितीला महत्त्व देता कामा नये. या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात येथे फार खोलवर आपणास जाता यावयाचे नाही. पण गांधींच्या मार्गाची दोन वैशिष्ट्ये येथे नमूद करता येण्यासारखी आहेत. ज्या समाजात प्रस्थापित राज्यसत्ता स्थिर व प्रबळ असते व तिची पकड पक्की असते त्या समाजात सशस्त्र परिवर्तनाचा मार्ग अनुसरता

येत नाही. गांधींचा मार्ग हा अशा परिस्थितीतही अनुसरता येतो. दुसरी गोष्ट अशी की, गांधींच्या मार्गाने आपण जसजसे पुढे जातो तसतशी लोकशक्ती संघटित होते आणि अशा संघटित व जागृत लोकशक्तीवर समाजात परिवर्तन घडवून आणण्याची प्रामुख्याने जबाबदारी असते. सशस्त्र क्रांतीचा मार्ग हा गुप्ततेचा मार्ग असतो, व त्याचा भर एका लहान, एकाधिकारवादी गटाच्या हाती सत्ता केंद्रित ठेवण्यावर असतो. चीन-मध्ये एका विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीमुळे माओला एका प्रदेशात आपले राज्य प्रस्थापित करता आले आणि तेथील क्रांतीची चळवळ गुप्ततेतून निर्माण होणाऱ्या अनेक दोषांपासून मुक्त होऊ शकली. एकाच देशात दोन राज्यसत्ता अस्तित्वात आल्या व त्यांच्यात लोकांच्या पाठिंब्यासाठी स्पर्धा निर्माण झाल्यामुळे माओला आपल्या प्रभुत्वा-खालील प्रदेशात काही प्रमाणात लोकसत्ताक राजवट अस्तित्वात आणावी लागली. चीनमधील कम्युनिस्ट चळवळीत अशा रीतीने काही प्रमाणात उघडपणे चालणाऱ्या चळवळींची काही वैशिष्ट्ये आढळून येतात. पण चीनमधील परिस्थिती केवळ अपवादात्मकच मानता येते. राज्यसत्ता हस्तगत झाल्यावर तेथे एकाधिकारवादी पक्षाची सत्ता प्रस्थापित झाली ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. राज्यकर्त्यांच्या विरोधात लोक-शक्तीचे स्वतंत्र संघटन चीनमध्ये आज शक्य नाही.

सारांशरूपाने गांधींच्या मार्गाचे चित्रण करावयाचे तर असे म्हणता येईल की, आपले सर्वस्व हरण करण्याची तयारी ठेवून जिवानिशी प्रतिकार करावयाचा, त्याद्वारा प्रतिपक्षीयाच्या ठिकाणची सदसद्विवेकबुद्धी क्रियाशील व जागृत करावयाची, आणि तशी ती जागी झाल्यावर उभयतांनी मिळून समाजात रचनात्मक व व्यवस्थात्मक परिवर्तन घडवून आणावयाचे. गांधी केवळ हृदयपरिवर्तन घडवून आणू इच्छितात असे म्हटले जाते. त्यामागचा गर्भित अर्थ असा असतो की, आहे ही समाजरचना व व्यवस्था न बदलली तरी चालेल असे गांधींचे मत होते. ही समजूत बरोबर नाही. रचनात्मक व व्यवस्थात्मक परिवर्तन हे कालच्या प्रतिपक्षीयांच्या सहभागाने घडवून आणण्यावर त्यांचा भर होता; प्रतिपक्षीयांचे शिरकाण करून व त्यांना जिवाचे भय घालून, दडपून वा नमवून बदल घडवून आणणे त्यांना चुकीचे वाटत होते; तसेच त्याची गरजही वाटत नव्हती. माणसाच्या ठिकाणचा सद्भाव जागृत करता येतो हा अनुभव-सिद्ध विश्वास हे गांधींच्या सर्व राजकीय-सामाजिक विचारांचे अंतःसूत्र आहे हे लक्षात बाळगिले तर त्यांचा विचार नेटकेपणाने समजण्यास मदत होईल.

गांधींचा राजकीय, सामाजिक व आर्थिक विचार नेटक्या स्वरूपात पुढे मांडणारी पुस्तके मराठीत फारशी नाहीत. सर्वसाधारण वाचकास गांधींचा विचार व त्यांचे राजकीय कार्य यांचा विवेचक परिचय करून देणाऱ्या पुस्तकाची गरज होती. प्रा. निर्मलकुमार बोस

यांच्या प्रस्तुत पुस्तकाने ही गरज पुष्कळ अंशाने भरून निघेल.

निर्मलकुमार बोस हे अनेक वर्षे कलकत्ता विद्यापीठात मानवशास्त्राचे प्राध्यापक होते. शास्त्रज्ञास शोभेल अशी सत्यनिष्ठा, काटेकोर निरीक्षण-ग्रहण-शक्ती, बौद्धिक शिस्त त्यांच्या ठिकाणी होती. गांधींचा भारतीय राजकारणात उदय झाला त्या वेळी त्यांच्या लढाऊ राजकारणाने ते त्यांच्याकडे आकृष्ट झाले तरी, इतर अनेक पांढरपेशा मध्यम-वर्गीयांप्रमाणे, ग्रामीण पुनरुत्थानाविषयीच्या गांधींच्या कल्पना त्यांनाही चमत्कारिक व हास्यास्पद वाटल्या. विशेषतः चरखा व खादी या गोष्टींस गांधींनी जे अपरंपार महत्त्व दिले ते त्यांना खुळचटपणाचे वाटले. पण गांधींचे विचार प्रत्यक्ष प्रयोग करून पडताळून पाहिल्याखेरीज त्यांच्यातला विज्ञाननिष्ठ संशोधक त्यांना स्वस्थ बसू देईना. एका खेड्यात जाऊन निर्मलकुमारांनी खादी केंद्राचे काम प्रत्यक्ष जबाबदारी घेऊन काही वर्षे केले. गांधींच्या सामाजिक-आर्थिक विचारांची सूक्ष्मता व व्यवहार्यता त्यांना अनुभवाने पटली. § तेथून पुढे त्यांनी गांधीविचार व कार्य यांचा सूक्ष्म व परिपूर्ण अभ्यास हे आपले एक काम मानले, आणि जन्मभर निष्ठेने पार पाडले. मानवशास्त्रज्ञ म्हणून त्यांचे कार्य चालूच होते. कलकत्ता विद्यापीठाच्या उदार धोरणामुळे निर्मलकुमारांना स्वातंत्र्य लढ्यातही सक्रिय भाग घेता आला. पुढे १९४६–४७ साली नोआखलीत व नंतर त्यांना गांधींचे बंगाली दुभाषी म्हणून काम करण्याची संधीही विद्यापीठाच्या उदार धोरणामुळे मिळाली. निर्मलकुमार बोस यांचा म्हणून एक विशेष अधिकार आहे.

निर्मलकुमार बोस यांनी इंग्रजीत तीन पुस्तके लिहिली आहेत. त्यांपैकी एका पुस्तकाचे स्वरूप गांधींच्या निवडक वेच्यांच्या संकलनाचे आहे ('सिलेक्शन्स फ्रॉम गांधी'). गांधींबरोबरील सहवासावर आधारलेले 'माय डेज वुइथ गांधी' हे दुसरे पुस्तक.* गांधींचे व्यक्तिमत्त्व, त्यांची कार्यपद्धती, आणि अखेरच्या दिवसांतल्या त्यांच्या जीवनातले नाट्य जाणून घेण्यास या पुस्तकाची मोलाची मदत होते. प्रस्तुतच्या पुस्तकात निर्मलकुमारांनी गांधींच्या विचारांचा गाभा वाचकांसमोर ठेवला आहे. शिवाय, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात गांधींचे कार्य काय राहिले त्याचा एक सलग आढावा घेतला आहे. या लेखाच्या निमित्ताने १९१९ ते १९४७ या कालखंडातील स्वातंत्र्य लढ्याचा त्रोटक पण सलग इतिहास निर्मलकुमारांनी पुढे ठेवला आहे. सर्वसामान्य जिज्ञासू वाचकांच्या दृष्टीने या पुस्तकाचे मोल मोठे आहे.

---

§ प्रा. अ. भि. शहा यांच्याशी निर्मलकुमारांच्या झालेल्या संभाषणावरून.

* या पुस्तकाचे मराठी भाषांतर 'गांधींच्या जीवनाचे अखेरचे पर्व' या शीर्षकाखाली प्रस्तुत पुस्तकासोबतच महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळातर्फे प्रकाशित होत आहे.

गांधींचा विचार विशद करून सांगणारे या पुस्तकातील लेख लक्षात घेतले तर एक विशेष गोष्ट ध्यानात येते. सत्याग्रह, विश्वस्तवृत्ती आणि ग्रामस्वराज्याधिष्ठित विकेंद्रित अर्थव्यवस्था या तीन गोष्टींत गांधींचा राजकीय, सामाजिक व आर्थिक विचार सामावलेला आहे.

साऱ्या समाजाची आमूलाग्र पुनर्रचना करण्याचा विचार गांधींच्या मनात प्रथमपासून होता असे आढळत नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे राजकारण आपण करावे असे त्यांना इतर अनेक तरुणांप्रमाणे शाळेत असल्यापासून वाटत होते. पुढे व्यवसायासाठी ते दक्षिण आफ्रिकेत गेले व तेथील हिंदी लोकांच्या हक्कांच्या रक्षणार्थ लढा उभारण्याचे काम त्यांनी केले. त्याही वेळी, एकीकडे बॅरिस्टरीचा व्यवसाय करून इतर वेळात हिंदी समाजाचे राजकारण करावे एवढेच त्यांच्या मनात होते. दक्षिण आफ्रिकेतून ते आपले काम संपवून भारतात आले तेव्हाही मुंबईत त्यांनी आपला व्यवसाय सुरू केला. त्यांची इच्छा अशी की, गोखल्यांच्या मार्गदर्शनाखाली आपण काँग्रेसचे काम करावे. गांधींची संपूर्ण क्रांतिकारक भूमिका ही राजकारणातून आकारास आलेली नाही. राज्यसत्ता हस्तगत करण्याचे उद्दिष्ट हे त्या भूमिकेचे प्रथमपासूनच कधी अंगभूत भाग नव्हते. साऱ्या समाजाची पुनर्रचना करीत असता राज्यसत्तेचीही अनुरूप पुनर्घटना घडून येईल ही गोष्ट वेगळी. माओ, लेनिन यांच्या नवीन समाज प्रस्थापित करावयाच्या विचारात सत्ता हस्तगत करण्याचे राजकारण एक अविभाज्य भाग म्हणून प्रथमपासून एकरूप झालेले आढळते. आणि त्यामुळे सत्ता हस्तगत करणे व ती राखणे हेच पुष्कळदा पहिले व शेवटचे ध्येय बनण्याचा धोका फार मोठा राहतो.

पुढे भारतात येऊन गांधींनी स्वातंत्र्य लढ्याच्या राजकारणाचे काँग्रेसमध्ये राहून पुढारीपण केले. नवसमाज रचनेच्या आपल्या कार्यक्रमातील काही बाबींचा त्यांनी आग्रहाने काँग्रेसच्या कार्यक्रमात समावेश केला. चरखा-खादी, अहिंसा, अस्पृश्यता-निवारण या गोष्टींचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल. पण या गोष्टींचा काँग्रेस संघटनेने गांधींना अभिप्रेत असलेल्या अर्थाने स्वीकार केला नाही. हिंसेचा मार्ग हा व्यवहार्य मार्ग नाही हे स्पष्ट दिसत व पटत असल्याने, तेवढ्या एकेरीवर येण्याची गरज वाटत नसल्याने काँग्रेसने धोरण म्हणून गांधींच्या अहिंसेचा स्वीकार केला. मूल्यनिष्ठेच्या अंगाने विचार केला तर 'अहिंसेचा स्वीकार' हे शब्द चुकीचेच होते. काँग्रेसने स्वीकार केला तो निःशस्त्र प्रतिकाराचा; मनात हिंसा होती, पण ती करण्याइतके बळ नव्हते. म्हणून निःशस्त्र प्रतिकार करावयाचा होता. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीने चटकन हिंसक वळण घेतले त्यातून हीच गोष्ट स्पष्ट झाली. मुद्दा असा की, हिंदुस्थानात आल्यानंतरच्या काळात काँग्रेसच्या माध्यमातून केलेले स्वातंत्र्याचे राजकारण आणि नवसमाजनिर्मितीचे रचनात्मक कार्य या दोन पातळ्यांवर गांधी स्वतंत्रपणे कार्य करीत

होते. खादी, अस्पृश्यतानिवारण यांसारख्या गोष्टी ' म्हाताऱ्या गांधींची खुळे ' म्हणूनच स्वीकारली गेली. कॉंग्रेसचे राजकारण हे अन्य कोणत्याही राष्ट्रवादी चळवळीप्रमाणे सत्ता हस्तगत करण्याचे राजकारण होते. नवसमाजनिर्मितीचा क्रांतिकारक विचार सांगणाऱ्या गांधींची कॉंग्रेस वारसदार कधीच नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात याचे प्रत्यंतर आपणास पुरेपूर आले आहे.

स्वातंत्र्य लढ्याच्या काळात ' रचनात्मक कार्यक्रमा 'ला धरून जी कामे व ज्या संघटना उभ्या राहिल्या त्या स्वाभाविकपणे व अपरिहार्यपणे स्वातंत्र्य लढ्याच्या राजकारणात ओढल्या गेल्या. त्यामुळे एका अत्यंत शबलित स्वरूपात गांधींच्या विचारांचा आविष्कार त्या काळात झाला. या कामात त्या काळात जी माणसे आली तीही या शबल संस्कारांतून वाढलेली असल्याने त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात जे गांधीप्रणीत नवसमाजनिर्मितीचे कार्य केले त्यांत हे सर्व दोष प्रकर्षाने प्रकट झाले. म्हणून गांधींचा नवसमाजनिर्मितीविषयीचा विचार आणि कार्यक्रम यांचा विचार हिंदुस्थानात गांधींनी केलेल्या स्वातंत्र्याच्या राजकारणापासून वेगळा केला पाहिजे.

दक्षिण आफ्रिकेत असताना १९०४ साली पोलक यांच्या सांगण्यावरून एका रात्रीच्या प्रवासात गांधींनी जॉन रस्किनचे ' अन टु धिस लास्ट ' हे छोटेखानी पुस्तक वाचले. ' ज्याने माझ्या जीवनामध्ये तत्काळ रचनात्मक फेरफार घडवून आणला ' अशा शब्दांत गांधींनी या पुस्तकाचा आपल्यावरील परिणाम सांगितला आहे. या पुस्तकाचे सार गांधींनी आपल्या शब्दांत असे सांगितले आहे : ' ( १ ) सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे. ( २ ) वकील काय किंवा न्हावी काय, दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे. ( ३ ) साधे, अंगमेहनतीचे, शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.' गांधींनी पुढे असे म्हटले आहे की ' पहिली गोष्ट मला माहीत होती; दुसरी मला अंधुक दिसत होती; तिसरीचा विचार मी केलेलाच नव्हता. '

रस्किनचे पुस्तक वाचण्यापूर्वीही पाश्चात्य भौतिक संस्कृतीविषयी त्यांच्या मनात असमाधान दाटत चालले होते हे मागे वळून पाहता स्पष्ट दिसते. विद्यार्थीदशेत इंग्लंडमध्ये असताना त्यांनी नव्या औद्योगिक संस्कृतीच्या परिणामांचे जवळून निरीक्षण केले असले पाहिजे. हिंदुस्थानचे शोषण ब्रिटिशांनी पद्धतशीरपणे चालविले असल्याची गोष्ट दादाभाई, रमेशचंद्र दत्त वगैरेंनी वेशीवर टांगलेली होतीच. दक्षिण आफ्रिकेत पाश्चात्य भौतिक संस्कृतीचे नागवे स्वरूप ते अनुभवीत होते. कोणत्या नैतिक तत्त्वांशी– सत्यांशी– प्रतारणा केल्याने पाश्चात्य भौतिक संस्कृती सैतानी बनली त्याची लख्ख जाणीव रस्किनच्या पुस्तकाने त्यांना झाली असे म्हटल्यास वावगे होणार नाही. या जाणीवेने गांधींच्या जीवनाला व

विचाराला एक क्रांतिकारक परिमाण प्राप्त झाले.

यंत्रांचा वापर, कारखानदारी उद्योग, रेल्वे, वीज, रस्ते यांसारख्या सुखसोयी—आधुनिक काळात सवयीच्या झालेल्या प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन वरील तीन तत्त्वांची कसोटी लावून गांधी करतात हे जर लक्षात ठेवले तर गांधींचा आर्थिक विचार अविकृत स्वरूपात समजून घेता येतो. काहींची धन करून इतरांचे अकल्याण करणारी, आर्थिक व सामाजिक उच्चनीचता व विषमता वाढविणारी, बहुसंख्य लोक श्रमिक असताना काहींचे (बहुशः शहरी पांढरपेशांचे) जीवन ऐदी बनविणारी कोणतीही 'सुधारणा' ही वस्तुतः वरदान नसून शाप आहे हे त्यांचे स्पष्ट मत होते. 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात गांधींनी आपले विचार प्रथमतः विस्ताराने मांडले. त्या वेळी तर त्यांची थट्टा झालीच, पण कालपर्यंत लोकांना त्यांच्या विचारात काही ग्राह्य असेल असे वाटत नव्हते. आज जेव्हा भारतातले दारिद्र्य आणि बेकारी पारंपरिक औद्योगीकरणाच्या योजनांनी कमी न होता वाढतच चालल्या आहेत, तेव्हा पुन्हा एकदा लोक गांधींकडे वळत आहेत.

गांधी प्रदीर्घ काळ एका संघटनेचे नेते व युद्धनीतिज्ञ होते. वेळोवेळी उपस्थित होणाऱ्या मुद्द्यांना धरून आपली नीती ते आखीत, व त्याची स्पष्टता करण्यासाठी लेख लिहीत. तत्त्वचिंतनात्मक स्वतंत्र ग्रंथलेखन त्यांनी केले नाही. तसेच, त्यांच्या विचाराचे अंतःसूत्र कायम राहिले तरी तपशिलाच्या बाबतीत त्यांच्या विचारात विकास आढळून येतो. आपल्या कल्पनेतल्या भावी समाजाचे तपशीलवार चित्रण त्यांनी केलेले नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे. त्यांच्या लेखनाची ही वैशिष्ट्ये व मर्यादा लक्षात घेऊन प्रस्तुत पुस्तकाचे वाचन केले पाहिजे. निर्मलकुमारांनी शक्य तेथे त्यांच्याच शब्दांत मांडणी केलेली असल्याने हा विवेक बाळगण्याची आवश्यकता आहे.

अराज्यवादी अवस्था आदर्श खरी, पण मानवी देहधर्माची मर्यादा सुटत नाही हे लक्षात घेतले तर प्रत्यक्षात कोणत्याही समाजात काही शासन हे असणारच, आणि शासन आहे तोवर त्यावर अंकुश ठेवण्यासाठी लोकशक्ती संघटित करण्याची गरज राहील असे गांधीजी मानीत (पृ. ४५), हा निर्मलकुमारांनी मांडलेला मुद्दा निसटू देता कामा नये. माणसे एकत्र राहतील तेथे तेथे स्वार्थभिन्नतेमुळे व सत्याचे आकलन व्यक्तिसापेक्ष असल्याने कलह अपरिहार्य आहेत, आणि म्हणून सभ्य मार्गांनी संघर्ष चालविण्याच्या रीती उत्क्रांत करणे गांधी आवश्यक मानीत. शासन लोक-प्रातिनिधिक असावे, आणि त्या जोडीला सत्याग्रही राजकारणासाठी संघटित लोकशक्तीचा वापर होत रहावा अशी गांधींची राज्यसत्तेसंबंधी गतिमान व जिवंत कल्पना होती असे तात्पर्य काढता येते. याच गतिमान व जिवंत लोकशाहीचा पुरस्कार आज सर्व जगभर विचारी लोक करीत आहेत, आणि त्या दिशेने लहानमोठी पावलेही उचलली जात आहेत.

व्यक्तिप्रतिष्ठा राखणे हे मूल्य गांधींच्या सर्व विचाराच्या गाभ्याशी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. गांधी पदोपदी ईश्वराचा हवाला देतात. पण 'सत्य हाच ईश्वर' ही त्यांची व्याख्या सांगून जाते की त्यांचा ईश्वर ही एक वेगळीच चीज आहे. सर्व मानवांमधले (व तत्त्वतः सर्व जीवांमधील) अद्वैत असा त्यांच्या ईश्वरनिष्ठेचा आशय व्यवहारात असल्याचे आढळते. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रयत्नांनी व प्रेरणेने गांधींनी प्रमुख धर्मांविषयी म्हणजे त्यांच्या शिकवणुकीविषयी सखोल चिंतन केले. एक प्रकारे, या चिंतनाचा परिपाकच त्यांना रस्किनच्या पुस्तकात आढळला. सर्व माणसांना समान वागणूक देणारी समाजरचना आदर्श म्हणून त्यांनी केवळ तत्त्वतः स्वीकारली नाही तर तत्काल त्याप्रमाणे आचरणास सुरुवात केली. गांधींच्या प्रेम व अहिंसानिष्ठेचा उगम सर्व व्यक्तींची प्रतिष्ठा समान आहे या श्रद्धेत आहे.

सत्याग्रह, विश्वस्तवृत्ती, अर्थरचना या तिन्हींबाबत गांधींनी जो विचार मांडला त्यात एक उत्कृष्ट सुसंगती आहे. आपल्यापेक्षा निराळ्या भूमिकेवर उभी असलेली माणसे ही आपल्याइतकीच माणसे असल्याने त्यांची अप्रतिष्ठा न करणे, त्यांना इजा न पोचविणे हे आपले कर्तव्य आहे; आणि आपणासारखीच तीही माणसे असली तर त्यांच्यातला सद्भाव जागा करता आलाच पाहिजे, हे सूत्र सत्याग्रहाच्या व विश्वस्तवृत्तीच्या विचारा-पाठीमागे आहे. तर सर्व व्यक्तींची प्रतिष्ठा केवळ एका शोषणमुक्त समाजातच राहू शकते आणि केवळ श्रमिकांची, श्रमनिष्ठ जीवनावर उभारलेली अर्थव्यवस्थाच शोषणमुक्त असू शकते, हे सूत्र त्यांच्या आर्थिक विचाराच्या गाभ्याशी आहे.

गांधी म्हणतात की, राजकीय क्षेत्रात अहिंसा पूर्णपणे सिद्ध करावयाची असेल तर अर्थव्यवस्था ही शोषणमुक्त असली पाहिजे. ज्या व्यक्तीला किंवा देशाला अहिंसेच्या मार्गाने संरक्षण करावयाचे असेल त्या व्यक्तीने किंवा देशाने दुसऱ्याचे शोषण करून संपादन केलेल्या सर्व गोष्टींचा त्याग स्वतःहून प्रथम केला पाहिजे याची आवश्यकता गांधींनी म्हणून अत्यंत आग्रहाने प्रतिपादिली. याचा एक अर्थ असा की, समाजात ज्या व्यक्तींनी (आणि जगात ज्या लोकसमूहांनी–राष्ट्रांनी–) अवैध प्रमाणात साधनसंपत्ती व सत्ता आपल्या हाती गोळा केली असेल त्यांना गांधींच्या व्यवस्थेत संरक्षण मिळणार नाही. आपली बुद्धी, बळ, साधने यांचा वापर करून आपल्या मालमत्तेत भर टाकीत राहावे—म्हणजेच इतरांना नागवावे—ही आजवरची सामाजिक, आर्थिक व्यवहारातली परंपरा आहे. राष्ट्रांच्या पातळीवर हीच परंपरा 'प्रखर राष्ट्रवाद' म्हणून ओळखली जाते. या परंपरेवर प्रत्यक्ष आघात न करता उभारलेल्या साम्यवादी राज्यसत्तांमधील व्यक्तींचे व त्या राज्यसत्तांचे व्यवहारही या परंपरेनुसारच घडतात ही उद्बोधक गोष्ट आहे. म्हणून या देशांमध्ये देशान्तर्गत एक प्रचंड बलिष्ठ असे दमनयंत्र कायम ठेवावे व वापरावे लागत आहे. गांधीजींची 'स्वदेशी' आणि त्यांची 'शोषणमुक्ती' ही दोन अंगांनी या परंपरेवर

सरळ सरळ आघात करतात. तुमच्याजवळ बुद्धी जास्त आहे, तुम्ही अधिक बलवान आहात, योगायोगाने तुमच्याजवळ जास्त साधने एकवटली आहेत म्हणून तुम्ही आपल्या मालमत्तेचा आकार वाढवीत जावे किंवा सत्तेच्या परिसीमांचा विस्तार करावा हे योग्य नाही. ते अनैतिक आहे कारण शेजाऱ्याची ( किंवा शेजारी राष्ट्रांची ) अप्रतिष्ठा व शोषण करूनच तुम्ही हे करीत असता. तुमच्या गरजा भागविण्यापुरतेच घेण्याचा तुम्हाला रास्त अधिकार पोचतो; आणि तुमच्या रास्त गरजा कोणत्या ही गोष्टही समाजातल्या इतरांना, विशेषतः अंत्यजांना काय मिळते आहे यावरून निश्चित केली पाहिजे हा विचार त्यांनी मांडला. गांधींच्या विश्वस्तवृत्तीच्या सिद्धांताचा येथे एका अंगाने संबंध पोचतो. गांधींच्या विश्वस्त सिद्धांतासंबंधी पुष्कळ अपसमज प्रसृत आहेत. प्रस्तुत पुस्तकात त्यासंबंधीची गांधींची जी वचने व प्रश्नोत्तरे एकत्र केली आहेत ( पृ. ४८–६३ व पृ. ६७–७१ ) ती वाचल्यास बरेचसे गैरसमज दूर होतील. काही ठिकाणी गांधी संदिग्ध भूमिका घेतात. आजच्या विषम अवस्थेतून शोषणमुक्त समाजाकडे वाटचाल करीत असताना संक्रमणावस्थेत आजच्या साधनसंपत्तीवानांना ते काहीशी उदार वागणूक द्यावयास तयार होते. पण त्याचेही एक कारण जनता दुबळी व असंघटित होती हे असावे. कारण जनतेला आपले सामर्थ्य कळेल त्या दिवशी जमीनदारी व भांडवलशाही असहकारामुळे ‘ उपाशी मरून ’ जातील असे त्यांनी म्हटले आहे ( पृ. ५९ ). लोकहिताशी विरोधी असे स्वार्थमूलक हितसंबंध शासनाने ताब्यात घ्यावेत, व नुकसानभरपाई द्यायची की नाही हे सुद्धा त्या त्या मालमत्तेच्या स्वरूपावर व पूर्वपीठिकेवर अवलंबून ठेवावे ( पृ. ६९ ) असे त्यांनी १९३१ साली गोलमेज परिषदेत म्हटले होते हेही या ठिकाणी लक्षात घेण्यासारखे आहे. जमीनदार, भांडवलदार धनिकांना पाठीशी घालण्यासाठी विश्वस्त सिद्धांत नव्हता हा खुलासा पुराव्यानिशी निर्मलकुमारांनी केला आहे.

गांधी वास्तववादी होते. निसर्ग सर्व माणसांना गुण आणि कर्तृत्व सारख्या प्रमाणात वाटत नाही. काही माणसे हिकमती असतात, आक्रमक असतात, उपक्रमशील असतात, गुणवान असतात. कोणतीही समाजव्यवस्था कल्पिली तरी ती जिवंत व गतिमान असली तर काही माणसे इतरांपुढे गेल्याखेरीज राहणार नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. विश्वस्तवृत्तीचे, म्हणजे आपल्या गुण-कर्तृत्वावर समाजाचाही अधिकार आहे हे मूल्य समाजात रुजलेले नसेल तर अपरिहार्यपणे शोषक-शोषित अशी विभागणी घडून येत राहणार. मग एक तर या वस्तुस्थितीला पुष्कळ वाव देणारी भांडवलशाही व्यवस्था पत्करावी किंवा प्रबळ हुकूमशाही शासनाद्वारा ही वस्तुस्थिती कठोरपणे नियंत्रित करावी हे दोनच पर्याय उरतात. चीनसारख्या समाजवादी राष्ट्रातही नियतकालिक शुद्धीकरणाचा मार्ग अनुसरावा लागतो आहे. म्हणून, थोडा विचार केला तर, शोषणमुक्त व समताधिष्ठित समाजव्यवस्थेसाठी, किंबहुना व्यक्ती व समष्टी यांच्यात योग्य संबंध

स्वेच्छापूर्वक प्रस्थापित व्हायचा असल्यास विश्वस्तवृत्तीचे मूल्य व्यक्तींच्या ठिकाणी सार्वत्रिक स्वरूपात रुजण्याची गरज स्वयंसिद्ध असल्याचे लक्षात येईल. हे मूल्य सार्वत्रिक रुजल्यानंतरही काही व्यक्ती समाजकंटक प्रवृत्तींकडे झुकणाऱ्या निघतील ही शक्यता गांधींनी स्वीकारलेली होती. अशासाठी त्यांनी शासनाचा हस्तक्षेप योग्य मानला होता. विश्वस्तवृत्तीचा विचार केवळ बड्या धनिकांसाठी, मालमत्तावाल्यांसाठी नाही; खरे तर तो प्रत्येकासाठी आहे हे लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. हे लक्षात घेतल्यास हे तत्त्व आपल्या पोटात केवढी प्रचंड क्रांतिकारक शक्ती वागविते त्याचे योग्य भान होईल.

गांधींचा यंत्रविषयक दृष्टिकोण असाच अपसमजांचा धनी आहे. प्रस्तुत पुस्तकातील यासंबंधीच्या विवेचनाने अपसमज दूर व्हावेत (पृ. २१–३७). यांत्रिकी कारखानदारीचा उदय– सुप्रसिद्ध औद्योगिक क्रांती– श्रमिकांचे जीवन संपन्न व प्रतिष्ठित बनविण्यासाठी झाला नाही हे सहसा लक्षात घेतले जात नाही. उत्पादन वाढवून अधिक नफा कमविण्यासाठीच्या स्पर्धेतून यांत्रिक कारखानदारी फोफावली. गेल्या दोन-अडीचशे वर्षांत औद्योगिक तंत्रविद्येचा विकास प्रामुख्याने या शोषणाच्या प्रेरणेतून झाला व या प्रेरणेचा या तंत्रविद्येशी व औद्योगिक-सामाजिक-आर्थिक व्यवस्थेशी अतूट संबंध आहे ही गोष्ट अलीकडे लक्षात येत आहे. रस्किन, टॉलस्टॉय आदी द्रष्ट्यांना तो पाऊणशे–शंभर वर्षे आधी उमगला होता, व त्यांच्यापासून गांधींना त्याची उमज आली होती. काहींची धन होऊन बहुतेकांचे अकल्याण ज्यात होते, ज्यामुळे काहींची मिळकत व सत्ता बहुतांपेक्षा अधिक होऊन सामाजिक-राजकीय विषमता वाढते, ज्यामुळे काहींचे जीवन ऐदी बनते पण श्रमजीवींच्या श्रमिक जीवनाचे अवमूल्यन होते अशा कोणत्याही गोष्टीस गांधी सुधारणा म्हणावयास तयार नव्हते. अत्यंत प्रगल्भ अशा स्वयंचलित यंत्रांवर काम करणारा कामगार हा उच्चशिक्षित असेल, तो पांढरपेशा असेल, पण त्याची प्रतिष्ठा संशोधक, व्यवस्थापक, नियोजक यांच्यापेक्षा खूप कमीच राहते. श्रमिकाच्या प्रतिष्ठेचा विचार हा श्रमनिष्ठ जीवनाच्या प्रतिष्ठेपासून वेगळा करता येतो हा भ्रम आहे हे गांधींनी रस्किन-टॉलस्टॉय यांच्यापासून जाणले. जगातले बहुसंख्य लोक हे श्रमिक राहणार; उच्च तंत्रविद्येच्या भावी काळात त्यांच्या श्रमांचे स्वरूप ढोरमेहनतीचे न राहता कदाचित ते हलकेफुलके राहील ही शक्यता मानली तरी अखेरीस ते श्रमिकच राहणार. खऱ्या अर्थाने श्रमिकांचे राज्य जगात प्रस्थापित व्हावयाचे असेल तर श्रमनिष्ठ जीवन जगणे हे पायाभूत मूल्य म्हणून समाजात रुजले पाहिजे.

जे यंत्र श्रमनिष्ठ जीवनाच्या अप्रतिष्ठेस व कोणाच्या ना कोणाच्या शोषणास कारणीभूत होत नाही त्या यंत्राचे स्वागत करण्यास गांधी उत्सुक होते. हिंदुस्थानातील बेकारी व दारिद्र्य दूर करण्यात अडथळा न आणता, सत्तेचे केंद्रीकरण घडू न देता, खेड्यांचे स्वातंत्र्य मातीमोल करणारे परावलंबन निर्माण न करता जी यंत्रे व जी

कारखानदारी स्वीकारता येण्यासारखी असेल ती स्वीकारण्यास त्यांचा विरोध नव्हता. स्वातंत्र्यानंतर सव्वीस वर्षे यंत्रप्रधान कारखानदारीचा पाठपुरावा करून अनुभव घेतल्यानंतर याच भूमिकेवर आपण हळूहळू येत आहोत हे लक्षणीय आहे.

गांधी स्वतःस सनातनी हिंदू म्हणवीत, प्रेम व अहिंसेच्या भाषेत बोलत, खादी-ग्रामोद्योगांचा पुरस्कार करीत, आधुनिककालीन पाश्चात्य भौतिक संस्कृतीचा 'सैतानी' म्हणून धिक्कार करीत. त्यामुळे त्यांचे संपूर्ण क्रांतिकारकत्व दुर्लक्षित राहिले. क्रांतिकारक गांधीकडे दुर्लक्ष करणे इतःपर आपणास परवडणारे नाही.

'भारतीय राजकारणात गांधी' हा प्रदीर्घ प्रबंध हा या पुस्तकाचा दुसरा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. गांधी व काँग्रेस संघटना यांचे संबंध द्वंद्वात्मक – डायलेक्टिकल – राहिले याचा सुस्पष्ट बोध निर्मलकुमार करून देतात. गांधींनी काँग्रेसचे नेतृत्व केले, पण काँग्रेस ही गांधींची बटीक कधीच नव्हती; तिला नेहमीच एक स्वतंत्र अस्तित्व होते, तिची स्वतंत्र भूमिका होती. गांधींनी देशाला काय दिले, तसेच गांधींच्या कार्याला पडलेल्या मर्यादा कोणत्या होत्या याची सम्यक् कल्पना करून घेणे आवश्यक आहे. केवळ गांधींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले नाही असे गांधींचे विरोधक म्हणतात. गांधींचा अवतार झाला नसता तरी हिंदुस्थान स्वतंत्र झाला असता ही गोष्ट खरीच आहे. पण गांधींनी या देशाला काय दिले हे समजून घेण्याची आवश्यकता आहे.

भारतीय राजकारणात गांधींना चटकन मोठे वजन का प्राप्त झाले? दक्षिण आफ्रिकेत त्यांनी ब्रिटिश सत्तेशी दीर्घ काळ लढा दिला होता आणि भारतात परतल्यावरही त्यांनी यशस्वी लढे संघटित केले होते. अर्ज-विनंत्यांच्या राजकारणाला कंटाळलेल्या, प्रत्यक्ष कृतीची वाट शोधणाऱ्या तरुण व प्रौढ नेत्यांना गांधींनी आकृष्ट करून घेतले. गांधींची राहणी व त्यांचे विचार पुष्कळ अंशी अनाकर्षकच होते. भारतीय राजकारणातील तत्कालीन मोठ्या पुढाऱ्यांवर दृष्टिक्षेप टाकल्यास गांधींचे अनाकर्षकत्व अधिकच ठसते. पण गांधींपाशी जनआंदोलनांचा जो अनुभव होता, सर्वस्वानिशी लढ्यात उतरण्याची जी सिद्धता होती ती इतरांपेक्षा अधिक होती.

१९१९ ते १९४७ या काळातले स्वातंत्र्यलढ्याचे अवलोकन केले तर असहकारात्मक लढे आणि कायदेकौन्सिलांत राहून विरोध वा सहकार्य अशी काँग्रेसची आलटून पालटून भूमिका राहिलेली दिसते. १९१९–१९२२, १९३०–१९३४, १९४०–१९४४ असे लढ्यांचे तीन कालखंड नजरेस पडतात. हेच तीन कालखंड काँग्रेसमधील गांधींच्या नेतृत्वाचे कालखंड आहेत ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. लढा ओसरला की काँग्रेसचे नेतृत्व संसदीय राजकारणाकडे कल असलेल्या गटाकडे जाई. या गटाचे नेते गांधींचा मान राखत असले, त्यांचा सल्ला घेत असले तरी स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीने राजकारण करीत असे

आढळते. १९३० नंतर काँग्रेसचे नेतृत्व गांधींनी पुढे आणलेल्या व्यक्तींकडे आल्यानंतरही काँग्रेसने गांधींच्या निष्ठा पूर्णत्वाने अंगीकारल्या नाहीत. अहिंसा ही काँग्रेसची निष्ठा कधी बनली नाही. गांधींच्या खादीग्रामोद्योगांना काँग्रेसने स्थान दिले तरी त्यांचे अर्थशास्त्र वा ग्रामस्वराज्यात्मक समाजशास्त्रही काँग्रेसने स्वीकारले नाही.

थोडा अधिक सूक्ष्म विचार केला तर मुळात गांधी व काँग्रेस यांची उद्दिष्टे वेगळीच होती ही गोष्ट स्पष्ट होते. गांधींना हिंदुस्थानला अहिंसाचरणी बनवावयाचे होते; आपल्या विशिष्ट अर्थाने स्वराज्यास पात्र बनवावयाचे होते; शोषणमुक्त, श्रमनिष्ठ, स्वावलंबी ग्रामस्वराज्याची उभारणी करावयाची होती. तर ब्रिटिश सत्तेपासून राजकीय स्वातंत्र्य हस्तगत करण्यात काँग्रेसला रस होता. इतर बाबी स्वीकारल्यासारखे काँग्रेसने केले, कारण काँग्रेसला लढ्यांसाठी गांधींचे तज्ज्ञ नेतृत्व हवे होते.

या सर्व कालखंडाकडे पाहिल्यास आणखी एक गोष्ट लक्षात येते. दर काही वर्षांनी लोकक्षोभाचा पारा चढे. लोकांच्या आकांक्षा वाढलेल्या असत; शासनाचे वळण दडपशाहीचे असल्याने राजकीय असंतोष वाढलेला असे; आर्थिक परिस्थिती वाईट असल्याने जनता बेचैन व असंतुष्ट असे. अशा वेगवेगळ्या कारणांनी देशातले वातावरण तप्त होई. अशा वेगवेगळ्या कारणांच्या एकत्रित परिणामामुळे १९१८–१९ साली, १९२८–२९ साली, १९४०–४२ साली देश खदखदत होता. या असंतोषाचा भडका उडणे अपरिहार्य होते. बेशिस्त हिंसक उद्रेकात त्याचे पर्यवसान होऊ द्यायचे की अहिंसक लढ्याच्या द्वारा त्या असंतोषातून लोकशक्ती जागृत व संघटित करावयाची असा काहीसा प्रश्न असे. गांधी काय करीत होते ? देशातील प्रक्षुब्ध परिस्थिती ही त्यांची निर्मिती होती असा त्यांनी कधीच दावा केला नाही. या प्रक्षोभाला लढ्याच्या रूपाने सर्जक वाट काढून देऊन, या प्रक्षोभाचाही लोकांचे शील व सामर्थ्य वाढविण्यासाठी ते जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचा यत्न करीत. कोणत्याही देशातील जनता, काही विशेष बाह्य कारणे अस्तित्वात नसल्यास, दीर्घकाळ प्रक्षुब्ध राहात नाही. तिचा पारा पुन्हा ' नॉर्मल 'वर येतो. प्रक्षोभ ओसरला की, एका अर्थाने, गांधींना रजा मिळे. अशा काळात ते आपल्या रचनात्मक कार्यात गढून जात. इकडे काँग्रेसचे नेते ' शांततेच्या काळा 'तले कायदे-कौन्सिलांचे राजकारण करू लागत.

अस्पृश्यतेचे उच्चाटन, हिंदू-मुस्लिम ऐक्य, खेड्यांची सुधारणा, अर्थव्यवस्थेची पुनर्घटना इत्यादी मार्गांनी स्वराज्याची उभारणी गांधींना करावयाची होती. प्रेम, अहिंसा व शोषणमुक्ती या तत्त्वांवर मानवी संबंध उभारण्यातला एक भाग म्हणून ते राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीकडे पाहात होते. पण गांधींच्या या साऱ्या शिकवणुकीप्रमाणे काँग्रेस संघटनेने आचरण केले असे आढळत नाही. काँग्रेसमध्ये एकत्रित आलेले हित-संबंधी गट आपल्या स्वार्थावर व सत्तेवर पाणी सोडण्यास तयार नव्हते. याचे एक अत्यंत

दुःखद प्रत्यंतर १९४६–४७ सालच्या स्वातंत्र्याच्या वाटाघाटींच्या वेळी आले. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी काँग्रेसला हिंदू संघटनेच्या संकुचित भूमिकेवर आणून ठेवले व हा दर्जा काँग्रेसच्या नेत्यांनी विशेष प्रतिकार न करता मानला. या प्रसंगी काँग्रेसच्या नेतृत्वाने गांधींना ज्या सहजतेने एकाकी पाडले व अलग ठेवले ती घटना फार बोलकी आहे.

निर्मलकुमारांचा प्रबंध बारकाईने वाचत असता गांधी व काँग्रेस यांच्यातील हा संबंध उकलत जातो. या संबंधाच्या या द्वंद्वात्मक पैलूकडे आजवर दुर्लक्ष झाले आहे. वस्तुतः या संबंधाचे हे स्वरूप सर्वांत महत्त्वाचे आहे. निर्मलकुमारांच्या प्रबंधाचे महत्त्व या कारणासाठी आहे.

केवळ व्यवहारी धोरणाचा भाग म्हणून काँग्रेसने अहिंसेच्या मार्गाचा स्वीकार केला, मनात सूडाची, द्वेषाची भावना बाळगून आपद्धर्म म्हणूनच केवळ अहिंसेची कास लोकांनी धरली, याचे स्पष्ट दर्शन गांधींना प्रथम १९४०–४४ या काळात घडले. १९४६–४७ साली देशात दंगली उसळल्या त्या वेळी अहिंसेची शिकवण लोकांच्या मनावर बिंबविण्याच्या आपल्या आजवरच्या प्रयत्नांचे यश केवढे मर्यादित आहे त्याची विदारक जाणीव त्यांना झाली. काँग्रेस संघटनेच्या आश्रयाने कार्य करण्यात चूक झाली का, असा प्रश्न त्यांना या संदर्भात विचारलाही गेला. निष्ठा म्हणून अहिंसेचा स्वीकार केलेल्या सहकाऱ्यांना घेऊन कार्य करण्यासाठी आपण थांबलो असतो तर कामाला आरंभच आपण करू शकलो नसतो आणि म्हणून आपण केले ते योग्यच केले असे उत्तर गांधींनी सारासार विचार केल्यावर दिले.

१९२० साली हंटर कमिटीपुढे गांधींची साक्ष झाली. सत्याग्रह चळवळ कशासाठी आहे व तिचे स्वरूप काय ? असा प्रश्न प्रारंभीच त्यांना करण्यात आला. हिंसात्मक मार्गास पदच्युत करण्यासाठी ही चळवळ आहे, आणि केवळ या चळवळीच्या मार्गानेच सर्व देशभर ( गाऱ्हाण्यांच्या निवारणार्थ ) हिंसेचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता टाळता येईल असे त्यांनी सांगितले. भारतीय राजकारणात गांधींचा अवतार झाला नसता तर सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे तरुण वळले असते यात शंका नाही. गांधींनी आपल्या लढ्यांनी हे वळण टाळले इतके तर निश्चितच म्हणता येईल. त्या बदल्यात गांधींनी देश निष्क्रिय व लाचार ठेवला नाही, तर लाखो लोकांना क्रियाशील बनविले. १९२१–२२ व १९३०–३१ या दोन लढ्यांच्या वेळी लोकांनी दाखविलेली हिंमत व त्यांनी पाळलेली शिस्त वाखाणण्यासारखी होती. अहिंसेचा मार्ग हिंसेइतकाच प्रभावी होऊ शकतो, उपखंडा-इतक्या विस्तीर्ण देशातही तो अनुसरता येतो इतके गांधींनी खचितच दाखवून दिले. हिंदुस्थानच्या तात्कालिक संदर्भात गांधींचे यश अगदी अल्प वाटले तरी मानवजातीच्या भावी वाटचालीच्या संदर्भात त्यांच्या अल्प यशाचे मोलही पराकोटीचे आहे.

पाश्चात्य लोकशाही देश, एकाधिकारवादी आशियाई-आफ्रिकी-लॅटिन अमेरिकी

देश, साम्यवादी देश—सर्व आधुनिककालीन देशांमध्ये लोक आणि शासन यांच्यातील संबंध ही एक गंभीर बाब बनत चालली आहे असे निःशंकपणे म्हणता येईल. मानवी प्रतिष्ठेला काही अर्थ राहावयाचा असेल तर शासन आणि लोक यांच्यातला संबंध एकतर्फी असून भागावयाचे नाही ही गोष्ट लक्षात आलेली आहे. तसेच, विरोधी पक्ष हेही शासनाचाच एक भाग असतात, आणि दर काही वर्षांनी प्रतिनिधी निवडून देण्याने भागत नाही हेही दिसून येत आहे. शासन आणि लोक यांच्यात नित्य दुतर्फी संबंध राहावयाचा असेल तर तो एकाच वेळी संघर्षाचा व संवादाचा राहू शकला पाहिजे. तो हिंसक दहशतवादाच्या स्वरूपाचा असू शकत नाही ही गोष्टही उघड आहे. गांधींचा सत्याग्रहाचा मार्ग हा संघर्षातही संवाद राखणारा मार्ग आहे. उघडपणे, टोकाला जाऊन संघर्ष करीत असतानाही शासनाशी संवाद राखता येतो, आणि म्हणून सत्याग्रह हा एक परिवर्तनाचा सर्जक मार्ग आहे याचे क्षीण का होईना पण प्रत्यक्ष दर्शन गांधींनी हिंदुस्थानात १९१९ ते १९४७ या काळात घडविले. त्यांच्या अल्प यशाचे मोलही पराकोटीचे आहे ते यासाठी.

६–१–७४

वसंत पळशीकर

# भाषांतरकाराचे निवेदन

प्रा. निर्मलकुमार बोस यांच्या 'स्टडीज इन् गांधीझम्'चे भाषांतर मी करावे असे पुण्याच्या समाज प्रबोधन संस्थेच्या श्री. वसंत पळशीकरांनी प्रथम मला सांगितले; पण केवळ एवढीच सूचना करून ते थांबले नाहीत. या भाषांतराचा शब्दन् शब्द वाचून त्यांनी सुधारणा सुचविल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हे पुस्तक सिद्ध झाले आहे. श्री. पळशीकरांचे आभार शब्दात मानणे शक्य नाही एवढेच फार तर मला म्हणता येईल.

'स्टडीज इन् गांधीझम्' या पुस्तकाचे भाषांतर करताना मला इतर अनेक व्यक्तींचे साहाय्य झाले आहे. श्री वारणा महाविद्यालयातील माझे सहकारी प्रा. प्र. ह. देसाई व प्रा. व. मो. घाटे यांनी प्रत्यक्ष लिहिण्याच्या कामी तर साहाय्य केलेच पण प्रसंगविशेषी मला कंटाळा आला तेव्हा उत्तेजन देण्याचे कामही त्यांनीच केले. शाळेत असतानापासून ज्याने मला सर्वच जीवनात मदत केली त्या प्रभाकर राजपाठकचे या कामातही खूपच साहाय्य झाले आहे. पुस्तकाच्या प्रथम भाषांतराच्या वेळी लेखनाचे काम आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. नरूटे यांनी केले. या सर्वांचा मी आभारी आहे.

वारणानगर ( जि. कोल्हापूर ) **भा. रा. बापट**

# तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

'स्टडीज इन् गांधीझम्' या पुस्तकाची पहिली आवृत्ती १९४० मध्ये, दुसरी १९४७ मध्ये व तिसरी आता १९६२ मध्ये प्रकाशित होत आहे. वरील प्रत्येक वेळी सर्व पुस्तकांत अनेक सुधारणा केल्या आहेत व कित्येक भाग सर्वस्वी बदलले आहेत. अशा रीतीने नाव तेच असले तरी प्रत्येक आवृत्ती हे नवे पुस्तकच आहे. पण याबद्दल क्षमायाचनेची गरज आहे असे वाटत नाही. कारण कित्येक वेळा घटनांबरोबर कल्पना बदलत जातात व नवीन संदर्भात त्यांचे पुनर्मूल्यांकन होऊ शकते.

वाचकांना माझी एक विनंती आहे : हे पुस्तक वाचीत असताना त्यानी संदर्भासाठी माझी 'सिलेक्शन्स फ्रॉम गांधी', 'माय डेज् वुइथ गांधी'* ही पुस्तके कायम हाताशी ठेवावीत. या पुस्तकातील एखाद्या मुद्द्याची मांडणी स्थलसंकोचामुळे अतिसंक्षिप्त म्हणून अस्पष्ट वाटल्यास तो मुद्दा समजण्यासाठी वरील पुस्तकांचे साहाय्य होईल.

'कमर्शियल प्रिंटर्स'च्या श्री. तारापद बोस यांचा मी फार आभारी आहे. कामाची अत्यंत निकड असूनही त्यांच्यामुळेच पुस्तकाची छपाई उरकणे शक्य झाले आहे.

३७ ए, बोसपारा लेन
कलकत्ता ३
१३ जून, १९६२.

निर्मलकुमार बोस

---

* 'सिलेक्शन्स फ्रॉम गांधी' हे गांधींच्या निवडक वेच्यांचे पुस्तक नवजीवन प्रकाशन संस्था, अहमदाबाद यांनी प्रकाशित केले आहे.

'माय डेज् वुइथ गांधी' या पुस्तकाचे मराठी भाषांतर 'गांधींच्या जीवनाचे अखेरचे पर्व' या नावाने प्रस्तुत पुस्तकासोबतच महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ प्रकाशित करीत आहे.

# अनुक्रमणिका

प्रकरण


| | | |
|---|---|---|
| १. | गांधीवादाचा परिचय ... | १ |
| २. | अहिंसेचे अर्थशास्त्र ... | १९ |
| ३. | स्वराज्य आणि राज्यसत्ता ... | ३९ |
| ४. | विश्वस्तवृत्तीचा सिद्धान्त ... | ४८ |
| ५. | एक मुलाखत ... | ६४ |
| ६. | कलह व ते सोडविण्याची हिंदु संस्कृतीतील पद्धत ... | ७२ |
| ७. | सत्याग्रह : अर्थ आणि कार्यपद्धती ... | ११८ |
| ८. | भारतीय राजकारणात गांधी ... | १२९ |
| ९. | गांधी आणि लेनिन ... | ३१० |

# संक्षेप

[ आधारभूत संदर्भ पुस्तकांचे सर्वत्र वापरलेले संक्षिप्त रूप व पुढे पूर्ण तपशील दिला आहे. अन्य संदर्भांचा तपशीलवार उल्लेख ज्या त्या ठिकाणी केला आहे. ]

आत्मवृत्त— 'दि स्टोरी ऑफ माय एक्स्पेरिमेंट्स विथ ट्रुथ' (दुसरी आवृत्ती, मे, १९४३), नवजीवन पब्लिशिंग हाउस, अहमदाबाद.

गांधी— 'गांधीजी: हिज लाइफ अँड वर्क' (१९४४ मध्ये ७५ व्या वाढदिवशी प्रसिद्ध केलेला ग्रंथ), कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई.

हरिजन— साप्ताहिक हरिजन, १९३४ पासून.

यं. इं.— साप्ताहिक यंग इंडिया, १९१९–१९३२.

पत्र— 'गांधीजीज कॉरेस्पॉंडन्स विथ दि गव्हर्नमेंट १९४२–४४' (दुसरी आवृत्ती, सप्टेंबर १९४५), नवजीवन पब्लिशिंग हाउस, अहमदाबाद.

भाषणे— 'स्पीचेस अँड रायटिंग्ज ऑफ महात्मा गांधी' (चौथी आवृत्ती), जी. ए. नटेसन अँड को., मद्रास.

इं. अॅ. र.[1]— 'दि इंडियन ॲन्युअल रजिस्टर', प्रकाशक: एन्. एन्. मित्रा, ॲन्युअल रजिस्टर ऑफिस, कलकत्ता.

हिं. स्व.— 'हिंद स्वराज ऑर इंडियन होमरूल', मो. क. गांधी (१९४४), नवजीवन पब्लिशिंग हाउस, अहमदाबाद.

सिलेक्शन्स[2]— 'सिलेक्शन्स फ्रॉम गांधी', एन्. के. बोस, नवजीवन पब्लिशिंग हाउस, अहमदाबाद.

र. का.— 'कन्स्ट्रक्टिव्ह प्रोग्रॅम: इट्स मीनिंग अँड प्रेस', एम. के. गांधी (डिसेंबर १९४५), नवजीवन पब्लिशिंग हाउस, अहमदाबाद.

'सत्याग्रह इन साउथ आफ्रिका', मो. क. गांधी (१९२८), एस्. गणेशन्, मद्रास.

---

**सर्वसाधारण दुरुस्ती**

१. पृ. १३३ ते १७७ पर्यंत 'इं. ॲ. रि.' असा संक्षेप पडला आहे.

२. पृ. १० ते ३० च्या दरम्यान 'सिलेक्शन, पृ.... ' असा संदर्भ दिला गेला आहे. संदर्भ पृष्ठाचा नसून वेचा क्रमांकाचा आहे; आकडे वेच्यांचा क्रमांक दर्शवितात. पृ. १७-१८ वरील टीप क्र. ३ मधील वेच्यांचे आकडे अनुक्रमे ७ व ५ असे पडले आहेत ते v व vii असे हवेत.

प्रकरण पहिले

# गांधीवादाचा परिचय

गांधींच्या लिखाणाचा मी अत्यंत काळजीपूर्वक व आदरपूर्वक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लिखाणाचा अर्थ जास्तीत जास्त स्पष्ट व्हावा म्हणून माझे मन शक्य तो माझ्या वैयक्तिक आवडीनिवडींपासून मुक्त ठेवण्याचा माझा प्रयत्न राहिला आहे. परंतु ही प्रस्तावना सादर करताना गांधींच्या मतांबरोबरच टीकाटिप्पणीच्या स्वरूपात क्वचित माझे विचारही मांडल्यास ते क्षम्य ठरावे. त्यामुळे ज्याच्याबरोबर वाचकाला खूपच लांबचा, कदाचित कंटाळवाणा, प्रवास करावयाचा आहे त्याचे मानस वाचकास परिचित होईल.

## इतिहासविषयक तत्त्वज्ञान

गांधींच्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानापासूनच आपण सुरुवात करू. आजवरच्या मानवेतिहासापासून गांधी काय बोध घेतात? काही प्रसंगी घ्यावी लागलेली तात्कालिक माघार सोडल्यास, सर्वसाधारणपणे, मानवाची प्रगतीच होत आहे असे मत असणाऱ्यांपैकी गांधी होते. दुसऱ्या भाषेत, काळाबरोबर मानवांतील बंधुभाव व ऐक्य सतत वाढत आहेत असे त्यांचे मत होते.[१]

गांधीजींच्या या मताची चर्चा आपण थोडी नंतर करू. तत्पूर्वी एका वेगळ्या राजकीय तत्त्वप्रणालीच्या मंडळींच्या या बाबतीतील याच प्रकारच्या विचारांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. गांधींसारखेच, 'मानवी समाजाची एकसारखी प्रगती होत आहे' असेच माझ्या ओळखीतील कित्येक मार्क्सवाद्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते एका नैसर्गिक नियमाच्या कार्यवाहीतून ही प्रगती घडून येत असते. भौतिक वा जैविक उत्क्रांतीही अशीच निसर्गनियमांनुसार होते. गांधी ईश्वरेच्छा म्हणतात त्या ठिकाणी मार्क्सवादी 'इतिहास' किंवा 'निसर्ग' या शब्दांची योजना करतो.

मानवाच्या एकंदर भूतकालीन कामगिरीचा आढावा घेता त्याने सातत्याने आणि खूपच प्रगती केली आहे ही गोष्ट उघड होते, मग ती प्रगती मोजण्याचे माप कोणतेही

असो. परंतु ही प्रगती फारशी खोल रुजलेली नसावी; कारण माणसाच्या जन्मजात गुण-दोषांवर तिचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. उदाहरणार्थ, आशियाच्या एखाद्या कोपऱ्यातील एकाकी घरात जन्मलेल्या मुलापेक्षा पश्चिम युरोपातील अत्यंत सुसंस्कृत वातावरणात जन्मलेल्या मुलातील सहजप्रवृत्ती फारशा वेगळ्या असल्याचे दिसत नाही. तरी विभिन्न सामाजिक वातावरणांमुळे त्यांच्या वागणुकीत पडणारा फरक मात्र अगदी स्पष्टपणे जाणवतो. काही थोड्याशा, ठराविक साच्याच्या सामूहिक अनुभवांतून जाणाऱ्या व्यक्तीपेक्षा अनेक प्रकारच्या सामाजिक संबंधांशी व विविध प्रकारच्या वैयक्तिक परिस्थितीशी जुळवून घ्याव्या लागणाऱ्या व्यक्तीचे मन अधिक लवचिक व संपन्न बनते.

यावरून इतिहासपूर्वकालीन मानवाच्या मनापेक्षा वारशाने अपरंपार सांस्कृतिक संचित लाभलेल्या आधुनिक माणसाचे मन श्रेष्ठ दर्जाचे असणारच असे मानणे तर्कविसंगत ठरणार नाही. आधुनिक माणूस प्राथमिक माणसापेक्षा मुळातच श्रेष्ठ आहे असे म्हणणे आणि वरील विधान यांचे अर्थ एकच नाहीत हे ध्यानात घेतले पाहिजे. आजवरची गोचर प्रगती मुख्यतः संस्कृतीचा संचय व तिच्याशी व्यक्तीची होणारी जुळवणूक यांमुळे झालेली आहे.

याखेरीज आणखी एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की, विषम संधीं-मुळे मानवसमाजातील बहुसंख्य लोकांना या सांस्कृतिक प्रगतीचा फारसा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे ही माणसे आजही सांस्कृतिकदृष्ट्या आदिमानवांच्याच पातळीवर आहेत. मानवी प्रगतीमध्ये सहभागी होण्याचे भाग्य ज्यांना लाभले आहे त्यांच्या बाबतीतही मानसिक विकासाची पोच फारशी खोल गेलेली नसण्याची शक्यता आहे. कारण जेव्हा विकार भडकावले जातात तेव्हा ' सुसंस्कृत ' माणसेसुद्धा, प्राण्यांनाही लाज वाटावी इतक्या रानटीपणे वागतात. वैयक्तिक वा तात्कालिक जमातीय स्वार्थ यांपेक्षा उच्चतर उद्दिष्टांनुरूप आपल्या कृतींना वळण लावण्याची ज्यांनी स्वतःला सवय लावून घेतली आहे अशी माणसे मात्र अत्यंत प्रक्षोभक स्थितीतही संयम दाखवू शकतात व ती तो दाखवितातही. माणसात प्रागतिकता अनुवंशाने उतरत नसून शिक्षणाने माणूस उन्नत बनतो असा याचा अर्थ होतो.

या मर्यादेतही पुढील विधान आपणांस निःसंकोचपणे करता येईल : पुरेशा दीर्घ कालावधीचा विचार केल्यास, मानवी स्वभाव उन्नत होत चालला आहे असा बोध इतिहासावरून काढता येतो. याचे कारण अंशतः, वर दर्शविल्याप्रमाणे, कालौघात संचित संस्कृतीत पडत गेलेली स्वाभाविक भर व लोकांची तिच्याशी होणारी जुळवणूक हे आहेच. पण मी असे म्हणेन की, याला आणखीही एक कारण आहे. दुःखात गांजणाऱ्या मानवतेबद्दल अपार सहानुभूती असणाऱ्या व्यक्तींचा प्रभावही मानवी स्वभाव उन्नत होण्याला थोडाफार कारणीभूत ठरलेला आहे. ज्या मुशीत त्यांचे व्यक्तिमत्त्व जडलेघडले

त्या परिस्थितीमध्ये अशा व्यक्तींच्या ठायी असलेल्या दलितांविषयीच्या कणवेचे पूर्ण स्पष्टीकरण मिळत नाही; त्याच परिस्थितीत घडलेल्या इतरांपेक्षा यांना दलितांविषयी अनेक पटींनी जास्त कणव होती. मार्क्स किंवा क्रोपोटकिन् यांचा मानवी ऐक्याबद्दलचा दृष्टिकोण त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीच्या स्वाभाविक संदर्भाच्या मानाने किती तरी जास्त विशाल होता. बुद्ध किंवा येशू यांच्याबद्दलही तेच म्हणता येईल. अगदी आपल्या काळातील गांधीजींची गोष्टही अशीच आहे. या व्यक्तींच्या ठिकाणी ही कणव किंवा प्रेम जन्मजात असेल; किंवा उगमस्थानी ते लहान धारेसारखे असेल आणि नंतरच्या काळातील त्याच्या क्रियाशील उपयोजनेमुळे त्याची व्याप्ती असाधारण विशाल झाली असेल. अशा व्यक्तींचे नेतृत्व हेच मानवी प्रगतीचे मुख्य कारण आहे असे मला वाटते.

एखादा मार्क्सवादी यावर शंका उपस्थित करून– व ती शंका त्याच्या दृष्टीने बरोबरच ठरते– म्हणेल, ' ठीक आहे. पण तुमचे म्हणणे अर्धसत्यच आहे. कारण अशा व्यक्तींच्या मानसिक घडणीत दैवी असे काहीच नाही. त्यांच्या वैयक्तिक चरित्रावरून तिचे स्पष्टीकरण सहज मिळेल. शिवाय भोवतालची बाह्य स्थिती अशा व्यक्तींकडे नेतृत्व जाण्यास योग्य झाली तरच त्या नेते होऊ शकतात. ही वस्तुस्थितीच मानवी मनात आकांक्षेची बीजे पेरते. नेत्यामध्ये त्या आकांक्षेचा आविष्कार जरा जास्त तीव्र असतो इतकेच. व्यक्तिगत नेतृत्वाला तुम्ही महत्त्व देता ते फाजील आहे. वास्तविक सर्व प्रगतीच्या मुळाशी भौतिक जीवनस्थितीच आहे. डायलेक्टिकच्या तत्त्वानुसार ती उत्क्रांत होत तिचा शेवट श्रमिक मानवतेला मुक्ती मिळण्यात होणार आहे. '

अंशतः या टीकेत तथ्य आहे हे मान्य करूनही, दुर्दैवाने, इतिहासाची वाटचाल अटळपणे श्रमिकांच्या मुक्ततेच्या दिशेनेच चालली आहे या किंवा मानवी प्रगती ही एका निरपवाद निसर्गनियमानेच होत आहे या मार्क्सवादी श्रद्धेशी आपण सहमत होऊ शकत नाही. तसे असते तर आजच्यापेक्षा अधिक प्रगती झालेली दिसावयास हवी होती. आजही मोठमोठे समाज अत्यंत क्षुद्र व संकुचित स्वार्थामागे लागलेले दिसतात. शिवाय अखेरीस सर्व प्रतिक्रांतीवादी शक्ती नष्ट होतील असे मानायला काय पुरावा आहे ? आजच्या श्रमिकांचे स्वातंत्र्य व ऐक्य त्यांच्या अंतिम विजयाने प्रस्थापित होतील असे कशाच्या आधारावर मानावयाचे ? याला काही आधार असलाच तर तो, ' या व्यतिरिक्त दुसरे काही होऊ देणारच नाही ' या आमच्या निश्चयाचाच तेवढा आहे.

परमेश्वरावर श्रद्धा असणारा मनुष्य म्हणेल की, जनसामान्यांच्या मनात असा निश्चय आढळतो, विजयश्री संपादन करण्याचे सुप्त सामर्थ्य असणाऱ्या या प्रवृत्ती प्रकट करणारे समर्थ नेते त्या त्या वेळी मिळतात, मानवाला नेहमी उच्चतर ध्येयाची वाट दाखविणाऱ्या विचारवंतांची व द्रष्ट्यांची अखंड मालिका निर्माण होते, यांवरून मानवाचे भवितव्य एका श्रेष्ठतर दैवी नियमानुसार घडत आहे हेच सिद्ध होते. गांधींच्या

लिखाणात कित्येक ठिकाणी ही श्रद्धा निश्चितपणे अनुस्यूत असल्याचे आढळते. व्यक्तिशः माझ्यापुरते मला हे सांगितले पाहिजे की ही श्रद्धा बाळगावी यासाठी कोणताच सबळ पुरावा मला आढळलेला नाही. माझ्या दृष्टीने अशा 'उच्चत्तम हेतू'चे अस्तित्व सिद्ध झालेले नाही, किंवा ते नाशाबीतही झालेले नाही. माझी ही भूमिका आहे तोपर्यंत मानवेतिहासाच्या क्रमात आज दिसत असलेली प्रगती (ती फार खोलवर रुजलेली नसली तरी) ही क्रियाशील सुजाण सहानुभावाच्या उद्यमानेच शक्य झाली आहे अशी श्रद्धा बाळगणेच मी पसंत करीन. भौतिक सुबत्तेच्या स्थितीतही समाजातील गटांच्या ठिकाणची संकुचित स्वार्थबुद्धी न सुटल्यामुळे आपल्या बांधवांना सोसावे लागणारे दुःख व क्लेश पाहून ज्यांना वेदना झाल्या अशा विश्वबंधुत्वाच्या भावनेने प्रेरित झालेल्या व्यक्तींनी अधूनमधून मानवजातीला नवी वाट दाखवली आहे. माणसांना संकुचित वृत्ती टाकून द्यायला शिकवले आहे. जी काय थोडी प्रगती प्रत्यक्षात झालेली दिसते ती अशीच झालेली आहे असे मी म्हणेन. पण जे घडते ते त्याच वेळी का घडते असा प्रश्न जर कोणी उपस्थित केला तर माझ्याजवळ त्याला उत्तर नाही. तसेच तंत्रविद्येतील प्रगतीमुळे उत्तरोत्तर अधिकाधिक मोठे समाज बनवून राहणे क्रमप्राप्त झाल्यामुळे, त्या अपरिहार्य निकडीतून मानवी मन प्रगल्भ झाले असे म्हणता येणार नाही का असा प्रश्न कोणी केल्यास, याबाबत 'मी अजून कोणत्याच निर्णायक अनुमानाला पोचलेलो नाही,' असे सांगणेच मी पसंत करीन. प्रगतीच्या व सुधारणांच्या मार्गात खोडा घालणाऱ्या सनातनी वृत्तीचा मी फार अनुभव घेतला आहे. त्यामुळे मनःप्रवृत्तींचे अडसर केवळ 'ऐतिहासिक अनिवार्यता' म्हणून अटळपणे आपोआप दूर होतील यावर माझा विश्वास नाही.

संस्कृतीविषयक एका बीज-वृक्षात्मक सेंद्रिय उपपत्तीवर मार्क्सवादी विश्वास ठेवतो असे वरील विवेचनातील एक गर्भित आहे. त्याची अशी धारणा आहे की, मानवी संस्कृती एका ठराविक क्रमाने उत्क्रांत होत आहे. त्या मार्गाने गेल्याने शेवटी जगातील सर्व श्रमपीडित माणसांची मुक्तता होणार आहे हेही ठरलेलेच आहे. नदीचा प्रवाह शेवटी सागराला मिळणार हे जसे निश्चित तसेच अखेरीस श्रमपीडितांची मुक्ती साधणार हेही निश्चित.

नदीच्या प्रवाहाची ही उपमा थोडी पुढे नेता येईल. नदीचा प्रवाह तिच्या दोन काठांनी मर्यादित झालेला असतो. आणि या काठांचे स्वरूप व आकार बऱ्याच अंशी प्रवाहाचा वेग आणि दिशा यांनीच ठरवले जातात, हे आपल्याला माहीत आहेच. त्याप्रमाणेच सांस्कृतिक प्रवाहही त्यात पतित असणाऱ्या व्यक्तींच्यात विशिष्ट मनोवृत्ती निर्माण करतो. संस्कृतीच्या प्रत्येक टप्प्यावर तत्कालीन समाजातील व्यक्तींच्या मनातील कामना पूर्वनिश्चित असतात. त्यांचा आकार व वळण प्रचलित विचारप्रणाली व मूल्यप्रणाली

यांच्या रूपाने व्यक्त होतात. या विचार व मूल्यप्रणाली त्या त्या वेळच्या सांस्कृतिक प्रवाहाशी सुसंगत अशाच असतात. मात्र वस्तुनिष्ठ समाजस्थिती आणि व्यक्ती यांच्या भूमिका निखालस कर्तरी आणि निखालस कर्मणी अशा नसतात, उभयतांची एकमेकांवर सतत क्रिया-प्रतिक्रिया होत असते. मार्क्सवाद मात्र वस्तुनिष्ठ सामाजिक परिस्थितीला व्यक्तीपेक्षा जास्त महत्त्व देतो हे नाकारता येणार नाही. म्हणजेच, मार्क्सवादाप्रमाणे समाजातील काही व्यक्तींची प्रगती करण्याची इच्छा असूनही परिस्थिती अनुकूल नसेल तर मुळीच प्रगती होणार नाही; उलट वस्तुनिष्ठ परिस्थिती परिपक्व झालेली असेल तर बराच मोठा समाज क्रांतीला प्रतिकूल असूनही मूठभर व्यक्तीसुद्धा क्रांती घडवून आणू शकतील. अशा वेळी त्या मूठभर व्यक्तींनी भविष्याची चाहूल घेऊन पुढे पाऊल टाकले पाहिजे. बाकीचा समाज कितीही मोठा असला तरी थोड्याच कालावधीत तो आपोआप क्रांतीच्या मागे येईल.

हे जर खरे असेल तर मार्क्सवाद्याच्या दृष्टीने क्रांतिकारकांचे कार्य तरी कोणते ? त्याच्या मते खऱ्या क्रांतिकारकाला संस्कृतीच्या प्रगतीच्या जगन्नाथाचा रथ कोणत्या मार्गाने जाणार हे आधीच कळते. त्या मार्गातील अडचणी दूर करणे एवढेच कार्य मार्क्सवाद त्याला सांगतो. भोवतालची समाजस्थिती पुढची झेप घेण्यास परिपक्व झालेली आहे हे त्याला व त्याच्यासारख्या इतर काहींना पटले की समाजातील लाखो लोकांच्या आत्मनिष्ठ क्रियाशीलतेला तुलनेने फारच कमी महत्त्व उरते. त्यांच्यामुळे रथाच्या चालीत थोडा खडखडाट होईल कदाचित; त्यांच्यामुळे प्रगतीला काहीसा विरोधही होईल; थोडी जास्त काळजी घेतल्यास कदाचित हा विरोध टाळता येण्यासारखा असेलही; पण क्रांतिकारकाने ही उठाठेव करण्याचे कारण नाही. भोवतालच्या समाजस्थितीत जास्तीत जास्त वेगाने बदल घडवून आणण्यासाठी त्याने प्रयत्न करावयाचा एवढेच. नव्या जीवनक्रमाशी मिळते घ्यायला जनता लवकरच शिकेल. जे विरोध करतील ते त्याची फळे भोगतील, क्वचित नष्टही होतील. ते अनुकूल झाले तर त्यांचे जीवन सरळ आणि सुखी होईल; आणि क्रांतीही जरा जास्त लवकर सफळ होईल.

या सैद्धांतिक दृष्टिकोणामुळे प्रत्यक्ष जीवनात मात्र मार्क्सवाद्याची स्थिती थोडी चमत्कारिक होते. वर म्हटल्याप्रमाणे त्याचा उद्देश परिस्थितीत लवकरात लवकर परिवर्तन करणे हा असतो. परिवर्तन लवकरात लवकर करावयाचे आहे या उद्दिष्टामध्ये त्याला हिंसक क्रांतीच्या मार्गाचे समर्थन सापडते. हिंसेबद्दल त्याला काही खास आकर्षण असते असे मुळीच नाही. इतर कोणत्याही शांतिप्रिय माणसांइतकाच तोही हिंसा टाळण्याचा प्रयत्न करतो; सर्व शांततावाद्यांइतकीच जगाला युद्धाच्या कचाट्यातून सोडविण्याची त्याचीही इच्छा असते; पण सशस्त्र संघर्षाचा मार्ग सर्वांत जवळचा म्हणून त्याच्या दृष्टीने तो सर्वांत इष्ट ठरतो.

ऐतिहासिक घडामोडी अशा आपसूक घडणार आहेत ही भूमिका* पत्करणे मला स्वत:ला जड जाणारे आहे— त्यातून मानवाच्या त्वरित मुक्ततेचे आश्वासन मिळत असले तरी. तसेच संस्कृती आणि तिच्यातले व्यक्तीचे कार्य याविषयीच्या आपल्या भूमिकेतून मार्क्सवादी जे व्यवहारात निष्कर्ष काढतो त्यांचाही मी स्वीकार करू शकत नाही. बहुतेक माणसांची भूमिका कर्मणी असते यात शंका नाही, पण वेळप्रसंगी ती वेगळ्याच प्रकारे वागू शकतात हेही खरे आहे. व्यक्ती आणि बहुजनसमाज कृतिप्रवण झाले आणि त्यांनी संस्कृतीला आणि अर्थव्यवहारांना वेगळे वळण दिले असे प्रसंग इतिहासात घडले आहेत. असे प्रसंग विरळ आहेत हे खरे. त्याचे कारण प्रत्येक बदलानंतर सोसावे लागणारे क्लेशदायी परिणाम टाळण्याकडेच लोकांची वृत्ती असते. सवयीचे सोडून नवे वळण स्वतःस लावून घेण्यात माणसाची मानसिक शक्ती खर्ची पडते, तर आपली मानसिक व शारीरिक उमेद राखून जीवन उपभोगण्याकडे सर्वसामान्य माणसाचा कल असतो. या वृत्तीतून माणसे प्रचलितापुढे मनानेच शरणागती पत्करतात. माणसांमधील या शरण जाण्याच्या प्रवृत्तीमुळेच प्रस्थापित संस्कृतीचे सर्वसामान्यांच्या जीवनावर इतके कमालीचे प्रभुत्व असते.

नदी आणि तिचे काठ हीच उपमा चालू ठेवल्यास, प्रामुख्याने नदीचा प्रवाह काठांची रचना ठरवीत असतो, हे मार्क्सवाद्यांचे म्हणणे मान्य करूनही आपणास एक गोष्ट विसरून चालणार नाही. ती अशी की, नदीकाठ हा वास्तविक जमिनीचाच एक भाग असतो. ही जमीन– तिची भूपृष्ठ व भूस्तररचना– बऱ्याच अंशी प्रवाहाचे वळण ठरवीत असते. भूरचना सतत उत्क्रांत होत असते. पण नदीच्या प्रवाहाला जसा समुद्राकडे जाण्याचा मार्ग काढावयाचा असतो तसे भूपृष्ठाच्या रचनेपुढे कसलेच अपरिहार्य अंतिम 'उद्दिष्ट' असत नाही. सामाजिक परिवर्तनांबाबतही, ती अखंडपणे एका दिशेने घडत नाहीत की त्यांच्या बाबतीत दिशाविषयक भरवसा देता येत नाही. त्या क्षणी लोकांची निवड काय असते त्यावरून बदलाची दिशा ठरत असते. लोक कृती करून आपली निवड जाहीर करतात की क्रियाशून्य राहून निवड दर्शवितात ते अप्रस्तुत आहे.

म्हणून मार्क्सवादी देतो त्यापेक्षा सामाजिक क्रांतीच्या प्रक्रियेत व्यक्तींच्या कर्तृत्वाला मी जास्त महत्त्वाचे स्थान देतो. भोवतालची परिस्थिती कशीही असली तरी सत्याग्रही व्यक्तीने पराभूत मनोवृत्तीने पछाडले न जाता आपले ईप्सित ध्येय गाठण्याचा मार्ग काढला पाहिजे. वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल की, वस्तुनिष्ठ जीवनस्थितीत असलेल्या सुप्त संभाव्यतांच्या चौकटीत कार्य करीत असताना आपल्या कार्याने त्या सुप्त संभाव्यता मूर्त करण्यासाठी आवश्यक असलेली निर्णायक भर घालून भोवतालची परिस्थिती त्याला पालटविता आली पाहिजे. माझी अशी खात्री आहे की, मार्क्सवादीसुद्धा, स्वतः किंवा त्याचा पक्ष नेमके हेच करीत असतो असा दावा करील. याचा अर्थ

तत्त्वविवेचनाच्या पातळीवर देतो त्यापेक्षा प्रत्यक्षात तो व्यक्तिगत, आत्मनिष्ठ कारकाला जास्त महत्त्व देतो असाच होतो.

## साधनभिन्नता

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी वापरावयाच्या मार्क्सवाद्याच्या व सत्याग्रहीच्या साधनांत जो मोठा फरक दिसून येतो त्याचे कारणही वरील विवेचनातच मिळते. मार्क्स-प्रणीत विचाराप्रमाणे परिवर्तन घडवून आणण्याची योजना अशी : सर्व सामाजिक आणि इतरही सत्ता जेथे एकवटलेल्या असतात ती राज्यसत्ता प्रथम सध्याच्या शासकवर्गाकडून हिसकावून घ्यावयाची. नंतर ती श्रमिक वर्गाच्या हुकूमशाहीच्या ताब्यात ठेवावयाची. श्रमिक हुकूमशाहीने पिळवणूक अशक्य होईल अशी समाजव्यवस्थेची पुनर्रचना करावयाची, जेणेकरून जुन्या सामाजिक संस्था नष्ट होतील व जुन्या सवयी, चालीरीती, मूल्ये बाजूला सारून त्या जागी नव्या उद्दिष्टांच्या सामाजिक संस्थांना अनुकूल अशा सवयी, चालीरीती व मूल्ये प्रस्थापित केली जातील. सर्वसाधारण बहुसंख्य जनता मानसिक जडत्व पसंत करीत असल्याने ती या नव्या चाकोरीत सहज रुळून जाईल अशी आशा मार्क्सवादी बाळगत असतो. पण तसे झाले नाही तर कठोर शिक्षांच्या वापराने आपणाला हवा असलेला बदल घडवून आणण्यास तो मागेपुढे पाहाणार नाही. दुर्दैवाने हिंसेची ही मालिका तुटतच नाही; कारण मार्गात नवनवीन अडथळे येतच असतात आणि त्यांतील बरेच अडथळे आधी केलेल्या हिंसाचारातूनच उद्भवलेले असातात.

याउलट मानवजातीच्या मानसिक ठेवणीतच मूलभूत बदल घडवून आणण्यावर गांधींचा जास्त भर होता. आपापल्या वैयक्तिक प्रयत्नांनी पूर्णत्वाला पोचलेल्या माणसांची संघटना उभारून नव्हे तर जनतेच्या सामूहिक कृतीद्वारा हे घडवून आणण्याची त्यांची कल्पना होती.

'अहिंसामय असहकार' व 'रचनात्मक कार्यक्रम' हा गांधींचा द्विदली कार्यक्रम आचरणात आणून स्वतःस अधिकाधिक निर्दोष व परिपूर्ण बनविण्याचा प्रयत्न करणारी जनता अशी सामूहिक कृती करील अशी कल्पना होती. नेमकी याच ठिकाणी गांधींच्या विचारातील अभिजातता दिसून येते.

राजकीय सत्तेच्या साहाय्याने 'जैसे थे' घडी कायम राखू इच्छिणाऱ्यांच्या विरोधात उत्पादनव्यवस्थेचा नवा नमुना निर्माण करावयाची कल्पना 'रचनात्मक कार्यक्रमा'-मागे आहे. सर्वांना श्रमिक बनवून मानवी संपत्तीची काटेकोरदृष्ट्या समान नसली तरी, समुचित वाटणी करावी हा अशा उत्पादनव्यवस्थेमागील उद्देश राहील. संपत्ती वारशाने मुलाबाळांना हस्तांतरित करण्याची सोय कायद्यात नसेल तर वैयक्तिक स्वरूपाची

आर्थिक विषमता विशेष हानिकारक ठरणार नाही असे गांधींचे मत होते. वारसा हक्कामुळेच समाजात एका खास हक्क असलेल्या वर्गाच्या निर्मितीची बीजे पेरली जातात. भल्याबुऱ्या कोणत्याही मार्गांनी राज्यकर्त्यांना हुसकून काढावे अशी अहिंसामय असहकारामागची कल्पना नाही. अन्याय्य म्हणून शाबित झालेल्या गोष्टींपुढे मान तुकविण्यास निश्चयी, सभ्यतापूर्वक नकार देऊन राज्यकर्त्यांचे मतपरिवर्तन करावे हे 'अहिंसक असहकारा'मागील उद्दिष्ट असते. न्याय, समता आणि स्वातंत्र्य यांवर आधारलेली नवी आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यात लोकांना कालपर्यंत जित व पराभूत अवस्थेत असलेल्या जुन्या राज्यकर्त्यांचे सहकार्य मिळावे हा त्यांचे परिवर्तन घडवून आणण्यामागे उद्देश असतो.

शोषण करणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा योग्य तो मान सत्याग्रहामध्ये राखला जातो. सत्याग्रह यशस्वी झाला तरी त्याला काळिमा लागत नाही, किंवा सत्याग्रह्याला विजयाचा उन्माद चढत नाही. सत्याग्रह करणाऱ्यास आणि ज्याच्याविरुद्ध तो केला जातो त्यास, दोघांनाही सत्याग्रहाचा वापर सारखाच शुभदायी ठरतो. समाजातील लोकांच्या प्रयत्नांच्या सहाय्यानेच नवी व अधिक समाधानकारक समाजव्यवस्था निर्माण करण्याची सत्याग्रही व्यक्तीची इच्छा असते, मग त्या लोकांजवळ पुरेसे शस्त्रबळ असेल अगर नसेल.[२]

शिक्षेचा वापर करण्याऐवजी मतपरिवर्तनाने सामाजिक बदल घडवून आणण्याच्या गांधींच्या कार्यक्रमाचे व्यक्तिशः मला फार मूलग्राही आकर्षण आहे. युद्धाच्या काळ्याकुट्ट छायेत वावरणाऱ्या आजच्या जगात मोठ्या प्रमाणावर वाव देऊन पहावा अशा योग्यतेची ही योजना खासच आहे अशी माझी श्रद्धा आहे. किंबहुना, आपले प्रश्न सोडविण्यासाठी युद्धास पर्यायी असा नवा मार्ग शोधून काढणे हीच मानवतेपुढची खरी समस्या आहे हे गांधींनी जाणले होते.[३]

मला असे वाटते की, मार्क्सवादी मार्ग नेमका याच्या उलट असून तो वैयक्तिक कर्तृत्वाला मानवी इतिहासात विनाकारण अगदी गौण स्थान देतो. भीतीचे दडपण नसेल तर माणूस बदलत नाही, या दृढ समजुतीवर या मार्गाची उभारणी झालेली आहे. अखंड व कुशल प्रचाराच्या साहाय्याने, यांत्रिक पद्धतीने आपल्याला हव्या असलेल्या आचारविचारांच्या सवयी निर्माण करण्यावर तो मार्ग फाजील प्रमाणात अवलंबून आहे. परंतु मनाच्या आंतरिक निष्ठेचे सिंचन न झालेल्या अशा उजाड मानवी मनांमध्ये अत्युत्तम व अत्युदात्त वृत्ती उमलतील हे अशक्य आहे.

मार्क्सप्रणीत मार्गापेक्षा वेगळे व अधिक सौम्य मार्गही अधूनमधून सुचवले गेले आहेत, आणि इतिहासात त्यांचे प्रयोगही झालेले आढळतात. या सर्व पद्धतींना सनदशीर, घटनात्मक या सदरात एकत्र घालता येईल. यांतील बहुतेक मार्गांमध्ये मुख्य प्रश्नाला–

सत्तेच्या प्रश्नाला– बगल दिल्याचे दिसते. सामाजिक भवितव्य ठरविण्याचे सामर्थ्य मूठभर विशेषाधिकारी वर्गाकडून लाखो श्रमिकांच्या हाती कसे जाणार, हाच तो प्रश्न होय. घटनात्मक मार्गांचा अवलंब पुष्कळदा संघर्ष टाळण्यासाठी केला जातो. मला तरी गांधींचा ' प्रत्यक्ष कृती 'चा मार्ग अशा मार्गांपेक्षा अधिक चांगला वाटतो.[४]

## अहिंसा आणि लोकशाही

मार्क्सवादी किंवा घटनात्मक मार्गांपेक्षा सत्याग्रहाचा क्रांतिकारक मार्ग आणखीही एका कारणाने अधिक इष्ट दिसतो.

आपल्यापैकी प्रत्येकाची इतिहासविषयक दृष्टी व ऐतिहासिक घडामोडींमध्ये निरनिराळ्या शक्तींच्या सापेक्ष प्रभावाबद्दलचा दृष्टिकोण वेगवेगळा असतो. व्यक्तीगणिक हे दृष्टिकोण बदलत जातील असे मानायला काहीच हरकत नाही. कारण मूळ गृहीतके मान्य केली तर एकाहून अधिक दृष्टिकोण तर्कसंगत व म्हणून बरोबर असण्याची शक्यता आहे. परंतु आपण सत्याच्या सर्वांत निकट पोचलो आहोत असे यांपैकी प्रत्येकास वाटले व म्हणून इतरांना शिक्षेचे भय दाखवून वा राज्यसत्तेच्या हाती असलेले प्रचाराचे षड्यंत्र वापरून आपल्या भूमिकेवर आणण्याचा नैतिक अधिकार स्वतःस आहे अशी त्याची खात्री पटली तर जगातील कटकटी कधीच संपणार नाहीत. अशा वेळी कोणाची भूमिका बरोबर आहे हे कसे ठरेल ? तर, ज्याची शिक्षा करण्याची ताकद सर्वाधिक असेल, किंवा विचारस्वातंत्र्याचे हरण करून लोकांचे आचारविचार विशिष्ट चाकोरीतून वळविण्याची किमया ज्याला साधेल त्याचीच भूमिका सत्य ठरेल व तेच त्याच्या खरेपणाचे प्रमाणही ठरेल. आपल्या मताचा खरेपणा सिद्ध करण्याची ही पद्धत काही फारशी स्पृहणीय नाही.

प्रत्येकाला आपल्या स्वतःच्या श्रद्धेनुसार जीवन व्यतीत करणे शक्य असते; वा तसे त्याने करावे हे खरेच. आपल्या निष्ठांच्या प्रकाशात राहण्याचा अधिकाधिक प्रयत्न करणे हाच आपली भूमिका सत्य असल्याचे दुसऱ्याला पटवून देण्याचा खरोखर सर्वांत सुसंस्कृत मार्ग आहे. असे करताना दुसऱ्याच्या भूमिकेतील किंवा तो ज्या मतप्रणालीचा असेल त्यातील असत्य व खोट्या गोष्टींना वा त्यांना उचलून धरणाऱ्या संस्थांना विरोध करावा लागेल हे शक्य आहे. हा विरोध अहिंसात्मक असेल व मतपरिवर्तन हेच त्याचे उद्दिष्ट असेल तर काहीच बिघडत नाही. वेगळे मत बाळगणाऱ्या व्यक्तींबद्दल द्वेषभावना न बाळगता, किंबहुना त्यांच्यापैकी जे आपणास आपल्या सत्याचरणासाठी देहदंड देतील त्यांच्याविरुद्धदेखील समभाव बाळगून देहदंड सोसण्याची तयारी ठेवून, आपणास उमगलेल्या सत्यानुसार आचरण करण्याचा आग्रह ही आपल्या निष्ठा प्रामाणिक

असल्याची सर्वात खात्रीशीर पावती आहे.

आपलेच मत चुकीचे असेल तर ते दुरुस्त करण्याची संधी मिळते हा या पद्धतीचा आणखी एक फायदा आहे. देहदंड सगळा आपणच भोगावयाचा असल्याने ज्या सत्यांविषयी आपणांस खात्री नाही त्यांचा आग्रह धरण्याची घाई आपल्याकडून होईल ही शक्यता कमी. हे आत्मक्लेश जर आनंदाने भोगले तर त्या क्लेशांमुळे आपणातील दृष्टिदोष दूर होण्यास मदत होईल; या दृष्टिदोषांमुळे आपल्या मतांना चिकटून राहिलेले हीण जळून जाईल. शिवाय आपल्या मतांचा आग्रह धरल्याने दुसऱ्या कोणालाच त्रास होत नाही याचे समाधानही या पद्धतीत मिळते. त्यामुळे इतरांबद्दल मैत्रीची भावना टिकून राहते व आपल्यापेक्षा वेगळ्या प्रकारे ज्यांना सत्य उमगले आहे त्यांच्या त्या विशिष्ट सत्यदर्शनाबद्दल ( मतांबद्दल ) आदरही शिल्लक राहतो.

अहिंसेचा हा मार्ग अशा रीतीने लोकशाहीचाही मार्ग आहे. आत्मक्लेशातून स्वतःची मते प्रत्यक्ष आचरणात आणून त्यांचा प्रचार करण्याचे सामर्थ्य समाजातील शारीरिक तसेच भौतिकदृष्ट्या अगदी दुबळ्या व्यक्ती वा जमातींच्या अंगीसुद्धा येऊ शकते ( **सिलेक्शन्स**, पृ. ५९-६० ).

## श्रमाचा महामंत्र

गांधींच्या लिखाणातील एका गोष्टीचा माझ्यावर फार खोल प्रभाव पडलेला आहे. स्वतंत्र समाजात प्रत्येक व्यक्तीला, आपली खास आवड व आपले कसब यांचा वापर व विकास करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, ही ती गोष्ट होय. अर्थातच इतरांना समान संधी देऊन, त्यांशी सुसंगती राखूनच हे स्वातंत्र्य उपभोगता येईल. मात्र त्याच वेळी प्रत्येक व्यक्ती, तिचे व्यक्तिगत कार्यक्षेत्र आणि त्यातील तिचे कौशल्य कितीही मोठे असले तरी, ‘ निर्वाह-श्रम ’ या नियमातून सुटणार नाही. म्हणजेच प्रत्येक धडधाकट व्यक्तीला किमान तिच्या शरीराचे पोषण करण्यास आवश्यक ते अन्न निर्माण करण्यास जरूरी असलेल्या श्रमांशी सममूल्य इतके शारीरिक श्रम केलेच पाहिजेत. हे कष्ट त्या व्यक्तीने अन्न, वस्त्र किंवा निवाऱ्यासारख्या जीवनाच्या मूलभूत गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाच्या क्षेत्रात केले पाहिजेत.

प्रथम टॉलस्टॉयचे लिखाण वाचले तेव्हा मी काहीसा अस्वस्थ झालो. त्या वेळी मी बौद्धिक परिश्रम करण्यात दिवस घालवीत होतो व हे माझे श्रम समाजाला उपयुक्त होते असे केवळ बऱ्याच दूरान्वयाने म्हणता आले असते. त्यामुळे मला बरेच अस्वस्थ वाटू लागले. लगेच मी आजवरच्या श्रमहीन आयुष्याची भरपाई करण्याच्या हेतूने स्वकष्टाने काही तरी निर्माण करण्याच्या उद्योगाला लागलो. कोणतीही बाह्य मदत न घेता एका

स्वावलंबी खादी उत्पादन केंद्राची जुळवाजुळव करण्याच्या कामात मला नैतिकदृष्ट्या फार मोठी मुक्तता मिळाली. परंतु ते केंद्र जसजसे सुरळीत चालू लागले तसतसे त्यापासून मला पूर्वीसारखे समाधान मिळेनासे झाले. हळूहळू माझ्या लक्षात आले की, ती संस्था पूर्णतः स्वावलंबी नसून बऱ्याच अंशी माझ्यावर अवलंबून आहे. संस्थेतील माझे महत्त्वही वाढले होते. 'स्वराज्या'च्या तत्त्वावर एक संस्था संघटित करण्याच्या परिश्रमाचे हे फळ अत्यंत हिणकस स्वरूपाचे होते. तेव्हा मी त्या संस्थेची व्यवस्था बदलून सर्व कारभार स्थानिक लोकांच्या हाती देण्याच्या उद्योगाला लागलो. परंतु ही नवी योजना पूर्णपणे अंमलात येण्यापूर्वीच ते कार्य आमच्या आवाक्याबाहेरील परिस्थितिजन्य अडचणींमुळे बंद पडले. मीही योगायोगाने अनेक राजकीय कार्यकर्त्यांच्या सहवासात फेकला गेलो. माझ्याकरता एक नवेच कार्य (व संधीही) मी शोधून काढले. हे काम वरीलप्रकारचे केंद्र चालविण्याच्या कामापेक्षा कोणत्याच दृष्टीने मुळीच कमी अर्थपूर्ण नव्हते. सामाजिकदृष्ट्या उपयुक्त बौद्धिक संशोधनाची फलिते राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांपर्यंत पोचविण्याचे हे काम होते. शुद्ध व केवल वैज्ञानिक संशोधनाच्या उद्देशालाही अशा रीतीने एक नवा पैलू प्राप्त झाला आणि नव्यानेच निर्माण झालेल्या सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेला अनुरूप त्या संशोधनाचे स्वरूपही पार बदलून गेले.

परंतु अजूनही मूळ प्रश्न अनुत्तरितच राहिला होता : 'माझ्या रोजच्या अन्नावर माझा हक्क पोचतो का?' तसा माझा हक्क आहे अशी मी स्वतःची समजूत करून घेतली. रिकामा वेळ आपल्याला अजिबात नसतो हे स्वतःच्या मनाला पटवून देण्यासाठी मी अधिकाधिक बौद्धिक काम करू लागलो; परंतु लवकरच मला असे आढळून आले की, कामांच्या मध्ये असा किती तरी मोकळा वेळ असतो की जो उपयुक्त गोष्टींसाठी घालवता येईल. त्या वेळात सूत कातून माझ्यापुरेसे कापड मला निर्माण करता येईल असे माझ्या लक्षात आले. म्हणजे माझ्या उदरनिर्वाहास आवश्यक इतके परिश्रम करायला पुरेसा वेळ मला मिळू शकणार नाही हे शक्य असले तरी माझे इतर उद्योग करीत असतानाच बऱ्याच अंशी मी ते तत्त्व आचरणात आणू शकतो हे माझ्या ध्यानी आले.

आयुष्यभराच्या अनुभवानंतर टॉलस्टॉयला असा महान शोध लागला की, दिवसात पूर्ण चोवीस तास असतात. एखाद्याने आठ तास बौद्धिक परिश्रमात घालविले व त्याचे आणखी आठ तास वैयक्तिक गरजा भागविण्यात गेले तरी शारीरिक श्रम करायला त्याला पूर्ण आठ तास शिल्लक राहतात. मग मी पुन्हा एकदा गांधींचे लिखाण काळजीपूर्वक वाचले व त्यातून माझ्या अडचणीवर काही उपाय निघतो का याचा शोध घेतला. तेव्हा मला असे आढळून आले की, गांधी मला एका अटीवर माझ्या आवडीचे शास्त्रीय संशोधनाचे काम करू देतील : ती अट अशी की, केवळ माझ्या आवश्यक गरजांपुरते

द्रव्य स्वतःजवळ ठेवून माझी सर्व उर्वरित मिळकत मी समाजाला– म्हणजेच त्या मिळकतीच्या खऱ्या मालकाला– देऊन टाकली पाहिजे. त्यांच्या मते आपली सर्व शक्ती, सर्व बुद्धी, सर्व वेळ, सर्व कौशल्य समाजाच्या मालकीचे असून आपण फक्त त्यांच्या योग्य उपयोगाची जबाबदारी असलेले विश्वस्त सेवक आहोत. आपल्या श्रमाचे फळ समाजाच्या अधीन असले पाहिजे; आणि समाज आपल्याला देऊ शकेल त्यापेक्षा जास्त काही आपण घेता कामा नये. अशा रीतीने, कायदेशीर मार्गांनी स्वतः मिळविलेली संपत्तीही वारसा हक्काने मिळणाऱ्या संपत्तीप्रमाणेच आपली स्वतःची नाही. जे काही आपल्याजवळ आहे त्यावर आपली मालकी नसून आपण त्याचे समाजाच्या वतीने नेमलेले विश्वस्त मात्र आहोत.

वकील, हिशेबनीस व इंजिनीयर यांना उद्देशून बऱ्याच वर्षांपूर्वी गांधी म्हणाले होते की, त्या सर्वांचा योग्य मिळकतीवर हक्क आहे. स्वतःच्या उदरनिर्वाहास आवश्यक तेवढी मिळकत ही योग्य मिळकत अशी गांधींची 'योग्य' शब्दाची व्याख्या होती. उदरनिर्वाहात गांधी सर्व नैसर्गिक गरजांचा समावेश करीत ( सिलेक्शन्स, पृ. १५८, २७८ ).

'निर्वाह-श्रम' या नियमाचा आणखीही एक पैलू आहे, ज्यामुळे मी त्याकडे कायम आकृष्ट झालो आहे. औद्योगिक संस्कृतीच्या मुळाशी असे एक तत्त्व आहे की मानवी उन्नतीसाठी प्रत्येकाला त्याच्या कलाने, त्याच्या आवडीचे काम करायला जास्तीत जास्त फुरसतीचा वेळ मिळाला पाहिजे. हे ठीकच आहे. पण भांडवलशाही काय किंवा समाजवादी काय, दोन्ही व्यवस्थांमध्ये एक अशी भावना आढळते की, मानवी जीवनाच्या धारणेसाठी जे कष्ट उपसणे नाइलाजाने आवश्यकच आहे त्यांचा बोजा यांत्रिकीकरण करून कमीत कमी केला पाहिजे. सहज टाळता येतील अशी ढोर-मेहनतीची कामे कमी व्हावीत याबद्दल कोणाचेच दुमत नाही. पण 'काम' आणि 'विश्राम' यांकडे पाहण्याच्या वरील दृष्टिकोणात काहीतरी चुकते आहे असे वाटते. जीवनाच्या धारणेसाठी आवश्यक असलेले काम 'पवित्र' मानून केल्यास त्याचा उपयोग माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्याकडे होईल. स्वतःच्या आवडीचे काम निरंकुशपणे करता यावे यासाठी त्याला 'विश्राम' मिळणे ही त्याची गरज राहील यात शंका नाही. पण 'निर्वाह-श्रम' हा आपल्याला साऱ्या मानवजातीशी जोडणारा नैतिक दुवा आहे या जाणिवेने त्याचे मन उन्नत व्हायला हवे, आणि निसर्गाने आपल्यावर कठोरपणे बंधनकारक केलेल्या कष्टांचे रूपांतर सर्जनशील कृतीत घडून यायला हवे. तसे झाल्यास उदरनिर्वाहासाठी करावी लागणारी मेहनत ही आपल्या व्यक्तिमत्त्वाचे पुष्प पूर्णपणे उमलून दाखविणारी कोमल व सर्जक कृती होईल. असे होण्यातच माणसाचा निसर्गावरील विजय सामावलेला आहे.

## स्वायत्तता

गांधींच्या ' निर्वाह-श्रम ' या तत्त्वाचा अर्थ प्रत्येक माणसाने वेगळे, पृथक आयुष्य व्यतीत करावे असा होतो का? श्रमविभागणी आणि उत्पादक श्रमांचे सामूहिक संघटन यांतून मानवाने आजपर्यंत जे मिळवले त्या सर्वांचा त्याग गांधींना अभिप्रेत आहे का? याबाबतीत गांधींचे उत्तर निर्विवादपणे नकारार्थीच आहे. संस्था, संघटना व, शक्यतर विश्वव्यापी, परस्परावलंबित्व या गोष्टी पाहिजेतच. गांधींचा आग्रह इतकाच की हे परस्परावलंबित्व जुलुमावर आधारलेले नसावे; त्याचे स्वरूप स्वेच्छेचे असावे; व सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाला त्यापासून सुख व आनंद मिळाला पाहिजे. सहकारी व्यवस्थेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक घटकाला समान प्रमाणात स्वातंत्र्य व अधिकार ही दोन्ही मिळाली पाहिजेत.

आजच्या जगातील आर्थिक व राजकीय व्यवस्था या केंद्रीभूत व दंडसत्ताधारित सत्तांवर आधारलेल्या आहेत. या सत्तांच्या पकडीतून व्यक्तीला मुक्त करण्याची गांधींची इच्छा होती. माणसांच्या दैनंदिन जीवनाचे नियंत्रण त्यांनीच निर्माण केलेल्या स्वायत्त संघटनांच्या हाती पुनरपि जाईल यासाठी काय उपाय करावा ही गांधींपुढील समस्या होती. स्वेच्छया परस्परावलंबन ही त्यानंतरची पायरी होती.

त्यांच्या विकेंद्रीकरणाच्या सिद्धांतामागे हाच उद्देश होता. एखाद्या केंद्रीय व सर्वंकष शासनसंस्थेत वाढलेली व्यक्ती, मग ती शासनसंस्था त्या व्यक्तीच्या भरणपोषणाची सर्व जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडत असली तरी, आध्यात्मिकदृष्ट्या खुजी आणि रोगटच राहते. एखाद्या सामाजिक संस्थेच्या अंगिकाराने माणसाच्या पदरात भौतिक सुखोपभोग पडत असले तरी त्यांच्या मोबदल्यात माणसाने आपले मौलिक स्वत्व गमावून बसणे ही सर्वांत मोठी हानी होय असे गांधींचे मत होते. माणसाला या सौद्याचा मोह पडेल याची त्यांना सर्वांत जास्त भीती होती.

विकेंद्रीकरण यशस्वी करायचे असेल तर सामाजिक जीवनाच्या सर्व शाखांत लोकशाही संस्थांचा पुरेसा विकास करावा लागणार आहे. जुन्या संस्थांची पुनर्घटना करावी लागेल; नव्या संस्था निर्माण कराव्या लागतील, इतकेच काय पण जसजसे लोक अधिकाधिक अनुभवी व स्वतंत्र होतील तसतसे या नव्या संस्थांतसुद्धा वेळोवेळी नवनवीन बदल करावे लागतील.

एकदा लोकांना अशा संस्थांचे मूल्य पटले की स्वाभाविकच ते स्वतःच्या सामर्थ्याने त्यांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतील. आत्मरक्षणाची साधने जर सर्वांच्या आवाक्यातली ठेवली, म्हणजेच या साधनांचे लोकशाहीकरण केले तर या संस्थांच्या संरक्षणाच्या जबाबदारीतही प्रत्येकाला सहभागी होता येईल. संरक्षणाची साधने अहिंसात्मक असतील

तरच ही गोष्ट शक्य होईल. तसे का याचे स्पष्टीकरण वर येऊन गेलेलेच आहे. हिंसेच्या वापराने सत्ता अपरिहार्यपणे अगदी मूठभर लोकांच्या हातात केंद्रित होते. या केंद्रीकरणाच्या प्रक्रियेमुळेच सत्ताधारी लोकांची एक वेगळी श्रेणी निर्माण होते, ते जनतेचे खरे प्रतिनिधी राहात नाहीत. ( **सिलेक्शन्स**, प्रकरण नववे पहा. )

## राष्ट्रवाद आणि विश्वबंधुत्व

गांधी हयात असताना गांधीवादावर पुढील टीका वारंवार केली जात असे : गांधींचे वैयक्तिक तत्त्वज्ञान काहीही असो, त्यांचे सर्व कार्यक्रम प्रत्यक्षात श्रमिकांच्या पोटावर पाय देऊन भारतातील बूर्झ्वांना धनवान-सत्तावान करणारेच ठरतील, अशी ही टीका होती. दुसऱ्या शब्दांत, गांधींची अहिंसा, जाणूनबुजून किंवा नकळत, भारतातील वरिष्ठ वर्गाची सत्तेवरील पकड अधिक घट्ट करण्यास मदत करणारी आणि दलित आणि श्रमिक वर्गांना श्रीमंत वर्गाविरुद्ध कोणतेही आंदोलन करण्यापासून परावृत्त करणारी ठरेल असे हे म्हणणे होते. म्हणून गांधींनी राष्ट्रसभेशी असलेले सर्व संबंध तोडून टाकावेत आणि धनिकवर्गीयांशी मुळीच संबंध ठेवू नयेत (तसेच येथील मध्यमवर्गीय जर धनिक वर्गाचेच हितसंबंध पोसणार असतील तर त्यांच्याशीही संबंध ठेवू नयेत ) अशी काहींनी मागणी केली होती. भारतीय स्वातंत्र्य संपादनाच्या कार्यासाठी गांधींनी शेतकरी व कामगार या कनिष्ठ श्रमिक वर्गाबरोबरच विशेषाधिकार भोगणाऱ्या धनिकांचा आणि वरिष्ठवर्गीयांचा पाठिंबा मिळविला होता हे खरे. तसेच उच्च वर्गातील काहींना गांधींच्या मित्रत्वाचा व्यक्तिगत फायदा मिळाला हेही खरे आहे. राष्ट्रसभा नेहमीच गांधींच्या ध्येयवादी भूमिकेला धरून पावले टाकू शकली नाही हेही खरे.

मात्र दोन गोष्टी आपण पक्क्या लक्षात ठेवल्या पाहिजेत. राष्ट्रसभेचे नेतृत्व गांधींकडे होते त्या काळात ते नेहमीच तिची नजर ' राष्ट्रवादा 'वरून जनसामान्यांच्या हिताच्या पातळीवर नेण्याचा सतत प्रयत्न करीत होते. ज्यामुळे केवळ उच्चवर्गीयांचा फायदा होईल आणि सामान्य जनतेचे नुकसान होईल अशा कोणत्याच उद्दिष्टाचा पुरस्कार त्यांनी राष्ट्रसभेला करू दिला नाही. दुसरे असे की, भारताला राष्ट्रवादाच्या संकुचित कल्पनेपासून वर उचलून जागतिक राष्ट्र-परिवाराचा एक सभासद म्हणून आपली काही कर्तव्ये आहेत याची जाणीव देशात निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या पातळीवर भारताची कर्तव्ये प्रामुख्याने दोन होती : एक म्हणजे, आपल्याजवळील साधनसंपत्तीमध्ये सर्व मानवजातीचा सहभाग आहे याचा स्वीकार करणे; आणि दुसरे, जागतिक शांततेच्या प्रस्थापनेच्या व युद्धसमाप्तीच्या दृष्टीने, स्वदेशात अहिंसेवर आधारलेली अर्थव्यवस्था निर्माण करून तिचा देशरक्षणाच्या अहिंसात्मक योजनेसाठी पाया म्हणून उपयोग करून घेणे. ( **सिलेक्शन्स**, पृ. १७४-१७५, ३४६-३५२. )

परंतु गांधींची ही कामगिरी अपूर्णच राहिली. याचे पहिले कारण असे की, त्यांच्या नेतृत्वाखाली ज्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कार्य केले त्यांनी गांधींच्या कित्येक कल्पना व विचार यांकडे दुर्लक्ष केले. दुसरे असे की, इतका उदात्त ध्येयवाद साकार करण्यासाठी आत्मविश्वास आणि सामर्थ्य लागते ते नाही. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी येथे जनतेचे अहिंसात्मक संघटन पुरेसे विकसित झाले असते तर ते कदाचित निर्माण झाले असते. खरोखर, संघटित अहिंसात्मक सामर्थ्याच्या दृष्टीने पाहता, आपली योग्यता नसतानाच आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. ते सामर्थ्य अजून आपल्याला मिळवावयाचेच आहे. वरील प्रकारचे सामर्थ्य मिळविण्याचा त्यांनी सांगितलेला मार्गच सर्वोत्तम आहे असे कदाचित आजही म्हणावे लागेल.

## सारांश

वैश्विक प्रक्रियांच्या मुळाशी एक सुष्ट उपकारक नियम आहे हा मूलभूत बोध गांधींनी इतिहासापासून घेतला. या नियमाच्या कार्यवाहीमुळे विश्वातील सर्व जीवन मूलतः एकच आहे याची उत्तरोत्तर सूक्ष्म जाणीव होण्याच्या दिशेने मानवजात प्रगती करीत आहे. निरनिराळ्या जमावांतील तटबंदी ढासळून पडत आहेत.

वरील नियम प्रत्यक्षात मूर्त करणे हा मानवी जीवनाचा उद्देश असून आपले आयुष्य त्या नियमानुसार व्यतीत करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. प्रत्येकाने मानवी स्वातंत्र्य व ऐक्य वाढविण्याच्या ऐतिहासिक कार्याला हातभार लावला पाहिजे.

मानवी जीवन खुजे व खुरटे करणाऱ्या चौकटी आपण मोडून तोडून टाकणार असू तर त्यासाठी आपण ज्या मार्गाचा अवलंब करू त्या मार्गामध्येही माणसाची प्रतिष्ठा आणि बंधुत्व यांचे तीव्र भान आढळले पाहिजे. एखाद्या संस्थेशी/व्यवस्थेशी असहकार करीत असताना त्या संस्थेस/व्यवस्थेस उचलून धरणाऱ्या विरोधकांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आपल्या मनात दुष्ट भावना असता कामा नयेत. उलट चिकाटीने प्रयत्न करून, प्रेमपूर्वक विरोधाने त्यांचे परिवर्तन घडवून आणले पाहिजे. मानवी ऐक्याच्या अधिक व्यापक बैठकीवर अधिष्ठित अशी नवी व्यवस्था निर्माण करण्यात भाग घेणाऱ्या क्रियाशील सहकाऱ्यांमध्ये आपल्या विरोधकांचे रूपांतर करणे हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे.

श्रम करूनच माणसाने आपले पोट भरले पाहिजे हा जीवनातील पहिला व सर्वोच्च नीतिनियम होय. पृथ्वीवर मानवी जीवन अबाधित राहावे म्हणून करावयाच्या कष्टांमध्ये प्रत्येकाने आपला वाटा उचललाच पाहिजे. असे श्रम विश्वबंधुत्वाची भावना मनात खोलवर रुजवतात. माणसे ‘ निर्वाह-श्रम ’ हे तत्त्व स्वीकारतील आणि आपल्या-

जवळचे सर्वस्व— जड वस्तू, बुद्धी, नीतिमत्ता, कर्तृत्व, स्वकष्टार्जित किंवा परंपरेने मिळालेली संपत्ती— सर्वांच्या कल्याणासाठी समाजाच्या स्वाधीन करतील तरच समता व स्वातंत्र्य यांवर अधिष्ठित अशी नवी संस्कृती निर्माण होऊ शकेल.

उत्पादन विकेंद्रित केल्यावर समाजांनी किंवा व्यक्तींनी सुटे सुटे, परस्पर असंबद्ध जीवन जगावे असे नाही. आवश्यकता असेल तेथे ऐच्छिक सहकार्य असावे. राज्यसत्तांनी आधुनिक काळात सरहद्दींच्या ज्या तटबंदी उभारल्या आहेत त्या न जुमानणारे हे सहकार्य विश्वव्यापी असेल. आपल्या प्राणभूत गरजांच्या बाबतीत समाज स्वावलंबी बनला आणि स्वसंरक्षणासाठी तो स्वसामर्थ्यावर अधिष्ठित असला तरच खऱ्या अर्थाने स्वेच्छापूर्वक सहकार अस्तित्वात येईल. त्यासाठी मूलभूत गरजा भागविणाऱ्या वस्तूंचे उत्पादन विकेंद्रित करून त्याची साधने सामाजिक मालकीची केली पाहिजेत. संरक्षणाच्या सामर्थ्याचेही लोकशाहीकरण करणे शक्य आहे : हिंसात्मक मार्गाचा त्याग करून अहिंसक मार्गाचा स्वीकार केल्यास लहानात लहान समाजसुद्धा स्वतःचे संरक्षण करण्याची शक्ती कमावू शकतील.

हिंसेत खरी सुरक्षितता नसते. तीमुळे शस्त्रास्त्रांची स्पर्धा सुरू होते. त्यामुळे एक नाजूक आणि सदा अस्थिर असा समतोल राखता येण्यावर सुरक्षितता अवलंबून असते. सुरक्षिततेसाठी हिंसात्मक मार्गाचा अवलंब केला म्हणजे लहान समाजांना असहाय्यपणे अधिक शस्त्रास्त्रे असलेल्या बलाढ्य गटांवर अवलंबून राहावे लागते. अहिंसात्मक मार्गामध्ये न्याय्य कारणासाठी क्लेश सोसण्याच्या मनोधैर्याला सर्वात जास्त महत्त्व असते. हे मनोधैर्य भौतिक साधनसामग्रीवर अवलंबून नसते. तसेच ते अत्यंत दुर्बळ व्यक्तीच्या किंवा अगदी लहान समाजाच्या आवाक्यात असते. अशा रीतीने मिळालेले स्वातंत्र्य प्रत्येक समाजाला इतरांबरोबर समानतेवर आधारित सहकार्य करायला साहाय्यभूत ठरेल. त्यामुळे स्वातंत्र्यावर आधारित खऱ्याखुऱ्या लोकसत्ताक जागतिक संघराज्याचा पाया घातला जाईल.

## टीपा

१. सर्व जीवन मूलतः एक असून सर्व माणसे जाणीवपूर्वक किंवा अजाणता या एकात्मतेच्या साक्षात्कारासाठी झटत आहेत ही माझी निष्ठा वा तत्त्वज्ञान आहे. (पत्र, पृ. ८८ व सिलेक्शन्स, पृ. ७८–८०) 'मानवी समाजाचा अखंड

विकास होत आहे, आध्यात्मिकदृष्ट्या तो सतत उमलत आहे' (सिलेक्शन्स, पृ. ७९).

२. पण विकृत झालेला मानवी स्वभाव प्रेमाच्या मार्गाने पुन्हा सरळ करता येईल काय? गांधी आपल्या काव्यमय भाषेत लिहितात. 'मी लहान असताना राजकोटला दोन आंधळे कलाकार होते. त्यांतील एक वादक होता. तो वाजवीत असताना त्याची बोटे अचूकपणे वाद्याच्या तारांवरून फिरत असत. ते संगीत सर्वांना मंत्रमुग्ध करीत असे. त्याचप्रमाणे प्रत्येक मानवी हृदयातही तारा आहेत. कोणत्या तारा कशा छेडायच्या हे कळले म्हणजे त्यांतूनही दिव्य संगीत बाहेर पडते' (हरिजन, २७-५-१९३९, पृ. १३६).

आपण हिंसात्मक मार्गापेक्षा अहिंसात्मक मार्ग अधिक पसंत का करतो हे स्पष्ट करताना गांधी लिहितात, 'आपले राज्यकर्ते दुष्ट असतील तर ते जन्मतःच पुरे दुष्ट आहेत असे नाही; बऱ्याच अंशी परिस्थितीनेच त्यांना तसे केले आहे. म्हणूनच त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्याची मला आशा वाटते. अर्थात ते आपला मार्ग स्वतःच बदलून घेण्यास असमर्थ आहेत हे अगदी खरे आहे. परिस्थितीनेच त्यांना वाईट बनविले असेल तर त्यांना ठार मारणे हा त्यावरील उपाय नव्हे हे निश्चित; परिस्थितीत बदल करूनच त्यांचे परिवर्तन केले पाहिजे. पण आपण म्हणजेच भोवतालची परिस्थिती आहोत आणि आपण असे आहोत म्हणूनच ते तसे बनले आहेत. म्हणजेच आपण सगळे मिळून जसे आहोत त्याचीच थोडी अतिशयोक्त आवृत्ती म्हणजे राज्यकर्ते. हे माझे म्हणणे खरे असेल तर राज्यकर्त्यांविरुद्ध केलेली हिंसा ही आपल्याचविरुद्ध केलेली हिंसा ठरणार. तो आत्मघातच होईल, आणि मला आत्महत्त्या करावयाची नाही किंवा माझ्या बांधवांनाही आत्महत्येस प्रोत्साहन द्यावयाचे नाही. म्हणून मी स्वतः अहिंसेचा उपासक बनलो व माझ्या मित्रांनीही तसे व्हावे असे त्यांना आवाहन करतो.

'शिवाय हिंसेने एखाददुसरा राज्यकर्ता मारला जाईल, पण रावणाच्या डोक्यांप्रमाणे त्याची जागा दुसरे घेतील. कारण दुष्टपणाचे मूळ दुसरीकडेच आहे. ते आपल्यात आहे. आपण जर स्वतःत सुधारणा केली तर राज्यकर्ते आपोआप सुधारतील' (सिलेक्शन्स, पृ. ३६४; शिवाय पृ. १४१–१४२, २४०, ४८०–८१ पहा.)

३. सत्य व अहिंसा या गोष्टी केवळ वैयक्तिक आचरणाच्या बाबी म्हणून आपल्याला प्रस्थापित करावयाच्या नसून गटांनी, समाजांनी व राष्ट्रांनीही त्यांचे आचरण करावे असा प्रयत्न करावयाचा आहे (सिलेक्शन्स, पृ. ७).

' जागतिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने **किंवा युद्धाच्या सर्वोच्च प्रश्नाच्या सोडवणुकीच्या** बाबतीत अहिंसेचे मूल्य अजून पूर्णपणे ओळखले गेलेले नाही. कदाचित असे असेल की त्यात जे नवे म्हणून आहे ते त्या सर्वोच्च प्रश्नाच्या सोडवणुकीच्या दृष्टीने अगदी कुचकामी असेल ' ( सिलेक्शन्स, पृ. ५ ).

४. ' १९०६ पर्यंत मी केवळ बुद्धीला आवाहन करण्यावर अवलंबून राहात असे. मी फार खटपट्या सुधारक होतो. मी पत्रे लिहिण्यात वाकबगार होतो कारण माझी माहिती पक्की असे. त्याचेही कारण सत्यज्ञान करून घेण्याविषयीचा माझा आग्रह. पण मला असे दिसून आले की ऐनवेळी निर्णायक प्रभाव पडण्याच्या दृष्टीने तर्क अपूरा पडतो. तेव्हापासून माझे असे ठाम मत होत चालले आहे की, लोकांना मूलभूत महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी केवळ बौद्धिक तर्क करून मिळत नाहीत; त्या आत्मक्लेशांचे मोल देऊन पदरात पाडून घ्याव्या लागतात. माझ्याइतक्या अर्जविनंत्या क्वचितच कोणी केल्या असतील किंवा उपेक्षित उद्दिष्टांचा पाठपुरावा माझ्याइतका क्वचित कोणी केला असेल. अनुभवाने मी आता या निर्णयाप्रत येऊन पोचलो आहे की **जर आपल्याला खरोखरच महत्त्वाचे काही घडवून आणावयाचे असेल तर केवळ बुद्धीचे समाधान करून भागत नाही. त्यासाठी हृदयाला स्पर्श करावा लागतो.*** बुद्धीचे आवाहन मुख्यतः डोक्याला असते. हृदयाचे दरवाजे आत्मक्लेशांनी उघडतात, आत्मक्लेशांनी माणसातील सूक्ष्म सहानुभाव जागृत होतो ' ( सिलेक्शन्स, पृ. ४३९ ).

□ □

* जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा.

प्रकरण दुसरे

# अहिंसेचे अर्थशास्त्र

## अहिंसा व तिचा गर्भितार्थ

अहिंसेसंबंधी आपले धोरण काय आहे ते राष्ट्रसभेने एकदा अखेरचे निश्चित करावे असा आग्रह गांधींनी सप्टेंबर १९३८ च्या दिल्लीला भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सभेत धरला. त्यांच्या मते भोवतालची परिस्थिती पाहता महायुद्धाची शक्यता दिवसेंदिवस वाढत चालल्याचे स्पष्ट होते. आणि शांततेकडील वाटचालीत हे युद्ध शेवटचेच ठरेल अशी काहीच खात्री नव्हती. अशा वेळी, अत्यंत बिकट परिस्थितीतही संघर्षांची सोडवणूक करण्याचे व मूल्यांचे संरक्षण करण्याचे पर्यायी तंत्र पूर्णतेस नेणे हे आपले कार्य आहे असे गांधींना वाटले. हिंदुस्थानमागे इतिहासकालापासून चालत आलेली अहिंसेची परंपरा असल्यामुळे जगात अहिंसेचे वातावरण निर्माण करण्याच्या महान कार्यात भारत पुढाकार घेऊ शकेल अशी आशाही त्यांना वाटत होती. म्हणून राष्ट्रसभेने आपणास प्रिय असलेल्या मूल्यांच्या संरक्षणार्थ हिंसेवर विसंबून राहण्याचा विचारही सोडून देण्याची हिंमत बांधावी यासाठी तिचे मन वळवण्याचा गांधींनी आटोकाट प्रयत्न केला. पण त्या वेळी तरी त्यांचा हा प्रयत्न यशस्वी व्हावयाचा नव्हता.

अहिंसेचे आवाहन मूलतः नैतिक स्वरूपाचे असल्याने स्वाभाविकच पुढील प्रश्न निर्माण होतो : कोणत्याही आणि सर्वच प्रकारच्या समाजरचनांचे गांधींच्या अहिंसक मार्गाने संरक्षण करता येईल काय ? फेब्रुवारी १९४७ मध्ये नेमकेपणाने हा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. जे अहिंसेने मिळवलेले असेल त्याचेच अहिंसा रक्षण करू शकते, असे त्यांनी उत्तर दिले. याचा अर्थ असा की, उलटपक्षी, जे मिळविण्यासाठी हिंसेवर अवलंबून राहावे लागते त्याचे रक्षणही केवळ हिंसात्मक साधनांनीच होऊ शकते.

नंतर गांधींना त्यांचे भांडवलशाहीबद्दल मत विचारले गेले. ते म्हणाले की, हिंसात्मक साधनांखेरीज व्यक्ती धनसंचय करूच शकत नाही; ही हिंसा उघड असेल किंवा प्रच्छन्न असेल. याचाच अर्थ असा की, भांडवलशाही रचना केवळ अहिंसेने रक्षिता येणार नाही. परंतु आपल्या म्हणण्याला त्यांनी अशी जोड दिली की, ज्या अर्थी अर्थव्यवहारा-

साठी भांडवल आवश्यक आहे त्या अर्थी ' अहिंसक समाजरचने 'मध्ये सामाजिक उपयोगासाठी भांडवलसंचय करणे हे राज्यसत्तेचे कर्तव्य राहील. तसे करणे शक्य आहे, इतकेच नव्हे तर आवश्यक व अनिवार्यही आहे ' ( सिलेक्शन्स, पृ. १६२ ).

यातून आणखी एक प्रश्न उद्भवतो. समजा, एखाद्या राष्ट्राने हिंसाचार टाळून अहिंसक मार्गांनीच आपले व आपल्या मालमत्तेचे रक्षण करावयाचे ठरवले; पण, त्या राष्ट्राला वारशाने प्राप्त झालेली प्रचलित समाजरचना आधीपासूनच वर्गभेद आणि विषमता यांनी दूषित आहे, तर अशा राष्ट्राने काय करावे म्हणजे त्याला अहिंसक मार्गांनी स्वरक्षण साधता येईल ? यावर गांधींची सूचना अशी की, अहिंसात्मक संरक्षणाची पहिली पायरी म्हणून त्या राष्ट्राने किंवा त्या समाजाने ' गैर ( हिंसात्मक ) मार्गांनी मिळविलेल्या लाभां 'चा स्वेच्छेने त्याग करावा ( सिलेक्शन्स, पृ. १६२ ).

गांधींच्या राजकीय तत्त्वज्ञानातील हा एक मूलभूत सिद्धांत असल्याने आपण त्याचा योग्य विचार केला पाहिजे. गांधींचे असे मत होते की, आक्रमक शत्रूला वा विरोधकाला अहिंसात्मक प्रतिकाराचे नैतिक आवाहन करून त्यात यशस्वी होण्याची आशा धरण्यापूर्वी त्या समाजाने आपले अंतर्गत व्यवहार नैतिक पातळीवर पुनर्घटित करणे आवश्यक आहे. ही आदर्शवादी विचारसरणी जनसामान्यांमध्ये लोकप्रिय कशी होईल हेही आपणास थोडक्यात पाहिले पाहिजे.

एखाद्या राष्ट्राने सशस्त्र युद्धाचा मार्ग निवडला तरी, अनेक गोष्टींची पूर्वतयारी केल्याखेरीज त्याला युद्ध प्रभावीपणे करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. सर्व प्रकारच्या तंगीच्या परिस्थितीतसुद्धा देशातील नागरिक राष्ट्रावर अढळ निष्ठा ठेवतील व त्यांचे स्वयंस्फूर्त सहकार्यही मिळत राहील असेच युद्धाचे उद्दिष्ट असावे लागते. युद्धामागील हेतू नागरिकांना उदात्त वाटत नसेल तर ते युद्धकाळातील हालअपेष्टा व जीवितवित्ताची हानी सहन करावयास तयार होणार नाहीत. दुसऱ्या बाजूला, प्रत्यक्ष युद्ध चालू असताना युद्धाच्या सर्व गरजा भागविल्या जातील अशा बेताने सर्व अर्थव्यवस्थेची मांडणी करावी लागते. ही एकच गोष्ट आधुनिक काळात फार ताण निर्माण करणारी असते. तिसरीकडे युद्धाच्या काळात अंतर्गत शासनाची सर्व चक्रे साधारणपणे सुरळीत फिरवत ठेवू शकेल असे ते सरकार असावे लागते.

अहिंसात्मक प्रतिकाराची व्यापक युद्धनीती व तात्कालिक डावपेच यांचा विचार आपण तूर्त बाजूला ठेवीत आहोत. पुढे एका स्वतंत्र प्रकरणात आपण त्याची चर्चा करणार आहोत. तूर्त आपण आदर्श अहिंसात्मक मार्गाचे स्वरूप, त्याचे मानसिक आवाहन यांचाच विचार करीत आहोत. अशा वेळी समाजाने अंतर्गत अर्थव्यवस्था कशी पुनर्घटित करावी ते आपणास आता पहावयाचे आहे.

भारताच्या बाबतीत बोलायचे तर निःसंदिग्धपणे असे म्हणता येईल की, गांधींनी

राष्ट्रापुढे एक अत्यंत उच्च व उदात्त आदर्श ठेवण्याचा प्रयत्न केला. पर्यायाने त्यांनी जगापुढे अहिंसेचा आदर्श ठेवला. तपश्चर्या व साधेपणा हे त्या मार्गाचे गुणविशेष होते. किंवा गांधी सांगत त्याप्रमाणे 'साधी राहाणी व उच्च विचारसरणी' ही त्याची वैशिष्ट्ये होती. या आदर्शाचे बहुतेक सामान्य स्त्रीपुरुषांना आकर्षण एरवी राहिले नसते असे म्हणता येईल. परंतु शतकानुशतकांच्या राजकीय व आर्थिक दास्यामुळे भारताचे जे नैतिक अधःपतन झाले होते व जे दारिद्र्य अंगात मुरले होते त्यांच्या पार्श्वभूमीवर साध्या, विरागी जीवनाचा आदर्श लोकप्रिय करणे तुलनेने सोपे गेले. राजकीय स्वातंत्र्यासाठी ही किंमत द्यायला कित्येकजण तयार झाले.

गांधी मानवजातीच्या महान शिक्षकांपैकी एक होते. व्यक्तिशः स्वतःच्या जीवनात सोसलेल्या क्लेशाच्या तीव्र अनुभूतीतून मनाने ते हलाखीत, दाट अंधःकारात कष्ट उपसणाऱ्यांशी एकरूप झाले होते. अविरत प्रचाराने आणि स्वतःच्या हृदयस्पर्शी उदाहरणाने त्यांनी अनेक स्त्री-पुरुषांना एक प्रकारच्या नव्या धार्मिक लढ्याला उद्युक्त केले. अहिंसात्मक मार्गाच्या आदर्शासाठी गरिबीचे व्रत घेण्यास, क्लेश भोगण्यास ही माणसे मग तयार झाली. दलितांची मुक्तता व्हावी व पृथ्वीवर त्यांचे राज्य प्रस्थापित व्हावे यासाठी त्याग व कष्ट करण्यास ही माणसे सिद्ध झाली. गांधींच्या मते जो निढळाचा घाम गाळून श्रमतो त्याचीच पृथ्वीवर खरी मालकी आहे. आधुनिक भारताचे थोर पुढारी ना. गोखले एकदा म्हणाले होते की, गांधींच्या अंगी सामान्यातले असामान्यत्व जागृत करण्याची अद्वितीय क्षमता आहे.

अहिंसात्मक मार्गासाठी लोकांचे संघटन करण्याच्या कार्यातला हा एक भाग होता. गांधींनी केला त्याहून ध्येयाचा अधिक उत्तम प्रचार होऊ शकला नसता. पिळवणुकीचा लवमात्र आधार न घेता केवळ अहिंसेचे अधिष्ठान असलेली अर्थव्यवस्था निर्माण करणे हा त्याचा दुसरा भाग होय. ही कामगिरी अधिक कठीण, यात शंकाच नाही. समाजातली, विशेषाधिकारसंपन्न जीवन उपभोगणारी माणसे समानता धर्माचे हे आव्हान विनविरोध स्वीकारतील हे सहसा शक्य नव्हते. गांधींनी याही दिशेने प्रदीर्घ व अविरत प्रयत्न केला. १९२० ते १९४८ या सुमारे तीस वर्षांच्या काळात त्यांनी अखिल भारतीय स्वरूपाच्या अनेक लोकाश्रयी संघटना उभारल्या. भारतापुढे त्यांनी मांडलेल्या मूल्यांवर आधारलेली आर्थिक व्यवस्था आणि शिक्षणपद्धती– विशेषतः ग्रामीण भागांसाठी– निर्माण करणे हेच या सर्व संघटनांचे उद्दिष्ट होते.

## विकेंद्रीकरणाचा सिद्धांत

औद्योगिक क्षेत्रातील कारखानदारीकरणासंबंधीची गांधींची मते काहीशी रस्किन व

टॉलस्टॉय यांच्यावरूना घेतलेली होती, तर काही प्रमाणात ब्रिटिश अमदानीतील भारताच्या आर्थिक इतिहासाच्या स्वतःच्या अभ्यासावरून ती त्यांनी बनवली होती. तसेच अराज्यवादी म्हणता येईल अशा काही कल्पना त्यांनी क्रोपोट्किनवरून घेतल्या असणे शक्य आहे. मात्र या लेखकाचा प्रत्यक्ष उल्लेख गांधींच्या लिखाणात कोठेच आढळत नाही. गांधी विद्यार्थीदशेत इंग्लंडला असताना, क्रोपोट्किन लंडनमध्येच राहात होते व त्यांच्या विविध लेखनाचा तत्कालीन ध्येयवादी विचारवंतांवर बराच प्रभाव पडला होता.

एखाद्या अर्थव्यवस्थेचा व्यक्तिमात्राच्या विकासावर काय परिणाम होतो यावरुन गांधी त्या व्यवस्थेचे मूल्यांकन करीत. माणसाला केंद्रस्थानी ठेवून ते कोणत्याही नव्या तंत्रविद्यात्मक वा सामाजिक सुधारणेची इष्टानिष्टता तपासून पाहात असत. श्रमांचा बोजा हलका करून माणसांमध्ये समानता प्रस्थापित करण्याकडेच कोणत्याही यंत्राचा व औद्योगिक संघटनेचा उपयोग झाला पाहिजे, तोच त्यांचा एकमेव वैध उपयोग होय अशी त्यांची दृष्टी होती. या उद्दिष्टांच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टी नैतिकदृष्ट्या आपोआपच धिक्कारणीय ठरत.

गांधींनी फार पूर्वी म्हणजे १९०९ मध्येच ' हिंद स्वराज ऑर इंडियन होमरूल ' या नावाचे एक पुस्तक लिहिले होते. त्या पुस्तकात त्यांनी म्हटले आहे की, यांत्रिकीकरण व कारखानदारीकरण यांमुळे मानवी समाजाची नैतिक अवनती झाली असून या दोन्ही गोष्टी ' महापाप ' आहेत.[१] याच आरोपाचा पुनरुच्चार त्यांनी १९२६ मध्ये[२] व पुढे १९३१ मध्ये[३] युरोपात असताना केला होता.

यावर कोणी असे म्हणेल की, यामध्ये खरा दोष यंत्राचा किंवा औद्योगिक संघटनेचा नाही. आज उत्पादनसाधने खाजगी मालकीची आहेत व उत्पादनाचा उद्देश वैयक्तिक फायदा मिळविणे हाच आहे, यात खरे पापाचे मूळ आहे. या युक्तिवादाविषयी गांधी नेहमीच साशंक होते. त्यांचे असे ठाम मत होते की, भारतापुरते तरी, मोठ्या, यांत्रिकी कारखानदारीची वाढ करून येथील सर्व धडधाकट स्त्रीपुरुषांना पुरेसा व निकोप रोजगार मिळवून देणे अशक्य आहे. इंग्लंडने ते जवळजवळ साध्य केल्याचे दिसते, पण इतर देशांतील लाखो कुटुंबांचे जीवन उध्वस्त करूनच इंग्लंडला ती गोष्ट शक्य झाली आहे, असा त्याबद्दलचा त्यांचा निवाडा होता. तेव्हा भारताने या पापी मार्गाने जाणे टाळले पाहिजे.

याविरुद्ध अशी बाजू मांडण्यात येईल की, आपला माल परदेशात विकण्याऐवजी सेवनाची देशांतर्गत पातळी वाढवून आपले अत्यंत खालावलेले जीवनमान उंचावण्यासाठी भारतास उत्पादनाचा विनियोग करता येईल. यावर गांधी म्हणत की त्यांचाही नेमका हाच प्रयत्न आहे. केंद्रीभूत तंत्रविद्येच्या साहाय्याने चटकन भाराभर उत्पादन वाढवून मग त्याचे गावोगाव वितरण करण्याचा अत्यंत खर्चिक उपाय अवलंबिण्याऐवजी

ज्यांच्यात उत्पादित वस्तूंचे वितरण करावयाचे त्यांच्या जवळपासच उत्पादन संघटित करण्याची त्यांची योजना होती. त्यांच्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेच्या सिद्धांताचे हेच सार होते. या विकेंद्रीकरणामुळे इतर कोणत्याही व्यवस्थेत मिळणार नाही इतके आर्थिक स्वातंत्र्य प्रत्येक स्त्रीपुरुषास उपभोगता येणार होते.[४]

'जीवनातील अत्यावश्यक प्राथमिक गरजांच्या उत्पादनाची साधने सामाजिक मालकीची असली पाहिजेत' या मताचा गांधी पुरस्कार करीत.[५] पण उत्पादनाच्यामागील उद्दिष्टांमध्येही त्यांना क्रांती अभिप्रेत होती. येथे समाजवादाच्या काही प्रकारांच्या ते अगदी जवळ येत. मात्र त्यांच्यात व भारतात आज समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्यांतील अंतर स्पष्ट आहे. १९४० मध्ये एका प्रसंगाच्या अनुषंगाने गांधी लिहितात : 'पंडित नेहरूंना कारखानदारीकरण हवे आहे. त्यांना असे वाटते की कारखाने राष्ट्रीय मालकीचे केले की भांडवलशाहीच्या दोषातून ते मुक्त होतील. माझे स्वतःचे असे मत आहे की, हे दोष कारखानदारीकरणाच्या अंगभूतच आहेत व समाजवादाच्या उताऱ्याने ते नाहीसे करणे शक्य नाही' (**हरिजन**, २९-९-१९४०, पृ. २९९).

## यंत्रे

गांधींच्या चरख्याच्या आग्रहाबद्दल कित्येकांना आश्चर्य वाटले आहे. चरख्याच्या बाजूने त्यांचे प्रमुख म्हणणे असे होते की, त्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या रिकाम्या वेळात, विशेषतः शेतावर काम नसते त्या दिवसांत, घरबसल्या काम उपलब्ध होते. शिवाय खादीकार्याच्या संघटनेतून खेड्यांत स्वाश्रयी, ऐच्छिक सहकार्य अस्तित्वात येणार होते. असे सहकार्य निर्माण करणे दुसऱ्या कोणत्याच कार्यक्रमाने शक्य झाले नसते.[६]

सर्वांना पुरेसे काम मिळाल्यानंतर जर गावांतील कोणी उत्पादन वाढविण्याच्या किंवा श्रम कमी करण्याच्या दिशेने अवजारांमध्ये सुधारणा केली वा नवी अवजारे शोधून काढली तर गांधी अशा शोधांचे स्वागत करण्यास तयार होते. म्हणूनच ते म्हणतात : 'हिंदुस्थानातील जनता सर्वार्थाने खादीचा स्वीकार करील तर श्रमांचा भार हलका करण्यासाठी आणि जीवन सुस्थित करण्यासाठी आवश्यक गणली जातील तेवढीच आधुनिक यंत्रतंत्रे भारत स्वीकारील ही आशा सोडण्याचे मला कारण दिसत नाही' (यं. इं., २७-७-१९२४, पृ. २४६ ).[७]

## सामायिक मालकी हक्क

गांधींची यंत्राबद्दलची मते १९०९ ते १९३१ व त्यानंतरच्या काळात बदलत गेली.

त्याचप्रमाणे १९४२ पासून पुढे सामायिक मालकीचा ते पुरस्कार करू लागले. फेब्रुवारी १९४२ मध्ये लिहिलेल्या 'व्यक्तिगत की सामायिक' या लेखात त्यांनी आपले मत जोरदारपणे मांडले आहे. ते लिहितात : 'जोपर्यंत आपण सहकारी पद्धतीने शेती करीत नाही तोपर्यंत शेतीचा पुरेपूर लाभ आपल्याला मिळणार नाही. जी गोष्ट शेतीची तीच, पशुपालनाची. ही जीवनपद्धती स्वीकारण्यासाठी लोकांची मने तात्काळ वळवणे फार अवघड आहे हा भाग वेगळा. सरळ आणि अरुंद चढण पार करणे नेहमीच अवघड असते.'[८]

## एका आरोपाचे निराकरण

गांधींच्या कार्यक्रमाविरुद्ध घेण्यात येणारा एक आक्षेप असा की, जगाने तंत्रविद्येच्या क्षेत्रात इतकी प्रगती केली असताना आपल्याला शेती व ग्रामोद्योगप्रधान युगाच्या दिशेने मागे जाण्याचे कारण काय?

याचे उत्तर दुहेरी आहे. पहिले असे की, एखाद्या समाजाजवळ औद्योगिक प्रगती करता आवश्यक ती साधनसंपत्ती नसेल तर तेवढ्यामुळे सुखासाठी आपल्या स्वातंत्र्याचा सौदा करण्याचा मोह त्या समाजाला होऊ नये असे गांधींना वाटत होते. 'जहाजे आणि तारायंत्रे यांच्याशी माझे मुळीच भांडण नाही. कारखानदारीकरण आणि त्यात गर्भित असलेल्या इतर गोष्टींच्या आधाराशिवाय त्यांची धारणा होऊ शकत असेल तर त्या गोष्टी खुशाल उपयोगात राहू द्या. मात्र जहाजे व तारायंत्रे ही मानवी जीवनाची साध्ये नाहीत व त्यांसाठी आपण आपली पिळवणूक होऊ देता कामा नये' (यं. इं., ७-१०-१९२२, पृ. ३४८).

साधने अगदीच अपुरी असतील आणि साधा चरखासुद्धा विकत घेता येत नसेल तर लोकांनी टकळीवर सूत काढून त्यापासून आपल्यापुरते कापड तयार करावे असा गांधींचा सल्ला असे. उलटपक्षी स्वातंत्र्याला बाध न येता यंत्रांचा वापर करता येत असेल तर गांधी त्यांचे स्वागत करायला तयार होते. इतर सर्व गोष्टींपेक्षा त्यांना स्वातंत्र्याचे मोल जास्त होते. त्याचे रक्षण करण्यासाठी, तशीच वेळ आली तर, तंत्रविद्यात्मक अकार्यक्षमता व मागासलेपणा स्वीकारण्याचीसुद्धा तयारी असली पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.

दुसरा प्रश्न असा की, यामुळे आपण भूतकाळात मागे गेल्यासारखे होत नाही काय? चरख्याच्या सहाय्याने गांधी आधुनिक भारतात जी व्यवस्था निर्माण करू पाहात होते तीत व प्राचीन भारतातील प्रत्यक्ष स्थिती यांतील साम्य केवळ वरवरचेच आहे, असा याचा सार्थ प्रतिवाद करता येईल. आपला भूतकाळ सामाजिक विषमतेने कलंकित

झालेला आहे ( अस्पृश्यता हे त्याचे चिवटपणे तगून राहिलेले केवळ एक चिन्ह ) याची त्यांना पक्की जाणीव होती. त्यामुळे शरीरश्रमांवर आधारलेल्या उद्योगांचा ते पुरस्कार करीत असले किंवा ' स्वयंपूर्ण ग्रामराज्या 'ची बाजू घेत असले तरी त्यांनी या जुन्या गोष्टींत नवीनच अर्थ भरलेला होता हे ध्यानात घेणे आवश्यक आहे.

आज लक्षावधी माणसे केवळ यंत्राची चाकर बनली आहेत. माणसाचे हे अवमूल्यन गांधींना दिसत होते. मानवाला या नव्या गुलामगिरीतून मुक्त करणे हे गांधींचे उद्दिष्ट होते. उत्पादनाच्या विकेंद्रीकरणामुळे माणूस एकदा स्वतंत्र झाला की मग ऐच्छिक सह-कार्याचा विस्तार राष्ट्रीय सरहद्दी ओलांडून पुढे गेला तरी काहीच हरकत नव्हती. अशा रीतीने, गांधींची उद्दिष्टेच भिन्न असल्यामुळे, गांधीप्रणीत ग्रामकेंद्री समाजरचना प्राचीन भारतातील समाजरचनेपेक्षा खूपच वेगळी असेल अशी शक्यता विचारात घेतली पाहिजे.[१]

संघर्षाची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने युद्धाला जो पर्यायी मार्ग ते सुचवू इच्छित होते त्यातील विकेंद्रित अर्थकारणाचे महत्त्व ओळखून १९४० मध्ये, सर्व जग महा-युद्धाच्या खाईत होरपळत असताना गांधींनी लिहिले :

' स्वाश्रयी, ऐच्छिक सहकार्यातून स्वाभिमानी व शांततापूर्ण जीवन जेथे साकार होत आहे अशा खेड्यांतून राहाणाऱ्या समूहांचा मिळूनच अहिंसक समाज निर्माण होऊ शकतो. हिंसेला हिंसेने तोंड देण्याची अपेक्षा ठेवून त्यासाठी तयारी करणाऱ्या समाजाचे जीवन एक तर अतिशय अस्थिर असेल किंवा असा समाज संरक्षणासाठी मोठी शहरे व शस्त्रागारे निर्माण करील. आजच्या युरोपच्या स्थितीवरून, तेथील मोठमोठी शहरे, राक्षसी कारखाने आणि प्रचंड शस्त्रसंभार यांचे अस्तित्व एकमेकांशी फार घनिष्ठपणे निगडीत आहे आणि त्यांपैकी कोणताही एक घटक इतरांशिवाय जगू शकणार नाही, असा निष्कर्ष काढणे अवाजवी होणार नाही. प्राचीन भारतातील ग्राम-गणराज्ये ही त्यातल्या त्यात अहिंसाधिष्ठित संस्कृतीच्या जवळ जाऊन पोचली होती. अर्थात या ग्राम-गणराज्यांचे उदाहरण फार ढोबळ व दोषपूर्ण आहे हे मी मान्य करतो. तसेच मला हेही माहीत आहे की माझ्या कल्पने व व्याख्येनुसार अहिंसेचे पालन त्या गणराज्यांतून होत नव्हते. पण अहिंसक संस्कृतीचे बीज त्या गणराज्यांत होते यात शंका नाही ' ( हरिजन, १३-१-१९४०, पृ. ४१० ).

' माझ्या कल्पनेतील ग्राम-स्वराज्य जेथे मूर्त झालेले असेल ते गाव पूर्णपणे लोकसत्ताक असेल, आपल्या प्राणभूत गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण असेल आणि जेथे परावलंबन आवश्यक आहे अशा कित्येक बाबींत त्या गावाचा इतर गावांशी परस्परावलंबी संबंध राहील. अशा रीतीने आपल्यापुरते अन्नधान्य व कापूस पिकवणे हे प्रत्येक गावाचे आद्य

कर्तव्य राहील. दुभत्या व शेतीच्या गुरांसाठी पुरेशी चराऊ जमीन राखून ठेवली जाईल. तसेच तरुणांना व मुलांना खेळण्यासाठी व त्यांच्या मनोरंजनादी कार्यक्रमांसाठीही पुरेशी जागा ठेवली जाईल. इतके झाल्यावर जमीन शिल्लक राहिली तर तीत रोखीची उपयोगी पिके ( अर्थात गांजा, अफू, तंबाखू, ... यांसारखी पिके वगळून ) काढली जातील. प्रत्येक गावात नाट्यगृह, शाळा आणि सभागृह असेल. नागरिकांना पुरेसे स्वच्छ व निर्जंतुक पाणी पुरविण्यासाठी एक पाणीपुरवठा केंद्र असेल. विहिरी व तळी यांवर घाण केली जाणार नाही या दृष्टीने योग्य नियंत्रण ठेवून ही गोष्ट साधता येतील. एका किमान दर्जा इतके बुनियादी शिक्षण सक्तीचे असेल. शक्यतो प्रत्येक काम सहकारी तत्त्वावर संघटित केले जाईल. माणसांमध्ये उच्चनीच व स्पृश्य-अस्पृश्य अशी प्रतवारी पाडून एक उतरंड रचणारे जातिभेद त्या समाजात नसतील. अहिंसा व तज्जन्य सत्याग्रह आणि असहकार हीच ग्रामसमाजाच्या अखत्यारातील दंडसत्ता असेल. ग्रामरक्षक दलात काम करणे सक्तीचे असेल. ग्रामरक्षकांची आळीपाळीने निवड करण्याकरता प्रत्येक गाव नागरिकांची नोंद ठेवील. ग्रामशासनाचे कार्य पंचायतीमार्फत होईल. पंचायतीत पाच व्यक्ती असतील. त्यांची निवड गावातील प्रौढ व पूर्वनिश्चित अशी किमान पात्रता असणारे स्त्रीपुरुष करतील. या पंचायतीला सर्व क्षेत्रांत पूर्ण अधिकार राहतील. रूढ अर्थाने शिक्षा देण्याची पद्धत राहाणार नसल्याने विधिसभा, न्यायसभा व अंमलबजावणीची सर्व कामे या पंचायतीकडेच राहातील. कोणतेही गाव आजसुद्धा असे " लोक-सत्ताक ग्रामराज्य " होऊ शकते. त्यात फारसा कोणाचा हस्तक्षेप होणार नाही. अगदी आजच्या परकीय सरकारचासुद्धा त्याला फारसा विरोध होणार नाही, कारण या सरकारचा गावाशी एकमेव परिणामकारक संबंध केवळ महसूल गोळा करण्यापुरताच येतो. ग्रामराज्याचे इतर गावांशी, किंवा एखादी केंद्रसत्ता असलीच तर तिच्याशी, संबंध कसे असावेत याचा सविस्तर ऊहापोह मी येथे केलेला नाही. ग्रामशासनाचा एक ढोबळ आराखडा मांडावा हाच माझा हेतू आहे. माझ्या कल्पनेतील ग्रामराज्यात व्यक्ति-स्वातंत्र्यावर आधारलेली संपूर्ण लोकशाही असेल. प्रत्येक व्यक्ती आपल्या शासनाची शिल्पकार असेल. व्यक्ती व सरकार दोघेही अहिंसेचे नियम पाळतील. अशी व्यक्ती व तिचा गाव जगातील कोणत्याही सामर्थ्याला झुगारून देऊ शकतील. प्रत्येक ग्रामस्थावर एकाच नियमाचे अधिराज्य असेल. " स्वतःच्या व गावाच्या सन्मानासाठी मृत्यूला आलिंगन देईन " हाच तो नियम ' ( **हरिजन**, २६-७-४२, पृ. २३८ ).

म्हणूनच, विकेंद्रित अर्थव्यवस्था आणि सत्याग्रह यांच्याकडे एकाच क्रांतिकारक विचारसरणीच्या दोन अविभाज्य बाजू या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. हा क्रांतिकारक मार्ग मानवजातीला एका नव्या, सर्जनशील, स्वातंत्र्याने परिपूर्ण अशा समाजव्यवस्थेच्या प्रांगणात नेऊन सोडेल अशी आशा गांधी बाळगून होते.

टीपा :

१. 'मुंबईच्या गिरण्यांत काम करणारे कामगार नुसते गुलाम झाले आहेत. या गिरण्यांतून काम करणाऱ्या स्त्रियांची स्थिती तर धक्का देणारी आहे. गिरण्या नव्हत्या तेव्हा या स्त्रिया उपाशी मरत होत्या असे नाही. आपल्या देशात यंत्रांचा हा हव्यास वाढत गेला तर देश दुःखी होईल. माझे म्हणणे कोणाला पाखंडी वाटेल पण हिंदुस्थानात गिरण्यांचे जाळे निर्माण केले त्यापेक्षा मँचेस्टरला पैसे पाठवून तेथील तकलादू कापड आपण वापरत होतो तेच बरे होते असे म्हणणे मला भाग आहे. मँचेस्टरचे कापड वापरण्यात आपण फक्त आपले पैसे फुकट घालवू; पण देशातच मँचेस्टर ( म्हणजे गिरण्या ) निर्माण केल्याने पैसे वाचतील पण त्यासाठी आपण आपल्या स्वत्वाचा मोबदला देत राहू. कारण गिरण्यांमुळे आपले नैतिक खच्चीकरण होत राहील. माझ्या या विधानांच्या पुष्ट्यर्थ साक्ष द्यायला मी या कामगारांनाच बोलवीन. या गिरण्या चालवून ज्यांनी संपत्ती मिळवली असेल ती माणसे इतर श्रीमंत माणसांपेक्षा विशेष चांगली निघतील असे नाही...... श्रीमंत माणसांचा ब्रिटिश राजवटीला पाठिंबा आहे हे मला वाटते आपल्याला मान्यच करावे लागेल. इंग्रजी सत्ता टिकून राहण्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत.... दरिद्री भारत स्वतंत्र होऊ शकेल पण अनीतीने श्रीमंत बनलेल्या भारताला स्वराज्य मिळवणे फारच कठीण जाईल.' ( हिं. स्व., पृ. ५६ ).

२. 'खरोखर पाश्चात्य देशांत कारखानदारीकरण आणि पिळवणूक यांचा अतिरेक झाला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की कारखानदारी यांत्रिक संस्कृती हा एक रोगच आहे, कारण ती एक सर्वस्वी अनिष्ट, पापी गोष्ट आहे. गोंडस वर्णने आणि मोठमोठे शब्द यांनी आपण आपली फसवणूक होऊ देता कामा नये. जहाजे व तारायंत्रे यांच्याशी माझे मुळीच भांडण नाही. कारखानदारीकरण व त्यात गर्भित असलेल्या इतर गोष्टींच्या आधाराशिवाय त्यांची धारणा होऊ शकत असेल तर त्या गोष्टी खुशाल उपयोगात राहू द्या. जहाजे व तारायंत्रे ही मानवी जीवनाची साध्ये नाहीत. त्यांसाठी आपण आपली पिळवणूक होऊ देता कामा नये. मानवाच्या चिरकालीन कल्याणासाठी या गोष्टी आवश्यक आहेत असे मुळीच नाही. आता एकदा आपल्याला वाफेचा व विजेचा उपयोग कळला आहे तेव्हा, कारखानदारीकरण टाळायला शिकल्यानंतर योग्य प्रसंगी त्यांचा उपयोग करणे आपल्याला जमले पाहिजे. तेव्हा, आपले पहिले काम म्हणजे कोणतेही मोल देऊन प्रथम कारखानदारीकरण नष्ट करणे हे आहे. सध्याची आपदावस्था

असह्य आहे. आजचे भिकारीपण, अठराविश्वे दारिद्य नष्ट झाले पाहिजे, पण कारखानदारीकरण हा त्यावरचा उपाय नाही. तसे म्हटले तर बैलगाड्या वापरण्याने आजचे दैन्य-दारिद्य निर्माण झालेले नाही. खरा दोष आपल्या स्वार्थीपणात व इतरांबद्दलच्या सहानुभूतीच्या अभावात आहे. आपल्याला जर शेजाऱ्याबद्दल प्रेम वाटत नसेल तर कितीही इतर क्रांतिकारक बदल केले तरी आपले कधीच भले होणार नाही ' ( यं. इं., ७-१०-२६, पृ. ३४८ ).

३. ' कारखानदारीकरण हा मानवाला मिळालेला शाप ठरणार आहे. दुसऱ्याला पिळण्याची कुवत, परकीय बाजारपेठांची उपलब्धता आणि स्पर्धा करणाऱ्यांचा अभाव याच गोष्टींवर कारखानदारीकरण सर्वस्वी अवलंबून असते. हे तीन घटक दर दिवशी इंग्लंडला कमी कमी प्रमाणात उपलब्ध होत चालल्यामुळेच तेथील बेकारांची संख्या बेसुमार वाढली आहे. भारतीय जनतेने इंग्रजी मालावर टाकलेला बहिष्कार या संदर्भात अगदीच क्षुद्र होता. इंग्लंडची जर ही अवस्था, तर भारतासारख्या विशाल देशाने कारखानदारीकरणापासून फायद्याची अपेक्षा करणे निखालस चूक होईल. खरोखर, भारताने इतर देशांची पिळवणूक करायला सुरुवात केली– कारण कारखानदारीकरण करावयाचे तर पिळवणूक करावीच लागणार– तर हिंदुस्थान म्हणजे इतर देशांना मोठाच शाप ठरेल; जग धोक्यात येईल. इतर देशांची पिळवणूक करण्यासाठी हिंदुस्थानात कारखानदारी वाढविण्याचा विचार मी का करू ? इंग्लंडची शोकांतिका आपण पहात आहोतच ना ? आपण आपल्या देशातील तीस कोटी लोकांना रोजगार मिळवून देऊ शकू ( चरखा व तत्सम ग्रामोद्योग यांच्या द्वारे – लेखक ), पण इंग्लंड आपल्या तीस लक्ष बेकारांना काम देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. इंग्लंडमधील या बेकारीच्या प्रश्नापुढे तेथील मोठमोठ्या विचारवंतांनीही हात टेकले आहेत. कारखानदारीचे भवितव्य अंधःकारमय आहे. जर्मनी, फ्रान्स, अमेरिका आणि जपान यांसारख्या यशस्वी स्पर्धकांशी इंग्लंडची गाठ पडली आहे. हिंदुस्थानातील मूठभर कापडगिरण्यासुद्धा इंग्लंडशी स्पर्धा करू लागल्या आहेत. आज भारत जसा कारखानदारीच्या क्षेत्रात पदार्पण करीत आहे, तशी उद्या दक्षिण आफ्रिकाही करीलच. आणि द. आफ्रिकेजवळ भारतापेक्षा खूपच अधिक साधनसंपत्ती– नैसर्गिक, खनिज व मानवी– आहे. आजचा बलाढ्य इंग्रज आफ्रिकेतील निग्रो वंशांतील दणकट लोकांपुढे उभा केला तर अगदीच खुजा दिसतो. कोणी असे म्हणेल की ती माणसे उमदी असली तरी जंगली आहेत. ती उमदी आहेत हे नक्कीच, पण जंगली मात्र मुळीच नाहीत. ' आपण निर्माण केलेल्या वस्तू हमखास माथी मारण्याची बाजारपेठ म्हणजे आफ्रिका ' हे वचन खोटे ठरण्याची

वेळ लवकरच आल्याचे युरोपीय राष्ट्रांना दिसून येईल. कारखानदारीकरणाचे वेड पाश्चिमात्यांना अंधाराकडेच नेणार असेल तर भारताला ते अधिकच धोकादायक नाही काय ?' (यं. इं., १२-११-१९३१, पृ. ३५५).

४. 'उत्पादनाच्या उत्तमोत्तम पद्धतींचाच तेवढा अंगीकार करून नव्हे तर, उत्पादन आणि वितरण दोन्हींच्या दृष्टीने उत्तम असलेली पद्धत स्वीकारून आम्ही आमचे राष्ट्रीय सामर्थ्य संघटित करू इच्छितो' (सिलेक्शन्स, पृ. २५०).

'खादीच्या शास्त्रानुसार निर्मिती व उपभोग या दोन्हींचेही विकेंद्रीकरण आवश्यक आहे. जेथे खादी निर्माण होते तेथून जास्तीत जास्त जवळ तिचा वापर झाला पाहिजे' (सिलेक्शन्स, पृ. २५६).

'मी व्यक्तिशः मोठमोठ्या कंपन्या स्थापन करण्याच्या आणि यंत्रांचे अवडंबर उभे करून उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण करण्याच्या विरुद्ध आहे. हिंदुस्थानातील जनता सर्वार्थाने खादीचा स्वीकार करील तर श्रमांचा भार हलका करण्यासाठी आणि जीवन सुस्थित करण्यासाठी आवश्यक गणली जातील तेवढीच आधुनिक यंत्रतंत्रे भारत स्वीकारील ही आशा सोडण्याचे मला कारण दिसत नाही' (सिलेक्शन्स, पृ. २६०).

गांधी पुढे म्हणतात :

'मोठ्या प्रमाणावर उत्पादन? अर्थातच, पण त्यात जुलुम असता कामा नये. खरे पाहता हाच चरख्याचा संदेश आहे. चरख्याने मोठ्या प्रमाणावरच निर्मिती होते. पण ती लक्षावधी लोकांनी आपापल्या घरात केलेली असते. एका व्यक्तीच्या उत्पादनाची कोटयवधी पट केली तर ते प्रचंड प्रमाणावरील उत्पादनच होत नाही काय? पण तरी माझे म्हणणे मला स्पष्टपणे मांडू दे. माझी अशी खात्री आहे की, जगाच्या आजच्या संकटांना हा मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचा हव्यासच जबाबदार आहे. यंत्रांच्या सहाय्याने मानवाच्या सर्व गरजा भागवता येतील असे क्षणभर मानले तरी त्यामुळे उत्पादन एका विशिष्ट भागात केंद्रित होईल हे नक्कीच. त्यामुळे वाटप नियंत्रित करण्यासाठी निष्कारण वळसा घालणाऱ्या आडवळणी मार्गांचा अवलंब करावा लागणार हे उघड आहे. उलट जेथे जेथे गरज आहे तेथे तेथे उत्पादन झाल्यास वाटपाचे नियंत्रण आपोआपच होईल. त्यामुळे त्यात अपहाराला फारच कमी वाव राहील व सट्टेबाजी तर मुळीच होणार नाही. उत्पादन व त्याचे सेवन या दोहोंचे संघटन स्थानिक पातळीवर झाले की पडेल ती किंमत देऊन उत्पादन अमर्याद वाढविण्याचा मोह नाहीसा होईल. आजच्या आर्थिक पद्धतीने निर्माण केलेले असंख्य प्रश्न व अनंत भानगडी मग आपोआप संपुष्टात येतील. एकीकडे मूठभर लोकांजवळ वस्तूंचे अनैसर्गिक प्रचंड

साठे आणि दुसऱ्या बाजूस लाखो लोकांच्या घरांत त्या वस्तूंचे दुर्भिक्ष्य असे दृश्य दिसणार नाही. आज ही राष्ट्रे तथाकथित दुबळ्या आणि असंघटित समाजांना लुटताना दिसत आहेत. पण एकदा का या लोकांना ही प्राथमिक गोष्ट समजली आणि त्यांनी आपली लूट होऊ द्यायची नाही असे ठरवले की स्वतः जे निर्माण करू शकतील त्यातच समाधान मानून ते राहातील. तेव्हा मग प्राणभूत गरजांच्या बाबतीत तरी केंद्रित स्वरूपाचे मोठ्या प्रमाणावरील उत्पादन बंद पडेल.'

प्रश्न : 'तर मग उत्पादन व वाटप मूठभर लोकांच्या हातांत केंद्रित होते म्हणून आणि तशा प्रकारच्या केंद्रीकरणास सहाय्यभूत ठरणाऱ्या यंत्रांनाच तुमचा विरोध आहे असे म्हणायचे का?'

उत्तर : 'होय. तुमचे म्हणणे बरोबर आहे. मक्तेदारी आणि विशेषाधिकार यांचा मला तिटकारा आहे. ज्यात सर्वसाधारण माणसाला भाग घेता येत नाही ते मला वर्ज्य आहे, इतकेच' (**हरिजन, २-११-१९३४, पृ. ३०१**).

५. 'माझ्या मते भारताची, किंबहुना साऱ्या जगाचीच अर्थव्यवस्था अशी हवी की कोणालाही अन्न-वस्त्राचा तुटवडा पडू नये. वेगळ्या प्रकारे सांगायचे तर, प्रत्येकाला आपला उदरनिर्वाह चालविण्यास पुरेल इतका रोजगार मिळाला पाहिजे. हे उद्दिष्ट जगात सर्वत्र सिद्ध व्हायचे असेल तर जीवनातील प्राथमिक गरजांच्या निर्मितीची साधने जनतेच्या हाती असली पाहिजेत. ईश्वरनिर्मित हवा व पाणी जसे सर्वांना मुक्तपणे घेता येते (किंवा घेता यायला हवे) तद्वतच जीवनाच्या प्राथमिक गरजा भागविण्याची साधनेही प्रत्येकाला मुक्तपणे मिळाली पाहिजेत. त्यांचा उपयोग दुसऱ्यांची पिळवणूक करण्याची साधने म्हणून करता येऊ नये. एखाद्या देशाची, राष्ट्राची किंवा गटाची त्यांच्यावर मक्तेदारी प्रस्थापित होणे अन्यायाचे होईल. या साध्या तत्त्वाकडे दुर्लक्ष झाल्यामुळेच आज, आपल्या कमनशिबी देशातच नव्हे तर, जगाच्या इतरही भागांत दारिद्य दिसत आहे' (**सिलेक्शन्स, पृ. १६०**).

'हिंसा कोणच्या एका पक्षाची मक्तेदारी आहे असे नाही. मला असेही काँग्रेसजन माहीत आहेत की जे समाजवादी नाहीत किंवा कम्युनिस्टही नाहीत आणि तरी उघडपणे हिंसाचाराचे पुरस्कर्ते आहेत. उलट मला असे समाजवादी व कम्युनिस्ट माहीत आहेत की जे माशीच्या पंखालासुद्धा धक्का लावणार नाहीत. निर्मितीच्या साधनांवरील सामाजिक मालकीच्या तत्त्वावर त्यांची दृढ श्रद्धा आहे. मी स्वतःला त्यांच्यातील एक समजतो' (**सिलेक्शन्स, पृ. १६१**).

६. 'जगामध्ये आजवर कोठेही घडून आले नाही इतक्या मोठ्या प्रमाणावर ऐच्छिक सहकार्य सूतकताईच्या विस्तारातून घडून येत आहे हे बहुधा फारच थोड्या

कार्यकर्त्यांच्या लक्षात आलेले आहे. अतिशय विशाल प्रदेशावर विखुरलेल्या आणि रोजच्या अन्नासाठी रोजंदारी करणाऱ्या लक्षावधी लोकांचे हे सहकार्य आहे. शेतीलाही खूपच मोठ्या सहकारी प्रयत्नांची गरज लागते यात शंका नाही. पण हातकताईला त्यापेक्षा जास्त व अधिक सच्च्या सहकार्याची गरज असते. गहू पिकतो तो माणसापेक्षा निसर्गाच्या ' प्रामाणिकपणा 'मुळेच. पण आपल्या झोपडीत सूत तयार करणे हे पूर्णपणे माणसाच्या प्रामाणिकपणावरच अवलंबून आहे. लक्षावधी लोकांनी स्वेच्छेने आणि बुद्धिपुरःसर सहकार्य केल्याशिवाय सूतकताई अशक्यच आहे. अन्नधान्य विकणाऱ्याप्रमाणेच भक्तिभावाने कातलेल्या सुताला बाजारपेठ मिळेल अशी परिस्थिती आपण निर्माण केली पाहिजे. तसेच त्याला पिंजणकाम येत नसेल तर नियमितपणे पेळू मिळतील अशी व्यवस्था झाली पाहिजे. सामान्य जनांचे वाढत चाललेले भिकारीपण सूतकताईमुळे जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे निघून जाईल असा मी दावा केला तर त्यात नवल वाटण्यासारखे काय आहे ? एका इंग्रज स्नेह्याने माझ्याकडे चीनने यांत्रिकीकरणात केलेली प्रगती दर्शविणारे वृत्तपत्राचे एक कात्रण पाठविले आहे. चरख्याचा व हातकताईचा मी पुरस्कार करतो त्या अर्थी बाळबोध यंत्रांचाच वापर तेवढा व्हावा असे माझे यंत्रांच्या आदर्श वापराविषयी मत आहे अशी या मित्राची समजूत झालेली दिसते. मी तसले काही मुळीच करत नाही. भारताचे भिकारीपण व तज्जन्य आलस्य नष्ट होणार असेल तर अत्यंत गुंतागुंतीच्या व जगडव्याळ यंत्रसामग्रीचा वापर करणे मी पसंत करीन. मी सूतकताईचा पुरस्कार करतो कारण, माझ्या मते, दारिद्र्य हद्दपार करण्याचे आणि रोजगार व संपत्ती यांचे दुर्भिक्ष्य अशक्य करून टाकण्याचे तेवढे एकच साधन तावडतोब हाताशी आहे. प्रत्यक्षात चरखा हेसुद्धा एक मूल्यवान यंत्रच आहे. आणि भारतातील विशिष्ट परिस्थितीशी सुसंगती राखून त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्नही मी माझ्या परीने सतत केला आहे. भारतावर आणि साऱ्या मानवतेवर प्रेम करणाऱ्याने स्वतःला एकच प्रश्न विचारावयाचा आहे: " आपले करंटे दैन्य-दारिद्र्य कमी करण्यासाठी कोणती व्यवहार्य साधने व मार्ग आपणास संघटित करता येतील ? " अत्यंत विशाल प्रदेशावर विखुरलेल्या भारतीय जनतेला वा सतत नव्याने बेकार होऊन घरी बसावे लागणाऱ्या लाखो माणसांना रोजगार मिळवून देण्याची कुवत असलेली कोणतीही पाणीपुरवठ्याची वा शेती सुधारण्याची योजना शोधून काढणे ही गोष्ट मानवी बुद्धीच्या आवाक्याबाहेरची आहे. ज्या देशातील लोक दिवसाकाठी सरासरी पाचच तास काम करतात, जास्त काम करण्याची त्यांची इच्छा नसते म्हणून नाही तर त्यांच्यासाठी त्याहून अधिक

रोजगार उपलब्धच नाही म्हणून, अशा देशाची कल्पना करा म्हणजे तुमच्यापुढे भारताचे वास्तव चित्र उभे राहील.

'वाचक आपल्यापुढे वरील प्रकारचे वास्तव चित्र उभे करील तर शहरातील धावपळीचे जीवन, शरीरातली सारी शक्ती शोषून घेणारे गिरणीतील जीवन, किंवा मळ्यातील गुलामगिरीचे जीवन हे जनसामान्यांच्या जीवनाचे प्रातिनिधिक चित्रण नाही हे त्याला ध्यानात घ्यावे लागेल. भारतीय समाजजीवनाच्या महासागरातील हे केवळ काही थेंब आहेत. भारतीय माणसाचा सांगाडा सम्यक् स्वरूपात वाचकाला डोळ्यापुढे आणावयाचा तर त्याला मुख्यतः आपापल्या लहानशा शेतात खपणाऱ्या ८० टक्के जनतेचाच विचार मनात आणावा लागेल. या लोकांना वर्षातून निदान चार महिने मुळीच काम नसते. त्यामुळे ही माणसे उपासमारीच्या छायेतच सतत वास करीत असतात. ही त्या लोकांची नेहमीची सर्वसाधारण स्थिती आहे. वारंवार पडणाऱ्या दुष्काळांमुळे या सक्तीच्या बेकारीत आणि निरुद्योगात आणखीच भर पडते. आपली घरेदारे, शेतीभाती न सोडता आपल्या तुटपुंज्या उत्पन्नात भर घालता येईल असे कोणते काम ही बायकामाणसे विनासायास करू शकतील? सूतकताईखेरीज दुसरे कोणतेच असे काम नाही याबद्दल अजूनही कोणाला शंका वाटते काय? मी पुन्हा पुन्हा सांगेन की, कार्यकर्ते मनात आणतील तर काही महिन्यांच्या अवधीतच ही गोष्ट सर्वत्र पसरू शकेल. खरोखर ती आताच सार्वत्रिक होण्याच्या मार्गावर आहे. त्याचे योग्य संघटन करायलाच काय ती तज्ज्ञांची आवश्यकता आहे. लोक तयार आहेतच. शिवाय सूतकताईच्या बाबतीत खूप अनुकूल गोष्ट अशी की, हा रोजगार एकदम नवीन किंवा अपरिचित नाही. अगदी कालपरवापर्यंत लोक सूत कातीत होते. त्याचे यशस्वी पुनरुज्जीवन करायचे तर कुशल प्रयत्न, चिकाटी, प्रामाणिकपणा आणि जगाने आजपर्यंत पाहिले नाही एवढ्या मोठ्या प्रमाणावरील सहकार्य यांची गरज आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर भारत सहकार साधू शकला तर या एकाच कृत्याने तो स्वराज्य मिळवील हे कोण नाकारू शकेल? ( यं. इं., ३-११-१९२२, पृ. ३५० ).

'आपण विदेशी कापडावरील बहिष्कार पूर्णपणे यशस्वी करू ( अर्थात खादीचे पुरेसे उत्पादन करून – लेखक ) त्या क्षणी साधेपणा व कौटुंबिक जिव्हाळा या जनमानसावर बिंबवलेल्या आदर्श तत्त्वांवर राष्ट्रीय जीवन पुनर्घटित करण्याइतकी आपली तयारी व उत्क्रांती झालेली असेल असा माझा दावा आहे. मग जगातील दुर्बलांच्या पिळवणुकीवरच उभ्या राहणाऱ्या साम्राज्यवादाच्या जंजाळात आपण गुरफटणार नाही. देशोदेशींच्या अजस्र सेनादलांनी जगात

शांततेने राहणे आज जवळपास अशक्य करून टाकले आहे. याच पाशवी बळावर आपल्या धारणेसाठी अवलंबून असणारी बेताल भोगवादी संस्कृती आपलीशी करण्याच्या मोहात मग आपण पडणार नाही. उलट आपण साम्राज्याचे रूपांतर राष्ट्रकुटुंबात करू. असे राष्ट्रकुटुंब की ज्यात राष्ट्रे एकत्र येऊन जगाला आपल्याजवळील उत्तम ते ते देतील आणि दुर्बल लोक व राष्ट्रे यांचे पाशवी सामर्थ्याऐवजी आत्मक्लेशाने रक्षण करतील. विचारविश्वात अशी पूर्ण क्रांती घडवून आणणे हाच असहकाराचा उद्देश आहे. चरख्याचा प्रसार करण्यात पूर्ण यश मिळण्यावरच हे परिवर्तन घडून येणे अवलंबून आहे. भारतास जगाला हा संदेश देण्यास पात्र बनावयाचे असेल तर परराष्ट्रांना भारताचा मोह पडणार नाही ( व मग अर्थातच परचक्रे येणार नाहीत ) अशी पक्की व्यवस्था आपण केली पाहिजे. अन्न व वस्त्र या दोन मुख्य गरजांबाबत तो स्वयंपूर्ण झाला तरच भारताचा कोणाला मोह पडणार नाही ' ( यं. इं., २९-६-१९२१, पृ. २०६ ).

७. असहकार चळवळीचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आढळते :

' ( शक्य असलेच तर ) यंत्रांवर काम करणाऱ्या माणसांत मानवता निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. अनेकांची पिळवणूक करून थोड्याशा लोकांच्या हातात सत्ता व संपत्ती केंद्रित करण्याच्या हेतूने यंत्रांचे किंवा कारखानदारीचे संघटन करणे सर्वस्वी चुकीचे आहे असे मी मानतो. आज अस्तित्वात असलेले यंत्रांचे संघटन बव्हंशी वरीलप्रकारचे आहे. काही मूठभर लोकांच्या हातात ती आहेत आणि यंत्रे ही पिळवणूक करण्याची साधने आहेत. यंत्रांची ही आजची भूमिका मोडून काढून त्यांना त्यांचे योग्य स्थान मिळवून देण्याची खादीची चळवळ हा एक संघटित प्रयत्न आहे. त्यामुळे माझ्या योजनेत यंत्रचालक स्वतःपुरता किंवा स्वतःच्या राष्ट्रापुरता विचार करून थांबणार नाहीत तर साऱ्या मानवजातीचाच ते विचार करतील. त्या परिस्थितीत लँकेशायर आपल्या गिरण्यांतील यंत्रांचा उपयोग भारत किंवा इतर देशांची पिळवणूक करण्यासाठी करण्याचे थांबवील. पुढे जाऊन, हिंदुस्थानला आपल्या खेड्यांतच कापसाचे कापड करता यावे यासाठी आवश्यक ती साधने व उपाय शोधून काढण्याचे काम लँकेशायर करील. तसेच माझ्या योजनेखाली अमेरिकन लोकशाही आपल्या शोधक बुद्धीचा व कौशल्याचा वापर पृथ्वीवरील इतर लोकांना लुटण्यासाठी करणार नाही ' ( यं. इं., १७-९-१९२५, पृ. ३२१ ).

' बाहेरून होणारी लूटमार थांबल्यानंतरच खेड्यांचे पुनरुज्जीवन शक्य आहे. मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीकरणाने खेड्यांची प्रत्यक्ष किंवा

अप्रत्यक्ष पिळवणूक होणारच. कारण मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीकरणाच्या जोडीला स्पर्धा आणि बाजारपेठांची उपलब्धता हे प्रश्न येणारच. म्हणूनच आपल्याला खेडे स्वयंपूर्ण करण्यावर, म्हणजे प्रामुख्याने स्वतःच्या सेवनासाठीच उत्पादन करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. ग्रामीण उद्योग-धंद्यांबाबत एवढे एक पथ्य सांभाळले गेले तर त्यांनी त्यांना बनवता येतील व परवडतील अशी अगदी अद्ययावत यंत्रे व अवजारे वापरण्याला माझी मुळीच हरकत नाही. मात्र त्यांचा उपयोग इतरांची पिळवणूक करण्यासाठी होता कामा नये ' ( हरिजन, २९-८-१९३६, पृ. २२६ ).

'मी जर साऱ्या देशाचे मन माझ्या बाजूला वळवू शकलो तर भावी काळातील समाजव्यवस्था मी प्रामुख्याने चरखा व त्यात गर्भित असलेली तत्त्वे यावरच आधारीन. खेडेगावातील लोकांचे जीवन सुखी करण्यास हातभार लावणाऱ्या सर्व गोष्टी त्यात असतील. गाव व गावकरी यांना धक्का पोचणार नाही ही मर्यादा सांभाळल्यावर मग माझ्या पत्रलेखकाने सुचवलेले सर्व उद्योग-धंदे त्या समाजव्यवस्थेत असतील. वीज, जहाज बांधणी, पोलाद निर्मिती, यंत्रोत्पादन यांसारख्या गोष्टी ग्रामीण हस्तोद्योगांबरोबरच गुण्यागोविंदाने राहात असल्याचे दृश्य मी जरूर पाहतो. पण मला अभिप्रेत असलेल्या समाजव्यवस्थेत अवलंबनाचा क्रम उलटा झालेला दिसेल. आजपर्यंत कारखानदारीकरणाचा प्रकार असा असे की गावे व ग्रामीण व्यवसाय उद्ध्वस्त होत. पण भावी काळात कारखानदारी उद्योग, खेडी व तेथील उद्योग यांना पूरक असतील. केंद्रीभूत उद्योग राज्यसत्तेच्या योजनेनुसार व मालकीखाली प्रस्थापित झाले म्हणजे जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती मोठ्या प्रमाणावर व केंद्रित स्वरूपात करणे हे जनसामान्यांच्या कल्याणाच्या दृष्टीने उपकारक ठरेल, या समाजवादी समजुतीशी मात्र मी मुळीच सहमत नाही ' ( हरिजन, २७-१-१९४०, पृ. ४२८ ).

'ज्या वस्तू खेड्यांतही शहरांइतक्याच चांगल्या निर्माण करता येतात त्यांचे उत्पादन शहरात करायला माझ्या योजनेत परवानगी नसेल. ग्रामीण उत्पादनाच्या विक्रीची व्यवस्था करणारी केंद्रे हेच शहरांचे योग्य कार्य आहे ' ( हरिजन, २८-१-१९३९, पृ. ४३८ ).

यंत्रे व कारखाने यांबद्दल प्रेम बाळगणाऱ्या एका समाजवादी गृहस्थांनी एकदा गांधींना विचारले, ' ग्रामोद्योगाची चळवळ यंत्राची हकालपट्टी करण्यासाठीच चालवली आहे काय ? '

गांधी त्या वेळी चरख्यावर सूत काढत होते. त्या चरख्याकडे बोट दाखवून त्यांनी प्रतिप्रश्न केला, ' हे चक्र म्हणजे एक यंत्रच नाही का ? '

'माझा प्रश्न मोठमोठ्या यंत्रांबद्दल होता.'

'म्हणजे, उदाहरणार्थ, सिंगरचे शिवणयंत्र का? पण तेही आमच्या ग्रामोद्योग चळवळीत सुरक्षित आहे. खरे म्हणजे ज्यामुळे लाखो माणसांचा काम करण्याचा हक्क हिरावून घेतला जात नाही, ज्यामुळे माणसाच्या व्यक्तिगत कुशलतेत भरच पडेल, जे यंत्र माणूस स्वतःच्या मर्जीप्रमाणे वापरू शकेल, जे यंत्र त्याला गुलाम बनविणार नाही अशा कोणत्याही यंत्राशी आमचे वाकडे नाही.'

'पण मग मोठमोठ्या यंत्रांच्या शोधांचे काय? तुम्हाला तर विजेशीसुद्धा कर्तव्य नसणार?'

'असे कोण म्हणते? आपण जर घराघरातून वीज आणू शकलो तर खेडुतांनी आपआपली अवजारे-आयुधे विजेवर चालवण्यास माझी मुळीच हरकत नाही. मात्र विद्युतनिर्मितीकेंद्रे सरकारच्या किंवा पंचायतीच्या ताब्यात असतील, आज चराऊ जमीन जशी गावकीच्या मालकीची असते. हो, पण जेथे वीज नाही किंवा यंत्रेही नाहीत तेथील माणसांच्या रिकाम्या हातांनी काय करावयाचे? काम नसल्याने ते हातच तोडून टाकावेत असे आपण म्हणाल, की त्यांना काम पुरवाल?

'सर्व मनुष्यमात्राच्या फायद्यासाठी लावल्या जाणाऱ्या प्रत्येक शोधाचे मला चीज आहे. पण शोधा-शोधात फरक आहे. एकाच वेळी माणसांचे समुदायच्या समुदाय मारून टाकणाऱ्या विषारी वायूंचे शोध मला कवडीमोलाचे वाटतात. मानवी श्रमांच्या आवाक्याबाहेरची सार्वजनिक उपयोगाची मोठमोठी प्रचंड कामे करू शकणाऱ्या यंत्रांनाही त्यांचे असे योग्य स्थान निश्चितच आहे. मात्र ही सर्व यंत्रे सार्वजनिक मालकीची असतील. त्यांचा उपयोग जनतेच्या भल्यासाठीच केला जाईल. परंतु ज्या यंत्रसामग्रीमुळे अनेकांच्या जिवावर थोडे लोक श्रीमंत होऊ शकतात, किंवा काही कारण नसताना लोकांचा रोजगार काढून घेऊ शकतात त्यांचे मला मुळीसुद्धा प्रेम नाही.

'आणि समाजवादी असलात तरी तुम्हीही यंत्रांच्या अविवेकी बेसुमार उपयोगाच्या बाजूने मत देणार नाही. छापण्याची यंत्रे घ्या. ती चालूच राहातील. शस्त्रक्रियेची उपकरणे घ्या. ती निव्वळ हाताने कशी करता येतील? ती करण्यासाठी मोठी अवजड यंत्रे हवीतच.' त्याच वेळी आपल्या चरख्याकडे पाहून ते म्हणाले, 'पण माणसाच्या निरुद्योगीपणावर या यंत्राखेरीज दुसरा काहीच उपाय नाही. तुमच्याशी बोलत असतानासुद्धा मी चरखा चालवू शकतो. तेवढ्यात मी राष्ट्रीय संपत्तीत थोडी का होईना भर घालू शकतो. हे यंत्र कोणी हुसकून काढू शकणार नाही' (**हरिजन, २२-६-१९३५, पृ. १४६**).

प्रश्न : तर मग तुमचा लढा यंत्र म्हणून यंत्राशी नसून त्याचा जो दुरुपयोग आज बोकाळला आहे त्याच्याविरुद्ध आहे, असेच ना ?

उत्तर : याचे होकारार्थी उत्तर देण्यास मला काहीच हरकत दिसत नाही; मात्र मी पुढे जाऊन असे म्हणेन की शास्त्रीय शोध आणि संशोधन ही केवळ द्रव्यलोभाची साधने होण्याचे आधी थांबले पाहिजे. म्हणजे मजुरांना अतिरिक्त मेहनतीचा बोजा पडणार नाही. आणि यंत्र म्हणजे संकट न ठरता मदतीचा हातच ठरेल. यंत्रे नष्ट करणे हे माझे ध्येय नसून त्यांवर मर्यादा घालणे हे माझे उद्दिष्ट आहे.

प्रश्न : या विधानाचा तर्कशुद्ध परिणाम सर्वच गुंतागुंतीची, वीज व इतर इंधनशक्तींवर चालणारी यंत्रे निषिद्ध ठरण्यात होईल का ?

उत्तर : कदाचित तसेही होईल. पण एक गोष्ट मला येथे स्पष्ट केली पाहिजे. ती ही की, कोणत्याही बाबतीत ' माणसाचे हित ' हाच सर्वोच्च निकष राहील. यंत्रांच्या वापरामुळे माणसांची इंद्रिये निकामी होता कामा नयेत. अर्थात मी या नियमाला काही खुबीदार अपवादही करीन. सिंगरच्या शिवण यंत्राचेच उदाहरण घ्या. जगातील अत्यंत उपयुक्त शोधांपैकी तो एक आहे. शिवाय त्या शोधाची एक भावरम्य कहाणी आहे. शिवणटिपण करण्याचे अत्यंत किचकट काम करून आपल्या पत्नीची दमछाक होताना सिंगरने पाहिले होते. केवळ तिच्या प्रेमाखातर, तिला निष्कारण फाजील परिश्रम करावे लागू नयेत म्हणून त्याने या यंत्राची रचना केली. पण त्या यंत्राने त्याने केवळ आपल्या बायकोचेच श्रम वाचवले असे नव्हे तर ज्याला कोणाला ते यंत्र घेता येईल त्या सर्वांचे श्रम त्याने कमी केले.

प्रश्न : पण तसे करण्यासाठी सिंगर शिवणयंत्रे तयार करण्याचा कारखाना पाहिजे. त्या कारखान्यात शक्तीवर चालणारी मोठी यंत्रे हवीत.

उत्तर : हो, पण असे कारखाने राष्ट्रीय मालकीचे असावेत किंवा त्यांवर सरकारी नियंत्रण असावे असे म्हणण्याइतका समाजवादी मी खचितच आहे. हे कारखाने आदर्श व्यवस्थेखाली अगदी आकर्षक अटींवर चालवले गेले पाहिजेत; फायद्यासाठी नव्हे तर, मानवी कल्याणासाठी लोभाची जागा प्रेमाने घेतली पाहिजे. मजुरांच्या कामाच्या पद्धतीत आणि वातावरणातच बदल झालेला मला हवा आहे. पैशापाठी चाललेली ही पिसाट स्पर्धा थांबली पाहिजे. मजुरांना त्यांच्या दैनंदिन जीवनाला पुरेल इतका रोजगार तर मिळालाच पाहिजे पण त्यांचे कामही केवळ ढोरमेहनतीच्या स्वरूपाचे, घाण्याला जुंपलेल्या बैलाच्या कामासारखे तेच-ते, कंटाळवाणे राहाता कामा नये. अशी स्थिती झाली तर यंत्रे चालकांना

किंवा सरकारला जितकी फायदेशीर ठरतील तितकीच ती त्यांवर काम करणाऱ्या मजरांनाही उपयोगी ठरतील. धनसंचयाची राक्षसी महत्त्वाकांक्षा नाहीशी होईल आणि मी वर म्हटल्याप्रमाणे कामगार आदर्श आणि आकर्षक स्थितीत काम करतील. ज्या अनेक यंत्रांचा मी अपवाद करीन त्यांपैकी सिंगरचे शिवणयंत्र हा फक्त एक झाला. शिवणयंत्रामागे प्रेम आहे. तिथे सर्वोच्च मूल्य ' व्यक्ती ' हे आहे. प्रत्येक यंत्रामागे व्यक्तीचे श्रम कमी करणे हे उद्दिष्ट आणि प्रामाणिक मानवतावाद ही प्रेरणा असली पाहिजे. लोभीपणा गेला पाहिजे. लोभाची जागा प्रेमानें घेतली तर सर्व काही नीट होईल ' ( यं. इं., १३-११-१९२४, पृ. ३७८ ).

८. गांधी म्हणतात, ' जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आज जग समाईक आणि सहकारी प्रयत्नाच्या दिशेने पुढे चालले आहे. या दिशेने खूपच गोष्टी साध्य झाल्या आहेत आणि कित्येक होत आहेत. आपल्या देशातही ही गोष्ट आली आहे. पण ती इतक्या विकृत स्वरूपात आली आहे की आमच्या गरीबांना त्याचा काहीच फायदा उठवता आलेला नाही. आपल्या लोकसंख्यावाढीबरोबर सामान्य शेतकऱ्याची जमीन दर दिवशी कमी होत आहे. तसेच बहुतेक वेळी व्यक्तिशः शेतकऱ्याची मालमत्ताही यथातथाच असते. अशा प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या घरात गुरे बाळगणे म्हणजे आत्मघातच करून घेण्यासारखे आहे. तरी आजची प्रत्यक्ष स्थिती मात्र तशीच आहे... ' ( नंतर सहकारी गोपालनासंबंधी काही व्यवहार्य सूचना करून गांधी पुढे लिहितात )...' माझा असा दृढ विश्वास आहे की जोपर्यंत आपण सहकारी पद्धतीने शेती करीत नाही तोपर्यंत शेतीचा पुरेपूर लाभ आपल्याला मिळणार नाही. एखाद्या गावातील शंभर कुटुंबांनी जमिनीच्या कशातरी केलेल्या शंभर तुकड्यांची मशागत करण्यापेक्षा सर्व जमिनीची एकत्र मशागत करून येणारे उत्पन्न सर्वांनी वाटून घेणे चांगले, हेच अधिक तर्कसंगत नाही काय ? जी गोष्ट जमिनीची तीच पशुपालनाची. '

' ही जीवनपद्धती स्वीकारण्यासाठी लोकांची मने तात्काळ वळवणे फार अवघड आहे हा भाग वेगळा. सरळ व अरुंद चढण पार करणे नेहमीच कठीण असते. गोसेवेच्या कार्यात प्रत्येक पावलागणिक प्रश्न काट्यासारखे पसरले आहेत. या सर्व अडचणींवर मात केल्यावरच सोपा रस्ता येण्याची शक्यता आहे. तूर्त तरी माझा उद्देश व्यक्तीने एकेकटीने करण्यापेक्षा सहकारी पद्धतीने पशुपालन करणे किती अधिक लाभदायी आहे हे दाखविणे हा आहे. शिवाय मला असे वाटते की व्यक्तिगत पशुपालनाची पद्धत चूक असून सहकारी पद्धतच बरोबर आहे. दुसऱ्याच्या सहकारानेच आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण व्यवहारात व्यक्ती करू शकते. खाजगीरीत्या पशुपालन करण्यामुळे स्वार्थ आणि क्रौर्य बोकाळले आहे.

उलट सामुदायिक रीतीने पशुपालन केल्यास हे दोन्ही दोष, समूळ टाळता आले नाहीत तरी, खूपच मर्यादेत राखता येतील ' ( हरिजन, १५-२-१९४२, पृ. ३९ ).

९. ' ... मध्ययुगीन काल वाईट असेलही. पण केवळ मध्ययुगीन आहेत म्हणून त्या वेळच्या सर्वच गोष्टींना दोष द्यायला मी तयार नाही. चरखा निश्चितच मध्ययुगीन आहे. पण त्याचे स्थान अढळ आहेसे दिसते. वस्तू तीच असली तरी आता ती स्वातंत्र्य आणि ऐक्य यांचे प्रतीक झाली आहे. तीच ईस्ट इंडिया कंपनीच्या चढाईच्या काळात गुलामगिरीचे चिन्ह होती. आपल्या वाडवडिलांना स्वप्नातसुद्धा दिसला नसेल इतका खोल अर्थ आधुनिक भारताला चरख्यात दिसू लागला आहे ' ( हरिजन, १६-१०-१९३७, पृ. ३०० ).

□ □

प्रकरण तिसरे

# स्वराज्य आणि राज्यसत्ता

## काही मूलतत्त्वे

' स्वराज्या 'ची आपली कल्पना गांधींनी ' हिंद-स्वराज्य ऑर इंडियन होमरूल ' या पुस्तकात पहिल्यांदा निःसंदिग्धपणे विशद केलेली आढळते. भारत व इटली यांची तुलना करताना ते लिहितात :

' इटलीवर इटालियन माणसेच राज्य करतात म्हणून ते राष्ट्र सुखी आहे अशी तुमची कल्पना असल्यास तुम्ही अजून पूर्णपणे अंधारातच आहात असे म्हटले पाहिजे. तेवढ्याने इटली खरीखुरी स्वतंत्र झालेली नाही हे मॅझिनीने निर्विवादपणे दाखवून दिले आहे. स्वातंत्र्याचा व्हिक्टर इमॅन्युएलने एक अर्थ केला तर मॅझिनीने दुसराच. इमॅन्युएल, कॅव्हूर यांच्या, आणि गॅरिबाल्डीच्यासुद्धा, मताप्रमाणे इटली म्हणजे इटलीचा राजा आणि त्याचे चार हस्तक. मॅझिनीच्या मते मात्र इटली म्हणजे इटलीची सारी जनता. त्याच्या मते इमॅन्युएल हा केवळ देशाचा एक सेवक. मॅझिनीची इटली अजून गुलामगिरीतच आहे. इटलीचा तथाकथित स्वातंत्र्यसंग्राम म्हणजे बुद्धिबळातील दोन राजांचीच लढाई होती. जनता म्हणजे खेळातली केवळ प्यादी. इटलीतील **श्रमिक जनता*** आजही सुखी नाही. म्हणूनच तेथील लोक आज खून, मारामाऱ्या, बंडाळी यात गढलेले दिसतात. शिवाय, क्वचित शांतता दिसलीच तरी, केव्हा बंड उसळेल याचा नेम नाही असे वाटते. ऑस्ट्रियन सैन्य निघून गेले; पण त्यामुळे इटलीचा भरीव असा काय फायदा झाला? फायदा झाला असलाच तर तो केवळ नाममात्रच. ज्या सुधारणा व्हाव्यात म्हणून युद्ध ओढवून घेतले त्या अजूनही झालेल्या नाहीत. माझी अशी खात्री आहे की भारतात याची पुनरावृत्ती व्हावी असे तुम्हाला वाटत नाही. भारतातील कोट्यवधी जनतेला सुखी करण्याची तुमची इच्छा आहे. तुमचा रोख केवळ

---

* जाड ठसा लेखकाचा.

स्वतःसाठी सत्ता संपादन करण्याचा नाही, अशी माझी समजूत आहे. मी म्हणतो तशीच तुमची भूमिका असेल तर मग आपल्याला एकाच गोष्टीचा विचार केला पाहिजे. ही **कोट्यवधी माणसे स्वतंत्र कशी होतील ?** * कितीएक संस्थानिकांच्या अमलाखालील जनता निव्वळ भरडली जात आहे हे तुम्ही मान्य कराल. संस्थानिक त्यांना निर्दयपणे चिरडत आहेत. त्यांची दडपशाही इंग्लिश दडपशाहीपेक्षा जास्त जुलमी आहे. तुम्हाला जर असली दडपशाही सगळ्या भारतात आणावयाची असेल तर तुमचे-माझे कधीच जमणार नाही. इंग्रज लोक गेल्यावर भारतीय जनता एतद्देशीय संस्थानिकांच्या टाचांखाली चिरडली गेली तरी हरकत नाही. इंग्रज येथून गेले म्हणजे झाले असे माझी देशभक्ती मला शिकवीत नाही. माझ्यात सामर्थ्य असेल तर मी हिंदी संस्थानिकांच्या दडपशाहीलाही इंग्रजांइतकाच विरोध केला पाहिजे. देशातल्या सर्व जनतेचे सुख इच्छिणे असा मी देशभक्तीचा अर्थ करतो. इंग्रजांच्या हातून जर या देशातील लोकांचे सुख मी साधू शकलो तर मी त्यांच्यापुढे नतमस्तक होईन. एखादा इंग्रज गृहस्थ आपले जीवन भारतीय स्वातंत्र्यासाठी समर्पण करील, दडपशाहीला विरोध करील व या भूमीची सेवा करील तर मी त्या इंग्रजाचे भारतीय म्हणून स्वागत करीन ' ( हिं. स्व., पृ. ३६ ).

त्यानंतर कित्येक वर्षांनी त्यांनी पुन्हा लिहिले :

' मात्र मला असे वाटते की, युरोपियन राष्ट्रे राजकीय स्वातंत्र्य उपभोगीत असली तरी, तेथे काय किंवा भारतात काय, रोग मूलतः एकच आहे. सत्तांतर होणे ही भारताच्या राष्ट्रीय जीवनाची प्राणभूत आवश्यकता आहे असे माझे ठाम मत आहे. तरी परंतु केवळ राजकीय सत्तांतर झाल्याने माझी आकांक्षा मुळीच पूर्ण होणार नाही. युरोपातील लोकांना राजकीय सत्ता मिळालेली आहे हे नक्की; पण ते स्व-तंत्र नाहीत. आशिया व आफ्रिका खंडातील जनतेच्या पिळवणुकीने अंशतः त्यांचा लाभ होत असला तरी त्यांच्या देशातील राज्यकर्ता वर्ग लोकशाहीच्या पवित्र नावाखाली स्वतः त्यांची पिळवणूकच करीत आहे. म्हणूनच मुळात त्यांचा व भारतीयांचा रोग एकच आहे असे मी वर म्हटले आहे. त्यावर उपायही एकच आहे असे मला वाटते. आवरणे दूर केली म्हणजे युरोपियन जनतेची पिळवणूक अंतिमतः हिंसेच्या बळावर टिकून आहे असेच दिसेल.

' यावर उपाय म्हणून जनतेने प्रतिहिंसा केल्याने हा रोग कधीच नाहीसा होणार नाही. ते काहीही असो, आजपर्यंतचा अनुभव असे दर्शवतो की हिंसेचा विजय झाला तरी तो अल्पजीवी ठरतो. त्यातून जास्त मोठी हिंसा जन्म घेते. आतापर्यंत जे मार्ग चोखाळले गेले ते सर्व हिंसेचेच निरनिराळे प्रकार होते. ज्या कृत्रिम मर्यादा घालण्यात आल्या त्याही हिंसेची साधने हाती असणाऱ्यांच्या इच्छेवर अवलंबून होत्या. त्यामुळे खरी

* जाड ठसा लेखकाचा.

आणीबाणीची वेळ आल्यावर या मर्यादा आपोआप तुटत. म्हणून मला वाटते की मुक्त व्हायचे असेल तर आज ना उद्या पाश्चात्य जनतेलाही अहिंसात्मक मार्गाचाच स्वीकार करावा लागेल. ते लोक सामूहिकरीत्या आणि तावडतोब अहिंसेचा स्वीकार करतील अशी काहीच आशा या घडीला दिसत नाही. याने मी गोंधळात पडत नाही. कारण विशाल काळचक्राच्या दृष्टीने काही हजार वर्षे क्षणासारखी आहेत. मात्र कोणीतरी अविचल निष्ठेने सुरुवात केली पाहिजे. तसे झाले तर अगदी युरोपातील जनताही योग्य प्रतिसाद देतील याबद्दल मला मुळीच शंका वाटत नाही. अहिंसात्मक मार्गाचा मोठा प्रयोग झाला पाहिजे यापेक्षाही मुक्ततेचा अर्थ नेमकेपणाने जाणणे आज निकडीचे आहे.

'लोकांची कशापासून मुक्तता होणार? या प्रश्नाचा विचार करताना उगीच "पिळवणूक व अधःपात यांपासून" असे काही तरी मोघम उत्तर देऊन चालणार नाही. आज भांडवलदारांच्या हाती जी सत्ता व प्रतिष्ठा आहे ती आपल्याला मिळावी अशी आज शोषितांची इच्छा आहे, हे उत्तर खरे नाही काय? तसे असेल तर ती त्यांना हिंसेनेच मिळवता येईल. पण त्यांना भांडवलदारीतून निपजणारी अनिष्टे टाळावयाची असतील, त्यांना भांडवलदारी दृष्टिकोणात परिवर्तन घडवून आणायचे असले तर श्रमनिर्मित वस्तूंची न्याय्य वाटणी व्हावी म्हणून ते प्रयत्न करतील. त्यातून समाधानी वृत्ती व साधेपणा स्वेच्छापूर्वक अंगी बाणविण्याच्या मुद्द्यावर आपण सरळ येतो. भौतिक गरजांचा गुणाकार करणे हे नव्या दृष्टिकोणानुसार जीवनाचे ध्येय राहाणार नाही. सुखी जीवनाशी सुसंगती राखून आपल्या गरजा मर्यादित करणे हे ध्येय ठरेल. **हस्तगत होईल ते सर्व आपलेच असा विचार करण्याऐवजी जे सर्वांना मिळू शकत नाही ते नाकारण्याची वृत्ती आपल्यात येईल.*** मला असे वाटते की युरोपच्या जनतेला अर्थशास्त्रीय युक्तिवादाचा आधार घेऊन यशस्वी आवाहन करणे कठीण जाऊ नये. असा प्रयोग जर पुरेसा यशस्वी झाला तर त्यातून कल्पनातीत आत्मिक प्रगती न कळत घडून येईल. आध्यात्मिक नियम एका राखीव क्षेत्रातच कार्यकारी असतो हे म्हणणे मला पटत नाही. उलट त्यांची खरी अभिव्यक्ती जीवनाच्या साध्यासुध्या व्यवहारातूनच घडून येत असते. आर्थिक,सामाजिक, राजकीय क्षेत्रांत आपण कसे वागतो त्याचा व आत्मिक उन्नती-अवनतीचा सरळ सरळ संबंध असतो. मी सुचविलेला जीवन-विषयक दृष्टिकोण अंगिकारण्यासाठी युरोपीय जनतेची मने वळविण्यात यश आल्यास आपल्या ध्येयपूर्तीसाठी त्यांना हिंसेची मुळीच गरज लागणार नाही. आणि अहिंसा व तदनुषंगिक मार्गाचा अवलंब केल्याने समाजाची सूत्रे आपल्या सहजी हाती येतील ही गोष्ट त्यांना उमजून येईल. भारतीय परिस्थितीत जी गोष्ट स्वाभाविक व शक्य कोटीतली

---

* जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा.

वाटते ती जडभरत भारतीय जनतेच्या डोक्यात शिरण्या अगोदर युरोपातील उद्यमी व जागरूक जनतेला आधी पटेल हे देखील शक्य आहे ' (यं. इं., ३-९-१९२५, पृ. ३०४).

वरील लांबलचक उतारे जसेच्या तसे उद्धृत करताना मला यत्किंचितही संकोच वाटत नाही. कारण या उताऱ्यांत लोकांचे स्वयंशासन किंवा स्वराज्य यांच्या संदर्भात अहिंसेचा मार्ग सर्वात इष्ट व योग्य का आहे हे थोडक्यात, निःसंदिग्धपणे आणि पूर्णत्वाने स्पष्ट करण्यात आलेले आहे. जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा गांधींनी अहिंसेच्या बाजूने युक्तिवाद करण्याचा कंटाळा केला नाही. केवळ राजकीय स्वातंत्र्य व स्वराज्य यांतील फरक, आणि स्वराज्य प्राप्तीसाठी हिंसक मार्गाच्या वापरातला फोलपणा याबाबत स्वतःच्या मतांविषयी गांधींना इतका ठाम विश्वास होता की त्यांनी एके ठिकाणी लिहिले आहे :

' माझा असा दावा आहे की सशस्त्र क्रांतिवादी पद्धत भारतात यशस्वी होणे शक्य नाही. समोरासमोर युद्ध करणे शक्य असते तर, कदाचित, इतर देशांप्रमाणे आपणही हिंसेचा मार्ग आचरावा आणि निदान रणांगणावर शौर्य गाजविल्याने जोपासले जाणारे गुण तरी संपादावेत याला मी मान्यता दिली असती अशी शक्यता होती. परंतु आज आपण जेथवर पाहू शकतो त्या भविष्य कालात ब्रिटिशांशी युद्ध करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देता येईल ही गोष्ट मला सर्वस्वी अशक्य वाटते. युद्ध केल्याने इंग्रजी राज्य जाऊन त्या जागी दुसरी एखादी राजवट येईल, हे शक्य आहे. पण सामान्य लोकांच्या दृष्टीने ती ' स्व–तंत्रता ' असणार नाही. स्वराज्य यात्रेचा मार्ग खडतर चढणीचा आहे. अगदी बारीकसारीक गोष्टींकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. याचा अर्थ जवळ फार मोठे संघटना चातुर्य हवे, विशुद्ध लोकसेवेसाठी खेड्यात जाण्याची तयारी हवी. थोडक्यात म्हणजे लोकांना शिक्षण दिले पाहिजे. जनतेमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण केली पाहिजे. स्वराज्य काही जादूगाराच्या पोतडीतून निघणाऱ्या आंब्यासारखे अकस्मात येणार नाही. त्याची वाढ वडाच्या वृक्षासारखी अगदी सावकाश, जवळ जवळ न कळत होईल. रक्तरंजित क्रांतीने ही गोष्ट कधीच साधणार नाही. याबाबत केलेली घाई पूर्णपणे वाया जाईल हे निश्चित ' ( यं. इं., २१-५-१९२५, पृ. १७८ ).

## अराज्यवाद

अहिंसक असहकाराच्या मार्गाने सामान्य जनतेला केंद्रीय राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवता येऊ शकेल अशी गांधींची कल्पना होती. या कल्पनेशी घनिष्ठपणे निगडित असलेली गांधींची आणखीही एक कल्पना होती. सामाजिक जीवनाचे नियमन करण्यासाठी जनतेने

सरकारवर कमीत कमी अवलंबून राहावे असे त्यांचे मत होते. कारण, अंतिमतः, हिंसेचे बळ हेच कोणत्याही शासनांच्या अधिसत्तेचे अधिष्ठान असते. प्रत्यक्षात गांधींनी भारतामध्ये लोकशाही राज्यसत्ता प्रस्थापित करण्याच्या स्वातंत्र्यलढ्याचे पुढारीपण केले असले तरी अराज्यवादाकडे त्यांचा कल असल्याचे त्यांच्या लेखनात वारंवार दिसून येते. उदाहरणार्थ, १९३१ मध्ये, एके ठिकाणी ते लिहितात :

' माझ्या मते राजकीय सत्ता हे साध्य असू शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उत्थान घडवून आणणे लोकांना शक्य करणारे ते एक साधन आहे. राजकीय सत्ता म्हणजे लोकप्रतिनिधींच्या मार्फत राष्ट्रीय जीवन नियमित करण्याची शक्ती. राष्ट्रीय जीवन जर स्वयंशासित होण्याइतके परिपूर्ण झाले तर प्रातिनिधिक राज्यसत्तेची आवश्यकताच उरणार नाही. म्हणजे एक प्रकारचे प्रबुद्ध अराजक निर्माण होईल. त्या अवस्थेत प्रत्येकजण स्वतःचा शास्ता असेल. दुसऱ्याला त्याचा कधीच उपसर्ग पोचणार नाही अशारीतीने तो स्वतःचे शासन करील. या आदर्श स्थितीत राजकीय सत्ताच उरत नाही कारण शासनसंस्था उरत नाही. परंतु ही आदर्श स्थिती प्रत्यक्षात पूर्णपणे कधीच अवतरू शकत नाही. थोरोच्या ' श्रेष्ठतम सरकार ते की जेथे शासन लघुतम असते ' या अभिजात वचनाचे स्पष्टीकरण हे असे आहे ' ( यं. इं., २-७-१९३१, पृ. १६२ ).

वरील लेखाशिवाय १९४० साली ' हरिजन 'च्या एका अंकामध्ये श्री. महादेवभाई देसाईंनी गांधींच्या संभाषणाचा दिलेला पुढील वृत्तांत मननीय आहे.

' गांधींना त्यांच्या एका तत्त्वज्ञ मित्राने काही महिन्यांपूर्वी पुढील प्रश्न विचारले होते : " ...मग आपण दार्शनिक अराज्यवादी भूमिकेवरच अटळपणे येऊन पोचत नाही काय ?... आणि हा आदर्श अशक्य कोटीतला आहे असे आपणास वाटत नाही का ? " या प्रश्नांची गांधींनी दिलेली उत्तरे आज उपयोग ठरतील असे वाटते.

' त्याने विचारले, " कोणाला तरी खरी अहिंसा प्रतीत झाली आहे का ? "

' त्यावर गांधींनी झट्कन उत्तर दिले, " नाही. कोणालाच ती प्रतीत झालेली नाही. कारण परिपूर्ण अहिंसा कोणीच आचरणात आणू शकत नाही. "

' " तर मग राजकारणात अहिंसेचा वापर कसा करता येईल ? "

' " आपण वरगुती क्षेत्रात अहिंसेचा अवलंब करतो नेमका त्याचप्रकारे राजकारणातही तो करता येईल. अहिंसेचे आपले आचरण परिपूर्ण असते असे नाही, तरी आपण निग्रहपूर्वक हिंसेचा उपयोग वर्ज्य मानतो आणि अपयशांतून शिकत शिकत यशस्वी होण्याइतकी आपली प्रगती होते. "

' " तुम्ही अहिंसेने राज्य करावयाचे म्हणता, पण सर्व कायद्यांचे अधिष्ठान अखेरीस हिंसा हेच नाही काय ? "

' " नाही. सर्व कायदे हिंसात्मक म्हणता येत नाहीत. समाजजीवन सुरळीत चालावे

म्हणून लोकांनी स्वतःवर घालून घेतलेले निर्बंधात्मक कायदे ही संघटित समाजजीवनाच्या चौकटीत शक्य असलेली परमोच्च अहिंसाच ठरते. पूर्ण अहिंसेच्या तत्त्वावर आधारलेला व त्याच तत्त्वावर चालणारा समाज म्हणजे विशुद्ध अराजकच होय. "

' " अशी स्थिती प्रत्यक्षात आणता येईल असे तुम्हाला वाटते काय ? "

' " होय. ज्या प्रमाणात अहिंसा आचरणात आणता येण्यासारखी आहे त्याच प्रमाणात वरील स्थितीही प्रत्यक्षात आणता येईल. जे जनतेवर कमीत कमी राज्य करते ते सरकार परिपूर्ण आणि अहिंसावादी म्हणता येईल. अहिंसेवर अधिष्ठित लोकशाही परिपूर्ण अराजकाच्या निकटतम पोचणारी असेल. माझ्या मते आजच्या युरोपमधील लोकशाही राज्ये म्हणजे लोकशाहीची मारेकरीच होत. "

' " तुमच्या कल्पनेतले अहिंसेचे पालन किंवा तुमच्या अर्थाची लोकशाही प्राचीन काळी कधीतरी अस्तित्वात होती काय ? "

' " ते मला माहीत नाही. पण पूर्वी कधीही या गोष्टी अस्तित्वात नसल्या तर त्याचा अर्थ इतकाच की मानवाने आजपर्यंत त्याच्या अंगच्या गुणांच्या विकासाची परमावधी गाठण्याचा कधी प्रयत्न केलेला नाही. इतिहासकाळात केव्हातरी आपण आजच्यापेक्षा अधिक सूज्ञ होतो आणि भविष्यातही आपल्याला आजच्यापेक्षा अधिक शहाणे झाले पाहिजे याबद्दल माझ्या मनात मुळीच संदेह नाही. अधिक शहाणपण आल्याशिवाय मानवात स्वभावतःच असलेल्या कितीतरी सुंदर व उदात्त गोष्टी आपल्याला कळणारच नाहीत. देहाचे अवगुंठन आहे तोवर विशुद्ध अहिंसाचरण आपल्याला शक्यच नाही. कारण जगायचे म्हणजे साडेतीन फूट जागा आपण वापरणारच. ( त्यातही सूक्ष्म का होईना हिंसा आहे. ) आपल्या शरीरात आपला निवास असेपर्यंत ' पूर्ण अहिंसा ' ही युक्लिडच्या ' बिंदू ' किंवा ' रेषा ' यांसारखी सैद्धांतिक कल्पनाच राहाणार. तरी आयुष्याचा प्रत्येक क्षण आपण त्या पूर्णत्वाकडे जाण्यासाठी वेचला पाहिजे " ' ( **हरिजन**, २७-७-१९४०, पृ. २११ ).

अशा रीतीने गांधींनी घेतलेली वैचारिक भूमिका मार्क्सच्या भूमिकेपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. साम्यवादानुसार, हिंसात्मक मार्गाने शास्त्रीय सत्ता हस्तगत करून ती श्रमिक वर्गाच्या हुकूमशाहीखाली आणणे हे पहिले पाऊल होय. सर्व प्रकारची पिळवणूक नष्ट करण्यासाठी आणि लोकांचे मानस शिक्षणाद्वारे बदलण्यासाठी राज्ययंत्रणा राबविणे ही नंतरची पायरी झाली. एवढे झाल्यानंतर मगच लोकांच्या निरनिराळ्या ऐच्छिक संघटना पुढे येतील व त्या शासनसंस्थेची कार्ये हळूहळू आपल्या हातात घेतील. आणि मग, अर्थातच, कालांतराने शासनसंस्था लयास जाईल. क्रांतीचे स्थूलमानाने असे टप्पे सांगितले आहेत. जनतेच्या जीवितवित्ताचे व हितसंबंधांचे संरक्षण करता यावे म्हणून संक्रमणकालात शासनसंस्था सर्वंकष व सर्वशक्तिमान असणे साम्यवादात

आवश्यक मानलेले आहे. याउलट गांधींची अशी श्रद्धा होती की असहकाराने पिळवणूक करणाऱ्याचे हृदयपरिवर्तन घडवून आणणे म्हणजेच अहिंसापालन करणे हाच संरक्षणाचा खरा मार्ग आहे; अशा रीतीने शासनसंस्थेचे प्रमुख कार्य सैन्याच्याऐवजी लोकच सरळ सरळ पार पाडतील. तसेच अहिंसात्मक मार्गाचा स्वीकार केल्याक्षणापासून, शक्य तितक्या जास्त प्रमाणात, ऐच्छिक, लोकाश्रयी आणि लोकशाही संघटनांच्या सहाय्याने लोक आपले आर्थिक व राजकीय जीवन नियमित करू लागतील. गांधींचा अराज्यवाद व मार्क्सचा साम्यवाद यातील फरक पुढीलप्रमाणे सांगता येईल. गांधीप्रणीत मार्गात शासन संस्थेचा क्षय होण्याची प्रक्रिया वर्तमानकाळात, अगदी प्रथमपासूनच सुरू होते तर हिंसेच्या मार्गाने निर्माण केलेल्या अत्यंत केंद्रीभूत आणि सर्वशक्तिमान सरकारकडून जनतेतील सर्व विरोध निपटून काढला जाईपर्यंत मार्क्सच्या मार्गात ही प्रक्रिया पुढे ढकलली जाते.

गांधींचा अराज्यवादावर इतका भर असूनही काही अराज्यवाद्यांप्रमाणे ते शासनयंत्रणेबाबत उदासीन नव्हते. त्यांचा स्वभाव वास्तववादी असल्याकारणाने निदान तिची गरज भासणार आहे तोपर्यंत तरी राज्यसत्तेवर लोकशाही नियंत्रण पूर्णपणे असले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. कोणत्याही परिस्थितीत, अगदी जनतेच्या तात्कालिक हिताची गोष्ट असली तरी सर्वंकष हुकूमशाही शासनाच्या व हिंसेच्या बळावर विरोधकांची दडपणूक खपवून घेण्यास ते तयार नव्हते.

## भारतीय स्वराज्य

आपल्या १९३१ च्या इंग्लंडच्या प्रवासाला निघण्यापूर्वी ' फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ' पुढे बोलताना गांधींनी स्वतंत्र भारताच्या सरकारची कर्तव्ये काय असावीत, याबद्दलच्या स्वतःच्या कल्पना अगदी साध्या आणि व्यवहारी भाषेत सांगितल्या होत्या. ते म्हणतात :

' भारतीय स्वराज्य म्हणजे येथील बहुसंख्य समाजाचे, अर्थात हिंदूंचे राज्य असे लोक बोलतात. यापेक्षा मोठी दुसरी चूक नाही. तसे होणार असेल तर मी तरी त्याला स्व-राज्य म्हणायला तयार नाही. अशा राज्याविरुद्ध मी सर्व सामर्थ्यानिशी झगडेन. माझ्या मते हिंदवी स्वराज्य म्हणजे येथील सर्व लोकांचे आणि न्यायाचे राज्य. त्या राज्यातील मंत्री हिंदू, मुसलमान, शीख कोणीही असोत, त्या राज्यातील विधिमंडळातले सर्व सभासद केवळ हिंदू वा मुसलमान वा अन्य कोणत्याही जमातीचे असोत, त्यांना सर्व जनतेला समानतेने व न्यायाने वागविणे भाग पडेल. भारतातील कोणत्याही जाती-जमातीने, ' स्वराज्य ' म्हणजे दुसऱ्या कोणत्यातरी जातीची किंवा धर्माची

मक्तेदारी अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. त्याप्रमाणेच येथील इंग्रजांनाही कसलेच भय बाळगण्याचे कारण नाही. त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी विशेष तरतुदी करण्याचा प्रश्न उद्‌भवण्याचे कारणच नाही. ज्यात कोणाच्याही हिताचे विशेष संरक्षण करावे लागत नाही असे राज्य म्हणजेच स्वराज्य. राष्ट्रसभा ही संघटना कोणत्याही एका गटाची नाही; ती सर्वांची आहे, हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो. तरीदेखील, भारतात बहुसंख्य लोक गरीब शेतकरी असल्याने त्यांचे हितरक्षण हे तिचे आद्य कर्तव्य आहे. म्हणूनच राष्ट्रसभेने खऱ्याखुऱ्या गरीब जनतेचे प्रतिनिधित्व केले पाहिजे. याचा अर्थ इतर सर्व वर्ग, मध्यमवर्ग, भांडवलदार, जमीनदार, इ. भरडून काढले जावेत असे नाही. तर त्याचा अर्थ असा की या सर्व वर्गांनी गरीब जनतेच्या हितसंवर्धनाला अग्रक्रम द्यायला हवा' ( यं. इं., १६-४-१९३१, पृ. ७८-८९ ).

नंतरही 'यंग इंडिया' मध्ये लिहिलेल्या एका लेखात हीच कल्पना त्यांनी परत एकदा पुढील भाषेत मांडली :

'... म्हणून मी माझे उद्दिष्ट स्वप्न मांडतो. "भारतातील लक्षावधी मूक सामान्य जनांची सर्वार्थाने परकीय जोखडातून संपूर्ण मुक्तता" हेच आमचे ध्येय आहे. या लोकांच्या हिताच्या विरुद्ध असणारा प्रत्येक हितसंबंध सुधारून घेतला पाहिजे आणि सुधारणे शक्य नसेल तर तो विरून गेला पाहिजे' (यं. इं., १७-९-१९३१ पृ. २६३ ).

'स्वराज्याचा माझा अर्थ पुढीलप्रमाणे आहे. भारतामध्ये लोकांच्या संमतीने चालणारे सरकार असले पाहिजे. आपली संमती लोकांनी जास्तीत जास्त बहुमताने दर्शविलेली असेल. जे राष्ट्राची **शरीरश्रमपूर्वक*** सेवा करीत असतील आणि ज्यांनी मतदारांच्या यादीत आपले नाव नोंदविण्याची खबरदारी घेतली असेल अशा सर्व, एतद्देशीय तसेच येथे स्थायिक झालेल्या इतर सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार असेल. मूठभर लोकांनी सत्ता हस्तगत केल्याने खरे स्वराज्य अवतरणार नाही; तर, सत्ताधारी कोणीही असो पण, सत्तेचा दुरुपयोग झाल्यास सत्तारूढ लोकांना प्रखर विरोध करण्याची पात्रता **सर्वांच्या*** अंगी आली म्हणजे खरे स्वराज्य येईल. हे माझे म्हणणे लोकांच्या प्रत्ययास मी आणून देऊ शकेन अशी मला आशा आहे. सत्तेवर नियंत्रण ठेवण्याच्या, तिचे नियमन करण्याच्या आपल्या अंगच्या सामर्थ्याची जाणीव जनतेमध्ये योग्य शिक्षणाने .निर्माण करून स्वराज्य संपादन करावयाचे आहे' ( यं. इं., २९-१-१९२५, पृ. ४० ).

त्याचप्रमाणे १९४१ मध्ये ते म्हणाले, 'सत्ता ही कायदेमंडळात वास करते अशी

---

* जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा.

आपली फार काळापासूनची समजूत आहे. हा एक गंभीर प्रमाद आहे. विचारशून्य गतानुगतिकत्व वा ( कोणीतरी केलेले ) मोहजाल यांमुळे हा प्रमाद घडला आहे असे म्हणता येईल. इंग्रजांच्या इतिहासाचा जुजबी अभ्यास केल्याने आपणास असे वाटू लागले आहे की लोकांना सर्व अधिकार पार्लमेंटकडून मिळतात. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की अधिकार व सत्ता लोकांतच असते. ते ती आपल्या मर्जीने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हाती काही काळापुरती देतात. पण लोक मागे नसतील तर पार्लमेंटला अधिकारच काय पण अस्तित्वही उरणार नाही. गेली एकवीस वर्षे ही साधी गोष्ट लोकांना पटवून देण्यासाठी मी झटतो आहे. सविनय कायदेभंग म्हणजे सत्तेचे कोठार आहे. सारीच्या सारी प्रजा विधिमंडळाने केलेले कोणतेही कायदे पाळावयाचे नाकारीत आहे व त्याचे सर्व परिणाम भोगायला तयार आहे हे चित्र डोळ्यांपुढे आणून पाहा. विधिमंडळ आणि सरकार बंद पाडण्याचे सामर्थ्य त्या जनतेत आहे. पोलिसदले किंवा सैन्यदले कितीही बलदंड असूद्यात, अल्पसंख्यांकांना नमविण्यासच फक्त ती समर्थ असतात. कोणत्याही मर्यादेपर्यंत छळ सोसण्यास सिद्ध झालेल्या निश्चयी जनतेला वाकवायला कोणतेही पोलिस किंवा सैन्यदल कधीच पुरे पडत नाही ' ( र. का., पृ. ५ ).

□ □

ग्रंथालय

प्रकरण चवथे

# विश्वस्तवृत्तीचा सिद्धांत

## प्रस्तावना

गांधींनी ' विश्वस्त ' हा शब्द त्यांच्या ' हिंद स्वराज्य ऑर इंडियन होमरूल ' या पुस्तकात १९०९ मध्ये बहुधा प्रथमतः वापरला असावा. ४ फेब्रुवारी १९१६ रोजी बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्‌घाटन समारंभात भाषण करताना व्यासपीठावरील ' उंची वस्त्रे व अलंकार यांनी मढलेल्या ' राजेरजवाड्यांना, ' हे सर्व दागदागिने उतरवून भारतीय देशबांधवांसाठी " विश्वस्त-ठेव " म्हणून त्यांचा विनियोग करा ' असे त्यांनी आवाहन केले.[१]

त्यांनी १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहासाठी प्रस्थान ठेवण्यापूर्वी त्यांनी त्यांच्या दृष्टीने भारतीय स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या गोष्टींचे विवेचन केले होते. तेव्हा ते म्हणाले,

' ब्रिटिश राजवटीमुळे आपल्यात निर्माण झालेल्या एतद्देशीय श्रीमंत, सटोडिये, भांडवलदार, जमीनदार, कारखानदार व तत्सम लोक यांच्या हितसंबंधांचा अहिंसेच्या मार्गात सर्वांत मोठा अडथळा आहे. लोकांचे रक्त ' पिऊन ' आपण जगत आहोत या वस्तुस्थितीची जाणीव या सर्वांना नेहमीच असते असे नाही. त्यांना ही जाणीव होते तेव्हा ते ब्रिटिश राज्यकर्त्यांप्रमाणेच अत्यंत निर्दय होतात. त्यांचेच ते हस्तक व एजंट आहेत. जपानमधील सामुराईप्रमाणे, आपल्या रक्तलांच्छित संपत्तीचा त्याग केला पाहिजे याची जाणीव त्यांना झाली की अहिंसेची लढाई आपण जिंकलीच म्हणून समजा. आपल्याच रक्ताचे लक्षावधी लोक अर्धपोटी जगत असताना आपण लक्षाधीश-कोट्यधीश असणे हा गुन्हा आहे आणि म्हणून आपण इतःपर ब्रिटिशांचे हस्तक राहाता कामा नये हे त्यांच्या लक्षात आणून देणे फारसे अवघड जाऊ नये. विश्वासू हस्तकांशिवाय आजपर्यंत कोणत्याच राज्यकर्त्यांना राज्य करता आलेले नाही.

' पण अहिंसेच्या उपासकाने, ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या बाबतीत आढळतो तसाच यांच्या बाबतीतही धीर धरला पाहिजे. अहिंसक कार्यकर्त्याचे उद्दिष्ट नेहमी हृदयपरिवर्तन हेच असले पाहिजे ' ( यं. इं., ६-२-१९३०, पृ. ४४ ).

गांधींची मते[१] अशाप्रकारची असल्याने, १९३५ च्या घटनात्मक सुधारणा स्वीकारुन राष्ट्रसभेने सत्ताग्रहण केले तेव्हा त्यांनी श्रीमंत लोकांवर जबर कर बसविण्याचा राष्ट्रसभेला सल्ला दिला. या अनुषंगाने 'संपत्तीचा वारसा राष्ट्राकडेच चालत आला पाहिजे' हे तत्त्वही गांधींनी पुढे मांडले.[२] या विषयावर याच प्रकरणात आपण अधिक सविस्तर विचार पुढे करणार आहोत.

## रोजगारातील समानता

गांधींनी १९०४ साली रस्किनपासून पुढील कल्पना घेतली : 'एखाद्या वकीलाच्या कामाला न्हाव्याच्या कामाइतकीच किंमत आहे कारण आपण करतो त्या कामातून उदरनिर्वाह मिळवण्याचा अधिकार प्रत्येकालाच आहे' (**आत्मवृत्त**, पृ. ३६५).

टॉलस्टॉयच्या 'निर्वाह-श्रम' या सिद्धांताशीही गांधी सहमत होते. या तत्त्वानुसार जीवनधारणेस अत्यावश्यक अशा पायाभूत वस्तूंच्या उत्पादनापोटी शरीरश्रम करणे हे प्रत्येकाचे निरपवाद कर्तव्य आहे. अर्थातच हा सिद्धांत बुद्धिजीवी वर्गालाही लागू आहे.

गांधींचे हे मत लक्षात घेऊन १९४७ मध्ये त्यांच्यापुढे पुढील प्रश्न ठेवला गेला.

**प्रश्न :** रवीन्द्रनाथ टागोर किंवा रामन् यांच्यासारख्यांनीही स्वतःच्या उदरभरणासाठी शारीरिक कष्ट केले पाहिजेत असा आग्रह धरावा का? यात त्यांच्या गुणांचा सर्वस्वी अपव्यय होत नाही का? बुद्धिजीवी व श्रमिक, दोघेही समाजाला उपयुक्त कामच करीत असतात. तर मग शरीरश्रम व बौद्धिक कष्ट समान का मानले जाऊ नयेत?

**उत्तर :** बौद्धिक काम महत्त्वाचे असून त्याला जीवनव्यवस्थेत स्थान आहे हे निश्चित, यात काहीच शंका नाही. तरी प्रत्येकाने शरीरश्रम केले पाहिजेत असा माझा आग्रह आहे. या कर्तव्यातून कोणाचाच अपवाद केला जाऊ नये असे मला वाटते. बौद्धिक काम करणाऱ्याने शरीरश्रम केल्यास बौद्धिक कामाचाही दर्जा वाढण्यास मदतच होईल. प्राचीन काळी ब्राह्मण डोक्याने आणि हातांनी, दोन्ही प्रकारे काम करीत असत असे म्हणण्याचे धाडस मी करतो. पण समजा, तेव्हा ते करत नसले तरी वर्तमानकाळात प्रत्येकाने शरीरश्रम करण्याची आवश्यकता ही स्वयंसिद्ध गोष्ट आहे. या संदर्भात मी टॉलस्टॉयच्या लिखाणाचा आणि त्याने 'निर्वाहश्रम' या सिद्धांताचा कसा प्रचार केला त्याचा उल्लेख करीन. 'निर्वाहश्रम' ही कल्पना प्रथम बोंडारेफ या रशियन शेतकऱ्याने प्रचारात आणली (**हरिजन**, २३-२-१९४७, पृ. ३६).

**प्रश्न :** आपण १९४१ मध्ये आर्थिक समतेबद्दल लिहिले आहे समाजाची

उपयुक्त व आवश्यक सेवा करणाऱ्या सर्व व्यक्तींना, मग तो शेतकरी असो, डॉक्टर असो, भंगी असो, शिक्षक असो, इंजिनीयर असो किंवा हिशेबनीस, इतरांशी समान वेतन मिळण्याचाच फक्त नैतिक अधिकार आहे असे आपले मत आहे काय ? अर्थात शिक्षण व तत्सम इतर बाबींवर होणारा खर्च सरकार करील हे गृहीतच धरलेले आहे. प्रश्न असा की आपल्या वैयक्तिक गरजांच्या पूर्तीसाठी सर्वांना सारखाच मोबदला मिळावा असे आपणास वाटत नाही काय ? तसेच, वेतनात समानता प्रस्थापित करण्यासाठी कार्य केल्यास इतर कोणत्याही मार्गापेक्षा अस्पृश्यता दूर करण्याचा तो सर्वात जवळचा मार्ग ठरेल असे आपणास वाटत नाही काय ?

उत्तर : सर्व जगाने हेवा करावा असे नमुनेदार स्वतंत्र जीवन निर्माण करावयाचे असेल तर भारतामध्ये भंगी, डॉक्टर, इंजिनीयर, वकील, शिक्षक, व्यापारी आदी सर्वांना दिवसभराच्या प्रामाणिक कष्टांबद्दल सारखीच मजूरी मिळाली पाहिजे, याबद्दल माझ्या मनात मुळीच शंका नाही. कदाचित भारतीय समाज हे ध्येय कधीच पूर्णपणे प्रत्यक्षात आणू शकणार नाही. पण भारतभू सुखी करावयाची असेल तर सर्व सामर्थ्यानिशी या ध्येयाकडे मार्गक्रमण करणे हे प्रत्येक हिंदी माणसाचे कर्तव्य आहे ( हरिजन, १६-३-१९४७, पृ. ६७ ).

## वर्गकलह

भारतात एक प्रश्न गांधींना नेहमीच विचारला जात असे, की मग जमीनदारांचे काय करावयाचे ? गांधींनी १९२९ मध्ये एका लेखात जमीनदारांचा उल्लेख करून, ' जमीनदार-भांडवलदारांनी काळाची पावले ओळखून आपल्या मालमत्तेवर स्वतःची ईश्वरदत्त सत्ता पोचते या त्यांच्या जुन्या समजुतीचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे ' असा त्यांना इशारा दिला. जमीनदार-भांडवलदारांनी आपण होऊन हक्क सोडला नाही, ते ' वेळीच जागे झाले नाहीत ' तर अज्ञ भुकेली जनता जागी झाल्यावर सारा देश अराजकाच्या खाईत लोटला जाईल, असेही त्यांनी त्याच लेखात सुचवले होते.[३]

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्यांनी या विषयावर पुढील विचार व्यक्त केलेले आढळतात : ' युद्धाचा शेवट हा भांडवलशाहीचाही शेवट ठरेल असे भविष्य मला दिसते. गरिबांचे राज्य प्रस्थापित होण्याचा दिवस जवळ जवळ येत असलेला मला स्पष्ट दिसत आहे. मग ते अहिंसेच्या मार्गाने येवो की शस्त्रबळाच्या जोरावर येवो ' ( हरिजन, १-२-१९४२, पृ. २० ).

आपल्या रचनात्मक कार्यक्रमाची गांधींनी १९४० मध्ये फेरमांडणी केली व त्याच्या उद्दिष्टांत ' आर्थिक समानते 'चा समावेश केला. अहिंसा व स्वातंत्र्याची

' गुरुकिल्ली ' अशा शब्दात आर्थिक समानतेचा उल्लेख करून त्यांनी या समानतेचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले :

' समान वाटणीमागील खरा अर्थ असा की प्रत्येकाला त्याच्या स्वाभाविक गरजा भागविण्याइतके द्रव्य निश्चित मिळावे, पण त्यापेक्षा जास्त मात्र मिळू नये. उदाहरणार्थ, एखाद्याची पचनशक्ती मंद असून त्याला फक्त दोन छटाक पीठ लागत असेल व दुसऱ्याला आठ छटाक पीठ लागत असेल, तर दोघांनाही आपापल्या गरजा भागविण्याइतके पीठ मिळावे. हे उद्दिष्ट प्रत्यक्षात आणावयाचे तर साऱ्या सामाजिक व्यवस्थेची पुनर्रचना केली पाहिजे. अहिंसेवर आधारलेला समाज याहून दुसरे ध्येय डोळ्यांसमोर ठेवू शकत नाही. कदाचित आपण या ध्येयाप्रत पोचणारही नाही. पण ते कायम आपल्या मनात असले पाहिजे. त्याच्या पूर्तीसाठी अविरत प्रयत्न केले पाहिजेत. या ध्येयाच्या दिशेने आपण जितका अधिक प्रवास करू तितक्याच प्रमाणात आपल्याला सुख आणि समाधान मिळेल. तेवढ्या प्रमाणात आपल्या हातून अहिंसक समाज निर्माण करण्याचे कार्यही झालेले असेल.

' कोणाही व्यक्तीला हा जीवनक्रम अंगिकारणे केव्हाही शक्य आहे. त्यासाठी इतरांनी तो अंगिकारण्याची वाट पहाण्याची गरज नाही. आणि वागणुकीचा एक नियम एक व्यक्ती पाळू शकत असेल तर एखादा समुदायही तो नियम पाळू शकेल हे ओघानेच आले. योग्य मार्गाने वाटचाल सुरू करायला कोणीच कोणासाठी थांबायचे कारण नाही हे मला मुद्दाम पुन्हा पुन्हा सांगावेसे वाटते. एखादे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होणार नाही असे वाटत असेल तर लोक त्या गोष्टीची सुरुवात करायलाही का-कू करतात. अशी मनोवृत्ती हाच खरोखर प्रगतीच्या मार्गातील अडथळा आहे.

' अहिंसात्मक मार्गाने समान वाटणी कशी काय साधता येईल याचा आता आपण विचार करू. ज्याने या ध्येयाचा मनोमन अंगीकार केला आहे त्याने प्रथम आपल्या वैयक्तिक जीवनात योग्य ते बदल करून सुरुवात केली पाहिजे. भारताची गरिबी ध्यानात घेऊन तो स्वतःच्या गरजा किमान पातळीवर आणून ठेवील. त्याच्या मिळकतीला अप्रामाणिकपणाचा स्पर्शही झालेला नसेल. कोणत्याही प्रकारच्या सट्टेबाजीचा मोह तो सोडून देईल. त्याचा निवास त्याच्या या नव्या जीवनक्रमाला साजेसा असेल. त्याच्या जीवनाच्या प्रत्येक अंगात आत्मसंयमनाचा आढळ होईल. आपल्या स्वतःच्या जीवनात शक्य आहेत ते सर्व बदल केल्यानंतरच त्याला आपल्या इष्टमित्रांना व शेजाऱ्यांना उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

' खरे तर या समानवाटणीच्या तत्त्वाच्या मुळाशी श्रीमंतांनी आपल्या मालकीच्या अनावश्यक अतिरिक्त धनाकडे " विश्वस्त " म्हणून पहावे हेच तत्त्व असले पाहिजे. कारण या सिद्धांताप्रमाणे श्रीमंताजवळ त्याच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांपेक्षा एक पैसाही जास्त

वर्गीकरण नंबर
रजिस्टर नंबर

असता कामा नये. हे कसे साधावयाचे ? अहिंसेने की श्रीमंतांची मालमत्ता जप्त करून ? मालमत्ता जप्त करावयाची तर स्वाभाविकच आपल्याला हिंसेचा मार्ग स्वीकारावा लागणार. या हिंसाचाराचा समाजाला काहीच फायदा होणार नाही. उलट समाज दरिद्रीच होईल. कारण संपत्तीचा संचय कसा करावा हे कळणाऱ्या माणसांच्या कौशल्याचा समाजाला लाभ होणार नाही. अहिंसक मार्ग स्वाभाविकच यापेक्षा जास्त चांगला आहे. श्रीमंतांची मालमत्ता त्यांच्याच ताब्यात राहू दिली जाईल. त्यातील त्यांच्या वैयक्तिक गरजांसाठी वाजवी आवश्यक तेवढा भाग ते स्वतःसाठी वापरतील व समाजाच्या उपयोगासाठी उरलेल्या संपत्तीचे ते समाजातर्फे "विश्वस्त" होतील. या विवेचनात त्या विश्वस्तांचा प्रामाणिकपणा गृहीत धरला आहे.

'मात्र प्रयत्नांची शिकस्त करूनही श्रीमंत माणसांनी खऱ्या अर्थाने गरीब जनतेचे पालक होण्यास नकार दिला व गरीब लोक अधिकाधिक भरडले जाऊन अन्नाभावी मृत्यु-मुखी पडू लागले तर काय करावे ? या समस्येचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत असता मला अहिंसक असहकार व सविनय कायदेभंग हा अत्यंत प्रभावी व रामबाण उपाय सुचला आहे. समाजातील गरीबांच्या सहकार्याखेरीज श्रीमंतांना धनसंचय करता येणार नाही हे नक्की. ही गोष्ट अजून सामान्य जनतेच्या लक्षात आलेली दिसत नाही. पण ही गोष्ट गरीब जनतेला कळली, तिचा सर्वत्र प्रसार झाला तर जनता समर्थ होईल. ज्या कमालीच्या आर्थिक विषमतेमुळे त्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग ओढवला आहे त्या विषमतेच्या फेऱ्यातून अहिंसक मार्गांनी स्वतःची कशी मुक्तता करावी हेही मग ते शिकतील' (**हरिजन**, २५-८-१९४०, पृ. २६०).

वरील स्पष्टीकरणामुळे गांधींचे ध्येय व त्यांचा अहिंसक असहकाराचा कार्यक्रम स्वाभाविकच समाजवादाच्या खूपच जवळ येतो. ही गोष्ट त्या वेळीच अनेक लोकांच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांनी गांधींना, त्यांच्या व पं. जवाहरलाल नेहरूंच्या भूमिकेत नेमका मतभेद कोठे आहे हे स्पष्ट करण्यास सांगितले. त्याचे उत्तर गांधींनी पुढील-प्रमाणे दिले.

**प्रश्न :** आपले आर्थिक धोरण श्री. नेहरूंच्या आर्थिक धोरणापेक्षा फारच वेगळे राहील, नाही ? मला जी नेहरूंची माहिती आहे त्यानुसार मला वाटते की ते जमिनदारांना समूळ उखडून काढतील.

**उत्तर :** होय. ग्रामोद्धार आणि ग्रामीण पुनर्रचनेसंबंधी आमची मते भिन्न आहेत असे दिसते खरे. मात्र भर कशावर द्यावयाचा या स्वरूपाचा हा फरक आहे. ग्रामो-द्धाराच्या चळवळीला त्यांचा विरोध नाही. त्यांचा मोठ्या कारखानदारीवर भरवसा आहे, तर भारताला त्याचा कितपत उपयोग होईल याबद्दल मी जबरदस्त साशंक आहे. अंतिमतः वर्गकलह अटळ आहे अशी त्यांची श्रद्धा आहे. मात्र तो टाळणे शक्य

असेल तर टाळावा अशी त्यांची भूमिका आहे. अहिंसक मार्गाने जमिनदारांचे व इतरही सर्वच भांडवलदारांचे हृदयपरिवर्तन घडवून आणण्याची मी अपेक्षा करीत असल्यामुळे वर्गविग्रह अटळ आहे असे मला अर्थातच वाटत नाही. कारण किमान विरोधाच्या मार्गाने जाणे हे तर अहिंसेच्या मार्गाचे अंगभूत वैशिष्ट्य आहे. ज्या क्षणी जमीन कसणाऱ्यांना आपल्या सामर्थ्याची जाणीव होईल त्या क्षणीच जमिनदारीची पकड ढिली पडेल. शेतमजूरांनी जर मालकाला स्पष्टपणे सांगितले की आमची व आमच्या कुटुंबियांच्या अन्नवस्त्राची व मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था चांगल्याप्रकारे करण्याइतकी मजुरी मिळणार नसेल तर आम्ही जमीन मुळीच करणार नाही, तर तो बिचारा जमिनदार तरी काय करील? खऱ्या अर्थाने श्रम करणारा हाच, तो उत्पादन करतो त्या वस्तूंचा मालक असतो. सारे श्रमिकजन हुशारीने एकत्र येतील तर एक दुर्दम्य शक्ती निर्माण होईल. त्यामुळे मला वर्गकलहाची मुळीच आवश्यकता वाटत नाही. मला जर तशीच आवश्यकता वाटली असती तर मी त्याचा प्रसार आणि प्रचार नक्कीच केला असता (हरिजन, ५-१२-१९३६, पृ. ३३९).

'मूठभर कोट्यधीशांना नष्ट करून गरिबांची पिळवणूक थांबणार नाही. गरिबांचे अज्ञान दूर करून, पिळवणूक करणाऱ्या श्रीमंतांशी असहकार करण्यास त्यांना शिकविल्यानेच ती थांबेल. त्याने शोषकांचे परिवर्तन घडून येईल. इतकेच काय पण, मी म्हणतो त्या मार्गाने गेल्यास आजचे श्रीमंत व गरीब शेवटी समान भागीदार बनतील असेही माझे मत मी सांगितले आहे. भांडवलसंचय मुळात वाईट नाही. त्याचा दुरुपयोग वाईट आहे. या ना त्या स्वरूपात भांडवलसंचयाची गरज समाजाला नेहमीच लागणार, यात शंका नाही (हरिजन, २८-७-१९४०, पृ. २१९).

वाचकांच्या हे लक्षात आलेच असेल की वर्गकलह हा शब्द गांधी 'वर्गावर्गातील हिंसक युद्ध' अशाच अर्थाने वापरतात. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी केलेला सत्याग्रह हा कलह असे ते कधीच मानत नाहीत. कारण सत्याग्रह नेहमी अहिंसकच असतो. मात्र मार्क्सने ज्या अर्थाने 'वर्गकलह' ही संज्ञा वापरली त्यानुसार असा अहिंसक असहकारही हिंसक युद्धाप्रमाणे वर्गकलह या सदरातच मोडेल.

## 'विश्वस्त' कल्पनेचा नवाच अर्थ

गांधींचे एक प्रमुख व निष्ठावंत अनुयायी श्री. शंकरराव देव यांनी फेब्रुवारी १९४२ मध्ये पुढील प्रश्न उपस्थित केले :

'प्रश्न : प्रथम लक्षावधी रुपये मिळवावयाचे व नंतर ते समाजासाठी खर्च करावयाचे असे का? समाजाची आजची व्यवस्था लक्षात घेता, कोटींनी रुपये मिळवण्याचे मार्ग

" शुद्ध " असणे शक्य नाही; ते वाममार्गच असणार. ज्याने कलंकित मार्गाने कोट्यवधी रुपये मिळविले आहेत तो " तेन त्यक्तेन भुञ्जीथः " या मंत्राचा आपण होऊन अंगिकार करील ही अपेक्षा करणे बरोबर होणार नाही. कारण वाममार्गाने धन मिळवण्याच्या कृतीमुळेच त्याचे चारित्र्य कलंकित व विकृत झालेले असणार. म्हणून माझी आपणास अशी विनंती आहे की स्वतःजवळचे जादा धन समाजासाठी खर्च करण्यावर आपण जेवढा भर देता तितका, आणि खरे तर त्यापेक्षा अधिक, भर धन मिळविण्याची साधने व मार्ग " शुद्ध " असावेत यावर द्यावा. संपत्ती मिळविण्याच्या वेळी साधनशुचितेचे काटेकोर पालन केल्यास, माझ्या मते, कोट्यवधी रुपयांचा संचय कोणी करूच शकणार नाही व जादा संपत्ती समाजासाठीच खर्च करायला प्रवृत्त करण्यातल्या अडचणींचे स्वरूप फारच गौण होऊन जाईल. '

वरील प्रश्न विचारला गेल्यानंतरच्या काही आठवड्यांत गांधींनी 'अहिंसा' आणि 'विश्वस्तवृत्ती' यांचे सूक्ष्म विवेचन करून त्यांतील गर्भितार्थ अधिक पूर्णत्वाने स्पष्ट केले. प्रथम श्री. शंकरराव देव यांच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी लिहिले :

'अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करताना कोण्याही माणसाला, मग तो कितीही नीतिभ्रष्ट का असेना, त्याच्या हृदयाला कुशलतेने व माणुसकीने आवाहन केल्यास, सुधारता येते यावर आपली श्रद्धा असली पाहिजे' (हरिजन, २२-२-१९४२, पृ. ४९).

गांधी पुढे असेही म्हणाले :

'तरी आधी संपत्ती मिळवावयाची आणि मग समाजातर्फे विश्वस्त म्हणून ती बाळगायची यापेक्षा धन मिळविण्याची इच्छाच धरू नये हे तत्त्व मला स्वीकारार्ह वाटते. मी स्वतः माझी सर्व संपत्ती पूर्वीच देऊन टाकली आहे. लोकांनी काय करावे यासंबंधी माझे मत काय आहे हे त्यावरून पुरेसे स्पष्ट होते. पण जे आधीच श्रीमंत आहेत किंवा ज्यांचा धनाचा लोभ सुटत नाही, मी त्यांना काय सांगू ? आपल्या धनाचा उपयोग सेवेसाठी करा एवढेच मी त्यांना सांगू शकतो. नाही का ?

'वारसा हक्काने कोणाला संपत्ती मिळावी यावर व्यक्तिशः माझा विश्वास नाही. सुखवस्तू लोकांनी आपल्या मुलांना योग्य प्रकारे वाढवून त्यांना असे शिक्षण द्यावे की ती आपापल्या पायावर उभे राहाण्यास शिकतील. पण दुर्दैव असे की ती माणसे हे करीत नाहीत. त्यांच्या मुलांना थोडेफार शिक्षण मिळते आणि ती गरिबीचे गुणगान करणारी भजनेही म्हणतात. पण, वाडवडिलांची संपत्ती वारशाने आपल्याकडून घेण्यास त्यांना कधीच खंत वाटत नाही. ही वस्तुस्थिती असल्यामुळे माझ्या सारासार बुद्धीचा उपयोग करून व्यवहार्य मार्गाचा उपयोग मी करतो' (**हरिजन**, १-३-१९४२, पृ. ६७).

त्यानंतर लगेचच महिनाभरात गांधींना कोणीतरी पुढील प्रश्न विचारला :

प्रश्न : आपल्या लिखाणावरून अशी कल्पना होते की आपल्या कल्पनेतील विश्वस्त आणि आज अस्तित्वात असलेल्या टाटा, बिर्ला, बजाज, वाडिया, यांसारख्या अत्यंत कनवाळू व लोकोपयोगी कामे करणाऱ्या व्यक्ती यांच्यात फरक नाही. हा समज बरोबर आहे का ? श्रीमंत माणसांच्या मालमत्तेचा लाभ मिळण्याचा अग्रहक्क किंवा योग्य अधिकार कोणाचा हे आपण कृपया स्पष्ट कराल काय ? तसेच, विश्वस्ताने आपल्या उत्पादनाचा व भांडवलाचा कितवा भाग किंवा किती रक्कम स्वतःसाठी, आपल्या सग्या-सोयऱ्यांसाठी किंवा, थोडक्यात म्हणजे, अ-सार्वजनिक गोष्टींवर खर्च करावी यावर काही मर्यादा असेल काय ? तसेच, एखाद्याने ही मर्यादा ओलांडली तर त्याला तसे करण्या-पासून अडवता येईल काय ? विश्वस्त व्यक्ती नालायक असेल किंवा इतर काही कारणाने आपले दायित्व पूर्ण करण्यात अपयशी ठरेल तर तिला काढून टाकता येईल काय ? याबद्दल सरकार किंवा त्या संपत्तीचा लाभ ज्यांना होतो ते लोक विश्वस्ताकडे त्याच्या कृत्यांचा जाब मागू शकतील काय ? भांडवलदार, जमीनदार, संस्थानिक या सर्वांना एकच विश्वस्त तत्त्व लागू होणार की 'विश्वस्तां'मध्ये वेगवेगळे प्रकार आहेत ?

उत्तर : विश्वस्त या कल्पनेने जर खरोखरच मूळ धरले तर आज ज्याला आपण औदार्य म्हणतो ते नाहीसेच होईल. तुम्ही जी नावे घेतली आहेत त्यांपैकी फक्त जमनालालच ( बजाज ) त्या कल्पनेच्या जवळपास, आणि तेही फक्त जवळपासच पोचले. विश्वस्ताला जनतेशिवाय दुसरा वारसदार नाही. अहिंसक विचारसरणीवर आधारित राज्यात विश्वस्ताचा हिस्सा ठरवला जाईल. याबाबत जमीनदार व राजे ( संस्थानिक ) इतर विश्वस्तांप्रमाणेच मानले जातील ( **हरिजन**, १२-४-१९४२, पृ. ११६ ).

वरीलप्रमाणेच १९३४ मध्ये झालेली पुढील प्रश्नोत्तरेही पाहण्यासारखी आहेत :

प्रश्न : समजा, एखाद्या कलावंताने आपल्यामागे आपल्या मुलाजवळ काही चित्रे ठेवली. या चित्रांचे राष्ट्रीय मूल्य त्या मुलाला कळत नाही. तो ती विकतो किंवा त्यांची अन्य मार्गांनी नासाडी करतो. स्वाभाविकच एका व्यक्तीच्या मूर्खपणामुळे राष्ट्राची मोठीच हानी होण्याची वेळ येते. हा मुलगा आपणास अभिप्रेत असलेल्या अर्थाने त्या चित्रांचा 'विश्वस्त' बनणे शक्य नाही ही खात्री पटल्यानंतर, हिंसेचा कमीत कमी वापर करून सरकारने ती चित्रे ताब्यात घेणेच न्याय्य ठरेल, असे आपणास वाटत नाही काय ?

उत्तर : होय. अशावेळी सरकार ती चित्रे ताब्यात घेईल आणि हिंसेचा कमीत कमी वापर होणार असेल तर ती गोष्ट न्याय्यच ठरेल असे मला वाटते. मात्र सरकारशी मतभेद असणाऱ्यांच्या बाबतीत सरकार अतिरिक्त हिंसेचा उपयोग करील ही भीती कायमचीच आहे. संबंधित व्यक्ती जर खऱ्या अर्थाने विश्वस्त म्हणून वागतील तर मला जास्त आनंद होईल. पण जर ती माणसे कर्तव्यच्युत होतील तर सरकारमार्फत त्यांची मालमत्ता काढून घ्यावी लागेल असे मला वाटते. अर्थात त्या वेळीही कमीत कमी

हिंसाचार व्हावा. माझी एकंदर मते अशी असल्यामुळेच मी गोलमेज परिषदेच्या वेळी सांगितले होते की अशा प्रत्येक स्वार्थमूलक हितसंबंधांची नीट पहाणी करून आवश्यक तेथे जप्तीचे हुकूम द्यावेत. जप्तीच्या मोबदल्यात नुकसान-भरपाई द्यायची की नाही हेसुद्धा त्या त्या मालमत्तेच्या स्वरूपावर व पूर्वपीठिकेवर अवलंबून ठेवावे.

वैयक्तिकरीत्या मात्र, राज्यसत्तेच्या हातात अधिकार एकवटण्यापेक्षा विश्वस्त-वृत्तीचा प्रसार होणे मला जास्त आवडेल. कारण माझ्या मतें खाजगी मालकीमुळे होणारी हिंसा सरकारच्या हिंसाचारापेक्षा कमी हानिकारक असते.

माझी अशी पक्की खात्री आहे की शासन हिंसेने भांडवलशाही नष्ट करील तर ते स्वतःच हिंसेच्या फेऱ्यात सापडेल. अशी राज्यसत्ता मग अहिंसेचा अंगीकार करण्याच्या दृष्टीने कधीच प्रगती करू शकणार नाही. राज्यसत्ता म्हणजे अत्यंत केंद्रीभूत आणि सुसंघटित स्वरूपातील हिंसाच. व्यक्तीला आत्मा असतो, पण शासनसंस्थेला आत्मा नसतो. म्हणून जी राज्यसत्ता हिंसेच्या आधारावर अस्तित्वात येते तिला हिंसे-पासून परावृत्त करणे कधीच शक्य होत नाही. म्हणून मी विश्वस्तवृत्तीचे तत्त्व अधिक पसंत करतो.

## व्यक्तिगत उत्पन्नातील विषमता

जसजसा काळ गेला आणि अनुभव गाठी बांधला गेला तसतसे गांधींना असे वाटू लागले असावे की काटेकोरपणे सर्वांना समान वेतन मिळावे हे व्यवहारात साकार करावयाचे ध्येय म्हणून पुढे ठेवणे शक्य होणार नाही. म्हणून समान मजूरीचा आदर्श ध्येय म्हणून स्वतःच्या डोळ्यापुढे कायम ठेवूनही, एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उत्पन्नातील विषमतेस मान्यता देऊन व्यवहारी पातळीवर उतरण्यास गांधी तयार झाले;[४] अधिक गुणवान व उच्च शिक्षित व्यक्तींना जास्त उत्पन्न मिळविण्यास परवानगी दिली जाईल अशी भूमिका त्यांनी घेतली. ‘बुद्धिमान व्यक्तीला अधिक पैसा मिळविण्याला मी परवानगी देईन. त्याची बुद्धी मी आवळून टाकणार नाही. पण मिळवत्या सर्व मुलांचे उत्पन्न कुटुंबाच्या एकत्र समाईक खर्चासाठी कारणी लावले जाते तसे त्याच्याही जादा मिळकतीचा भाग सार्वजनिक हितासाठी खर्च झाला पाहिजे’ ( यं. इं., २६-११-१९३१, पृ. ३६८ ).

## वारसा हक्क

सर्व प्रकारचा वारसा हक्क राष्ट्राकडे असला आणि माणसाच्या खर्चावर निर्बंध असतील तर उत्पन्नाच्या विषमतेचा प्रश्न फारसा महत्त्वाचा राहणार नाही. कदाचित ही विषमता

उपकारकही ठरू शकेल.

काही झाले तरी वारसा हक्काचा प्रश्न महत्त्वाचा आहे. वारशाने वडिलार्जित संपत्ती मिळणे बंद झाले म्हणजे मालमत्तावान 'धनाढ्य वर्गाच्या निर्मितीचा पायाच ढासळेल.

'प्रश्न : आपण श्रीमंतांना 'विश्वस्त' होण्यास सांगितले आहे. त्यांनी आपल्या मालमत्तेवरील खाजगी मालकी हक्क सोडून देऊन एक कायदेशीर व लोकशाही पद्धतीने चालणारा ट्रस्ट निर्माण करावा असा अर्थ करावयाचा काय? असा अर्थ केल्यास, सध्या अस्तित्वात असलेली व्यक्ती मृत्यू पावल्यावर तिचा उत्तराधिकारी कसा निवडला जाईल?

'उत्तर : वरील प्रश्नाला उत्तर देताना गांधींनी सांगितले की याबाबत ते त्यांच्या जुन्या मतांनाच चिकटून आहेत. त्यांच्या मते सर्व गोष्टी परमेश्वरानेच दिलेल्या असून त्यांवर परमेश्वराचीच मालकी आहे. कोणतीही मालमत्ता परमेश्वराच्या लेकरांच्या उपयोगासाठी असते. कोण्या एका व्यक्तीच्या उपभोगासाठी ती नसते. जेव्हा एखाद्या माणसाजवळ प्रमाणापेक्षा जास्त संपत्ती गोळा होते तेव्हा तो त्या जादा भागापुरता लोकांतर्फे "विश्वस्त" ठरतो.

'ईश्वर सर्वशक्तिमान असल्याने त्याला साठा करण्याची गरजच नसते. आजचे आज, उद्याचे उद्या अशी त्याची रीत आहे. त्यामुळे खरे म्हणजे, तत्त्वतः, माणसानेही उद्याची चिंता करू नये, साठा करू नये. हे तत्त्व सामान्य लोकांच्या मनात बिंबले तर ते कायद्यात ग्रथित होईल. मग विश्वस्त या संस्थेलाही आपोआपच कायदेशीर अधिष्ठान लाभेल. विश्वस्त सिद्धांत ही भारताने जगाला दिलेली देणगी ठरावी अशी त्यांची इच्छा होती. सर्व जगाने या पद्धतीचा स्वीकार केला तर कसलीच पिळवणूक राहणार नाही. गोऱ्या लोकांनी स्वतःसाठी किंवा आपल्या भावी पिढ्यांसाठी ऑस्ट्रेलिया, कॅनडा, किंवा तशाच दुसऱ्या देशात जमीन राखून ठेवण्याचेही कारण उरणार नाही. या भेदभावाच्या उदरात दोन महायुद्धांपेक्षाही भयंकर युद्धाची बीजे आहेत. एखादा विश्वस्त मृत्यू पावल्यानंतर त्याचा उत्तराधिकारी कोण? या प्रश्नाच्या उत्तरादाखल ते म्हणाले की प्रत्येक विश्वस्ताला कायदेशीर मान्यता घेऊन आपला उत्तराधिकारी नेमण्याचा हक्क असेल' (सिलेक्शन्स, क्र. ३१२).

'प्रश्न : एखाद्या विश्वस्ताचा उत्तराधिकारी प्रत्यक्षात कसा निवडला जाईल? त्याला नाव सुचविण्याचा अधिकार असेल पण निवड पक्की करण्याची सत्ता अंतिमतः शासनाची राहील अशी ती पद्धत असेल काय?

'उत्तर : त्यांनी कालच सांगितल्याप्रमाणे, निवडीचा अधिकार मूळ मालकाला, पहिला विश्वस्त बनेल त्याला द्यावा. पण त्यावर अंतिम शिक्कामोर्तब मात्र शासनाने करावे. अशा व्यवस्थेमुळे व्यक्तीचे शासनावर व शासनाचे व्यक्तीवर बंधन राहील.

' **प्रश्न :** अशा रीतीने विश्वस्त-तत्त्व लागू होऊन खाजगी मालमत्तेचे सार्वजनिक मालमत्तेत रूपांतर झाल्यावर मालकी हक्क ( हिंसेचे हत्यार असलेल्या ) राज्यसत्तेकडे जाणार की ऐच्छिक स्वरूपाच्या ग्रामसभा, नगरपालिका अशा लोकाश्रयी संस्थांकडे जाणार ? अर्थात नगरपालिका, ग्रामसभा वगैरे संस्थांचे अधिकार अंतिमतः राज्यसत्तेच्या कायद्यानेच प्राप्त झालेले असतील, हे शक्य आहे.

' **उत्तर :** गांधीजींच्या मते या प्रश्नातच थोडासा वैचारिक गोंधळ होता. वरील रूपांतर झाल्यानंतर कायदेशीर मालकी विश्वस्ताकडेच राहील, राज्यसत्तेकडे नव्हे. किंबहुना मालमत्तेची जप्ती टाळण्यासाठीच विश्वस्त कल्पनेचा जन्म झालेला आहे. त्यामुळेच मूळ मालकाचे कौशल्य व त्याची योग्यता याचा जनतेला लाभ मिळत राहील. शिवाय शासन नेहमीच हिंसेवर आधारलेले असायला हवे असे आपण मानत नसल्याचे गांधींनी स्पष्ट केले. सिद्धांत म्हणून ते ठीक असेलही, पण सिद्धांत व्यवहारात आणताना राज्यसत्ता ही बहुतांशी अहिंसाधिष्ठित असावी अशी आवश्यकता निर्माण होते ' ( **सिलेक्शन्स**, क्र. ३१३ ).

' जमिनदारांना उद्देशून त्यांनी सांगितले की जर त्यांच्याविरुद्ध बोलल्या जाणाऱ्या गोष्टी खऱ्या असतील तर त्यांचे दिवस भरत आले आहेत हे नक्की. प्रभू किंवा मालक म्हणून यापुढे त्यांना रहाता येणार नाही. गरीब शेतकऱ्यांचे विश्वस्त म्हणून रहाण्यास ते तयार असतील तर त्यांचे भविष्य उज्ज्वल असेल. श्रीमंतांनी केवळ नावापुरते विश्वस्त न बनता मनापासून विश्वस्त झाले पाहिजे. आपली मेहनत आणि आपल्या गरजा यामुळे जेवढ्यावर आपला अधिकार पोचतो त्यापेक्षा एक कपर्दिकही जास्त न घेणारे असेच हे विश्वस्त असतील. त्यांनी अशी वर्तणूक ठेवल्यास कोणताही कायदा त्यांना पदच्युत करू शकत नाही हे त्यांना दिसून येईल. सर्व शेतकरी व कुळे त्यांचे मित्रच होतील ' ( **सिलेक्शन्स**, क्र. ३१४ ).

' **प्रश्न :** आपण म्हणता की राजे, जमीनदार, भांडवलदार यांनी गरीब जनतेचे विश्वस्त व्हावे. पण तसे आज कोणी आहेत का ? की या सर्वांचे हृदयपरिवर्तन होईल अशी अपेक्षा आपण बाळगता ?

' **उत्तर :** मला वाटते, काही थोडे तसे लोक आजही आहेत. ते पूर्णार्थाने विश्वस्त नाहीत. मात्र त्यांची वाटचाल या दिशेने सुरू झाली आहे हे नक्की. तरी, हल्लीचे राजे, जमीनदार हे गरीबांचे विश्वस्त होतील काय हा प्रश्न राहतोच. ते आपण होऊन विश्वस्त झाले नाहीत तर परिस्थितीच्या दडपणाने त्यांना तसे व्हावे लागेल. अर्थात त्यांना स्वतःचा सर्वनाशच करून घ्यायचा असेल तर गोष्ट वेगळी. जेव्हा " पंचायत राज्य " स्थापन होईल तेव्हा हिंसेने जे कधीच साधणार नाही ते लोकमताने सहज साधेल. सामान्य जनतेला आपले सामर्थ्य कळत नाही तोपर्यंतच या राजे, महाराजे, जमीनदार

किंवा भांडवलदारांची मातब्बरी. लोकांनी जमीनदारी आणि भांडवलशाहीच्या पापाशी असहकार केला की त्या "उपासमारी"ने मरून जातील. "पंचायत राज्या"त केवळ पंचायतीच्याच आज्ञा पाळल्या जातील, आणि पंचायतीचा कारभार लोकांनी स्वतः केलेल्या कायद्यानुसारच चालेल' (**सिलेक्शन्स**, क्र. ३१५).

## बुद्धिमत्ता

सध्या वैयक्तिक मालकीखाली असलेल्या सगळ्या संपत्तीचे हळूहळू विश्वस्त संपत्तीत रूपांतर झाले व व्यवहारात शक्य आहे तेवढ्या कमाल प्रमाणात आर्थिक समता प्रस्थापित झाली की विश्वस्त सिद्धांताचे प्रयोजन संपले असे होईल काय? गांधींचे तसे मत नव्हते. बुद्धिमत्ता, कौशल्य व तदनुषंगिक विषमता ही राहणारच. सर्वांनी आपली स्वकष्टार्जित किंवा वडिलोपार्जित संपत्ती विश्वस्त म्हणून बाळगावी याप्रमाणेच गांधींचे असेही मत होते की सर्व गुणवंतांनी आपली बुद्धी, आपल्याजवळची विशेष कौशल्ये समाजातर्फे विश्वस्त म्हणूनच धारण करावीत. म्हणूनच त्यांच्या कल्पनेतील भावी समाजाबद्दल ते लिहितात, 'कोणीही माणूस, मग तो राजा असो की व्यापारी असो की जमीनदार असो, वारशाने मिळालेल्या किंवा स्वतःच्या कमाईच्या संपत्तीचा एकमेव मालक असणार नाही. त्याला संपत्तीची आपल्या इच्छेनुसार हवी तशी विल्हेवाट लावता येणार नाही. इतरांच्या समान संधीच्या आड न येता आपल्या गुणांचा संपूर्ण उपयोग करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला असले पाहिजे. त्या उपयोगापासून मिळणाऱ्या मिळकतीचा मन मानेल तसा उपयोग करण्याचा अधिकार मात्र कोणालाच असणार नाही. प्रत्येकजण राष्ट्राचा वा, असे म्हणू की, त्याच्या भोवतालच्या समाजाचा घटक असतो. त्यामुळे त्याच्या बुद्धिमत्तेचा उपयोगही त्याने एकट्या स्वतःसाठी करता कामा नये. तो ज्या समाजाचा घटक आहे व ज्याच्या जिवावर तो जगतो त्या समाजाच्या फायद्यासाठी त्याने आपल्या गुणांचा उपयोग केला पाहिजे' (**हरिजन**, २-८-१९४२, पृ. २४९).

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, प्राथमिक गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या उत्पादनसाधनांप्रमाणेच गुणदेखील विश्वस्त वृत्तीने धारण केले पाहिजेत. गुणांचे असे सामाजिकीकरण, अर्थातच, संघटित अहिंसात्मक मार्गाने गुणी जनांची मने वळवूनच झाले पाहिजे. अशा रीतीने विश्वस्त सिद्धांताला मानवी समाजात शाश्वत मूल्य आहे.

माझ्या एका मित्राने गमतीने म्हटल्याप्रमाणे याचे तात्पर्य असे सांगता येईल की, विश्वस्तवृत्ती सिद्धांताचे वर वर्णिलेले व्यापक आदर्शवादी उपयोजन वगळले आणि केवळ आर्थिक जीवनाचा विचार केला तरी, या सिद्धांताने वर्गसमन्वय साधणार नसून सर्व वर्गभेद समूळ नष्ट करण्याचेच उद्दिष्ट साधणार आहे. त्यामुळे सर्व माणसे "श्रमिक"

होतील आणि प्रत्येकाची भौतिक आणि मानसिक साधनसंपत्ती सर्व मानवजातीच्या सेवेत कारणी लागेल. शोषित मजुरांनी मालकांवर जबरदस्ती करून नाही तर, ज्यांच्या जिवावर धन मिळविले, राखले व उपभोगले जाते त्या कामगारांनी अहिंसक असहकाराने त्यांचे हृदयपरिवर्तन घडवून आणल्यामुळे हा बदल झालेला असेल. हा लढा चालू असताना दलित श्रमिकांचेही दौर्बल्य नाहीसे होईल. आजची सामाजिक विषमतेची परिस्थिती हा त्या दौर्बल्याचाच परिणाम आहे. आज आपापसात विग्रह आहे अशा वर्गांच्या संयुक्त प्रयत्नांनी निर्माण झालेल्या नव्या सामाजिक संघटनेमध्ये सर्व माणसे अगदी स्वेच्छेने आणि सुखाने समाजाचे सेवक म्हणून राहतील. जीवनमूल्यांची एका नव्या दिशेने संपूर्ण पुनर्घटना होईल. आर्थिक समानता आल्यामुळे समाजही प्रत्येक व्यक्तीला आपल्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक साधनसामुग्रीचा विकास करून घेण्याला आवश्यक ती संधी उपलब्ध करून देईल. एकाला विकासाची संधी मिळत असताना इतरांच्या विकासावर बंधने पडत नाहीत ना, हेही पाहिले जाईल. सर्वांच्या बुद्धिकौशल्यांचा लाभ सर्वांनाच होईल.

**टीपा :**

१. 'आता मी तुमचे लक्ष दुसऱ्या एका दृश्याकडे वेधून घेऊ इच्छितो. आपल्या सभेचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या महाराजाधिराजांनी भारताच्या दारिद्र्याचे विवरण केले. इतरही वक्त्यांनी त्यावर मोठा जोर दिला. परंतु व्हाइसरॉयांच्या हस्ते विद्यापीठांच्या स्थापनेचा समारंभ ज्या भव्य शामियान्यात झाला तेथे आपण काय पाहिले? तर एक अतिभव्य वैभवशाली देखावा, हिऱ्यामोत्यांचे एक जंगी प्रदर्शन, की जे पाहून या प्रसंगी मुद्दाम हजर राहिलेल्या पॅरिसच्या मोठ्यात मोठ्या जवाहिऱ्याचे डोळे तृप्त झाले. येथे जमलेल्या व दागदागिन्यांनी मढलेल्या लक्ष्मीपुत्रांची आणि देशातील लक्षावधी गरीब माणसांची मी तुलना करतो तेव्हा या मानकऱ्यांना आणि सरदार-दरकदारांना सांगावेसे वाटते : आपण आपल्या अंगावरचे दाग-दागिने उतरवून गरीब देशबांधवांसाठी "विश्वस्त-धन" म्हणून ते उपभोगिल्याखेरीज भारताचा उद्धार होणार नाही. अध्यक्ष महाराज, ज्या ज्या वेळी हिंदुस्थानातील एखाद्या शहरात, मग ते ब्रिटिश हिंदुस्थानातील असो किंवा आमच्या मोठमोठ्या संस्थानिकांच्या प्रदेशातील असो, एखादा मोठा राजवाडा उभारला जात असल्याचे मी ऐकतो तेव्हा तेव्हा मला मत्सर वाटतो आणि मी म्हणतो, "अरे, ही सारी संपत्ती गरीब शेतकऱ्यांच्या घामातून

निर्मिलेली आहे. " या देशात ७५ टक्के लोक शेतकरी आहेत, आणि काल रात्री श्री. हिग्गिनबॉटम यांनी आपल्या शैलीदार व्याख्यानात सांगितलेली, "गवताच्या एका पानाच्या जागी दोन पाने" काढणारी हीच ती माणसे आहेत. परंतु या शेतकऱ्यांच्या कष्टाची सर्व फळे आपणच हिरावून घेत असलो किंवा इतरांना हिरावून घेऊ देत असलो तर आपल्यात स्वराज्याची भावना फारशी नाही असेच म्हटले पाहिजे. शेतकऱ्याच्या मुक्तीतच आपली सर्वांची मुक्ती आहे. वकील, डॉक्टर किंवा धनाढ्य जमीनदार ती आपल्याला मुळीच मिळवून देऊ शकणार नाहीत' (भाषणे, पृ. ३२२).

२. 'धनावर अजून पुरेसा कर बसलेला नाही. इतर कोणत्याही देशापेक्षा, भारतात तरी निदान एखाद्या व्यक्तीने बेसुमार संपत्ती बाळगणे हा (हिंदी) मानवतेचा अपराध मानला जायला हवा. तेव्हा एका विशिष्ट पातळीवर जाऊन पोचलेल्या धनराशीच्या बाबतीत कर बसविण्याची कमाल मर्यादा कधी येऊच शकत नाही. इंग्लंडमध्ये एका ठरवून दिलेल्या रकमेहून अधिक असणाऱ्या मिळकतीवर ७० टक्के इतका कर आजच बसवलेला आहे असे मी ऐकतो. हिंदुस्थानात त्यापेक्षा अधिक हिस्सा कररूपाने का काढून घेतला जाऊ नये, याला काहीच कारण मला दिसत नाही. मृत्यूकर का बसविला जाऊ नये? वयात आलेल्या मुलांना जर आपल्या लक्षाधीश आई-बापांची संपत्ती मिळत असेल तर त्यामुळे त्या मुलांचे नुकसानच होत असते. राष्ट्राचे तर त्यामुळे दुहेरी नुकसान होते. **कारण खरे पाहता संपत्तीचा वारसा राष्ट्राकडे असला पाहिजे.*** तो आज राष्ट्राकडे नाही यात एका तऱ्हेचे नुकसान आहेच. शिवाय, दुसरे असे की, या संपत्तीच्या ओझ्याखाली सापडल्यामुळे त्या मुलांचे कर्तृत्व पूर्णपणे कधीच विकास पावत नाही. त्यामुळे राष्ट्राला त्या वारसदारांच्या गुणांचा लाभ होत नाही' (हरिजन, ३१-७-१९३७, पृ. १९७).

३. 'जपानमधील सामुराईप्रमाणे आपल्याकडील जमीनदारांनीही स्वतःला आपल्याजवळील संपत्ती-मालमत्तेच्या बाबतीत रयतांचे विश्वस्त मानले पाहिजे. तसे झाल्यास ते आपल्या कामाबद्दल **योग्य मेहनताना घेण्यापलीकडे*** स्वतःसाठी अधिक काही घेणार नाहीत. एकीकडे धनाढ्य लोकांची सर्वस्वी अनावश्यक उधळपट्टी, चैन व डामडौल आणि दुसरीकडे त्यांना ज्या जनतेत राहावे लागते त्या सामान्य माणसांचे पराकोटीचे दारिद्र्य आणि गलिच्छ परिस्थिती यात काहीच ताळमेळ राहिलेला नाही. आदर्श जमीनदार प्रथम आपल्या प्रजेवरील बराचसा

---

* जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा.

बोजा ताबडतोब कमी करील. रयतेशी निकटतम सहवास साधून त्यांच्या अडचणी तो समजावून घेईल. जगण्यात काही राम उरू नये इतके रयतेचे जीवन आज नैराश्यग्रस्त आहे. त्या जागी हा जमीनदार आशेचा अंकूर फुलवील. जनतेचे आरोग्य व स्वच्छताविषयक नियमांचे अज्ञान त्याला स्वस्थ बसू देणार नाही. लोकांच्या आवश्यक गरजा पुऱ्या व्हाव्यात म्हणून तो स्वतः गरिबीचा वसा पत्करील. आपल्या प्रजेच्या आर्थिक स्थितीचा तो अभ्यास करील. मुलांसाठी तो शाळा काढील व आपल्या मुलांबरोबर त्यांच्या मुलांनाही तो तेथेच शिकवील. पाणी शुद्ध राहावे म्हणून तो विहिरी व तलाव स्वच्छ ठेवील. स्वतःचा संडास स्वतः साफ करील व आपला शरीरश्रमाचा धर्म पार पाडील. जनतेलाही संडास व रस्ते स्वच्छ ठेवायला शिकवील. आपली उद्याने तो रयतेला पूर्णपणे खुली करून देईल. स्वतःच्या चैनीसाठी बांधलेल्या व बहुतांशी रिकाम्या पडून राहणाऱ्या इमारतींतच तो शाळा, इस्पितळे किंवा तत्सम कार्ये सुरू करील. या भांडवलदारांनी काळाची पावले ओळखली व आपल्याजवळील मालमत्तेवरील "ईश्वरदत्त वारसा हक्का"ची कल्पना सुधारली तर आज खेडे ही संज्ञा प्राप्त झालेले हे सात लाख शेणगोठे आपला विश्वास बसणार नाही इतक्या अल्पावधीत सुख, शांती, आणि आरोग्य यांची मंदिरे होऊन जातील. माझी अशी खात्री आहे की आपल्याकडील भांडवलदार मंडळी जपानमधील सामुराईंचे अनुकरण करतील तर त्यांना खरोखर काहीच गमवावे लागणार नाही. उलट नवसंजीवन लाभेल. खरोखर आता दोनच पर्याय उरले आहेत. एक म्हणजे धनिकांनी आपल्याजवळील सर्व जादा संपत्तीचा स्वेच्छेने त्याग करावा आणि त्यायोगे स्वतःसाठी व सर्वांसाठी खरेखुरे सुखसमाधान प्राप्त करून घ्यावे. एरवी, धनिक वेळीच सावध झाले नाहीत तर, अज्ञानी पण जागृत झालेली अर्धपोटी जनता साऱ्या राष्ट्राला अराजकाच्या खाईत लोटून देईल हा दुसरा पर्याय. मोठ्यात मोठ्या सत्ताधाऱ्यांना आपल्या सर्व लष्करी सामर्थ्यानेही हे अराजक टाळता येणार नाही' ( यं. इं., ५-१२-१९२९, पृ. ३९६ ).

४. 'आपण मानवातील मांगल्याला आवाहन करूनच प्रतिसादाची अपेक्षा केली पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग केवळ स्वतःचे वैभव वाढविण्याकडे करण्यापेक्षा सर्वांच्या भल्यासाठी करावा हेच समाजाच्या हिताचे होणार नाही काय? प्रत्येक मनुष्याला आपल्या बुद्धि-कौशल्यांचा पुरेपूर उपयोग करता येत नाही वा करू दिला जात नाही अशा स्मशान-समता आपल्याला नको आहे. असा समाज शेवटी रसातळाला जाईल. म्हणूनच मी म्हणतो की, धनिकांनी ( प्रामाणिकपणे ) कोट्यवधी रुपये मिळवावेत,

मात्र ती सर्व संपत्ती सर्वांच्या सुखासाठी अर्पण करण्यासाठी मिळवावी, ही सूचना व्यवहार्य आहे. "तेन त्यक्तेन भुञ्जीथः" हा मंत्र असामान्य ज्ञानावर अधिष्ठित झालेला आहे. आपल्या शेजाऱ्याचे काय होत आहे याचा विचार न करता प्रत्येकजण जगतो ही आजची तऱ्हा आहे. अशा या आजच्या समाज-रचनेच्या जागी सर्वांचे सुख साधणारी नवी जीवनपद्धती निर्माण करण्याचा मार्ग या मंत्राने सांगितला आहे' ( **हरिजन**, २२-२-१९४२, पृ. ४९ ).

□ □

प्रकरण पाचवे

# एक मुलाखत

दिनांक ९ व १० नोव्हेंबर, १९३४ या दोन दिवशी वर्धा येथे प्रस्तुत लेखकाची गांधींशी एक प्रदीर्घ मुलाखत झाली. त्या वेळी चर्चिले गेलेले प्रश्न सामाजिक व राजकीय दृष्ट्या मूलभूत स्वरूपाचे होते. त्या मुलाखतीचा वृत्तांत सर्वसामान्य जनतेलाही उद्बोधक वाटेल असे वाटल्यावरून प्रस्तुत लेखकाने तो लिहून काढला. नंतर तो दुरुस्ती व संमतीसाठी गांधींकडे पाठवला. त्यात योग्य ते फेरफार करून त्यांनी तो पुढील स्वरूपात लेखकाकडे परत पाठवला. हा वृत्तांत पुढे कलकत्ता येथून प्रकाशित होणाऱ्या 'मॉडर्न रिव्ह्यू' या मासिकाच्या ऑक्टोबर, १९३५ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता.

**प्रश्न १**

खेडोपाडी काम करीत असता माझ्या असे निदर्शनात आले की ग्रामीण लोकांच्या स्थितीत खरीखुरी सुधारणा घडवून आणण्यात दोन प्रमुख अडचणी आहेत.

१. सहकार्याचा अभाव : आपल्या हक्कावर कोणी अतिक्रमण करीत असेल तर त्याला एकजुटीने वा सहकार्याने विरोध करावा ही गोष्ट ती माणसे पार विसरून गेली आहेत.

२. ही गुलामगिरी, काही अंशी बाह्य स्थितीचा, तर काही अंशी ग्रामस्थांच्या चारित्र्याचा, आणि आमच्याकडून त्यांच्या शिक्षणाची जी पूर्ण आबाळ झाली आहे त्याचा परिणाम आहे. या गुलामगिरीच्या जीवनामुळे लोकांत निग्रहशक्तीच राहिलेली नाही.

अशा स्थितीत खादीचे किंवा इतर प्रकारचे ग्रामीण पुनर्रचनेचे कार्य करीत असताना आपले प्रमुख उद्दिष्ट काय असावे? बंगालमधील काही भागांत गरीबी निवारण्याचे कार्य एवढाच खादी कार्याला अर्थ उरला आहे. त्यांची निग्रह शक्ती जागृत करण्यात अपयश आलेले आहे. आणि ती जागृत झाली तरच त्यांच्या जीवनात चिरंतन बदल घडून येईल.

माझा प्रश्न असा की, खादीकडे केवळ एक मानवतावादी मदतकार्य म्हणून पाहिले जावे की त्या कार्याचा उपयोग प्रामुख्याने राजकीय लोकशिक्षणाचे एक साधन म्हणून करावा ? माझा असा अनुभव आहे की अंतिम उद्दिष्टाचे भान बाळगले नाही तर खादीकार्य अगदी चटकन एक फालतू काम बनते.

## उत्तर

राजकीय संघटना व खादी ही दोन कार्ये अगदी वेगळी ठेवली पाहिजेत. त्यात कसलीच गल्लत होता कामा नये. खादीचे उद्दिष्ट मानवातावादीच आहे. पण आजची भारतीय स्थितीच अशी आहे की खादीकार्याचा मोठा राजकीय परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

सॅल्व्हेशन आर्मीचे लोक येतात ते वास्तविक ईश्वराचा संदेश देण्यासाठी. पण ते लोक अन्न बरोबर आणतात. अन्न हेच गरिबांचे परब्रह्म असते. त्याचप्रमाणे आपणही लोकांना खादीतून पोटाला अन्न मिळवून दिले पाहिजे. खादीच्या सहाय्याने जर आपण लोकांतील करंटा आळस घालवू शकलो तर ते सहजच आपले म्हणणे ऐकायला तयार होतील. सरकार इतर काहीही करीत असू दे पण ते गावकऱ्यांना थोडेतरी पोटाला देतेच. आपण जर त्यांना अन्न देऊ शकलो नाही तर त्यांनी आपले का ऐकावे ? ते स्वतःच्याच प्रयत्नांनी काय काय करू शकतात हे आपण त्यांना दाखवून दिल्यानंतर आपले म्हणणे ऐकून घ्यायला ते निश्चितच तयार होतील.

असा विश्वास निर्माण करण्याचा खादीकार्य हा उत्तम मार्ग आहे. खादीचा कार्यक्रम प्रचारात आणत असताना आपला उद्देश पूर्णतः मानवतावादी म्हणजेच आर्थिक असला पाहिजे. कोणत्याही प्रकारची राजकीय उद्दिष्टे आपण मनात बाळगता कामा नयेत. मात्र या कार्याचे राजकीय स्वरूपाचे दूरगामी परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. ते कोणी टाळू शकत नाहीत आणि त्याची खंतही वाटण्याचे कारण नाही.

[**टीप :** ‘आपला उद्देश पूर्णतः मानवतावादी म्हणजेच आर्थिक असला पाहिजे’ याचा अर्थ असा नव्हे की खादी कार्यकर्त्याने चालू आर्थिक व सामाजिक चौकट स्वीकारून, त्या चौकटीत राहून लोकांच्या अडचणीत त्यांना केवळ काही मदत पोचविण्याचे मर्यादित उद्दिष्ट ठेवावे. वास्तविक त्याने लोकांच्या स्वप्रयत्नांवर आधारलेली व त्यांच्याच नियंत्रणाखाली असलेली नवी उत्पादनपद्धती व व्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय मनात बाळगले पाहिजे. दूरदूरच्या शहरांतून विकण्यासाठी खादीचे उत्पादन दुप्पट-

तिप्पट करण्याचे उद्दिष्ट प्रधान न मानता आपल्या कार्यक्षेत्रातली बेकारी जास्तीत जास्त दूर करण्यावरच संघटकाने शक्ती केंद्रित केली पाहिजे.

तसेच, स्वयंसेवकाने 'लोकांना ते स्व-प्रयत्नांनी काय काय करू शकतात ते शिकवावे' या साध्याचा अर्थ असा की, शेवटी लोकांना त्याच्या मदतीची अपेक्षाच उरणार नाही अशा रीतीने त्याने कार्याचे संघटन करावे. थोडक्यात, सामान्य लोकांची स्वतःच्या हिंमतीवर काम करण्याची कार्यशक्ती जागृत करणे हे त्याचे उद्दिष्ट असावे.

कार्यक्षमतेच्या दृष्टीनेसुद्धा, कार्यकर्त्याने रचनात्मक कार्य आणि राजकीय प्रचार यांची सरमिसळ करू नये. खादीच्या चळवळीमुळे वाढीस लागलेली उपक्रमशीलता आणि आत्मविश्वास यांचे राजकीय परिणाम योग्य वेळी दिसून येतीलच. रूढार्थाने "राजकीय" परिणाम झटपट साधण्याची घाई करण्याचे कारण नाही. अन्यायाची दखल घेऊन प्रामुख्याने स्वतःच्या अहिंसक प्रतिकारशक्तीने त्याचे निवारण करण्याइतका जनतेचा आत्मविकास झाला म्हणजे मग त्यांचा प्रतिकार हा स्वाभाविक व योग्य प्रकारचा होईल. —निर्मलकुमार बोस ]

## प्रश्न २

जनतेचे सामर्थ्य वाढवण्याकरता वा लोकात सहकार्याची जाणीव निर्माण करण्यासाठी खादीचे काम करण्याऐवजी भांडवलदारीविरुद्ध स्थानिक व विशिष्ट प्रश्नांवरून लहान लहान लढे उभारणे अधिक इष्ट होणार नाही का? या दोन्हींतून निवड करण्याची वेळ आली तर आम्ही कोणता मार्ग निवडावा? गावातील सावकाराशी किंवा जमीनदाराशी एखाद्या प्रश्नावर–उदाहरणार्थ, व्याजाचा दर कमी करून घेणे किंवा शेतकऱ्याने स्वतःसाठी ठेवून घ्यावयाच्या धान्याचे प्रमाण वाढवून घेणे– झगडताना खादी कार्यक्रमाद्वारे झालेल्या सर्व कार्यावर पाणी सोडण्याची वेळ आली, विशेषतः खादीच्या कार्यातून लोकसंघटन करण्याच्या पद्धतीपेक्षा अशा लढ्यांनी लोकांमध्ये अधिक आत्मविश्वास निर्माण होणार असेल, तर आम्ही काय करावे?

## उत्तर २

प्रश्नाच्या शेवटी टाकलेला पेच निर्णयात्मक उत्तर देण्याच्या दृष्टीने अवघड आहे. अहिंसक मोहिमेला आवश्यक निर्धार व धैर्य स्थानिक व विशिष्ट प्रश्नावर लढे उभारून निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे की नाही याचा निवाडा मला होत नाही. पण ती शक्यता मी मान्य केली तर त्या परिस्थितीत खादीचा बळी द्यावा लागेल. तरी, अहिंसक

प्रतिकार पद्धतींचा तज्ज्ञ व व्यावहारिक अनुभव गाठीस असलेला एक मित्र या नात्याने मी तुम्हाला असा सल्ला देईन की लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी व राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी तुम्ही आज लढ्याच्या मार्गाचा अवलंब न करणेच चांगले.

आपण अहिंसक मार्गाने स्वातंत्र्यप्राप्तीचा संग्राम लढत आहोत. भारतातील निरनिराळ्या भागांत तुम्ही म्हणता तसे स्थानिक लढे देण्यात अनेक कार्यकर्ते गुंतून पडले तर खरी वेळ येईल तेव्हा देशातील सर्व लोक स्वराज्याच्या संग्रामासाठी एकत्र येऊ शकणार नाहीत. सविनय कायदेभंगाची देशव्यापी चळवळ करण्यापूर्वी लोकांना सविनय किंवा ऐच्छिक आज्ञापालन म्हणजे काय हे शिकले पाहिजे. आपण सरकारी आज्ञांचे पालन करतो ते भीतीमुळे; सरकारविरुद्ध आपली प्रतिक्रिया हिंसा किंवा लाचारी– म्हणजेच भ्याडाची प्रच्छन्न हिंसा– या द्वारा प्रकट होते. खादीच्या कार्यातून लोकांना त्यांनी स्वतःच उभ्या केलेल्या संस्थेशी सविनय आज्ञाधारक कसे राहावे हे आपण शिकवीत आहोत. ही कला त्यांना अवगत झाली म्हणजे मगच नको असलेल्या गोष्टी अहिंसक मार्गाने नष्ट करण्यासाठी त्यांना यशस्वीपणे सविनय कायदेभंग करणेही जमेल. म्हणूनच माझे सर्व कार्यकर्त्यांना सांगणे आहे की, त्यांनी आपले लढाऊ सामर्थ्य सर्व प्रकारच्या अनेक लहान लहान आवाड्यांवर लढे देण्यात उधळू नये. अहिंसात्मक असहकाराचा यशस्वी लढा देण्यासाठी लागणारी मनोभूमिका खादीच्या शांततामय कार्याद्वारे निर्माण करण्याच्या कामी त्यांनी आपली शक्ती केंद्रित करावी. त्यांच्या स्वतःच्या शोषणाची पार्श्वभूमी लक्षात घेता परदेशी कापडावरील बहिष्काराची –' पिकेटिंग '– चळवळ सहजच हिंसक वळण घेईल; उलट खादीची चळवळ स्वाभाविक व सर्वस्वी अहिंसक राहील.

## प्रश्न ३

प्रेम वा अहिंसा आणि स्वामित्व वा शोषण यांचे सहअस्तित्व कोणत्याही स्वरूपात तरी शक्य आहे का? स्वामित्व आणि अहिंसा, या दोन्ही गोष्टी एकत्र नांदणे शक्य नसले तरी, खाजगी मालकीहक्काशिवाय राहण्याची तयारी होण्याइतके लोकांचे शिक्षण होत नाही वा त्यांच्यात प्रगल्भता येत नाही तोवर, एक अनिष्ट पण अटळ गोष्ट म्हणून, आपण जमिनी, कारखाने यांच्यावरील खाजगी मालकी चालू राहू द्यावी असे तुम्ही म्हणाल का? तसे असेल तर सर्व जमीन प्रथम राज्याच्या मालकीची करून घेऊन राज्य जनतेच्या नियंत्रणाखाली ठेवावे हेच अधिक इष्ट नाही काय?

उत्तर ३

प्रेम आणि अप्पलपोटे स्वामित्व एकत्र नांदणे कधीच शक्य नाही. तत्त्वतः जेथे विशुद्ध प्रेम आहे तेथे संपूर्ण निर्ममत्वच असले पाहिजे. आपला देह ही आपल्या मालकीची शेवटची वस्तू आहे. ज्याची मृत्यूला कवटाळण्याची तयारी आहे आणि जो मानवजातीच्या सेवेसाठी आपला देह ठेवायला तयार आहे त्यालाच विशुद्ध प्रेम आचरता येईल. त्यालाच पूर्ण अपरिग्रह साध्य होईल. परंतु हे केवळ विचारांच्या पातळीवरच शक्य आहे. प्रत्यक्ष जीवनात आपल्याला कधीच विशुद्ध प्रेम करता येत नाही. कारण 'शरीर' ही आपली 'मालमत्ता' आपणाबरोबर (जिवंत असेपर्यंत) असणारच. त्यामुळे मनुष्य नेहमीच अपूर्ण राहणार. पण त्याने नेहमी पूर्णत्वाकडे जाण्याचा आपल्याकडून प्रयत्न केला पाहिजे. आपण जिवंत आहोत तोपर्यंत पूर्णत्वाला गेलेले प्रेम किंवा अपरिग्रह या गोष्टी असाध्यच आहेत. पण त्या मिळविण्यासाठी आपण अविश्रांत धडपड ही केलीच पाहिजे.

आज ज्यांच्याजवळ संपत्ती आहे त्यांनी गरीब जनतेचे विश्वस्त होऊन संपत्ती धारण करावी असे मी म्हणतो. तुम्ही म्हणाल की विश्वस्तवृत्ती हा एक केवळ कायदे-शीर चकवा आहे. पण लोक या कल्पनेचे सतत चिंतन करतील व त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न करतील तर आपले ऐहिक जीवन आजच्यापेक्षा कितीतरी जास्त प्रेममय होईल. परिपूर्ण विश्वस्तवृत्ती ही गोष्ट युक्लिडच्या बिंदूप्रमाणे केवळ अमूर्तच आहे, अनाचरणीयच आहे. पण आपण जर तिचा ध्यास घेतला तर या भूतलावर समतेचे राज्य निर्माण करण्यात इतर कोणत्याही मार्गापेक्षा तिच्याद्वारे आपण जास्त प्रगती करू.

प्रश्न : आपण म्हणता की खाजगी मालकी आणि अहिंसा एकत्र नांदणे शक्य नाही, तर आपण खाजगी मालकी का चालवून घेता ?

उत्तर : आपण मिळविलेल्या धनाचा विनियोग एरवी स्वेच्छेने मानवी हितासाठी करायला तयार होणार नाहीत अशांना दिलेली ती एक सवलत आहे.

प्रश्न : तर मग खाजगी मालकीऐवजी सरकारी मालकी प्रस्थापित करून हिंसेचे प्रमाण कमीत कमी का करू नये ?

उत्तर : सरकारी मालकी खाजगी मालकीपेक्षा बरी हे खरे. मात्र हिंसेच्या भूमिके-वरून तीही आक्षेपार्हच ठरते. माझी अशी पक्की खात्री आहे की शासन हिंसेने भांडवल-शाही नष्ट करील तर हिंसेच्या फेऱ्यात सापडेल. अहिंसेचा अंगिकार करण्याच्या दृष्टीने अशी राज्यसत्ता कधीच प्रगती करू शकणार नाही. राज्यसत्ता म्हणजे अत्यंत केंद्रीभूत आणि सुसंघटित स्वरूपाची हिंसाच. व्यक्तीला आत्मा असतो पण शासनसंस्थेला आत्मा

नसतो. म्हणून जी राज्यसत्ता हिंसेच्या आधारावर अस्तित्वात येते तिला हिंसेपासून परावृत्त करणे कधीच शक्य होत नाही. म्हणूनच मी विश्वस्तवृत्तीचे तत्त्व अधिक पसंत करतो.

प्रश्न : आपण एक विशिष्ट उदाहरण घेऊ. समजा, एखाद्या कलावंताने आपल्यामागे आपल्या मुलाजवळ काही चित्रे ठेवली. या चित्रांचे राष्ट्रीय मूल्य त्या मुलाला कळत नाही. तो ती विकतो किंवा त्यांची अन्य मार्गांनी नासाडी करतो. स्वाभाविकच एका व्यक्तीच्या मूर्खपणामुळे राष्ट्राची मोठीच हानी होण्याची वेळ येणार. हा मुलगा आपणास अभिप्रेत असलेल्या अर्थाने त्या चित्रांचा ' विश्वस्त ' बनणे शक्य नाही ही खात्री पटल्यावर हिंसेचा कमीत कमी वापर करून सरकारने ती चित्रे ताब्यात घेणेच न्याय्य ठरेल असे आपणास वाटत नाही का ?

उत्तर : होय. अशा वेळी सरकार ती चित्रे ताब्यात घेईल आणि हिंसेचा कमीत कमी वापर होणार असेल तर ती गोष्ट न्याय्यच ठरेल असे मला वाटते. मात्र सरकारशी मतभेद असणाऱ्यांच्या बाबतीत सरकार अतिरिक्त हिंसेचा उपयोग करील ही भीती कायमचीच आहे. संबंधित व्यक्ती जर खऱ्या अर्थाने विश्वस्त म्हणून वागतील तर मला जास्त आनंद होईल. पण जर ती माणसे कर्तव्यच्युत होतील तर सरकार-मार्फत त्यांची मालमत्ता काढून घ्यावी लागेल, असे मला वाटते. अर्थात त्या वेळीही कमीत कमी हिंसाचार व्हावा. माझी एकंदर मते अशी असल्यामुळेच मी गोलमेज परिषदेच्या वेळी सांगितले होते की अशा सर्व स्वार्थमूलक हितसंबंधांची नीट पहाणी करून आवश्यक तेथे जप्तीचे हुकूम द्यावेत. जप्तीच्या मोबदल्यात नुकसानभरपाई द्यायची किंवा नाही हे सुद्धा त्या त्या मालमत्तेच्या स्वरूपावर व पूर्वपीठिकेवर अवलंबून ठेवावे.

वैयक्तिकरीत्या मात्र राज्यसत्तेच्या हातात अधिकार एकवटण्यापेक्षा विश्वस्त-वृत्तीचा प्रसार होणे मला आवडेल. कारण माझ्या मते खाजगी मालकीमुळे होणारी हिंसा सरकारच्या हिंसाचारापेक्षा कमी हानिकारक असते. अर्थात अनिवार्य असेल तर किमान सरकारी मालकीला मी पाठिंबा देईनही.

प्रश्न : तर मग असे म्हणता येईल का, की समाजवादी आणि आपण यांमधील मूलभूत फरक हाच की, आपल्या मताप्रमाणे मनुष्य केवळ सवयींपेक्षा आपल्या इच्छा-शक्तीने व स्वयंनिर्णयाने जास्त चालतो तर समाजवाद्यांच्या मते त्याचा आयुष्यक्रम इच्छा किंवा स्वयंनिर्णय यांपेक्षा त्याच्या सवयींवरच जास्त अवलंबून असतो ? आणि याच कारणामुळे आपण आत्मशुद्धीचा पाठपुरावा करता तर जीमध्ये दुसऱ्याची पिळवणूक करण्याची इच्छा पुरी करता येणेच शक्य नाही अशी व्यवस्था ते प्रस्थापित करू इच्छितात ?

उत्तर : प्रत्यक्षात मनुष्य संवयीनुसार प्रवाहपतित जीवन जगतो हे मी मान्य करतो. पण पुढे जाऊन मी असे म्हणेन की त्याने आपल्या इच्छाशक्तीने जगावे हे जास्त चांगले. पिळवणुकीचे प्रमाण अगदी किमान तेवढेच शिल्लक राहील इतकी आपली निग्रहशक्ती माणसे विकसित करू शकतात यावरही माझी श्रद्धा आहे. शासनसंस्थेच्या सत्तेमध्ये वाढ होणे हे मला फार भयकारक वाटते. कारण, पिळवणूक कमी करून एखादी राज्यसत्ता लोकांचे वरकरणी भले करीत असली तरी, माणसातले व्यक्ति-विशेषत्व खच्ची करून ती मानवजातीचे परमावधीचे नुकसान करून ठेवीत असते. या गोष्टीचे मला इतके भय वाटते, कारण माझ्या मते सर्व प्रकारच्या प्रगतीचे मूळ या व्यक्तिविशेषत्वातच आहे. 'विश्वस्त' झालेल्या व्यक्तींची किती तरी उदाहरणे दाखवता येतील. पण खऱ्या अर्थाने गरिबांसाठी राबत असलेली किंवा राबलेली एकही राज्यसत्ता दाखवता येणार नाही.

प्रश्न : पण आपण अधूनमधून ज्या विश्वस्तांची उदाहरणे देता ते इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा, व्यक्तिशः तुमच्या प्रभावामुळे विश्वस्त बनलेले आहेत असे नाही का ? आपल्यासारखे मानवतेचे शिक्षक वारंवार होत नाहीत. मानवी जीवनात बदल घडवून आणण्याचे काम आपल्यासारख्यांचा कधी कधी अवतार होण्यावर अवलंबून न ठेवता, एखाद्या संघटनेमार्फत आवश्यक परिवर्तन घडवून आणणे अधिक इष्ट होणार नाही काय ?

उत्तर : माझी गोष्ट बाजूला ठेवा. पण आपल्याला हे विसरता येणार नाही की मानवतेच्या सर्वच महान शिक्षकांच्या शिकवणुकीचा प्रभाव त्यांच्या प्रत्यक्ष आयुष्यापेक्षा किती तरी अधिक काळपर्यंत टिकलेला आहे. महंमद, बुद्ध, किंवा येशू यांसारख्या प्रत्येक द्रष्ट्याच्या शिकवणुकीतला काही भाग शाश्वत उपयोगाचा आहे तर त्यातील काही भाग तत्कालीन समाजाच्या गरजांना अनुलक्षून होता. त्यांच्या शिकवणुकीतील शाश्वत व अशाश्वत भाग आपण वेगळे करीत नाही म्हणूनच आजच्या धार्मिक वर्तनात इतके सारे विपर्यास निर्माण होतात. हे बाजूला ठेवू. पण या महात्म्यांचा प्रभाव ते मृत्यू पावल्यानंतरही टिकून राहिलेला आहे हे सर्वांना दिसू शकते. शिवाय माझा विरोध आहे तो दंडसत्तेवर आधारलेल्या संघटनांना. राज्यसत्ता ही अशी एक संस्था आहे. लोकाश्रयी, ऐच्छिक संघटना तर असल्या पाहिजेतच असे माझे मत आहे.

## प्रश्न ४

तर मग आपली आदर्श समाजव्यवस्था कशी असेल ?

ग्रंथालय

उत्तर ४

माझी अशी श्रद्धा आहे की या जगात जन्म घेणारा प्रत्येक माणूस जन्मतःच काही नैसर्गिक गुणसंपदा व कल घेऊन जन्मास येतो. तशाच प्रत्येक व्यक्तीच्या काही जन्मजात मर्यादा असतात. या मर्यादा ओलांडता येणे तिला शक्य नसते. या मर्यादांचे काळजी-पूर्वक निरीक्षण करून पूर्वी वर्णधर्म सांगितलेला होता. या नियमानुसार विशिष्ट कल असलेल्या विशिष्ट लोकांसाठी विशिष्ट कार्यक्षेत्रे प्रस्थापित केली जातात. त्यामुळे सर्व प्रकारची फालतू स्पर्धा नष्ट झाली. मर्यादा मान्य करीत असताना वर्णधर्माने उच्च-नीच हा भेद मुळीच मानलेला नव्हता. वर्णधर्मामुळे एकीकडे प्रत्येकाला आपल्या श्रमांची फळे उपभोगण्याची शाश्वती मिळाली, तर दुसरीकडे, कोणालाही आपल्या शेजाऱ्यावर स्पर्धेचे दडपण आणण्याची मुभा ठेवली नाही. या थोर वर्णधर्माची आज अधोगती व अप्रतिष्ठा झाली आहे. पण माझी अशी दृढ निष्ठा आहे की या महान नियमाचा अर्थ पूर्णपणे नीट समजावून घेऊन तो आचरणात आणला गेला म्हणजेच आदर्श समाजव्यवस्था निर्माण होईल.

**प्रश्न** : प्राचीन भारतामध्ये चार वर्णांतील लोकांच्या आर्थिक स्थितीत व सामाजिक दर्जात फार मोठी तफावत होती असे आपणास वाटत नाही काय ?

**उत्तर** : ऐतिहासिकदृष्ट्या ते खरे असेलही. पण एखाद्या नियमाचा दुरुपयोग झाला किंवा त्याची योग्य व पूर्ण समज दिसून आली नाही म्हणून तो नियमच दुर्लक्षण्यात येऊ नये. सतत व चिकाटीच्या प्रयत्नांनी आपल्याला मिळालेला वारसा अधिकात अधिक संपन्न बनविला पाहिजे. वर्णधर्म माणसाची कर्तव्ये ठरवतो. कर्तव्ये योग्य प्रकारे पूर्ण केली की अधिकार आपोआप प्राप्त होतात. कर्तव्यांकडे दुर्लक्ष करावयाचे आणि हक्क मात्र सांगावयाचे, नव्हे ते बळकवावयाचे अशी अलीकडे चाल पडली आहे.

**प्रश्न** : वर्णाश्रमव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करायला आपण इतके उत्सुक आहात तर ते साधण्याचा अगदी नजिकचा मार्ग म्हणून तुम्ही हिंसेचा अवलंब का करीत नाही ?

**उत्तर** : मला वाटते हा प्रश्न उद्‌भवतच नाही. कारण कर्तव्ये नेमून दिली आणि त्यांच्या आचरणावर भर दिला की हिंसेला मुळीच वाव राहत नाही.

**प्रश्न** : आपणास उमगणाऱ्या सत्याचे स्वरूप अंतिमतः सापेक्ष व सीमित असल्याने सत्याचा शोध आपण आपल्यापुरताच मर्यादित ठेवावा, आपले सत्य जगाच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करू नये हे इष्ट नाही का ?

**उत्तर** : आपण कितीही प्रयत्न केला तरी सत्याला असे कुंपण घालू शकत नाही. सूर्य जसा आपला प्रकाश लपवू शकत नाही त्याप्रमाणे प्रकट झालेल्या प्रत्येक सत्यात स्वतःच्या प्रसाराची बीजे असतातच.

□ □

प्रकरण ६ वे

# कलह व ते सोडविण्याची हिंदू संस्कृतीतील पद्धत*

## प्रस्तावना

भारताची लोकसंख्या प्रचंड असून ती सर्व मानववंशाच्या सुमारे एक षष्ठांश भरते. त्याचा इतिहास आजपासून सुमारे पाच हजार वर्षांपर्यंत मागे पोचतो. त्याच्या चतुःसीमांमध्ये नाना प्रकारचे लोक राहिलेले आहेत. त्यांच्या भिन्न व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती येथे नांदलेल्या आहेत. सामान्यतः या संस्कृतींनी एकमेकांना हुसकून लावण्याचा प्रयत्न केलेला नाही; थोड्याफार तडजोडीनंतर, आपल्यात फेरजुळवणी करून घेतल्यावर, शेजारी शेजारी नांदण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. या देशाच्या समाजरचनेतदेखील, निरनिराळ्या लोकांचे वेगळेपण पुसून टाकून त्या सर्वांमधून एकसाची लोक निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. उलट, काही स्थूल तत्त्वे समानत्वाने मान्य करण्यास लोक तयार असतील तर, भिन्न संस्कृती जगणाऱ्या लोकांना घेऊन एक 'महासंघराज्य' निर्माण करण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न मात्र या देशात सतत झालेला दिसतो. त्यामुळे भारतीय समाजाचे चित्र नेहमीच गोधडीसारखे दिसत आले. जगाच्या इतर भागांतील एकरस समाजांच्या तुलनेने भारतीय समाजातील विविध स्तर वा घटक अधिक ठळकपणे, रेखीवपणे वेगळे दिसून येतात.

ही ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडण्याचे कारण असे की भांडणे-संघर्ष सोडविण्याच्या–मिटविण्याच्या पारंपरिक पद्धती कोणत्या, मार्ग कोणते यासारख्या बाबतीतही आपल्याला सर्वच भारतीय समाजात एकच एक पारंपरिक पद्धत प्रचलित असल्याचे दिसून येत नाही. दुसऱ्यांना जिंकून घेण्यात वा समकालिनांकडून केवळ औपचारिक का होईना पण शरणागती कबूल करवून घेण्यात ज्यांना आनंद वाटत असे, असे योद्धे भारतात होऊन गेले आहेत. उलटपक्षी, वरकरणी अगदी परस्परविरुद्ध असलेले दोन्ही दृष्टिकोण

---

* 'युनेस्को'च्या सौजन्याने. कलकत्ता विद्यापीठाच्या 'जर्नल ऑफ डिपार्टमेंट ऑफ लेटर्स'वरून पुनर्मुद्रित.

स्वीकारण्याचीही परंपरा आढळते. ही परंपरा परस्परविरुद्ध दृष्टिकोणांमधील समान अंश शोधून काढण्याचा निर्धारपूर्वक प्रयत्न करते. एका नव्याच पातळीवरुन त्या दोन दृष्टिकोणांत समन्वय साधता यावा हे त्या प्रयत्नांमागील उद्दिष्ट असते. अशा परिस्थितीत एखादीच विशिष्ट परंपरा वा अमूक एक दृष्टिकोण हाच तेवढा भारतीय व बाकीच्या परंपरा वा दृष्टिकोण उपरे किंवा अपभ्रंश होत असे मानणे चुकीचे होईल. भिन्नभिन्न कालखंडांत वा भारतीय समाजातील वेगवेगळ्या थरांत वा भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांत वेगवेगळ्या परंपरा आढळतात, असे म्हणणे अधिक बरोबर ठरेल. असे असूनही काही दृष्टिकोण इतरांपेक्षा अधिक प्रमाण, श्रेष्ठ व चांगले मानले गेले होते असे म्हणता येते. असे सर्व प्रमाण, श्रेष्ठ दृष्टिकोण एकाच श्रद्धेतून निर्माण झालेले आहेत. ती अशी की, कोणत्याच माणसाला पूर्ण सत्यज्ञान होत नाही, सर्वच माणसांच्या दृष्टिकोणांत म्हणूनच तथ्यांश असतो, आणि वरकरणी परस्परविरोधी असणाऱ्या दृष्टिकोणांतील समान अविरोधी अंश शोधून काढण्याच्या प्रयत्नांतूनच सत्याचे अधिक परिपूर्ण आकलन होण्याचा संभव असतो.

## पंचायती किंवा स्थानिक विधिमंडळे

भारतावर पाश्चिमात्य सत्तांचे प्रभुत्व प्रस्थापित होईपर्यंतच्या काळात येथील आर्थिक जीवन साधारणतः प्रादेशिक स्वयंपूर्णतेच्या तत्त्वावरच रचलेले होते. वाहतूक सामान्यपणे पायी, जनावरांवरून किंवा त्यांनी ओढलेल्या गाड्यांतूनच होत असे. रस्ते कमीच होते. स्वाभाविकच राजे व राज्यकर्ते यांच्या राजकीय प्रभावाची पोच आजच्यापेक्षा खूपच अल्पदूर व क्षीण होती. याचा एक प्रत्यक्ष परिणाम असा की गावात जे काही तंटेबखेडे निर्माण होत त्यांचा निकाल गावातील वा पंचक्रोशीतील मंडळेच करीत असत.

हिंदुस्थानात या मंडळांना उद्देशून 'पंचायत' (अर्थात पाचांचे मंडळ) हा शब्द अतिशय सार्वत्रिक स्वरूपात वापरला जातो. या पंचायतींचे काही प्रकार आहेत. एखाद्या विशिष्ट भूप्रदेशात पसरलेल्या जातीचे मंडळ असू शकते किंवा एखाद्या खेडेगावचे, त्यातील सर्व जातींच्या सर्व माणसांसाठी, एखादे अस्थायी मंडळ गावकरी निवडू शकतात. गावातील भिन्नभिन्न जातींना त्या मंडळात प्रतिनिधित्व दिले जाते. हे मंडळ गावातील सर्व लोकांना रस असलेल्या बाबींचा, तंट्यांचा विचार करते. काही जातींचे स्वरूप औद्योगिक वा व्यावसायिक संघांसारखे असल्याने अशा जातींच्या पंचायती त्यांच्या जातीच्या व्यवसायाशी निगडित विशिष्ट आर्थिक प्रश्नांचा किंवा लग्नासारख्या कौटुंबिक समस्यांचा किंवा इतर जातींशी येणाऱ्या संबंधातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्यांचा विचार करू शकतात.

या पंचायती त्यांच्यापुढे आलेले वाद कसे सोडवीत असत व न्यायदानाची त्यांची काय रीत होती हे पाहण्यापूर्वी या पंचायती व शासन किंवा राजा यांचे तेव्हा काय संबंध होते हे लक्षपूर्वक पाहणे जरूरीचे आहे.

राजा अर्थातच राज्याचा सर्वश्रेष्ठ अधिकारी असे. पण प्राचीन भारताच्या इतिहासावरून असे दिसते की कायदे करण्याचा अधिकार त्याला नव्हता. कायदे एक तर वर उल्लेख केलेले जातवार व्यावसायिक संघच करीत; किंवा ते वेदादी पवित्र ग्रंथां-वरून घेतले जात. त्यांचे अर्थ लावण्याचे काम वेळोवेळी विद्वान ब्राह्मण करीत असत. 'गौतम संहिता' या प्राचीन कायदेविषयक ग्रंथात पुढील नियम सांगितले आहेत :

'१९. वेद, अंगे, स्मृती व पुराणे यांना धरूनच तो (राजा) न्यायदान करील.

'२०. वरील ग्रंथांना विरोधी असणार नाहीत अशा प्रादेशिक जातीय कौटुंबिक नियमांनाही (कायद्याचे) प्रामाण्य आहे.

'२१. शेतकरी, व्यापारी, गुराखी, सावकार आणि कारागीर यांना आपापल्या वर्गापुरते कायदे करण्याचा अधिकार आहे.

'२२. संबंधित जातीतील अधिकारी व्यक्तीकडून सर्व परिस्थिती जाणून घेऊन तो (राजा) आपला कायदेशीर निवाडा करील.

'२३. तर्कशुद्ध विवेचन हे सत्याप्रत जाण्याचे साधन आहे.

'२४. या मार्गाने निर्णयाप्रत येऊन तो योग्य निकाल देईल.

'२५. जर पुरावा विवाद्य असेल तर तो वेदविद्या-पारंगत असलेल्या ब्राह्मणांकडून सत्य जाणून घेईल व त्यानुसार न्याय देईल.'[1]

इतिहासकार रमेशचंद्र मजुमदार यांनी व्यावसायिक संघ व राजा यांच्या परस्पर-संबंधांचा खूप तपशिलात जाऊन अभ्यास केला आहे. त्यावरून त्यांनी काढलेला निर्णय असा :

'... या व्यावसायिक संघांना न्यायसभेत संघ म्हणून रीतसर मान्यता होती हे स्पष्ट दिसून येते. एखाद्या बागेच्या किंवा शेताच्या किंवा तत्सम इतर बाबींच्या मालकीचा प्रश्न असेल तेव्हा निवडक सभासद संघाचे प्रतिनिधित्व करीत.

'कार्यकारी अधिकारी व्यावसायिक संघाच्या वतीने कर्जाचे व्यवहार करू शकत असे;

'संघातून कोणालाही आपले सभासदत्व स्वेच्छया रद्द करून घेता येत असे.

'कार्यकारी अधिकाऱ्यांपैकी जो कोणी अतिनिंद्य गुन्हा करील, संघात बेदिली निर्माण करील किंवा संघाच्या मालमत्तेचा नाश करील त्याला काढून टाकता येत असे. अशा प्रकारची हकालपट्टी केल्याचे राजाला फक्त कळवावे लागत असे, त्याला त्याची मान्यता घ्यावी लागत नव्हती. मात्र या अधिकाऱ्यांच्या हातात खूपच सत्ता असल्याने

त्यांना काढून टाकणे– विशेषतः या अधिकाऱ्यांनी संघाचा निर्णय धाब्यावर बसविण्याचे धोरण स्वीकारले तर– नेहमीच सोपे जात असेल असे नाही. अशा वेळी ते प्रकरण राजापुढेच न्यावे लागत असे. राजा दोन्ही बाजू ऐकून घेऊन त्या त्या संघाचे विशिष्ट नियम असतील त्यांस अनुसरून निर्णय देत असे. व आपल्या अधिसत्तेचा वापर करून त्याची अंमलबजावणीही करीत असे.' २

अशा रीतीने ग्रामपंचायती किंवा जातपंचायती राजाच्या सर्वोच्च सत्तेखालील, पण स्वायत्त संस्था होत्या.

## प्रत्यक्ष न्यायदान

आता आपण या पंचायतीपुढे येणाऱ्या निरनिराळ्या तंट्यांचे स्वरूप पाहू. तसेच अशावेळी पंचायती कसा निर्णय घेत व निर्णयाची अंमलबजावणी त्या कशी करीत हेही पाहू.

प्रा. टी. डब्ल्यू. ऱ्हीस डेव्हिड्स आपल्या 'बुद्धिस्ट इंडिया' या पुस्तकात म्हणतात, 'व्यावसायिक संघांना आपल्या सभासदांच्या गृहकलहात लवादाने निर्णय देण्याचा अधिकार होता, असे म्हटले जाते. दोन व्यावसायिक संघांमधील तंटे 'महासेठि'च्या कक्षेत येत असत. हा महासेठी म्हणजे राज्याचा महाकोषाधिकारी असे. तो वेगवेगळ्या संघांच्या अधिकाऱ्यांवरील प्रमुख अधिकारी म्हणून भूमिका पार पाडत असे.' ३ राज्यकारभार कसा चालवावा या विषयावरील कौटिल्याच्या वचनांचे भाषांतर श्री. आर. रामशास्त्रींनी केले आहे. त्या भाषांतरात यापेक्षा अधिक सविस्तर व निःसंदिग्ध विवरण आढळते. कौटिल्याचा ग्रंथ साधारणतः इसवी सनापूर्वी तीनशे वर्षांच्या काळातील आहे. त्यात दोन गावांतील सीमेच्या वादासंबंधी पुढील नियम दिला आहे : 'शेजारील ५–१० गावांतील प्रतिष्ठित माणसांनी जमून याबाबत शोध करावा. पुराव्याची छाननी करावी. हा पुरावा म्हणजे सीमारेषा दर्शविणाऱ्या नैसर्गिक किंवा कृत्रिम खुणा होत... शेतासंबंधीचा वाद आसपासच्या किंवा गावातीलच वृद्ध व प्रतिष्ठित व्यक्तींनी सोडवावा. त्यांचे एकमत झाले नाही तर विशुद्ध चारित्र्याच्या मान्यवर व्यक्तींकडून निवाडा करून घेतला जावा किंवा विवाद्य जागा उभय पक्षांनी सारखी वाटून घ्यावी. परंतु या सर्व मार्गांनी तंटा सोडविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले तर विवाद्य जमीन राजाने स्वतःच्या ताब्यात घ्यावी.' ४

प्रा सुरेंद्रनाथ सेन यांनी १८ व्या शतकात भारताच्या बऱ्याच मोठ्या भू-भागावर राज्य असलेल्या मराठा राज्यकर्त्यांच्या शासनपद्धतीचा विशेष अभ्यास केला आहे. त्यांचा निष्कर्ष असा की, 'मराठा राज्यकर्त्यांची भूमिका आधुनिक न्यायाधिशाची

असण्यापेक्षा एकत्र कुटुंबातील जुन्या वळणाच्या वडिलधाऱ्यासारखी असे. दिवाणी कज्जांमध्ये कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी नसे; काटेकोर कायदेशीरपणा हे त्यांचे ब्रीद नव्हतेच. सन्मान्य तडजोड करण्यास नेहमीच उत्तेजन देण्यात येई. तसेच प्रत्येकाला आपली बाजू मांडण्याकरता जास्तीत जास्त संधी व मदत उपलब्ध करून दिली जात असे. कित्येक वेळा भावी काळात दोन विरुद्ध पक्षांत चांगले संबंध राहावेत म्हणून ' पराभूत ' पक्षाला शिक्षेच्या बाबतीत सौम्य वागणूक दिली जाई. उदा. मालोजी शहाजी भांगा व हिरोजी नरसोजी भांगा यांत जमिनीच्या एका तुकड्यावरून झगडा निर्माण झाला होता. या खटल्यात हिरोजीला आपला हक्क शाबीत करता आला नाही. तरीही पंचांनी मालोजीला असा आदेश दिला की त्याने हिरोजीला घर बांधण्यापुरेशी जागा व तीस बिघे जमीन द्यावी.

' सुमारे तीस हात लांब व तीस हात रुंद अशी जागा वरील गावाच्या वस्तीत (घर बांधण्यासाठी) आणि तीस बिघे जमिनीचे—उत्तम, मध्यम व कनिष्ठ प्रतीची मिळून—पाटिलकीचे अधिकार जात-सभेने हिरोजी नरसोजी भांगा यास दिले.'[५]

अशा प्रकारचा माणुसकीचा विचार शिक्षेच्या संबंधातही केला जात असे. खोटा आळ घेतल्याच्या गुन्ह्याबद्दल होणाऱ्या शिक्षेविषयी प्रा. सेन पुढीलप्रमाणे लिहितात : ' ... तिसऱ्या उदाहरणात सोयराजी राहणार किल्ले नारायणगड याला ५० रु. दंड करण्यात आला. त्याने रखमाजीची मुलगी मैनी हिच्यावर परीट शिवाजीबरोबर व्यभिचार केल्याचा ( खोटा ) आरोप केला होता. या खटल्यात मैनीने आपले निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी पंचांसमोर एक दिव्य ( उकळत्या तेलाच्या कढईतून एक धातूचा तुकडा बाहेर काढणे ) करून दाखविले होते. ही गोष्ट मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहे. खोटा आरोप करण्याच्या अशा गुन्ह्यांना साधारण ४० ते ७५ रु. पर्यंत दंड होत असे. खटल्यातील बहुतेक अपराधी साधारण गरीबच असावेत. कारण त्याच पेशव्यांच्या कारकीर्दीत पुढे फक्त दहा वर्षांनंतर आपल्याला असे दिसते की पंतप्रतिनिधींचे बंधू हनुमंत भट यांना एका खटल्यात खोटी साक्ष दिल्याबद्दल एक हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. यावरून साधारणतः गुन्हेगाराच्या उत्पन्नाच्या प्रमाणात दंड करण्याचे धोरण असल्याचे स्पष्ट होते. रामा न्हाव्याला ज्या शिक्षेने वचक बसेल त्या शिक्षेने प्रतिनिधींच्या भावाला जरब बसणार नव्हती.'[६]

मात्र कालमानानुसार पंचायतींची परंपरा काही अंशी बदलली असणे शक्य आहे. अलीकडच्या काळात ग्रामीण भागात तिचे कार्य कसे चालत असे याची सविस्तर माहिती भारत सरकारने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या निरनिराळ्या खानेसुमारीच्या अहवालांवरून मिळते. हिंदुस्थानच्या पूर्व भागातील प्रांतांच्या संबंधात असा एक सविस्तर अहवाल ' दि सेन्सस ऑफ इंडिया, १९११ ( खंड ५, भाग–१ ) ' यात आला आहे. त्याची व

इतर कागदपत्रांची पहाणी केल्यावर असे दिसून येते की अलीकडच्या काळात पंचायती गुन्हेगारांना शिक्षा करण्याच्या बाबतीत अधिक निष्ठुर झाल्या होऱ्या. सामुदायिक निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रेम किंवा आदर या भावनांवर अवलंबून राहण्या-ऐवजी गुन्हेगाराच्या ठिकाणी भय निर्माण करण्याकडे त्यांचा जास्त कल दिसतो.

अर्थात वरील अहवालासाठी वृत्तांत पाठविणाऱ्यांनी सदोष वृत्तांत पाठविला असणेही शक्य आहे. कदाचित असेही असेल की परकीय सत्तेखाली आल्याने या पंचायतीचे काही अधिकार हिरावले गेले व त्यामुळेच सामाजिक नीतिनियमांच्या अंमलबजावणीच्या बाबतीत त्या अधिकच कठोर व असहिष्णू झाल्या असतील. योग्य परिस्थितीत अलौकिकपणे दैवी शक्ती सत्याची बाजू उचलून धरतात. या श्रद्धेमधून सत्य निश्चित करण्याची बरीचशी मार्गदर्शक सूत्रे निघालेली आहेत असेही आढळून येते.

असो. या संदर्भात काही समकालीन अहवालांतून यासंबंधी काय म्हटले गेले त्याचा परामर्श घेणे उपयुक्त ठरेल.

' ओरिसातील संस्थानांचे जहागिरदार अजूनही प्राचीन हिन्दू राजांचे अधिकार उपभोगीत आहेत. जातीशी संबंधित असणारे सर्व प्रश्न त्या जातीची पंचायतच सोडविते. या पंचायतीचा एक अधिकृत असा अध्यक्ष असतो. त्याला "बेहेरा" म्हणतात. जवळपास सर्वच संस्थानांमध्ये याची नेमणूक जहागिरदार स्वतःच्या अधिकारात व स्वतःच्या मर्जीप्रमाणे करतात. काही थोड्या ठिकाणी बेहेराची नेमणूक करण्यापूर्वी त्या जातीतील प्रमुख प्रतिष्ठित मंडळींची सल्लामसलत घेतली जाते, तर आणखी काही तुरळक ठिकाणी बेहेराची निवडणूक त्या जातीवरच सोपविलेली आहे. जातीच्या पंचाय-तीच्या मदतीने त्या जातीच्या संबंधात उपस्थित होणारे सर्व प्रश्न बेहेरा सोडवतात. जर जाति-मंडळाला समोर आलेल्या प्रश्नाचा निर्णय करता आला नाही तर तो प्रश्न जहागिर-दारापुढे ठेवला जातो. त्याने दिलेला निर्णय सर्वस्वी अंतिम असतो. पंचायतीने दिलेल्या निर्णयाविरुद्धही जहागिरदाराकडे दाद मागता येते. याही बाबतीत त्याचा निर्णय अंतिम व बंधनकारक असतो. अशा खटल्याचा निर्णय जहागिरदार स्वतःच करतो किंवा काही निवडक ब्राह्मण व मान्यवर व्यक्तींपुढे ते प्रकरण ठेवतो. ही सर्व मंडळी राजधानीच्या ठिकाणी असलेल्या प्रमुख देवळात बसून अशा प्रकरणी निवाडा करतात. या लवादांचा निवाडा मग जहागिरदारापुढे ठेवण्यात येतो. जहागिरदार योग्य वाटल्यास निवाडा जशाचा तसा स्वीकारतो किंवा त्यात फेरफार करतो किंवा तो फिरवतो. जातविषयक प्रकरणी राजाची आज्ञा न मानण्याच्या गुन्ह्याला वाळीत टाकण्याची शिक्षा होते.

' ओरिसातीलच एका संस्थानात एक अत्यंत सुसंघटित आणि वजनदार अशी जात आहे. थोड्याच दिवसांपूर्वी या जातीपुढे एक अत्यंत गंभीर पेच उपस्थित झालेला होता. या जातीतील एका तरुणावर एका अगदी हलक्या जातीच्या बाईबरोबर शरीर-

संबंध ठेवल्याचा आरोप होता. या आरोपाला चांगलीच प्रसिद्धी मिळाली. त्या जातीतील मंडळी चांगलीच हादरून गेली, गोंधळात पडली. अब्रूनुकसानीचा फौजदारी खटला केला गेला. पण तो फसला. शेवटी हे प्रकरण जातपंचायतीसमोर आणले गेले. ही जात अत्यंत धनाढ्य आहे. जातपंचायतीच्या सभासदांवर दडपण आणले गेले. पंचायतीच्या सभासदांत दोन तट पडले. दोन्ही गटांना जातीतील निरनिराळ्या वजनदार व्यक्तींचा पाठिंबा होता. एका पक्षाचे असे मत होते की, आरोप खरा असून अपराध्याला जातीतून बाहेर टाकावे. नंतर हा प्रश्न संस्थानच्या राजाकडे नेऊन त्याचा निवाडा मागण्यात आला. राजाने मोठी सभा बोलावली. संस्थानातील प्रमुख देवळात आरोपाची सुनावणी झाली. आरोप नाशाबित असून तो तरुण निर्दोषी आहे असा सभेत निवाडा झाला. राजाने हा निर्णय उचलून धरला. पण हे प्रकरण तिथेच संपले नाही. या प्रकरणावर सबंध जात दुभंगली होती व सरळ सरळ दोन प्रतिस्पर्धी पक्ष निर्माण झाले होते. आरोपीला शासन झालेच पाहिजे असे म्हणणाऱ्या गटात जातीतले त्यातल्या त्यात जास्त प्रतिष्ठित लोक होते. त्यांनी राजाचा निर्णय अव्हेरण्याचे ठरवून, आरोपीला जातीतून बाहेर काढून टाकण्याचा निर्णय घेतला. तेव्हा त्या राजाने या सर्व बंडखोर गटालाच जातीतून बाहेर काढून टाकले. त्यामुळे या गटातील कोणालाच न्हावी, धोबी, उपाध्याय इत्यादींची सेवा मिळेनाशी झाली. ही आज्ञा इतकी बंधनकारक व म्हणूनच परिणामकारक होती की त्या दिवसापर्यंत त्यांची कामे करणाऱ्या त्या संस्थानातील न्हावी, धोबी, भंगी लोकांनी तर त्यांची सेवा करण्याचे नाकारलेच पण त्या संस्थानाच्या बाहेर राहणाऱ्या व्यावसायिकांकडूनही त्यांना सेवा मिळू शकली नाही. काही काळपर्यंत ही आज्ञा अगदी कडकपणे अमलात होती. या समाजातील लोक वास्तविक स्वच्छ, गुळ-गुळीत दाढी केलेले, उत्तम केस राखलेले व सुंदर पोषाख घालणारे असतात. कालांतराने वरील वाद जेव्हा मिटला तेव्हा वरील आज्ञा लागू असलेल्या लोकांच्या दाढ्या-डोईवरचे केस वाढून त्यांत भयंकर घाण भरली होती, व कपडे किती मळलेले होते त्याचे तर वर्णन करता येणार नाही.' ७

'बिहारमध्ये ब्राह्मण, भूमिहार ब्राह्मण, रजपुत आणि कायस्थ यांसारख्या वरच्या जातींत जातनियम मोडणाऱ्यांचा पत्ता लावून त्यांना शिक्षा देण्यासाठी वेगळी अशी कोणतीच संस्था नाही. या जातीमध्ये नियंत्रक मंडळ ही संस्था अस्तित्वात नाही. त्यामुळे जे काय करावयाचे असेल ते लोकांनी आपण होऊन करावे लागते. गुन्हा जर निर्विवाद असेल तर लोक एकदमच त्या अपराध्याशी सर्व व्यवहार बंद करतात. जर संशयाला जागा असेल तर त्या जातीतील प्रतिष्ठित व वजनदार माणसांची अनौपचारिक सभा भरते. सभेत त्या गुन्ह्याची दखल कशाप्रकारे घ्यावयाची ते ठरते. आपल्याला लागलेला कलंक धुवून काढण्याचे काम सर्वस्वी त्या संशयितालाच करावे लागते. त्यासाठी

तो प्रथम पंडितांचा सल्ला घेतो. त्याचे पाप जर नष्ट होण्यासारखे असेल तर पंडित त्या प्रकरणाचा निवाडा देतो. काय प्रायश्चित्त घ्यावयाचे व शुद्धीकरणासाठी कोणते विधी करावे लागतील ते तो सांगतो. सर्वसाधारण जी प्रायश्चित्ते घ्यावी लागतात त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो : ( १ ) ठराविक काळापर्यंत तीर्थयात्रा करणे, ( २ ) गंगेत स्नान करून तिची वाळू खाणे, ( ३ ) ठराविक काळापर्यंत भिक्षा मागून उपजीविका करणे, ( ४ ) ठराविक काळापर्यंत मौन पाळणे, ( ५ ) दिवसात एकदाच जेवणे, ( ६ ) पंचगव्याचे प्राशन करणे, आणि ( ७ ) उपास करणे. पापक्षालनार्थ करावयाच्या विधींमध्ये ( १ ) बळी देणे, ( २ ) देवांची, मुख्यतः सत्यनारायणाची पूजा करणे, ( ३ ) कुटुंबाच्या उपाध्यायांना गाय, धन, वस्त्रे, इ. चे दान करणे, ( ४ ) ब्राह्मणभोजन घालणे व त्यांना दक्षिणा व वस्त्रे देणे, आणि ( ५ ) जातीबांधवांना मेजवानी देणे, यांचा अंतर्भाव होतो.

'जातीचे नियम मोडणाऱ्यांची दखल घेणारी कोणतीही नियमित यंत्रणा नाही अशा इतर जातींत, प्रश्न उद्भवेल तेव्हा सभा घेतली जाते. अपराध झाल्याचे ज्याला माहीत असते तो ही गोष्ट इतरांना सांगतो. मग सर्वजण बसून या प्रश्नावर खल करतात व या गुन्ह्यासंबंधी काय करायचे ते ठरवतात. त्यासाठी कधी स्वतंत्र सभा बोलावली जाईल किंवा कधी एखाद्या समारंभात किंवा उत्सवप्रसंगी सर्व मंडळी जमली की तेथे तो प्रश्न उपस्थित केला जाईल. कधी कधी संशयित व्यक्ती स्वतःच आपली बाजू मोठ्या लोकांपुढे मांडून आपले निरपराधित्व सिद्ध करून घेते व जातीतील स्वतःची प्रतिष्ठा पुन्हा परत मिळविते. ज्या जातींमध्ये जातीशी संबंधित प्रश्नांचा किंवा नियमांचा भंग करणाऱ्यांना शिक्षा देण्याचा विचार करण्यासाठी अधिकाऱ्यांचे एक स्थायी मंडळ असते त्या जातींच्या मानाने वरील जातींत व्यक्तीवरील जातीबंधनाची पकड स्वाभाविकपणेच क्षीण असते.' ८

'बिहार प्रांतातील चंपारण्यामधील नाट लोकांमध्ये जमातीच्या भांडणांच्या संदर्भात, ते मुसलमान असूनही, जहागिरदाराची ( टोळीच्या मुखियाची ) सत्ता किंचितही कमी नाही. यांच्या पंचायतीत वंशपरंपरेने चालत आलेला टोळीचा मुखिया किंवा प्रधान व त्यानेच स्वतःच्या मर्जीनुसार नेमलेले इतर सभासद ( साधारणपणे दोन किंवा तीन ) असतात. स्वाभाविकपणेच मुखिया आपल्या गावातूनच इतर सभासदांची नेमणूक करतो. त्याच्या स्वतःच्या गावात त्याची सत्ता अगदी निरंकुश असतेच. पण त्याचा अधिकार गाव आणि पंचक्रोशीपेक्षाही खूप लांबवर चालतो. त्याच्या अधिकारात चंपारण्यच फक्त आहे असे नव्हे; बिहारमधीलच सारण आणि मुजफ्फरपूर, इतकेच नव्हे तर संयुक्त प्रांताच्या पूर्वेकडील जिल्ह्यांचाही त्यात समावेश होतो. हा प्रधान आपला काळ आधिपत्याखालील प्रदेशात दौरे काढण्यात घालवतो. या सर्व प्रदेशातील लोक त्याला ओळखतात व भितातही.

'त्याच्यापुढे आणल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची व तंट्यांची – लहान सहान चोऱ्यांसारखे फौजदारी गुन्हे, जमिनीच्या मालकीसंबंधीचे तंटे, किंवा अन्य प्रकरणे, सर्वांचीच – दखल प्रधान घेतो. आरोपी आणि फिर्यादी दोघेही एक एक बारीक फांदी तोडून प्रधानाजवळ देतात. सर्व खटला संपेपर्यंत प्रधान त्या जवळ बाळगतो. त्यानंतर आरोपीला दिव्य करावे लागते. हे दिव्य अग्नी किंवा जल अशा दोन प्रकारचे असते. अग्निदिव्यात आरोपीच्या हातावर लोखंडाचा तापवून लाल झालेला तुकडा ठेवतात. त्याच्या हाताला किंचित संरक्षण मिळावे म्हणून की काय, क्वचित हातावर सात पिंपळाची पाने ठेवून त्यावर तो तुकडा ठेवतात. हा तुकडा आरोपीने दुसरा एक मनुष्य ठराविक अंतर ( सात यार्ड आणि परत ) पळून जाईपर्यंत हातावर ठेवला पाहिजे. त्याने तो तुकडा मध्येच खाली टाकला तर तो गुन्हेगार ठरतो. अर्थात पळणाऱ्या व्यक्तीची गती आणि सदिच्छा यावर बरेच अवलंबून राहते. अग्निदिव्याऐवजी जलदिव्य निवडता येते. यात आरोपीला त्याचे नाक बुडेल इतक्या पाण्यात उभे करतात. दुसरा एक माणूस ठराविक अंतर पळून जाईपर्यंत पाण्यातील मनुष्याने नाक बंद करून श्वास रोखून धरावा लागतो. श्वास रोखून धरण्यात तो यशस्वी झाला तर त्याला निर्दोष म्हणून सोडून देतात. शिवाय त्याने दिलेल्या काटकीच्या वजनाइतके सोने त्याला मिळते. प्रत्यक्षात ही रक्कम ३० ते ६० रु. च्या दरम्यान होते. त्याला पाण्यात दम राखता आला नाही तर ही रक्कम त्याने द्यावयाची असते. ही फक्त प्राथमिक चौकशी झाली. शिक्षा नंतरच मिळते. प्रथमतः दंड ठोठावण्यात येतो. सामान्य नाट माणसाचे उत्पन्न पहाता दंडाची रक्कम फारच मोठी असते. ही रक्कम अर्थातच प्रधानाच्या खिशात जाते. दंडाला विकल्प म्हणून शीत-स्नानाची शिक्षा देतात. गुन्हेगाराला एखाद्या नदीच्या किंवा तलावाच्या पाण्यात २ पासून २४ पर्यंत कितीही तास बसून राहावे लागते. एक दुर्दैवी मनुष्य अशी शिक्षा भोगण्या-साठी एका हिवाळ्यातील सकाळी २-३ तास पाण्यात बसला. त्यानंतर एका हिंदू जमीन-दाराला त्याची दया आली व त्याने त्याला पाण्यातून बाहेर काढले. परंतु ही गोष्ट जातीला कळताच त्या नाटाला पाच वर्षे जातीतून बाहेर टाकण्याची कडक शिक्षा देण्यात आली. इतरही शिक्षांचे स्वरूप किती कडक असते हे पुढे दिलेल्या उदाहरणांवरून स्पष्ट होईल. एका माणसाने दुसऱ्याच्या शेतावर अतिक्रमण केले; त्याला २०० रु. दंडाची शिक्षा झाली. दुसऱ्या एका प्रकरणात एका मुलीशी बेकायदा शरीरसंबंध ठेवल्याबद्दल एका नाटाला १०० रु. दंड झाला. तिसऱ्या प्रकरणात एका नाटाने एक शेत स्वतःचेच समजून त्यातील काही मका काढून घेतला होता; त्याच्यावर चोरीचा आरोप सिद्ध होऊन त्याला तीन तास शीतस्नानाची शिक्षा दिली गेली. परंतु ती त्याला सहन होईना म्हणून त्याला २०० रु. दंड झाला. झालेला दंड किंवा शिक्षा नाकारण्याचा उद्धटपणा केल्यास दोन किंवा अधिक वर्षे वाळीत टाकण्याची शिक्षा दिली जाते. अशावेळी साधारणतः

५ वर्षे वाळीत टाकले जाते. प्रधानाची सत्ता इतकी निरपवाद आणि सर्वंकष असते आणि त्याच्याबद्दल इतका खोल आदर आढळतो की त्याच्या निर्णयाच्या न्याय्यतेविषयी कोणीच शंका घेत नाही. त्याने दिलेल्या शिक्षा नेहमी काटेकोरपणे पाळल्या जातात.'[९]

अशा रीतीने, ही मंडळे, मग ती एखाद्या जातीची असोत किंवा विशिष्ट भू-प्रदेशाची असोत, भारतातील ग्रामीण भागात शासनव्यवस्थेचे काम यशस्वीपणे करीत आली हे आपल्या लक्षात येईल. रूढ चालीरीतींचा मान राखणे किंवा सारासार विवेक वापरून न्याय्य काय, योग्य काय ते ठरविणे ही मंडळांच्या कामकाजाची दोन सूत्रे दिसतात. दोन्ही पक्ष पंचायतीने किंवा प्रमुखाने दिलेला निर्णय बिनतक्रार मानताना दिसतात. पंचायतीबद्दल असलेला आदर हे त्याचे स्पष्टीकरण असावे; तसेच, निर्णय न मानल्यास मिळणाऱ्या कडक व निष्ठुर शिक्षेची भीती हेही त्याचे एक स्पष्टीकरण असणारच.

पश्चिम भारतातील स्थानिक न्यायपद्धतीचे आपले विवरण संपविताना प्रा. सेन म्हणतात, 'या पंचायतींना लोक साधारणपणे पंच-परमेश्वर* असे म्हणतात. शिवाय कित्येक कागदपत्रांतील मायन्यावरून उभय पक्ष पंचांना पित्यासमान लेखीत असत हे स्पष्ट होते. पाचामुखी परमेश्वर बोलतो हा विश्वास ज्या अर्थी महाराष्ट्रातील लोकांत आढळतो त्या अर्थी पंचांचा निर्णय न्याय्य व योग्य असतो असा सामान्य प्रत्यय असणार.'[१०]

भारतातील ग्रामीण जनता या पद्धतीने आपले अंतर्गत व स्थानिक तंटे समाधानकारकरीत्या सोडविण्याचा प्रयत्न करी. भारतीय जनतेचा कल, एकंदरीत, शांततेने राहण्याकडे होता हेही यावरून दिसून येते. अर्थात सर्वच वाद संबंधित पक्षांचे समाधान होईल इतक्या यशस्वीपणे सोडविले जात असतील असे मानण्याचे कारण नाही. अगदी खिस्तपूर्व काळापासून विधिसंहिता बनविल्या गेल्याचे आढळते; न्यायदानाचे कामकाज कसे चालावे याविषयी सूचना व आदेश दिलेले आढळतात. म्हणजेच, लोकांचा भांडखोरपणा कधीच शमला नाही व राज्यकर्त्यांचे तद्विषयक कार्यही कधी थांबले नाही.

प्राचीन भारतातील राजांचा विचार करता ते जगाच्या इतर भागांतील त्यांच्यासारख्या इतर राजांपेक्षा अधिक शांतताप्रिय होते असे वाटत नाही. 'जितकी राजाची

---

* पंच म्हणजे पाच व पंच-परमेश्वर म्हणजे 'पाच लोकांचे मंडळ म्हणजेच जणू परमेश्वर.' पाच या आकड्याला भारतात एक वेगळाच प्रतीकात्मक अर्थ व महत्त्व आहे. विश्वाची निर्मिती पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचतत्त्वांपासून झाली आहे. ज्ञानप्राप्तीसाठी माणसाला पंचेंद्रिये आहेत. ज्या हाताने आपण कर्म करतो तो पाच बोटांचा बनलेला आहे. ..... पाच आकडा एकप्रकारचे पूर्णत्व दाखवितो.

मालमत्ता, प्रदेश, व सामर्थ्य अधिक तितका तो राजा मोठा' या भूमिकेवरच राजांच्या मार्गदर्शनासाठी घालून दिलेली तत्त्वे आधारलेली आहेत. ही भूमिका शांततेला पोषक नाही तर, स्वतःच्या फायद्याचे वाटेल तेव्हा, युद्धासच उत्तेजन देणारी आहे हे वाचकांच्या सहज लक्षात आले असेल. कौटिल्याने राजकारणावरील आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात पुढील नियम सांगितला आहे: 'नवनवे किल्ले बांधता येतील, मोठ्या इमारती उभारता येतील, व्यापार-वाहतुकीसाठी रस्ते बांधता येतील, नव्या लागवडी करून गावे वसवता येतील, भूमीतून खनिजे काढता येतील, हत्तींच्या सहाय्याने अरण्यातून इमारती लाकूड मिळवता येईल, आणि असे करीत असताना आपल्या शत्रूच्या याच प्रकारच्या कार्यात अडथळेही निर्माण करता येतील... असे धोरण चालविणारा राजा चाणाक्ष म्हणावा.'[११] 'युद्ध करणे आणि शांतता राखणे या दोन्ही धोरणांपासून होणारे फायदे समान तोलाचे असतील तेव्हा शांतताच पसंत करावी. कारण सामर्थ्यहानी, संपत्तीचा नाश, राजधानी सोडून वनवास, पापात वृद्धी या गोष्टी व हे तोटे युद्धाबरोबर येतातच.'[१२] पण कौटिल्य पुढील इशाराही देऊन ठेवतो : 'फक्त वरिष्ठ किंवा बरोबरीच्या राजांशीच शांतता-तह करावे; कनिष्ठ राजांवर आक्रमणच करावे. जो आपल्यापेक्षा बलिष्ठ राजाशी युद्ध पुकारील त्याची स्थिती हत्तीच्या पायी दिलेल्या शिपायासारखी होईल. आणि कच्च्या मडक्यावर दुसरे मडके आपटल्यास जसा दोन्ही भांड्यांचा नाश होतो त्याचप्रमाणे दोन बरोबरीच्या राजांचे युद्ध दोघांच्याही नाशास कारणीभूत होते.'[१३]

थोडक्यात, जगातील इतर भागांप्रमाणेच, भारतातही व्यक्तींची भांडणे आणि राजांमधील संघर्ष हा नेहमीचाच अनुभव होता; ऐतिहासिक परंपरेचा तो एक भागच होता. आपापले उद्योग शांतपणे करीत रहावे अशी भारतातील सामान्य ग्रामीण जनतेची इच्छा असूनही वरील परिस्थिती होती.

## एक वेगळी परंपरा

परंतु जगात सर्वत्र आढळणारे श्रमिकांचे शांतताप्रेम किंवा राजे लोकांच्यात असलेले पराक्रमाचे, युद्धाचे किंवा वैभवाचे प्रेम यांच्या परंपरेखेरीज भारताने आणखीही एक वेगळीच परंपरा निर्माण केली आहे. त्या परंपरेचा आता आपणास परामर्श घ्यावयाचा आहे. एका सखोल व सुविहित वृत्तीतून ही परंपरा आलेली आहे. ही वृत्ती विभिन्न भारतीय किंवा हिंदू धर्मश्रद्धांतून निष्पन्न झालेली आहे. अर्थातच गौतम बुद्ध, आणि महावीर किंवा पार्श्वनाथ यांसारखे जैन संत यांच्या नावाशी निगडित असलेली हिंदू धर्माची सुधारकी ( प्रॉटेस्टंट ) रूपेही या परंपरेत समाविष्ट आहेत.

ऐहिक जीवनाचे उद्दिष्ट मोक्ष मिळवणे हेच आहे असे वेगवेगळ्या हिंदू धार्मिक संप्रदायांनी मानलेले आहे. मोक्षालाच मुक्ती, निर्वाण अशी नावे आहेत. काही दर्शनांनुसार ( षड्दर्शनांपैकी ) मोक्षप्राप्ती केवळ ईश्वरी कृपेनेच होते. तर इतर बऱ्याच विचारप्रणालींप्रमाणे ईश्वरी कृपासुद्धा तपश्चर्येने प्राप्त होते. आंतरिक शुद्धीसाठी आत्मक्लेश भोगणे या स्वरूपाच्या अविरत तपस्येने मनुष्य अत्यंत श्रेष्ठ स्थितीला पोचतो.

हिंदुस्थानातील भक्त ठराविक दिवस उपासतापास करतात. देवाला प्रसन्न करण्यासाठी ते देहदंडही सोसतात. भर उन्हाळ्यात भोवती विस्तवाचे कडे करून त्यात बसणे, जालीम थंडी असताना सर्व अंग उघडे ठेवून बसणे यासारखे किंवा यापेक्षा कठीण असलेले इतर प्रकारचे देहदंडही सोसतात. आपण ( जन्मतःच ) पापी आहोत आणि ते पाप देहधारणेतून उद्भवत असल्याने देहदंडाची शिक्षा भोगली पाहिजे अशी भूमिका मात्र त्यामागे नसते. ईश्वराचे लक्ष आपल्याकडे जावे हा कधी कधी त्यामागील हेतू असतो. आपल्या मन व देहजन्य विकारांपासून मुक्ती मिळवावी, शुद्धी करावी म्हणून उपासतापास, व्रतवैकल्ये केली जातात, देहदंड सोसले जातात.

या वृत्तीतूनच सर्वस्वी ऐहिक गोष्टींतही न्याय मिळविण्याचे काही विशेष मार्ग भारतात निर्माण झाले आहेत असे दृश्य दिसते. ऋणकोकडून कर्जाची परतफेड होत नाही असे दिसून आल्यास धनकोने त्याच्या दारात उपोषणाला बसण्याची हिंदुस्थानातील फार प्राचीन परंपरा आहे. असे केल्यामुळे ताबडतोब ऋणकोच्या दारात गावकऱ्यांची गर्दी जमते. आपणास न्याय्य वाटणाऱ्या गोष्टीसाठी आत्मक्लेश ओढवून घेणाऱ्याविषयी, त्याच्या म्हणण्याच्या खरेखोटेपणात न शिरताही, स्वाभाविकपणेच लोकांना सहानुभूती वाटते.

मात्र येथेच हेही सांगितले पाहिजे की, या पारंपरिक 'धरणे' पद्धतीचे अधःपतन होऊन, सरळ दुसऱ्यावर सक्ती करण्यासाठीही तिचा उपयोग केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, पश्चिम बंगालमधील बांकुरा जिल्ह्यातील अशाच एका प्रकरणात धनको सकाळी उजाडतच ऋणकोच्या घरी गेला. त्याच्या चुलीत आपले दोन्ही पाय घुसवून तो तेथेच धरणे धरून बसून राहिला. अर्थात त्या घरातील दिवसाचा स्वयंपाक होण्यातच बाधा आली. म्हणजे धनको स्वतः उपाशी राहिला पण त्याने ऋणकोच्या सर्व कुटुंबासही दिवसर उपाशी राहण्याची सक्ती केली.

टी. डी. ब्राउटन नावाचा एक गृहस्थ १८०९ मध्ये एका मराठा लष्करी मोहिमेबरोबर होता. तेथे घडलेल्या एका 'धरण्या'चा वृत्तांत त्याने लिहून ठेवला आहे. तो लिहितो : '... थोड्याच दिवसांपूर्वी एक मनुष्य मला भेटायला आला होता... त्याने सांगितले की त्याचे मालक नेहमीप्रमाणेच पैशाच्या मोठ्या अडचणीत आहेत... त्याने सांगितले की त्यांचे महाराजांकडे काही येणे असून ही रक्कम सुमारे सात लक्ष रुपयां-

इतकी आहे. तो पुढे असेही म्हणाला की त्यांचे देणे ताबडतोब चुकते झाले नाही तर दुसऱ्या दिवशी त्याच्या मालकाने महाराजांच्या तंबूवर ‘ धरणे ’ धरावयाचे ठरवले आहे... आपली मागणी पूर्ण करून घेण्यासाठी ‘ धरणे ’ धरण्याचा हा प्रकार मराठ्यांत सर्वत्र दिसतो. स्वतः शिंदेसुद्धा याला अपवाद नाहीत. ज्याच्याकडून आपले काही म्हणणे मान्य करून घ्यावयाचे असेल त्याच्या घराशी किंवा तंबूशी धरणे धरणाऱ्याने जाऊन बसावयाचे व मागणी पुरी होईपर्यंत तेथून हालावयाचे नाही अशी ही पद्धत आहे. धरण्याच्या सबंध वेळात ज्याच्यावर धरणे धरलेले असते त्याला घरातून बाहेर पडू दिले जात नाही. धरणे धरणाऱ्याच्या परवानगीनेच बाहेरची माणसे त्याला भेटू शकतात. इतर कोणाशीही त्याला बोलताचालतासुद्धा येत नाही. या धरण्यासंबंधीचे नियम अगदी स्पष्ट आहेत. धरणे धरणाऱ्याच्या मनात ते अधिक कडक करावयाचे असेल तर तो स्वतःबरोबर बरीचशी माणसे घेऊन जातो. ही सर्व माणसे ऋणकोच्या घराभोवती किंवा कधी कधी तर त्याच्या अंथरुणाभोवतीच बसून राहतात... त्यामुळे त्याचे खाणेपिणे बंद होते. मात्र अशा वेळी नियमांप्रमाणे धनकोच्या मंडळींनाही खाता येत नाही. त्यामुळे ज्याचे पोट अधिक सहनशील त्याची सरशी होते. या प्रकारची चाल काशी प्रांतात इतकी प्रचलित होती की ब्राह्मणांना दीर्घकाल उपाशी राहण्याचे शिक्षणच दिले जात असे. हे ब्राह्मण मग एखाद्या श्रीमंताच्या दाराशी जात. “ विशिष्ट दक्षिणा मिळाल्याशिवाय अन्नग्रहण करणार नाही ” अशी प्रतिज्ञा करून ते तेथे उपोषणास बसत. ब्रह्महत्येचे पाप इतके मोठे मानलेले आहे की साधारणतः पैसे दिले जात. पण ब्राह्मण खराच “ दमदार ” आहे की नाही याची कसोटीही पाहिली जात असे. त्यानंतरच पैसे देण्यात येत. कारण पैसा म्हणजे हिंदूंचे सर्वस्व, अगदी जीव की प्राण. या छावणीत पुष्कळ ब्राह्मण आहेत. ज्यांना धरणे धरण्याइतकी सवड नसेल किंवा तेवढा त्रास नको असेल त्यांच्यासाठी हे पैसे घेऊन धरणे धरण्यास जातात. ’ १४

वरील पुस्तकाच्या संपादकांनी पुढील पुस्ती जोडलेली आहे : ‘ इंडियन पिनल कोडप्रमाणे अशा प्रकारचे ‘ धरणे ’ धरणे हा गुन्हा असून त्यासाठी “ एक वर्षपर्यंत ( साधा किंवा सश्रम ) कारावास किंवा दंड किंवा दोन्ही ” अशी शिक्षा सांगितली आहे. ’ १५

या धरण्याचा दक्षिणेकडे प्रचलित असलेला एक प्रकार मार्को पोलोने वर्णिला आहे :

‘ एखाद्या ऋणकोला त्याच्या सावकाराने अनेक वेळा पैशांची मागणी केली व ऋणको दर वेळी पुढील दिवसाचा वायदा करून पैसे देण्याचे टाळीत असेल तर, देणेकऱ्याची भेट होताच त्याच्याभोवती जमिनीवरच एक वर्तुळ काढण्यात सावकार यशस्वी झाला तर सावकाराचे पैसे दिल्याशिवाय किंवा भक्कम जामीन दिल्याशिवाय ऋणकोला त्या वर्तुळाबाहेर पडता येत नाही. परतफेडीची व्यवस्था न करताच तो ते वर्तुळ

ओलांडून जाईल तर त्याला सत्य व न्याय यांची अवहेलना करणारा समजून देहांताची शिक्षा दिली जाते. प्रस्तुत लेखक जो मार्को त्याने परतीच्या सफरीवर असताना या राज्यात ( मलबार ) स्वतः जातीने पुढील गोष्ट पाहिली आहे. येथील राजालाच एका परकीय व्यापाऱ्याचे काही पैसे देणे होते. ही गोष्ट वारंवार नजरेस आणूनसुद्धा पुढचे वायदे देण्यापलीकडे राजाने काही केले नाही. एकदा राजा घोड्यावर बसून शहरात फिरत असताना त्या व्यापाऱ्याने संधी साधून घोड्यासकट राजाभोवती वर्तुळ काढले. हे पाहताच राजाने घोडा थांबवला. ज्या जागेवर तो उभा होता तेथून तो मुळीच हालला नाही. त्या व्यापाऱ्याचे समाधान करीपर्यंत त्याने अंगसुद्धा हालवले नाही. रस्त्यावरून जाणाऱ्यायेणाऱ्यांनी जेव्हा हे पाहिले तेव्हा त्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. ते म्हणू लागले की न्यायापुढे नम्र होणारा हा राजा खरोखरच फार थोर व न्यायी आहे. '[१६]

## धार्मिक असहिष्णुतेचा शांततापूर्ण विरोध

'धरण्या'च्या मार्गात एक हीन प्रतीची नैतिक बळजबरीच असे. कारण विरुद्ध पक्षाला पुष्कळदा मुकाट्याने दुसऱ्याचे म्हणणे मान्य करण्याखेरीज पर्याय नसे. पण हिंसा, बळजबरी किंवा न्यायालयात तंटा नेणे याखेरीज 'धरणे' हा एकच भांडण मिटवण्याचा मार्ग होता असे मात्र नाही.

पंधराव्या शतकात बंगालवर मुसलमान राजे राज्य करीत असत. याच काळात चैतन्य महाप्रभू ( १४८५–१५३३ ) हे थोर संत व महान सुधारक होऊन गेले. चैतन्यांनी वैष्णव पंथाचा प्रसार केला. या पंथाच्या पूजापद्धतीत टाळ-मृदंग वाजवीत परमेश्वरनामाचे जप-नामसंकीर्तन करण्याला फार महत्त्व आहे. चैतन्य महाप्रभू स्वतः राहात त्या नादिया गावी हा पंथ सर्वसामान्य लोकांत खूपच लोकप्रिय झाला. हे पाहून त्या गावचे मुसलमान रहिवासी अत्यंत क्षुब्ध झाले. त्यांचे शिष्टमंडळ काझीकडे– न्यायाधीश व शहराधिकारी– गेले. तेव्हा, एका रात्री टाळ-मृदंगाच्या आवाजात संगीत कीर्तन चालू असलेल्या एका घरात काझी गेला. त्याने तेथील सर्व मृदंग फोडून टाकले आणि जमलेल्या सर्वांना तंबी दिली की 'हिंदू धर्माचे पालन अशा प्रकारे करण्याचे धाडस आजपर्यंत कोणीच केलेले नाही. तुम्ही जर हे सवाद्य नामसंकीर्तन सोडणार नसाल तर मी तुम्हाला कडक सजा देईन व तुमची जातच नष्ट करून टाकीन.' त्या सर्वांना निषिद्ध असलेले मांस सक्तीने खायला भाग पाडून त्यांना मुसलमान केले जाईल हेच त्या धमकीत ध्वनित होते. लोक अगदी घाबरून गेले. दुसरे दिवशी ही गोष्ट चैतन्यांना कळली तेव्हा त्यांनी तावडतोब निश्चय केला की केवळ खासगी घरातच कीर्तन करून थांबायचे नाही तर एक मोठी मिरवणूकच वाजत-गाजत काझीच्या घरापर्यंत

न्यावयाची. त्यासाठी सर्वसामान्य नागरिकांमधून तीन कीर्तन-गट त्यांनी तयार केले. गावातील श्रीमंत माणसे मात्र घाबरून काझीकडे गेली. या चळवळीशी स्वतःचा संबंध नसल्याचे काझीला सांगून चळवळीला तो उच्छृंखल तरुण चैतन्यच सर्वस्वी जबाबदार असल्याचे त्यांनी सांगितले. त्या रात्री सर्व लोक हातात पेटत्या मशाली घेऊन सवाद्य नामसंकीर्तन करीत काझीच्या महालाकडे गेले. ते पाहताच काझी घाबरला व आपल्या लवाजम्यासह महालात लपून बसला.

चैतन्य महाप्रभू तेथे पोचले तेव्हा त्यांना असे आढळून आले की, गर्दीतील काही माणसे काझीच्या फुलबागेची नासाडी करीत आहेत. त्यांनी ताबडतोब लोकांना तसे न करता सभ्य माणसांसारखे वागावयास सांगितले. मग त्यांनी काझीकडे निरोप पाठविला की ते काझीच्या घरी पाहुणे म्हणून आलेले आहेत. काझीने त्यांची भेट घेतली तेव्हा पूजा-कीर्तनादी करण्याच्या स्वातंत्र्याची मागणीवजा प्रार्थना त्यांनी त्याच्यापुढे मांडली. ती अर्थातच चटकन मान्य झाली.

चैतन्य महाप्रभूंच्या जीवनात अशा प्रकारचा आणखीही एक प्रसंग घडल्याचे दिसून येते. ते एकदा ओरिसातून बंगालमध्ये प्रवेश करीत होते. ते नावेत होते. नावाड्याने त्यांना विनंती केली की आपण आता मुसलमान राज्यात प्रवेश करीत आहात, तेव्हा हरिनाम मोठ्याने न घेतलेले बरे. त्यावर जप बंद करण्याऐवजी चैतन्यांनी मोठमोठ्याने नामसंकीर्तन सुरू केले. लगेच तेथे मुसलमान अधिकारी धावून आले; पण सुदैवाने कोणताच गैरप्रकार झाला नाही.

शांततेने प्रतिकार करण्याच्या अशा प्रकारांतून कित्येक वेळा अत्यंत दुर्दैवी परिस्थिती सहज निर्माण होऊ शकते. चैतन्यांचा समकालीन असलेला त्यांचा परमशिष्य हरिदास हा जन्माने मुसलमान होता. पण त्याने स्वेच्छेने हिंदू धर्मातील आचारांचा स्वीकार केला होता. यासंबंधीच्या तक्रारी जेव्हा काझीकडे गेल्या तेव्हा हरिदासाला काझीसमोर उभे राहण्याची आज्ञा झाली. काझीने त्याला हे नवे थोतांड सोडून देण्याचा हुकूम दिला. हरिदासाने काझीचा हुकूम शांतपणे नाकारला. तेव्हा हरिदासाला शहरातील अठराच्या अठरा बाजारपेठांत सार्वजनिक ठिकाणी फटके मारावयाचे ठरले. त्याला फटके मारून त्याचे प्रेत मुस्लिम विधींनुसार पुरावे असा हुकूम होता. हरिदास मुळीच डगमगला नाही. त्याने हिंदू देवदेवतांची नावे जपतच सर्व फटके मोठ्या धैर्याने सहन केले. पण जास्तीत जास्त फटके मारूनसुद्धा त्याला काही झाले नाही हे पाहून काझीचे नोकर घाबरले. हरिदासाचा जीव घेता आला नाही म्हणून काझी आपल्यालाच शिक्षा करील अशी त्यांना भीती होती. त्यांची ही व्यथा ऐकून हरिदास हसला व म्हणाला, 'माझ्या जिवाचे तुम्हांला जर ओझे वाटते तर हा पहा मी मरतो.' असे म्हणून त्याने योगसामर्थ्याने समाधी लावली. भोवतालच्या सर्वांना असे दिसले की जिवंतपणाची

सर्व लक्षणे हळूहळू हरिदासाचे शरीर सोडून जाऊ लागली आहेत. पण काझीचे नोकर कबरस्तानात नेण्यासाठी जेव्हा ते प्रेत उचलू लागले तेव्हा ते इतके जड झाले होते की ते त्यांना मुळीच उचलता येईना.[१७] या चमत्कारामुळे नोकरांचे व काझीचेही मन पालटले. त्यांनी हरिदासाला वाटेल त्या मार्गाने भक्ती करण्याचे स्वातंत्र्य दिले. हळूहळू हरिदासाची योगसमाधी उतरली. त्याचे शरीर पुन्हा नेहमीसारखे झाले.

या प्रकारच्या कहाण्या आणि परंपरा जगातील इतर भागांप्रमाणेच भारतातही कमी नाहीत. परंतु धार्मिक स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या संतांना त्यांच्या आयुष्यातच जो मान आणि स्वातंत्र्य येथे मिळाले तसे इतरत्र मात्र सामान्यतः घडलेले आढळत नाही.

राजे किंवा योद्धे यांपेक्षा संतांचा व तत्त्वांचा भारताने अधिक सखोल आदर केलेला आहे. काही कालखंडांत क्षत्रिय वा योद्धे हे सर्व श्रेष्ठ मानले गेलेले दिसतात; तरी, एकंदरीत पाहता, भारतीय इतिहासात युगानुयुगे लोकांकडून ब्राह्मणांनाच श्रेष्ठ व निर्विवाद मान मिळालेला दिसतो. या बाबतीत चीनमधील परिस्थितीशी साम्य आढळते. तेथेही कवी किंवा तत्त्वज्ञ यांना जास्त मान मिळे. सैनिकाचा दर्जा त्या मानाने खूपच खालचा समजला जाई.

या ब्राह्मणांची परंपरागत कर्मे वेदादी पवित्र ग्रंथांत सांगितलेली आहेत. पौरोहित्य करणे, पवित्र धर्मग्रंथांचा अभ्यास करणे व ज्ञानदान करणे अशी त्यांची कामे सांगितलेली आहेत. या ज्ञानी व आध्यात्मिक माणसांनी ऐच्छिक दारिद्र्यात राहावे असेही सांगितलेले होते. या परंपरा जेव्हा क्षीण होत किंवा बुजत किंवा प्रत्यक्षात अधःपतित व्यवहार बोकाळत तेव्हा तेव्हा अलौकिक विचारवंत स्वतःच्या उदाहरणांनी व शिकवणुकीने जुन्या परंपरेचे पुनरुज्जीवन करीत असत.

गौतम बुद्धाने याच प्रकारे इसवी सनापूर्वी सहाव्या शतकात रूढीने साचेबंद झालेल्या ब्राह्मण्याच्या परंपरेविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. तो म्हणे, 'डोक्यावर शेंडी राखल्याने, गळ्यात दोरे घातल्याने किंवा विशिष्ट कुटुंबात जन्म घेतल्याने माणूस ब्राह्मण होत नाही; ज्याच्या अंगी सत्य वास करीत आहे व जो योग्य विचार करतो तोच भाग्यवंत, तोच ब्राह्मण.

'मी एखाद्या व्यक्तीला त्याच्या जन्मावरून किंवा त्याच्या आईबापांवरून ब्राह्मण म्हणत नाही. किंबहुना तेवढ्यावरून ब्राह्मणपण सांगणारा माणूस उद्धट असतो, श्रीमंत असतो. पण जो गरीब असून सर्व आसक्तींतून मुक्त झाला आहे, त्यालाच मी खराखुरा ब्राह्मण मानतो.

'जो असहिष्णू लोकांशी सहिष्णूपणे वर्तन करतो, जो कुरापती काढणाऱ्यांशी सौम्यपणे वर्तन करतो आणि विकारी लोकांमध्ये राहूनही जो विकारांपासून मुक्त राहतो त्याला मी ब्राह्मण मानतो.

'सुईच्या अग्रावरून गळून पडणाऱ्या मोहरीच्या दाण्याप्रमाणे ज्याच्यापासून राग आणि द्वेष, गर्व आणि असूया ही गळून पडली आहेत त्यालाच मी खरा ब्राह्मण म्हणतो.'[१८]

वाद किंवा भांडण मिटविण्याच्या संदर्भात बुद्धाचा आदेश अगदी स्पष्ट आहे. प्राचीन परंपरेसारखेच तोही म्हणतो :

'"त्याने मला शिव्या दिल्या, त्याने मला मारले, त्याने मला हारविले, त्याने मला लुटले,..." या विचारांना जे थारा देतात त्यांचा द्वेष कधीच सरत नाही.

'"त्याने मला शिव्या दिल्या, त्याने मला मारले, त्याने मला हारवले, त्याने मला लुटले,..." या विचारांना जे थारा देत नाहीत त्यांचा द्वेष नाहीसा होईल.

'कारण द्वेषाने द्वेष कधीच संपत नाही; द्वेष संपतो तो प्रेमाने. हाच सनातन नियम आहे.'[१९]

द्वेषाचे उत्तर प्रेमाने, रागाचे उत्तर शांतीने देण्याची, किंवा, थोडक्यात म्हणजे, योग्य व न्याय्य कारणाची प्रतिष्ठा राखण्यासाठी दुसऱ्यांचा छळ न करता स्वतःच आत्मक्लेश भोगण्याची प्राचीन परंपरा फार थोड्या लोकांच्या पालनात असली पाहिजे हे उघड आहे. बहुसंख्य लोक सर्वसामान्य माणसे वागतील त्या पद्धतीनेच वागत असली पाहिजेत हेही उघड आहे. पण सामान्य लोकांपेक्षा वेगळ्या प्रकाराने वागणाऱ्या स्त्री-पुरुषांना फार मोठा मान मिळत असे ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. जे लोक दैनंदिन जीवनातही तपस्येचा अवलंब करीत त्यांच्याकडे 'चक्रम व छांदिष्ट अवलिये' या दृष्टीने न पाहता, ते योग्य मार्गाने जात आहेत या दृष्टीनेच पाहिले जाई.

सत्यशोधनासाठी तपस्या करणे किंवा आत्मक्लेश भोगणे ही ब्राह्मणी परंपरा केवळ आध्यात्मिक उद्दिष्टांपुरतीच मर्यादित राहिली व आध्यात्मिकता सर्वस्वी पारलौकिक जीवनाशी निगडित गोष्ट मानली गेली असे थोड्या खेदाने म्हणावे लागते. सर्वसामान्य माणसांचे दैनंदिन जीवन सर्वत्र आढळणाऱ्या सर्वसामान्य नियमांनीच ठरवले जात असे. यासंबंधी भारतातील जैन पंथाचे एक उदाहरण देता येईल. या देशातील इतर कोणत्याही पंथांपेक्षा अहिंसेच्या, म्हणजेच दुसऱ्याला न दुखविण्याच्या, तत्त्वावर जैन तत्त्वज्ञानाने अवास्तव स्वरूपात भर दिलेला आहे. किडा-मुंगी आपल्या न कळत मारली किंवा दुखावली जाईल या भीतीने जैन उपासक तोंडावर पांढरी पट्टी बांधतात आणि पिण्यापूर्वी पाण्याचा प्रत्येक घोट गाळून घेतात. तरी इतिहासात जैनधर्मानेसुद्धा राजेरजवाड्यांशी व शासनांशी जुळवून घेतलेले दिसते. वास्तविक राजे व राज्यसत्ता यांचे अस्तित्वच सुसंघटित व सशस्त्र बळावर आधारलेले असते. भारताचा महान बौद्ध सम्राट अशोक याने युद्धाचा त्याग केला. पण त्याची तर्कसंगत पूर्तता म्हणून पूर्वीच्या युद्धांतील विजया-मुळे पदरी पडलेल्या फलाचा त्याग करावयाची जरुरी त्याला वाटली नाही. त्याची

अहिंसा, कमी-अधिक प्रमाणात, जीवनाच्या काही वैयक्तिक पैलूंपुरतीच मर्यादित राहिली.

दुसऱ्याला इजा पोचवू नये या विचाराचा, तत्त्वाचा भारतीय जीवनात झालेला समावेश ही काही लहान कामगिरी नव्हे. मुद्दा इतकाच की, शांतता व अहिंसा यांची परंपरा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारे पंथामागून पंथ होऊनही वरील गोष्टीचा प्रभाव जीवनाच्या फारच थोड्या भागावर पडलेला दिसतो.

## प्राचीन परंपरेचे गांधीप्रणीत पुनर्निरूपण

चालू शतकाच्या पहिल्या दशकात भिन्न वांशिक जमातींमधील परस्परसंबंधांच्या क्षेत्रात दक्षिण आफ्रिकेमध्ये मोहनदास करमचंद गांधी यांच्या नेतृत्वाखाली वरील प्राचीन परंपरेचे पुनरुत्थान झाले. हिंदी समाजाने द. आफ्रिकेत केलेली अहिंसक चळवळ हा सर्व जगाच्या दृष्टीने या युगातील सर्वाधिक महत्त्वाचा प्रयोग आहे असे टॉलस्टॉयचे मत होते.

गांधी स्वतः एका अतिशय धार्मिक वैष्णव कुटुंबात वाढले होते. तथाकथित अस्पृश्यांना दिली जाणारी वागणूक पाहून लहानपणी त्यांच्या मनावर फार खोल परिणाम झाला होता. पुराणांतील हरिश्चंद्र, ध्रुव, प्रल्हाद अशा महापुरुषांच्या गोष्टींनीही त्यांचे मन हेलावून जाई. या सर्वांनी आदर्श सत्यनिष्ठा दाखवली आणि त्यासाठी पराकाष्ठेची दुःखे भोगली. मोठेपणी या आपल्या नायकांच्या पावलावर पाऊल टाकून आयुष्य वेचण्याची त्यांची मनीषा होती. ते इंग्लंडला गेले तेव्हा त्यांचा ख्रिश्चन परंपरेशी परिचय झाला. त्यामुळे त्यांच्यात मूलतः असलेली सत्यनिष्ठा आणि भूतदयेची वृत्ती खूपच जास्त दृढ झाली.

वर्णभेदाला तोंड देण्यासाठी क्रियाशील अहिंसेचे म्हणजेच सत्याग्रहाचे तंत्र त्यांनी हळूहळू कसे विकसित केले हा इतिहास पुन्हा सांगितला पाहिजे असे नाही. तो गांधींनी 'माझे सत्याचे प्रयोग' या आपल्या आत्मवृत्तात व 'सत्याग्रह इन् साउथ आफ्रिका' या पुस्तकात फारच चांगल्या प्रकारे दिलेला आहे. महत्त्वाचा मुद्दा हा की, प्राचीन काळी केवळ धार्मिक क्षेत्रात योग्य मानले गेलेले तंत्र आधुनिक काळात ऐहिक जीवनाच्या क्षेत्रात लागू करणारे गांधी हे आधुनिक भारतातील पहिलेच गृहस्थ होत. या तंत्राचे सविस्तर वर्णन करणे व त्याचे काही प्रसंगांतील उपयोजन प्रत्यक्ष तपासून पाहणे ही गोष्ट म्हणूनच आवश्यक ठरते. तसे केल्यानंतरच हे तत्त्व आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अधिक व्यापक क्षेत्रात लागू करण्यासंबंधी त्यांची कल्पना काय होती हे पाहता येईल.

'सत्य' आणि 'आग्रह' या दोन संस्कृत शब्दांपासून 'सत्याग्रह' हा शब्द

बनलेला आहे. 'स्वतःला उमगलेले सत्य उचलून धरण्यासाठी दुसऱ्याला त्रास न देता स्वतःच आत्मक्लेश भोगण्यास तयार असलेली व्यक्ती' असा गांधींनी 'सत्याग्रही'चा अर्थ दिला आहे. सत्य काय आहे याविषयी स्वतःची स्वतंत्र समज बाळगण्याचा अधिकार आहे. प्रत्येक माणसाला सत्याचे एक विशिष्ट आकलन, म्हणजे एका व्यक्तीला उमगलेले सापेक्ष सत्य, शिक्षा आणि हिंसाचार यांच्या साहाय्याने दुसऱ्या माणसावर लादण्यात त्यांच्या मते काहीच अर्थ नव्हता.

सत्य काय आहे याविषयी आपापले आकलन उचलून धरण्याचा हक्क ज्याचा त्यास आहे याचा अर्थ सत्याच्या क्षेत्रात अशा नाना आकलनांचे अस्तित्व योग्य म्हणून स्वीकारावे असा मात्र होत नाही. एकाच सत्याचे वेगवेगळ्या व्यक्तींचे वा गटांचे 'दर्शन' भिन्न असू शकते याबद्दलच्या आग्रहापोटी व्यक्ती किंवा गट यांनी नेमके सत्य काय आहे याविषयी तटस्थ वा उदासीन, म्हणजे ज्याला जे वाटेल ते त्याने सत्य समजावे अशी, भूमिका घ्यावी अशी गांधींची कल्पना नव्हती. मला सत्याची जी दर्शने चूक वाटतात ती दर्शने बाळगण्याचा इतरांचा अधिकार मान्य करीत असतानाच त्या दर्शनांचा, म्हणजेच त्या दर्शनांपासून निष्पन्न होणाऱ्या व्यवहारांचा, असहकार पुकारून अहिंसक मार्गांनी विरोध करण्यास, त्यांच्यातील असत्यता उघडकीस आणून देण्याचा प्रयत्न करण्यास माझी सत्यनिष्ठा व माझ्या दर्शनाबद्दलचा माझा प्रामाणिक आग्रह मला उद्युक्त करतील असे गृहीत धरलेले होते. आज जगात असत्य आणि अन्याय टिकून आहेत याचे कारण माणसे अज्ञानाने, आळसाने, भीतीने किंवा मोहाने त्यांना शरण जातात हेच आहे. ज्याला सत्याधिष्ठित समाज निर्माण करावयाचा आहे त्याने तपाचरण व आत्मक्लेश यांच्या मदतीने असत्यास प्रखर विरोध केला पाहिजे. ते त्याचे कर्तव्यच आहे.

सत्याच्या स्वतःच्या सापेक्ष दर्शनाबद्दल ही किंमत द्यावयाची ज्याची तयारी आहे त्याचे प्रथम दर्शन, समजा, चुकीचे असले तरी तो जे आत्मक्लेश भोगील त्यामुळे आपल्या मताचे परिष्करण करण्यास त्याचे मानस अनुकूल होईल. प्रतिपक्षाच्या भूमिकेतील सत्यांश ओळखण्यासही सत्याग्रही आत्मक्लेशांमुळे मदत होते असे गांधींचे मत होते. तसेच त्यांचे असेही मत होते की सत्याग्रही पद्धतीने विरोध केल्यामुळे एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाचा पराभव असा कधीच होत नाही. म्हणून दोन्ही पक्षांना प्रामाणिकपणे मान्य अशा सत्याच्या दर्शनावर दोघेही स्थिर होण्यात सत्याग्रहाची परिणती होते.

सकृद्दर्शनी परस्परविरोधी दिसणाऱ्या दृष्टिकोणांतील अविरोधी समानांश शोधण्याचा प्रयत्न करण्यानेच आपण सत्याच्या अधिकात अधिक जवळ जातो, आणि तपस्या करणाऱ्यालाच सत्य सापडते, या प्राचीन भारतीय दार्शनिक भूमिकेवर गांधींचे मत अधिष्ठित होते. गोपीनाथ कविराज हा सद्यकालीन प्रसिद्ध तत्त्वज्ञ म्हणतो त्याप्रमाणे,

सतारीला अनेक तारा असतात, एकेकटी तार घेतली तर एकाची सुरावट दुसऱ्या तारांशी न जुळणारी असते. पण सतारिया सतार वाजवतो तेव्हा त्या सर्वांमध्ये मेळ प्रस्थापित होतो आणि (प्रत्येक वेगवेगळ्या सुराहून श्रेष्ठ असलेले) एकरस संगीत निर्माण होते. परस्परांशी मेळ असलेले स्वर शोधून ते योजणे ही वादकाची जबाबदारी असते. दैनंदिन जीवनामध्ये माणसांना मार्गदर्शन करणाऱ्या सत्याच्या निरनिराळ्या दर्शनांचेही तसेच आहे. सकृद्दर्शनी वेगळ्या, आणि विरोधीही वाटणाऱ्या गोष्टींतील मेळ शोधण्याचा जर सतत ध्यास धरला तर आपण मानवी जीवनात शक्य आहे तेवढे सत्याच्या जवळ पोचतो.

भारतीय संस्कृतीची एक महत्त्वपूर्ण घटक-परंपराच गांधी पुढे चालवीत आहेत हे दाखविण्यासाठीच हे थोडे वैचारिक विषयान्तर केले आहे. गांधींची प्रतिभा दोन गोष्टींत दिसून येते. एक म्हणजे आतापर्यंत केवळ धार्मिक क्षेत्रात उपयोजिला जाणारा मार्ग त्यांनी ऐहिक क्षेत्रात वापरला. व दुसरे म्हणजे, त्या वेळपर्यंत फक्त वैयक्तिक व खाजगी पातळीवरच वापरात आलेले सत्याग्रहाचे साधन त्यांनी मोठ्या प्रमाणावरील सामूहिक कृतीमध्ये परिवर्तित केले.

युद्धाला पर्याय शोधून काढणे हा गांधींचा मुख्य उद्देश होता. इतर काहीही दोष असले तरी, बदल घडवून आणण्याचा युद्ध हा एक अत्यंत परिणामकारक मार्ग आहे यात शंका नाही. पण दुर्दैवाने त्यामुळे साधणाऱ्या गोष्टी त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या किमतीच्या मानाने कमी मोलाच्या असतात. गांधींचा युद्ध या मार्गावर आणखी एक आक्षेप आहे. युद्धातील विजयामुळे जेत्यांना गर्व चढतो. त्यांच्या धुंद झालेल्या डोळ्यांना विरोधी पक्षाच्या भूमिकेतील सत्यांश दिसत नाही; ओळखता येत नाही. कोणत्याही झगड्यात राष्ट्रांचे मोठे हितसंबंध गुंतलेले असतील तर लोकसभा किंवा आंतरराष्ट्रीय न्यायालये युद्धे थांबविण्याच्या बाबतीत नेहमीच प्रभावी ठरत नाहीत. म्हणून युद्धाच्या मानाने कमी मनुष्यहत्या होईल पण अधिक चांगले परिणाम होतील असा प्रत्यक्ष क्रियाशील पर्याय शोधून काढण्याचा प्रयत्न गांधींनी केला.

तात्त्विकदृष्ट्या, गांधींच्या अहिंसक प्रतिकारासंबंधीच्या भूमिकेचे एक उद्बोधक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. शांततेचा मार्ग हा खरा ब्राह्मणी मार्ग असे बुद्धाचे मत होते असे आपण मागे पाहिलेच आहे. गांधींच्या मते प्रेम, शांती, आत्मक्लेश भोगण्याची तयारी ही पुरुषापेक्षा स्त्रीस्वभावाची वैशिष्ट्ये अधिक आहेत. अधिक सूक्ष्म विश्लेषण केल्यास, त्यांच्यावर बालपणी जो आईचा खोल प्रभाव होता त्यामुळे किंवा लहानपणीच्या इतर काही अनुभवांमुळे [२०] गांधींचे हे मत बनलेले असावे, ही गोष्ट अगदी शक्य आहे. उगमस्थान कोठेही असो, गांधींचे असे ठाम मत होते की, मानवी संस्कृतीला आत्मनाशाकडे चाललेल्या अधोगतीपासून वाचवावयाचे असेल तर तिच्या

व्यवहारात काही नवीन तत्त्वे प्रविष्ट केली पाहिजेत. स्त्री ही अशा तत्त्वांची विशेष प्रतीक व प्रतिनिधी आहे अशी त्यांची दृढ धारणा होती.

## सत्याग्रह-साधनाचे उपयोजन

गांधींनी १९१९ मध्ये भारतीय राजकारणात प्रवेश केल्यापासून तो १९४८ मधील त्यांच्या अखेरच्या दिवसापर्यंत जातीय, आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय क्षेत्रांतील सर्व प्रकारच्या झगडयांत वेळोवेळी सत्याग्रहाचा उपयोग केला गेला. यांतील काही लढे प्रत्यक्ष त्यांच्या नेतृत्वाखाली झाले, काही लहानसहान व स्थानिक स्वरूपाच्या सत्याग्रहांमध्ये त्यांचे दुरून मार्गदर्शन झाले, तर काही त्यांच्या नकळतही झाले. मात्र त्यांनी उभारलेले सत्याग्रहाचे सार्वत्रिक लढे हेच सर्वांचे स्फूर्तिस्थान होते.

त्रावणकोर संस्थानातील वैकोम येथे १९२४ साली काही अगदी साधे नागरी हक्क अस्पृश्यांना मिळवून देण्यासाठी एक चळवळ झाली. त्याच सुमारास अमृतसरमध्ये शिखांच्या धार्मिक संस्थांवर सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी लढा झाला. बार्डोलीला १९२८ मध्ये जमिनीचा खंड कमी करून घेण्यासाठी तेथील शेतकऱ्यांनी सत्याग्रह केला. मिदनापूरमध्ये १९२१ साली युनियन बोर्डावर बहिष्कार टाकला गेला. १९३० नंतर बरद्वान जिल्ह्यात वाढीव पाणीपट्टीविरुद्ध चळवळ झाली. निरनिराळ्या गोष्टींसाठी झालेल्या अशा सुमारे चाळीस किंवा अधिकच सत्याग्रह चळवळींखेरीज १९२१, १९३०, १९३२ व १९४२ मध्ये राष्ट्रीय पातळीवर राजकीय स्वरूपाच्या प्रचंड सत्याग्रह चळवळी झाल्या.

या सर्व घडामोडींचा सामाजिक किंवा ऐतिहासिक दृष्टिकोणातून तपशीलवार, सूक्ष्म व चिकित्सक अभ्यास अजून झालेला नाही. मात्र तसा तो होणे फार आवश्यक आहे.

वरीलपैकी काही चळवळींच्या बाबतीत, उदाहरणार्थ अस्पृश्यांना समान नागरी हक्क मिळवून देण्याच्या वैकोमच्या लढ्यात, त्यांच्यामागील कारणांची नैतिकता लोकांच्या मनात सामान्यपणे पक्की ठसलेली होती. जेथे आर्थिक अन्यायाचा प्रश्न होता तेथे मूळ प्रश्न नेहमीच निःसंदिग्ध नव्हते. त्यामुळे लोकमतात दु-फळी आढळून आली असल्यास ती गोष्ट समर्थनीय म्हणावी लागते. बऱ्याच मोहिमांत, विरोधी पक्षीयांविरुद्ध प्रत्यक्ष हिंसाचार झाला नाही तरी, विरोधकांचे हृदयपरिवर्तन घडवून आणण्याची इच्छा सत्याग्रह्यांच्या मनात शेवटपर्यंत राहिली नाही. त्यांच्यात सत्याग्रहास न शोभणारा कडवटपणा निर्माण झाला. जेव्हा जेव्हा हिंसेचा उद्रेक झाला तेव्हा द्वेष कमी करण्यासाठी गांधींनी मुद्दाम वेगळे प्रयत्न केले व सत्याग्रहाचे उद्दिष्ट असफल होऊ नये अशा रीतीने

लढ्याला वळण दिले. या सर्व सत्याग्रही चळवळींचे तपशीलवार पृथक्करण करणे खरोखरच फार महत्त्वाचे ठरेल. कारण पूर्वीच्या प्रयोगांवरूनच आपल्याला कोणत्या परिस्थितीत सत्याग्रह चांगला यशस्वी ठरतो, आणि तो मार्ग जेथे फसला तेथे तो का व कोणत्या परिस्थितीत फसला हे शोधून काढावे लागणार आहे.

## वैकोम सत्याग्रह

वैकोम हे दक्षिण भारतात ९° ४६′ उत्तर अक्षांश व ७६° २४′ पूर्व रेखांशावर वसलेले गाव आहे. या गावावर १९४७ पर्यंत हिंदू संस्थानिक राज्य करीत होते. येथे एक विख्यात हिंदू मंदिर आहे. १९२४ मध्ये, अस्पृश्यांना या मंदिरात तर प्रवेश नव्हताच पण ज्या रस्त्यांवर ब्राह्मण वस्ती होती त्या रस्त्यांवरून चालण्यासही त्यांपैकी काही जातींना मनाई होती.

सर्व हिंदूंना व अहिंदूंनाही खुले असलेले हे रस्ते (तथाकथित) अस्पृश्यांना खुले करण्यासाठी वैकोममध्ये १९२४ च्या सुरुवातीला चळवळ करण्यात आली. रूढ चालीरीती मोडून वरील रस्त्यावरून शांतपणे अस्पृश्यांसह मिरवणुकीने जाण्याचा आपला मनोदय जाहीर करणाऱ्यांविरुद्ध तसेच प्रत्यक्ष त्या रस्त्यावरून जाणाऱ्यांविरुद्ध ब्राह्मणाकडून हिंसा घडली. शांततेचा भंग होईल हे लक्षात घेऊन त्रावणकोर सरकारने आधीच बंदीहुकूम काढला होता. सत्याग्रह्यांनी ती आज्ञा मोडली व तुरुंगवास स्वीकारला. हा लढा दोन वर्षे चालला. शेवटी रस्त्यावरून जाण्याचा अस्पृश्यांचा हक्क मान्य केला गेला. आणखी काही वर्षांनी सरकारने मंदिरप्रवेशाचा हक्कही अधिकृतपणे मान्य केला.

गांधी या मोहिमेचे अधिकृत नेते नव्हते. पण त्यांनी कायदेभंग करणाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून व या प्रकरणाचा प्रचार करून चळवळीला साहाय्य केले. गांधींनी वेळोवेळी ज्या सूचना पाठविल्या त्यांपैकी काहींचा अभ्यास करणे उद्बोधक आहे. त्यावरून त्यांच्या नेतृत्वाखाली विकास पावलेल्या या नव्या तंत्राच्या मूलभूत तत्त्वांवर खूपच प्रकाश पडतो.

अस्पृश्यांबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या अ-हिंदू व्यक्तींना या मोहिमेत भाग घेता येईल काय असे विचारता गांधी म्हणाले की, ‘अस्पृश्यता हे हिंदूंचे पाप आहे. त्याबद्दल त्यांनीच क्लेश भोगले पाहिजेत, आत्मशुद्धी करून घेतली पाहिजे. आपल्या पददलित बंधुभगिनींचे ऋणही त्यांनीच फेडले पाहिजे. ही त्यांना लज्जा आणणारी गोष्ट आहे व तो काळा कलंक धुवून टाकल्याचे श्रेयही त्यांनाच मिळाले पाहिजे.’ [२१]

त्यांचे कार्य सफळ व्हावयाचे तर खूपच चिकाटीची आवश्यकता आहे असे त्यांनी सविनय कायदेभंग करणाऱ्यांना बजावले. ‘वैकोमच्या लढ्याचे उद्दिष्ट सुधारणा

घडवून आणण्याचे आहे. केवळ आपल्या चारित्र्याच्या आणि सहनशक्तीच्या जोरावर सत्याग्रह्याला विरोधकांचे मन वळवावयाचे आहे. तो जितका अधिक शुद्ध असेल व जितके जास्त क्लेश तो भोगेल तितकी लवकर प्रगती होईल. म्हणूनच त्याने जातीबाहेर काढले जाण्याची, कुटुंबातून हाकलले जाण्याची व कुटुंबाच्या मालमत्तेवरील हक्क गमावण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्याने ही सर्व दुःखे तर आनंदाने भोगली पाहिजेतच पण आपला छळ करणाऱ्यावर प्रेम केले पाहिजे. सत्याग्रही पापाचरण करीत आहेत अशी विरोधकांची प्रामाणिक समजूत आहे. म्हणून त्यापासून सत्याग्रहीस परावृत्त करण्यासाठी माहीत असलेल्या एकमेव परिणामकारक साधनाचा, म्हणजे देहदंडात्मक शिक्षेचा, ते वापर करीत आहेत. उलट सत्याग्रही मात्र शिक्षेने नव्हे तर तपाचरणाने, आत्मशुद्धीने आणि आत्मक्लेशाने सुधारणा साधणार असतो. म्हणूनच विरोधकांकडून होणाऱ्या छळाचा राग आल्यास स्वतःवर घालून घेतलेल्या शिस्तीचा भंग करण्यासारखे होईल.' २२

१४ ऑगस्ट, १९२४ च्या 'यंग इंडिया'त त्यांनी लिहिले : 'सत्याग्रह्यांच्या यातनांमुळे सनातनी मंडळींची मने अजून द्रवली नाहीत याचे मला आश्चर्य वाटत नाही. त्यांनी अजून फार काळ यातना भोगलेल्या नाहीत. त्या यातना पुरेशा तीव्रही नव्हत्या. भोगायचे ठरवून क्लेश उत्पन्न करता येत नाहीत. त्यांच्या नशिबात ईश्वराने जे वाढून ठेवले असेल ते सत्याग्रह्यांनी स्वीकारले पाहिजे. यातना भोगण्यातच त्यांचा देह झिजावा अशी त्याची इच्छा असेल तर त्यांनी या अत्यंत कठीण कसोटीच्या प्रसंगीदेखील अंगचोरपणा करता कामा नये, किंवा यातनांचे नाटक करण्याचे धाष्ट्र्य करता कामा नये.' सत्याग्रह प्राचीन हिंदू परंपरेशी सातत्य राखतो याकडे निर्देश करून त्याच लेखात गांधी पुढे लिहितात, 'तपश्चर्येचे साधन किती अमोघ असते हे सनातनी हिंदूंना सांगायला नको. सत्याग्रह म्हणजे "सत्यासाठी केलेली तपस्या"च आहे.'

सरकारचा बंदीहुकूम मोडून पुष्कळ स्वयंसेवकांनी तुरुंगवास स्वीकारला. वास्तविक सरकारचा दृष्टिकोण सत्याग्रह्यांना सहानुभूतीचा होता. तरी पण आपल्या समजुतीनुसार राज्यात शांतता राखणे सरकारला भागच होते. या संबंधात, कायदेभंग करणाऱ्याने शासनाविषयी काय भूमिका घ्यावी याबद्दल गांधींना स्पष्टपणे लिहावे लागले होते : 'त्रावणकोर सरकारचे बंदीहुकुमाबद्दलचे धोरण अजूनही ताठरपणाचेच आहे. मात्र त्यांची अंमलबजावणीची पद्धत सौजन्याची आहे. सत्याग्रह्यांवरील हल्ल्यांना त्यांनी किती जलद पायबंद घातला हे जनतेला माहीत आहेच. जेलमध्ये मिळणारी वागणूक सरकारच्या बाहेरच्या वर्तणुकीशी सुसंगत अशीच आहे....

'सत्याग्रह चालू असतानाही अर्ज-विनंत्या करणे, सार्वजनिक सभा घेणे, शिष्टमंडळे पाठवणे यांसारख्या मार्गांनी जनतेचे व सरकारचे मन आपल्याकडे वळवून घेण्याचे काम

सत्याग्रह्यांनी चालू ठेवावे या माझ्या सांगण्यावर आश्चर्य प्रकट करण्यात येत आहे. त्रावणकोरचे सत्ताधीश एतद्देशीय आहेत म्हणून मी राज्यशासनाशी पक्षपाताने वागत आहे तर येथील ब्रिटिश शासन परकीय सत्तेचे प्रतिनिधी असल्याने मी त्याला कडवा विरोध करतो असे टीकाकारांचे म्हणणे आहे. माझ्या दृष्टीने लोकमत झुगारून देणारे सर्वच राज्यकर्ते परकीयच होत...

' त्रावणकोरमध्ये एका संपूर्ण शासनसंस्थेविरुद्ध सत्याग्रही लढत नाहीत. किंबहुना त्यांचा हल्ला शासनसंस्थेवर नाहीच. ते हिंदूंच्या धार्मिक अपसमजुतींशी झगडत आहेत. त्रावणकोर सरकारची भूमिका त्रयस्थ मध्यस्थाची आहे. असे असल्यामुळे सत्याग्रहींनी सरकारशी संवाद साधण्याचा किंवा सभासंमेलने घेऊन लोकांचे मन आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न न केल्यास ते योग्य मार्गापासून विचलित झाल्यासारखे होईल. " प्रत्यक्ष कृती " नेहमीच अन्य सुसंगत मार्ग बंद करतेच असे नव्हे. अर्ज-विनंत्या हे नेहमी सत्याग्रह्यांच्या दुर्बलतेचेच लक्षण असते असेही नाही. खरे तर, जो नम्र नाही तो सत्याग्रहीच नाही. '[२३]

सत्याग्रहाच्या चळवळींत क्वचित अशी वेळ येऊ शकते की जेव्हा कायदेभंग करणाऱ्याला परिस्थितीची कोंडी फोडावी लागेल व पुढे जाण्यासाठी नवा मार्ग शोधावा लागेल. गांधींवर अशी वेळ आली तेव्हा त्यांनी आयुष्यात बऱ्याच वेळा उपोषण केले होते. प्राचीन काळच्या धरणे धरण्याचीच ही एक सुधारित आवृत्ती होती. मात्र यात कसल्याच प्रकारच्या दैवी हस्तक्षेपाची अपेक्षा नव्हती; तसेच विरोधकावर दडपण आणण्याचेही ते साधन नव्हते. सहानुभूती दाखविणाऱ्याच्या हृदयाला स्पर्श करून त्यालाही योग्य वाटणाऱ्या कार्याच्या पूर्तीसाठी अधिक जोरदारपणे उद्युक्त करणे हा एकमेव उद्देश असे.[२४]

वैकोम सत्याग्रहाच्या वेळी गांधींनी या मुद्द्याचा खुलासा केला होता. ' सत्याग्रह मार्गामध्ये उपोषणाला स्पष्ट मर्यादा आहेत. जुलूम करणाऱ्याविरुद्ध उपोषण करता येणार नाही; कारण ती त्याच्याविरुद्ध हिंसाच ठरेल. त्याच्या आज्ञांचे पालन न करून तुम्ही शिक्षेला आमंत्रण देता. पण तो शिक्षा करण्याचे नाकारतो आणि तुम्हांला क्लेश देणे भाग पडू नये म्हणून आज्ञांचा भंग करणेच अशक्य करून टाकतो. तेव्हा तुम्ही, तो शिक्षा करीत नाही म्हणून, स्वतःस शिक्षा करून घेऊ शकत नाही. उपोषणाचा मार्ग केवळ प्रियजनांविरुद्ध वापरावयाचा असतो. उदाहरणार्थ, दारू पिणाऱ्या बापाविरुद्ध मुलगा उपोषण करतो तेव्हा त्याचा उद्देश धाक दाखवून काही अधिकार हस्तगत करणे हा नसून बापाची सुधारणा करणे हा उद्देश असतो...

' येथे " जुलमी " व " प्रियजन " हे शब्द व्यापक अर्थाने वापरलेले आहेत. जो अन्याय करतो तो " जुलमी " व जो तुमच्याबद्दल सहानुभूती बाळगतो तो

" प्रियजन ". माझ्या मताप्रमाणे वैकोम सत्याग्रहाच्या संदर्भात सुधारणेला विरोध करणारे " जुलमी " होत. राज्यसरकार तसे असेल किंवा नसेल. या विशिष्ट संदर्भात राज्यसत्ता केवळ शांतता राखणाऱ्या पोलिसदलाची भूमिका पार पाडत आहे असे मी गृहीत धरले आहे. पण कोणत्याच स्थितीत राज्यसत्ता किंवा विरोधक " प्रियजन " या उपाधीस पात्र होत नाहीत. तो मान सत्याग्रहाला पाठिंबा देणाऱ्यांचा आहे. सत्याग्रही माणसाच्या उपोषणाला नेहमीच दोन शर्ती आहेत. त्याचे उपोषण " प्रियजनां "-विरुद्ध असले पाहिजे आणि ते त्यांच्याकडून काही अधिकार पदरात पाडून घेण्यासाठी नसले पाहिजे. ते प्रियजनांस सुधारण्याकरताच असले पाहिजे. मी माझ्या पित्याविरुद्ध त्याला व्यसनातून मुक्त करण्यासाठी उपोषण करू शकेन. पण त्याने मला ठराविक हिस्साने वारसा द्यावा म्हणून मला उपोषण करता येणार नाही. उत्तम पोषाख मिळावा म्हणून आईबापांविरुद्ध उपास करणारी मुले जशी सत्याग्रही नाहीत तसेच पाहिजे तेवढी भीक घातली नाही म्हणून काही भिकारी उपास करतात तेही सत्याग्रही नाहीत. सरकार अटक करीत नाही म्हणून जर वैकोमचे सत्याग्रही उपोषण करतील तर मला अत्यंत नम्रपणे असे म्हणावेसे वाटते की त्यांचे उपोषण वर सांगितलेल्या भिकाऱ्याच्या उपोषणा-सारखे होईल. ' २५

या वेळपावेतो केवळ वैयक्तिक जीवनाच्या क्षेत्रात लागू असलेली गोष्ट सार्वजनिक क्षेत्रात उपयोजण्याचा प्रयत्न गांधी करीत होते ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. एकदा ते म्हणालेही होते, ' सार्वजनिक सत्याग्रह म्हणजे वैयक्तिक किंवा घरगुती सत्या-ग्रहाचाच एका दिशेने झालेला विस्तार आहे. प्रत्येक सार्वजनिक सत्याग्रहाची परीक्षा त्याला अगदी समांतर असे घरगुती उदाहरण करून केली पाहिजे. समजा, मला माझ्या घरातून अस्पृश्यतेचे निर्मूलन करावयाचे आहे. माझ्या मातापित्यांचा त्याला विरोध आहे, आणि माझी निष्ठा तर प्रल्हादासारखी ज्वलंत आहे. माझे वडील मला शिक्षेच्या धमक्या देतात; असे समजा की, मला सजा देण्यासाठी सरकारलाही बोलावतात. तर मी काय करावे ? माझ्या पित्याने मला दिलेल्या निरनिराळ्या शिक्षा भोगण्यासाठी मी माझ्या मित्रांना बोलवावे ? आत्मक्लेश व प्रेम यांनी केवढेही कठीण हृदय विरघळते या नियमावर विसंबून, या मार्गाने त्यांच्या हृदयातील काठिण्य विरघळून जाईल, अस्पृश्यता पाळण्यातील पापाचे त्यांना दर्शन होईल, या विश्वासाने पित्याने दिलेल्या सर्व शिक्षा माझ्या मीच शांत चित्ताने भोगणे माझे कर्तव्य नव्हे का ? माझ्यासारख्या मुलाच्या सांगण्याने त्यांची समजूत पटत नसेल तर ती गोष्ट पित्याला समजावून सांगण्यासाठी मी विद्वान पंडितांची, घरोब्यातील वडिलधाऱ्या मित्रांची मदत घ्यायला हरकत नाही. पण शिक्षा भोगण्याच्या कर्तव्यात – आणि मानातही – मी कोणालाच सहभागी होऊ देऊ शकत नाही. या काल्पनिक घरगुती सत्याग्रहाची जी गोष्ट, तीच गोष्ट त्याच प्रमाणात

सार्वजनिक सत्याग्रहाबाबतही* खरी आहे.' [२६]

## १९३० सालचा मिठाचा सत्याग्रह

राष्ट्रसभेने १९३० मध्ये पूर्वीच्या आपल्या ध्येयात बदल करून यापुढे पूर्ण स्वराज्य मिळविणे हेच यापुढे तिचे ध्येय राहील असे जाहीर केले. त्याच ठरावाने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अहिंसक लढ्याचे नेतृत्व करण्याची महान जबाबदारी म. गांधींवर सोपविण्यात आली.

नेतृत्वाची सूत्रे हाती घेतल्याबरोबर प्रथम गांधींनी ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या भारतातील प्रतिनिधीला, व्हाइसरॉयला वाटाघाटी करण्याचे निमंत्रण दिले. मात्र काही अगदी प्राथमिक आर्थिक व राजकीय सुधारणांना प्रारंभ करून त्यानेही आपली प्रामाणिकता दाखवून दिली पाहिजे, अशी गांधींची अट होती. ३० जानेवारी १९३० च्या 'यंग इंडिया'मधील लेखात त्यांनी लिहिले आहे :

'व्हाइसरॉय व ब्रिटिश मंत्रिमंडळाने पुढील सुधारणा अंमलात आणण्याची कारवाई सुरू करावी.

१. संपूर्ण दारूबंदी.
२. विनिमयाचा दर रुपयास १ शिलिंग ४ पेन्स इतका कमी करणे.
३. जमीन महसूल निदान ५० टक्क्यांनी कमी करून त्यावर कायदेमंडळाचे नियंत्रण मान्य करणे.
४. मिठावरील कर रद्द करणे.
५. सुरुवात म्हणून सैन्यावरील खर्च निदान ५०% ने कमी करणे.
६. कमी केलेल्या महसुलामुळे उत्पन्नात घट होणार ही गोष्ट लक्षात घेऊन, उच्च श्रेणीच्या नोकरांचे पगार निम्म्याने किंवा अधिकही कमी करणे.
७. परदेशी कापडावर संरक्षक कर आकारणे.
८. ज्यांच्यावर खून केल्याचा किंवा खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप नाही अशा सर्व राजकीय बंदींना मुक्त करणे. सर्व राजकीय खटले काढून घेणे, सेक्शन १२४ ए व १८१८ चे रेग्युलेशन व तत्सम निर्बंध मागे घेणे. सर्व हद्दपार राजकीय कैद्यांना भारतात येण्याची परवानगी देणे.

---

* हा मजकूर, हिंदू नसलेल्या लोकांनीही सत्याग्रहात भाग घ्यावा किंवा कसे, या संदर्भात लिहिलेला आहे.

९. सी. आय. डी. नष्ट करणे किंवा त्यावर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण बसवणे.
१०. स्वसंरक्षणासाठी हत्यारे वापरण्यास अनुमती देणे व त्यावर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण बसवणे.'

'ही यादी म्हणजे अत्यंत निकडीच्या गरजांची पूर्ण यादी नव्हे,' असे गांधींनी स्पष्ट केले. 'पण व्हाइसरॉयने भारताच्या एवढ्या तरी अगदी साध्या पण प्राणभूत महत्त्वाच्या मागण्या पूर्ण कराव्या, म्हणजे कायदेभंगाची भाषा त्यांच्या कानांवर पडणार नाही. त्यानंतर मग कोणताही विचार मांडण्यास व मागणी करण्यास पूर्ण स्वातंत्र्य असलेल्या कोणत्याही वाटाघाटींच्या परिषदेत काँग्रेस मनापासून भाग घेईल.'[२७]

वरील मागण्यांना ब्रिटिश राजवटीकडून मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक नसल्याने म. गांधी व त्यांनी निवडलेल्या काही सहकाऱ्यांनी मिठाच्या कायद्याचा भंग करून सत्याग्रहाला सुरुवात करावी असे ठरले. वरील चळवळ सुरू करण्याच्या थोडे दिवस आधी गांधींनी व्हाइसरॉयना एक वैयक्तिक पत्र लिहिले. त्यात त्यांनी 'प्रिय मित्र' असेच संबोधन वापरले होते. हे पत्र त्या वेळी भारतात असलेल्या एका पॅसिफिस्ट इंग्लिश तरुणाहाती पाठविण्याची खबरदारीही त्यांनी घेतली होती. महत्त्वाचा मुद्दा असा की, विरुद्ध पक्षात असलेल्या व्यक्तीतल्या 'माणसा'ला केलेले ते आवाहन होते. अधिकारपद विभूषित करण्यातून येणारी संकुचित साचेबंद भूमिका टाकून काँग्रेसने राष्ट्रातर्फे केलेल्या मागण्यांतील न्याय्यपणा व्हाइसरॉयने मन मोठे करून मान्य करावा यासाठी ते आवाहन होते.

त्या पत्रात सुरुवातीच्याच परिच्छेदात म्हटले होते, 'सविनय कायदेभंगाला सुरवात करण्यापूर्वी व गेली काही वर्षे पत्करण्यास धजत नव्हतो (तो धोका) पत्करण्यापूर्वी आपणाकडे काही मार्ग निघतो का ते पाहण्यासाठी तुम्हाला लिहावे असे मला वाटले.

'माझी वैयक्तिक निष्ठा अगदी स्पष्ट आहे. कोणी माझी किंवा माझ्या माणसांची मोठ्यात मोठी आगळीक केली तरी कोणत्याही प्राणिमात्राला, माझ्या मानवी बांधवांना तर नाहीच नाही, जाणूनबुजून इजा करणे माझ्या निष्ठेत बसत नाही. ब्रिटिश राजवट हा मला शाप वाटतो; तरी कोणाही इंग्रजाला दुःख पोचविण्याची माझी मुळीच इच्छा नाही. तसेच एखाद्या इंग्रजाचे भारतात वैध हितसंबंध असतील तर त्यांनाही मी धक्का लावणार नाही.'

व्हाइसरॉयच्या खाजगी चिटणिसांकडून या पत्राला आलेले उत्तर पुढीलप्रमाणे होते : 'हिज एक्सलन्सी व्हाइसरॉयनी आपणाला आपल्या २ मार्चच्या पत्राची मी पोच पाठवावी अशी इच्छा दर्शविली आहे. कायदा मोडला जाईल व सार्वजनिक शांततेला धोका पोचेल अशा मार्गाने आपण जाऊ इच्छिता याचे त्यांना दुःख होते.' थोड्याच

दिवसांनी या पत्राला उद्देशून गांधींनी लिहिले, 'गुडघे टेकून मी भाकरीची भिक्षा मागितली. पण भाकरीऐवजी माझ्या पदरात धोंडा टाकला गेला. इंग्लिश राष्ट्र केवळ सामर्थ्यालाच साद देते. मला व्हाइसरॉयच्या उत्तराचे मुळीच आश्चर्य वाटत नाही. या देशाला गजांआडची तुरुंग-शांतता ही एकच सार्वजनिक शांतता ठाऊक आहे. हा देश म्हणजे एक मोठा तुरुंगच आहे. या देशाचा (ब्रिटिशप्रणीत) कायदा मी अव्हेरतो. माझ्या राष्ट्राची गळचेपी करणाऱ्या या, सक्तीच्या शांततेची शोचनीय कंटाळवाणी चाकोरी फोडणे हे मी माझे पवित्र कर्तव्य मानतो.' २८

शेवटी १२ मार्च १९३० रोजी गांधींनी अहमदाबादहून २०० मैलांवर, समुद्र-किनारी असलेल्या दांडी या खेड्याकडे पायी कूच केले. ५ एप्रिलला ते दांडीला पोचले. प्रत्यक्षपणे मिठाच्या कायद्याचा भंग करण्यास दुसरे दिवशी सकाळी प्रारंभ झाला.

पदयात्रेच्या तीन आठवड्यांच्या या मार्गक्रमणात गांधींनी कित्येक सभांतून भाषणे केली. या सभांना सहस्रावधी स्त्रिया, पुरुष व मुले जमत. या भाषणांचे सविस्तर वृत्तांत देऊन कित्येक वृत्तपत्रे या सत्याग्रहाला देशभर प्रसिद्धी मिळवून देत होती. गांधींनी गुजरातमध्ये मिठाच्या कायद्याचा भंग केल्यानंतर लगेच भारताच्या इतर भागांतही स्वयंसेवकांना तसे करण्याची अनुमती देण्यात आली. मात्र सत्याग्रह करण्यापूर्वी स्वयं-सेवकांना काही अटी पाळण्याची शपथ घ्यावी लागे, व सत्याग्रहाची अहिंसात्मक शिस्त व स्थानिक सत्याग्रह समितीचे नियंत्रण सर्वस्वी स्वीकारण्याचे अभिवचन द्यावे लागे.

स्वयंसेवकांसाठी जे सूचनापत्रक काढले होते त्याचा काही भाग पुढे दिला आहे :

'सध्याची राजवट संपुष्टात आणण्याकरता तनमन वेचीत असतानाच सत्याग्रही स्वयंसेवक विचाराने, वाणीने किंवा कृतीने कोणाही इंग्लिश व्यक्तीला जाणूनबुजून इजा पोचविणार नाही...

१. सत्याग्रही स्वतःच्या मनात क्रोधाला थारा देणार नाही.

२. तो विरोधकांचा क्षोभ सहन करील.

३. तसे करीत असताना विरोधकांचा शारीरिक हल्ला झाल्यास तो सहन करील पण कोणत्याही परिस्थितीत प्रतिहल्ला करणार नाही. क्रोधांध होऊन दिलेले आदेशांचे शिक्षेच्या वा इतर भीतीपोटी तो पालन करणार नाही.

४. जेव्हा एखादा अधिकारी अटक करायला येईल तेव्हा स्वयंसेवक अटक करून घेईल. स्वतःजवळची कसलीही मालमत्ता जप्त करण्याच्या किंवा काढून घेण्याच्या कृतीला तो विरोध करणार नाही.

५. एखाद्या सत्याग्रहीजवळ "विश्वस्त" म्हणून काही मालमत्ता असल्यास ती तो देणार नाही. त्या मालमत्तेचे रक्षण करताना प्राण द्यावा लागला तरी तो देण्याची त्याची तयारी असेल. मात्र कोणत्याच परिस्थितीत तो प्रतिहल्ला

करणार नाही.

६. प्रतिहल्ल्यामध्ये शिव्याशाप देणे व वाईट चिंतणे यांचाही समावेश होतो.

७. म्हणूनच तो विरोधकाचा अपमान करणार नाही व अहिंसा तत्त्वाच्या विरुद्ध असणाऱ्या अलीकडच्या अनेक घोषणा देण्यात भाग घेणार नाही.

८. सत्याग्रही " युनियन जॅक "ला प्रणाम करणार नाही. पण त्याचा, किंवा इंग्लिश वा भारतीय अधिकाऱ्यांचा अपमान करणार नाही.

९. लढा चालू असताना जर कोणी अधिकाऱ्यांचा अपमान करील किंवा त्यांच्यावर शारीरिक हल्ला करील तर सत्याग्रही आपल्या प्राणांचीही पर्वा न करता त्या अधिकाऱ्यांचे अपमानापासून वा हल्ल्यापासून रक्षण करील. '[२९]

काही आठवड्यांतच देशातील सर्व तुरुंग तुडुंब भरले. आणखी कैद्यांना ठेवायला जागा राहिली नाही. परिणामतः अटकसत्र मंदावले आणि त्याऐवजी सत्याग्रही व त्यांचे मित्र यांना दंडुक्यांनी भयंकर मारहाण करण्यास सुरवात झाली. विधिमंडळात विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना, तेवीस वेळा गोळीबाराचा अवलंब केला गेल्याचे व त्यात १०९ लोक ठार व ४२० लोक जखमी झाल्याचे सरकारने मान्य केले.[३०]

बिगरसरकारी चौकशीनुसार हा आकडा खूपच मोठा असल्याचे निष्पन्न झाले. उदाहरणार्थ, पेशावरमध्ये २३ एप्रिल १९३० रोजीचा अधिकृत सरकारी आकडा ३० मृत्यू व ३३ जखमी असा होता. मात्र कॅाँग्रेस वर्किंग कमिटीने वॅ. विठ्ठलभाई पटेल ( कायदेमंडळाचे माजी अध्यक्ष ) यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या ' पेशावर चौकशी समिती 'च्या अहवालाप्रमाणे ' ज्यांच्याविषयी मारले गेल्याचा प्रत्यक्ष पुरावा मिळाला अशांची संख्या १२५ होती; प्रत्यक्षात ही संख्या यापेक्षा किती तरी मोठी असली पाहिजे अशी आमची खात्री आहे. तसेच जखमींची संख्या तर त्याहून फारच जास्त असली पाहिजे. सध्या या प्रांतात असलेल्या राजकीय स्थितीमुळे, वरीलपेक्षा मोठ्या संख्येने लोक मारले गेले वा जखमी झाले ही गोष्ट पुराव्याने सिद्ध करणे अशक्य आहे. २९ एप्रिलनंतरच्या काळात कॅाँग्रेस कमिटीने जो पुरावा गोळा केला होता तो ४ मे रोजी लष्कराने हिसकावून घेतला आणि लष्कराच्या गावातील उपस्थितीमुळे पुढे चौकशी करणे अशक्य झाले. '[३१]

निरनिराळ्या वेळी कमीअधिक प्रक्षोभक स्थितीत सत्याग्रही कसे वागले व स्वयंसेवक म्हणून दाखल झालेल्या लोकांनी त्या प्रसंगी कसा प्रतिसाद दिला हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील कोंताई या गावी कायदेभंग करून मिठाचे उत्पादन करण्याचे काम चालले होते. सुरवातीचे अटकसत्र संपल्यानंतर पोलिसांनी मीठ तयार करण्यासाठी मिरवणुकीने येणाऱ्या सत्याग्रहींना दंडुक्यांनी बडविण्याचा सपाटा

चालविला. रोज सकाळी पाच स्वयंसेवक सत्याग्रह करीत असत. ते माराने जखमी होऊन शेवटी बेशुद्ध पडले म्हणजे त्यांना स्ट्रेचरवरून काँग्रेसनेच चालविलेल्या रुग्णालयात नेण्यात येई. बरे झाल्यावर हे लोक पुन्हा सत्याग्रह करीत.

सत्याग्रह पाहण्यासाठी दररोज सकाळी स्त्री-पुरुषांची मोठी गर्दी जमत असे. सत्याग्रह्यांना आपली सहानुभूती आहे, असे हे बघे लोक म्हणत असले तरी सामान्यतः ते निष्क्रीयच असत. अशी एक प्रकारची कंटाळवाणी कोंडी निर्माण झाली. म्हणून मग स्वयंसेवकांनी एक नवाच पवित्रा घेतला. त्या दिवशी सकाळी नवीन सत्याग्रह्यांचा गट पाठविण्याऐवजी त्यांनी आदल्या दिवशी जखमी झालेल्या पाच लोकांनाच पुन्हा पोलिसांच्या कड्याकडे जाण्याला सांगितले. त्यांपैकी एकाचे सर्व शरीर, व चेहराही, इतके सुजले होते की त्याला डोळेसुद्धा उघडता येत नव्हते. त्याच्या मित्रांना त्याला धरूनच न्यावे लागत होते. या दृश्याने मात्र बघायला आलेल्या लोकांत खळबळ उडाली. जमावातील काही स्त्रिया एकदम पुढे झाल्या व त्यांनी त्या स्वयंसेवकाचा मार्ग रोखून धरला. त्या त्याला मरणाला सामोरे जाऊ देईनात. शिवाय, त्या बायकांनी व इतका वेळ बघ्यांची भूमिका करणाऱ्या गर्दीतील माणसांनी बंदीहुकूम मोडून मीठ करण्याची तयारी दाखविली. आतापर्यंत केवळ स्वयंसेवकांपुरती मर्यादित असलेली सत्याग्रह चळवळ त्या दिवशी, स्वयंसेवक जिवावर उदार होऊन बाहेर पडल्यामुळे, एकदम सार्वजनिक चळवळ झाली.

अशा पराक्रमाच्या गोष्टी भारतातील सर्व भागांत घडू लागल्या. याच वेळी काही अत्यंत धीरोदत्त प्रसंग वायव्य सरहद्द प्रांतात घडले. येथील लोक टोळ्या करून राहतात, व त्यांना एकमेकांशी व ब्रिटिश सरकारशीही सशस्त्र युद्ध करण्याची चांगलीच सवय होती. या पठाण लोकांनी अत्यंत प्रक्षोभक आव्हान मिळूनसुद्धा कमालीची अहिंसक शिस्त दाखवून उदाहरण घालून दिले.

इंग्लिश वृत्तपत्रांच्या बातमीदारांनी ही सत्याग्रह मोहीम ठिकठिकाणी पाहिली. सत्याग्रहात भाग घेणाऱ्या स्वयंसेवकांच्या संयमास व पराक्रमास ते साक्षी राहिले. श्री. एच. एन. ब्रेल्सफोर्ड यांनी स्वतःच्या वैयक्तिक निरीक्षणावर आधारित एक प्रदीर्घ व सविस्तर वृत्तांत १२ जाने० १९३१ च्या 'मँचेस्टर गार्डियन' मध्ये प्रसिद्ध केला. हा लेख काँग्रेसच्या अधिकृत इतिहासात पुनर्मुद्रित केलेला आहे.[३२] 'डेली हेरॉल्ड' या लंडनच्या वृत्तपत्राच्या बातमीदाराने लिहिले होते, 'वडाळ्याभोवती कडे करणाऱ्या टेकड्यांपैकी एका टेकडीवरून मी सर्व प्रसंग पाहात होतो. स्वयंसेवक व सहानुभूतीदार यांच्या त्या स्नेहार्द्र, उत्कट व भारावलेल्या गर्दीत उभे राहून स्वदेशीय शासनसंस्थेचे प्रतिनिधी करीत असलेली हास्यास्पद व लज्जास्पद कृत्ये पाहणे ही गोष्ट इंग्रज माणसाच्या दृष्टीने अत्यंत मानहानिकारक होती.' 'न्यू फ्रीमॅन' पत्रासाठी दुसऱ्या एकाने लिहिले, 'मी गेली अठरा

वर्षे बातमीदाराचे काम करीत आहे. या काळात मी बावीस देश हिंडलो. या काळात मी किती तरी दंगे, बंडाळ्या, रस्त्यांवरील मारामाऱ्या आणि बंडे पाहिली असतील. पण धारासणा येथे पाहिले तसे अंगावर शहारे आणणारे दृश्य मला कोठेच पाहावयास मिळाले नाही. काही वेळा दृश्ये इतकी क्लेशकारक होती की मला तोंड फिरवावे लागले. स्वयंसेवकांची कमालीची शिस्तबद्धता ही एक अत्यंत नवलपूर्ण गोष्ट होती. त्यांनी गांधींच्या अहिंसा तत्त्वाचे सारे सार अंगी बाणविले आहे असे वाटत होते.' ३३

अशा प्रकारे स्वयंसेवक जरी पूर्ण संयमाने वागत होते तरी सरकारी अधिकाऱ्यांच्या क्रूर वागणुकीने सत्याग्रह पाहण्यास आलेली जनता प्रक्षुब्ध होत असे. त्यामुळे अधिकाऱ्यांवर जनतेने काही ठिकाणी सामाजिक बहिष्कार टाकण्याचे प्रकार घडले. एकदा गुजरातमध्ये खुद्द गांधींच्या उपस्थितीत असा प्रकार घडला. त्यांनी तावडतोब पुढील सूचना दिल्या: 'लोकांनी शांतता राखली असली तरी त्यांच्यात क्रोध व द्वेषबुद्धी दिसून येते आहे. अधिकाऱ्यांवर घातलेल्या सर्वंकष सामाजिक बहिष्कारात हिंसा दडलेली आहे. किरकोळ बाबींमध्ये लोक सरकारी अधिकाऱ्यांवर ताशेरे झाडतात, त्यांना त्रास देतात. या मार्गाने आपण यशस्वी होणार नाही.... खेडा जिल्ह्यातील लोकांनी ही सावधगिरीची सूचना लक्षात ठेवावी व बहिष्कार मर्यादेतच ठेवावा. उदाहरणार्थ, मी पूर्वीच सांगितल्याप्रमाणे, गावातील अधिकाऱ्यांवरील बहिष्कार त्यांच्या अधिकारपदाच्या कार्यक्षेत्रापुरताच सीमित असावा. त्यांच्या आज्ञा ऐकू नका, पण त्यांचा अन्नधान्य पुरवठा बंद करू नका. त्यांना घराबाहेर काढून लावू नका. इतक्या संयमाने वागण्यास आपण असमर्थ असलो तर बहिष्कारच सोडून दिला पाहिजे.' ३४

सत्याग्रहींनी दाखविलेल्या तौलनिकदृष्ट्या कमालीच्या संयमाचा परिणाम ही चळवळ चिरडून टाकण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भारतीय सैनिकांवर व शिपायांवर होऊ लागला. गढवाली सैनिकांच्या एका पलटणीने निःशस्त्र लोकांवर गोळीबार करण्यास नकार दिला. परिणामतः त्या पलटणीतील सैनिकांना दीर्घ मुदतीच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली.

प्रत्यक्ष ब्रिटिश जनतेवरही या वर्तनाचा झालेला परिणाम अभ्यासण्यासारखा आहे. सरकारवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही असेच वरकरणी तरी दिसले. पण कित्येक इंग्लिश व्यक्तींची मने सत्याग्रहींच्या मूक व धीरोदात्त वर्तनाने द्रवली. त्यांपैकी पुष्कळांनी उभय पक्षांत समझौता घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. भारतातील ब्रिटिश राज्यसत्तेची लोकप्रियता झपाट्याने कमी झाली. ज्या गोरगरीब जनतेचे प्रतिनिधित्व करण्याचा आपण दावा करतो त्या जनतेच्या मनात आपल्याबद्दल झपाट्याने दुरावा निर्माण होत आहे, याची खुद्द सरकारला जाणीव झाली. म्हणून मग जानेवारी १९३१ मध्ये भारत सरकार व काँग्रेस यांमध्ये एक करार झाला आणि लढा मागे घेतला गेला.

तसेच पुढील शांततेच्या बोलण्यांची पहिली पायरी म्हणून सर्व सत्याग्रही कैद्यांची मुक्तता करण्यात आली.

## अहिंसेची संघटना

वर वर्णिलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न आता उपस्थित करता येईल विरोधकाने दडपशाहीचा अवलंब केल्यास सामान्य जनता किती काळ संयम राखू शकेल ? लोकांनी उलटून प्रतिहल्ला करण्याची कितपत शक्यता राहते ? किंवा सुरुवातीच्या अहिंसक प्रतिकारानंतर त्यांचे नीतिधैर्य खचून चळवळ थंडावण्याची शक्यता किती ?

गांधींच्या नेतृत्वाचा भारतातील अनुभव एकंदरीत संमिश्र आहे. मोहिमेतील आघाडीचे पुढारी जर कणखर असतील व संयम राखतील तर त्यांच्यामागे असलेल्या जनतेला त्यांच्या उदाहरणाने धीर येतो. जनताही मग जवळजवळ पुढाऱ्यासारखीच स्थिरचित्त राहते. पण असे पुढारी काढून घेतले किंवा असे पुढारी नसतीलच तर जनतेचा निग्रह खचतो, प्रतिकार क्षीण होतो, भीतीचे सावट पडते, व त्यामुळे चळवळ कोसळते; किंवा प्रसंगी सहनशक्तीचा अंत होऊन जनता हिंसाचाराचा अवलंब करते, असे दिसते.

१९४२ मध्ये " भारत छोडो " चळवळीच्या वेळी पश्चिम बंगालच्या मिदनापूर जिल्ह्यात स्थानिक ब्रिटिश शासनयंत्रणेस धाब्यावर बसवून एक " राष्ट्रीय सरकार " स्थापन केले गेले होते. खेड्यातील हजारो निःशस्त्र स्त्री-पुरुष हे या सरकारचे सैन्य होते. हे सैन्य शांतपणे संचलन करून पोलिस चौक्यांवर " चालून " जात असे. पोलिस चौक्या हीच खेड्यांतील ब्रिटिश साम्राज्याची खूण आणि सत्तेची जागा होती. अशा मोर्च्यांवर चौकीतील सशस्त्र पोलिस गोळीबार करीत. त्यात काही लोक ठार वा जखमी होत. इतके झाल्यावर पोलिस माघार घेऊन निघून जात. जनता चौकीचा ताबा घेई. कधी कधी त्यांना चौकीत काही बंदुका मिळत. अशा वेळी लोकांना दिलेल्या सूचनांप्रमाणे त्यांची मोडतोड करून त्या निकामी केल्या जात अथवा आसपासच्या तळ्यात फेकून दिल्या जात. शिस्तीच्या बंधनामुळे सत्याग्रह्यांना त्या बंदुकांचा स्वतःसाठी उपयोग करता येत नसे.

नोव्हेंबर १९४५ व फेब्रुवारी १९४६ या काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांनी कलकत्याच्या धरमताला विभागात प्रवेश करण्यावर बंदी घातली होती. तेथे सभा घेऊन मुंबईच्या आरमारी बंडाला सहानुभूती दाखवून त्या बंडखोरांतर्फे न्यायाची मागणी करण्याचे निदर्शकांनी ठरविले होते. रस्त्यात एका ठिकाणी सशस्त्र पोलिस रस्ता अडवून उभे होते. लोक मिरवणुकीने येत होते. त्यांचा मोर्चा शांतपणे पुढे पुढे येत होता. त्यांच्या हातात ध्वज होते. प्रथम लोक पोलिसांपासून थोड्या अंतरावर रस्त्यातच बसले. नंतर

त्यांच्यातील एक टोळी प्रत्यक्ष शिपायांच्या ओळीकडे जाऊ लागली. तावडतोब गोळी-बाराला सुरुवात झाली. त्यात काही ठार झाले व बरेचजण जखमी होऊन पडले. त्यानंतर उडालेल्या गोंधळात एका गोऱ्या सार्जंटाच्या एकाएकी लक्षात आले की आपण अगदी गर्दीत सापडलो असून पिस्तुलातील सर्व काडतुसे संपलेली आहेत. त्याची ही स्थिती एका स्वयंसेवकाच्या लक्षात आली. स्वतः तो स्वयंवसेवक मांडीत गोळी लागून जखमी झाला होता. तशा स्थितीतही त्याने भोवतालच्या क्षुब्ध जनतेला शांत करण्याचा प्रयत्न केला, इतकेच नव्हे तर त्याने त्या सार्जंटला उचलून इतर पोलिस होते तिकडे फेकले.

अहिंसक शिस्तीचे औपचारिक धडे न मिळालेली माणसेसुद्धा संकटाच्या वेळी अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे धैर्य दाखवू शकतात, असे गांधींचे ठाम मत होते. मात्र संकटपरंपराच कोसळल्यास लोक अहिंसेच्या भूमिकेवर किती काळ टिकून राहतील हा प्रश्न तरीही शिल्लक राहतोच. १९३१ मध्ये राष्ट्रीय लढा मागे घेतला गेला, १९३२ मध्ये त्याचे पुनरुज्जीवन केले गेले, पण लढा करणाऱ्यांना १९३३ पर्यंत जवळजवळ पूर्ण पराभव पत्करावा लागला. त्यानंतर देशाच्या निरनिराळ्या भागांत लहान प्रमाणावर हिंसाचारी वर्तन घडत राहिले. ज्यांनी अहिंसेची शिस्त कधी स्वीकारलीच नव्हती असे काँग्रेसच्या बाहेरचे क्रांतिकारी पक्ष सरकारच्या दडपशाहीमुळे हिंसाचाराला अधिकच प्रवृत्त झाले. सामान्य जनतेने या हिंसक चळवळीत सक्रीय भाग घेतला नाही व ती संयमित राहिली हे खरे. अहिंसक लढा अयशस्वी झाल्यानंतर माजलेल्या हिंसक बंडाळीला पायबंद घालण्याचे सामर्थ्य सत्याग्रही स्वयंसेवकांच्या काय, किंवा सामान्य जनतेच्या काय, कोणाच्याच अहिंसेत नव्हते. म्हणजेच त्यांची अहिंसा दुर्बलांची अहिंसा ठरली होती.

या दुबळेपणाची उदाहरणे प्रत्यक्ष काँग्रेसजनांतही दिसून येत होती. काँग्रेस संघट-नेतील बहुसंख्य सभासदांनी गांधींच्या अहिंसाविषयक तत्त्वज्ञानाचा कधी खऱ्या मनाने स्वीकारच केला नव्हता. जुलै १९४० मध्ये, भारताने लोकशाही राष्ट्रांच्या बाजूने महा-युद्धात भाग घ्यावा अशी बाजू काँग्रेसमधील एका प्रमुख गटाने मांडली होती. पक्षाच्या तत्कालीन अध्यक्षांनी दिलेल्या एका भाषणात म्हटले होतेः ' आम्हाला माहीत आहे की दारूगोळा आणि शस्त्रास्त्रे यांनी फ्रान्स, हॉलंड, बेल्जियम किंवा नॉर्वे यांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करता आलेले नाही. पण आम्हाला हेही माहीत आहे की सशस्त्र प्रतिकाराचा फोलपणा कळूनसुद्धा मानवी स्वभाव शस्त्रबळाचा त्याग करण्यास तयार होत नाही. या देशात शस्त्रसज्ज सैन्याचा आधार न घेताच राज्यसत्ता संघटित करू असे जाहीर करण्याचे धैर्य आम्ही करू शकत नाही. आम्ही तसे करू तर ती चूक ठरेल. महात्मा-जींना जगाला अहिंसेचा संदेश द्यायचा आहे. तेव्हा अहिंसेचा प्रचार करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. आम्हाला मात्र, ( काँग्रेसमध्ये जमलेले ) हिंदी राष्ट्राचे प्रतिनिधी या भूमिकेतून विचार केला पाहिजे. इंडियन नॅशनल काँग्रेस ही एक राजकीय संघटना आहे.

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्याची तिची प्रतिज्ञा आहे. ती काही जगात शांतता निर्माण करण्यासाठी स्थापन झालेली संस्था नाही.' ३५

यामुळे लोक गांधींना विचारू लागले की, तर मग स्वतःच्या विचारांशी पूर्णपणे सहमत असणाऱ्या लोकांची वेगळीच संघटना स्थापण्याचे प्रयत्न त्यांनी का केले नाहीत? याला उत्तर देताना एप्रिल १९४२ मध्ये गांधी लिहितात, 'प्राप्त परिस्थितीत स्वातंत्र्य संपादनाचे सर्वांत सोयीस्कर व फायदेशीर साधन म्हणून अहिंसेची मी काँग्रेसला शिफारस केली ते मी बरोबरच केले, या माझ्या मताला मी अद्यापही चिकटून आहे. राजकारणात अहिंसा प्रविष्ट करावयाची तर यापेक्षा मी काही वेगळे करू शकलो नसतो. दक्षिण आफ्रिकेतही "एक सोयिस्कर साधन" म्हणूनच मी अहिंसेच्या उपयोगाला प्रारंभ केला. स्वयंसेवक मोजकेच असून ते लहानशाच भागावर केंद्रित झालेले असल्याने त्यांच्यावर नियंत्रणही चांगले ठेवता आले म्हणून तेथे ते यशस्वी झाले. एका विशाल भूप्रदेशावर असंख्य माणसे विखुरलेली आहेत अशी भारतात स्थिती होती. त्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे किंवा त्यांना शिकवून तयार करणे सोपे राहिले नाही. असे असूनही येथील लोकांनी जो प्रतिसाद दिला तो आश्चर्यकारक आहे असेच म्हटले पाहिजे. यापेक्षा जास्त चांगली साथ ते देऊ शकले असते आणि अधिक फळ पदरात पाडून घेऊ शकले असते हे खरे; पण आज दिसत असलेल्या परिणामानेही माझ्या मनात निराशेची भावना मुळीच आलेली नाही. निष्ठा म्हणून अहिंसेचा स्वीकार करणाऱ्यांनाच फक्त घेऊन मी निघालो असतो तर मी एकटाच उरलो असतो अशी शक्यता आहे. मी स्वतः अपूर्ण आहे, आणि माझ्यासारख्याच अपूर्ण स्त्री-पुरुषांना बरोबर घेऊन मी या अज्ञात सागरावरील प्रवासाला निघालो. माझी होडी इच्छित स्थळी पोचली नसली तरी ती तुफानांना तोंड देण्याइतकी भक्कम ठरली याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतो.

'अहिंसेचा मार्ग राष्ट्रापुढे ठेवण्याचे काम माझ्यावर सोपवून ईश्वराने माझ्यावर कृपाच केली आहे. बऱ्यावाईट कशाही कारणांनी का होईना, काँग्रेसने त्या मार्गाचा स्वीकार केला आहे. काँग्रेससारख्या निर्विवादपणे सर्वांत मोठ्या व लोकप्रिय पक्षाने गेली एकोणीस वर्षे सातत्याने व आपल्या कुवतीनुसार अहिंसेच्या तत्त्वाने वागण्याचा प्रयत्नही केला आहे.

'काँग्रेसने माझी भूमिका सर्वस्वी स्वीकारली नाही म्हणून मी काँग्रेसशी असलेला माझा संबंध तोडून तिला मार्गदर्शन करण्याचे नाकारायला हवे होते असे मला प्रश्न विचारणाऱ्या सुविद्य टीकाकाराला सुचवायचे नाही अशी मला आशा आहे. माझ्याशी संबंधित असल्यामुळे काँग्रेसला सांघिक अहिंसेच्या तंत्राचा पाठपुरावा करता आला आहे.

'मजप्रमाणे ते अहिंसेचे अधिक व्यापक व खोल पातळ्यांवर उपयोजन करीत नाहीत, त्याबाबत माझे अनुकरण करीत नाहीत, म्हणून मी माझ्या उत्तम सहकाऱ्यांना वाऱ्यावर सोडून देईन तर त्याद्वारे मी अहिंसेच्या ध्येयाची अधिक सेवा करीन असे मुळीच नाही. अहिंसक मार्गावरून त्यांची च्युती तात्कालिकच असेल, आणि अगदी लहानशा, मर्यादित क्षेत्रापुरताच त्यांचा अहिंसक मार्गाचा त्याग सीमित राहील असा विश्वास बाळगून मी त्यांची साथ कायम ठेवणार आहे.'[३३]

भारतातील अहिंसक चळवळींच्या एका प्रमुख गुणवैशिष्ट्याकडे मुद्दाम लक्ष वेधणे आवश्यक आहे. कायदेभंगाच्या चळवळीच्या ओघात घडणाऱ्या प्रत्येक हिंसक कृत्यावर गांधी डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवीत असत. चळवळ हिंसक प्रवृत्तीकडे झुकत आहे असे लक्षात येताच ते तिच्या कार्यक्रमात, तंत्रात काही तरी ठळक बदल करीत (उदाहरणार्थ १९३० साली धारासणा मिठागरावरील सत्याग्रहाचे वेळी जखमी सत्याग्रहींनाच पुन्हा पाठविण्याचे तंत्र), किंवा चळवळ तात्पुरती स्थगित करीत (उदाहरणार्थ १९२२ चा बार्डोली सत्याग्रह), किंवा चळवळ सार्वजनिक पातळीवरून वैयक्तिक पातळीवर आणीत (उदाहरणार्थ १९३३ चा सत्याग्रह), किंवा काँग्रेसजनच हिंसेला उत्तेजन देत आहेत किंवा ती चालवून घेत आहेत असा त्यांना संशय आला तर, प्रसंगविशेषी, ते काँग्रेसजनांविरुद्धच उपोषण करीत. गांधींच्या या असामान्य जागरूकतेचा असा परिणाम झाला की त्यांच्या अनुयायांची त्यांच्यावरील निष्ठा व आज्ञाधारकता खूपच वाढली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांची स्वतःचीही नैतिक उंची वाढली. मात्र याचा आणखीही एक परिणाम झालेला दिसतो. तो म्हणजे खालच्या पुढाऱ्यांची अभिक्रमशीलता नाहीशी झाली. गांधींनी हाती घेतलेले कार्य अंतिमतः न्याय्य आहे असा त्यांचा विश्वास टिकून असेपर्यंत, ते त्यांच्या आदेशांचे पालन करण्यातच समाधान मानू लागले. स्वतःहून पुढाकार घेऊन काही करण्याची इच्छा वा कुवत त्यांच्यात राहिली नाही.

वैचारिकदृष्ट्या पाहता सत्याग्रहाच्या संघटनेतून अधिकाराचे अधिकाधिक विकेंद्रीकरण झाले पाहिजे. पण निदान भारतीय उदाहरणात तरी त्यामुळे स्थानिक पातळीवरील अभिक्रमशीलता नष्ट झाली, चिकित्सक विचारशक्ती दिवसेंदिवस क्षीण होत गेली आणि अधिकाराचे, त्या अधिकाराची जातकुळी नैतिक होती हे खरे असले तरी, केंद्रीकरणच झाले.

याचे स्पष्टीकरण कदाचित असेही असेल की दीर्घ परकीय अंमलामुळे भारतीयांच्या अभिक्रमशीलतेची दीर्घकाळ उपासमार झाली होती; किंवा असेही असेल की, येथील एकत्र कुटुंबपद्धतीत काय, गावातील पंचायतीत काय किंवा जातिपातीत काय वडिल-धाऱ्यांचेच वर्चस्व असल्यामुळे लोकांना अधिकारवादी सत्तेचीच, आज्ञा मानण्याचीच

सवय झालेली असेल.

## अहिंसेचे अर्थशास्त्र

आणीबाणीच्या वेळी वेचक पुढाऱ्यांनी आपल्या नेतृत्वाने लोकांना अहिंसेच्या तंत्रात प्रवीण करावयाचे याशिवाय लोकांच्या प्रशिक्षणाची आणखीही एक योजना गांधींजवळ होती. इंग्लंडचे व्यापारी हितसंबंध साधण्यासाठी मुद्दामच भारतात राज्यसत्तेचे केंद्रीकरण करण्यात आले आहे हा ब्रिटिश साम्राज्यावरील गांधींच्या टीकेचा एक भाग होता. येथील ग्रामराज्ये नष्ट करण्यात आली. उत्पादनाची योजना स्थानिक गरजांनुसार करण्याऐवजी दूरवर शहरात राहणाऱ्या लोकांच्या हितसंबंधांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने व केवळ फायद्यावर बोट ठेवून होऊ लागली.

हे सर्व पाहूनच गांधींनी राजकीय कार्यकर्त्यांना 'रचनात्मक कार्यक्रम' अमलात आणून लोकशाहीची आर्थिक पायाभरणी करण्याचा सल्ला दिला होता. त्यात १९४१ पर्यंत एकूण अठरा गोष्टींचा समावेश केलेला होता. त्यांतील एक बाब 'आर्थिक समता' ही होती. तिचे वर्णन स्वतः गांधींनीच 'अहिंसात्मक स्वराज्याची गुरुकिल्ली' असे केले होते.[३७]

गांधींचा यंत्रावर अविश्वास होता असे नाही. खेड्यात वीज वापरण्यालाही त्यांचा विरोध नव्हता. मात्र त्यांचा असा कटाक्ष होता की, उत्पादनाची यांत्रिक वा केंद्रीकृत साधने राष्ट्राच्या किंवा स्थानिक लोकमंडळाच्या ताब्यात असली पाहिजेत. त्यांचा उपयोगही वैयक्तिक फायद्यासाठी न करता लोकांचे कष्ट कमी करण्याकडे झाला पाहिजे. आवश्यक त्या आंतर-प्रादेशिक विनिमयाचे ते स्वागतच करीत. मात्र हे सहकार्य स्वेच्छेने व समानतेच्या भूमिकेवरून व्हावे असे त्यांना वाटे.

'खेड्यांची पिळवणूक थांबली तरच त्यांचे पुनरुत्थान होईल' असे त्यांनी १९३६ मध्येच सांगितले होते. 'प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या कारखानदारीमुळे खेड्यातील लोकांची अपरिहार्यपणे पिळवणूक होईल. कारखानदारीबरोबर स्पर्धा व बाजारपेठ यांचे प्रश्न उपस्थित होतात व त्यांना तोंड न देता आल्याने खेड्यांतील उद्योगधंदे मोडकळीस येतात. यासाठी आपण मुख्यतः खेडे स्वयंपूर्ण करण्यावर व प्रामुख्याने स्थानिक उपभोगाच्या दृष्टीने उत्पादन करण्यावरच भर दिला पाहिजे. खेड्यातील उद्योगधंद्यांचे हे स्वरूप जर टिकवता आले तर त्यांनी त्यांना बनवता येतील व परवडतील अशी आधुनिक यंत्रे व अवजारे वापरावयाला मुळीच हरकत नाही. अट फक्त ही की, त्यांनी यंत्रांचा उपयोग इतरांची पिळवणूक करण्याकडे करता कामा नये.'[३८]

'आपल्या प्राणभूत गरजांसाठी पूर्णतया स्वायत्त व स्वावलंबी, पण जेथे परावलंबन

आवश्यक आहे अशा इतर अनेक बाबतींत इतर खेड्यांबरोबर परस्परावलंबी, अशी माझी ग्रामस्वराज्याची कल्पना आहे.' ३९

गांधींना १९३४ मध्ये असा एक प्रश्न विचारण्यात आला होता की, खेड्यातील लोकांचे सामर्थ्य संघटित करण्यासाठी व त्यांना शिस्त लावण्यासाठी, खादी व इतर ग्रामोद्योगांची निर्मिती या अप्रत्यक्ष मार्गाचा अवलंब करण्यापेक्षा, स्थानिक स्वरूपाचे लहान लढे सुरू करणे हे अधिक प्रभावी साधन नाही का? हा प्रश्न व त्याचे उत्तर येथे जसेच्या तसे देत आहे.

'**प्रश्न** : जनतेचे सामर्थ्य वाढविण्याकरिता वा लोकांत सहकार्याची एक जाणीव निर्माण करण्याकरता, खादीचे कार्य करण्यापेक्षा भांडवलदारीविरुद्ध स्थानिक व विशिष्ट प्रश्नांवरून लहानसहान लढे उभारणे अधिक इष्ट होणार नाही काय? या दोन्हींतून निवड करायची वेळच आली तर आम्ही कोणता मार्ग निवडावा? गावातील सावकाराशी किंवा जमीनदाराशी एखाद्या प्रश्नावर – उदाहरणार्थ, व्याजाचा दर कमी करून घेणे किंवा शेतकऱ्याने स्वतःसाठी ठेवून घेण्याच्या धान्याचे प्रमाण वाढवून घेणे – झगडताना खादी कार्यक्रमाद्वारे झालेल्या सर्व कार्यावर पाणी सोडण्याची वेळ आली, विशेषतः खादीच्या कार्यातून लोकसंघटन करण्याच्या पद्धतीपेक्षा अशा लढ्यांतून लोकांमध्ये अधिक आत्मविश्वास निर्माण होत असेल, तर आम्ही काय करावे?

'**उत्तर** : प्रश्नाच्या शेवटी टाकलेला पेच निर्णयात्मक उत्तर देण्याच्या दृष्टीने अवघड आहे. अहिंसक मोहिमेला आवश्यक असलेला निर्धार आणि धैर्य स्थानिक व विशिष्ट प्रश्नांवरील लढे उभारून निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे की नाही, याचा निवाडा मला होत नाही. पण ती शक्यता मी मान्य केली तर त्या परिस्थितीत खादीचा बळी द्यावा लागेल. तरी अहिंसक प्रतिकारपद्धतीचा एक तज्ज्ञ व व्यावहारिक अनुभव गाठीस असलेला एक मित्र या नात्याने मी तुम्हाला असा सल्ला देईन की लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी व राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी तुम्ही त्या मार्गाचा अवलंब न करणेच बरे.

'आपण अहिंसक मार्गाने स्वातंत्र्यप्राप्तीचा संग्राम लढत आहोत. भारताच्या निरनिराळ्या भागांत अनेक कार्यकर्ते तुम्ही म्हणता तशा स्थानिक लढ्यांत गुंतून पडले तर खरी वेळ येईल तेव्हा देशातील सर्व लोक स्वराज्याच्या संग्रामासाठी एकत्र येऊ शकणार नाहीत. सविनय कायदेभंगाची देशव्यापी चळवळ सुरू करण्याआधी लोकांना सविनय वा ऐच्छिक आज्ञापालन म्हणजे काय हे शिकले पाहिजे. आपण सरकारी आज्ञांचे पालन करतो ते भीतीमुळे. सरकारविरुद्ध आपली प्रतिक्रिया हिंसा किंवा लाचारी (म्हणजेच भ्याडाची प्रच्छन्न हिंसा) या स्वरूपाची होते. स्वतःच उभ्या केलेल्या संस्थेशी सविनय आज्ञाधारक कसे राहावे हे खादीच्या कार्यातून लोकांना आपण शिकवीत आहोत.

ही कला त्यांना अवगत झाली म्हणजे मगच नको असलेल्या गोष्टी अहिंसक मार्गाने नष्ट करण्यासाठी त्यांना यशस्वीपणे सविनय कायदेभंगही करणे जमेल. म्हणूनच माझे सर्व कार्यकर्त्यांना सांगणे आहे की आपले लढाऊ सामर्थ्य सर्व प्रकारच्या, अनेक लहान-लहान आघाड्यांवर लढे देण्यात वाया न घालवता, अहिंसात्मक असहकाराचा यशस्वी लढा देण्यासाठी लागणारी मनोभूमिका निर्माण करण्याचे शिक्षण खादीच्या शांततामय कार्याद्वारे देण्यात आपली शक्ती त्यांनी केंद्रित करावी. आपले शोषण होत आहे याचे भान लोकांना आहे. त्यामुळे परदेशी कपड्यावरील बहिष्काराची पिकेटिंग चळवळ चटकन हिंसक वळण घेण्याचा धोका आहे; उलट खादीची चळवळ स्वाभाविकच आणि सर्वस्वी अहिंसक राहील.' ४०

मानवी समाजात मालमत्तेचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा असल्यामुळे याविषयीच्या गांधींच्या कल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे. त्यानंतर आपण गांधींचे आंतरराष्ट्रीय झगडे सोडविण्यासंबंधीचे मत पाहू. खाली दिलेली प्रश्नोत्तरे फेब्रुवारी १९४२ मध्ये ' हरिजन ' साप्ताहिकामधून प्रसिद्ध झाली होती.

**प्रश्न :** जोपर्यंत मालकीच्या वस्तू आहेत तोपर्यंत काही झाले तरी त्यांचे रक्षण हे केलेच पाहिजे हे आपल्या कसे लक्षात येत नाही ? त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हिंसा टाळलीच पाहिजे हा आपला आग्रह अगदी निरुपयोगी आणि निरर्थक आहे. मला असे वाटते की अहिंसेचे पालन फक्त काही निवडक व्यक्तींनाच शक्य होईल.

**उत्तर :** ...माझा तर असा दावा आहे की, आजची समाजरचना अहिंसेच्या जाणीवपूर्वक केलेल्या स्वीकारावर आधारित नसूनसुद्धा, सर्व जगभर माणसे जगतात व आपापली मालकी टिकवून धरतात ती परस्परांशी जुळवून घेण्याच्या वृत्तीतूनच. तसे नसते तर अगदी थोडी, सर्वांत क्रूर माणसेच जगाच्या पाठीवर राहिली असती. पण तसे झालेले नाही. प्रेमाच्या बंधनांनी कुटुंबे एकत्र बांधलेली असतात. त्याचप्रमाणे ' राष्ट्र ' या संज्ञेने संबोधल्या जाणाऱ्या सभ्य समाजातील गटही प्रेमामुळेच एकत्र राहात असतात. फक्त त्यांना अहिंसा तत्त्वाच्या सर्वश्रेष्ठपणाची जाणीव झालेली नसते. याचाच अर्थ त्यांनी या तत्त्वाच्या विशाल सामर्थ्याचा शोधच घेतलेला नाही. मी असे म्हणेन की, ज्यांनी सर्व-संगपरित्याग केलेला आहे व तदनुषंगिक संयमाची प्रतिज्ञा केलेली आहे त्यांनाच संपूर्ण अहिंसा आचरता येईल असे आपण केवळ बुद्धिमांद्यामुळेच इतके दिवस म्हणत आलो आहोत. जे अहिंसेचे निष्ठावंत उपासक आहेत त्यांनाच याबाबत संशोधन करून मानवमात्राचे शासन करणाऱ्या या महान चिरंतन नियमाच्या उपयोजनेच्या नव-नव्या शक्यता वेळोवेळी स्पष्ट करता येतील हे खरे असले तरी, जर तो नियम असेल तर तो सर्वांनाच लागू पडला पाहिजे. अनेक प्रसंगी हा नियम अयशस्वी ठरल्याचे आपण पाहतो. ते अपयश त्या नियमाचे नसून त्याचे पालन करणाऱ्या अनुयायांच्या दुबळेपणाचा

तो परिणाम असतो. त्यांपैकी कित्येकांना तर, आपली इच्छा असो वा नसो, आपण या नियमांच्या अधीन आहोत हे कळलेले नसते. अनेक अपयशे पदरी आली तरी, हे अहिंसेचे तत्त्व जाणीवपूर्वक स्वीकारले जावे व निष्ठेने आचरणातही आणले जावे या गोष्टीचा पुरस्कार मी गेली पन्नास वर्षे करीत आहे. पन्नास वर्षांच्या कार्याच्या ओघात मला उत्तम परिणाम दिसून आला आहे. त्यामुळे माझी निष्ठा अधिकच बळकट झाली आहे. माझा असा दावा आहे की, अहिंसेच्या सतत आचरणामुळे आपण अशी स्थिती निर्माण करू की कायदेशीर मालमत्तेची सर्व लोक स्वतः होऊनच प्रतिष्ठा करतील. अशी मालमत्ता शोषणाने कलंकित झालेली नसेल हे निःसंशय. अशी मालमत्ता सभोवती भरून राहिलेल्या विषमतेचे निर्लज्ज प्रदर्शन नसेल. शिवाय, बेकायदेशीर व अन्याय्य मार्गांनी संपादित केलेल्या मालमत्तेच्या प्रश्नाने अहिंसेच्या उपासकाची छाती दडपून जाण्याचे कारण नाही. त्याच्या दिमतीला सत्याग्रह आणि असहकार ही दोन अमोघ अहिंसक अस्त्रे आहेतच. ही दोन्ही अस्त्रे प्रामाणिकपणे व योग्य प्रमाणात वापरल्यास ती हिंसेची जागा व्यवस्थितपणे घेऊ शकतात, हे आतापर्यंत दिसून आले आहे.' [४१]

## राष्ट्रऋण

संस्कृत भाषेत 'हितोपदेश' नावाचा लहानलहान उपदेशपर नीतिकथा सांगणारा एक ग्रंथ आहे. त्यात एक पुढील अर्थाचा श्लोक आहे : सर्व कुटुंबासाठी एका व्यक्तीचा त्याग करावा; सर्व गावासाठी एखाद्या कुटुंबाचा त्याग करावा; देशासाठी एखाद्या गावाचा त्याग करावा, आणि आत्म्यासाठी सर्व जगाचाही त्याग करावा. [४२] हाच श्लोक चाणक्याच्या नावाशी निगडित असलेल्या नैतिक उपदेशाच्या प्राचीन संग्रहातही आलेला आहे. एकंदरीत भारतीय परंपरेचा एक पैलूच या श्लोकाने सांगितला आहे.

गांधींनी या श्लोकाचा उपयोग करून त्याला एक नवाच अर्थ कसा दिला हे पाहणे उद्बोधक ठरेल. समाजाची सेवा करणे हा सर्वश्रेष्ठ गुण आहे असे त्यांनी मानले. आपल्या १९२५ च्या एका भाषणात ते म्हणतात, 'आम्हाला आमच्या देशाचे स्वातंत्र्य हवे आहे ते दुसऱ्या देशाचे नुकसान वा शोषण करून किंवा त्यांचा अधःपात व्हावा म्हणून नको. भारताचे स्वातंत्र्य म्हणजे इंग्लंडचा विनाश किंवा इंग्लिश माणसाचा सर्वनाश ठरणार असेल तर मला ते नको आहे. मला माझ्या देशाचे स्वातंत्र्य अशासाठी हवे आहे की इतर देशांनी या देशापासून काही शिकावे; अशासाठी की माझ्या देशाची साधनसंपत्ती साऱ्या मानवजातीच्या सेवेसाठी वापरता यावी. कुटुंबासाठी एखाद्या व्यक्तीने मेले पाहिजे, गावासाठी कुटुंबाचे दान दिले पाहिजे, प्रांतासाठी जिल्ह्याने व देशासाठी तर प्रांतानेही मेले पाहिजे अशी शिकवण देशभक्तीची प्रणाली आम्हाला देत आहे.

त्याचप्रमाणे सर्व जगासाठी जरूर पडल्यास देशाने स्वतःस समर्पित करावे यासाठी तो देश आधी स्वतंत्र असला पाहिजे. यासाठी आम्हाला स्वातंत्र्य हवे आहे.'[४३]

या वृत्तीतूनच ते पुढे म्हणाले की, 'राष्ट्रांनी आखलेल्या सरहद्दी ओलांडून आमच्या शेजाऱ्यांची आम्ही सेवा करू. या सरहद्दी काही देवाने आखून दिलेल्या नाहीत.'[४४]

कोणत्याही वस्तूवर केवळ स्वतःपुरती, राखीव मालकी ही भूमिका आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जशी चुकीची आहे तशीच ती खाजगी जीवनाच्या क्षेत्रातही चुकीची आहे असे गांधींचे मत होते. एखादी वस्तू सर्वांना पुरेल इतकी नसेल तर सर्वांनीच पोटाला चिमटा घ्यायला पाहिजे. आपल्यापोट्या राखीव मालकीच्या आग्रहापोटीच अनेक युद्धे झाली आहेत. प्रत्येक राष्ट्राने योगायोगाने ठरलेल्या त्याच्या भौगोलिक सीमांमध्ये असलेली साधनसंपत्ती अखिल मानवजातीसाठी विश्वस्त म्हणून बाळगली तर झगड्यांची कितीएक कारणे आपोआप नाहीशी होतील. काही राष्ट्रांना ही गोष्ट पटली आणि त्यांनी तसे आचरण सुरू केले, पण इतर काहींना ती पटली नाही व त्यांनी जागतिक शांततेत अडथळे उत्पन्न करण्यास सुरवात केली, तर खाजगी तंट्यांत किंवा लहानमोठ्या सार्वजनिक तंट्यांत वापरावयाच्या मार्गांनीच तशा राष्ट्रांचे मानसपरिवर्तन घडवून आणले पाहिजे, असे त्यांचे मत होते.

कोणत्याही प्रश्नाच्या मानवी पैलूकडे पाहण्याचा आग्रह गांधी धरीत असत. कोणताही अमूर्त वैचारिक संघर्ष किंवा हितसंबंधांचा झगडा त्यात गुंतलेल्या माणसांच्या आवाक्यात येईल व वाटाघाटींनी सोडविता येईल अशा पातळीवर ते आणून ठेवीत. यातच गांधींचे खास भारतीयत्व दिसून येते. ग्रामीण भारतातील पंचायतपद्धतीत कोणत्याही प्रश्नाचा विचार सहजच त्या प्रश्नात गुंतलेल्या माणसांच्या संदर्भात करता येई. कारण एक तर तेथील प्रश्न मुळात लहान प्रमाणावरच असत. शिवाय उभय पक्ष व न्याय देणारे पंच एकमेकांच्या चांगल्या माहितीचे असत. परस्परांना न ओळखणारी व एकमेकांविषयी सहानुभूती न बाळगणारी असंख्य माणसे गुंतलेली आहेत अशा विराट प्रश्नांच्या सोडवणुकीतही या रीतीचा अवलंब करण्याचा प्रयत्न करण्यात गांधींची प्रतिभा दिसून येते.

## राष्ट्रीयीकरण आणि आंतरराष्ट्रीयीकरण

१९३९ मध्ये महायुद्ध सुरू झाले तेव्हा आपली सहानुभूती इंग्लिश राष्ट्राला असल्याचे गांधींनी स्पष्टपणे जाहीर केले. त्यामुळे देशात बरेच गैरसमज पसरले. तेव्हा आपल्या मताच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनी लिहिले : 'माझी सहानुभूती कोणाच्या बाजूने आहे

याबद्दल इंग्लिश माणसांनी, कॉंग्रेसजनांनी किंवा ज्या कोणापर्यंत माझा आवाज पोचत असेल त्यांनी मुळीच संदेह बाळगू नये. माझी सहानुभूती ब्रिटिशांकडे आहे याचा अर्थ मी ब्रिटिशांवर प्रेम करतो व जर्मनांचा द्वेष करतो असे नाही. सारे जर्मन वा इटालियन राष्ट्र इंग्रजांपेक्षा वाईट आहे असे मला वाटत नाही. आपण सर्वजण एकाच रंगाने रंगलेलो आहोत. आपण सर्वजण एकाच विशाल मानवी कुटुंबातील माणसे आहोत. त्यात भेद करण्याचे मी नाकारतो. हिंदुस्थानातील लोकांच्या श्रेष्ठत्वाचाही दावा मला सांगावयाचा नाही. आमच्या अंगी तेच गुण आणि तेच दोष आहेत. मानवजातीची अशी काही हवाबंद कप्प्यांतून विभागणी झालेली नाही की कोणाचा गुण व वाण दुसऱ्यास लागणार नाही. ते हजार वेगवेगळ्या खोल्यांत राहात असतील पण ते सर्व एकमेकांचे नातलगच आहेत. मी असे कधीच म्हणणार नाही की, "भारत तेवढा माझा...बाकी जग गेले खड्ड्यात." भारत माझे सर्वस्व असेल पण जगातील इतर राष्ट्रांच्या कल्याणाची पण मी चिंता वाहीन. केवळ भारतनामक लहानशा भूपृष्ठावर राहणाऱ्या नव्हे तर साऱ्याच जगातील मानवी कुटुंबाबद्दल सदिच्छा असली तरच माझा भारत आणि त्याचे स्वातंत्र्य मी अबाधित राखू शकेन.' [४५]

वरील प्रकारचेच मत गांधींनी १९२४ मध्येही व्यक्त केले होते : 'इतरांशी काही कर्तव्य असणार नाही असे स्वातंत्र्य संपादणे हे काही जगातील राष्ट्रांचे ध्येय होऊ शकत नाही; स्वेच्छेवर आधारित परस्परावलंबन हे त्यांचे स्वाभाविक ध्येय असले पाहिजे.' [४६]

## अहिंसक संरक्षणाचा कार्यक्रम

जे राष्ट्र शस्त्रबळाने आपले संरक्षण करण्याची इच्छा करते त्याला स्वाभाविकच बरीच तयारी करावी लागते. स्वतःचे औद्योगिक सामर्थ्य उभे करावे लागते. सैन्य उभारून त्याला शिक्षण द्यावे लागते. मोक्याच्या जागा व्यापणाऱ्या अन्य राष्ट्रांशी करार करावे लागतात, इत्यादी. पुरेशी तयारी केल्याशिवाय कोणतेही राष्ट्र युद्धात भाग घेण्याचे धाडस करणार नाही. बरोबर त्याचप्रमाणे, एखाद्या राष्ट्राने अहिंसक मार्गाने आपल्या भू-भागाचे रक्षण करावयाचे ठरविल्यावर प्रथम आपल्या जिंदगीची नीट छाननी केली पाहिजे. सर्व राष्ट्रांच्या सदिच्छेने आणि मान्यतेने जेवढे आपणाकडे ठेवता येईल तेवढेच ते राष्ट्र स्वतःच्या हाती ठेवील. ती सर्व जिंदगीदेखील ते राष्ट्र सर्व मानवतेच्या कल्याणा-साठी विश्वस्त म्हणून धारण करील. सशस्त्र लढाईच्या संदर्भात शांततेच्या काळात उद्योगधंदे उभारण्याला जे महत्त्व आहे तेच महत्त्व अहिंसक संरक्षण-योजनेत शांततेच्या काळात वर सांगितलेली तयारी करण्याला आहे. राष्ट्राने ही तयारी इतर राष्ट्रांच्या

पाशी आपले वजन वाढविण्यासाठीच करावयाची असते, कारण युद्धाचे वेळी तिचा उपयोग होण्यासारखा असतो.

ही तत्त्वे अमलात आणण्याच्या बाबतीत भारताला मार्गदर्शन करण्याची संधी गांधींना त्यांच्या आयुष्यात मिळाली नाही. परंतु या बाबतीत भारतीय परंपरेत त्यांनी आपल्या प्रतिभेने किती भर घातली होती हे पाहण्यासाठी एका काल्पनिक परिस्थितीचा विचार करणे अप्रस्तुत ठरणार नाही. अशा वेळी अहिंसक मार्गाने संरक्षण करू इच्छिणाऱ्या राष्ट्राला कोणत्या क्रमाने कोणत्या गोष्टी कराव्या लागतील याचे सूचन गांधींनी वेळोवेळींच्या सैद्धान्तिक विवेचनाच्या ओघात केले होते, ते आता आपण पाहू.

हिंसक मार्गांनी संपादिलेल्या मालमत्तेचे रक्षण अहिंसक मार्गांनी करता येणार नाही असे १९४७ मध्ये गांधींनी स्पष्टपणे जाहीर केले. हिंसक मार्गाचा वापर करून संपादिलेल्या मालमत्तेचा त्याग करूनच माणसाला अहिंसक पद्धतीचा मार्ग यशस्वीपणे चोखाळता येईल. गांधींचे असेही मत होते की, व्यक्तीला हिंसेशिवाय खाजगीरीत्या भांडवलसंचय कधीच करता येणार नाही; मग ती हिंसा उघड असेल किंवा प्रच्छन्न असेल. जनतेला भांडवलाची गरज मात्र कायमच लागणार आहे. अहिंसक समाजात फक्त सरकारलाच असा भांडवलसंचय करता येईल.[४७]

समजा, एखाद्या राष्ट्राने अशी तयारी केली तर तेवढ्यानेच किंवा त्यामुळे आलेल्या नैतिक सामर्थ्यानेच ते राष्ट्र भिन्नमतवादी राष्ट्रांपासून सुरक्षित होईल काय? ती राष्ट्रे आक्रमण करणार नाहीत याची शाश्वती काय? गांधींच्या मते मानवी स्वभाव आज आहे तसा असेतोपर्यंत आक्रमणाची शक्यता राहीलच. अर्थात अहिंसक प्रतिकार करून माणसांना सन्मार्गाला लावणेही शक्य आहेच.

यामुळेच, प्रतिहल्ला करणे हा संरक्षणाचा सर्वोत्तम मार्ग नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. आक्रमकांना सत्याग्रही स्वयंसेवकांच्या प्रेतावरून येण्याचे आमंत्रण दिल्यानेच खरे संरक्षण साधणार आहे. असे झाल्यानंतरही आक्रमण पुढे आले तर मागे जिवंत राहिलेल्यांनी त्यांच्याशी अहिंसक असहकार करणे ही पुढील कृती होय. त्या वेळी ही माणसे जेत्याचा स्वार्थ साधण्यासाठी शेतांत, गिरण्यांत, कारखान्यांत कामे करणार नाहीत. प्राप्त परिस्थितीत शक्य असेल तेवढे स्वतःचे जीवन नेहमीच्याच पद्धतीने ते व्यतीत करतील. जमीनजुमला बेचिराख करण्याचे धोरण अंमलात आणणार नाहीत. आक्रमक पक्षातील सैनिकांशी ते बंधुभावानेच वागतील. धीरोदात्त पण अहिंसक प्रतिकाराने त्यांच्यावर छाप पाडण्याचा ते प्रयत्न करतील. मात्र जे सैनिक त्यांच्यात बरोबरीने मिसळून राहण्यास तयार असतील त्यांना आपल्या जीवनात व संपत्तीत सहभागी करून घेण्याची तयारी सत्याग्रही जनतेने ठेवली पाहिजे.

थोड्या वेगळ्या संदर्भात गांधींना कोणीतरी विचारले होते की, सत्याग्रही स्वयंसेवकाचे आत्मक्लेश सराईत गुन्हेगाराच्या हृदयाला पीळ पाडू शकतील काय? गांधींचा असा विश्वास होता की स्वयंसेवकाचा निर्धार आणि शौर्य तेवढ्या उच्च दर्जाचे असतील तर तत्त्वतः तसे परिवर्तन व्हायला काहीच हरकत नाही. पण ते वास्तववादी होते. त्यांनी मोठ्या खेदाने अशी कबूली दिली की, काही लोकांच्या बाबतीत तसे परिवर्तन होणारही नाही. पण अशा दुष्ट व्यक्तीचे मित्र वा अनुयायी त्याच्या गैरमार्गावरून परावृत्त होण्याची शक्यता आहे. जगात कोठेही गेले तरी सर्वसामान्य माणसे पूर्णपणे हिंसक नसतात किंवा पूर्णपणे अहिंसावादीही नसतात. आक्रमण करणाऱ्या सैन्यातील सैनिक अशा सामान्य माणसांतूनच भरती केलेले असतात. लष्करी कवायती करायला लावून त्यांच्यात विशिष्ट सैनिकी मनोवृत्ती बाणवलेली असते. असे असले तरी सत्याग्रहाने आवश्यक ती परिस्थिती निर्माण केली तर त्यांच्याकडून तरी अनुकूल प्रतिसाद मिळेल अशी गांधींची श्रद्धा होती. एकदा तसे झाले की त्यांचा नेता पुरेसे पाठबळ नसल्याने हतबल होईल, किंवा, दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, दुष्ट प्रवृत्ती एकाकी पडेल असे त्यांचे म्हणणे होते. या पृथ्वीवरून दुष्ट प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन करणे शक्य आहे असे त्यांना वाटत नव्हते. दुष्ट प्रवृत्तीला एकाकी पाडून निष्प्रभ करणे एवढेच माणसाच्या हाती आहे असे त्यांना वाटे.

आपल्या राष्ट्राचे किंवा आपल्याला प्रिय असलेल्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी अहिंसेचा अवलंब करावयाचा झाल्यास परंपरागत युद्धातल्यापेक्षा फारच उच्च दर्जाच्या धैर्याची गरज लागणार आहे हे गांधी कबूल करीत. परंतु त्यांचे असे मत होते की, मानवी संस्कृतीने आपापसातील तंटे मिटविण्यासाठी सत्याग्रहासारख्या अगदी नवीन व धाडसी पद्धतीचा प्रयोग करण्याची तयारी दाखवली नाही तर विज्ञान आणि तंत्रविद्या या ऋद्धिसिद्धींनी मानवाच्या घरी पाणी भरले तरी माणूस नैतिकदृष्ट्या आहे तेथेच राहील.

सृष्टी जितकी जुनीपुराणी तितकाच अहिंसेचा संदेशही प्राचीन आहे असे गांधींचे म्हणणे होते. तरी पण, भारतात अहिंसेची परंपरा तुलनेने अधिक विकसित झालेली होती. शिवाय प्राचीनकालीन विकेंद्रित ग्रामराज्यांची आठवण अजून जिवंत होती. या पार्श्वभूमीवर आधुनिक काळातील परिस्थितीला अनुरूप अशी अहिंसक जीवनपद्धती उत्क्रांत करण्याच्या बाबतीत भारताला अधिक अनुकूलता आहे अशी त्यांची श्रद्धा होती.

## संदर्भ

१. गौतमसंहिता, XI, पृ. १९–२५.

२. मजुमदार, १९१८, पृ. २१.
३. डेव्हिड्स्, १९१६, पृ. ९७.
४. शामशास्त्री, १९२९, पृ. १९१–१९२.
५. सेन, १९२५, पृ. ३४७–४८.
६. किता, ३८२–८३.
७. ओ 'मॅली, १९१३, पृ. ४५४–५५.
८. कित्ता, पृ. ४६१.
९. कित्ता, पृ. ४५९–६०.
१०. सेन, १९२५, पृ. ३५५–५६.
११. शामशास्त्री, १९२९, पृ. २८७.
१२. कित्ता, पृ. २९६.
१३. कित्ता, पृ. २९८.
१४. ब्राउटन, १८९२, पृ. ३१–३२.
१५. मार्को-पोलो, II, पृ. ३२७.
१६. ब्राउटन, १८९२, पृ. ३२–३३.
१७. चैतन्य भागवत, आदि खंड, प्रकरण १४ वे.
१८. धम्मपद, XXVI, श्लोक ३९३, ३९६, ४०६, ४०७.
१९. कित्ता, I, श्लोक ३–५.
२०. बोस, १९५३, पृ. १८९–२०७.
२१. यंग इंडिया, १-५-१९२४.
२२. कित्ता, १८-९-१९२४.
२३. कित्ता, २४-४-१९२४.
२४. बोस, १९५०.
२५. यंग इंडिया, १-५-१९२४.
२६. कित्ता, २४-४-१९२४.
२७. कित्ता, ३०-१-१९३०.
२८. सीतारामय्या, १९३५, पृ. ६३८.
२९. यंग इंडिया, २७-२-१९३०.
३०. सीतारामय्या, १९३५, ६९२–६९३.
३१. पेशावर एन्क्वायरी कमिटी : अहवाल, १९३०, पृ. १०.
३२. सीतारामय्या, १९३५, पृ. ६८७ व पुढे.
३३. कित्ता, पृ. ६७७.

३४. कित्ता, पृ. ६६१.
३५. बोस, १९४७, पृ. ३११.
३६. बोस, १९४८, पृ. ४६.
३७. गांधी, १९४८, पृ. २०–२१.
३८. बोस, १९४८, पृ. ७१.
३९. कित्ता, पृ. ७३.
४०. बोस, १९४७, पृ. १९९–२००.
४१. बोस, १९४८, पृ. २४–२५.
४२. हितोपदेश मित्रलाभ, श्लोक ११५.
४३. बोस, १९४८, पृ. ४३.
४४. कित्ता, पृ. ४४.
४५. बोस, १९४७, पृ. २५.
४६. बोस, १९४८, पृ. ४४.
४७. कित्ता, पृ. २७९.

## ग्रंथ-सूची

१. बोस, निर्मलकुमार
१९४७ स्टडीज् इन् गांधीझम्, कलकत्ता.
१९४८ सिलेक्शन्स फ्रॉम गांधी, अहमदाबाद.
१९५० 'फास्टिंग इन् सत्याग्रह', 'दि मॉडर्न रिव्ह्यू', कलकत्ता, ऑक्टोबर १९५०.
१९५३ 'माय डेज् वुइथ गांधी', कलकत्ता.

२. ब्राउटन, टी. डी.
१८९२ 'लेटर्स रिटन इन् मराठा कँप (१८०९)', वेस्ट मिनिस्टर.

३. चैतन्य भारत
संपादक : रसिकमोहन विद्याभूषण व मृणालकांती घोष.
चौथी आवृत्ती, गौरब्द ४४०, कलकत्ता.

४. डेव्हिड्स, टी. डब्ल्यू. ऱ्हीस
१९१६ बुद्धिस्ट इंडिया (पुनर्मुद्रण १९१६), लंडन.

५. धम्मपद
' दि सेक्रेड बुक्स् ऑफ दि ईस्ट ', खंड १०, ऑक्सफर्ड.

६. गांधी, मो. क.
१९४८ कन्स्ट्रक्टिव्ह प्रोग्रॅम : इट्स मीनिंग अँड प्लेस, अहमदाबाद.

७. गौतम संहिता
' दि सेक्रेड बुक्स् ऑफ दि ईस्ट ', खंड २, १८७९, ऑक्सफर्ड.

८. हरिजन
साप्ताहिक वृत्तपत्र, १९३४ पासून पुढे, अहमदाबाद.

९. हितोपदेश ( नारायणकृत )
संपादक : पीटर पीटरसन, १८८७, मुंबई.

१०. मजुमदार, रमेशचंद्र
१९१८ कॉर्पोरेट लाइफ इन् एन्शंट इंडिया, कलकत्ता.

११. मार्को-पोलो
प्रवास-वर्णन खंड १ व २. ( वर उल्लेखिलेल्या ब्राउटनकृत पुस्तकाच्या संपादकांनी उल्लेखलेली आवृत्ती, अर्थात मूल यांची आवृत्ती ).

१२. ओ'मॅली, एल्. एस्. एस्.
१९१३ सेन्सस ऑफ इंडिया, १९११, खंड ५, कलकत्ता.

१३. पेशावर एन्क्वायरी कमिटी
( काँग्रेस वर्किंग कमिटीने नेमलेली ) अहवाल : १९३०, अलाहाबाद.

१४. सेन, सुरेंद्रनाथ
१९२५ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ दि मराठाज्, कलकत्ता.

१५. शामशास्त्री, आर्.
१९२९ कौटिल्याज् अर्थशास्त्र, म्हैसूर.

१६. सीतारामय्या, बी. पी.
१९३५ दि हिस्टरी ऑफ दि इंडियन नॅशनल काँग्रेस (१८८५–१९३५), अलाहाबाद.

१७. यंग इंडिया
साप्ताहिक वृत्तपत्र, १९१९–१९३२, अहमदाबाद.

□ □

प्रकरण ७ वे

# सत्याग्रह : अर्थ आणि कार्यपद्धती*

## सत्याग्रह आणि युद्ध

१. सत्याग्रह हा अहिंसात्मक पद्धतीने "युद्ध" करण्याचा एक मार्ग आहे. जोपर्यंत माणसे आजच्यापेक्षा फारशी वेगळी बनलेली नाहीत तोपर्यंत हितसंबंध परस्परांना आडवे येऊन तंटे उद्‌भवणारच. हे झगडे जास्तीत जास्त सुसंस्कृतपणे, काटकसरीने आणि परिणामकारक रीतीने सोडविले जाणे सर्वांत चांगले. अशा पद्धतीने तंटे सोडविण्याचा सत्याग्रह हाच सर्वांत चांगला मार्ग आहे, असा गांधींचा विश्वास होता.

२. हिंसक युद्धामध्ये आपल्या शत्रूला शासन करून त्याला नमविण्याचा प्रयत्न केला जातो. यशस्वी युद्धात एक पक्षाचा विजय आणि दुसऱ्या पक्षाचा पराभव होतो. सत्याग्रही युद्धात असे होत नाही. त्यात शेवटी दोन्ही पक्ष एका उभयमान्य भूमिकेवरून, न्याय व परस्परांबद्दलचा आदर यांवर आधारित सन्मान्य तडजोड शोधून काढतील अशी अपेक्षा असते. अंतिम निर्णय उभय पक्षांच्या सहकार्यानेच ठरत असल्याने जयापजयाचा प्रश्नच येत नाही.

३-अ. संघर्ष टाळणे असा अहिंसेचा अर्थ होत नाही. स्वतः गांधींची अहिंसा चांगलीच क्रियाशील होती. कित्येकदा तर ती लढाऊसुद्धा झाल्याचे दिसते.

३-ब. सामान्य युद्धात शत्रूला शासन केले जाते. युद्धाच्या एका निर्णायक क्षणी एका पक्षाचे हल्ला चढविण्याचे सामर्थ्य दुसऱ्या पक्षाने लावलेल्या शक्तीपेक्षा जास्त झाले की त्याला विजय मिळतो. सत्याग्रही वेगळ्याच मार्गाने जात असतो. व्यक्ती आणि व्यवस्था यांत तो भेद करतो. जी व्यवस्था त्याला गैर वाटते तिच्याशी असहकार करणे हे सत्याग्रह्याचे ध्येय असते; त्यामुळे असहकाराच्या काळात तो स्वतःवर शिक्षा ओढवून

---

* अमेरिकन फ्रेंड्स् सर्व्हिस कमिटीतर्फे ४ जून, १९७० रोजी पुणे येथे 'रूट्स् ऑफ इंटरनॅशनल अंडरस्टँडिंग' या विषयावर झालेल्या परिसंवादात दिलेल्या भाषणाचा सारांश.

घेतो. अभेद्य अविचल धैर्याने "शत्रू"ला दिपवून टाकण्याचा तत्त्वतः त्याचा उद्देश असतो. सत्याग्रह्याच्या प्रतिकारातून आपल्या जिवाला मुळीच धोका संभवत नाही असे आश्वासन शत्रूला सत्याग्रह्याच्या वर्तणुकीतून सतत मिळत असते. सत्याग्रह करणाऱ्याचा धीरोदात्तपणा विरोधकाच्या हृदयाला जाऊन भिडला की मग त्याच्या अंतःकरणातील कवाडे त्याच्यातील विवेकाला खुली होण्याची शक्यता निर्माण होते. असे झाले म्हणजे मग त्या वेळेपर्यंत परस्परांशी लढत असलेल्या दोन्ही पक्षांना एकमेकांना पटेल असे उत्तर काढण्याचा मार्गही खुला होतो.

३-क. या सर्व अहिंसक असहकाराच्या काळात, आपल्याला जे बरोबर व सत्य वाटते त्याला चिकटून राहत असतानाच, प्रतिपक्षाच्या म्हणण्यातील सत्यांशाचा शोध सत्याग्रही घेत असतो. हे करीत असतानाच नीर-क्षीरविवेकाने त्याला स्वतःच्या भूमिकेतील तत्त्व आणि तपशील वेगवेगळे करता येते. तत्त्वाच्या बाबतीत, प्राणभूत गाभ्याच्या गोष्टींच्या बाबतीत कधीच माघार घ्यावयाची नसते. विरुद्ध पक्षातील ज्या गोष्टी न्याय्य आणि वैध असतील त्यांचा आपल्या भूमिकेत समावेश करण्याने आपली भूमिका अधिक परिपूर्ण करता येते. सर्वसामान्य तडजोड काढण्यासाठी अनावश्यक गोष्टी नेहमीच त्यागावयाच्या असतात. वर म्हटल्याप्रमाणे संघर्षाच्या ओघात एकमेकांच्या दृष्टिकोनांकडे आदराने पहाण्यास उभय पक्ष शिकले की त्या दोघांनाही मान्य अशी तडजोड निघते. ही तडजोड हेच अहिंसक असहकाराचे अंतिम उद्दिष्ट असते, त्याचा शेवट असतो.

## तयारी

१. सशस्त्र युद्धाचा शेवट आपल्या बाजूने लागण्याची अपेक्षा करण्यापूर्वी काही काळ तयारी करावी लागते. अहिंसक युद्धासाठीसुद्धा पुरेशा तयारीची गरज असते. ही तयारी लढाईला तोंड लागण्यापूर्वीच केलेली केव्हाही चांगली. पण संघर्ष अटळच झाला तर लढाई चालू असतानासुद्धा तयारी करता येते. पण त्याने लढाईची गुंतागुंत वाढते. त्यात सत्याग्रह्याच्या बुद्धीला, संघटनाचातुर्याला आणि नैतिक सच्चेपणाला फारच मोठे आव्हान असते.

२. अहिंसक मार्गाने मिळवता येतात अशाच गोष्टींचे रक्षण अहिंसक पद्धतीने करता येते. हिंसक मार्गांनी मिळवलेली कोणतीच वस्तू अहिंसक मार्गाने राखता येत नाही.

३. आपली अंतर्गत समाजव्यवस्था सुधारणे, निर्दोष करणे हीच अहिंसक संरक्षणाची पूर्वतयारी होय. कौटुंबिक तसेच जमातीय संबंधातील विषमता व अन्याय अहिंसक मार्गांनी क्रमशः दूर करणे ही गोष्ट पूर्वतयारीत मोडते. सत्याग्रहाने परकीय आक्रमणाचा प्रतिकार करता येण्यासाठी या पूर्वतयारीची आवश्यकता असते.

४. पण वरील तयारी पूर्णत्वाला पोचेपर्यंत थांबण्याची आवश्यकता नाही. कदाचित वरील तयारी कधीच पूर्ण होणार नाही.

५. अहिंसावादी सामाजिक-आर्थिक रचनेत विशेषाधिकारसंपन्न व दलित असे वर्ग असणार नाहीत. व्यक्तीव्यक्तींत निसर्गतः भेद असतात. पण या नैसर्गिक भेदांवरून विषमताधिष्ठित समाजरचना निर्माण करणे, बुद्धिमान व चतुर लोकांचा वा त्यांच्या मुलाबाळांचा वेगळा, खास विशेषाधिकार असलेला वर्ग निर्माण होण्यास वाव देणे चूक होय. मालमत्तेवरील वारसाहक्क प्रदान करणारा आजचा कायदा रद्द करून ही गोष्ट अंशतः साध्य करता येईल.

६-अ. "रचनात्मक कार्यक्रम" अंमलात आणून वर्गविरहित समाजरचना निर्माण करण्याचा सत्याग्रही व्यक्तीचा सतत प्रयत्न असतो. या कार्यक्रमाचा तपशील अर्थातच प्रत्येक देशात वेगवेगळा असेल. पण सामाजिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणणे हा अशा सर्व पुनर्रचनांचा समान व सारभूत उद्देश असेल.

६-ब. मानवी स्वभाव आज आहे तसाच असेपर्यंत शासनसंस्थेची गरज राहील असे वाटते. या संस्थेचे कार्यक्षेत्र कमीत कमी करणे हा गांधींच्यापुढील आदर्श होता. आज सरकार करीत असलेले कार्य ऐच्छिक संघटनांना वाटून देण्याची त्यांची कल्पना होती. या संघटनांचे सभासद स्वेच्छेने एकत्र आलेले असतील. मूलभूत मतभेद झाल्यास कोणालाही त्यांतून अंग काढून घेता येणार होते. याउलट सरकारचे काम दंडसत्तेच्या जोरावर चाललेले असते.

६-क. प्राथमिक गरजा भागविणाऱ्या वस्तूंची निर्मिती व निर्मितीची साधने सामाजिक नियंत्रणाखाली असतील ही गोष्ट विकेंद्रीकरणात गृहीत धरलेली आहे. लहान आकाराच्या ऐच्छिक संघटनांच्या हाती नियंत्रण राहिल्यास जास्त चांगले. ही उत्पादनालये–कारखाने–नफ्यासाठी चालविली जाणार नाहीत. कोणताही भेद न करता सर्वांना लाभ मिळावा या दृष्टीने त्यांचा कारभार चालवला जाईल.

६-ड. परंतु केवळ आकाराचे छोटेपण हाच स्वयंसिद्ध आदर्श नाही. ऐच्छिक संघटनांनी विशिष्ट कामांसाठी आवश्यक तेथे केंद्रीकरण करावयाला हरकत नाही. छोटे आकारमान ही विकेंद्रीकरणाची फक्त आंशिक कसोटी आहे. उत्पादनाच्या व्यवस्थेसाठी निर्माण केलेली सामाजिक यंत्रणा ही ऐच्छिक संमतीच्या तत्त्वावर संघटित झालेली आहे की ती सक्तीची आणि अधिकारवादी आहे यावरही एखाद्या उत्पादनालयात विकेंद्री-करण प्रत्यक्षात आले आहे की नाही ही गोष्ट अवलंबून राहील.

## रचनात्मक कार्यक्रम आणि राष्ट्रीय शासनसंस्था

१. अशा प्रकारे विधायक किंवा रचनात्मक कार्याच्या साहाय्याने आणि किंवा विशिष्ट उद्दिष्टांसाठी ठिकठिकाणी केलेल्या सत्याग्रहांमुळे सत्याग्रही साधकाला अभिप्रेत असलेल्या भावी समाजाची उभारणी अंशतः व लहान प्रमाणावर का होईना पण झाली की आपल्या संभाव्य शत्रुमित्रांपर्यंत त्याने ती वार्ता पोचवावी.

२. अशा समाजाचा नमुना किंवा प्रतिकृती निर्माण करीत असताना विरोधकांतील जास्तीत जास्त माणसे आपल्या बाजूने वळविण्याचा त्याचा खास प्रयत्न असावा. या घटनांना प्रसिद्धी देत असताना, आपण साकार करू पाहत असलेल्या नव्या समाजरचनेत सर्व जमातींच्या, धर्मांच्या, वर्गांच्या लोकांना स्थान आहे असा विश्वास त्याने जनतेत निर्माण केला पाहिजे. या रीतीने अहिंसक युद्धाच्या मार्गाने आपल्या आदर्शाचे रक्षण करण्याच्या अंतिम प्रसंगासाठी आपल्या बाजूने सदिच्छा निर्माण करण्याचे प्रयत्न सत्याग्रह्याने करावेत.

३-अ. हे सर्व चालू असतानाच देशांतर्गत तो जे विधायक कार्य करीत असेल त्याची व्याप्ती त्याला वाढविता येईल, आपल्याजवळ जे काही आहे त्यात सभोवतालच्या राष्ट्रांतील समाजांना, ते गरजू असतील तेव्हा, सहभागी करून घेण्यासाठी त्याला आपल्या समाजाचे व तो कायदेशीररीत्या ज्या राज्यसत्तेचा घटक आहे त्या सरकारचे मन वळविण्याचा प्रयत्न करता येईल. इतरांना आपल्या साधनसंपत्तीत असे सहभागी करून घेण्यामागील तत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल : जगातील सर्व वस्तू अखिल मानवजातीच्या आहेत हे एक, आणि मक्तेदारी मालकी, मग ती राष्ट्रीय पातळीवरही का असेना, हिंसक मार्गानेच सुरक्षित राखता येते, हे दुसरे.

३-ब. गांधींना भारताचे स्वातंत्र्य हवे होते ते ' वेळ पडल्यास मानवजातीसाठी स्वतःचे समर्पण करण्यास भारत स्वतंत्र असावा ' म्हणून. ते असेही म्हणत असत की, आपली सेवा ' राष्ट्रांच्या सरहद्दी ओलांडून किती सर्वदूर पोचावी याला कसलीच मर्यादा नाही.' त्यांच्या मते, ' आंतरराष्ट्रीय सीमा काही परमेश्वराने निर्माण केलेल्या नाहीत.'

## संरक्षण

१. छोट्या प्रमाणावर तसेच व्यापक " राष्ट्रीय " पातळीवर आपली अशी तयारी चालू असतानाच एखाद्या " शत्रु-राष्ट्रा "ला कदाचित आक्रमण करण्याची बुद्धी होईल. अशा वेळी सर्वांत प्रथम सत्याग्रही स्वयंसेवकांचा एक गट आक्रमक सैन्याला " तोंड " देण्यासाठी पाठवावा. शक्य असेल तर आक्रमकांशी बोलण्याचा हे स्वयंसेवक

प्रयत्न करतील. तुडविले जाण्याची तयारी ठेवतील. मात्र स्वसंरक्षणासाठी किंवा अन्य कोणत्याही कारणाने शत्रूला इजा पोचविण्याच्या उद्देशाने बोटसुद्धा उचलणार नाहीत.

२. या गटाचा निकाल लावल्यावर, कदाचित, शत्रू देश व्यापण्यासाठी पुढे येईल. तेव्हा देश बेचिराख करण्याचे धोरण मुळीच अवलंबिले जाणार नाही. आक्रमक देशाच्या सैन्याला देशात स्वतःच्या शर्तीवर शांततेने राहू देण्यास सत्याग्रही देश तयार असेल. सत्याग्रही देशाच्या समाजरचनेत श्रमिक म्हणून त्या देशाच्या नागरिकांच्या बरोबरीने राहण्याची तयारी असल्यास आपले स्वागत होईल अशी आक्रमकाची भावना झाली पाहिजे.

३. या गोष्टीस आक्रमकांची तयारी नसल्यास सत्याग्रही शरण जाण्यास नकार देतील, आक्रमकांच्या आज्ञा पाळणार नाहीत. मात्र आक्रमक सैनिकांना त्यांचा जीव धोक्यात आहे असे कोणत्याही प्रकारे वाटू देणार नाहीत.

४. सत्याग्रही सेवकांचे धैर्य व निश्चय पुरेसे दृढ असतील तर शत्रु-सैन्यातील माणसे विचार करण्यास प्रवृत्त होतील. त्यांना आपल्या जीविताची भीती वाटत नसेल व त्यांच्यापुढे स्वतःच्या रक्षणाचा प्रश्न नसेल तर ती विचार करू लागतील ही शक्यता जास्त आहे. ही प्रक्रिया सुरू झाली की त्यांच्यावर सैनिक म्हणून बिंबवण्यात आलेल्या विचारसरणीचा पगडा कमी व्हायला लागेल. प्रथम सांगितल्याप्रमाणे, सत्याग्रहींनी शत्रुपक्षाच्या भूमिकेतील सत्याचा स्वीकार करण्याची मनोवृत्ती बाळगल्यास शत्रूकडील सैनिकांमधील विचारसरणीचा पगडा कमी होण्याच्या क्रियेला वेग येईल.

५. याच मार्गाने शत्रूच्या सेनापतीलासुद्धा आपल्या बाजूने वळवून घ्यावे हा गांधींचा आदर्श होता. परंतु वाईट धरून चालायचे, म्हणजेच सेनापतीचे परिवर्तन शक्य होणार नाही असे मानले तर, सर्व सैनिकांचे परिवर्तन झाल्यावर सेनापतीच्या रुपाने उपस्थित असलेली दुष्ट प्रवृत्ती एकाकी पडेल अशी आशा होती. प्रत्यक्ष जीवनात मानवाला सामूहिक अहिंसक साधनांनी मिळवता येणारे हेच सर्वोच्च साध्य आहे.

## वयक्तिक आणि सामुदायिक अहिंसा

१. सॉक्रेटिस किंवा येशू यांनी पूर्वीच अहिंसेची मौलिकता सिद्ध केली आहे. मृत्यू आला तरी आपण ज्याला सत्य मानतो त्याला चिकटून राहण्याची अतूट चिकाटी, कधीच न खचणारे धैर्य आणि आपल्या विरोधकालासुद्धा आ ल्या बरोबरीचा, आपला भाऊ म्हणूनच वागणूक देण्याचा आग्रह याद्वारा त्यांनी खरी श्रद्धा अजिक्य असते ही गोष्ट सिद्ध केली. हे तंत्र माणसांच्या मोठ्या समुदायांकरवी आचरणात आणण्याचा गांधींनी प्रयत्न केला, इतकेच. अहिंसा हा एक व्यवहार्य आदर्श ठरावयाचा असेल तर

प्रत्येक व्यक्ती परिपूर्ण होईपर्यंत थांबून चालणार नाही असे ते म्हणत. अन्याय व असत्य याविरुद्ध लढा चालू असतानाच सामान्य स्त्री-पुरुषांना अधिकाधिक पूर्णत्वाकडे जाता येईल असे त्यांना वाटत होते. सुरुवातीला लोकांनी स्वेच्छेने स्वतःला अहिंसेच्या शिस्तीला बांधून घ्यायचे होते. विरोधक हा दुष्ट शत्रू नसून आपल्यासारखाच व आपल्या बरोबरीचा माणूस आहे अशी भावना दृढतर होत जाऊन त्यांच्या अहिंसेच्या आचरणात जसजसा अधिक जोम व प्रगल्भता येत जाईल तसतसे त्यांना आपली अहिंसा उत्तरोत्तर अधिकाधिक परिणामकारक ठरत चालल्याचा प्रत्यय येईल अशी त्यांची खात्री होती.

२. अद्वितीय व महान विभूतींच्या भात्यात आतापर्यंत पडून असलेल्या अहिंसेच्या तत्त्वातून सामूहिक अहिंसक प्रतिकाराचे एक हत्यार बनविण्यात गांधींची खरी अभिजातता दिसून येते.

## सत्याग्रही स्वयंसेवकाची निवड

१. ज्या कोणावर एखादा विशिष्ट अन्याय झाला असेल त्यांनीच त्या अन्यायाच्या परिमार्जनार्थ सत्याग्रह करावा. सर्वसाधारणपणे इतरांनी त्यांच्यात मिसळू नये. इतरांना जर सत्याग्रह न्याय्य वाटत असेल तर त्यांनी सत्याग्रहाच्या वेळी हजर राहून, त्याचे सहृदयतेने विवेचन करून, त्याला योग्य ती प्रसिद्धी मिळवून देऊन सत्याग्रह्यांना मदत करण्यास हरकत नाही.

२. केवळ नैतिक किंवा न्याय्य कारणांसाठीच सत्याग्रही झगडू शकतो. ‘अन्याय्य कारणासाठी सत्याग्रह होऊच शकत नाही’ (यं. इं., २७-४-१९२१, पृ. १२९). अहिंसेचे स्वरूपच असे आहे की त्याचा उपयोग कुमार्गाने मिळवलेल्या संपत्तीचे रक्षण करण्याकरता किंवा अनैतिक कृत्यांचे समर्थन करण्यासाठी करता येणार नाही (हरिजन, ५-९-१९३६, पृ. २३६).

३-अ. अहिंसेच्या आचरणाच्या बाबतीत परिपूर्णता प्राप्त केलेली आहे अशांनाच केवळ सत्याग्रह चळवळीत भाग घेता येईल असे नव्हे. चळवळीची शिस्त व नियम पाळण्याची ज्याची तयारी आहे अशा कोणालाही त्यात भाग घेता येईल.

३-ब. ज्यांना नेहमीच्या आयुष्यात कायदे पाळण्याची व शिस्त राखण्याची सवय आहे त्यांनीच कायदेभंगासाठी पुढे यावे.

४-अ. सत्याग्रहाची चळवळ शक्य तो अस्तित्वात असलेल्या एखाद्या लोकशाही संघटनेमार्फत केली जावी. तसे शक्य नसेल तर लोकशाही तत्त्वांवर आधारलेली एक तात्पुरती संघटना निर्माण करावी.

४-ब. सत्याग्रही छावणीत कामे वाटून दिली जावीत. प्रसिद्धी आणि इतर कामे प्रत्यक्ष लढ्यात भाग घेण्यापेक्षा गौण लेखली जाऊ नयेत.

५. जसजसा अनुभव वाढत जाईल व चळवळ पसरत जाईल तसतसे प्रत्येक स्वयंसेवकाने काही तत्त्वांनुसार आपले वर्तन आपणच निश्चित करावे आणि स्वतःच्या विवेकबुद्धीवर व अभिक्रमशीलतेवर अवलंबून राहावे. चळवळ सर्वत्र पसरल्यावर नेतृत्वाचे विकेंद्रीकरण होणे हा सत्याग्रहाचा एक आवश्यक भाग आहे.

## मागणी

१. सत्याग्रह मोहिमेत मागण्या किमान असाव्यात; त्या आणखी कमी करता येणे शक्य नसावे. मात्र त्यात तत्त्वाचा, आवश्यक गोष्टींचा बळी दिला जाऊ नये. विरोधकाला खूष करण्याकरता मागण्या कधीही कमी करू नयेत.

२-अ. 'शुद्ध संघर्षामध्ये, लढा सुरू झाल्यानंतर चळवळीचे सामर्थ्य कितीही वाढले तरी, सुरुवातीला जे उद्दिष्ट पुढे ठेवले असेल त्याच्या पलीकडे कधीच जाता कामा नये; उलट चळवळीचा जोर कमी होत आहे असे वाटले तरी मूळ उद्दिष्ट साध्य झाल्याखेरीज ती मागेही घेता कामा नये' (**सत्याग्रह इन साउथ आफ्रिका**, मद्रास, १९२८, पृ. ४१२).

२-ब. 'लॉ ऑफ प्रोग्रेशन' प्रत्येक धर्मयुद्धाला लागू असतोच... सत्याग्रहाच्या बाबतीत तो नियम गृहीतकृत्यांत मोडतो... कारण सत्याग्रहात किमान मागण्या याच कमाल मागण्याही असतात. या मागण्या आणखी कमी करता येण्यासारख्या नसल्याने माघार घेण्याचा प्रश्नच येत नाही. वाटचाल फक्त एकाच दिशेने शक्य असते; पुढेच सरकणे तेवढे शक्य असते हाच तो 'लॉ ऑफ प्रोग्रेशन' होय. इतर प्रकारच्या संघर्षांत, ते सत्याधिष्ठित असले तरी, पुढे देवाणघेवाणीला वाव रहावा म्हणून, मागणी करताना प्रथम थोडे जास्तच मागितलेले असते. त्यामुळे त्या सर्व संघर्षांना 'लॉ ऑफ प्रोग्रेशन' निर्विवादपणे लागू होत नाही.

'आपले सामर्थ्य कितीही असले तरी ज्या मागण्यांसाठी आपण लढा सुरू केला आहे त्या मान्य होताच लढा थांबविला पाहिजे...मात्र "युद्ध" चालू असताना प्रतिपक्षाने काही नव्याच अडचणी निर्माण केल्या तर त्या दूर करण्याची मागणी आपोआपच समाविष्ट होते (**सत्याग्रह इन साउथ आफ्रिका**, पृ. ३१९).

## वाटाघाटी, त्यांची वेळ, इत्यादी

१. ' सत्याग्रही या नात्याने मी माझी बाजू वेळोवेळी तपासली जाण्यास अनुमती दिली पाहिजे. तीत चूक आढळली तर मी ती सुधारली पाहिजे ' ( हरिजन, १३-१ १९४०, पृ. ४११ )... जो योग्य गोष्टीला विरोध करतो तो आपली बाजू कच्ची करून घेतो ' ( हरिजन, ११-३-१९३९ पृ. ४४ )... ' प्रतिपक्षाशी वाटाघाटी करण्याची सत्याग्रह्याने नेहमी इच्छा बाळगली पाहिजे व त्यासाठी सतत तयार असले पाहिजे. वाटाघाटींची अवस्था कधी येणारच नाही अशी कल्पना करता येते, नाही असे नाही. सत्याग्रह्याच्या दोषामुळे मात्र तशी पाळी येता कामा नये ' ( हरिजन, २४-६-१९३९, पृ. १७० ).

२. सत्याग्रहाशिवाय अन्य कारणांनी शत्रूला दौर्बल्य आले असेल तर त्याचा फायदा उठविण्याचे नाकारले पाहिजे.

३. ' आधीचे सर्व उपाय करून झाल्याशिवाय अंतिम अस्त्र वापरावयास काढणे सत्याग्रहाच्या भूमिकेच्या सर्वस्वी विरुद्ध आहे. तशी घाई ही एक हिंसाच आहे ' ( हरिजन, २४-६-१९३९, पृ. १७२ ).

४. ' परिवर्तन घडवून आणणे हेच अहिंसक कार्यकर्त्याचे ध्येय असले पाहिजे. त्यासाठी त्याने अनंतकाळ थांबावे असे मात्र नाही. थांबण्याची मर्यादा संपली की तो धोका पत्करतो आणि क्रियाशील सत्याग्रहाची योजना आखतो. क्रियाशील सत्याग्रह म्हणजे सविनय कायदेभंग किंवा तत्सम कृती. अंगीकृत विचारसरणीचा त्याग करण्याइतका मात्र त्याचा धीर कधीच खचत नाही ' ( यं. इं. ६-२-१९३०, पृ. ४४ )... ...' पण जेव्हा त्याच्या " आतील आवाजा "ची अनिवार्य हाक येते आणि तो सत्याग्रहात उडी घेतो तेव्हाच त्याने मागचे दोर कापलेले असतात... मग तिथे माघार नसते ' ( यं. इं., २०-१०-१९२७, पृ. ३५३ ).

## लोकशिक्षण

१-अ. ' जागृत आणि डोळस लोकमत हे सत्याग्रह्याच्या हातातले एक अत्यंत अमोघ शस्त्र आहे ' ( यं. इं. ८-८-१९२९, पृ. २६३ ).

१-ब. ' जो लढा मुख्यतः अंतःसामर्थ्यावर अवलंबून आहे तो एखादे वृत्तपत्र हाती असल्याशिवाय पूर्णतया चालवता येणार नाही अशी माझी समजत आहे. तसा माझा अनुभवही आहे. ' इंडियन ओपिनियन ' हे पत्र नसते तर दक्षिण आफ्रिकेतील भारतीय समाजाचे शिक्षण करणे कदाचित अशक्य झाले असते. तसेच, त्याच्या-

शिवाय दक्षिण आफ्रिकेत चाललेल्या घडामोडींची जगभर विखुरलेल्या भारतीयांना माहिती करून देणे यांसारखी कार्ये इतक्या सहजपणे नक्कीच झाली नसती. ते वृत्तपत्र म्हणजे आमच्या हातातले मोठे उपयोगी व सामर्थ्यशाली हत्यार होते. परिणामी, लढ्याच्या ओघात आणि लढ्याचा परिणाम म्हणून समाज जसा बदलत गेला तसतसे 'ओपिनियन 'ही बदलत गेले' ( सत्याग्रह इन साउथ आफ्रिका, पृ. २२१ ).

२. 'तार करून आपले संदेश पोचवता येतात. आपल्याला जर तारेची चैन नाकारण्यात आली तर आपण पोस्टाने पत्रे पाठवून आपली गरज भागवली पाहिजे. टपालावर बंदी घातली तर आपण निरोप्यांचे साहाय्य घेऊ... आपली गती रोखण्याचे बाहेरून कितीही प्रयत्न झाले तरी आपण कृतनिश्चयी असू तर आपल्यावर कोणीच मात करू शकणार नाही' ( यं. इं., १५-१२-१९२१, पृ. ४०८ ).

'जोपर्यंत आपल्याजवळ कागद आणि टाक, किंवा निदान पाटीपेन्सिल आहे तोपर्यंत आपल्याजवळ पुरेसे स्वयंसेवक असले तर, आपले विचार पसरविण्याच्या बाबतीत निराश होण्याचे काहीच कारण नाही. स्वयंसेवक लेखकांची पुरेशी संख्या असेल तर कोणत्याही कागदपत्राच्या आपण अगणित प्रती काढू शकतो' ( यं. इं., ९-३-१९२१, पृ. ७३ ).

'प्रत्येकाने स्वतःच एक चालते-बोलते वर्तमानपत्र व्हावे व तोंडातोंडी बातम्या पसरवाव्या. मात्र त्यांनी अफवा-आवयांत शिरू नये. त्यांनी बातमीच्या उगमस्थानाची व खरेपणाची खात्री करून घ्यावी' ( हरिजन, १०-११-१९४०, पृ. ३३४ ).

३. 'शासनसंस्थेचे दोष दाखविण्यावर लक्ष केंद्रित करू नका. ती यंत्रणा चालविणाऱ्यांचे मतपरिवर्तन करून आपल्याला त्यांच्याशी मैत्री करावयाची आहे. शिवाय कोणीही स्वभावतःच दुष्प्रवृत्त नसतो. विरोधक दुष्प्रवृत्त असतील तर आपण स्वतः काय कमी ( दुष्प्रवृत्त ) आहोत ? आत्मपरीक्षणाची वृत्ती सत्याग्रहात अंगभूतच आहे' ( हरिजन, ३०-३-१९४०, पृ. ७१ ).... द्वेषाचे प्रतीक असणारी सर्व गाणी, घोषणा, भाषणे आपल्याला वर्ज्य आहेत' ( यं. इं., २-४-१९३१, पृ. ५८ ). )

## नेतृत्व

१. 'झुंडशाही टाळावयाची असेल आणि देशाची सुव्यवस्थित प्रगती व्हावी अशी इच्छा असेल तर जनतेच्या नेतृत्वावर हक्क सांगणाऱ्यांनी गर्दीच्या आहारी जाण्याचे कटाक्षाने टाळले पाहिजे. आधी आपले विरोधी मत नोंदवून शेवटी पुन्हा गर्दीच्या मताला मान तुकवून चालणार नाही. इतकेच काय पण, प्राणभूत महत्त्वाच्या प्रश्नात लोकांची इच्छा नेत्याच्या विवेकबुद्धीला पटत नसेल तर त्याने लोकांच्या इच्छेला

मान न देता तिच्याउलट कृती केली पाहिजे ' ( यं. इं., १४-७-१९२० ).

२. ' त्याच्या स्वतःच्या विवेकाने दाखविलेल्या मार्गाने चालणारा नेता नसेल तर तो कुचकामी ठरतो. त्याला आपल्या भूमिकेवर खंबीर ठेवणारा आणि योग्य मार्गदर्शन करणारा " आतला आवाज " त्याच्याजवळ नसेल तर सुकाणू नसलेल्या जहाजासारखा तो इकडे तिकडे भरकटत राहील ' ( यं. इं , २३-२-१९२२, पृ. १२२ ).

## मोहीम

१. ' हिंसक असो वा अहिंसक, प्रतिकार कसा करावयाचा त्याचा प्रथम पूर्ण विचार केला पाहिजे. विचार न करता केलेला प्रतिकार म्हणजे, सैनिकी भाषेत, नुसते आचरट साहस ठरेल. अहिंसक भाषेत, तो हिंसाचार किंवा मूर्खपणाच ठरेल. माघार घेणे हीच कित्येक वेळा प्रतिकाराची योजना असू शकते. कित्येक वेळा ते महापराक्रमाचे किंवा महान त्यागाचे पूर्वचिन्ह ठरू शकते. प्रत्येक माघार म्हणजे मृत्यूचे भय पोटात बाळगणारा भित्रेपणा नव्हे. अर्थात आपल्याला हुसकून लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या आक्रमकारी हिंसक किंवा अहिंसक मार्गांनी झुंजताना बळी जाणे पराक्रमी मनुष्य अधिक पसंत करील, पण तात्पुरती माघार घेणे शहाणपणाचे असेल तर तसे करणे त्याच्या शौर्याला कमीपणा आणीत नाही ' ( हरिजन, १२-४-१९४२, पृ. १०९ ).

२. ' चाणाक्ष सेनापती आपले सैन्य संपूर्णपणे नेस्तनाबूत होईपर्यंत कधीच थांबत नाही. जे ठिकाण आपल्याला लढवता येणार नाही असे त्याला वाटते तेथून तो वेळीच, शिस्तीत व पद्धतशीरपणे पाय काढून घेतो ' ( हरिजन, २२-१०-१९३८, पृ. ३०४ ).

३. ' लोकांनी काय करावयाचे ते आपण लोकांना सांगितले पाहिजे. ते आपल्या कुवतीप्रमाणे कृती करतील. लोकांची कुवत जोखून त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करू लागलो तर आपण अडखळणारे आदेश देऊ व चळवळ धोक्यात आणू अशी शक्यता आहे. तसे कधी होऊ देता कामा नये ' ( पत्र., पृ. ३१० ).

## पण नेत्यांच्या बाबतीत

१-अ. ' सत्याग्रह्याला मर्यादा माहीत नसते; आणि क्लेश भोगण्याची त्याची सहनशक्ती असीम असते ' ( यं. इं., १९-२-१९२५, पृ. ६१ ).

१-ब. ' हिंसा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला निष्प्रभ करून टाकण्याचे सामर्थ्य अहिंसेत आहे ही त्याची श्रद्धा असीम असली पाहिजे. हिंसेला सामोरे जाण्यातच खरी

अहिंसा आहे. सकृद्दर्शनी अशक्य भासणाऱ्या गोष्टी साध्य करणे अहिंसेला जमेल का, हा अहिंसेच्या सामर्थ्यावरील अविश्वास गळून पडला पाहिजे' (हरिजन, २९-४-१९३९, पृ. १०४-१०५).

## एक सूचना

'आपण सर्वजण हुतात्म्याचे मरण मरण्यास तयार होण्याइतके पराक्रमी होऊ या. पण हौतात्म्याची लालसा कोणीच धरू या नको' (हरिजन, १३-१-१९२७, पृ. १०).

□ □

प्र/९०४
९
ग्रंथालय

प्रकरण ८ वे

# भारतीय राजकारणात गांधी

**प्रस्तावना**

प्रस्तुत पुस्तकात आतापर्यंत विशिष्ट आर्थिक व राजकीय प्रश्नांवरील गांधींचे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आता त्यांनी हे विचार प्रत्यक्षात कसे आणले त्याचे वर्णन करून त्याचे विश्लेषण करण्याचे ठरवले आहे.

सार्वजनिक कार्यकर्ता या दृष्टीने त्यांचे एक ठळक वैशिष्ट्य असे की, एखादी नवी योजना कार्यवाहीत आणावयाची असेल तेव्हा त्यांनी त्यासाठी नवी संघटना न उभारता शक्य तो विद्यमान संघटनांचाच उपयोग करून घेतला. काही वेळा नव्या संस्था काढणे अगदीच आवश्यक झाले तेव्हासुद्धा गांधींनी नव्या संस्थेसंबंधीचा ठराव विद्यमान व प्रतिष्ठित संस्थांत आणून तो मान्य करून घेतल्याचे दिसते. असे केल्याने नव्या संस्थेच्या कार्याला अनुकूल वातावरण मिळते. शिवाय, अप्रत्यक्षपणे का होईना, अधिकाधिक लोक तिच्याशी निगडित होतात.

गांधींच्या सामाजिक व आर्थिक आदर्शांची कल्पना अंशतः तरी वाचकांना आलेलीच असेल. पण त्याशिवाय प्रकृती आणि स्वभाव या दोन्हींच्या विशिष्ट ठेवणीमुळे काही गोष्टींकडे त्यांचा आपसूकच कल होता. त्यांनी जे जे करण्याचा प्रयत्न केला त्या सर्वांवर त्यांची त्यामुळे वैयक्तिक छाप पडलेली आहे. त्यांच्याबरोबर कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांवर त्यांचा प्रभाव पडला. ज्या संस्थांतून त्यांनी कार्य केले त्यांतही तदनुषंगिक बदल घडून आले.

उदाहरण म्हणून त्यांच्या ठिकाणच्या प्रवृत्ती येथे मांडतो. ऐन निकराच्या वेळी "टीकेचा अत्यंत प्रखर झोत आत्मनिरीक्षणासाठी" स्वतःवर टाकण्याची त्यांना सवय होती. भारतीय लोक परदास्यात राहत असतील, त्यांच्यावर काही संकटे कोसळत असतील तर, त्यांचे असे म्हणणे असे की, या समाजाच्या अंतर्गत रचनेतच असा काही दोष असला पाहिजे की, त्यामुळे येथील लोकांना गुलाम करणे शक्य व्हावे, किंवा

येथील लोकांवर संकटे कोसळावीत. म्हणून प्रथम " स्वतःच्याच डोळ्यांतील मुसळ काढण्याकडे " किंवा त्यांच्याच भाषेत सांगावयाचे तर " अंतर्गत शुद्धीकरणा "कडे ते आपल्या प्रयत्नांचा रोख वळवीत असत. तसे करीत असतानाच, दुसरीकडे, आवश्यक ते " बाह्य " संघटनात्मक बदल घडवून आणण्याचा ते प्रयत्न करीत असत. संघटनात्मक किंवा बाह्य परिस्थितीतील बदल घडवून आणण्यातील यश ही त्यांच्या लेखी यशस्वी आत्मशुद्धीची खूण होती. बाह्य बदल सार्थ व्हायचे असतील तर आनुषंगिक आंतरिक परिवर्तन झालेच पाहिजे असे त्यांना वाटत असे. असे असल्यामुळे कित्येक वेळा त्यांच्या औपचारिक राजकीय कार्याची वाटचालही सामाजिक सुधारणेच्या दिशेने वळण घेत असे.

मानवी जीवनाची निरनिराळी अंगे सुटी वा परस्परांशी असंबद्ध नसून ती मूलतः व सेंद्रीय स्वरूपात परस्परांशी घनिष्ठपणे निगडित आहेत असा गांधींचा दृष्टिकोण होता. त्यांच्या कार्यपद्धतीतील उपरोक्त वैशिष्ट्याचा संबंध आपणास याच्याशी जोडता येईल.

अगदी निकटच्या, प्रत्यक्ष हातात असलेल्या प्रश्नावर त्या त्या वेळी सर्व लक्ष केंद्रित करण्याची त्यांची हातोटी ही त्यांच्या ठिकाणची दुसरी प्रवृत्ती होय. दूरवरच्या प्रश्नांची त्यामानाने ते विशेष चिंता करीत नसत. " एक पाऊल ( पुढे टाकणे ) पुरेसे आहे " असे ते नेहमी म्हणत. परिणामतः त्यांनी मागे केलेल्या गोष्टींत व आज ते करावयास उद्युक्त झालेल्या गोष्टींत कधी कधी एक प्रकारची विसंगती दिसून येत असे. माझे सत्याचे दर्शन जसजसे प्रगल्भ होत जाते तसतसा मी माझ्या कृतीत अनुरूप बदल करतो, असे त्यावर त्यांचे स्पष्टीकरण असे. एखाद्या विशिष्ट क्षणी जे सत्य प्रतीत होईल त्याच्या बाजूने निर्धाराने उभे राहण्याच्या बाबतीत मात्र त्यांच्या वागण्यात सतत सुसंगती दिसून येते.

त्यांच्या स्वभावातील या दोन प्रवृत्तींचा परिणाम असा झाला की, एखादी गोष्ट पूर्णपणे पटल्याशिवाय ते बदलाला नकार देत असत. त्यांना एखादी गोष्ट पटवून देणे ही खरोखरच मोठी बिकट गोष्ट होती. कित्येक वेळा ते आडमुठी भूमिका घेत आहेत असे वाटे. पण या सवयीमुळे त्यांचा फायदाही झालेला आहे. कोणतीही गोष्ट अमलात आणावयाची झाली की ते अंमलबजावणीच्या अगदी बारीकसारीक तपशिलात जाऊ शकत असत. दुसरा फायदा असा की अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांचा इतरांशी प्रामाणिक मतभेद झाला तर ते सहजगत्या " मला माझ्या मार्गाने जाण्याचे स्वातंत्र्य आहे " ही भूमिका घेऊ शकत असत. असे करीत असताना तीच सवलत ते दुसऱ्यांनाही देत असत.

गांधींनी आधुनिक काळातील भारताच्या राजकीय घडामोडींमध्ये कोणती भूमिका बजावली त्याचा आता अभ्यास करू. सामान्य जनतेवरील गांधींचा प्रभाव व जनमानसा-

विषयीचे त्यांचे ज्ञान ही केवळ अद्‌भुत होती. अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांशी त्यांचा जो ऋणानुबंध होता त्याबद्दलही हेच म्हणता येईल. त्यांचा हा प्रभाव १९१७ मध्येच दिसू लागला होता; आणि तो १९४८ मध्ये त्यांचा मृत्यू होईपर्यंत टिकून होता; कदाचित, १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळेपर्यंत तरी तो टिकून होता, असे म्हणणे अधिक बरोबर होईल. त्यानंतर मात्र गांधींचा प्रभाव भारतीय राजकारणातून झपाट्याने ओसरत गेला असे दिसते. भारतीय राजकारणातील या गांधीयुगाचा परिणाम म्हणून येथे काही गोष्टी कायमच्या रुजलेल्या दिसतात. एक विशिष्ट विचार व मूल्यप्रणाली काही प्रमाणात प्रभावी आहे ही त्यापैकी एक गोष्ट. भारतात सार्वजनिक व्यवहारात व्यक्तीचे वर्तन धुतल्या तांदळासारखे उच्च नैतिक असावे ही अपेक्षा ही दुसरी गोष्ट म्हणता येईल. ज्या कल्पना-विचारांचे व नैतिक मूल्यांचे पौरोहित्य गांधी करीत होते आणि ज्या गोष्टी त्यांनी कृतीच्या साहाय्याने लोकांत रुजविण्याचा प्रयत्न केला होता त्या विचार-कल्पनांना आणि नीतिमूल्यांना पुन्हा एकवार भारतभूमीतच जोराने धुमारे फुटतील की जगात अन्यत्र कोठे अधिक उत्सुक भूमी लाभल्याने त्या रुजून फोफावतील हे कोणालाच सांगता येणार नाही.

## वारसा

(अ) राष्ट्रीयत्व : एकोणिसाव्या शतकात क्रमाक्रमाने पूर्ण हिंदुस्थान इंग्रजांच्या आर्थिक वर्चस्वाखाली आला. परंतु भारताच्या निरनिराळ्या भागांत त्या वर्चस्वाची पकड सारखीच घट्ट नव्हती. देशाच्या सांकृतिक व राजकीय व्यवस्थेबद्दलही हेच म्हणता येईल.

हिंदुस्थानात आधीपासूनच सांस्कृतिक एकत्वाचे तीव्र भान होते. देशभरच्या लोकांचे जीवन एकाच प्रकारच्या उत्पादनपद्धतीवर अवलंबून होते. बाहेरून आलेल्या पण या देशातच घर करून राहिलेल्या जमातीही यात सहभागी होत्या. मुस्लिम किंवा ख्रिश्चन समाज एतद्देशीयच झाले होते. विशेष म्हणजे जातिव्यवस्थेखालील उद्योग-व्यवसायांच्या संदर्भातल्या श्रेष्ठकनिष्ठपणाच्या कल्पना या बाहेरून आलेल्या समाजांनीही अंगिकारल्या होत्या. जातीबाहेर लग्नसंबंध न करण्याचा नियम त्यांच्यातही पाळला जाऊ लागला. सर्व हिंदूंवर एकाच किंवा सारख्याच वारसाविषयक नियमांचे अधिराज्य होते. सर्वांचे जीवनही एकाच किंवा साधारणतः सारख्याच प्रकारच्या सामाजिक व आर्थिक नियमांनी बद्ध होते. मुसलमान किंवा ख्रिश्चन लोक वरील समाजरचनेतून बाहेर राहिले होते हे खरे; तसेच त्यांचे रूपांतर अजूनपर्यंत हिंदू धर्माच्या पंथांत झालेले नव्हते हेही खरे. तरी कालमानाने जैन, बौद्ध किंवा शीख यांसारख्या अवैदिक, पाखंडी पंथांसारखेच स्थान त्यांना प्राप्त झाले होते.

प्राचीन भारतीय विचारवंतांनी जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या या सांस्कृतिक ऐक्यातून राजकीय एकात्मतेची भावना निर्माण झाली नाही. एकोणिसाव्या शतकापासून पुढे एका ऐक्याचा उपयोग दुसरे ऐक्य साधण्यासाठी होऊ लागेपर्यंत ती वेग-वेगळीच राहिली.

प्रत्यक्ष रणक्षेत्रावर किंवा व्यापारी व आर्थिक क्षेत्रात स्पर्धा करणाऱ्या जमातींनी युद्धासाठी पुन्हा पुन्हा केलेल्या पूर्वतयारीचे एक फलित म्हणून युरोपमध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. स्थानिक भेद नष्ट करून त्यांच्या जागी राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्यात आले. स्थानिक वैशिष्ट्यांच्या जागी एक ' राष्ट्रीय संस्कृती ' निर्माण करण्यात आली. राष्ट्राचा खरा आधार व त्याचे बळ इतर समाजांपासून असलेल्या वेगळेपणाच्या भावनेत होते. या वेगळेपणालाच कित्येक वेळा श्रेष्ठतेच्या भावनेचीही जोड दिली जाई. त्या श्रेष्ठतेच्या समर्थनार्थ व स्पष्टीकरणार्थ नाना कारणे सांगण्यात येत.

भारतातील आंग्लविद्याविभूषित वर्गाने पाश्चिमात्य राजकीय व सांस्कृतिक वर्चस्वा-विरुद्ध झगडा देण्याची मानसिक तयारी करावयाला सुरुवात करण्यापूर्वी हिंदुस्थान हे त्या अर्थाने राष्ट्र नव्हतेच. गांधींचा जन्म झाला त्या वेळी हिंदुस्थानात राष्ट्रवादाकडे आपला नवा धर्म म्हणून पाहिले जात होते. आयुष्याच्या प्रारंभी गांधींवरही राष्ट्रवादी विचारप्रणालीचा काहीसा प्रभाव पडलेला दिसतो. दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या अनुभवाने राष्ट्रवादी विचारसरणीची पकड अधिकच दृढ झाली. परंतु इंग्रज लोकांच्या चारित्र्याबद्दल आणि त्यांच्या सामाजिक संस्था-संघटनांबद्दल त्यांच्या मनात फारच आदर होता. भारताचा चिरकालपर्यंत ब्रिटिश साम्राज्याशी संबंध कायम राहावा अशी त्यामुळेच त्यांची तीव्र इच्छा होती. ब्रिटिश साम्राज्यवादी राजवटीचे दोष सिद्ध झालेले होते तरी, भावी काळात भारताची उन्नती याच राजवटीचा हात धरून होऊ शकेल असे त्यांना वाटत होते.

( ब ) **मुसलमान** : येथील सुशिक्षित मुसलमानांनी भारतातील हिंदूंना आपल्या बरो-बरीचे मानले असे नेहमीच घडलेले नाही. त्यांना मुख्यतः पश्चिम आशियातील स्वधर्मी लोकांविषयी जास्त आपुलकी होती.

काकीनाडा येथे १९२३ मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या अध्यक्षांचे याविषयीचे विचार उद्धृत करणे येथे उपयुक्त ठरेल असे वाटते. त्या काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना महंमद अली म्हणाले, ' हिंदुस्थानी लोकांनी त्यांना सहानुभूती दाखविणाऱ्या ब्रिटिश व्यक्तींच्या मदतीने १८८५ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना केली तेव्हा काही थोड्या व्यक्ती वगळता मुसलमानांनी त्यात भाग घेतला नाही. त्यांच्यात पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता आणि म्हणून उच्च शिक्षितांनी सुरू केलेल्या वरील

चळवळीत भाग घेण्यास आवश्यक ती तयारी मुसलमानांची नव्हती. दुसऱ्या बाजूला, त्यांच्या राजकीय स्वभावप्रकृतीमुळे कोणत्याही राजकीय चळवळीला त्यांचे अस्तित्व धोकादायक ठरले असते असेही म्हणता येईल. हिंदुस्थानचे राज्य त्यांनी गमावले होते, पण त्या सत्तापभोगाच्या परंपरेची स्मृती त्यांच्या मनात रेंगाळत होती. नवीन पद्धतीच्या शिक्षणाबद्दल त्यांना नेहमीच तिरस्कार वाटत आला होता. तो या मनोवृत्तीमुळे अधिकच वाढला... हिंदुस्थानच्या नव्या राज्यकर्त्यांच्या संस्कृतीपासून मुसलमानांची एक सबंध पिढी कडवटपणे दूर राहिली... त्यांच्या संस्कृतीविषयी त्यांना मनोमन तिरस्कारच वाटत होता. ऐतिहासिकदृष्ट्या मुस्लिम वर्चस्वाचे केंद्र असलेल्या उत्तर भारतात १८५७ मध्ये राजकीय उद्रेक घडून आला. त्याच वर्षी स्थापन झालेल्या मुंबई, मद्रास व कलकत्ता विद्यापीठांमुळे उपलब्ध झालेल्या शैक्षणिक सवलतींचा लाभ घेण्याचा विचार करण्याच्यादेखील मनःस्थितीत मुसलमान नव्हते' ( इं. ॲ. रि., १९२३, खंड २, पृ. २३ ).

श्री. महंमद अलींच्या वरील भाषणावरून स्वाभाविकच असे वाटते की, गरीब-श्रीमंत, शेख-मोमीन, शिया-सुनी ( आणि अहमदिया पण ) अशा वेगवेगळ्या व परस्परांना छेदही देणाऱ्या गटांचा मिळून बनलेला सैलसर विणीचा समाज या दृष्टीने ते मुस्लिम समाजाकडे पाहात नव्हते, तर माजी राज्यकर्त्यांचा एकसंध समाज या दृष्टीने ते त्याकडे पाहात होते. उलट बाजूस, तुलनेने, गरीब-श्रीमंत, श्रेष्ठ- कनिष्ठतेच्या उतरंडीवर रचलेल्या असंख्य जाती, भिन्नभाषिक समूह अशा हिंदू समाजाच्या चिरफळ्या पडलेल्या होत्या. अशा या शतखंडित समाजातूनच युरोपीय अर्थाने एक " राष्ट्र " निर्माण करण्याचा प्रयत्न भारताचे थोर पुढारी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सातत्याने करीत होते. तर भारतात ठिकठिकाणी विखुरलेल्या मुसलमानांत एक जोमदार राष्ट्रवाद निर्माण करणे हा अलिगढ चळवळीचा उद्देश होता असे म्हणता येईल. १९०६ च्या अखेरीस मुस्लिम लीगची स्थापना झाली आणि १९०९ मध्ये ब्रिटिश सरकारने विभक्त मतदारसंघ निर्माण केले. वर उल्लेखलेल्या अध्यक्षीय भाषणात श्री महंमद अली असेही म्हणाले की, ' सामान्य प्रादेशिक मतदारसंघाच्या व्यवस्थेखाली स्वतःसाठी योग्य वा पुरेशा प्रमाणाच्या जवळपासदेखील प्रतिनिधित्व मिळवण्यात मुसलमानांना यश मिळाले नाही. मुसलमानांसाठी वेगळे मतदारसंघ निर्माण करण्यास ज्यांनी विरोध केला व विभक्त मतदारसंघ अस्तित्वात आल्याचा ज्यांना खेद होतो त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की, विभक्त मतदारसंघ मुसलमान व ( त्यांच्याहून संख्येने अधिक असलेले ) हिंदू यांच्यातील विलगपणाच्या वस्तुस्थितीतून निर्माण झाले, विभक्त मतदारसंघामुळे विलगपणा निर्माण झालेला नाही' ( इं. ॲ. रि., १९२३, पृ. २७ ).

काँग्रेस व मुस्लिम लीग यांनी तत्पूर्वी, १९१६ मध्ये, एक समझोता केला होता.

त्यानुसार ‘ मुसलमानांसाठी विभक्त मतदारसंघ असावेत याला उभय पक्षांनी मान्यता दिली होती. आणि, पंजाब व बंगाल या दोन प्रांतांचा अपवाद सोडता, मुसलमानांना त्यांच्या संख्येच्या मानाने किती तरी जास्त प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याचेही मान्य केले होते, ’ (राजेन्द्रप्रसाद, १९४६, पृ. ११८). ‘ दि स्टोरी ऑफ माय लाइफ ’ या आपल्या पुस्तकात श्री. जयकर म्हणतात, ‘ “ लखनौ करार ” घडवून आणण्यात ज्यांचा प्रमुख हात होता त्यात टिळक एक होते. त्यामुळे त्या वेळच्या कित्येक राष्ट्रीय पुढाऱ्यांना आश्चर्य वाटले होते. जातीय स्वरूपाच्या विभक्त मतदारसंघांना ना. गोखल्यांनी १९०९ मध्येच मान्यता दिली होती. टिळकांनी ती १९१६ साली लखनौ येथे दिली ’ ( जयकर, १९५८, खंड १, पृ. १६१ ).

गांधी १९१५ च्या शेवटी द. आफ्रिकेतून भारतात परत आले. त्यानंतर, १९१८–१९१९ मध्ये त्यांनी भारतीय राजकारणात प्रवेश केला. विभक्त मतदारसंघ हा त्या वेळच्या भारतीय राजकीय परिस्थितीतला एक महत्त्वाचा पूर्वगृहित घटक होता. तो गृहीत धरूनच गांधींना कार्य करावे लागले.

( क ) **जाती आणि वर्ग :** १९१५ मध्ये येथील राजकारणात जात किंवा वर्ग या घटकांना अद्याप महत्त्व प्राप्त झालेले नव्हते. फूट होती; पण ती आर्थिक व सामाजिक मागासलेपणापुरती मर्यादित होती.

गांधी स्वतः रस्किन व टॉलस्टॉय यांचे वैचारिक शिष्य असल्याने त्यांची वरील फुटीकडे पाहण्याची दृष्टी इतर बहुतेक राजकीय नेत्यांहून भिन्न होती. ब्रिटिश अमदानीतील हिंदुस्थानच्या आर्थिक इतिहासाचा त्यांचा अभ्यास आणि टॉलस्टॉय-रस्किन यांच्याकडून घेतलेली शिकवण यांच्या आधारे त्यांनी खेडे आणि शहर यांमध्ये, शेतात खपणारी ग्रामीण जनता आणि पांढरपेशी शहरी जनता यांच्यात मुख्य भेद केला. इतर प्रकारचे– धर्मावरून, जातीवरून, इ.– भेद त्यांनी गौण मानले. त्यांच्या मते बहुतांशी खेड्यांतून राहणाऱ्या श्रमिक जनतेच्या कष्टांवर ( बांडगुळाप्रमाणे ) जगण्याच्या बाबतीत ( परकीय ) राज्यकर्त्यांशी शहरवासियांनी हातमिळवणी केलेली होती ( सिलेक्शन्स, क्र. २३८ ).

( ड ) **सशस्त्र राष्ट्रवाद :** भारताला राष्ट्रवादी विचारसरणीच्या व त्यासाठीच्या संग्रामाच्या दिशेने नेणारा वेगळ्या प्रकारचा आणखीही एक प्रवाह त्या वेळी देशाच्या राजकारणात होता. गांधींना ज्या वातावरणात कार्य करावे लागले त्याचा तोही एक घटक होता.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून पुढच्या काळात भारतीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांशी सशस्त्र लढा देण्याचे ठरविलेल्या काही व्यक्ती भारतीय राजकारणात होत्या. त्यांना ‘ सशस्त्र क्रांतिकारक ’ या नावाने सामान्यतः ओळखले जाते. सशस्त्र

क्रांतिकारक व्यक्ती व संस्था प्रामुख्याने महाराष्ट्रांत व बंगालमध्ये होत्या ( **सेडिशन कमिटी रिपोर्ट**, १९१८ ).

१९०५ ची बंगालची फाळणी, त्यातून निर्माण झालेली वंगभंगाची आणि "स्वदेशी"ची चळवळ या दोन्ही गोष्टींमुळे राष्ट्रवादी भारताची राजकीय मनःस्थिती जहाल राजकीय कृतीला अनुकूल झाली होती. पहिल्या महायुद्धाने त्यांना संधी मिळवून दिली. ब्रिटिश राज्यसत्तेला प्रचंड धक्का द्यावा या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर निदान दोन तरी प्रयत्न क्रांतिकारकांनी केले ( **सी. आर. दास यांचे भाषण, इं. ॲ. रि.**, १९२५, खंड १, पृ. ३९२ ).

पंजाबपासून बंगालपर्यंत पसरलेल्या हिंदी सैन्यात उठाव घडवून आणण्याचा प्रयत्न हा पहिला. दुसऱ्या प्रयत्नात, भारताच्या पूर्व भागात जर्मनीतून शस्त्रास्त्रांची आयात करावयाची; गनिमी काव्याचे युद्ध सुरू करून बरेचसे सैन्य तिकडेच गुंतवून ठेवावयाचे; आणि सैन्य तिकडे गुंतवल्यानंतर सर्व देशभर सामान्य जनतेने ब्रिटिश राज्याविरुद्ध संप, हरताळ, बंडाळी यांची गर्दी करून सत्ता हाती घ्यायची अशी योजना होती.

वरील दोन्ही कट अगदीच अयशस्वी ठरले; मात्र दोन्ही प्रयत्नांत क्रांतिकारकांनी अतुलनीय पराक्रम व धैर्य दाखविले. त्यांच्या पराक्रमांच्या कथा खूपच पसरल्या होत्या. लोकांत स्वातंत्र्याचे ध्येय निर्माण करण्यास क्रांतिकारकांच्या प्रयत्नांचा चांगलाच उपयोग झाला. क्रांतिकारकांची राष्ट्रपुरुषांत गणना होऊ लागली. त्यांच्या शौर्यगाथांनी लोकांचे नीतिधैर्य वाढले.

## संघटनेचा शोध

वरील वारसा घेऊन गांधींनी भारतीय राजकारणातली आपली कामगिरी सुरू केली. तत्पूर्वी त्यांनी स्वतःपुढे काही निश्चित ध्येये ठेवली. या भूतकाळाकडे थोड्या चिकित्सक दृष्टीने पाहिले तर असे आढळून येईल की, श्रमजीवी लोकांची अहिंसेवर आधारलेली सामूहिक जनसंघटना निर्माण करणे हेच गांधींनी आपल्यासमोर सर्वांत मोठे उद्दिष्ट ठेवले होते. अर्थात, भारतीय स्वातंत्र्य, अस्पृश्यतानिवारण आदि तदनुषंगिक गौण उद्दिष्टे जोडीला होतीच. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एखाद्या अनुरूप संघटनेचा त्यांनी शोध केला. यासाठी त्यांनी प्रथम पुण्याच्या 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी'ची निवड केली असे दिसते. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांना गांधी आपले राजकीय गुरू मानीत असत. गोखल्यांचा आणि सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचा घनिष्ठ संबंध जाहीरच होता.

सोसायटीत प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवार म्हणून गांधी दाखल झाल्यानंतर 'एका सकाळीच त्यांनी सोसायटीच्या कार्यकर्त्यांच्या लहानशा वस्तीतील संडास झाडायला

सुरुवात केली ' अशी एक मजेदार आठवण श्री. जयकरांनी सांगितली आहे (जयकर, १९५८, पृ. ३१६). गोखले यांचे संभाषणही श्री. जयकर यांनी नमूद केले आहे. गांधी 'एका महान चळवळीचे धुरीणत्व करणार ' हे भविष्य वर्तवून गोखले म्हणाले होते की, नाजुक स्वरूपाच्या राजनैतिक बोलण्याच्या वेळी मात्र त्यांच्यावर विसंबण्यात फार अर्थ नव्हता. गोखले यांचे गांधींविषयी असे मत असूनही त्यांना सोसायटीत घ्यायला ते बरेच उत्सुक होतेसे दिसते. परंतु गांधींना सभासद करून घ्यावे की नाही यावरून त्या वेळच्या सभासदांत तीव्र मतभेद निर्माण झाल्यामुळे गांधींनी सोसायटीच्या सभासत्वासाठी केलेला अर्ज मागे घेतला ( **गांधी,** १९४०, पृ. ४५६-४५७ व पृ. ४७१-४७२ ).

त्यानंतर पुन्हा आपली गांधींशी गाठ पडते ती ' होमरूल लीग 'च्या प्रांगणात. ही संस्था १९१७ च्या मध्यास स्थापन झाली होती व तिच्या अनेक प्रांतिक शाखा होत्या. या प्रांतिक शाखांच्या अध्यक्षस्थानी लो. टिळक, डॉ. ॲनी बेझंट, श्री. एम्. ए. जीना आदि ज्येष्ठ नेते होते. मुंबई शाखेचे जीना अध्यक्ष आणि जयकर उपाध्यक्ष होते. जयकर आपल्या आत्मवृत्तात लिहितात, ' कोण्या एका घातवेळी संस्थेच्या संस्थापकांच्या मनात असा विचार आला की, होमरूल लीगच्या मुंबई शाखेचे अध्यक्षपद स्वीकारण्याबद्दल गांधींना विनंती करावी. तसे केल्यास, लोकमान्य किंवा बेझंट अध्यक्ष असलेल्या शाखांइतकेच मुंबई शाखेचे महत्त्व वाढेल असे त्यांना वाटले. ' जयकरांचा तसे करण्याला विरोध होता. ' सनदशीर मार्गांनी एक चळवळ धीराने वाटचाल करीत होती ' अशा वेळी ' बहुतांशी बेसनदशीर मार्गांवर विसंबून असणाऱ्या ' गांधींना होमरूल लीगचे अध्वर्यू करणे त्यांच्या मते फारच धोकादायक ठरले असते.

गांधींना होमरूल लीगमध्ये प्रवेश द्यावा काय, या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी घेतलेल्या बैठकीत गांधी व जयकर यांचे संभाषण झाले ते उद्बोधक आहे. जयकर म्हणाले, ' आपण अखिल भारतीय, नव्हे जागतिक पातळीवर कार्य करणारे नेते आहात. तुमची ध्येये आंतरराष्ट्रीय, वैश्विक आहेत. आपण राष्ट्रीयतेच्या सर्व मर्यादा ओलांडून पलीकडे गेलेले आहात. आपण ज्या तत्त्वांचा प्रचार करीत आहात ती साऱ्या मानववंशासाठी आहेत. लीगसारख्या आमच्या लहानशा संस्थेच्या चार भिंतींत कोंडून घेणे आपल्या दृष्टीने कितपत बरोबर आहे व आमच्या दृष्टीने किती योग्य आहे याची शंका वाटते. ब्रिटिश सरकारच्या पवित्र्यानुसार आमची कार्यपद्धती वेळोवेळी बदलती ठेवणे आम्हाला आवश्यक आहे. कधीकधी तर आम्हाला ब्रिटिश राज्यसत्तेशी वैरभाव धारण करण्याची वेळ येते. अशी भूमिका आपल्या प्रेम आणि शांतीच्या संदेशाच्या विरुद्ध आहे असे कदाचित आपणास वाटण्याचा संभव आहे... थोड्याच अवधीत कदाचित आपण आमच्या ध्येय-धोरणातच बदल करू मागाल, किंवा आमच्या सैद्धांतिक बैठकीत आपण आपले काही आवडते सिद्धांत घुसडण्याचा प्रयत्न कराल, हे अशक्य

नाही. आपले हे आवडते सिद्धांत आमच्यातील पुष्कळांच्या दृष्टीने " आपली लोकविलक्षण खुळे " आहेत.'

उत्तरादाखल गांधी म्हणाले, 'मी तुमच्या लीगमध्ये यायचे निश्चित केलेच तर मी एकच " खूळ " तेथे आणण्याचा आग्रह धरीन, असे प्रथमच सांगू इच्छितो. सर्व भारताची म्हणून एक समान भाषा असावी, सध्याच्या प्रांतिक भाषांतूनच एकीची त्यासाठी निवड केली जावी, या गोष्टीचा मी आग्रह धरीन; त्याखेरीज " स्वदेशी "चा मी आग्रह धरीन. याखेरीज तुम्हाला माझ्या सिद्धांतांतील आणखी काही स्वीकारावे लागेल अशी तुम्ही भीती बाळगू नका.'

या खुलाशानंतर, अखेरीस, गांधींना होमरूल लीगचे सभासद करून घ्यावे असे ठरले. ते तिच्या मुंबई शाखेचे अध्यक्षही झाले ( **जयकर**, १९५८, पृ. ३१८ ).

होमरूल लीगचे साध्य काय असावे याविषयी तिच्या निदान एका अध्यक्षांची धारणा काय होती यावर भारतमंत्री– सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया– मि. इ. एस् मॉंटेग्यू यांच्या 'डायरी'तल्या नोंदीने वेगळाच प्रकाश पडतो. 'डायरी'त त्यांच्या व बेझंटबाईंच्या एका भेटीचा वृत्तान्त आहे. 'बेझंटबाईंनी मला होमरूल लीगच्या स्थापनेमागील इतिहास सांगितला. आजच्या जहाल तरुणांना काबूत आणण्याची आवश्यकता त्यांना कशी वाटली ते त्यांनी सांगितले. होमरूल लीगने पुरस्कारलेले धोरण अंमलात आले तर बंडाळी व अराजकाचा मार्ग सोडून हे तरुण सनदशीर मार्गाला येऊन मिळतील अशी आपली खात्री असल्याचे त्यांनी सांगितले. देशाचे अर्थव्यवहार व कार्यकारी शासन यांवर आपले नियंत्रण असले पाहिजे असा हिंदी लोकांचा आग्रह आहे, व तो खरा केल्याशिवाय ते राहावयाचे नाहीत असे त्यांनी गंभीरपणे सांगितले. ( जयकर, १९५८, पृ. २१६ ).*

अर्थात मॉंटेग्यूंना मिसेस बेझंट यांचे म्हणणे नीट उमगले व त्यांनी त्याची बरोबर नोंद केली असे आपल्याला गृहीत धरले पाहिजे. पण बेझंटबाईंचे विचार तसे असणे अशक्य नाही. १९१६ साली बनारस हिंदु विद्यापीठाच्या उद्घाटनाच्या वेळी गांधींनी जे 'अराजकवादी' भाषण केले ( **भाषणे**, पृ. ३२४ ) त्याला अत्यंत तीव्र विरोध करणाऱ्यांपैकी बेझंटबाई एक होत्या, ही गोष्ट विसरता कामा नये.

* मात्र होमरूल लीगच्या कार्याचे यापेक्षा वस्तुनिष्ठ व सुखद चित्र आपल्याला मिसेस बेझंट यांच्या १९१७ च्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात मिळते ( **सीतारामय्या**, १९४६, I, पृ. १३०, १३७, १५० ).

सुमारे एक वर्ष असेच गेले. या वर्षात भारतात एतिहासिक महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. कृती करण्याची वेळ आली आहे असे गांधींना वाटू लागले. त्यानुसार त्यांनी होमरूल लीगच्या सभासदांची एक सभा बोलावून होमरूल लीग या संस्थेचे नाव

व ध्येयधोरणही बदलून घेण्यात यश मिळवले. परिणामतः श्री. जीना, श्री. जयकर, श्री. के. एम्. मुनशी, श्री. कानजी द्वारकादास, व आणखी १५ सदस्य यांनी मिळून २७-१०-१९२० रोजी ' स्वराज्य सभे 'च्या ( ' ऑल इंडिया होमरूल लीग 'चे गांधींनी बदललेले नाव ) अध्यक्षांना ( गांधींना ) उद्देशून राजीनाम्याचे पत्र पाठवले. या पत्रात त्यांनी म्हटले होते :

' नव्या घटनेमधील संस्थेचे उद्दिष्ट स्पष्ट करणाऱ्या २(१) या पोटकलमात हिंदुस्थानचा व ब्रिटिश राज्यसत्तेचा संबंध काय राहील याविषयी कोणताही उल्लेख नाही. आणि २(२) या पोटकलमानुसार, प्रभावी व शांततापूर्ण असेल तोवर कोणत्याही बेकायदेशीर व बेसनदशीर कृतींना स्पष्ट परवानगी दिलेली आहे. तसेच, आमचे सर्वांचे असे मत आहे की, होमरूल लीगच्या घटनेत बदल घडवून आणण्यासाठी जी पद्धत वापरली गेली ती लीगच्या याबाबतच्या नियमांना धरून नाही. थोडे पुढे जाऊन आम्ही असे म्हणतो की, ती पद्धत वैध करून घेण्यासाठी आपण दिलेला निर्णय चुकीचा व लहरी आहे. आम्ही इंडियन नॅशनल काँग्रेसच्या घटनेत अंतर्भूत केलेली उद्दिष्टे व कार्यपद्धती मानतो; आणि आमची अशी धारणा आहे की, लीगसारख्या काँग्रेसशी संलग्न असलेल्या संस्थेने त्या काँग्रेसने घटनात्मक म्हणून संमत केलेल्या पद्धतीनेच गेले पाहिजे '* ( **जयकर, १९५८, पृ. ४०५** ).

## इंडियन नॅशनल काँग्रेसशी संबंध

काँग्रेसच्या स्थापनेपासूनच ( १८८५ ) तिची उद्दिष्टे आणि कार्यपद्धती वर म्हटल्याप्रमाणे " सनदशीर–घटनात्मक " होती हे खरे आहे. वर्षातून एकदा देशाच्या सर्व भागांतून राजकारणाकडे प्रवृत्ती असलेल्या सुशिक्षित व्यक्तींना एकत्र आणून सबंध देशाच्या राजकीय व आर्थिक विकासविषयक प्रश्नांची चर्चा घडवून आणणे हे काँग्रेसचे सर्वात मोठे कार्य होते. लोकांच्या मनात राष्ट्रवाद खोल रुजविण्यात काँग्रेस चांगलीच यशस्वी ठरली होती. राष्ट्रीयत्वाची ही भावना सामान्य जनतेतही हळूहळू खूपच मोठ्या प्रमाणावर रुजू लागली होती.

हिंदुस्थानातील लोकांच्या मुख्यत्वेकरून राजकीय हक्कांचा पुरस्कार काँग्रेसने त्या

---

* येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. १९२० मध्ये, म्हणजे होमरूल लीगमध्ये वरील प्रकार झाल्यानंतर थोड्याच दिवसांत, गांधींनी खुद्द काँग्रेसच्या घटनेतच वरील प्रकारचा बदल घडवून आणण्यात यश मिळवले. गांधींनी लीगचे अध्यक्षपद स्वीकारताना केलेले निवेदन पहा : **सीतारामय्या, १९४६, पृ. १९२-१९३.**

वेळपर्यंत केला होता. ' ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक ' म्हणून हिंदी लोकांना ब्रिटिशांबरोबर समान हक्क मिळावेत, उद्योगधंदे व व्यापार तसेच न्यायदान व नोकऱ्याचाकऱ्या या क्षेत्रांत समान वागणूक मिळावी या अधिक मूलभूत मागण्यांचीही चर्चा वेळोवेळी होत होती. जमीनमालकीहक्क रचनेत सुधारणा करून रयतेवरील ओझे कमी केले जावे अशा शिफारशीही प्रसंगोपात्त केल्या जात असत.

काँग्रेसचा आणि गांधींचा पहिला संबंध १९०१ मध्ये आला. त्या वेळी त्यांनी दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहाची मोहीम सुरू केलेली होती. त्या वर्षाच्या काँग्रेस अधिवेशनात दक्षिण आफ्रिकेतील भारतीय लोकांच्या स्थितीबद्दल एक ठराव काँग्रेसमध्ये मांडण्याची गांधींना अनुमती मिळाली होती. या संघटनेच्या कार्यपद्धतीच्या मर्यादांची जाणीव त्याच वेळी गांधींना झाली. तरीसुद्धा भारतात परत आल्यावर आपल्याला करावयाचे कार्य ज्या संघटनांमार्फत साध्य करता येणे शक्य आहे त्यांमध्ये काँग्रेस ही एक प्रमुख संघटना ठरणार आहे हा निर्णय करण्यास त्यांना फार वेळ लागला नाही.

## १९१५ ते १९१९

आपल्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी गांधींनी कार्यवाहीत असलेल्या कोणत्या ना कोणत्या संघटनेत प्रवेश करून घेण्याचे धोरण कसे ठेवले ते आपण पाहिले. त्याच वेळी सत्याग्रहासाठी जनतेची संघटना घडवून आणण्याची त्यांची प्राथमिक मनीषा अखंड कार्य करीतच होती. सामूहिक अहिंसेच्या संघटनात्मक पैलूवर प्रकाश पाडण्याच्या दृष्टीने, या काळात गांधींनी चालविलेल्या तीन चळवळींचा थोडा सूक्ष्म अभ्यास करणे उपयुक्त ठरेल.

( अ ) **चंपारण्य*** : उत्तर बिहारमधील निळीचे मळेवाले व तेथील सामान्य शेतकरी यांचे संबंध एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासूनच अत्यंत बिघडलेले होते ( रायचौधुरी, १९५५, पृ. १३-२४ ). गांधींनी १९१७ मध्ये भारताच्या राजकीय रंगभूमीवर प्रवेश केला तेव्हाही ते तसेच होते.

१९०७ आणि १९०८ साली शेख गुलाब, सीतल रॉय आणि राधेमल या तीन शेतकऱ्यांनी मळेवाल्यांच्या जुलमाविरुद्ध एक चळवळ सुरू केली. परिणामी स्थानिक सरकारने त्या तिघांनी " स्पेशल कॉन्स्टेबल " म्हणून पोलिसात भरती व्हावे असा काहीसा विचित्र हुकूम काढला. त्या तिघांना चळवळीपासून दूर ठेवण्याचाच उद्देश या

---

* पाहा : **भाषणे**, पृ. २७३-२७८; **विल्यम्स्**, १९१९, पृ. ८७-८९; **रायचौधुरी**, १९५५; **राजेंद्रप्रसाद**, १९४९ अ; १९४९ ब, पृ. १–३४; **गांधी**, १९४०, पृ. ४९४–५११.

आज्ञेमागे होता हे उघड आहे. त्या तिघांनीही तसे करण्यास नकार दिला, तेव्हा त्यांना आज्ञाभंगाच्या आरोपाखाली दोषी ठरवण्यात आले. मात्र या निर्णयावरील अपिलात, मार्च १९०८ मध्ये, वरिष्ठ न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरविले. कलकत्ता व पाटणा येथील अनेक वृत्तपत्रांनी रयतेची बाजू उचलून धरली व या प्रकरणाला चांगलीच प्रसिद्धी दिली. पण मळेवाल्यांची दडपशाही निरंकुशपणे चालूच राहिली. इतकेच काय पण पहिल्या महायुद्धाच्या काळात मळेवाल्यांचा संघ आणि एक 'बिहार लाइट हॉर्स' नावाची गौर-वर्णीयांची ऐच्छिक संरक्षक संघटना यांच्या हाती प्रत्यक्षात सर्व प्रांताचा कारभार होता. (रायचौधुरी, १९५५, पृ. १८). सामान्य जनता असंघटित, भयग्रस्त होती. तर ज्या थोड्या सुशिक्षित माणसांना सामान्य जनतेबद्दल सहानुभूती होती त्यांची कृती करण्याची हिंमत नव्हती.

परिस्थिती अशी असताना शेतकऱ्यांची दुःखे राष्ट्रीय पुढाऱ्यांपुढे मांडण्यासाठी डिसेंबर १९१६ मध्ये लखनौला भरणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहण्याचे चंपारण्यातीलच एक शेतकरी राजकुमार शुक्ल याने ठरविले. राजकुमार शुक्लच्या चिकाटीमुळे अखेरीस 'या सर्व शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची आणि उत्तर बिहारमधील नीळ पिकविणारी रयत व युरोपियन मळेवाले यांच्यातील बिघडलेले संबंध यांची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमावी' अशी शिफारस करणारा ठराव काँग्रेसने मंजूर केला. (राजेंद्रप्रसाद, १९४९ अ, पृ. ४८). गांधी त्या अधिवेशनाला हजर होते. श्री. शुक्ल यांनी तेथे व पाठोपाठ कलकत्त्यालाही गांधींची या संबंधात गाठ घेतली. राजकुमार शुक्लाने पिच्छा पुरविल्याने सर्व परिस्थितीची व्यक्तिशः नीट माहिती मिळविण्यासाठी १० एप्रिल १९१७ रोजी गांधी बिहारला पोचले.

ताबडतोब जिल्हा सोडून निघून जावे, असा हुकूम सरकारने लगेच त्यांच्यावर बजावला. गांधींनी या गोष्टीस नकार दिला; (मॅजिस्ट्रेटच्या) आज्ञाभंगाचा दोष मान्य केला; त्यासाठी शिक्षा भोगण्याची तयारी दाखवली; पण ते ज्या चौकशीसाठी तेथे आले होते ती चौकशी पूर्ण करण्याचा आपला निश्चयही जाहीर केला. सरकारी हुकूम मोडण्याच्या त्यांच्या या कृतीने त्यांना ग्रामीण लोकांचे पुढारीपण मिळाले. आपली गाऱ्हाणी नोंदविण्याकरता हजारो शेतकऱ्यांनी गर्दी केली. ही निवेदने, बहुतेक वेळा पोलिस आणि युरोपियन मळेवाले यांच्यादेखतच, त्यांच्या सत्यतेविषयी पूर्ण छाननी करून नोंदविली जात. त्यांच्याविषयी रयतेच्या मनातली भीती एकाएकी खूपच कमी झाल्याचे दिसून आले.

शेवटी सरकारने गांधींवरील खटला काढून घेतला, आणि चौकशीसाठी अधिकृत समितीही नेमली. गांधींच्या सहकाऱ्यांनी गोळा केलेली माहिती खरी असल्याचे या समितीच्या निष्कर्षांनी शाबीत केले. थोड्याच काळात, मळेवाल्यांचा विरोध असतानाही,

तत्संबंधी एक कायदाही प्रसृत केला गेला. थोड्याच वर्षांत 'निळीचे मळे' ही गोष्ट भूतकाळात जमा झाली. (आधीच हा उद्योग कृत्रिम रासायनिक नीळ निघाल्यामुळे पांगुळला होता.)

चंपारण्य सत्याग्रहाच्या पृथक्करणात किमान एक गोष्ट दिसून येते. नेत्याच्या धैर्यामुळेच जनतेचे धैर्य संघटित होण्यास मदत झाली. लोकांनी १९०८ मध्येच आपली क्षमता सिद्ध केली होती; परंतु तेव्हा चळवळ केवळ काही व्यक्ती वा लहान गट यांच्यापुरतीच सीमित होती. या वेळी आज्ञाभंगाचे उघड स्वरूप, त्यांचे शांततापूर्ण धैर्य आणि निश्चयीपणा यांमुळे गांधींचे उदाहरण ग्रामीण जनतेला अनुकरणीय वाटले. हजारोंनी त्यांचे उदाहरण गिरविले. चळवळीतून विधायक राजकीय शक्ती जागृत झाली.

रयतेच्या मागण्यांची नैतिकता व न्याय्यता पूर्वीच प्रस्थापित झाली होती ही गोष्टही लक्षात घेण्यासारखी आहे. गांधींनी आपल्या चौकशीतून त्या मागण्यांच्या न्याय्यतेस अचूकतेचा भक्कम आधार मिळवून दिला, इतकेच.

याच संदर्भात राजेंद्रप्रसादांनी नोंदविलेल्या गांधींच्या उद्गारांची दखल घेणे उद्बोधक ठरेल. चंपारण्य चळवळ चालू असतानाच श्रीमती बेझंट यांना होमरूलसाठी चळवळ केल्याबद्दल स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. त्यामुळे सारा देश चांगलाच प्रक्षुब्ध झाला होता. भारताला 'होमरूल' मिळावे अशी गांधींचीही तीव्र इच्छा होती. पण राजेंद्रप्रसादांनी जेव्हा त्या चळवळीत पडण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा गांधींनी त्यांस, तसे न करता, चंपारण्यामधील कार्यातच सर्व शक्ती केंद्रित करण्यास सांगितले : 'आपल्या मौनानेच आपण "होमरूल" आणण्यासाठी सर्वांत मोठे कार्य करीत आहोत' (**राजेंद्रप्रसाद, १९४९ ब, पृ. १९**).

या उपदेशाची दोन कारणे होती. एक म्हणजे कार्यकर्त्यांनी आपले लक्ष हातातल्या कामावर जास्तीत जास्त केंद्रित करावे अशी गांधींची इच्छा होती. दुसरे असे की, त्यांना आपल्या विरोधकांना दिलासा द्यावयाचा होता. किंबहुना त्यांनी असे लिहिले आहे की, 'माझ्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून मी असे ठरविले होते की, काँग्रेसच्या नावाने काही एक करावयाचे नाही. आम्हाला काम हवे होते, नाव नको होते. आम्हाला भरीव कामगिरी करावयाची होती, पोकळ गाजावाजा नको होता. सरकारला— व सरकारचे नियंत्रक जे मळेवाले त्यांनाही— काँग्रेसच्या नावाचा एक बागुलबुवाच वाटत होता' (**गांधी, १९४०, पृ. ५०३**).

**( ब ) खेडा*** : चंपारण्य प्रकरणात शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सत्याग्रहात भाग घेण्यासाठी बोलावले गेले नव्हते. एकट्या गांधींनीच सविनय कायदेभंग केला. बिहारच्या गव्हर्नरची सहानुभूती त्यांच्या बाजूने होती. सरकारच रयतेच्या मदतीला आले. स्वाभाविकच, काही अटींवर का होईना, मळेवाल्यांना शरण यावे लागले. १९१८ मध्ये गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील परिस्थिती मुळातच वेगळी होती.

शेते पिकली नव्हती आणि शेतकऱ्यांनी सारा वसूली केली जाऊ नये अशी विनंती केली होती. गांधी त्या वेळी ' गुजरात सभे 'चे अध्यक्ष होते. या सभेने आणि सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीच्या काही सदस्यांनी मिळून एक तपशीलवार आर्थिक पाहणी केली. तीत त्यांना असे आढळून आहे की, शेतकऱ्यांची मागणी न्याय्य आहे. शेतकऱ्यांची ही मागणी मान्य करायला सरकार मात्र काऽकू करीत होते. म्हणून गांधींनी आपली पत्नी कस्तूरबा, विठ्ठलभाई पटेल व इतर कार्यकर्त्यांच्या मदतीने शेतकऱ्यांच्या सभा घेण्यास सुरुवात केली. शेकडो, हजारो शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांनी एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आले. त्यात म्हटले होते, ' आमची जमीन जप्त झाली तरी चालेल ' पण आम्ही राहिलेला किंवा पूर्ण सारा मुळीच देणार नाही. '

आर्थिक मागण्यांचा लढा राजकीय पातळीवर नेण्याचा येथे गांधींचा प्रयत्न होता. ६ एप्रिल १९१८ रोजी त्यांनी केलेल्या भाषणाच्या वृत्तांतानुसार गांधींनी असे म्हटले की, " जर " स्वराज्य " मिळवावयाचे असेल तर आपल्या वचनांना दृढपणे चिकटून राहण्यास त्यांनी शिकले पाहिजे. गांधींनी लोकांना एक आग्रहाची विनंती केली की, त्यांनी दुसऱ्या कोणावर विसंबून न राहता स्वतःच्याच सामर्थ्यावर निष्ठा ठेवावी. ही चळवळ फसली तर भारताच्या अन्य भागांतील शेतकरी पुढे कित्येक दिवस उठाव करणार नाहीत ' ( इं. ॲ. रि., १९१९, IV, पृ. ७५–७६ ). १७ एप्रिल १९१८ रोजी काढलेल्या एका पत्रकात इतर काही गोष्टींबरोबरच गांधी म्हणतात, ' कुंभकर्णी झोपेतून भारत आता जागा होऊ लागला आहे यात काहीच शंका नाही. आपले हक्क आणि कर्तव्ये समजण्यासाठी जनतेने साक्षरच व्हायला पाहिजे असे नाही. त्यांना आपल्या अप्रतिहत सामर्थ्याचे भान होण्याचीच फक्त गरज आहे, मग कोणतेही सरकार, कितीही शक्तिशाली असले तरी, त्यांच्या इच्छेआड येऊ शकणार नाही. खेडा जिल्ह्यातील लोक भारतातील साम्राज्यशाहीचा अव्वल प्रश्न सोडवीत आहेत. लोकांच्या संमतीशिवाय त्यांच्यावर राज्य करणे शक्य नाही हे ते दाखवून देखील... हा लढा केवळ सारा वसूली

* पाहा : **इं. ॲ. रि.**, १९१९, IV, पृ. ७३–७४; **गांधी** १९४०, पृ. ५३१–५३८; **भाषणे**, पृ. २७९–३०४; आणि गांधींनी आपल्या आत्मवृत्तात उल्लेख केलेले श्री शंकरलाल पारीख यांचे खेडा सत्याग्रहावरील गुजराथी पुस्तक.

स्थगित करून घेण्यासाठी नाही. त्यात तीस कोटी लोकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत... हा स्वराज्याचा लढा आहे' (कित्ता, ७८–७९).

त्यानंतरची हकीकत व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद श्री. सी. शंकरन् नायर यांच्या शब्दांत देणेच उत्तम ठरेल. संकल्पित घटनात्मक सुधारणांच्या मसुद्यासंबंधी त्यांनी एक भिन्न मतपत्रिका जोडली होती. त्या भिन्न मतपत्रिकेला खेडा जिल्ह्यातील घटनांसंबंधी एक परिशिष्ट त्यांनी जोडले होते. त्यात ते म्हणतात, 'सरकारी भाडेपट्टी किंवा शेतसारा (रयतेने) दिला नाही. मालमत्ता– त्यात घरातील भांडीकुंडी, दुभत्या गाई, इत्यादी सर्व चीजवस्तू आल्या-जप्त केली गेली; इतकेच नव्हे तर जमिनीही जप्त करण्याचे सरकारी हुकूम सुटले. सारावसूलीसाठी सरकारच्या मुलकी अधिकाऱ्यांनी सर्व तऱ्हेचे उपाय योजले. कमिशनरने स्वतः शेतकऱ्यांची एक जाहीर सभा बोलावली व सांगितले की, शेतकऱ्यांनी होमरूल लीगवाल्यांच्या मागे जाण्यात अर्थ नाही, कारण सारा न देण्यामुळे होणारे परिणाम भोगायला ती माणसे (होमरूल लीगची) येणार नाहीत. पण जनता आपल्या मार्गावर दृढ राहिली. या चळवळीला सहानुभूती दर्शविण्यासाठी सर्व देशभर सभा घेण्यात आल्या. सरकारनेच या लढ्याला "सरकार विरुद्ध होमरूल लीग" असे स्वरूप दिले. सर्व प्रकारची दडपणे आणण्याचा प्रयत्न केला गेला. पण जनतेचा विरोध अधिकच तीव्र झाला. गावातील प्रमुखसुद्धा पुढे सरकारच्या विरुद्ध गेले... २५ एप्रिल रोजी सरकारने सारावसूली तहकूब केली व हुकूम काढला की, 'ज्यांना सारा देणे शक्य असेल त्यांनीच तो द्यावा; उरलेल्यांनी सारा पुढील वर्षी भरला तरी चालेल' (किता, पृ. ८५–८६).

अशा रीतीने एक प्रकारे चळवळीचा विजय झाला. पण या विजयाने गांधींचे समाधान झाले नाही. त्यांनी आपल्या "आत्मकथे"त लिहून ठेवले आहे की, 'लोक आधीच घायकुतीला आले होते. त्यांना ताठर राहावयास सांगून सर्वनाश ओढवून घ्यावा की काय याबद्दल मी साशंक होतो.' सरकारी हुकूम हा सुटकेचा निःश्वास ठरला. 'वस्तुतः गरीबांना तहकुबी मिळावी असा सरकारी हुकूम असूनही त्याचा फायदा फारसा कोणालाच मिळाला नाही. कोणास गरीब म्हणावे हे ठरविण्याचा अधिकार खरे पाहता जनतेलाच होता; पण तो तिला बजावता आला नाही' (गांधी, १९४०, पृ. ५३७);

(क) **अहमदाबाद :*** खेडा जिल्ह्यातील चळवळ पूर्ण वेगात असतानाच गांधी काहीशा अपवादभूत परिस्थितीत अहमदाबादच्या एका कामगार वादात ओढले गेले.

---

* पाहा : **गांधी**, १९४०, पृ. ५२१–२२, ५२६–५३०; **देसाई**, १९५१ **सोमण**, १९५७, पृ. २३३–२४८.

खेडा चळवळीच्या संदर्भातच मुंबईला आले असताना गांधी अहमदाबादच्या कापडव्यवसायातील प्रमुख उद्योगपती श्री. अंबालाल साराभाई यांना २ फेब्रुवारी १९१८ रोजी भेटले. अहमदाबादमधील कापडगिरण्यांचे मालक व मजूर यांतील बिघडलेल्या संबंधाची माहिती श्री. साराभाईंनी त्यांना सांगितली. गेली काही वर्षे कामगारांना त्यांच्या मजूरीच्या ७० ते ८० टक्के इतका बोनस मिळत होता. हा बोनस बंद होणार अशी बातमी प्रसृत झाल्याने कामगार क्षुब्ध झाले होते. ११ फेब्रुवारी १९१८ ला अहमदाबादच्या कलेक्टरने 'खरी स्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने' गांधींना भेटीसाठी बोलावले. गांधींचे चिटणीस श्री. महादेवभाई देसाई यांची माहिती बरोबर असेल तर 'अहमदाबाद शहराची शांतता नष्ट होऊ नये यासाठी काही प्रतिबंधक उपाय' योजण्याचा कलेक्टरने निर्णय घेतला (देसाई, १९५१, पृ. ४–५).

गांधी अहमदाबादला गेले. आपल्या ठरलेल्या पद्धतीप्रमाणे त्यांनी तेथील परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. त्यात त्यांना असे आढळून आले की, ५० % बोनस मिळावा ही मजूरांची मागणी समर्थनीय नव्हती. ३५% बोनसची मागणी रास्त झाली असती. ३५% च्या खाली जाणे कोणत्याही स्थितीत शक्य नव्हते. प्रयत्नांची परिसीमा करून गांधींनी मजूरांकडून त्यांची मागणी ३५% इतकी खाली आणविली. त्याच वेळी त्यांनी मजूरांकडून असेही वचन घेतले की, आपली मागणी मान्य करून घेण्यासाठी ते केवळ शांततापूर्ण असे सर्व मार्ग अवलंबतील, मग त्याचे परिणाम काहीही होवोत. गिरणीमालकांच्या सहकार्याने एक लवादमंडळही बसवण्यात आले. त्यावर दोन्ही पक्षांचे प्रतिनिधी होते. मजूरांच्या तर्फे गांधी, श्री. शंकरलाल बँकर व वल्लभभाई पटेल हे प्रतिनिधी होते.

मध्यंतरी काही कामगार संपावर गेले. हे अर्थातच चूक होते. कारण लवादाला आधीच मान्यता दिलेली होती व लवादाने अजून निर्णय दिलेला नव्हता. गांधींनी लगेच मजूरांच्या वतीने माफी मागितली, व संपवाल्यांना त्यापासून परावृत्त केले. मात्र गिरणीमालकांनी या संधीवर झडप घालून संपाचा उपयोग लवाद धुडकावून टाकण्यासाठी केला. त्यांनी ताबडतोब टाळेबंदी केली. त्यामुळे लढ्याला तीव्र स्वरूप प्राप्त झाले. १८ दिवसांनंतर मालकांनी टाळेबंदी उठवली; जे मजूर कामावर येतील त्यांना २०% बोनस देण्याचे जाहीर केले.

प्रत्येक दिवशी संध्याकाळी गांधी त्यांच्या घराजवळील मोकळ्या जागेत मजूरांना भेटत असत. दररोज पत्रके काढली जात. संध्याकाळी त्यांचे वाचन व त्यावर चर्चा होत असे. कामगारांनी आपल्या वचनांना व मागण्यांना दृढपणे चिकटून राहावे हे पटवण्यासाठी गांधींनी फार प्रयत्न केले. कामगारांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पूरक व्यवसाय शोधण्यात आले, पण ते अर्थातच सर्वांना पुरतील असे नव्हते. काहींच्या मनात चलबिचल

निर्माण झाली. एके दिवशी एका कार्यकर्त्याला काही कामगार म्हणाले, 'गांधीजी आणि अनसूयाबेन मोटारीतून हिंडतात, पोटभर जेवतात; पण आम्ही येथे मरणयातना भोगत आहोत. सभांना हजर राहिल्याने काही आमची उपासमार हटत नाही' (देसाई, २४-२५). ही बातमी गांधींना फारच लागली. त्यांनी उपोषण सुरू केले. 'कामगारांनी आपल्या वचनावर दृढ राहावे' म्हणून उपोषण केले असे त्यांनी त्या वेळी त्याचे जाहीर कारण दिले. पण आपल्या आत्मकथेत या उपोषणाविषयी एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न त्यांनी विचारून ठेवला आहे : 'या उपोषणामागे माझा सत्याबद्दलचा अतीव आग्रह होता, कामगारांबद्दलचे प्रेम होते, की माझा गर्व होता?... कोण सांगू शकेल?' (गांधी, १९४०, ५२६).

ते कसेही असले तरी उपोषणाचा परिणाम झाला. लोकांच्या भावनांना खोलवर स्पर्श झाला. कामगारांनी आपल्या मागण्यांवर शपथपूर्वक दृढ राहण्याचे ठरविले. गिरणीमालकही कमालीचे अस्वस्थ झाले. ज्या पद्धतीने गांधींनी या मालकांना जनतेच्या रोषास पात्र केले होते तीवरून काहींनी गांधींची तीव्र शब्दात कुत्सित निंदा केली. त्यांचे हे कृत्य कदाचित समर्थनीयही म्हणता येईल.

अखेरीस पुन्हा लवादाची स्थापना झाली व गांधींनीही उपोषण थांबविले. नवीन लवादाने कामगारांची बाजू उचलून धरली. मालकांनीही लवादाचा निर्णय मान्य केला व सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले.

अहमदाबादच्या कामगारांच्या या प्रकरणाचे व त्यातील गांधींच्या भूमिकेचे पृथक्करण केल्यानंतर सर्वसाधारणपणे जो निष्कर्ष निघतो तो बऱ्याच अंशी चंपारण्य चळवळीतून काढलेल्या निष्कर्षाशी मिळताजुळताच आहे. तो असा की, सामान्य जनतेची अहिंसक संघटना बांधावयाची झाल्यास त्याचे यशापयश बव्हंशी नेत्यावर किंवा नेत्यांवर अवलंबून राहते. नेते रणांगणावर पाय रोवून उभे राहिले तर लोक त्यांच्यामागे तितक्याच खंबीरपणे उभे राहतात असे दिसते. पण अहमदाबाद प्रकरणात आणखीही एक गोष्ट दिसून येते. लढ्याचे स्वरूप अत्यंत गंभीर व नाजूक झाले त्या वेळी व्यक्ती म्हणून नेत्यावर असलेली भक्तीच पराभव टाळण्यास कारणीभूत झाली. यावर कोणी म्हणेल की हीच गोष्ट रूढ युद्धांनाही लागू पडते. सैन्यावर अत्यंत आणीबाणीची वेळ आली तर सैनिकांची नायकावरील वैयक्तिक निष्ठाच उपयोगी पडते. मात्र दोन्ही परिस्थितीत थोडा फरक आहे हेही आपण ध्यानात घेतले पाहिजे.

युद्धामध्ये एका सेनापतीची जागा दुसरा सेनापती घेऊ शकतो व तरीही त्याच दुर्दम्य निश्चयाने लढाई पुढे चालवू शकतो. अत्यंत आणीबाणीच्या लढाईच्या वेळी सेनापतीच्या अंगच्या सर्व नैतिक आणि बौद्धिक गुणांची अगदी कसोटी लागते तेव्हासुद्धा

प्रत्यक्ष लढण्याचे काम अधिकाऱ्यासह पण सैनिकच करीत असतात. अधिकाऱ्याबरोबरच त्याच्याशी केलेल्या निष्ठावंत साथीमुळे सैनिकही विजयाच्या किंवा पराजयाच्या जबाबदारीत सहभागी असतात. अधिकारी त्यांच्या अधिकाधिक जवळ येतो, एका अर्थाने तो त्यांचा लाडका बनतो, हीरो बनतो.

गांधींच्या राजकीय जीवनातील या पहिल्यावहिल्या ' लढायां 'त तरी एक विरोध आढळतो. अहमदाबादला घडले त्याप्रमाणे, जेव्हा जेव्हा ऐन वेळी गांधींनी उपोषण केले– प्रकरणांचा निकाल लावून घेण्याच्या दृष्टीने ती कृती निर्णायक महत्त्वाची ठरली– तेव्हा तेव्हा एकट्या गांधींवरच सर्व गोष्टी अवलंबून राहिल्या असे दिसते. याचा परिणाम म्हणून त्यांचे व्यक्तित्व नैतिकदृष्ट्या अधिक उन्नत झाले व त्यांच्या ठिकाणी लोकांची भक्ती जडली. सर्व देशाला त्यांच्या जीविताची काळजी लागून राही. पण नेमक्या त्याच कृतीमुळे ज्यांच्यासाठी त्यांनी उपोषणाचे अंतिम पाऊल उचललेले असे ते त्यांच्यापासून दूर गेले, वेगळे पडले, असे दिसते. याचे दूरच्या भविष्यकाळात काय परिणाम अपेक्षित होते ते असोत, पण नजिकच्या भविष्यात तरी त्याचा असा परिणाम झाला की, गांधींची " एकमाणशी " सेना ( वन मॅन आर्मी ) अस्तित्वात आली. गांधींखेरीज सर्वच लोकांना मग आपोआपच लढाईतील गौण भूमिका मिळाल्या.

थोडक्यात, अहमदाबाद संप प्रकरणाच्या वेळीच गांधींच्या ठिकाणी नैतिक अधिसत्तेचे केंद्रीकरण होण्याची चिन्हे दृग्गोचर झाली. गांधीपूजा वाढली. जे गांधींना जमते ते आम्हाला जमणार नाही असे सांगण्याचाच गांधीपूजा हा आडवळणी प्रकार होता. गांधींना जे साधावयाचे होते त्याच्या नेमकी उलट अशी ही फलश्रुती होती. नैतिक अधिसत्तेचे असे केंद्रीकरण होऊ नये म्हणून त्यांनी भावी काळात कसकशी पावले टाकली ते आपण पाहणारच आहोत. हे त्यांचे प्रयत्न कधी यशस्वी तर कधी अयशस्वी झाले.

सामूहिक अहिंसेचे संघटन ही मोठीच गुंतागुंतीची व नाजूक गोष्ट ठरते हे येथे नमूद केल्यास ते क्षम्य मानले जावे. नैतिक एकाधिकारवादाच्या दिशेने चळवळ वाटचाल करणार नाही याची खबरदारी घ्यावी लागते. चळवळ ही एक वैयक्तिक कृती बनणार नाही, " पूर्णत्वाला पोचलेल्या " किंवा " जवळजवळ पूर्णत्वाला पोचलेल्या " व्यक्तींच्या कृतीपुरतीच ती सीमित राहणार नाही यासाठी सतत प्रतिबंधक उपाय योजावे लागतात. मोहिमेतील काही विवक्षित क्षणी काही व्यक्तींनाच सर्व भार आपल्या खांद्यावर घेणे आवश्यक ठरेल ही शक्यता कायम लक्षात घ्यावी लागते. त्याच वेळी, उत्तरोत्तर, सामान्य जनता चळवळीत अधिकाधिक सहभागी होईल या दिशेने चळवळीचा विकास चालू राहील अशी खबरदारी घ्यावी लागते. दुसरीकडे चळवळ अहिंसेच्या तत्त्वास एकनिष्ठ राहील किंवा तिची परिणती अधीर हिंसक उद्रेकात होईल, या दोन्ही गोष्टी शक्य

असतात. यापैकी दुसरी गोष्ट घडते तेव्हा, एकीकडे हिंसक उद्रेकांना परिणामकारक पायबंद घालत असतानाच, दुसरीकडे, लोकांचा उत्साहपूर्ण व सक्रीय पाठिंबा टिकविण्याचे आव्हान सर्वोच्च असते.

## तिहेरी मागणी

वर दिलेल्या तिन्ही प्रकरणांच्या विश्लेषणावरून या सर्व प्रकरणांतले एक समान वैशिष्ट्य पुढे येते. अन्यायाची तीव्र जाणीव जेथे पक्की रुजलेली होती अशा ठिकाणी व अशा बाबींना धरूनच गांधींनी आपल्या चळवळी उभारल्या असे दिसून येते. अर्थात ज्यांना धरून या प्रकारच्या सामूहिक अहिंसेच्या संघटनांचा प्रयोग करता येईल अशा कारणांची त्या वेळच्या भारतात मुळीच कमतरता नव्हती. १९२१–२२ ची देशव्यापी असहकार चळवळ हे वरील प्रकारचेच उदाहरण आहे.

( अ ) **रौलट ॲक्ट :** पहिले महायुद्ध संपत आले असतानाचा काळ होता. परकीय सत्तेखाली असूनही भारताने युद्धामध्ये दोस्त राष्ट्रांच्या बाजूने आपल्या परीने पूर्ण शक्ती लावली होती. राजकीय पुढाऱ्यांना अशी आशा वाटत होती, नव्हे त्यांची अशी अपेक्षा होती की, युद्धोत्तर पुनर्रचनेच्या वेळी भारताला बऱ्याच अंशाने प्रातिनिधिक राज्यसत्ता बहाल करण्यात येईल ( विल्यम्स, १९१७–१८, पृ. २५, २८–६७ ). स्वतः प्रखर शांततावादी असूनही गांधींनी लष्करभरतीच्या मोहिमेत आपली शक्ती खर्ची घातली होती. त्यामुळे त्यांनी आपले आरोग्यही धोक्यात आणले होते. त्या वेळी त्यांना खरोखरच असे वाटत होते की, ब्रिटिश साम्राज्याच्या आजवरच्या इतिहासाने सिद्ध झालेल्या मर्यादा लक्षात घेऊनसुद्धा भारताच्या प्रगतीचे ते एक फार महत्त्वाचे साधन आहे. शिवाय, एखाद्याला ब्रिटिश नागरिकत्वाचे सर्व लाभ मिळावयाचे असतील तर त्याने बऱ्यावाईट परिस्थितीत स्वतःची कर्तव्ये योग्य रीतीने पाळलीच पाहिजेत असेही गांधींचे मत होते ( गांधी, १९४०, पृ. ५४० व त्यापुढे ).

भारतमंत्र्यांनी २० ऑगस्ट १९१७ रोजी असे जाहीर केले की, ' ब्रिटिश साम्राज्याचा एकात्म घटक असलेल्या भारतात क्रमाक्रमाने जबाबदार प्रातिनिधिक शासनाची स्थापना हे ब्रिटिश सरकारचे धोरण राहील ' ( विल्यम्स, १९१७–१८, पृ. ३६ ). भारतात या घोषणेला संमिश्र स्वरूपाची प्रतिक्रिया झाली. काही राजकीय पक्ष या घोषणेने आनंदून गेले. काही ब्रिटिश हेतूंविषयी साशंक होते. सरकारने हिंदुस्थानचा स्वयंनिर्णयाचा हक्क लवकर मान्य करावा अशी त्यांनी मागणी केली.

महायुद्ध चालू असतानाच १० डिसेंबर १९१७ रोजी एक हुकूम काढून सरकारने

न्यायमूर्ती एस. ए. टी. रौलट यांच्या अध्यक्षतेखाली भारतात माजलेल्या बंडखोर प्रक्षोभाची कारणे शोधून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी समिती ( **सेडिशन कमिटी, १९१८** ) स्थापन केली. या समितीने १५ एप्रिल १९१८ ला आपला अहवाल सरकारला सादर केला. भारतात अराजकवादी क्रांतिकारक माजले असून सध्या अस्तित्वात असलेले कायदे ही परिस्थिती काबूत ठेवण्यास अपुरे आहेत, असे अहवालात म्हटले होते. या अहवालाची फलश्रुती म्हणून केंद्रीय कायदेमंडळापुढे दोन बिले ठेवण्यात आली. तेथे पं. मदनमोहन मालवीय किंवा श्री. श्रीनिवास शास्त्री यांसारख्या भारतीय प्रतिनिधींनी त्या बिलांना प्रखर विरोध केला. तरी ती गव्हर्नर जनरलच्या मान्यतेने २१ मार्च १९१९ रोजी संमत झाली. भारतीय जनमत पूर्णपणे झिडकारून टाकण्यात आले ( **जयकर**, १९५८, पृ. २७१–२७४ ). एक नागरिक या नात्याने गांधींनी व्हाइसरॉयला पत्रे पाठविली व काही निवेदनेही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली. शेवटी वरील बिलांचे कायद्यात रूपांतर होण्याच्या आदल्याच दिवशी त्यांनी सत्याग्रहाचे पाऊल टाकण्याचे ठरविले ( **गांधी**, १९४०, पृ. ५५८–५६३ ).

२८ फेब्रुवारी, १९१९ रोजी गांधींनी सत्याग्रहाची शपथ घेतली आणि तत्संबंधीचे निवेदन प्रसिद्धीसाठी दिले ( **रिपोर्ट ऑफ द पंजाब सबकमिटी ऑफ इंडियन नॅशनल काँग्रेस**, १९२०, पृ. २५–२६ ). त्या वेळी अस्तित्वात असणाऱ्या संघटनांना सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारणे कदाचित अशक्य होईल असे वाटल्यावरून, त्यांच्या सूचनेवरून "सत्याग्रह सभा" ही वेगळी संस्था करण्यात आली. अनेक लोकांनी शपथपत्रकावर स्वाक्षऱ्या केल्या; पत्रके काढण्यात आली, आणि सभाही घेण्यात आल्या. पण या ना त्या कारणाने 'सत्याग्रह सभेत सामील झालेल्या सुविद्य मंडळींचे आणि माझे एकमत होण्याची शक्यता फारशी नव्हती' अशी गांधींची भावना होती. तरी मुंबई, मद्रास, बिहार, सिंध यांसारख्या प्रांतांत आपल्याला पाठिंबा मिळेल अशी गांधींना आशा होती ( **गांधी**, १९४०, पृ. ५६२ ). मात्र सत्याग्रहाची सुरुवात ज्या हरताळाने झाली तो अगदी अनपेक्षितपणे सर्व देशभर अत्यंत यशस्वीपणे पाळला गेला.

मुंबई, दिल्ली किंवा तत्सम शहरांत शांतपणे चाललेल्या निदर्शकांवर पोलिसांनी काही वेळा सशस्त्र हल्ला केला तर काही ठिकाणी गोळीबारसुद्धा केला. जनसागराकडून त्यामुळे अधिकाधिक प्रक्षुब्ध वर्तन होत गेले; सत्याग्रह्यांमध्ये शिस्त व शांती कायम राखण्याचे जवळपास कोणतेच साधन हाती नव्हते असे म्हणता येईल. पण या दोन गोष्टी तर सत्याग्रहाचा गाभा होत. गुजरातमधील नडियाद येथे असताना गांधींच्या मनात एकदम विचार चमकून गेला की, लोकसंघटनांच्या आदेशांचे व शिस्तीचे तसेच कायद्यांचे पालन स्वेच्छापूर्वक करण्याची कडवी शिस्त अंगी बाणवून घेऊन ( सविनय कायदेभंग करण्यास लोकांनी ) **स्वतःस पात्र बनविण्याआधीच** सविनय कायदेभंग

करण्यास परवानगी देण्यात त्यांची भयंकर चूक झाली होती. याच चुकीला " हिमालया-एवढी चूक " असे गांधींनी संबोधले व ही चळवळ लगेच मागे घेतली.

( ब ) पंजाब : दरम्यान पंजाबमध्ये अत्यंत खेदकारक घटना घडल्या होत्या. सबंध प्रांतात लष्करी कायदा पुकारण्यात आला होता. सरकारने कित्येक निरपराध माणसांना गोळ्या घालून ठार मारले होते. कोणत्याही सुसंस्कृत सरकारला लाज वाटावी इतकी मानहानीकारक वागणूक सरकार पंजाबी जनतेला देत होते.

कडक निर्बंध पार करून पंजाबमधील घटनांच्या बातम्या जेव्हा बाहेर कळल्या तेव्हा सारा देश दुःख व क्रोध या भावनांनी ढवळून निघाला. ब्रिटिश सरकारला जेव्हा या परिस्थितीचे गांभीर्य उमगले तेव्हा त्याने एक चौकशी मंडळ नेमले. त्या समितीने आपला अहवाल सादर केला. हा अहवाल ' हंटर रिपोर्ट ' या नावाने प्रसिद्ध आहे. दरम्यान काँग्रेसने आपल्यातर्फे एक समिती नेमून वरील प्रकारांची चौकशी आरंभिली. या समितीचा अहवाल गांधी, सी. आर. दास, अब्बास तैयबजी आणि जयकर यांच्या सहीने २० फेब्रुवारी १९२० रोजी प्रसिद्ध करण्यात आला ( **पंजाब सबकमिटी, १९२०** ). समितीचे कामकाज पूर्णतया सत्यनिष्ठ राहावे यासाठी गांधींचा प्रयत्न कसा राहिला, आणि चौकशी समितीच्या सदस्यांनी स्वतःस सूडभावनेचा स्पर्शही होऊ न देता न्यायाच्या मर्यादा काटेकोरपणे पाळाव्यात यासाठी गांधींनी त्यांचे मन कसे वळवले याचे वर्णन जयकरांच्या आत्मवृत्तात आलेले आहे (**जयकर, १९५८, पृ. ३१९–३२५**).

असे असूनही काँग्रेसच्या अगदी साध्या आणि पूर्णपणे न्याय्य मागण्यांना हरताळ फासण्यात आला. त्यामुळे राष्ट्रव्यापी सत्याग्रह करण्याच्या इतर कारणांत पंजाबमधील अन्यायाची भर पडली.

( क ) खिलाफत : वस्तुतः केवळ-जागतिक मुस्लिम " भ्रातृसंघा "शी– ब्रदरहुड ऑफ इस्लाम–संबंधित असलेले हे " खिलाफत अन्याय " प्रकरण भारताच्या राष्ट्रीय इतिहासाचे एक पान कसे काय बनले हा इतिहास उद्बोधक आहे

अधिकारी मुस्लिम धर्मगुरूंच्या मते " खिलाफत "चा अर्थ काय होतो हे गया येथील जमियत-उल-उलेमाच्या २४ डिसेंबर, १९२२ रोजी भरलेल्या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षांनी अधिकृतपणे सांगितलेले आहे. ते म्हणतात, ' तुर्कस्तान, अफगाणिस्तान, इराक, इराण, अरेबिया, बोखारा, खिवा, इत्यादी सर्व मुसलमान राष्ट्रांनी आपली निष्ठा खलिफाला वाहिली पाहिजे. सर्व राष्ट्रांचे परराष्ट्रीय धोरण ठरविण्याचा अधिकार खलिफा स्वतःकडे ठेवील व अंतर्गत कारभाराचे हक्क ज्या त्या राष्ट्राकडे परत देईल. असे केल्याने युद्धाच्या वेळी या सर्व राष्ट्रांची सैन्ये इस्लामचे रक्षण करण्यासाठी एकवटता येतील.'

(इं. अॅ. रि., १९२३, पृ. ९३८). *

" खिलाफत " या संकल्पनेत राजकीय आणि धार्मिक सत्ता अविभाज्यपणे एकत्रित केलेल्या आहेत. १९२० च्या अखिल भारतीय खिलाफत अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. जी. एस. भुर्गी यांनी स्पष्टच सांगितले की, ' जझिरत-उल-अरब 'वरील नियंत्रण आणि इस्लामच्या पवित्र स्थळांच्या शासनाची सत्ता हे मुसलमानांचे अत्यंत पवित्र व मौल्यवान हक्क आहेत. महायुद्धात दोस्तांचा विजय झाल्यामुळे ते हक्क धोक्यात आले होते. (इं. अॅ. रि., १९२१, पृ. १५९; याच ग्रंथातील खिलाफत मॅनिफेस्टो, पृ. १६१-६२ पाहा; विशेषत: इं. अॅ. रि., १९२४, I, ९६(b)).

एकंदरीत महायुद्धानंतर तुर्कस्तानला मिळालेली वागणूक व तुर्की साम्राज्याची लांडगेतोड यामुळे हिंदुस्थानातील मुस्लिम लोक क्रुद्ध झाले होते हे उघड आहे. राष्ट्रांच्या सरहद्दी भेदणाऱ्या जागतिक मुस्लिम भ्रातृसंघावरील त्यांच्या निष्ठेमुळे त्यांची हिंदुस्थानावरील निष्ठा पातळ झालेली होती असा त्याचा अर्थ होता. या राष्ट्रबाह्य निष्ठेच्या वतीने केलेल्या मागणीस हिंदुस्थानच्या राष्ट्रीय मागण्यांमध्ये कसे काय स्थान मिळाले हे तपासून पाहणे महत्त्वाचे आहे.§

---

* १९२१ मध्ये एक गंमतीदार प्रश्न उपस्थित झाला. २ एप्रिल १९२१ रोजी इरोडे येथे श्री. महंमद अली यांनी ' इस्लामला खच्ची करणाऱ्या व इस्लामची पवित्र स्थळे बळजबरीने कब्जात घेणाऱ्या ब्रिटिशांना शासन करण्यासाठी अफगाणिस्तानचे अमीर जर हिंदुस्थानवर स्वारी करून आले तर मी ( महंमद अली ) त्यांना सहाय्य करीन ' असे भाषण केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल व इतरांनी या वक्तव्याचा अत्यंत कडक शब्दात निषेध केला. गांधींनी ' यंग इंडिया 'त ' दि अफगाण बोगी ' या शीर्षकाचा एक लेख प्रसिद्ध केला होता. त्या लेखावरही श्री. पाल व श्री. अॅन्ड्र्यूज यांनी " ' जागतिक इस्लामवादा 'ला– पॅन इस्लामिझमला– अजाणता दिलेला पाठिंबा " अशी टीका केली ( इं. अॅ. रि., १९२२, पृ. १९, पृ. १६९–१७० व यं. इं., ४-५-१९२१, पृ. १३८–१३९ ). या संदर्भात अ. भा. हिंदू महासभेच्या अध्यक्षीय भाषणात सरदार महंमद गुलखान यांचा पुरावा उद्धृत केला आहे, तोही पाहण्यासारखा आहे ( इं. अॅ. रि., १९२५, I, पृ. ३७९–३८० ).

§ सरतेशेवटी नोव्हेंबर १९२२ मध्ये केमाल पाशाच्या नेतृत्वाखाली तुर्कस्तानात धर्मनिरपेक्ष सरकार स्थापन झाले आणि खलिफाला स्वित्झर्लंडमध्ये सेवानिवृत्त होणे भाग पडले. मात्र त्यानंतरदेखील भारतीय मुसलमान खलिफाच्या व त्याच्या गादीच्या पुन:प्रस्थापनेची मागणी करीत राहिले. या संदर्भात आगाखान यांनी लिहिलेले पत्र पाहावे ( इं. अॅ. रि., १९२४, I, पृ. ८५ व पुढे ).

युद्धोत्तर आंदोलनांनी हिंदुस्थान ढवळून निघत होता आणि काँग्रेसच्या एकंदर ध्येयधोरणावर व कार्यक्रमावर त्याचा खोल प्रभाव पडत होता. याच वेळी लोकमान्य टिळकांनी 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी'तर्फे एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. इतर गोष्टींच्या बरोबरच त्यात पुढील एक विधान होते : 'मुस्लिम धर्मसिद्धांत, श्रद्धा व पवित्र कुराणातील वचने यानुसार खिलाफतचा प्रश्न सोडविला जावा ही मुसलमानांची मागणी हा पक्ष मान्य करतो.' (सीतारामय्या, १९४६, I, पृ. १९४). उलट टिळकांच्या व्यक्तिगत मतासंबंधाने त्यांच्या एका अगदी निकटच्या सहकाऱ्याने असे नमूद केले आहे की, 'खिलाफत चळवळ मान्य केल्यामुळे किती भयंकर परिणाम होतील याचे चित्र त्यांना दिसत होते; आणि त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना त्याचा इशाराही दिला होता' (जयकर, १९५८, पृ. ३८८; स्वतः जयकरांच्या याच विषयावरील वैयक्तिक विचारांसाठी त्याच पुस्तकाचे पृष्ठ ३१२ पाहा).

काँग्रेसचे खास अधिवेशन सप्टेंबर १९२० मध्ये व्हायचे होते. त्याआधी थोडेच दिवस दिलेल्या निरनिराळ्या भाषणांतून बिपिनचंद्र पाल यांनी खिलाफतच्या प्रश्नाबद्दल पुढील भूमिका घेतल्याचे आढळते : 'मी या चळवळीच्या बाजूने उभा आहे तो माझ्या भावना त्यात गुंतलेल्या आहेत म्हणून नाही, तर श्रेष्ठतर राजकीय कारणांमुळे...... भारताचे स्वातंत्र्य आणि त्याचे सारे भवितव्यही तुर्की साम्राज्याचे स्वातंत्र्य व एकात्मता अबाधित राहण्यावर अवलंबून आहे.' बिपिनचंद्रांना अशी भीती वाटत होती की, जर तुर्कस्तान पडले तर पर्शिया आणि पाठोपाठ अफगाणिस्तानही 'ख्रिश्चन प्रभावाखाली जातील. तसे झाल्यास आशियाला व म्हणूनच भारतालाही धोका आहे' (पाल, १९२०, पृ. ९८–९९).

'यंग इंडिया'च्या १ जून, १९२१ च्या अंकात प्रसिद्ध केलेल्या एका लेखात गांधींनी स्वतःची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यात ते म्हणतात : 'कोणत्याही दृष्टिकोणातून पाहिले तरी मुसलमानांची मागणी न्याय्य आहे असे दिसून आले तेव्हाच मी या प्रकरणात पडलो. माझ्या दृष्टीने ती एक सुवर्णसंधी होती. मला असे वाटले की, आपल्या मुस्लिम देशबांधवांवरील या आपत्तीच्या प्रसंगी जर मी त्यांच्याबद्दल निष्ठा दाखविली तर हिंदू व मुस्लिम या दोन्ही जमातींमध्ये मी चिरकाल मैत्री निर्माण करू शकेन.' त्यानंतर तीन आठवड्यांनी लिहिलेल्या 'द टर्किश क्वेश्चन' या एका महत्त्वाच्या लेखात गांधी लिहितात, 'हिंदूंनी "पॅन–इस्लामिझम्"ला घाबरून जाऊ नये. ती विचारप्रणाली भारताच्या किंवा हिंदूंच्या विरुद्ध नाही–असण्याचे कारण नाही. मुसलमानांनी प्रत्येक मुस्लिम राष्ट्राचे अभीष्टचिंतन अवश्य करावे आणि एखादे मुस्लिम राष्ट्र हकनाक संकटात पडले असेल तर त्याला मदतही अवश्य करावी' (यं. इं., २९-६-१९२१, पृ. २०४).

येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. हिंदी राजकारणात गांधींचा प्रवेश होण्या-आधीपासूनच हिंदी राष्ट्रवाद्यांनी येथील मुसलमानांची स्वतःला "एक अलग राजकीय जमात" म्हणून वागविले जावे ही मागणी मान्य केली होती. विशेष प्रकारची हमी असेल तरच आपले "धार्मिक व सांस्कृतिक हितसंबंध" सुरक्षित राहतील असे त्या जमातीला वाटत होते. मुसलमानांच्या देशबाह्य निष्ठेबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यात गांधींनी वरील मान्यतेचे तर्कशुद्ध टोक गाठले होते इतकेच. लो. टिळक किंवा बिपिन-चंद्र पाल यांची सशर्त मान्यता हा एका प्रकारच्या डावपेचाचा भाग असेल तर गांधींची मान्यता हाही एका वेगळ्या प्रकारच्या डावपेचाचाच भाग होता.

## असहकार : प्राथमिक तयारी

१९१९ च्या अमृतसर अधिवेशनापासून गांधींनी काँग्रेसच्या कार्यात भाग घ्यायला खरी सुरुवात केली. रौलट-ॲक्टविरोधी सत्याग्रह मागे घेतल्यानंतर ते अगदी जवळून काँग्रेसच्या संघटनेत ओढले गेले. सत्याग्रह मागे घेतल्यानंतर गांधींनी साऱ्या देशालाच सत्याग्रहाचे तंत्र काय आहे, त्याला कोणत्या पूर्वतयारीची आवश्यकता आहे इत्यादी गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न सुरू केला होता. त्यासाठी त्यांनी देशभर विस्तृत दौरे काढले व असंख्य भाषणे दिली. 'यंग इंडिया' व 'नवजीवन' (गुजराती) या दोन साप्ता-हिकांचेही– त्यांचे संपादकत्व त्यांनी स्वीकारले होते– त्यांनी या कामासाठी पुरेपूर उपयोग करून घेतला.

१ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य मृत्यू पावले; आणि जयकरांच्या भाषेत सांगायचे तर, 'भारतीय राजकारणातील गांधींच्या असहकार चळवळीचा प्रमुख विरोधक दूर झाला' (**जयकर**, १९५८, पृ. ३८८). सप्टेंबर १९२० मध्ये काँग्रेसचे खास अधिवेशन कलकत्त्याला भरले होते. स्वतः जयकरांनी या वेळी पुढीलप्रमाणे भाषण केले : 'गेल्या पस्तीस अधिवेशनांच्या संपूर्ण काळात या काँग्रेसने सतत सरकारशी सहकार करण्याचा पुरस्कार केला आहे. एका अधिवेशनाच्या एका बैठकीत एकाएकी निराळेच निर्णय घेऊन हा सबंध प्रवाह तुम्ही उलटवू शकत नाही. आपण स्वतःच्या अंगी गांधींचे अहिंसक असहकाराचे तत्त्व बिंबविले आहे असे वाटते अशा, स्वतःला गांधींचे अनुयायी म्हणविणाऱ्यांना मित्रत्वाच्या भावनेतून मी सावध करू इच्छितो. कमालीचा आत्मसंयम आणि सन्यस्ताची प्रखर शिस्त ही गांधींच्या जीवनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. ती सहजासहजी प्राप्त होणारी नाहीत. त्यासाठी कित्येक वर्षांच्या तपश्चर्येची आवश्यकता आहे हे त्यांनी लक्षात घ्यावे' (**जयकर**, १९५८, पृ. ३९६).

प्रत्यक्ष अधिवेशनात काय घडले हेही जयकरांच्याच शब्दात देणे उचित ठरेल...

'सर्व प्रमुख मंडळी आणि खुद्द अध्यक्ष लजपतराय यांचा गांधींच्या कार्यक्रमाला विरोध होता. शिवाय असहकाराचा ठराव याच अधिवेशनात घाईने मान्य करून घेतला जावा हेही त्यांना पसंत नव्हते. परंतु केवळ स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या व प्रतिपादनाच्या सामर्थ्यावर गांधींनी या काँग्रेसमध्ये विजय मिळवला. लोकांत गांधींबद्दल जी वैयक्तिक निष्ठा होती तीमुळेच ते विजय मिळवू शकले... शिवाय त्या वेळचे सरकारी धोरणही इतके दुराग्रही व आडमुठे होते की दुसरा काही पर्यायच व्यवहारतः उरला नव्हता' (जयकर, १९५८, पृ. ४०२).

गांधींनी प्रसृत केलेल्या कार्यक्रमात पुढील गोष्टींचा समावेश होता : (१) किताब, सन्माननीय पदव्या वगैरेंचा त्याग. (२) सरकारी उत्सवादी कार्यक्रमांवर बहिष्कार. (३) सरकारी शिक्षणसंस्थांतून मुलांना काढून घेणे. (४) हळूहळू क्रमाक्रमाने कोर्टावर बहिष्कार. (५) मेसापोटेमियातील भारतीय सैनिकांनी व इतरांनी काम करण्याचे नाकारणे. (६) मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांनुसार पुनर्घटित केलेल्या कायदेमंडळांवर संपूर्ण बहिष्कार. आणि (७) विदेशी वस्तूंवर बहिष्कार.

नागपूर येथे डिसेंबर १९२० च्या शेवटच्या आठवड्यात काँग्रेसचे नेहमीचे अधिवेशन भरले होते. त्या वेळीही असहकाराचा ठराव मान्य करण्यात आला. येथे तो श्री. चित्तरंजन दास यांनीच मांडला. वास्तविक त्या वेळेपर्यंत दास हे गांधींच्या विरोधकांपैकी एक होते. वरील ठरावाला सुचविलेल्या सर्व उपसूचनाही मागे घेण्यात आल्या (इं. ॲ. रि., १९२१, III, पृ. १७९–१८३ ). असे असले तरी श्री. सी. विजयराघवाचारियर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, कोर्टावर व शैक्षणिक संस्थांवर बहिष्कार टाकणे हे त्यांच्या मते चूकच होते. सावधगिरीच्या स्वरात ते पुढे म्हणाले, 'ही दोन कलमे एकत्रितपणे विचारात घेऊन मला असे विचारावेसे वाटते की, चळवळीस बऱ्यापैकी यश मिळाल्यास (चळवळीस असे यश कधीच मिळणार नाही असे मी नम्रपणे म्हणू इच्छितो) हिंदुस्थानच्या लोकांना अजाणता परत रानटी अवस्थेप्रत घेऊन जाण्याचा कार्यक्रमच आपण (या दोन कलमांद्वारे) सुचवीत नाही काय? आपणा सर्वांना प्रिय असलेली लोकशाही धर्तीची जबाबदार प्रातिनिधिक राज्यसत्ता प्रस्थापित करण्याच्या व ती कायम टिकविण्याच्या दृष्टीने असे यश ही काही चांगली पूर्वतयारी ठरणार नाही, हे नक्कीच. याचा आपण विचार करावा असे म्हटले तर ती गोष्ट समर्थनीय ठरेल असे म्हणण्याचे मी धाडस करतो' (इं. ॲ. रि., १९२१, III, पृ. १४३ ).

वरील प्रकारचा अगदी मवाळ कार्यक्रमच का सुचवला, व साराबंदीची चळवळ तावडतोब हाती का घेतली नाही, यालाही सबळ कारण होते. वास्तविक कलकत्त्याच्या खास अधिवेशनात मांडलेल्या असहकाराच्या ठरावातच ते अंतर्भूत केलेले होते.

( कित्ता, III, पृ. १०७ ). आपल्या ' यंग इंडिया ' साप्ताहिकात गांधींनी त्याचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले : ' सर्व राष्ट्राची प्रगती एक व्यक्ती किंवा एक वर्ग थांबवू शकत नाही. अशिक्षित कारागीर, अगदी खालच्या वर्गातील माणसे, स्त्रिया– सर्वच चळवळीतील आपापला वाटा उचलीत आहेत. सुशिक्षित वर्गातील लोकांना केलेल्या आवाहनामुळे त्यांचा मार्ग खुला झाला. खरा कोण, खोटा कोण ते ठरविण्याची वेळ आली आहे. आपला शब्द खरा करण्याचे आवाहन त्यांना सुशिक्षितांना करायला हवेच होते. आंदोलनाची सुरुवात त्यांच्यापासून आणि त्यांच्याकरवीच करणे जरूरीचे होते ' ( यं. इं., २०-४-१९२१, पृ. १५३ ).

' अगदी आरंभकाळापासूनच आम्ही जनतेला जागृत करण्याचा प्रयत्न करीत आहोत. तीच चळवळीचा मुख्य कणा आहे. कारण शेवटी जनतेलाच स्वराज्य मिळवायचे आहे. स्वराज्यसंपादन हा काही केवळ सुशिक्षित किंवा श्रीमंत माणसांचा प्रश्न नाही. स्वराज्य मिळवण्याच्या कोणत्याही योजनेत या दोन हितसंबंधियांनी आपले हितसंबंध गौण मानले पाहिजेत. आपली जनता जेव्हा शिस्त पाळण्यास शिकेल व तिला पुरेसा आत्मसंयम करता येईल तेव्हा आम्ही, तशीच वेळ आली तर, साराबंदी करण्याची सूचना देण्यास मुळीच मागेपुढे पहाणार नाही. ' ( कित्ता, १२४; शिवाय सिलेक्शन्स, क्रमांक ३६७–३७२ पाहा. )

## १९२१–२२ ची असहकार चळवळ *

अशा रीतीने फासे तर टाकले गेले. १९२१ नंतर कोणकोणत्या घटना घडल्या ते आपण पाहाणार आहोत. या सर्व घटनांची सविस्तर व कालानुक्रमे माहिती मिळवण्यासाठी वाचकांनी इंडियन ॲन्युअल रजिस्टरचे १९२० च्या पुढील खंड पाहावेत. येथे आपण त्या काळात घडलेल्या राजकीय दृष्टीने महत्त्वाच्या काही प्रमुख घडामोडींचा धावता परामर्श घेणार आहोत.

काँग्रेसच्या घटनेत झालेला बदल ही गांधींच्या काँग्रेसवरील प्रभुत्वाची नांदी होय. १९२० च्या नागपूर अधिवेशनात ' शांततापूर्ण व वैध मार्गांनी स्वराज्य मिळविणे ' हे काँग्रेस संघटनेचे ध्येय असल्याचे घोषित करण्यात आले. संघटनेच्या रचनेत आमूलाग्र बदल केले गेले. साऱ्या भारताचे भाषावार २१ काँग्रेस प्रांत पाडण्यात आले. अगदी

* चळवळीच्या उत्कृष्ट संक्षिप्त वृत्तांतासाठी पाहा **रिपोर्ट ऑफ द सिव्हिल डिस्ओबिडियन्स एन्क्वायरी कमिटी** ( इं. अ‍ॅ. रि., १९२०, ४९–१६९; शिवाय, पृ. १७१–१८३ ).

सामान्य माणसानेसुद्धा काँग्रेसच्या कार्यात प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे अशी गांधींची दृढ श्रद्धा होती. त्यांच्या मते, प्रांतीय पातळीवरचे कामकाज तेथील भाषेत व अखिल भारतीय पातळीवरचे कामकाज हिंदुस्थानीत झाले तरच सर्वांना काँग्रेसच्या कामात भाग घेता येण्यासारखे होते ( इं. अॅ. रि., १९२२, पृ. ३५३-ब व पुढे ).

मुख्य चळवळीची सुरुवात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर हरताळ पाडून केली गेली. 'नव्या घटनात्मक सुधारणां'चे उद्घाटन करण्यासाठी भारताच्या दौऱ्यावर आलेल्या ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या स्वागताच्या वेळी असाच एक हरताळ पाडण्यात आला ( विल्यम्स, १९२२, पृ. ४६ ). या शाही दौऱ्याचे स्वागत सर्वत्र हरताळांनीच झाले. सार्वजनिक व्यवहार इतके पूर्णपणे बंद पडल्याचे दृश्य त्याआधी सरकारने किंवा उच्चभ्रू लोकांनी कधीच पाहिले नव्हते. जनता जागृत झाल्याचे दृश्य दिसत होते. सर्व आंदोलनाचे सूत्र जणू जनतेने स्वतःच्या हाती घेतले होते. सुशिक्षित लोक जनतेच्या बरोबरीने चालण्याचा प्रयत्न करीत होते. तर कायदा आणि सुव्यवस्था यांच्या रक्षणासाठी खूपच धावपळ करावी लागल्याने सरकारला बचावाची भूमिका घ्यावी लागली.

'प्रिन्स ऑफ वेल्स'ची भारतभेट ही एक प्रकारे येथील राजकीय असंतोषावर उतारा म्हणून योजण्यात आली होती. पण या भेटीमुळे राजकीयदृष्ट्या जागृत भिन्नभिन्न वर्गांमधील दरी अधिकच रुंदावली. राजपुत्राचे जहाज १७ नोव्हेंबर, १९२१ रोजी मुंबई बंदराला लागले. राजनिष्ठ लोकांनी राजपुत्राच्या स्वागताची जंगी तयारी केली होती. उलट "जनते"ने तर त्याच्या भारतभेटीवर बहिष्कार घालण्याचेच ठरवले होते. राजनिष्ठ लोकांवर हरताळ पाडण्यासाठी दडपण आणण्याच्या प्रयत्नांतून या दोन प्रकारच्या लोकांत जी दंगल उसळली तीत पाच पारशी व युरोपियन ठार झाले, व काही जखमीही झाले. उलट हरताळवाल्यांपैकी ५३ माणसे ठार व २९८ जण जखमी झाले. ही माणसे अर्थातच गोळीबारानेच जखमी किंवा मृत झाली.*

ही दंगल गांधींच्या डोळ्यांदेखतच झाली. ती काबूत आणण्यासाठी त्यांनी उपोषण केले.

दरम्यान जून १९२१ मध्ये कोलार येथे हिंदू–मुसलमान दंगा झाला आणि मलबारमध्ये तर त्याहीपेक्षा भयंकर गोष्टी घडू लागल्या. तेथील मुसलमान मोपल्यांनी बंड उभारले आणि "खिलाफत राज्य" स्थापन करण्याचा प्रयत्न केला. ठिकठिकाणी पोलिस चौक्यांवर खिलाफती झेंडे उभारण्यात आले. सर्वांत भयंकर गोष्ट म्हणजे मोपले स्थानिक हिंदूंवर ते हिंदू म्हणून उलटले. अत्यंत रानटी गोष्टी व भयंकर अत्याचार झाले.

---

* मृत व जखमींच्या तपशीलवार यादीसाठी नायर, १९२२, पृ. २१८–२५१; व जयकर, १९५८, पृ. ४६४-४७० पाहा.

या मोपल्यांविरुद्ध सरकारने केलेला बंदोबस्त पुढे २२ फेब्रुवारी १९२२ रोजी जादा लष्कर व मार्शल लॉ उठवीपर्यंत चालू होता. या सर्व बंडाळीत सुमारे चार हजार लोक ठार व अगणित माणसे जखमी झाली ( इं. अॅ. रि., १९२२, पृ. १८६–१८८; नायर, १९२२, पृ. ९६ व पुढे व १३०–१४२ ). या बंडाळीचे राजकीयदृष्ट्या वैशिष्ट्य म्हणजे ब्रिटिशांचे राज्य संपुष्टात आले आहे व आपण मुसलमानांचे राज्य पुनःप्रस्थापित करीत आहोत अशी मोपल्यांची कल्पना होती.

जनतेचे या प्रकारचे काही आततायी पिसाट उठाव सोडले तर लोक-जागृतीच्या इतर अवस्थाही या चळवळीच्या काळात नजरेस पडल्या. त्यांची आता थोडी पाहाणी करू. एकंदरीत सुशिक्षित उच्चवर्गीयांचा या आंदोलनाला बेताचाच पाठिंबा होता. मात्र विद्यार्थी-जगतात त्याने चांगलीच खळबळ उडवून दिली होती असे दिसते. बंगालमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर शिक्षणसंस्था सोडल्या. तेथे " राष्ट्रीय " शिक्षण-संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न झाला. बनारस व अलिगढ या ठिकाणीसुद्धा राष्ट्रीय विद्यापीठे स्थापन करण्याचे ठरले. पुढे देशात राजकीय चळवळीची तीव्रता एवढी वाढली की शैक्षणिक पुनर्रचनेसारखे धीमे कार्य करण्यासाठी लागणारा वेळ व स्थिरता कोणालाच नव्हती.

मध्यंतरीच्या काळात शेतकरी आणि कामगारही गाढ निद्रेतून जागृत होऊ लागले होते. त्यांना आपल्या स्वतःची आणि स्वसामर्थ्याची जाणीव होऊ लागली होती. ते आक्रमक बनू पाहात होते. ठिकठिकाणी त्यांच्या संघटित चळवळी झाल्या. काही आंदोलनांत अहिंसक शिस्त काटेकोरपणे पाळली गेली तर काही चळवळी हिंसा-अहिंसा यांच्या सीमेवर रेंगाळत राहिल्या.

अहिंसेची शिस्त पाळून ज्या चळवळी झाल्या त्यांच्यात पुढील काही चळवळींचा समावेश करता येईल : मुळशी पेटा (इं. अॅ. रि., १९२२, पृ. १४४ जी; जयकर, १९५८, पृ. ४५६–४६२; शिवाय 'यंग इंडियात'ही याविषयी उल्लेख आलेले आहेत. ), मिदनापूर येथील लोकल बोर्डावरील बहिष्कार ( स्थानिक बंगाली साप्ताहिक 'निहार'च्या फायली ), पंजाबमधील गुरुद्वार चळवळीची सुरुवात ( चळवळीच्या उत्तरार्धासाठी पाहा गुरुका बाग, १९२४ ). पुढील काही चळवळींत लोकांनी अहिंसा मुळीच सोडली नाही, पण त्या दडपल्या गेल्या व शेवटी अयशस्वी ठरल्या : आसाममधील चहाच्या मळ्यांवरील मजूरांचा बहिष्कार आणि चांदपूरचा रेल्वे संप ( इं. अॅ. रि., १९२२, पृ. १४४ जे, १४४ पी ), चिराला-पेराला चळवळ ( राव, १९२२ ), आणि डिसेंबर १९२१ मधील कलकत्ता येथील किडरपूर गोदीतील हमालांचा संप.

खिलाफत चळवळीच्या ओघात मालेगाव येथे १९२० साली दंगा उसळला ( नायर, १९२२, पृ. ३८–४२; शिवाय इं. अॅ. रि., १९२२, पृ. १४४ सी. ) १९२१ च्या

जानेवारी-मार्च या काळात शेतकऱ्यांनी उत्तर प्रदेशांतील बाराबांकी ( नायर, १९२२, पृ. १६१-१६३ ), व बरेली येथे उठाव केला; तर त्याच वर्षात एप्रिलमध्ये गिरिडिह येथील कोळशाच्या खाण-कामगारांनी उठाव केला ( इं. ॲ. रि., पृ. १४४ एफ्. ).

अशा रीतीने त्या सुमारास हिंदुस्थानच्या सर्वच भागांतील जनता जागृत होत होती. या जागृत जनतेची शक्ती तशीच वाया जाऊ नये म्हणून काँग्रेसच्या विजयवाडा येथे भरलेल्या पुढील अधिवेशनात, सर्व देशाला मोठ्या प्रमाणावरील कायदेभंगासाठी तयार करण्याचे ठरले. एकंदर कार्यक्रम असा होता : एक कोटी रुपयांचा फंड जमविणे; एक कोटी सभासद नोंदविणे; परिणामकारकरीत्या विदेशी कापडावर बहिष्कार टाकता यावा या दृष्टीने खेडोपाडी कापडाचे उत्पादन करण्यासाठी वीस लक्ष चरखे सुरू करणे.

या चळवळीत सुशिक्षित वर्गातील बराच मोठा समाज उत्साहाने भाग घेत होता. सर्वसामान्य जनता तर सर्वच बाजूंनी चळवळीला उत्सुक होती. या चळवळीच्या रूपाने एक प्रकारे देशाची अस्मिताच जागी होत होती. प्रचंड घटना घडत होत्या. याचा परिणाम असा झाला की, गांधींनी ठरवलेला मार्ग बरोबर की चूक, याबद्दल संभ्रम असलेल्या सुशिक्षित वर्गानेही आपल्या शंका झटकून टाकल्या. त्यांनी निष्क्रियता सोडून दिली. तेही सैनिकाच्या निश्चयाने लढा देण्यास सज्ज झाले. जणू लढाई सुरू असताना सेनापतीच्या व्यूहाबद्दल शंका उपस्थित करणे शिस्तीत बसणार नव्हते.

कित्येकांनी या "भुललेल्या" लोकांच्या "आंधळ्या" आज्ञाधारकत्वाची चिकित्सा करताना तिचे श्रेय गांधींच्या व्यक्तिमत्त्वाच्या कमालीच्या मोहिनीला दिले आहे ( नायर, १९२२ ). काहींनी असे सूचित केले आहे की, भारत नेहमीच वैराग्यपूजक राहिलेला आहे; गांधींना शरण जाऊन सुशिक्षित भारतीय संन्याशाची पूजा बांधण्याच्या आपल्या ऐतिहासिक परंपरेचाच पुनरपि आविष्कार करीत होते ( मजुमदार, १९६१, पृ. ४० व पुढे ). पण या वर्गाने गांधींपुढे दाखविलेल्या 'लाचारी'चे आणखीही वेगळ्या पद्धतीने स्पष्टीकरण करता येईल.

आजपर्यंत या सुशिक्षित वर्गाने पाश्चिमात्त्यांच्या सांस्कृतिक वर्चस्वाच्या विरोधात स्वतंत्र बौद्धिक व सांस्कृतिक अस्मिता प्रस्थापित करण्याचा काहीसा एकाकी प्रयत्न चालविला होता. क्वचित काही विशेष विलोभनीय प्रसंग सोडल्यास, सामान्य जनता त्यांच्या पाठीशी असल्याचे दृश्य दिसले नव्हते. त्यामुळे फार थोडे राजकीय हक्क व अधिकार पदरात पाडून घेता आले होते. आता जगन्नाथाचा रथच सहस्रावधी पायांवर चालू लागला होता. या भरतीने असंख्य लोक आकृष्ट झाले. गढूळ असला तरी प्रवाहाबरोबर पोहण्यात सामर्थ्याचा प्रत्यय येतो, उल्हसित झाल्यासारखे वाटते. गांधी या गढूळ प्रवाहाला काही एक दिशा देऊ पाहात होते. देशातील बहुतेक राष्ट्रीय पुढाऱ्यांची त्याला मान्यता होती. या प्रवाहाबरोबर वाहात वाहात आपण अखेरीस कोठे

जाऊन पोचणार आहोत याची दूरवरची कल्पना त्यांना नव्हती, किंवा दूरच्या भविष्यातील मार्गासंबंधी त्यांचे व चळवळीचे सूत्रधार यांचे एकमत नव्हते. पण तरीही त्यांची त्या क्षणी गांधींच्या मार्गाला संमती होती.

जनता प्रक्षुब्ध आहे, तिचा प्रक्षोभ हिंसक वळण घेत आहे, ही गोष्ट गांधींनी स्पष्टपणे ओळखली. जनतेने पेट घेतला होता, पण अद्याप धूरच फार माजला होता. धुराने सर्व झाकोळले होते. कोंदटलेल्या धुरामुळे ज्वाळांचा परिणाम म्हणावा तसा होत नव्हता. पण धूर म्हणजे आत अग्नी प्रज्वलित झाल्याचाच पुरावा नव्हता काय? जनतेच्या पेटलेल्या मनाचा पुरेपूर व प्रभावी उपयोग करून घेण्यासाठी गांधींनी सर्वस्वी आपल्या नियंत्रणाखाली राहील अशी एक स्थानिक पातळीवरील कायदेभंगाची चळवळ तावडतोब हाती घेण्याचे ठरविले. हा प्रयोग यशस्वी झाला तर सर्व हिंदुस्थानपुढे ते एक अनुकरणीय उदाहरण ठरेल असे गांधींना वाटले असावे. या वेळी त्यांनी आदर्श रणांगण म्हणून बार्डोलीची निवड केली.

बार्डोली पूर्वीच अहिंसेच्या ठराविक शिस्तीतून गेलेली होती. आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली ( इं. ॲ. रि., १९२२, पृ. ३०२–३०५ ). अ. भा. काँग्रेस कमिटीने ३० जानेवारी १९२२ च्या बैठकीत बार्डोली तालुक्यात साराबंदीची चळवळ करण्यास अधिकृत मान्यता दिली. देशातील इतर भागातल्या लोकांना उत्कंठा लागली. श्वास रोखून ते बार्डोलीकडे डोळे लावून बसले. इतरांनी कृती करावयाची नव्हती. या बंधनाचा काही ठिकाणच्या लोकांना जाच वाटला, आणि गुंतूरसारख्या काही ठिकाणी लोकांनी, जनतेची पुरेशी तयारी झाली आहे अशी काँग्रेसने खात्री करून घ्यावी व आम्हालाही साराबंदीची चळवळ करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली.

परंतु या होऊ घातलेल्या सार्वत्रिक कायदेभंगाच्या पोटात दडलेल्या धोक्याची काहींना कल्पना आली. त्यांमध्ये भारताचे एक ज्येष्ठ राष्ट्रीय पुढारी श्री. मदनमोहन मालवीय हेही होते. त्यांनी अगदी शेवटच्या घटकेलाही सरकार व काँग्रेस यांमध्ये समझोता घडवून आणण्याच्या दृष्टीने गोलमेज बैठक भरविण्याचा प्रयत्न केला. वरील बैठक भरविण्यापूर्वी एक प्राथमिक सभा १४ जानेवारी १९२२ रोजी घेण्यात आली. या वेळी गांधीही उपस्थित होते ( इं. ॲ. रि. १९२२, पृ. १६०–२९३; जयकर, १९५८, पृ. ५०४ व पुढे; यं. इं., १९२२, पृ. ३३–३५ ). या गोलमेज परिषद भरविण्याच्या कल्पनेला एक प्रकारे गांधींनीच बगल दिली. त्यांनी १ जानेवारी १९२२ रोजी व्हाइसरॉयना एक पत्र पाठवून आपला साराबंदीच्या मार्गाने कायदेभंग करण्याचा निर्णय कळवला. सरकारनेही ‘ सर्व देश अराजकाच्या खाईत नेण्यास गांधीच जबाबदार राहतील ’ अशा आशयाचे उत्तर पाठवले. त्या पत्रात असेही म्हटले होते, ‘ नागरी कायद्यांचा सार्वजनिकरीत्या भंग करण्यामुळे शासनाला फारच गंभीर धोका निर्माण होणार असल्याने

तशा प्रयत्नांचे पारिपत्य अत्यंत कणखर व कडक पद्धतीनेच केले पाहिजे' (इं. ॲ. रि., १९२२, पृ. २९५–२९७).

वरील घटनेनंतर लगेचच चौरीचौरा येथे जमावाकडून भयंकर हिंसा घडली. जमावाने २२ पोलिस ठार मारले. ही बातमी गांधींना कळताच त्यांनी तातडीने आपली योजना बदलली. कॉंग्रेस वर्किंग कमिटीमध्ये तीव्र विरोध असूनही त्यांनी तेथे प्रसिद्ध बार्डोली-ठराव पास करून घेतला. या ठरावानुसार सार्वत्रिक कायदेभंगाचा कार्यक्रम मागे घेण्यात आला (इं. ॲ. रि., १९२२, पृ. ३०७–३१५). या प्रसंगी गांधींनी एक महत्त्वपूर्ण निवेदन प्रसिद्ध केले. ते निवेदन अतिशय सर्वश्रुत असल्याने येथे त्याचा फक्त उल्लेख पुरेसा आहे. त्यानंतर थोड्याच दिवसांत, म्हणजे २४ फेब्रुवारी १९२२ ला, अ. भा. कॉंग्रेस कमिटीची बैठक भरून तीत वर्किंग कमिटीच्या वरील शिफारशीवर शिक्कामोर्तब केले गेले. अशा रीतीने सार्वत्रिक कायदेभं ा तात्पुरता स्थगित करण्यात आला. वैयक्तिक कायदेभंग करण्याचा हक्क मात्र राखून ठेवलेला होता. भारतीय जनतेने आणखी काही दिवस विधायक कार्यावरच लक्ष केंद्रित करावे असा कॉंग्रेसने लोकांना आदेश दिला.

कॉंग्रेसने आपल्या कार्यक्रमात फेरफार केले असले तरी सार्वत्रिक कायदेभंग होणारच नाही असे सांगता येत नाही असे वाटून सरकारने तडकाफडकी १० मार्च १९२२ रोजी गांधींना अटक करून कोर्टापुढे उभे केले. खटल्यात त्यांना अपराधी ठरवून ६ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सांगण्यात आली.

१९१९ पासून भारतातील राजकीय घडामोडींवर सरकारचा काही लगाम राहिला नव्हता. या वेळी एक प्रकारे सरकारने परत लगाम आपल्या हाती घेतला असे म्हणता येईल.

## असहकाराच्या काळातील राजकीय प्रवाह

या सुमारास देशातील राजकीय वर्तुळात काय काय घडामोडी चालल्या होत्या हे पाहणे आवश्यक आहे. सुशिक्षित व अशिक्षित, हिंदू व मुसलमान, जहाल व मवाळ, अशा प्रत्येक गटाची प्रतिक्रिया वेगवेगळी होती. त्यांतील फरक समजावून घेणे हे भारतात पुढे झालेल्या घटना समजण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरण्याचा संभव आहे.

(अ) **हिंदू व मुसलमान :** १९१९ ते १९२२ या वर्षांत एकामागोमाग एक घटना घडत गेल्या. या सर्व गुंतागुंतींतूनही मु लिम व मुस्लिमेतर या दोन गटांच्या भूमिकांतील एक ठळक फरक स्पष्टपणे उमटून दिसतो.

इंग्रजी राज्य हिंदुस्थानात सुस्थिर होत असताना सुविद्य मुसलमानांनी पाश्चात्य शिक्षणाकडे एकंदरीत पाठ फिरवली होती. अलिगढ चळवळ व त्याआधीची वहाबी चळवळ झाल्यानंतर त्यांनी आपले वेगळे व्यक्तित्व ठसविण्याचा प्रयत्न चालू ठेवून, दुसरीकडे, पाश्चात्य शिक्षण व संस्कृती ग्रहण करण्याच्या दिशेने मर्यादित प्रमाणात पावले टाकली होती. ही गोष्ट सर्वसाधारणपणे पहिल्या महायुद्धापूर्वीच झाली. युद्धानंतर खिलाफतच्या प्रश्नावरून हिंदुस्थानातील राष्ट्रवादी चळवळीनेही मुस्लिम मागण्यांना आपला पाठिंबा दिला. तेव्हा सर्वसामान्य मुस्लिम जनताही राजकारणात ओढली गेली. याचा फायदा घेऊन उच्चवर्णीय मुसलमानांनी आपल्या समाजाचे वेगळेपण व अलगपण पक्के रुजविण्याचा प्रयत्न केला.

दैनंदिन जीवनात अगदी क्षुल्लक असणाऱ्या गोष्टींना एकदम महत्त्व प्राप्त झाले. कारण त्या गोष्टींनी इतरांपासून मुसलमानांचे वेगळेपण ठसण्यास मदत होणार होती. यामध्ये गाईची कत्तल करण्याचा हक्क, कोणत्याही मशिदीवरून केव्हाही वाजत मिरवणूक नेण्याला बंदी करण्याची मागणी, कोणत्याही नमाज पढण्याच्या जागेचे आत्यंतिक पावित्र्य, इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.*

नागरी जीवनातील या बाबींना मुद्दामहून राजकीय मागण्यांचे स्वरूप देण्यात आले. आपले हे सांस्कृतिक हक्क अबाधित राखण्यासाठी मुसलमान पुढाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते कायदेमंडळांपर्यंत स्वतंत्र प्रतिनिधित्व मागितले. इतकेच नव्हे तर त्यांनी सरकारी नोकऱ्यांत व इतरत्रही विशिष्ट प्रमाणात जागा मागण्यास सुरुवात केली. हे प्रमाण लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षाही जास्त आहे याची त्यांनाही जाणीव होतीच. पण तसे केल्याशिवाय हिंदूंच्या ' प्रचंड ' बहुमतापुढे ( किंवा नंतरच्या एका मुस्लिम पुढाऱ्याने म्हटल्याप्रमाणे हिंदूंच्या ' पाशवी ' बहुमतापुढे ) मुसलमानांना सुरक्षित वाटणार नाही हे कारण त्यांनी पुढे केले.

खिलाफत चळवळीमुळे मुसलमान अधिकच कडवे बनले. भारतात एकराष्ट्रीयत्व निर्माण करण्याच्या प्रयत्नात भर घालण्याच्या कार्यापासून ते अधिकाधिक दूर गेले हा मुख्य मुद्दा.

अशा रीतीने एकीकडे मुसलमान धार्मिक, सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या भूमिकेवर

---

* बेळगाव काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात गांधी म्हणाले, ' क्षुल्लक गोष्टींना धार्मिक तत्त्वांच्या नावाखाली उगीचच महत्त्व देण्यात आले असून वाटेल ती किंमत द्यावी लागली तरी त्या गोष्टींचे पालन झालेच पाहिजे असे विचार कडवे लोक मांडत आहेत. वितुष्ट वाढविण्यासाठी राजकीय व आर्थिक बाबीही मदतीला घेतल्या जात आहेत ' ( इं. ॲ. रि., १९२४, II, पृ. ४०७ ).

दृढ होत असताना § हिंदू 'राष्ट्रवादी' भूमिकेपासून काहीसे दूर चालल्याचे दृश्य दिसत होते स्वदेशीची मोहीम व त्यानंतरच्या सांस्कृतिक उत्थानाच्या काळात भारताच्या प्राचीन वैभवाच्या गोष्टी ऐकावयास मिळत. त्या आता कमी कमी ऐकू येऊ लागल्या होत्या. त्याऐवजी आता शेतकऱ्यांच्या मागण्या, मजूरांचा रास्त वेतनमानावरील हक्क, देवस्थाने व ट्रस्ट्स यांच्यावर लोकनियंत्रण असावे व त्यांचा कारभार लोकशाही ( निवडणूक ) पद्धतीने चालावा ही मागणी, देवस्थानांची संपत्ती सार्वजनिक व शैक्षणिक कार्यासाठी वापरण्यासाठी मागणी, अस्पृश्यांचा समान वागणुकीचा हक्क, ग्रामोद्योगांचे महत्त्व, सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये म्हणून हिंदुस्थानच्या योजनापूर्व विकासाची आवश्यकता इत्यादी विषय महत्त्व पावले. थोडक्यात असे म्हणता येईल की, हिंदू लोक आपल्या हिंदुत्वाच्या फेऱ्यात अधिक न गुरफटता पूर्वीपेक्षा जास्त लोकशाहीवादी व पूर्वीपेक्षा जास्त ऐहिक व निधर्मी बनत गेले.

मुसलमानांच्या जातीय संघटनांचा हिंदूंवर पुढील प्रकारचा एक सांस्कृतिक परिणाम असहकाराच्या काळापासून दिसून येतो. हिंदूंमध्ये, प्रतिक्रिया म्हणून का होईना, धर्मरक्षणाची भावना वाढली. धार्मिक उत्सव सार्वजनिकरीत्या साजरे करण्याची प्रवृत्ती वाढली. त्या उत्सवातील धार्मिकता मात्र दिवसेंदिवस कमी होत जाऊन त्यांचा उपयोग मुख्यतः ऐच्छिक सामाजिक संघटना बांधण्याकडे होऊ लागला. सांस्कृतिक घडामोडींच्या या पैलूविषयी प्रस्तुत संदर्भात अधिक खोलात जाऊन विवेचन करणे अनावश्यक आहे.

( ब ) **शिक्षित आणि अशिक्षित :** असहकाराच्या चळवळीमुळे जनताजनार्दन आणि शिक्षित वर्ग यांच्यातील भेद अधिक रेखीव झाला. असे होण्याची एकमेकांच्या अगदी उलट असलेली दोन कारणे आहेत.

चळवळीच्या धकाधकीत बुद्धिनिष्ठेच्या जागी सेनानीवरील अंध आज्ञाधारक श्रद्धा रुजविली जाते, आणि पश्चिमेचा दुस्वास राष्ट्रभक्तीचा बुरखा घेऊन मिरवतो या गोष्टी प्रत्यक्ष आंदोलनाच्या ओघात काही संवेदनाशील व्यक्तींच्या ध्यानी आल्या. या धोक्याच्या प्रवृत्तीविरुद्ध सर्वांत जोरदार व धीरोदात्त आवाज कविवर्य रवीन्द्रनाथ टागोरांनी उठविला. भारताच्या आजवरच्या इतिहासात महान विचारवंतांनी जपलेली थोर मूल्ये

§ 'विश्वभारती' त्रैमासिकात ( खंड २१, क्र. १, १९५५, पृ. ५८–८९ ) प्रसिद्ध झालेला 'इस्लाम इन् मॉडर्न बेंगॉल' हा श्री. विनयगोपाल रे यांचा लेख, तसेच या विषयावरील श्री. विल्फ्रेड कँटवेल स्मिथ यांचे 'मॉडर्न इस्लाम इन् इंडिया' ( रिपन प्रिं. प्रेस, लाहोर, १९४७, २ आवृत्ती ) हे अत्यंत महत्त्वाचे पुस्तक पाहा.

वाऱ्यावर सोडून न देण्याचे आवाहन त्यांनी आपल्या अनिर्वचनीय भाषेत केले. संकुचित भूमिकेने तात्पुरता लाभ होत असला तरी त्याचा मोह टाळला पाहिजे, अशी टागोरांनी विनंती केली. गांधींनी कविवर्यांचा इशारा आदरपूर्वक ऐकून घेतला व स्वतःचे भिन्न मत नम्रपणे मांडले. त्यांनी आपल्या ' दि ग्रेट सेंटिनल ' या लेखात म्हटले की, कविवर्यांनी उल्लेखलेला द्वेष किंवा गतानुगतिकत्व भारतीय जनतेत आढळत असल्याचा काहीच पुरावा त्यांना दिसत नाही ( **टागोर-गांधी कॉरस्पॉन्डन्स**, पृ. ३६–११५ ).

रोमा रोलाँनी लिहिलेल्या महात्मा गांधींच्या चरित्रात टागोर आणि गांधींच्या भिन्न मानसप्रकृतींची फारच सुंदर तुलना केली आहे. या तुलनेसाठीच नव्हे तर एकूणातच त्या रोमांचकारी काळाचे भव्य व मनोज्ञ चित्रण पाहण्यासाठीही वाचकांना त्या पुस्तकाची मी शिफारस करीन ( **रोमा रोलाँ**, १९२४, विशेषतः पृ. १४०–१८३ ).

गांधींच्या जीवनापासून व त्यांच्या शिकवणीपासून सुशिक्षित वर्गाने फटकून राहण्याचे आणखीही एक कमी उदात्त कारण होते. श्री. सी. शंकरन् नायर यांच्या मते गांधींची चळवळ वैज्ञानिक प्रगतीपासून आणि प्रातिनिधिक जबाबदार राज्यपद्धतीपासून मिळणारे सर्व फायदे नष्ट करण्यास उघड उघड उद्युक्त झालेली होती. गांधी एकंदरच शासनसंस्थेविरुद्ध उभे असून साधा सरळ विध्वंस हेच त्यांचे उद्दिष्ट आहे असेही त्यांना वाटे. त्यांनी म्हटले आहे : ' गांधींची चळवळ अंतर्गत विघटनामुळे कोसळून पडेल यात काहीच शंका नाही. टॉलस्टॉय, लेनिनवादी कम्युनिझम्, सोशॅलिझम्, कर्मठ हिंदुत्व, आक्रमक इस्लाम अशा वेगवेगळ्या परस्परविरोधी प्रणालींमधून काही काही घेऊन गांधींनी आपली चळवळ उभारली आहे. ही तत्त्वे परस्परांची घृणा करणारी व परस्परांच्या संपर्कात आली म्हणजे स्फोटक, विध्वंसक बनणारी आहेत. त्यांना एकत्र आणल्याचे स्वाभाविक भयानक परिणाम आताच दिसू लागले आहेत ' ( **नायर**, १९२२, पृ. १२४ ). नायर यांचे असे मत होते की, भारतातील जनतेला परिश्रमपूर्वक, पायरीपायरीने तिच्या राजकीय हक्कांचे शिक्षण दिले पाहिजे; सामाजिक जडत्वाच्या खोल गर्तेतून बाहेर काढून तिला मताधिकार मिळवून दिला पाहिजे; आणि हे सर्व करण्याची मुख्य जबाबदारी योग्य अशा पाश्चात्य विद्याविभूषित लोकांची आहे.

सामान्य जनतेवरचा हा अविश्वास गांधींच्या काही निकटवर्ती व आदरणीय सहकाऱ्यांच्या मनातही होता. जयकरांचे उदाहरण या संदर्भात देता येईल. बार्डोलीच्या साराबंदीच्या चळवळीआधी गांधींनी व्हाइसरॉयला जो निर्वाणीचा खलिता पाठवला त्याचा मसुदा तयार करीत असताना त्यांनी जयकरांशी सतत संपर्क राखला होता. गांधींच्या एका पत्राला १ फेब्रुवारी, १९२२ रोजी जयकरांनी पाठवलेल्या उत्तरातील काही भाग पुढे दिला आहे :

' आपणाविषयी अत्यंत आदर असूनही, आपण स्वतःच्या उक्तींना निष्ठुरपणे

नेहमी ज्या उच्च कसोट्या लावता त्यांशी ताडून पाहता आपण व्हाइसरॉयला लिहिलेले हे ऐतिहासिक पत्र फार हिणकस आहे, असे म्हणणे मला भाग पडत आहे. त्याचे काय परिणाम होतील ते एक ईश्वरच जाणे. सार्वत्रिक सविनय कायदेभंगाच्या चळवळीविरुद्ध माझ्या भावना किती तीव्र आहेत हे आपण जाणताच. त्यांची पुनरावृत्ती करण्याचे हे स्थळ नव्हे. या भयकारक साहसात आपल्याला यश मिळो अशीच माझी इच्छा आहे. पण मला अशीही आशा वाटते की, अगदी शेवटच्या क्षणी येथील मागल्या भेटीच्या वेळी तुम्ही पुढे ठेवलेली मागणी स्वीकारून या मार्गापासून तुम्हाला परावृत्त करणे शक्य होईल (जयकर, १९५८, पृ. ५५४. शिवाय पृ. ३५९ पहावे).

तथापि येथे एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात घेतली पाहिजे. सामान्य जनतेच्या पात्रतेविषयी व क्षमतेविषयी असा अविश्वास असला तरी श्री. नायर, ना. जयकर किंवा तत्सम नेते राष्ट्रनिष्ठेत काकणभरही कमी नव्हते. मात्र ते गांधींच्या भूमिकेशी सहमत नव्हते. याविषयी ' मूठभर एतद्देशीय लोकांनी सत्ता हस्तगत केल्याने खरे स्वातंत्र्य येणार नसून सत्तेचा दुरुपयोग झाल्यास तिला विरोध करण्याचे सामर्थ्य सर्व लोकांत आल्यानेच ते येणार आहे ' अशी गांधींची भूमिका होती (**सिलेक्शन्स**, वेचा क्र. ३३४). या मुद्द्यावर मुख्यत्वेकरून एकंदर सुशिक्षित वर्ग गांधींशी कधीच सहमत झाला नाही. शिवाय गांधींचे असेही ठाम मत होते की, हिंसात्मक चळवळीच्या यशातून सत्ता मूठभर लोकांच्या हातात केंद्रित होण्याकडे कल असतो. उलट सर्व जनता सत्तेत सहभागी व्हायची तर ही गोष्ट केवळ अहिंसक मार्गांनीच साध्य होऊ शकते. व्यवहारत: शक्य असते तर, सशस्त्र उठावाने ब्रिटिश राज्य उलथून टाकण्याचा मार्ग पत्करण्यात सुशिक्षित वर्गाच्या मते काही गैर झाले नसते. स्वत:च्या चांगुलपणावरही त्यांचा इतका पूर्ण विश्वास होता की, घटनात्मक वाटाघाटींच्या किंवा जहाल राष्ट्रवादाच्या मार्गाने उद्या स्वातंत्र्य मिळाल्यावर आपण जनतेला सत्तेत सहभागी होण्यापासून वंचित ठेवू असे घडणे शक्यच नाही याविषयी त्यांची खात्री होती.

(क) **स्वराज्यपक्ष विरुद्ध नाफेरवादी :** काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनाच्या अध्यक्षांनी, शैक्षणिक संस्था व कोर्टे यांवर बहिष्कार टाकल्यास देश, नकळत का होईना, कदाचित पुन्हा रानटी असंस्कृततेच्या गर्तेत लोटला जाईल अशी भीती व्यक्त केली होती, हा उल्लेख पूर्वी आला आहेच. गांधींनी उत्साहाने चालविलेल्या खादी आणि चरख्याच्या कार्यक्रमाविरुद्धही तशाच आशयाची किंवा अधिकच जोरदार मते व्यक्त केली गेली.

देशबंधू चित्तरंजन दास गया येथे १९२२ मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात असहकाराखाली निर्दिष्ट केलेल्या कार्यक्रमाचा फेरविचार व्हावा आणि त्यातील काही बाबींवरच शक्ती केंद्रित करावी

असे आवाहन केले. त्याच भाषणात त्यांनी स्वतःची राष्ट्रवादी मते व गांधींची मते यांतील फरक स्पष्ट करणारे एक महत्त्वाचे विधान केले. ते म्हणाले, 'कोणत्याही प्रकारची सविनय कायदेभंगाची चळवळ हाती घेण्यापूर्वी काही अटींची पूर्तता झाली पाहिजे, असे जे बंधन घातले आहे त्यास मी अनुकूल नाही हे मी कबूल करतो. माझ्या मते काँग्रेसने ही बंधने काढून टाकावीत. जनतेला विशिष्ट कायदे विनयपूर्वक मोडायचे असतील तर अशा कायदेभंग करणाऱ्यांपैकी निदान ८० टक्के माणसांनी शुद्ध खादी घालण्याची काय आवश्यकता आहे, हे मला अजूनही समजलेले नाही. मला स्वतःला सार्वत्रिक सार्वजनिक कायदेभंगाचा कार्यक्रम तितकासा पसंत नाही. मला तो अव्यवहार्य वाटतो. अर्थात जे विशिष्ट कायदे उघडउघड गैर आहेत, जे केवळ "कायदा व सुव्यवस्था" राखण्याच्या हेतूने लोकांना दडपण्यासाठी निर्माण झाले आहेत, जे उघडच मानवाची अप्रतिष्ठा करणारे आहेत, अशा कायद्यांचा भंग करणे व्यवहार्य राजकारणाच्या चौकटीत बसते. असे कायदे मोडण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे असेच मलाही वाटते' (इं. ॲ. रि., १९२३, पृ. ३३५).

१९२२ साली काँग्रेसजनांत सामान्यतः दोन गट निर्माण झाले. एका गटाला असहकाराच्या कार्यक्रमात बदल करावा असे वाटत होते. या गटाला 'फेरवादी' व पुढे 'स्वराज्य पक्ष', अशी नावे मिळाली. लोकांत फारसा उत्साह शिल्लक राहिलेला आढळत नसतानादेखील, गांधीप्रणीत असहकाराचा कार्यक्रमच अनुसरावा असा आग्रह दुसऱ्या गटाने धरला. याचे नाव 'नाफेरवादी' असे पडले.

१९२३ च्या अधिवेशनात काँग्रेसने "सुधारित" कायदेमंडळांच्या निवडणुकीत भाग घेण्यास परवानगी दिली आणि पक्षातील फूट टाळली. असहकाराच्या काळात कायदेमंडळांतील जवळजवळ सर्व जागांवर जणू काही नेमस्त–लिबरल–मंडळींची मक्तेदारीच झाली होती. त्यापैकी कित्येक जागा काँग्रेसने हिसकून घेतल्या. त्यामुळे सर्व देशभर राजकीय उत्साहाला पुन्हा उधाण आले.

कायदेमंडळांतील प्रवेशानंतर व त्याचा परिणाम म्हणून घडून आलेली एक अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे बंगालमध्ये एक नवा हिंदू-मुसलमान करार अस्तित्वात आला. या कराराचे मुख्य सूत्रधार स्वतः चित्तरंजन दासच होते. या बंगाल-करारावर १७ डिसेंबर १९२३ रोजी कलकत्त्यात सह्या झाल्या. सतत विरोध करून घटनात्मक सुधारणा फोल ठरवणे, राज्यकारभाराला खीळ घालणे ही त्यांची जहाल राष्ट्रवादी या नात्याने नीती होती. हे उद्दिष्ट साधण्यासाठी देशबंधू दास यांना कायदेमंडळातील आपली बाजू भक्कम करायची होती. त्यासाठी बंगालमधील मुसलमानांची समजूत काढणे आवश्यक आहे असे त्यांना वाटले. या करारान्वये मुसलमानांच्या ज्या हितसंबंधांना संरक्षण दिले गेले त्यांचा संबंध धर्माशी नसून ऐहिक स्वार्थाशी होता ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी

आहे. त्यातही मुस्लिम समाजातील उच्च व मध्यमवर्गीय सुशिक्षित व्यक्तींचेच हितसंबंध अधिक पाहिले गेले. या करारामुळे दलित मुस्लिम जनतेच्या भाग्यात इतर जमातींतील दलितांच्या तुलनेने काही विशेष फरक पडणार नव्हता.

या बंगाल करारातील काही कलमे खाली दिलेली आहेत. करारातील धर्मसहिष्णुते-विषयीचा भाग प्रस्तुत संदर्भाला अनावश्यक म्हणून गाळला आहे.

'असे ठरविण्यात येते की—

'(१) **विधिमंडळातील प्रतिनिधित्व :** बंगाल विधिमंडळातील प्रतिनिधित्व लोकसंख्येच्या आधारावर आणि विभक्त मतदारसंघांच्या तत्त्वावर आधारलेले असावे. अखिल भारतीय हिंदू मुसलमान करार, आणि खिलाफत (कमिटी) व काँग्रेस यांच्यातील समझोता यांच्याशी सुसंगती राखण्यासाठी आवश्यक ते फेरबदल मात्र केले जातील.

(२) **स्थानिक संस्थांतील प्रतिनिधित्व :** प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक संस्थांतील प्रतिनिधित्व ६० : ४० या प्रमाणात (याविषयी अधिक फेरविचार करता येईल) असावे; बहुसंख्याक समाजास ६० % व अल्पसंख्य जमातीस ४० % याप्रमाणे.

(३) **सरकारी नोकऱ्या :** सरकारी नोकऱ्यांतील ५५% जागा मुसलमानांना मिळाव्या. ही टक्केवारी पुढीलप्रमाणे ठरवावी — प्रथम प्रत्येक प्रकारच्या नेमणुकीसाठी विशिष्ट कसोटी ठरवावी. नंतर किमान कसोटीला उतरणाऱ्या मुसलमानांची भरती प्रथम वरील प्रमाण गाठले जाईपर्यंत करावी. अशा रीतीने वरील संख्या पूर्ण झाल्यानंतर पुढील जागा ५५ : ४५ या प्रमाणात – ५५ मुसलमानांना व ४५ मुस्लिमेतरांना – भराव्या. मात्र मध्यंतरीच्या वर्षांत, काही टक्के, समजा २०%, नोकऱ्या हिंदूंना दिल्या जाव्यात (इं. ॲ. रि., १९२४, I, पृ. ६३-६४).

या संदर्भात स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस श्री. मोतीलाल नेहरू यांनी १४ ऑक्टोबर १९२३ रोजी काढलेल्या जाहीरनाम्यात व्यक्त झालेल्या पक्षाच्या आर्थिक धोरणाकडे लक्ष वेधणे उचित ठरते. 'स्वराज्य म्हणजे श्रमिकांचे स्वातंत्र्य' ही स्वराज्याची कल्पना रुजविण्याचा, लोकप्रिय करण्याचा गांधींचा प्रयत्न होता. या आदर्शाशी स्वराज्यपक्षीयांचा असलेला मतभेदही त्यावरून चांगला दिसून येतो.

जाहीरनामा म्हणतो : 'आमचा पक्ष त्यांच्या पाठीशी अविचल निष्ठेने उभा आहे असे आश्वासन भारतातील शेतकऱ्याला मुद्दाम द्यायला हवे असे नाही...आमचा पक्ष कुळांना न्याय मिळावा या मताचा आहे हे अगदी निखालस सत्य आहे, पण तसे करताना जमीनदारांवर अन्याय झाल्यास त्या न्यायाची प्रत अगदीच हिणकस म्हणावी लागेल. या पक्षाची अशी खात्री आहे की, मालक आणि कुळे दोघांच्याही खऱ्याखुऱ्या हितसंबंधांची जपणूक केल्यानेच स्वराज्याला भक्कम पाया लाभेल. दोघांच्याही पाठीशी

त्यांच्यावरील आणीबाणीच्या प्रसंगी खंबीरपणे उभे राहण्याची आमची प्रतिज्ञा आहे' (इं. ॲ. रि., १९२४, I, पृ. ६०-६१).

स्वराज्य पक्षाविषयी स्वतः गांधींनी घेतलेली भूमिका महत्त्वाची आहे. त्या वेळीही काँग्रेसचे सभासद प्रचंड बहुमताने गांधींच्याच पाठीशी होते. परंतु केवळ बहुमताच्या जोरावर इतरांची ठाम मते दडपून टाकण्याचे गांधींनी टाळले. काँग्रेससारख्या राष्ट्रीय संघटनेत इतरांप्रमाणे त्यांनाही स्थान असले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. दरम्यान गांधींनी स्वराज्य पक्षातील आपल्या विरोधकांना स्वतःची 'स्वराज्या'विषयीची कल्पना समजावून देण्याचा व त्यांना आपल्या भूमिकेवर आणण्याचा प्रयत्न केला (यं. इं., १५-१०-१९२५, पृ. ३५२). १९२४ च्या उन्हाळ्याच्या मध्यास त्यांनी एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी जाहीर केले की, त्यांचे व स्वराज्य पक्षाचे मतभेद मूलभूत असले तरी, स्वराज्यपक्षीयांनी 'कायदेमंडळात जाणे सर्वथा समर्थनीय असून "नाफेरवाद्यां" कडून त्यांनी संपूर्ण तटस्थतेची अपेक्षा करणे' योग्यच आहे (सीतारामय्या, १९४६, I पृ. २६९–२७१; त्याच ग्रंथातील नेहरू-दास पत्रक पाहावे, पृ. २७१–२७४).

१९२४ च्या बेळगाव येथील काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून गांधींची निवड झाली. तेथे त्यांनी एक योजना मांडली. काँग्रेसचे सभासद श्रमनिष्ठ असले पाहिजेत अशी भूमिका त्यात घेतलेली होती. श्रमाचे द्योतक म्हणून ठराविक प्रमाणात प्रत्येक सभासदाने सूत कातावे, मगच त्याला काँग्रेसचे सभासदत्व व (पक्षांतर्गत बाबीत) मताधिकार मिळेल अशी ही योजना होती. 'उत्पन्न किंवा सामाजिक दर्जा ही मताधिकार प्राप्तीची कसोटी ठेवणे बरोबर नाही. शरीरश्रम करणाराच मताधिकारास पात्र समजला पाहिजे. काँग्रेसने मताधिकार प्राप्तीसाठी अशा प्रकारची कसोटी सुचविली आहे. शिक्षण किंवा संपत्तीच्या आधारावर ठरविलेल्या कसोट्या चकविणाऱ्या आहेत हे सिद्ध झालेले आहे. शासनसंस्थेच्या व राज्याचे कल्याण साधण्याच्या कामात सहभागी होण्याची संधी शरीरश्रम सर्वांना उपलब्ध करून देते' (इं. ॲ. रि., १९२४, II, पृ. ४०९, ३९४–३९७).

श्रमजीवींना त्यांचे योग्य ते स्थान त्यांच्या श्रमांच्या जोरावर काँग्रेसमध्ये मिळवून द्यावे अशी गांधींची कल्पना होती, ही गोष्ट यावरून स्पष्ट होते. राजकारणी वळणाच्या शिक्षित वर्गाने गांधींच्या या विचाराला कडाडून विरोध केला. शेवटी या विषयावर दास, नेहरू आणि गांधी यांच्यात एक प्रकारची तडजोड झाली. 'महात्माजीं'बद्दल असणाऱ्या वैयक्तिक आदरापोटी या दोन पुढाऱ्यांनी तडजोड पत्करण्याची तयारी दाखविली, इतकेच.

काँग्रेसच्या बाहेरील राजकारणेच्छु शिक्षित वर्गाचे मत अधिकच गांधीविरोधी बनले. गांधींनी सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमाविषयी घेतलेली भूमिका आणि स्वराज्य

मिळविण्याचा अहिंसा हाच एकमेव मार्ग असल्याबद्दलचा त्यांचा दावा, यांवर महाराष्ट्र प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात ११ मे, १९२५ रोजी कडाडून हल्ला केला गेला (इं. ॲ. रि., १९२५, I, पृ. ३९० व पुढे). गांधींनाही आपणात व इतरांत असलेल्या दरीची जाणीव होती. कधीकधी ते आपल्या भावना व्यक्तही करीत असत. त्यात खिन्नतेची झाक आढळत असे. 'यंग इंडिया'च्या ६ ऑगस्ट, १९२५ च्या अंकात ते लिहितात, 'शिक्षित भारतीयांना जर मला माझ्याबरोबर घेता आले असते तर मी आजच "संपूर्ण असहकार" पुकारला असता' (यं. इं., ६-८-१९२५, पृ. २७१; शिवाय गांधींचा 'अबाउट एज्युकेटेड क्लासेस' हा लेख पाहा, कित्ता, पृ. ३५२)

गांधींनी उल्लेखलेला शिक्षित वर्ग आणि त्यांच्या 'रचनात्मक कार्यक्रमा'द्वारा जनतेच्या हिताशी तद्रूप होण्याचा प्रयत्न करणारी मंडळी यांच्यामधील ध्रुवीकरण या काळात काहीसे तीव्र झाले. परंतु राष्ट्रीय संघटनेला बाधक ठरण्याइतके हे ध्रुवीकरण तीव्र होऊ नये याची गांधी नेहमीच खबरदारी घेत असत. त्यांनी लिहिले आहे, 'मला काँग्रेसबद्दल फार आदर आहे; तिला सोडून काही करण्याचा विचारच माझ्या मनात येत नाही. ही एकच अशी संघटना आहे की जिने बऱ्यावाईट सर्वच झंझावातांना तोंड दिले आहे. शिक्षित भारतीयांनी वर्षानुवर्षे चिकाटीने केलेल्या प्रयत्नांचे काँग्रेस संघटना हे फळ आहे. तिची उपयुक्तता कमी होईल अशी कोणतीच गोष्ट मी जाणूनबुजून करणार नाही' (यं. इं., २०-८-१९२५, पृ. २८८). *

गांधींनी ३० जुलै, १९२५ च्या 'यंग इंडिया'त एक महत्त्वपूर्ण लेख लिहिला. त्यात त्यांनी पुन्हा लिहिले : 'तिहेरी रचनात्मक कार्यक्रमावर आपले लक्ष केंद्रित करून सुशिक्षित भारतीयांनी आपल्या जीवनात त्याला महत्त्वाचे स्थान दिले तर आपण स्वातंत्र्याच्या अधिक निकट जाऊ हे निश्चित. परंतु त्या वर्गात असा विश्वास निर्माण करण्यास मी असमर्थ ठरलो आहे हे मला कबूल केले पाहिजे.

'काँग्रेसचा विकास करण्याचे काम या सुशिक्षित वर्गाला करू द्यावे, त्यांच्या आड मी येऊ नये, हे आवश्यक आहे. भारताच्या सर्वसामान्य जनतेशी मी सर्वस्वी एकरूप झालो आहे. सुशिक्षित भारतीयांशी माझे मूलभूत मतभेद आहेत. मला अजूनही त्यांची मने वळवायची इच्छा आहे. पण हे कार्य मी काँग्रेसचे नेतृत्व करून करू इच्छित नाही. १९१५ ते १९१९ या काळात मी जसे शांतपणे काम केले तसेच कार्य करून मला

---

* विशेषतः गांधींचे २३ डिसेंबर १९२४ रोजी बेळगाव येथील अ. भा. काँग्रेस कमिटीच्या सभेतील निवेदन (इं. ॲ. रि., १९२४, II, पृ. ३९४–३९६) आणि त्यांचा 'यंग इंडिया'च्या २७ नोव्हेंबर, १९२४ च्या अंकातील 'शॅल वुई युनाइट ?', हा लेख, पृ. ३८७–३८८, हे साहित्य पाहावे.

त्यांच्या हृदयात शिरकाव करून घ्यायला हवा. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षित भारतीयांनी राष्ट्राची मोठी सेवा केली आहे हे मी जाणतो. कार्य करण्याची त्यांची एक ठराविक पद्धत आहे. भारताच्या राजकीय जीवनात त्यांचे एक आगळे स्थान आहे. कोणी काहीही म्हणो, "स्वराज्य पक्षा"च्या शिस्तबद्ध विरोधाचा राज्यकर्त्यांवर चांगलाच ठसा उमटलेला आहे, ही वस्तुस्थिती मला स्पष्ट दिसते. त्यांच्या मार्गातून दूर होऊन, कॉंग्रेसच्या मदतीने व तिच्या झेंड्याखाली माझ्या रचनात्मक कार्याला स्वतःस वाहून घेणे हाच त्यांच्या कार्याला सहाय्य करण्याचा उत्तम मार्ग मला दिसतो. अर्थात, कॉंग्रेसचा व तिच्या नावाचा उपयोगही वरील सुशिक्षित वर्गाची अनुमती मिळेल तेवढाच मला केला पाहिजे.'

एकंदरीत १९२५ मध्ये कॉंग्रेस व गांधी यांचे संबंध असे होते.

## वातावरण निवळून भेद स्पष्ट होण्याचा काळ

कॉंग्रेस पक्षान्तर्गत फेरवादी व नाफेरवादी गटांतील फरक स्पष्ट होत होता त्याच काळात देशात इतरही महत्त्वाच्या घडामोडी होत होत्या. त्यांचा वेगळा परामर्श घेणे इष्ट व आवश्यक ठरते.

( अ ) **अखिल भारतीय चरखा संघ :** 'शारीरिक श्रम ही कॉंग्रेस संघटनेत मतदानाचा अधिकार मिळविण्याची एकमेव कसोटी असावी' हा गांधींचा ठराव बेळगाव कॉंग्रेसमध्ये बारगळल्यानंतर त्यांनी कॉंग्रेस कमिटीपुढे सप्टेंबर १९२५ मध्ये आणखी एक ठराव मांडला. १९२१ पासूनच अ. भा. खादी मंडळ (ऑल इंडिया खद्दर बोर्ड) अस्तित्वात होते. त्याचे कार्यही चालू होते. या मंडळाचे रूपांतर अखिल भारतीय चरखा संघात (ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन) करावे असा तो ठराव होता. या संघाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती : 'सूतकताई शिकविण्याच्या शाळा किंवा संस्था काढणे; कॉंग्रेसची एजन्सी म्हणून तिच्या वतीने कॉंग्रेसची वर्गणी म्हणून हाताने कातलेले सूत स्वीकारणे; इत्यादी.' 'या संघाच्या कार्यामुळे कॉंग्रेसची प्रतिष्ठा वाढेल... अर्थात हा संघ स्थापण्याचा उद्देश कॉंग्रेसला शह देणे किंवा ती काबीज करणे असा मुळीच नाही... एका दृष्टीने ती शुद्ध आर्थिक संघटना राहील व देशाच्या आर्थिक बाजूकडे लक्ष देणे हे त्या संघाचे काम असेल' असा खुलासाही गांधींनी केला (इं. ॲ. रि., १९२५, II, पृ. २५, २७–२८).

जवाहरलाल नेहरूंच्या मते सूत कातणाऱ्यासच मतदानाचा हक्क मिळावा हा नियम अयशस्वी ठरला होता; या नियमाचे पालन करणारे फक्त ९११७ सभासद होते

तेव्हा मतदानाचा अधिकार मर्यादित करण्यापेक्षा त्याचा विस्तार करण्याची गरज होती, जेणेकरून पूर्वीप्रमाणेच भिन्न मते असलेली माणसे काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारण्यास उद्युक्त होतील ( किन्त्ता, पृ. २५ ).

सूतकताईवर आधारलेल्या मताधिकारात पुढे बदल करण्यात आले. तरी परंतु अ. भा. चरखा संघाने आपल्या कार्यात खूपच प्रगती केल्याचे काँग्रेसच्या सरचिटणिसांनी तयार केलेल्या अहवालात नमूद केलेले आढळते ( इं. ॲ. रि., १९२६, II, पृ. २८–३०; इं. ॲ. रि., १९२८, II, पृ. १८; इं. ॲ. रि., १९२९, पृ. २५२ ).

( ब ) **छोटे सत्याग्रह :** ज्या काँग्रेसजनांनी गांधीजींचा कार्यक्रम स्वीकारला होता ते या काळात केवळ खादीच्याच कार्याला सर्वस्वी चिकटून राहिले असे नाही. विशिष्ट अन्याय दूर करून घेण्यासाठी देशाच्या वेगवेगळ्या भागांत स्थानिक स्वरूपाचे सत्याग्रह करण्यात आले. १९२३ ते १९२८ ही वर्षे वरील प्रकारच्या सत्याग्रहाच्या मोहिमांसाठीच प्रसिद्ध आहेत. शीख लोकांची गुरुद्वार-सुधारणा चळवळ ही अशी एक प्रमुख चळवळ गणली पाहिजे. १९२१ च्या असहकाराच्या ऐन धुमाळीतच या चळवळीची सुरुवात झाली होती. तिला या काळात खरा जोर चढला. २० फेब्रुवारी, १९२४ रोजी जैतो येथे निर्घृण हत्याकांड झाले. पण त्यामुळे चळवळ दडपली गेली नाही. उलट शीखांचा निश्चय अधिकच पक्का झाला ( इं. ॲ. रि., १९२४, I, पृ. ९७, व II, पृ. १९; गुरूका बाग, १९२४ ). वैकोम ( केरळ ) येथे अस्पृश्य जातींना नागरी हक्क मिळवून देण्यासाठी एक आंदोलन झाले ( इं. ॲ. रि., १९२४, II, पृ. १९; यं. इं. १९२४, पृ. १२४, १३३, १४४, २०१, २२१, ३०६ ). महाराष्ट्रातील मुळशी धरणाखाली येणाऱ्या जमिनीवरून झालेल्या सक्तीच्या बेदखलीविरुद्धचा शेतकऱ्यांचा सत्याग्रह चालू होताच ( इं. ॲ. रि., १९२४, II, पृ. १९ ). १९२४–२५ मध्ये बंगालमधील तारकेश्वर येथे एका धार्मिक मठाच्या महंताच्या दडपशाहीविरुद्ध सत्याग्रहाची मोहीम सुरू करण्यात आली. १९२३ ला नागपूरमध्ये ध्वज-सत्याग्रह झाला, तर मद्रासेत जनरल नीलचा पुतळा काढून टाकण्यासाठी सत्याग्रह सुरू केला गेला ( या पुतळ्याखाली कोरलेला मजकूर भारतीयांना अत्यंत अपमानकारक वाटणारा होता ). पटुआखली येथे मुस्लिमांनी मागितलेल्या काही खास विशेषाधिकारांविरुद्ध इतर नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सत्याग्रह पुकारण्यात आला.*

---

* घोषल, १३४० बी. एस्.; सन्याल, १३४२ बी. एस्.; आणि बंदोपाध्याय, १३५५ बी. एस्. नागपूरसाठी इं. ॲ. रि., १९२७, II, पृ. १६९–१७२; पटुआखली-करता इं. ॲ. रि., १९२६, II, पृ. १०९–११२ आणि इं. ॲ. रि., १९२७, पृ. ७८–८०; जनरल नील प्रकरणासाठी इं. ॲ. रि., १९२७, II, पृ. ३८, ३३७.

ज्यांना प्रसिद्धी मिळाली अशा वरीलसारख्या सत्याग्रहांखेरीज इतरही काही सत्याग्रह देशाच्या निरनिराळ्या भागांत झाले. त्यांचा अभ्यास केल्याने काही महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतील. अशा मोहिमांत, राजशाहीमधील त्रिकुत्सा येथील एका जमीनदाराविरुद्ध कुळांनी केलेला सत्याग्रह, जेसोरमधील बदाबिला येथील युनियन बोर्डावरील बहिष्कार चळवळ, आणि पटुआखली येथील सत्याग्रह संपल्यानंतर तेथील मुसलमानांनी सुरू केलेली युनियन बोर्डावरील बहिष्काराची चळवळ यांचा समावेश करता येईल.

या सर्व सत्याग्रहांबाबत एक गोष्ट प्रामुख्याने दिसून येते ती अशी की, बहुतेक सर्व चळवळीत फक्त हिंदू लोकांनीच भाग घेतला होता. १९१९–१९२१ या काळात बहुतेक लोक गांधींच्या शिस्तीच्या व अहिंसेच्या कल्पनांशी अपरिचित होते. त्यामुळे गांधींनी जेव्हा जेव्हा हरताळाचा आदेश दिला तेव्हा तेव्हा लोकांनी साद दिली, परंतु हिंसा-अहिंसा यांचा फारसा विधिनिषेध त्यांनी बाळगला नाही. पण आता त्यांची समज वाढली होती. गांधींच्या उपोषणामुळे त्यांच्या डोळ्यांत अंजन पडले होते. आपल्या वर्तनाचा काय परिणाम होत आहे याविषयी सावधगिरी बाळगण्याइतकी त्यांना जाणीव झाली होती. प्रतिपक्षाबद्दल गांधी म्हणत त्याप्रमाणे प्रेमादराची भावना जरी त्यांच्या मनात नसली तरी, अहिंसेच्या मर्यादांचे पालन करण्याचा, कोणत्याच प्रकारचा हिंसाचार घडणार नाही याची खबरदारी घेण्याचा प्रयत्न आता त्यांच्याकडून होत होता.

सर्व हिंदुस्थानच्या पार्श्वभूमीवरून पाहता, हे लहानसहान सत्याग्रह म्हणजे एक प्रकारचे अहिंसापालनाचेच पाठ होते. अर्थात त्यातही डावे-उजवे होतेच. पण ज्या शीख जमातीने हिंस्र युद्धातले सर्वोत्तम सैनिक निर्माण केले त्याच शीख समाजाने अहिंसक चळवळीतही धैर्य व निश्चयीपणा यांचे श्रेष्ठ आदर्श निर्माण केले, ही गोष्ट मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहे.

आणखीही एक गोष्ट वरील सर्व सत्याग्रहांबाबत लक्षात घेण्यासारखी आहे. वरीलपैकी कोणताच सत्याग्रह विशिष्ट धार्मिक हितसंबंधांच्या पूर्तीसाठी केला गेला नाही. आणि जेथे धार्मिक संस्थांचा संबंध होता तेथेही अशा संस्थांचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालावे अशा स्वरूपाची मागणी सत्याग्रहामागे होती; म्हणजे सत्याग्रहाचे उद्दिष्ट ऐहिकच होते. या सत्याग्रहात भाग घेणारे स्वयंसेवक त्यामुळे अधिक धर्मलंड बनले नाहीत. उलट सत्याग्रहामुळे त्यांचा अनुभव व गुणवत्ता वाढली. पुढे केव्हाही एखाद्या न्याय्य कारणासाठी अहिंसक लढा करण्याची वेळ आली तर त्यात भाग घेण्याची या स्वयंसेवकांची चांगलीच तयारी झाली.

येथे स्वाभाविकपणेच एक प्रश्न उद्भवतो. हिंदूंमधील सामान्य जनता व शेतकरी अशा रीतीने राजकीय रंगमंचावर आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखवीत असताना

प्र/१०९/१ मं ग्रा ल य.

मुसलमान जमातीतील याच वर्गांची स्थिती काय होती ? लोकसंख्येत मुस्लिमांचे प्राबल्य असलेल्या ठिकाणी झालेल्या सत्याग्रहांचा तपशीलवार अभ्यास केल्याशिवाय या प्रश्नाचे उत्तर देणे फार अवघड आहे. असा अभ्यास करण्यामधील प्रमुख अडचण म्हणजे यांतील बऱ्याच प्रकरणांत घटनांची कसलीच पद्धतशीर नोंद ठेवलेली आढळत नाही. त्या त्या सत्याग्रहात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या स्वयंसेवकांच्या मुलाखती घेऊन या इतिहासाचा काही भाग पुन्हा रचता येईल. मात्र या कार्यकर्त्यांनी आपली हकीगत वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून सांगावी अशा युक्तीनेच त्यांच्या मुलाखती घेतल्या पाहिजेत.

अशा एका सत्याग्रहाची हकीगत येथे थोडक्यात सांगत आहे. राजशाही जिल्ह्यातील त्रिकुत्सा येथे शेतकऱ्यांनी जमिनदाराविरुद्ध उठाव केला. येथे बहुसंख्य शेतकरी मुसलमान होते व जमीनदार हिंदू होता. शेतकरी सुसंघटित होते. त्यांनी जमीनदाराला खंड देण्याचे नाकारले. स्वाभाविकच सरकार जमीनदाराच्या मदतीला धावले. कॉंग्रेसमधल्या ज्या प्रमुख व्यक्तींनी या लढ्यात पुढाकार घेतला होता त्यांना अटक झाली. ही सर्व माणसे हिंदूच होती. दरम्यान सरकारने त्या भागात नवीन अधिकारी पाठवले. मात्र आधीच्या हिंदू अधिकाऱ्यांऐवजी धोरणी व अनुभवी मुसलमान अधिकारी पाठवण्याची खबरदारी सरकारने घेतली.

हे अधिकारी शेतकऱ्यांना त्यांच्या घरी तसेच मशिदीत जाऊन भेटत असत. या अधिकाऱ्यांच्या बायकांनीही शेतकरी स्त्रियांशी मैत्री केली. अशा रीतीने पुरेशी लोकप्रियता मिळाल्यानंतर शेतकऱ्यांनी, कॉंग्रेसच्या हिंदू पुढाऱ्यांचे न ऐकता, काय अडचणी असतील त्या आपल्याला सांगाव्या, असा प्रचार त्यांनी सुरू केला. या सगळ्याचा शेतकऱ्यांवर प्रभाव पडत आहे असे पाहताच सरकारने वेळ न घालवता शेतकऱ्यांच्या बहुतेक मागण्या पूर्ण केल्या. वास्तविक या सर्व मागण्या कॉंग्रेसजनांनीच शेतकऱ्यांच्या मनात ठसविल्या होत्या. मात्र मागण्या पूर्ण होऊनही, लढा देऊन आपण विजयश्री मिळविली असे शेतकऱ्यांना वाटले नाही. सरकारी अधिकाऱ्यांच्या सहानुभूती व औदार्यामुळे या सर्व गोष्टी घडून आल्या हाच विचार लोकांच्या मनांत दृढ झाला.

पटुआखलीचा सत्याग्रह संपल्यानंतर बारिसाल जिल्ह्यात झालेल्या सत्याग्रहाची हकीगत बरीचशी वरील प्रकारचीच आहे. पटुआखलीच्या पहिल्या मोहिमेचे नेतृत्व सतिन सेन या कॉंग्रेसच्या प्रमुख हिंदू गृहस्थांकडे होते. त्यांची मोहीम यशस्वी झाली होती. प्रार्थनेच्या वेळेखेरीज राहिलेल्या वेळात मशिदीवरून सवाद्य मिरवणूक नेण्याचा हिंदूंचा हक्क प्रस्थापित झाला होता.

पटुआखलीचा सत्याग्रह यशस्वीपणे संपल्यावर योगायोगाने थोड्या अवधीनंतर जिल्ह्यात युनियन बोर्ड स्थापण्याची योजना अमलात आणण्याचे सरकारने ठरवले. जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांचा या गोष्टीला विरोध होता. १९२१ मध्ये मिदनापूर

जिल्ह्यात युनियन बोर्डावरील बहिष्कार यशस्वी झाला होता ही गोष्ट त्यांना ऐकून माहीत होती. हे मुसलमान शेतकरी श्री. सतिन सेन यांच्याकडेच आले. त्यांनी श्री. सेन यांना आपल्या लढ्याचे नेतृत्व करण्याची विनंती केली. श्री. सेन यांनीही ती विनंती ताबडतोब मान्य केली. त्यांनी त्या भागाचा एक दौरा काढला. या गोष्टीचा सुगावा लागताच बारिसालच्या मॅजिस्ट्रेटने ताबडतोब युनियन बोर्डाची योजना मागे घेतली. कारण काँग्रेसजनांचे ( जे सामान्यतः हिंदू होते ) मुस्लिम किसान जनतेशी मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध निर्माण होण्याची संधी देणे हे फारच धोक्याचे आहे असे सरकारचे व उच्चवर्गीय मुसलमानांचे मत होते. ' आमची जमात स्वतंत्र व अलग आहे ' हा उच्चवर्गीय मुसलमानांचा दावा त्यांना सामान्य मुस्लिम जनतेत पाठिंबा मिळत असेतोवरच मान्य होणार होता.

( क ) **मुस्लिम संघटनेची पुनर्रचना :** हिंदुस्थानातील मुस्लिम लोकांची क्रमाक्रमाने एक अलग राष्ट्रीय अस्मिता संघटित केली जाऊ लागली होती हे मागेच सुचित केलेले आहे. मुस्लिमांवर बहुसंख्य हिंदूंकडून सतत जुलूम-जबरदस्ती व अन्याय केला जात असल्याची भावना आवर्जून वाढवणे हा एक त्याचा प्रमुख मार्ग होता.

१९२३ पासून ते घटनात्मक सुधारणांच्या पुढच्या हप्त्यासाठी पूर्वचौकशी करण्यासाठी १९२८ मध्ये भारतात सायमन कमिशन आले त्या वेळपर्यंत अलगत्वाच्या भूमिकेतून दोन मागण्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मुसलमान जनतेला पद्धतशीरपणे उत्तेजन देण्यात आले. गोवध करण्याचा मुसलमानांना हक्क आहे, आणि मशिदीसमोरून कोणीही केव्हाही वाद्ये वाजवीत मिरवणूक नेऊ नये, या त्या दोन मागण्या होत्या. हिंदू लोक केवळ संख्येनेच जास्त आहेत असे नाही तर आर्थिकदृष्ट्याही तो समाज वरचढ आहे यावर भर दिला जाई. हिंदू-हिंदूंतील गरीब-श्रीमंत भेदाकडे या वेळी संपूर्ण दुर्लक्ष केले जात असे.

वरील प्रचाराचा लगेचच असा परिणाम झाला की, श्रीमंत, जमीनदार हिंदूंचा, ते श्रीमंत ( व शोषक ) आहेत म्हणून नव्हे तर केवळ हिंदू म्हणून द्वेष होऊ लागला. अशा रीतीने मुसलमान दलित समाजातील वाढत्या प्रक्षोभाला हिंदू द्वेषाचे वळण देऊन अलग मुसलमान राष्ट्रीय अस्मितेची उभारणी करता आल्यास मुसलमानांतील श्रीमंत व्यक्तींचा त्यात स्वार्थ होता. ' धर्मबंधू ' म्हणून त्यांच्या शोषणाला संरक्षण व अभय मिळणार होते. हिंदू व मुसलमान दोन्ही धर्मातील शेतकऱ्यांची अवस्था सारखीच गरीबीची, शोषितांची असूनसुद्धा दलित मुसलमानांचा प्रक्षोभ हिंदू दलित जनतेविरुद्ध प्रकट होणार होता.

या काळातील काही निवडक घटना तपासून त्यांचे राजकीय परिणाम काय झाले ते आता पाहू.

१९२४ मध्ये दिल्ली, गुलबर्गा, लखनौ, शहाजहानपुर, अलाहाबाद, कलकत्ता व कोहट येथे गंभीर स्वरूपाचे हिंदू-मुसलमान दंगे झाले. नंतरच्या काळातही दंग्यांची एक मालिकाच सुरू झाली. या दंग्यांमागील कारणे नेहमीचीच म्हणजे सार्वजनिक ठिकाणी गोहत्या, दिवसाच्या २४ तासात कोणत्याही वेळी मशिदीवरून सवाद्य मिरवणूक जाऊ देण्यास मज्जाव, हिंदूंनी चालविलेली शुद्धीकरण मोहीम, व आर्यसमाजासारख्या हिंदूंच्या संघटनांचा मुसलमानांचे धर्मांतर घडवून आणण्याच्या हक्कासंबंधीचा आग्रह इत्यादी होती.

हिंदू व मुसलमान हे दोघे भारतीय असून उभयतांचे हित समान गोष्टींतच आहे असे मानणाऱ्या उभय जमातींतील राष्ट्रवाद्यांनी करार, ऐक्य-परिषदा यांद्वारे फुटीर प्रवृत्तीला रोखण्याचा प्रयत्न केला. अशी एक ऐक्य-परिषद दिल्लीला २ सप्टेंबर, १९२४ रोजी गांधींच्या उपोषणानंतर घेण्यात आली. दुसरी सिमल्याला १६ सप्टेंबर १९२७ला; अशीच आणखी एक २७ ऑक्टोबर १९२७ रोजी कलकत्त्याला भरवली गेली. विशेष असे की, या सर्व परिषदांतील चर्चा गोवध, सवाद्य मिरवणुका, शुद्धीकरण, धर्मांतर या जुन्या विषयांभोवतीच घोटळत राहिली. त्यामुळे हिंदू-मुसलमानांत समान असणाऱ्या आर्थिक व राजकीय हितसंबंधांवर लक्ष केंद्रित होण्याऐवजी दोन धर्मीयांतील भेद अधिक धारदार बनण्यातच त्यांची फलश्रुती झाली ( इं. ॲ. रि., १९२४, II, पृ. १४९ व पुढे; कित्ता, १९२७, II, पृ. ३९–५८; विशेषतः यं. इं., २९-५-१९२४ मधील 'हिंदू-मुस्लिम तेढ : कारणे व निवारणाचे उपाय' पृ. १७३–१८३ हा गांधींचा लेख पाहा ).

श्री. शौकत अली हे गांधींचे खिलाफत चळवळीपासूनचे सहकारी होते. कोहटच्या दंगलीच्या ( १९२४ ) कारणमीमांसेवरून या दोघांतील तीव्र मतभेद प्रकट झाले. ज्या वाचकांना या विषयात खास गोडी आहे त्यांना त्या दंगलीची या दोघांनी आपापल्या परीने केलेली भिन्न कारणमीमांसा वाचता येईल (इंडियन ॲन्युअल रजिस्टर, १९२५, पृ. ९७–१०६.). राजकीय क्षेत्रातल्या वाढत्या अलगपणाच्या संदर्भात, श्री शौकत अलींनी वरील निवेदनात काढलेले पुढील उद्गार महत्त्वाचे आहेत : 'वायव्य सरहद्द प्रांतातील ही अल्पशिक्षित आणि अज्ञ खानमंडळी आपली प्रतिष्ठा आणि सामाजिक दर्जा प्राणपणाने जपतात... शिकलेल्या व अधिक चतुर असलेल्या हिंदूंनी त्यांच्या काटकसरी राहणीने व व्यापार करण्याच्या किमयेमुळे समाजात बरेच वरचढ स्थान संपादले आहे. त्यांनी दौलत जमवली व कधीकधी ते तिचे उन्मत्त प्रदर्शनही करतात. सरकारही एकीकडे, हिंदूंची शक्ती वाढू नये म्हणून खबरदारी घेत असले तरी, दुसरीकडे, खानदानी मुसलमानांना आणखी खच्ची करण्यासाठी या स्थितीचा फायदा उठवीत होते...

'... सरहद्द प्रांतातील मुसलमानांची अवस्था गुलामांसारखीच असून साऱ्या

राष्ट्रवादी हिंदुस्थानने आपल्या मदतीला धावून यावे आणि देशाच्या इतर भागांतील नागरिकांना मिळणारे सर्व हक्क आपणास मिळवून द्यावेत अशी त्यांची अपेक्षा आहे. नगरपालिका, विद्यापीठे, जिल्हा बोर्डे व विधिमंडळे यांसारख्या लोकशाही संस्थांमध्ये आपणास प्रतिनिधित्व मिळावे अशी त्यांची मागणी आहे. '

जानेवारी १९२५ मध्ये झालेल्या सर्वपक्षीय संमेलनात श्री. जिना यांनी पुढील-प्रमाणे वक्तव्य केल्याचे वृत्त प्रसिद्ध झालेले आढळते : ' हिंदू-मुसलमानांतील हा वाद– विशेषतः विधिमंडळांवर व इतरही लोकशाही संस्थांवर प्रतिनिधींचे प्रमाण काय असावे ? किंवा सरकारी नोकरीतील नेमणुकांचे प्रमाण काय असावे ?— म्हणजे राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गातील एक भयंकर धोंड होऊन बसली आहे... ही प्रचंड धोंड दूर केल्याशिवाय देशाची कोणत्याच दृष्टीने प्रगती होणार नाही. ' ( इं. ॲ. रि., १९२५, I, पृ. ६८ ).

थोडक्यात असे म्हणता येईल की, या निरनिराळ्या दंगलींचा उपयोग उच्चवर्गीय मुसलमानांनी राजकीय व आर्थिक व्यवहारात लोकसंख्येतील प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात प्रतिनिधित्व मिळविण्यासाठी करून घेतला. त्याबरोबरच, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील भिन्नत्वाच्या आधारे, स्वतंत्र व अलग राष्ट्रीय समाज म्हणून मान्यता मिळावी ही त्यांची मागणी कायमच होती. अलग सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या जोपासनेत यश मिळत गेले तसे क्रमाक्रमाने मुसलमानांतील गरीब-श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित इत्यादी भेद यशस्वीपणे झाकले गेले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

पुढील काही दशकांचा इतिहास पाहता असे दिसून येते की, सांस्कृतिक राष्ट्रवादा-धारित दुफळी जास्त जास्त दृग्गोचर होत गेली. परंतु तूर्त आपण आपले लक्ष या काळात काँग्रेस पक्षांतर्गत घडून आलेल्या बदलांवर केंद्रित करू.

**( ड ) स्वराज्य पक्ष आणि प्रतियोगी सहकारिता :** गांधीजींनी १९२४ मध्ये काँग्रेसचा जवळ जवळ त्याग केला. १९२५ सालच्या आपल्या अहवालात काँग्रेसच्या सेक्रेटरींनी म्हटले, ' गेली काही वर्षे मुख्यतः राष्ट्रबांधणीचे विधायक कार्य करीत असलेली काँग्रेस आता पुन्हा प्रामुख्याने राजकीय कार्य करणारी संघटना झाली आहे. रचनात्मक कार्य आता बहुतांशी केवळ त्यासाठीच स्थापन केलेल्या विशेष संस्थांकडे सोपविण्यात आले आहे ' ( इं. ॲ. रि., १९२५, II, पृ. १९ ). पाटणा येथील अ. भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीत २२ सप्टेंबर, १९२५ रोजी ' काँग्रेस राष्ट्रहिताच्या दृष्टीने वाटेल ते सर्व राजकीय कार्य आता हाती घेईल ' असा ठराव केला होताच आणि ' काँग्रेसला आवश्यक वाटतील ते फेरबदल वेळोवेळी स्वीकारून केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळातील कामकाज स्वराज्य पक्षाने घालून दिलेल्या धोरण व कार्यक्रमानुसार चालेल ' असेही त्याच ठरावात पुढे म्हटले होते ( इं. ॲ. रि., १९२६, II, पृ. १७ ).

अशा रीतीने स्वराज्य पक्षाचा राजकीय कार्यक्रम हाच सर्व काँग्रेसचाही कार्यक्रम झाला. परंतु प्रत्यक्ष कार्याला सुरुवात झाली तेव्हा स्वराज्य पक्षातच मतभेद होऊ लागले. विधानसभांतून सरकारच्या अडवणुकीचे धोरण स्वीकारण्याचा दावा स्वराज्य पक्षाने केला होता. पण प्रत्यक्षात काही प्रमुख सभासदांचा कल सरकारने देऊ केलेल्या अधिकाराच्या जागा स्वीकारण्याकडे झुकू लागला. (विशेषतः कानपूरमध्ये पंडित मालवीयांनी घेतलेली भूमिका व तिचे परिणाम यासाठी पहा, इं. ॲ. रि., १९२५, पृ. ३३३–३४०).

या आडमुठ्या अडवणुकीच्या धोरणास विरोध करणारा एक ठळक गट काँग्रेसमध्ये वस्तुतः प्रथमपासूनच होता.. या गटात महाराष्ट्रीय प्रतिनिधींची संख्या विशेषत्वाने होती. योग्य परिस्थितीत सरकारशी सहकार्य करणेच चांगले असे या गटाचे मत होते. या गटाला प्रतियोगी सहकारिता पक्ष असे नाव पडले. त्यात मुख्यत्वेकरून जयकर, अणे, केळकर, मुंजे आदि मंडळींचा समावेश होता.

क्रमाक्रमाने स्वराज्य पक्ष आणि प्रतियोगी सहकारिता पक्ष यांतील मतभेद वाढतच गेले. परिणामी, शेवटी प्रतियोगी सहकारिता पक्षातील लोकांनी काँग्रेसचा त्याग केला (इं. ॲ. रि., १९२६, पृ. ३३, ४३, ४६, ५१, ९४; जयकर, १९५८, प्रकरण ७ वे).

या काळातील काँग्रेसचे राजकारण कमीअधिक प्रमाणात लिबरल वा नेमस्त किंवा बेझंटबाईच्या होमरूल लीगच्या राजकारणाशी मिळतेजुळते होते. मात्र एक ठळक फरक होता. स्वराज्य पक्षाच्या लोकांना सामान्य जनतेचा पाठिंबा असलेल्या काँग्रेससारख्या फार मोठ्या संघटनेचे पाठबळ होते. काँग्रेसची ताकद जनतेने वाढवलेली होती. गांधींच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली या जनतेने अहिंसक लढे दिलेले होते. असे असूनही त्याच पूर्वीच्या शिक्षित उच्चवर्गीयांचे हितसंबंध स्वराज्य पक्ष जपत होता. फरक म्हणजे नेमस्तांना ब्रिटिश साम्राज्यातून फुटून निघायचे नव्हते, स्वराज्य पक्ष मात्र वेळ पडल्यास तेही करायला तयार होता. अर्थात (अंतर्गत स्वायत्ततेसह) वसाहतीचा दर्जा मिळाला असता तरी स्वराज्य पक्षाचे समाधान झाले असते.

**(ई) मजूर संघटना आणि डावे पक्ष :** जातीय दंगे आणि अलग सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या दृढीकरणाच्या दिशेने घरंगळ चालू असूनही लहानलहान सत्याग्रह लोकप्रिय होतच होते. यांपैकी बहुतेक सारे लढे उभय जमातींना समान अशा उद्दिष्टांसाठीच लढले गेले. याशिवाय भारताच्या राजकीय क्षितिजावरती त्या वेळी आणखी एक महत्त्वाची घटना घडत होती. भारतात ‘डावी’ विचारसरणी व संघटना उदय पावत होत्या.

२८ डिसेंबर १९२७ रोजी मद्रासला भरलेल्या ‘रिपब्लिकन काँग्रेस’च्या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणातील विधानाने आपण या विवेचनाची सुरुवात करू

या. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून जवाहरलाल नेहरू म्हणाले, ' असहकाराची चळवळ अयशस्वी झाल्यापासून काँग्रेसचे राजकारण मध्यमवर्गीयांच्या किंवा " बाबू "-लोकांच्या हितसंबंधांभोवती घोटाळत आहे. तिला असलेला सामान्य जनतेचा पाठिंबा कमीकमी होत आहे... एखादी नवी संघटना निर्माण करून काँग्रेसवर जनतेच्या हिताचे दडपण कायम ठेवणे म्हणून आवश्यक झाले आहे. प्रजासत्ताकाचे ध्येय लोकांच्या मनात ठसविण्यासाठी, विशेषतः योग्य तऱ्हेच्या आदर्श प्रजासत्ताकाची कल्पना लोकांच्या मनात ठसविण्यासाठी एका नव्या संघटनेची आवश्यकता आहे ' ( इं. ॲ. रि., १९२७, II, पृ. ३४८ ).

कामगारांचे झगडे आणि संप-हरताळ यांचे प्रमाण बरेच वाढले होते. मात्र त्यातून अजूनपर्यंत डोळ्यांत भरण्याइतकी राजकीय फलनिष्पत्ती झाली नव्हती. कामगार संघटना आणि ट्रेड युनियन परिषदांची सुरुवात १९२१ मध्येच झाली होती. सामाजिक–आर्थिक जीवनातल्या या परिचित, स्थिरपद घटना झाल्या होत्या. लाला लजपतराय यांसारखे पुढारी वैयक्तिक पातळीवर त्या चळवळीत भाग घेत असूनही, काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर प्रभाव पाडण्यात त्यांना एकंदरीत यश मिळाले नव्हते. हीच गोष्ट कॉन्फरन्स ऑफ इंडियन कम्युनिस्ट्स यांच्याबद्दलही म्हणता येईल. त्यांनी आपले पहिले अधिवेशन २६ डिसेंबर, १९२५ रोजी कानपूर येथे भरवले होते.

या सुमारास गांधी राजकीयदृष्ट्या एक प्रकारचे निवृत्त जीवन कंठत होते. तरी, प्रत्येक आणीबाणीच्या व महत्त्वाच्या प्रसंगी त्यांचे मत व अभिप्राय घेतला जात असे. अहिंसेचा जीवननिष्ठा म्हणून स्वीकार काँग्रेसकडून झाला नव्हता, आणि काँग्रेसच्या राजकीय सदसद्विवेकबुद्धीचा ताबा स्वराज्य पक्षाच्या हाती दिलेला होता. असे असले तरी ट्रेड युनियनसारखा किंवा मालक-मजूर झगड्यासारखा महत्त्वाचा प्रश्न आला की गांधींचा विचार घेतला जात असे. थोडक्यात, अद्यापही, गांधी ही राजकीय क्षेत्रातील उपेक्षा करता न येण्याएवढी मोठी शक्ती होती.

श्री. शापुरजी सकलातवाला हे ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद होते. ते कट्टर कम्युनिस्ट होते. भारतातील मजूर संघटनेसंबंधी त्यांचा व गांधींचा पत्रव्यवहार झाला. हा सर्व पत्रव्यवहार १९२७ सालच्या इंडियन ॲन्युअल ( रजिस्टर इं. ॲ. रि., १९२७, I, पृ. ६५ व नंतर, आणि II, पृ. ११७ व नंतर ) मध्ये पहावयास मिळतो. ही पत्रे ' इज इंडिया डिफरंट ? ' या पुस्तिकेच्या रूपाने ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षानेही प्रसिद्ध केलेली आहेत.

या पत्रात गांधींनी अहिंसेच्या सिद्धांताचे, आणि गृहोद्योग व ग्रामोद्योग यांच्या सहाय्याने सहकाराच्या तत्त्वावर विकेंद्रित स्वरूपात उत्पादनाची रचना करून सामान्य जनतेला जागृत व संघटित करण्याच्या इष्टतेचे समर्थन केले आहे. या पत्रव्यवहाराच्या तपशीलात अधिक खोलवर जाण्याचे आपल्याला कारण नाही. परंतु येथेही, ज्या लढ्याच्या

ओघात जनता आपल्या राजकीय कर्तव्यांबद्दल व हक्कांबद्दल जागृत होईल व परिणामी सत्ता जनतेच्या हाती येईल अशा अहिंसक लढ्यासाठी लोकांची तयारी करण्याच्या गांधींच्या प्रयत्नात खंड पडलेला नव्हता या गोष्टीकडे लक्ष वेधता येईल.

गांधींनी काँग्रेस संघटनेला बरोबर घेऊन, तिचा एक घटक सभासद म्हणून कार्य केले होते. त्यानंतर देशव्यापी असहकार चळवळीचे नेतृत्व केले होते. नंतर सामान्य जनतेचे अहिंसात्मक आर्थिक सामर्थ्य संघटित करून कार्यान्वित करण्यासाठी ते काँग्रेस-मधून काहीसे निवृत्त झाले होते. हळूहळू काँग्रेसची उद्दिष्टे आणि कार्यपद्धती नेमस्तांच्या दिशेने झुकत होती. स्वतः गांधींनी ही उद्दिष्टे टाकाऊ मानली होती असे नाही. ती त्यांची स्वतःची ध्येये नव्हती इतकेच. पुन्हा एकवार लढा करण्यापूर्वी जनतेचे अहिंसेच्या आचारविचारात पूर्वशिक्षण झाले पाहिजे असे ते म्हणत. पण त्या तयारीचे कसलेच चिन्ह वातावरणात कोठेच दिसत नव्हते. देशाची अहिंसक लढ्याच्या दृष्टीने मुळीच तयारी नव्हती ही गोष्ट स्पष्ट दिसत होती.

( फ ) **नेहरू-अहवाल आणि नंतर :** जबाबदार प्रातिनिधिक शासन प्रस्थापित करण्याच्या दिशेने आणखी कोणकोणत्या घटनात्मक सुधारणा करणे इष्ट व शक्य आहे त्याची पाहणी करून शिफारशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षते-खाली १९२७ साली एका कमिशनची स्थापना केली. बहुतेक राजकीय पक्षांनी या कमिशनवर बहिष्कार घालण्याचे ठरवले. या संघात १९ मे १९२८ रोजी एक 'सर्व-पक्षीय परिषद' स्थापन करण्यात आली आणि निरनिराळ्या राजकीय मतप्रणालींच्या पुढाऱ्यांवर 'भारताची घटना कशी असावी याचा विचारविनिमय करण्याची व घटनेची तत्त्वे ठरविण्याची' कामगिरी सोपविण्यात आली. श्री. मोतीलाल नेहरू समितीचे अध्यक्ष आणि श्री. तेजबहादुर सप्रू, अली इमाम, प्रधान, शुऐब कुरेशी, सुभाषचंद्र बोस, माधवराव अणे, ना. जयकर, ना. म. जोशी आणि मंगलसिंग हे सभासद होते.

या नेहरू-अहवालाची चर्चा सर्वपक्षीय परिषदेच्या अधिवेशनात ऑगस्ट, १९२८ मध्ये लखनौ येथे व पुढे डिसेंबर, १९२८ मध्ये कलकत्ता येथे झाली. या दोन्ही चर्चा-सत्रांत, या बाबतीत निरनिराळ्या पक्षांत गंभीर मतभेद आहेत हे उघड झाले. या बाबतीत एकमेकांची मते समजावून घेऊन सर्वसंमत मसुदा पुढे मांडण्याचा सर्वांनीच आटोकाट प्रयत्न केला तरीही मतभेद मिटले नाहीत.

मुस्लिमांचा फुटीर राष्ट्रवाद एव्हाना चांगलाच दृढ रुजला होता. इतर धर्मीयांच्या व अन्य काही जमातींच्या मनासही पृथगात्म सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या विचारांची कीड लागलेली होती. तरुण वर्ग एक तर डावीकडे झुकत होता किंवा अहिंसक मार्गाच्या

धिक्काराकडे वळत होता. अहिंसेचा आश्रय हे काँग्रेसचे तात्पुरते धोरण होते. गांधींच्या बाबतीत ती अंतिम निष्ठा होती.

वरील विधानांच्या पुष्ट्यर्थ पुढील तीन पुरावे देता येतील.

( १ ) आपणास लोकसंख्येतील प्रमाणाहून जास्त, विशेष प्रतिनिधित्व मिळावे ही मुसलमानांची मागणी व्यवहाराला धरून अधिकाधिक प्रमाणात मान्य करण्याचा प्रयत्न एकीकडे नेहरू-समिती करीत असतानाच, दुसरीकडे आक्रमक पॅन-इस्लामिक भूमिकेचा उघडउघड पुरस्कार करणारा एक गट महंमद अलींच्या नेतृत्वाखाली मुसलमानांमध्ये संघटित झालेला होता. डिसेंबर १९२८ मध्ये अ. भा. खिलाफत परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना महंमद अलींनी पुढील उद्गार काढले : 'माणसे ईश्वराने निर्मिली तर राष्ट्रे सैतानाने तयार केली... सर्व मानवांनी एका विशाल कुटुंबात एकत्र यावे, त्यांचा एकच एक समाज बनावा म्हणून ईश्वराने इस्लामची निर्मिती केली. माझी अशी इच्छा आहे की, हिंदू, खिश्चन, ज्यू, भुताखेतांची पूजा करणारे, सर्वांनीच माझ्या पाठीमागे ( इस्लाममध्ये ) यावे आणि एकात्म जीवन व भ्रातृसमाज निर्माण करावा असे आवाहन मी करतो. कोणत्याही प्रकारच्या सक्तीशिवाय, दंडेलीशिवाय, हिंसेशिवाय, फसवणुकीशिवाय आणि नेहरू-रिपोर्टाच्या बाजूने केल्या जाणाऱ्या खोट्या, भ्रामक प्रचारासारख्या प्रचाराशिवाय सर्वांनी इस्लामला आलिंगन द्यावे' ( इं. अॅ. र., १९२८ II, पृ. ४०३ ).

'द नॅशनल लिबरल फेडरेशन'चे अध्यक्ष सर चिमणलाल सेटलवाड यांनी ३० डिसेंबर १९२८ रोजी अलाहाबाद येथे केलेल्या भाषणात नेमस्तांची भूमिका व्यक्त झाली आहे. ते म्हणतात, 'नेहरू-समितीने आपल्या शिफारशींमध्ये जातीय प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे... या प्रश्नाने त्याच्या वास्तविक परिमाणापेक्षा फारच मोठे स्वरूप धारण केले आहे. या प्रश्नाशी निगडित असलेले प्रमुख समाज म्हणजे हिंदू आणि मुसलमान. ते अलग असून त्यांना विभक्त वागणूक मिळावी या तत्त्वाला १९०९ मध्ये मान्यता मिळाली आणि १९१६ च्या लखनौ कराराने त्यावर शिक्कामोर्तब केले. त्या करारावर सही करणाऱ्या हिंदू किंवा मुसलमान पुढाऱ्यांची अशी कल्पना होती की, विभक्त मतदारसंघ ही बाब तात्पुरती ठरेल व केवळ कायदे मंडळांपुरतीच सीमित राहील. त्या वेळच्या तात्कालिक सामाजिक विकृतीवरील इलाज म्हणूनच त्यांनी विभक्त मतदारसंघाची कल्पना स्वीकारली. त्यांची अशी खात्री होती की, राष्ट्रीय ऐक्याची वाढ झाली की ही अनैसर्गिक पृथगात्मता नष्ट होईल. दुर्दैवाने ही फुटीर वृत्ती एखाद्या तणासारखी फोफावली आहे. ती आता नगरपालिका, लोकल बोर्डे यांत शिरली असून कित्येक ठिकाणी तर तिने शैक्षणिक क्षेत्रावरही आक्रमण केल्याचे दिसत आहे. हीच कीड युरोपियन, अॅंग्लो-इंडियन, शीख, ब्राह्मणेतर, अस्पृश्य व इतर अनेक समाजांत

व जातींत पसरली आहे. अधिकच दुर्दैवाची गोष्ट अशी की, ही विभक्तपणाची जाणीव सरकारी नोकऱ्यांच्या क्षेत्रातही घुसली आहे. त्यामुळे पात्रता, कार्यक्षमता किंवा राष्ट्राची गरज या कसोट्या गौण ठरल्या आहेत. सार्वजनिक सेवा व प्रशासनाचा दर्जा घसरण्यात याचा अनिवार्य परिणाम झाला आहे. याचा आणखी पुढचा परिणाम म्हणून राष्ट्रीय चारित्र्य हिणकस आणि दुबळे झाल्याखेरीज राहणार नाही' (इं. ॲ. र, १९२८, II, पृ. ३८७).

(३) पहिली अ. भा. समाजवादी युवक कॉंग्रेस कलकत्त्याला जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली २० डिसेंबर १९२८ रोजी भरली होती. तेथे निरनिराळे अनेक ठराव संमत करण्यात आले. त्यांतील एक पुढे दिला आहे : 'या कॉंग्रेसचे असे मत आहे की, केवळ वसाहतीचे स्वातंत्र्य नव्हे तर, संपूर्ण स्वातंत्र्य हेच भारतापुढील पहिले व तातडीचे उद्दिष्ट आहे. राजकीय स्वातंत्र्य हा आमचा अंतिम आदर्श नाही. या देशात साम्यवादी (कम्युनिस्टिक) समाज निर्माण करण्यासाठी एक प्राथमिक आवश्यकता म्हणूनच केवळ आम्हाला राजकीय स्वातंत्र्य हवे आहे. नेहरू-समितीचा अहवाल आम्ही पूर्णपणे फेटाळून लावीत आहोत. ज्या अनेक कारणांसाठी तो अहवाल आम्ही फेटाळून लावीत आहोत, त्यांतील एक कारण असे की, त्या अहवालाने तथाकथित वसाहतीची स्वायत्तता (डोमिनियन स्टेटस) प्रस्थापित करण्याच्या मुद्द्यावरून येथील बूर्झ्वा वर्गास ब्रिटिश साम्राज्यवाद्यांशी हातमिळवणी करण्यास मोकळीक दिली आहे. या हातमिळवणीतून प्रस्थापित जमीनदारी, भांडवलदारी व सरंजामदारी हितसंबंध अधिक पक्केपणी जपले जाणार असून जनतेच्या हिताचा बळी दिला जाणार आहे' (इं. ॲ. र., १९२८, II, पृ.४५४).

गांधींनी नेहरू-समितीच्या अहवालाला सशर्त मान्यता दिली. त्यावरून गांधी व एक विख्यात युरोपियन शांततावादी ( B. de Ligt ) यांच्यात वाद सुरू झाला, तो बराच उद्बोधक आहे. गांधींनी वरील अहवालाला मान्यता दिल्याचे वृत्त वाचून त्यांनी गांधींना एक पत्र पाठवले. यंग इंडियाच्या ३० जाने. १९३० च्या अंकात प्रसिद्ध केलेले ते पत्र पुढीलप्रमाणे होते : 'पाश्चात्य राष्ट्राच्या नमुन्याबरहुकूम हिंदुस्थानात राष्ट्रवादी राज्यसत्ता स्थापन करण्याच्या बेतामध्ये आपण आपली संमती देऊन सहभागी व्हावे या गोष्टीलाच माझा विरोध आहे. आपली ही कृती टॉलस्टॉय यांच्या विचारांपासून फार दूर जाणारी आहे. बूर्झ्वा धोरणातून काय साध्य होऊ शकेल याविषयी आपण फाजील विश्वास बाळगीत आहात... स्वायत्त वसाहतीचा दर्जा मिळविण्यासाठी आज तुम्ही आपले सारे सामर्थ्य पणाला लावीत आहात. तुमच्याच देशातील लक्षावधी सामान्य लोकांच्या हिताविरुद्ध व उच्चवर्गीयांच्या स्वार्थासाठी स्वायत्त वासाहतिक राज्यसत्तेचा वापर होणे अटळ आहे. भारतातील उच्च वर्ग दिवसेंदिवस परदेशांतील उच्चवर्गीयांशी

घनिष्ठ संबंध प्रस्थापित करील... तुमचा देश शस्त्रसज्ज होऊ लागताच शस्त्रास्त्रांसाठी तो आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीचा व मोठमोठ्या पाश्चात्य बँकांचा मिंधा होईल. तुमच्या देशातील उद्योगधंद्यांचा विकास करावयाचे राज्यसत्तेने ठरविले की तुमच्या देशातील हा सत्ताधारी वर्ग लगेच देशाबाहेरच्या आर्थिक सत्तांना निमंत्रण करील. स्वाभाविकच, तुमच्या देशबांधवांच्या पायांत आर्थिक दास्याच्या जड शृंखला पडतील... आमच्या दृष्टीने म्हणाल तर, कोणत्याही प्रकारे युद्धाच्या तयारीत भाग घेण्याचे, शस्त्रांचा वापर करण्याचे आम्ही नाकारतो... जरा आर्थिक काटेकोर शब्दांत सांगावयाचे तर आम्ही एक वेळ आमचे राष्ट्रीय स्वातंत्र्यही गमावू– आणि हे स्वातंत्र्य तरी कसले ? ते मायावी असल्याचे प्रत्यही सिद्ध होत चालले आहे— पण ते युद्धाच्या मार्गाने टिकवून धरणार नाही ' ( यं. इं., ३०-१-१९३०, पृ. ३३ ).

## १९३० मधील घडामोडी

अशा रीतीने सर्वच प्रश्न एकंदरीत हळूहळू सुस्पष्ट, रेखीव, ठाम बनत चालले होते. वातावरण स्फोटक बनत चालल्याची चिन्हे अधिकाधिक दिसू लागली होती. गांधींना, व त्यांच्याप्रमाणेच सविनय कायदेभंगावर विश्वास ठेवणाऱ्यांना, प्रत्यक्ष कृती करण्याचे आव्हान देणारी परिस्थिती निर्माण झाली.

प्रथमतः १९२८ व १९२९ मध्ये औद्योगिक कलह वारंवार होऊ लागले. अशा प्रकारच्या एका संघर्षाने जमशेटपूर ग्रासले गेले होते. त्याच वेळी मुंबईच्या कापड-गिरण्यांत आणि कलकत्त्याजवळील लिलुआ व बामुनागाछी येथील रेल्वे वर्कशॉपमध्ये गंभीर कलह उपस्थित झाले.

या सर्वांच्या जोडीला सशस्त्र क्रांतिवादी राष्ट्रवादानेही आक्रमक पवित्रा घेण्यास सुरुवात केली. १९२४ मध्ये अ. भा. काँग्रेस कमिटीपुढे आलेल्या एका ठरावावरून झालेल्या पराभवाच्या वेळीच गांधींना वारे कोणत्या दिशेने वहात आहेत याची जाणीव झाली होती.

गोपीनाथ साहा नावाच्या एका तरुण क्रांतिकारकाने एका इंग्रज इसमाला ठार मारले होते. त्यासाठी गोपीनाथला फाशी देण्यात आले होते. अहमदाबाद येथील अ. भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीत गोपीनाथच्या देशभक्तीचा गौरव करणारा एक ठराव मांडण्यात आला होता. या ठरावाच्या संदर्भात गांधींनी ' पराभूत व चीतपट ' या शीर्षकाने एक लेख लिहिला, त्यात ते म्हणतात, '...चारही ठरावांच्या वेळी माझ्या बाजूला जेमतेम मताधिक्य होते इतकेच; पण खरोखर मी ते अल्पमतच मानले पाहिजे... गोपीनाथ साहावरील ठरावाने वस्तुस्थिती प्रकट केली. त्या ठरावाच्या बाजूने

झालेली भाषणे, ठरावावरील मतदान आणि ठराव पसार झाल्यानंतरचा जल्लोष या सगळ्यांनी माझ्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. वरकरणी श्री. दास यांचा आठ मतांनी पराभव झाला पण वास्तविक विजय त्यांचा आहे. एकूण १४८ मतांपैकी ७० मते त्यांच्या बाजूने पडावीत, इतक्या मतांचा पाठिंबा त्यांना मिळावा या घटनेत माझ्या मते फार मोठा अर्थ भरलेला होता. खरे लोकमानस काय आहे ते ठरावावरील मतदानाच्या या प्रकाशात मला स्पष्ट झाले' (यं. इं., ३-७-१९२४, पृ. २१७).

नंतरच्या काळात देश अधिकाधिक जातीय वैमनस्याकडे झुकू लागला. इंग्रज राज्यकर्त्यांपुढे एकसंध फळी उभी करण्यासाठी आपापसातील मतभेद मिटवून समझौता करण्यात सतत अपयश येऊ लागले, तसतसा हा हिंसक राष्ट्रवाद अधिकच प्रबळ होऊ लागला. हिंसक संप्रदाय कधी हिंदू पुनरुज्जीवनवाद्यांशी तर कधी डाव्या वा इतर पाश्चिमात्य विचारसरणीशी हातमिळवणी करताना आढळू लागला.

सायमन कमिशनच्या विरोधासाठी देशभर झालेल्या प्रचंड उग्र निदर्शनांत लाहोर येथे ३० ऑक्टोबर १९२८ रोजी पोलिसांनी लाला लजपतराय यांच्यावर निर्घृण हल्ला केला. परिणामतः ते १७ नोव्हेंबर रोजी मृत्यू पावले. यानंतर महिन्याने, १६ डिसेंबर रोजी, लाहोर शहरात क्रांतिकारकांनी आय. पी. सॉंडर्स या पोलिस अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार मारले. व्हाइसरॉय प्रवास करीत असलेली एक आगगाडी उलथून देण्याचाही प्रयत्न झाला. पुढे ८ एप्रिल १९२९ रोजी दिल्लीला केंद्रीय कायदेमंडळात बाँब टाकण्यात आले.

जनतेत असंतोष किती खोल व सर्वत्र पसरला आहे हे लाहोर कट खटला आणि सॉंडर्स खून खटला यांनी दाखवून दिले (इं. ॲ. र., १९२९, II, पृ. २५-२७). देशातील तरुण कोणत्या दिशेने वाटचाल करीत होते या गोष्टीची सूचनाही वरील दोन प्रकरणांवरून मिळत होती. मे, १९२९ मध्ये मीरत कट खटला सुरू झाला. एक स्वतंत्र गट म्हणून कम्युनिस्टांची दखल घेतली जाण्याची ही पहिलीच वेळ होती. हिंदी राजकारणाच्या रंगमंचावर कम्युनिस्टांचा प्रवेश मीरत कट खटल्याने झाला. सप्टेंबर १९२९ मध्ये जतीन दास नावाच्या क्रांतिकारकाने तुरुंगात कित्येक दिवस अन्नत्याग करून मृत्यूला कवटाळले. कलकत्त्यात त्याची प्रेतयात्रा इतकी प्रचंड निघाली की, तेवढी मोठी प्रेतयात्रा त्यापूर्वी कलकत्त्याने एकदाच, १९२५ मध्ये देशबंधू चित्तरंजन दास यांचीच पाहिली होती.

स्वराज्य पक्षाच्या उत्कर्षापासून गांधी राजकारणात सक्रिय भाग घेण्यापासून दूर राहिले होते. देशाच्या राजकारणाला लागत चाललेले हिंसक वळण हे गांधींना आव्हान होते. देशातील तरुण काँग्रेसच्या राजकारणाला कंटाळले होते. त्या राजकारणात क्रांतिकारक जहालपणा अजिबात उरला नव्हता. क्रांतिकारक हुतात्म्यांबद्दल जो पूज्यभाव

लोक मूकपणे व्यक्त करीत होते त्यानेसुद्धा तत्कालीन लोकमानसावर चांगलाच प्रकाश पडत होता. अहिंसा व अहिंसेचे प्रतीक म्हणून चरख्यावरील अतिरेकी अवलंबन यांचे राजकारणात रस असलेल्या लोकांना फारच थोडे आकर्षण राहिले होते, असे दिसत होते.

१९३० च्या लाहोर अधिवेशनात कॉंग्रेसने ' संपूर्ण स्वातंत्र्य ' हे आपले उद्दिष्ट असल्याचे घोषित केले. तत्पूर्वी ' स्वराज्य ' हे कॉंग्रेसचे ध्येय होते. स्वराज्याचा अर्थ भिन्न भिन्न प्रकारे केला गेला होता. ' संपूर्ण स्वातंत्र्या 'चा ठराव स्वतः गांधींनीच मांडला होता. त्याला सुभाषचंद्र बोसांनी एक उपसूचना मांडली. संपूर्ण स्वातंत्र्याचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने ताबडतोब प्रतिसरकार स्थापन करावे व सविनय कायदेभंगाची चळवळही लगेच हाती घ्यावी, अशी ती सूचना होती. ही उपसूचना स्वीकारली गेली नाही (इं. ॲ. र., १९२९, II, पृ. ३०२). उपसूचनेवर बोलताना गांधींनी सांगितले की असे काही करता येईल इतकी आपली पक्षसंघटना तयार नाही. त्यामुळे, ताबडतोब काही तरी करण्याच्या मोहात कोठेतरी भरकटत जाण्यापेक्षा देशाने सावधगिरीनेच पावले टाकावीत, असे त्यांचे मत होते.

संपूर्ण स्वातंत्र्याचा मूळ ठराव संमत झाला. तो अमलात आणण्यासाठी हाती घ्यावयाच्या सर्व कार्यक्रमांसाठी गांधींच्या हाती सर्वाधिकार सोपवण्यात आले. अहिंसक मोहीम उभारण्याची ही एक संधी होती. देशाची मनःस्थिती लढ्याला अनुकूल व उत्सुक होती. मिठावरील निर्बंध नाट्यपूर्णरीत्या मोडून सविनय कायदेभंगाचा आरंभ करावयाचे गांधींनी ठरवले. गरीब, श्रीमंत, हिंदू, मुसलमान, मजूर, मालक असा कोणताही भेद न करता, सर्वांवरच मिठाच्या कायद्याचा भार पडत होता. शिवाय मिठासारख्या अगदी प्राथमिक प्राणभूत गरजेच्या वस्तूवर कर बसवणारा कायदा अनैतिक आहे, असे गांधींचे कित्येक वर्षांचे मत होते.

ही मोहीम आखताना युद्धनीतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या गोष्टी गांधींनी विचारात घेतल्या. या मोहिमेचा आराखडा तयार करताना त्यांनी ज्या गोष्टींना महत्त्व दिले त्या म्हणून विशेष बारकाईने पाहणे आवश्यक आहे. १९२० सालच्या असहकार चळवळीच्या वेळी ' जनते 'च्या हिंसाचारामुळे चळवळ सत्याग्रहाच्या मार्गापासून च्युत झाली होती. चौरीचौरा येथील वृत्त कळताच ते माघारी फिरले होते. ' चौरीचौरा प्रकरणात कॉंग्रेस व खिलाफत चळवळीचे कार्यकर्ते यांचे हात बरबटलेले होते ' हे कारण देऊन त्यांनी आंदोलन मागे घेण्याच्या आपल्या कृतीचे नंतर समर्थन केले होते ( सिलेक्शन्स, क्र. ६३०, ६३१ ). प्रस्तुत प्रसंगीसुद्धा जनतेच्या हातून हिंसक कृत्ये घडण्याची शक्यता होती. जनतेकडून या बाबतीत आपण ज्या शिस्तीची व संयमाची अपेक्षा करतो त्याची लोकांना आता चांगलीच कल्पना आलेली आहे, अशी गांधींना आशा वाटत होती.

याखेरीज आणखी एक कारण होते, ते त्यांच्या स्वतःच्याच शब्दांत देणे उचित ठरेल :

'सशस्त्र हिंसेच्या मार्गाचा अवलंब करावा असे मानणारा एक पक्ष देशात आहे यात शंका नाही. या पक्षाचे सामर्थ्य वाढत आहे. काय वाटेल ते मोल द्यावे लागले तरी ते देऊन देश स्वतंत्र करावा या एका ध्येयाने वेडे बनलेल्या, गुप्तपणे, मूक राहून जिद्दीने धडपड करणाऱ्या तरुण-तरुणी माझ्या डोळ्यांसमोर आहेत. पराकोटीच्या सर्वस्व-त्यागाची आपल्यातील सर्वोत्तमांकडून मागणी करणारा कार्यक्रम देशापुढे आहे अशी त्यांची खात्री झाल्याशिवाय ते कोणाचेही कोणतेच म्हणणे ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत' (यं. इं., २३-१-१९३०, २८). थोडक्यात असे म्हणता येईल की, सशस्त्र क्रांतिवादाचा आविष्कार हे आपल्या अहिंसेला दिलेले आव्हान आहे असे गांधींना वाटत होते. 'वातावरणात द्वेष भरलेला आहे यात शंकाच नाही. त्याची वेळीच दखल घेतली नाही व त्याला अन्य मार्ग काढून दिला नाही तर त्याचा विनाशक स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही' (कित्ता, २९). 'या सुप्त, अनिर्बंध, जीवनविनाशक शक्तीचे रूपांतर शिस्तबद्ध, जीवनसंवर्धक सामर्थ्यामध्ये करण्याचा सविनय कायदेभंग हा एकमेव आणि रामबाण उपाय आहे, आणि या उपायात शंभर टक्के यशाची खात्री आहे' (यं. इं., २७-३-१९३०, पृ. १०८).

त्याबरोबरच गांधींना आता असेही वाटू लागले की, 'अशी चळवळ फार आधीच हाती घ्यायला हवी होती याविषयी मला संदेह नाही' (यं. इं., ३०-३ १९३०, पृ. ९९).

काही निवडक स्वयंसेवक घेऊन मोहीम तावडतोब सुरू करावी व लोकांपुढे शूर सामूहिक अहिंसक कृतीचे प्रत्यक्ष उदाहरण उभे करावे ही गांधींची या वेळी नीती होती, असे स्पष्ट दिसते. या मोहिमेचा इतरत्र कृती करणाऱ्यांना नमुना म्हणून उपयोग होणार होता, आणि शिवाय हिंसक शक्तीच्या शिडातली हवा काढून घेता येणार होती.

मीठ-सत्याग्रहाच्या मोहिमेची सुरुवात स्वतः गांधींनी १२ मार्च १९३० रोजी साबरमतीपासून समुद्रापर्यंतच्या २४१ मैलांच्या पदयात्रेने केली. त्यांच्याबरोबर ७९ सहकारी होते. याच वेळी सबंध देशभर मिठाचा सत्याग्रह करण्याची योजना काळजी-पूर्वक आखली होती. तसेच समुद्रकिनारा नसलेल्या ठिकाणी शांततामय निदर्शनांना बंदी करणारा हुकूम मोडण्याची, मद्य व परदेशी कापड विकणाऱ्या दुकानांवर निरोधने करण्याची जय्यत तयारी केली होती. सर्व हिंदुस्थान श्वास रोखून उभा होता. ६ एप्रिल १९३० रोजी गांधींनी दांडीच्या किनाऱ्यावर चिमुटभर मीठ तयार करून मिठावरील

निर्बंधाचा प्रतीकात्मक भंग केला. तत्क्षणी साऱ्या देशाने अद्वितीय उत्साहाने स्वतःला या लढ्यात झोकून दिले.*

चळवळीचे यश अभूतपूर्व होते. क्वचित कोठे शिस्तभंग झाला असेल–नसेल. या सर्व चळवळीच्या काळात एकंदर सुमारे १ लक्ष लोकांनी तुरुंगवास पत्करला. १९२० च्या असहकाराच्या चळवळीत ही संख्या फक्त तीस हजारांच्या आसपास होती.

चळवळीच्या उत्तरार्धात गांधींनी घेतलेला एक अत्यंत धाडसी पवित्रा, हे या मीठ-सत्याग्रहाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणायला हवे. पहिल्या काही दिवसांनंतर सत्याग्रहाला फारच ठरीव स्वरूप आले. स्वयंसेवकांना अटक करणे, मारहाण करणे, खटला भरून तुरुंगात रवानगी करणे, या गोष्टींची अगदी चाकोरी बनली. सत्याग्रह्यांची कोंडी झाली. ही कोंडी फोडण्यासाठी गांधींनी वेगळाच डाव टाकला. सरकारच्या क्रौर्याची कसोटी पाहण्यासाठी साध्या सत्याग्रहाऐवजी धरसाणा व वडाळा येथील मिठाच्या सरकारी गुदामांवर ' अहिंसक धाडी ' घालण्याचे त्यांनी ठरवले ( इं. ॲ. र., १९३०, पृ. ११२--११९ ) म्हणजे आता केवळ अटक करून भागणार नव्हते तर सरकारला बंदूक चालवण्याचे आव्हान होते.

वरील पेचात सापडलेल्या सरकारने प्रत्यक्ष गोळ्या घातल्या नाहीत; पण चालून येणाऱ्या सत्याग्रही स्वयंसेवकांवर निर्घृण लाठीहल्ला करून धाडी परतवून लावण्यास सुरुवात केली. भारतातील ही अपूर्व चळवळ पाहण्यासाठी युरोपियन बातमीदार मोठ्या संख्येने आलेले होते. त्यांच्यादेखत निःशस्त्र स्वयंसेवकांवर गोळ्या घालण्याने ब्रिटिश सरकारची अब्रू जाणार होती. त्यांच्यादेखत गोळ्या न घालण्याइतके सरकार मुरब्बी होते, परंतु जेथे लष्कराकरवी वृत्तबंदी लादता येत होती, तेथे ठार मारण्याच्या हेतूने गोळीबार करण्यास ब्रिटिश सोजिरांनी पर्वा केली नाही.

या लढ्यामध्ये आणखी एक गोष्ट नव्यानेच घडली. एकीकडे फुटीर मुस्लिम राष्ट्रवाद अधिकाधिक दृढ होत होता त्याच काळात वायव्य सरहद्द प्रांतातील पठाण शेतकऱ्यांमधून एक नवीन शक्ती उदयास आली. येथील ग्रामीण जनता जवळपास सर्वस्वी मुसलमान असून पिढ्यान्‌पिढ्या खून, मारामाऱ्या आणि लुटालूट यांना येथील टोळीवाले सरावलेले होते. या अत्यंत युद्धखोर पठाण टोळ्यांपैकी एका टोळीचे खान अब्दुल गफारखान हे मुख्य होते. त्यांनी या हिंसक पठाणांतूनच अहिंसक तंत्राच्या शिस्तीत मुरलेल्या स्वयंसेवकांची संघटना घडविण्याचा प्रयत्न केला. या स्वयंसेवकांना

* अधिक तपशीलवार माहितीसाठी पाहा : **सीतारामय्या**, I, पृ. ३६२ व पुढे, **तेंडुलकर**, III, पृ. १--२१८; इं. ॲ. र., १९३०, I, पृ. ८१–१६०; तसेच प्रमथनाथ मुखोपाध्यायांनी केलेले मूल्यमापन पाहावे. ( इं. ॲ. र., १९३०, पृ. ५५–८० (b) ).

' खुदाई-खिदमतगार ' नाव होते. त्यांनी दारूच्या दुकानांपुढे पूर्ण अहिंसक शिस्तीने निदर्शने करून सत्याग्रहात भाग घेतला. निदर्शने पूर्णतया शांततापूर्ण असूनही लष्कराने गोळीबार केला आणि सुमारे २००–३०० लोक प्राणास मुकले. सबंध पेशावर जिल्हा काही काळ लष्करी टाचेखाली होता.

तरीही लढा चालूच राहिला. खेडेगावातील जनतेने अतुलनीय धैर्य व संयम दाखविल्याचे अनेक प्रसंग या चळवळीत घडले. ' पेशावर चौकशी समिती 'च्या अहवालातील पुढील प्रकरण मुद्दाम पाहण्यासारखे आहे. ' खुदाई-खिदमतगारांच्या महंमद नकीबखान या दस्ता-नायकाला झालेल्या कमालीच्या मारहाणीचे वर्णन करणे अशक्य आहे. त्याचे कुडते आधीच ओरबाडून काढले होते. त्याला त्याचा पायजमाही काढण्याचा हुकूम देण्यात आला. तेव्हा मात्र त्याने जवळच असलेल्या आपल्या घराकडे धाव घेतली. अर्थात प्रतिहल्ल्यासाठी तो घरात असलेले पिस्तूल आणण्यासाठी धावला होता. पण तेवढ्यात स्वयंसेवकांचा सेनापती रब्नवाझखान याने ओरडून विचारले, " थांब; तुझा संयम एवढ्यातच संपला काय, की तू हिंसेने प्रतिकार करायला उद्युक्त झालास ? मृत्यू आला तरी काँग्रेसच्या तत्त्वाप्रमाणे अहिंसा सोडणार नाही अशी शपथ तू घेतली होतीस, त्याचे स्मरण कर. ' हे ऐकताच तो ओशाळ्याने व अनवाणी परत फिरला. त्याच्या हातात काहीच नव्हते. नंतर शिपायांनी त्याला अटक केली ' ( पेशावर इन्क्वायरी कमिटी रिपोर्ट, १९३०, ४० ).*

वरील प्रकारच्या धैर्याची उदाहरणे बंगालमध्येही पाहावयास मिळाली. तेथे अविचल निर्धार दाखविण्याची शेतकऱ्यांत जणू स्पर्धाच लागली होती. ( उदहरणार्थ, पाहा बोस, १९५८, पृ. ५९–६३ ).

चळवळ अशा रीतीने जानेवारी १९३१ पर्यंत वाढत गेली. देशातील नेमस्त पुढाऱ्यांनी सरकारला धोक्याचे इशारे वेळोवेळी दिले ही महत्त्वाची गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. गोलमेज परिषद घेऊन चळवळीवरून देशाचे लक्ष काढून घ्यावे असा प्रयत्न सरकार करीत होते. श्री. चिमणलाल सेटलवाड व श्री. कावसजी जहांगीर ( ज्यूनियर ) यांच्या सहीने निघालेल्या पत्रकात म्हटले होते : ' व्यापारी व उद्योगपती या वर्गातील मंडळीसुद्धा आता कायदेभंगाच्या सत्याग्रहाला उत्तेजन देताना दिसतात हे पाहून सरकार उघडच बुचकळ्यात पडले आहे. यामागील उघड गुपित असे आहे की, या वर्गांचा-

* अशा धीरोदात्त वर्तनाने ब्रिटिश सोजिरांच्या हृदयाला पाझर फुटला नाही तरी गढवाल रेजिमेंटच्या भारतीय सैनिकांनी मात्र निःशस्त्र सत्याग्रह्यांवर गोळ्या झाडण्याचे नाकारले. परिणामतः त्यांच्यावर खटले भरून त्यांना दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.

सुद्धा आपल्याला प्रचलित शासनव्यवस्थेखाली न्याय्य वागणूक व उत्तेजन मिळेल यावरचा विश्वास उडत चालला आहे ' ( इं. ॲ. र., १९३०, I, पृ.१२२ ).

१९३१ च्या प्रारंभी गांधींना व कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या इतर सभासदांना मुक्त करण्यात आले. लंडनमध्ये होऊ घातलेल्या गोलमेज परिषदेत कॉंग्रेसला भाग घेता यावा हा यामागील उद्देश होता. सरकार व कॉंग्रेस यांमध्ये एक तात्पुरता शांतता-तह ( गांधी-अर्विन करार ) झाला. कॉंग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून गांधी इंग्लंडला गेले. या परिषदेतून राजकीयदृष्ट्या काहीच निष्पन्न झाले नाही. मात्र गांधींनी या संधीचा उपयोग भारताच्या भावी आर्थिक व राजकीय राज्यघटनेसंबंधीच्या आपल्या मूलग्राही कल्पना स्पष्ट मांडण्यासाठी करुन घेतला ( सिलेक्शन्स, क्र. ३२५, आणि प्रकरणे ७ ते १० ). पण या बाबतीत गांधी कॉंग्रेसच्या अधिकृत ध्येयधोरणाचे प्रतिनिधित्व किती प्रमाणात करीत होते याविषयी शंकाच आहे. स्वतःच्या वैयक्तिक आशा-आकांक्षांचाच त्यात अधिक आविष्कार होता असे म्हटले पाहिजे.

भारतात परतल्यावर कायदेभंगाची चळवळ गांधींनी पुन्हा सुरू केली. कारण प्रत्यक्ष गोलमेज परिषदेचे कामकाज चालू असतानासुद्धा, राजकीय समझौता दृढ करण्याचे प्रयत्न करण्याऐवजी, “ शांतता व सुव्यवस्था ” राखण्याच्या निर्धाराने दडपशाही-दंडुकेशाहीचे सत्र भारत सरकारने ( नव्या व्हाइसरॉयच्या नेतृत्वाखाली ) पुनरपि अंगिकारले होते.

गांधींना पुन्हा तुरुंगात डांबण्यात आले. १९३२ नंतर दोन वर्षे सत्याग्रहाची मोहीम जोरदारपणे चालू होती. त्यानंतर तिचा जोर बराचसा ओसरला. ब्रिटिश सरकारनेही काही घटनात्मक सुधारणा जाहीर केल्या. अस्पृश्यांना देऊ केलेल्या राखीव जागा व विभक्त मतदारसंघ हा या सुधारणांचा एक भाग होता. अस्पृश्यांना वेगळे प्रतिनिधित्व देऊन हिंदूंतच फूट पाडण्याचा सरकारचा डाव होता. १९०९ मध्ये हिंदूंविरुद्ध मुसलमान अशी फूट पाडण्यासाठी योजलेली नीतीच परत एकवार अंगीकारली गेली होती. अस्पृश्यांचे विभक्त मतदारसंघ मान्य केल्यास राष्ट्रीय एकात्मतेवर वज्राघात होणार हे स्पष्ट ओळखून गांधींनी तुरुंगातच प्राणांतिक उपोषणाला सुरुवात केली.

गांधींचे हे उपोषण स्वतःच्या सवर्ण हिंदू देशबांधवांच्या विरुद्धच होते. देशातील सवर्ण हिंदू जनतेला त्यांनी आवाहन केले की, तिने आपण होऊनच पददलित समाजावरील अन्याय दूर करावा म्हणजे हिंदू-हिंदूंतच फूट पाडण्याचे साधन सरकारला मिळणार नाही. या उपोषणामुळे देशातील राष्ट्रीय पुढाऱ्यांची मने द्रवली आणि कमालीच्या थोड्या अवधीत त्यांनी आपापसात एक करार केला. इंग्लंडच्या पंतप्रधानांना जातीय निवाडा मागे घेणे भाग पडले.

गांधींना त्यांच्या शिक्षेची मुदत संपण्यापूर्वीच, ८ मे १९३३ रोजी, तुरुंगातून

सोडण्यात आले. तुरुंगातून सुटल्यावर गांधींनी गेली चार वर्षे चाललेल्या चळवळीचा आढावा घेतला. या संदर्भात, चळवळीत त्यांच्याबरोबर कार्य करणाऱ्या बहुतेक पुढाऱ्यांना त्यांचा अहिंसेविषयी इतका आग्रह का याचे खरे कारण उमगलेच नव्हते, अशी निःसंदिग्ध कबुली त्यांनी दिली. काही तरी करून ब्रिटिश सत्ता संपुष्टात आणणे यातच त्यांना रस होता, तर गांधींच्या दृष्टीने ती एक किरकोळ बाब होती. जनशक्तीची संघटना, हेच त्यांचे खरे ध्येय होते. म्हणूनच त्या पुढाऱ्यांचा व आपला मार्ग भिन्न होण्याची वेळ फार दूर नाही असे त्यांना वाटू लागले होते.

शेवटी ७ एप्रिल १९३४ रोजी गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेण्याचे ठरवले. त्याच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनी असे उद्गार काढले: ' मानवाच्या शस्त्रागारातील या सर्वोत्तम शस्त्राविषयी– सत्याग्रहाविषयी– माझी निष्ठा जाज्वल्य व तीव्र आहे. युद्ध किंवा हिंसाचार यांची जागा सत्याग्रह पूर्णपणे घेऊ शकेल असा माझा दावा आहे. सशस्त्र क्रांतिकारक व त्यांना दडपून टाकण्यासाठी दंडुकेशाहीने साऱ्या राष्ट्राला निश्चेष्ट करू पाहणारे सरकार या दोघांच्याही हृदयाला स्पर्श व्हावा, त्यांचे परिवर्तन घडून यावे अशासाठी सत्याग्रहाची योजना होती. पण कायदेभंग भव्य प्रमाणावर झाला असला तरी, विशेष गांभीर्य व निष्ठा न राखता केलेल्या कायदेभंगाने एक वर्ग म्हणून क्रांतिकारकांच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या हृदयाला स्पर्श केलेला नाही हे उघड आहे. खरा आणि अव्यभिचारी सत्याग्रह दोघांच्याही हृदयाला भिडलाच पाहिजे... म्हणून माझा सर्व काँग्रेसजनांना आदेश आहे की, त्यांनी स्वराज्य संपादण्याच्या उद्देशाने चालू असलेला सविनय कायदेभंग थांबवावा. विशिष्ट स्थानिक गाऱ्हाण्यांचे निवारण करून घेण्यासाठी सत्याग्रहाचा वापर केला तर चालेल. पण स्वराज्यप्राप्तीसाठी कायदेभंग करण्याची गोष्ट तूर्त एकट्या माझ्यावर सोपवावी. स्वराज्यासाठी पुनरपि कायदेभंग सुरू करावयाच झाल्यास माझ्या हयातीत केवळ माझ्याच मार्गदर्शनाखाली कायदेभंग व्हावा. अर्थात या शास्त्रात माझ्यापेक्षाही पुढे गेलेली एखादी व्यक्ती समोर आली व लोकांतही तिने आपल्याविषयी तसा विश्वास निर्माण केला तर गोष्ट वेगळी ' ( इं. ॲ. र., १९३४, I, पृ. २६४ ).

यापुढच्या काळात गांधींनी राष्ट्रउभारणीच्या विधायक कार्यक्रमावर आपली शक्ती एकवटण्याचे ठरवले. त्यांच्याबरोबर काम करण्याचा निर्णय घेतलेल्या काँग्रेसजनांनी पूर्णपणे राष्ट्रबांधणीच्या कामाला वाहून घ्यावे असा सल्ला गांधींनी दिला. इतरांना त्यांनी आपापल्या निष्ठेप्रमाणे कार्य करीत राहण्याचा सल्ला दिला.

डॉ. अन्सारींना पाठविलेल्या एका पत्रात गांधींनी म्हटले आहे, ' स्वराज्य पक्षाचे पुनरुज्जीवन करून विधिमंडळाच्या निवडणुका लढविण्याचा निर्णय तुम्ही मंडळींनी घेतला आहे. तुमच्या निर्णयाचे मी निःसंदिग्धपणे स्वागत करतो.

'सध्याच्या परिस्थितीत कायदेमंडळांची उपयुक्तता काय, यासंबंधी माझी मते प्रसिद्धच आहेत. एकंदरीने पाहता, १९२० मध्ये होती तशीच ती आजही आहेत. पण मला असे वाटते की, ज्या काँग्रेसजनांना या ना त्या कारणाने कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेता येत नाही किंवा भाग घेण्याची इच्छा नाही, आणि विधिमंडळात जाऊन काम करण्यावर ज्यांचा विश्वास आहे, त्यांनी निवडणुकांत भाग घेणे बरोबरच आहे. इतकेच नव्हे तर ते त्यांचे कर्तव्य आहे. त्यांनी निवडणुका लढवून कायदेमंडळात प्रवेश करावा व त्यांच्या मतीनुसार देशाचे हित साधणारा कार्यक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने सभागृहात निरनिराळ्या गटांशी हातमिळवणीही करावी.

'मी वर व्यक्त केलेल्या विचारांशी सुसंगत असे कोणतेही काम पक्षासाठी करायला मी नेहमीच तयार असेन. माझ्या सामर्थ्यानुसार मी लागेल ती मदत केव्हाही करीनच' ( इं. ॲ. र., १९३४, I, पृ. २६२–२६३ ).

स्वराज्य पक्षाचा जीर्णोद्धार झाला. पाटण्याला भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीत काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची स्थापनाही करण्यात आली. येथेही गांधींनी पुन्हा आपली अहिंसेबद्दलची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. १८ मे, १९३४ रोजी भरलेल्या सभेत ते म्हणाले, 'मी हजारो सभांतून सशस्त्र क्रांतिवादी गटाला सांगितले आहे की काही मोजक्या ब्रिटिश वा हिंदी अधिकाऱ्यांना ठार मारून स्वराज्य मिळवण्यात त्यांना यश आले तरी ते त्यांच्यापुरतेच स्वराज्य असेल. सर्वसामान्य भारतीय जनतेच्या भाळीचे पारतंत्र्य कायमच राहील...

'हिंसेची जागा सत्याग्रह पूर्णपणे घेऊ शकतो. सत्याग्रहाच्या मार्गाने प्रत्येकाला आपले स्वराज्य हस्तगत करावयाचे असते. या शस्त्राने जनतेला एक नवे सामर्थ्य आणि उभारी प्राप्त करून दिली आहे....

'मी आशावादी आहे; निराशा माझ्या मनाला कधीच पूर्णपणे ग्रासून टाकत नाही. कायदेभंगाची चळवळ स्थगित करण्याचा माझा निर्णय माझ्या अहिंसक विरोधाच्या शक्तीवरील अविचल श्रद्धेतूनच जन्मलेला आहे. पण लढा केव्हा व कसा सुरू करायचा हे सेनापतीने ठरवावे हेच बरोबर नाही काय? सैनिकांची चढाई करण्याइतकी तयारी झालेली आहे याबद्दल सेनापतीची खात्री असली पाहिजे. शिवाय सेवेच्या अटी सैनिकांनी ठरवायच्या नसून त्या सेनापतीनेच निश्चित करावयाच्या असतात. पण तुमच्यापुढे उभ्या असलेल्या या सेनापतीजवळ तर कसलीच प्रत्यक्ष सत्ता नाही. तो फक्त सैनिकांच्या बुद्धीला व हृदयाला आवाहन करू शकतो.' ( इं. ॲ. र., १९३४, I, पृ. २८८ ).

काँग्रेसशी असलेले संबंध तोडल्याची घोषणा गांधींनी १७ सप्टेंबर, १९३४ रोजी केली. या वेळीही त्यांनी १९२४ च्या बेळगाव काँग्रेसच्या वेळी केला होता तसा

देशातील बुद्धिवंत व स्वतः यांमधील मतभेदांचा पुनरुच्चार केला. या प्रसंगी ते म्हणाले, ' माझ्या आणि बहुसंख्य काँग्रेस सदस्यांच्या दृष्टिकोणात अत्यंत महत्त्वाचे अंतर असून ते एकसारखे वाढतच आहे असे मला वाटते. पक्षातील श्रेष्ठ बुद्धिवादी व्यक्तींपैकी बहुतेकजण ज्या मार्गाने मोठ्या उत्साहाने व आनंदाने जाऊ इच्छितात त्याच्या बरोबर विरुद्ध दिशेने मी निघालो आहेसे दिसते. त्यांची माझ्या ठिकाणी असलेली अतुलनीय श्रद्धाच त्यांना आज त्यांच्या आवडीच्या मार्गाने जाऊ देत नाही. काँग्रेससाठी मी आखून दिलेल्या धोरणांशी त्यांचा मतभेद जाहीर करीत असतानाही त्यांनी निष्ठेने आणि समर्पण वृत्तीने दर वेळी माझे नेतृत्व स्वीकारले. यापेक्षा दृढ निष्ठेची कोणीही नेता अपेक्षा करू शकणार नाही. त्यांच्या या श्रद्धेचा यापुढेही लाभ घेऊ पाहणे म्हणजे, ती फाजील ताणण्यासारखे होणार आहे. काँग्रेस, बुद्धिवंत आणि मी यांच्यात मला दिसून येणारे मूलभूत मतभेद त्यांच्या निष्ठेमुळे माझ्या दृष्टिआड होऊ शकत नाहीत ' ( तेंडुलकर, १९५२, खंड ३, पृ. ३६२ ).

## रचनात्मक कार्य

अशा रीतीने १९३४ मध्ये काँग्रेसमधून औपचारिकरीत्या निवृत्त झाल्यानंतर आपला सर्व वेळ रचनात्मक कार्यासाठी देण्याचा गांधींचा विचार होता. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या १२ व १३ जून १९३४ या दिवशी झालेल्या एका बैठकीतील एका ठरावान्वये अ. भा. ग्रामोद्योग मंडळाची स्थापना करण्यात आली होती. " मुख्यतः विकेंद्रीकरणावर भर देऊन " खेडेगावांचे पुनरुत्थान करणे हे या मंडळाचे उद्दिष्ट होते ( इं. अॅ. र., १९३४, II, पृ. २२२ ). श्री. जे. सी. कुमारप्पा यांना त्या मंडळाचे चिटणीस नेमले होते. सल्लागार मंडळात रवीन्द्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बसू, प्रफुल्लचंद्र रॉय, सी. व्ही. रमण, प्रा. सॅम हिगिनबोटम, मेजर जनरल सर रॉबर्ट मॅककॅरिसन इत्यादी मंडळींचा अंतर्भाव केला होता.

पूर्ण वेळ रचनात्मक कार्य करणाऱ्या सेवकांच्या योगक्षेमाची व्यवस्था करण्यासाठी गांधी सेवा संघ ही संस्था स्थापन झाली. सेवकाच्या वैयक्तिक गरजेनुसार संघ त्याला मानधन देत असे. संघाच्या वार्षिक अधिवेशनात परस्परांच्या अनुभवांची देवाणघेवाण होत असे. नवीन धोरणेही या वेळी ठरवली जात. संघाच्या सभासदांनी आपले सर्व लक्ष खेडेगावांच्या पुनरुज्जीवनासाठी द्यावे असे त्यांच्यावर बंधन होते. राजकारणात कोणत्याही प्रकारचा भाग घेणे त्यांना वर्ज्य होते.

अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचे कार्य हरिजन सेवक संघ नावाच्या वेगळ्याच संस्थेकडे सोपवण्यात आले. गांधींचे ' यंग इंडिया ' हे साप्ताहिक १९३२ मध्ये बंद पडले होते;

त्याऐवजी आता त्यांनी 'हरिजन' नावाचे नवीन साप्ताहिक सुरू केले. कोणत्याच प्रकारचे राजकीय लेख प्रसिद्ध करावयाचे नाहीत असा 'हरिजन'चा बाणा होता. पुढे १९३७ मध्ये काँग्रेसने सत्ताग्रहण करीपर्यंत 'हरिजन'चे हे धोरण कायम होते. त्या वेळी ते बदलले. ज्या प्रांतांतून काँग्रेसने मंत्रिमंडळे बनवली त्या प्रांतांत रचनात्मक कार्यक्रम सरकारने आपलाच कार्यक्रम म्हणून स्वीकारावा असा गांधींनी सल्ला दिला. पूर्वी 'यंग इंडिया' जी भूमिका बजावत असे तेच कार्य त्या वेळेपासून पुढे 'हरिजन'ने बजावले.

## काँग्रेस आणि निवडणुका

गांधी आता काँग्रेसचे सामान्य सभासदही नव्हते. पण त्यांचा व काँग्रेसचा संबंध संपला असे झाले नाही. उलट तो जास्तच पक्का झाला असे दिसून आले. आता गांधी काँग्रेस पुढाऱ्यांचे मार्गदर्शक झाले. या नव्या भूमिकेतून केलेल्या अगदी सुरुवातीच्या सूचनांपैकी एक, यापुढे काँग्रेसची अधिवेशने मोठ्या शहरात न भरवता लहान गावात भरवावी, अशी होती. तदनुसार १९३६ चे काँग्रेसचे अधिवेशन महाराष्ट्रात फैजपूर येथे भरवले गेले.

१९३५ च्या घटनात्मक सुधारणांनुसार होणारी भावी निवडणूक हा या अधिवेशनात चर्चेला आलेल्या अनेक विषयांतील एक प्रमुख विषय होता. एक घटना-समिती बोलवावी असाही या सुधारणांचा एक भाग होता. अधिवेशनासाठी जमलेल्या साठ हजार लोकांना गांधी म्हणाले, 'तुम्हाला खरोखरच काँग्रेसचा संदेश गावोगाव पोचवायचा असेल तर तुम्ही यापुढील सर्व अधिवेशने खेड्यांतच भरवण्याचा निश्चय केला पाहिजे. तुम्ही स्वराज्य मिळवायचे म्हणता, मग त्यासाठी ग्रामीण जनतेने काय केले पाहिजे यासंबंधीच्या तुमच्या कल्पना त्यांना समजायला नकोत का? आजचे अध्यक्ष श्री. जवाहरलाल नेहरू आणि समाजवादी गटाचे लोक म्हणतात की तुम्ही चार आणे देता आणि मग झोपी जाता. केवळ चार आणे दिल्याने तुम्ही काँग्रेसचे खरे सभासद आहात हे सिद्ध होत नाही. अधिवेशनाची तयारी काही एका दिवसात होत नाही. त्यासाठी कित्येक महिने लागतात. गावोगाव हिंडून सामानाची जुळवाजुळव करावी लागते. अशा वेळी जे संबंध निर्माण होतात ते कायम टिकवले पाहिजेत....

'स्वराज्य अगदी आपल्या दाराशी आल्यावर मगच घटनासमिती भरविण्याचा निर्णय घेता येईल. अशी समिती बोलवायची झाली तर आपल्याजवळ आधी तसे सामर्थ्य असले पाहिजे. तिची बैठक दिल्लीत होऊ शकणार नाही. ती अगदी दूरवरच्या खेड्यात भरेल. आपले सामर्थ्य सर्व बाजूंनी वाढवल्यानंतरच आपल्याला स्वराज्य मिळणार आहे. आपण आपले सामर्थ्य वाढवू तर स्वराज्य अगदी जवळ आलेले दिसेल.

१९२० मध्ये मी तुम्हाला काही गोष्टी तावडतोब करायला सांगितल्या होत्या. त्या अजूनही अपूर्णच राहिल्या आहेत. चरखा, दारूबंदी आणि अस्पृश्यतानिवारण यांपैकी काहीच साध्य झालेले नाही. या गोष्टींकडे दुर्लक्ष केलेत तर तुम्ही स्वराज्य गमावलेले असेल. या म्हाताऱ्याचे हे शब्द विसरू नका ' ( इं. ॲ. र., १९३६, II. पृ. २३१ ).

देशाच्या कानाकोपऱ्यातून जमलेल्या काँग्रेसजनांपुढे वरील भावना व्यक्त करताना गांधींना एक प्रकारचे दुःख व क्वचित थोडासा एकाकीपणा जाणवत असला पाहिजे हे उघड दिसते. ते कसेही असो, पण काँग्रेसने निवडणुका लढवल्या आणि ११ पैकी ६ प्रांतांत बहुमत मिळण्याइतके यशही तिला मिळाले (इं. ॲ. र., १९३७, I, पृ. १६८ व पुढे ). स्वाभाविकपणेच त्या त्या प्रांतात काँग्रेसला मंत्रिमंडळ बनविण्यासाठी पाचारण करण्यात आले. तसे करण्यापूर्वी काँग्रेसजनांनी गव्हर्नरांकडून एक आश्वासन मागण्याचे ठरवले. मंत्रिमंडळाचा कारभार जोपर्यंत घटनेने आखून दिलेल्या चौकटीबाहेर जात नाही तोपर्यंत गव्हर्नर त्यात ढवळाढवळ करणार नाही, असे आश्वासन काँग्रेसने ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून मागितले. यावर भारतात तसेच इंग्लंडमध्येही वादळ माजले. पण लवकरच " सभ्य वागणुकी "चा करार झाला. त्यामुळे प्रथम सहा प्रांतांत व नंतर जून, १९३७ च्या अखेरीस आणखी एका प्रांतात काँग्रेसने अधिकारग्रहण केले.

सत्ताग्रहणास काँग्रेसमध्ये अंतर्गत विरोधही खूप होता. एका बाजूने मिनू मसानी व जयप्रकाश नारायण यांसारख्या डाव्यांचा तर दुसरीकडे पं. मालवीयांसारख्या ज्येष्ठ राष्ट्रीय पुढाऱ्यांचा अधिकारग्रहणास विरोध होता. १८ मार्च १९३७ रोजी भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीपुढे बोलताना पं. मालवीय म्हणाले, ' आज या सभागृहात जो कोणता निर्णय घेतला जाईल त्याने भारताच्या साऱ्या राजकीय भवितव्यावर परिणाम होणार आहे... ताडीची चार दुकाने बंद पाडणे किंवा जनतेसाठी चारदोन किरकोळ सवलती मिळविणे ही काँग्रेसची उद्दिष्टे कधीच नव्हती. त्या गोष्टी आवश्यक असून त्यात लक्ष घातले पाहिजे हे खरे असले तरी ते काँग्रेसचे ध्येय नव्हे... नुकत्याच झालेल्या निवडणुका आपण का लढवल्या हे मतदारांना स्पष्टपणे सांगितले आहे. त्या वेळी आपण त्यांना निःसंदिग्ध शब्दांत हे सांगितले आहे की, या सुधारणांमुळे देशाचा काडीइतकाही फायदा होणार नाही. ही घटनात्मक सुधारणा झिडकारून टाकण्याचा आपला मानस प्रत्यक्षात आणण्यासाठीच मतदारांनी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड संख्येने निवडून दिले आहे. आता केवळ किरकोळ सोयीसवलती पाहण्यापेक्षा राष्ट्राचा संकल्प पूर्ण करण्याकडे लक्ष देणे हेच काँग्रेसचे काम आहे. काँग्रेसने विधिमंडळात प्रवेश केला तो एक विशिष्ट आणि निःसंदिग्ध उद्देश डोळ्यांसमोर ठेवून. आता अधिकारग्रहण केल्याने लोकांसाठी आपण चारदहा छोट्या-मोठ्या गोष्टी करू शकू असे म्हणणे आपल्याला शोभत नाही. ' शेवटी प्राप्त परिस्थितीत अधिकारग्रहण करणे हे ' पाप ' आहे

असा आपला अभिप्राय पं. मालवीयजींनी व्यक्त केला ( इं. ॲ. र., १९३७, I, पृ. २०२ ).

याउलट श्री. राजेंद्रप्रसाद यांनी अधिकारग्रहणाचे समर्थन केले व त्याच अ. भा. काँग्रेस कमिटीच्या बैठकीत सांगितले की, 'काँग्रेसने अधिकारग्रहण करण्याचे ठरवले आहे ते, आपले ध्येय साध्य करण्यासाठी सर्व देश सुसंघटित करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी. या दृष्टीने अधिकाराचा जास्तीत जास्त लाभ करून घेण्यासाठी सत्ताग्रहण करायचे आहे... सत्ताग्रहणाच्या बाजूला असलेल्या लोकांची अशी प्रामाणिक खात्री आहे की तसे केल्याने काँग्रेसचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने देशाचे सामर्थ्य वाढवण्यास चांगलाच वाव मिळणार आहे' ( इं. ॲ. र., १९३७, I, पृ. १९२ ). सरते शेवटी जुलै १९३७ मध्ये मंजूर झालेल्या ठरावात म्हटले होते : 'ही समिती अशा निर्णयाप्रत आलेली आहे व असा ठराव करते की, निवडून गेलेल्या काँग्रेसच्या सभासदांनी त्यांना जेथे पाचारण करण्यात येईल तेथे अधिकारग्रहण करण्यास हरकत नाही. पण त्याबरोबरच ही समिती कटाक्षाने एक गोष्ट स्पष्ट करू इच्छिते : अधिकारग्रहणाचा उपयोग काँग्रेसने घालून दिलेल्या मार्गाने जाण्यासाठी आणि पक्षाच्या जाहीरनाम्याने दिलेल्या आश्वासनांच्या परिपूर्तीसाठीच त्यांनी केला पाहिजे. **एकीकडे या नव्या घटनात्मक सुधारणांचा पोकळपणा उघड करून त्यांचा प्रतिवाद करण्याचे व दुसरीकडे रचनात्मक कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे काँग्रेसचे दुहेरी धोरण त्यांनी पुढे चालविले पाहिजे** ( इं. ॲ. र., १९३७, पृ. २१६ ).*

## गांधी आणि अधिकारग्रहण

या वेळेपर्यंत गांधी पडद्याआड होते असे म्हटले तरी चालेल. परंतु काँग्रेस कार्यकारिणीच्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या बैठकी वर्ध्यालाच होत असत. शिवाय अधिकारग्रहणाच्या ठरावाला पाठिंबा देणाऱ्यांत जुने, नाफेरवादी म्हणून ओळखले जाणारे काही कट्टर गांधीवादी होते. यावरून काँग्रेसच्या राजकारणात गांधी महत्त्वाची भूमिका अद्यापही पार पाडीत होते असा अंदाज बांधायला हरकत नाही. मात्र इतके दिवस मोठ्या हिरिरीने समाजवादाचा पुरस्कार करणारे, गांधीवादातील बहुतेक मूळ तत्त्वांना सामान्यतः विरोध करणारे, व त्या वेळी काँग्रेसचे अध्यक्ष असणारे जवाहरलाल नेहरू ( अधिकारग्रहणवादी गटात नवीन आल्याचे दिसत होते.

गांधींनी आपली भूमिका ३० मार्च १९३७ रोजी काढलेल्या पत्रकात स्पष्ट केलेली

* जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा.

आढळते. ते म्हणतात, ' देशामध्ये आज निर्माण झालेल्या स्थितीबद्दल मी माझे मत व्यक्त करणे आवश्यक आहे असे मला वाटू लागले आहे... मला तीन तारा दाखवण्यात आल्या आहेत... त्यात सद्यःस्थितीबद्दल माझे मत विचारले आहे... तेव्हा असे मत देणे हे मी स्वतःवर घालून घेतलेल्या निर्बंधांना सोडून असले, तरी या आर्जवांपुढे तसे करण्याखेरीज गत्यंतर नाही— विशेषतः काँग्रेसने केलेल्या ठरावातील अधिकारग्रहणाच्या कलमाचा व सत्ताग्रहणावर विशिष्ट अटी घालण्यासंबंधीच्या कल्पनेचा मीच जनक असल्याने मला आता गप्प राहता येत नाही... घटनेत काही दुरुस्ती करावी असे काँग्रेसचे धोरण नसून कोणालाच पसंत नसलेली ही नवी घटना पूर्णतः रद्बातल ठरवावी असेच काँग्रेसचे धोरण होते व आहेही. अर्थात अधिकारग्रहणाने, मग ते कितीही सशर्त असले तरी, घटना रद्बातल ठरविण्याचे उद्दिष्ट साध्य होणार नाही याची काँग्रेसजनांनाही जाणीव आहे. काँग्रेसच्या अहिंसक विचारप्रणालीशी सुसंगत अशा साधनांनी सर्व सत्ता जनतेच्या हाती हस्तांतरित होईल अशी स्थिती येईपर्यंत, दरम्यानच्या काळात, अधिकार स्वीकारून काँग्रेसला बळकट करावे असे सत्ताग्रहणवाद्यांचे उद्दिष्ट आहे. कारण बहुजनसमाजाचे प्रतिनिधित्व काँग्रेसच प्रामुख्याने करते असे निवडणुकींनी दाखवून दिले आहे ' ( इं. ॲ. र., १९३७, I, पृ. २४२ ).

या नव्या पवित्र्याची जुन्या विचारांशी सांगड घालण्यासाठी गांधींनी केलेल्या युक्तिवादाचा अभ्यास करणे उद्बोधक ठरेल. १७ जून १९३७ च्या ' हरिजन 'मधील ' काँग्रेस मंत्रिमंडळे ' या लेखात ते लिहितात, ' हिंदुस्थानला स्वराज्य मिळण्याच्या दृष्टीने गव्हर्नेन्ट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५, पूर्णपणे असमाधानकारक आहे ही गोष्ट अगदी सर्वमान्य आहे. परंतु, एक अत्यंत मर्यादित व क्षीण का होईना, दंडुकेशाहीच्या जागी लोकमताचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न म्हणूनही त्याच्याकडे पाहता येणे शक्य आहे. तीन कोटी स्त्री-पुरुष मतदार निर्माण करून त्यांच्या हाती व्यापक सत्ता देण्याच्या या क्रियेला त्याशिवाय दुसरे नाव देता येणार नाही... ' ( हरिजन, खंड ५, पृ. १८० ).

गांधींची ही भूमिका घटनात्मक सुधारणावादी होती. लिबरल मंडळींची भूमिका तंतोतंत अशीच होती. तसेच गांधी या ठिकाणी त्यांच्या अराज्यवादी भूमिकेपासून जास्तीत जास्त दूर गेलेले दिसतात. त्यांच्या भूमिकेतील या लवचिकपणामुळेच ते निरनिराळ्या राजकीय दृष्टिकोणांच्या लोकांबरोबर काम करू शकत असत. मात्र तसे करताना आपल्या मूलभूत तत्त्वांची पायमल्ली होत नाही अशी त्यांची स्वतःची खात्री व्हावी लागे. या अधिकारग्रहणाच्या बाबतीत त्यांची तशी खात्री होती असे मानायला हरकत नाही.

अशा रीतीने अधिकारग्रहणाच्या तत्त्वाशी जुळवून घेताना गांधींना एक आशा वाटत होती. वास्तविक इच्छा नसतानाही काँग्रेसच्याच हाती सत्ता द्यावी लागावी अशी

परिस्थिती निर्माण झालेली होती. या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणेच्या व सत्तेच्या वापरातून जनतेची स्वराज्यासाठी तयारी करवून घेता येईल असे त्यांना वाटत होते. काँग्रेस सरकारांनी काही गोष्टी खास करून साध्य कराव्यात असे त्यांना वाटत होते.

पोलिस किंवा लष्कर यांच्या साहाय्याशिवाय राज्य चालविण्याची कुवत काँग्रेस-जनांनी संपादन करणे ही त्यांपैकी एक गोष्ट होती. (हरिजन, खंड ५, मधील पुढे दिलेले निरनिराळे महत्त्वाचे लेख पाहा : 'काँग्रेस मंत्रिमंडळे', पृ. १८०; 'मूलभूत मतभेद', पृ. १८८; 'टीकेस उत्तर', पृ. १९६; 'गर्भितार्थ', पृ. २२०). * २१ ऑगस्ट १९३७ च्या 'हरिजन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'गर्भितार्थ' या लेखाच्या शेवटी ते म्हणतात, 'लष्कराची मुळींच मदत न घेता व पोलिसांचीही—ज्यांना एखादे नवे व मित्रत्वाचे निदर्शक असे नामाभिधान देता येईल—अगदी किमान मदत घेऊन आपण राज्य करू शकतो असे काँग्रेसने दाखवून देणे हा सध्याची राज्यघटना मोडून काढण्याचा उत्तम व एकमेव परिणामकारक उपाय आहे.'

असे असले तरी, संघर्ष उपस्थित होण्याची शक्यता लक्षात घेऊन, कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगाला यशस्वीपणे तोंड देऊ शकतील असे खऱ्याखुऱ्या अहिंसक वृत्तीचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने पुढे येतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. दरम्यानच्या काळात काँग्रेस मंत्रिमंडळांनी आपले शस्त्रबळावरील अवलंबन उत्तरोत्तर कमी करून स्वतःची लायकी सिद्ध केली पाहिजे असे गांधींचे मत होते. (हरिजन, खंड ६, मधील 'आपले अपयश', पृ. ५४; 'आत्मपरीक्षणाची गरज', पृ. ६४; आणि 'निवड', पृ ७२,... इत्यादी लेख पाहा). पण 'आपल्याला पोलिस किंवा लष्कर यांच्या मदतीशिवाय राज्य करता येत नाही असे त्यांना आढळून आल्यास, अहिंसेच्या कसोटीवर, काँग्रेसने सत्ता सोडून दिली पाहिजे याचा तो स्पष्ट निर्देश असेल. तसे झाल्यास काँग्रेसने सत्ता सोडून पुन्हा विजनवासात जावे आणि तपाचरणाने श्रेयाचा शोध घ्यावा' (हरिजन, खंड ६, पृ. ३८५).

गांधींना आणखी एक आशा वाटत होती. काँग्रेसी मंत्र्यांना जर नवी जबाबदारी पार पाडावयाची असेल तर '"लाल फिती"चे—नोकरशाहीचे—राज्य नष्ट करण्याची कला त्यांना अवगत करून घ्यावी लागणार आहे. नोकरशाही हा जुन्या व्यवस्थेचा प्राण होता तर नव्या मनूला नोकरशाही प्राणघातक ठरणारी आहे.' 'नोकरशाहीचे ते इतके बांधील आहेत की विचार करायला त्यांना सवडच नाही' ('रेड टेप', **हरिजन**, खंड ६, पृ. ३८५) अशी गांधींना आधीच भीती वाटत होती. यात सुधारणा केलीच पाहिजे याला एक खास कारण होते. 'काँग्रेसने भारतातील कोट्यवधी जनतेची

---

* लेखांचे मूळ इंग्रजी मथळे भाषांतरून येथे व पुढे दिले आहेत. —भाषांतरकार.

अशी समजूत करून दिली होती की कॉंग्रेस सत्तेवर येताच देशात एकही व्यक्ती उपाशी राहणार नाही; कपड्यांच्या अभावी कोणी अर्धनग्न राहणार नाही. ज्या विश्वासाने जनतेने त्यांच्या हाती सत्ता दिली होती त्या विश्वासाला न्याय द्यायचा तर या प्रश्नांवर मंत्र्यांनी आपली बुद्धी व वेळ खर्च केला पाहिजे' (हरिजन, खं. ६, पृ. ३८५).

गांधींची तिसरी आशा अशी होती की, अस्पृश्यता नष्ट केल्याने व हिंदू-मुसलमान ऐक्य साधल्याने देशात सामाजिक न्याय व समता यांचे वातावरण निर्माण होईल. तुरुंगांची सुधारणा करून वर्तन सुधारण्यास वाव देणाऱ्या स्वावलंबी संस्थांमध्ये त्यांचे रुपांतर करायला हवे होते. लोक दारू पितात याच्या मुळाशी असलेली कारणे नष्ट करता येतील अशा प्रकारे अबकारी करांपासूनचे उत्पन्न खर्च करून दारूबंदी यशस्वी करावी अशी त्यांची कल्पना होती. ब्रिटिश राजवटीत अबकारी करांच्या उत्पन्नातून शिक्षणाचा खर्च केला जाई. ही पद्धत तावडतोब बंद करायला हवी होती. आपल्या श्रमातून शिक्षणावरील खर्च बऱ्याच प्रमाणात विद्यार्थीच (निदान वरच्या इयत्तांमधील) भरून काढू शकतील अशा प्रकारे एखाद्या जीवनोपयोगी उद्योगाभोवती शिक्षणाची उभारणी केल्यास शिक्षण सार्वत्रिक करता येणार होते (हरिजन, खंड ६, १६१; इं. ॲ. र., १९३८, I, पृ. १८).

गांधींच्या या आशा किती प्रमाणात सुफलित झाल्या किंवा कॉंग्रेसला कोणत्या परिस्थितीत त्यांच्या योजनेपासून किंवा कार्यक्रमापासून विचलित व्हावे लागले या गोष्टी नंतरच्या इतिहासात सापडतीलच. मध्यंतरी कॉंग्रेसला होता होईल तितके मार्गदर्शन करण्याचे काम गांधी करीतच होते. कारण सत्ताग्रहण केलेल्या कॉंग्रेसचे पालकत्व त्यांच्याकडेच होते ना ! पण रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्थाच त्यांच्या खऱ्या औरस पुत्र होत्या.

## कॉंग्रेस आणि राज्यशासन

प्रथम सहा आणि नंतर आठ राज्यांत कॉंग्रेस १९३७ च्या मध्यापासून ते १९३९ च्या ऑक्टोबरअखेरपर्यंत अधिकारारूढ होती. देशाने महायुद्धात भाग घ्यावा की नाही, याबाबत ब्रिटिश सरकारशी मतभेद झाल्यामुळे ऑक्टोबर १९३९ मध्ये कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. अशा रीतीने ११ पैकी ८ प्रांतांत कॉंग्रेस सुमारे २७ महिने सत्तेवर होती

अधिकारग्रहण केल्यानंतर थोड्याच अवधीत कॉंग्रेसपुढे अगदी भिन्नभिन्न स्वरूपाचे खूपच प्रश्न उपस्थित झाले. कॉंग्रेस व ब्रिटिश सरकार यांचे संबंध कसे असावेत या मुद्द्यावरून त्यातील काही निर्माण झाले होते. कॉंग्रेसच्या आवाक्याबाहेर असलेल्या देशाच्या परिस्थितीतून काही समस्या निर्माण झालेल्या होत्या, तर काही पूर्णपणे

पक्षांतर्गत मतभेदामुळे निर्माण झालेल्या होत्या. या सर्वांचे वेगवेगळे विवेचन करणे आवश्यक आहे. तत्पूर्वी या सर्व प्रश्नांची एकत्रित यादी करणे उपयोगाचे होईल. काँग्रेस पक्ष व त्यांची सरकारे ज्यांत गुंतली गेली अशा प्रश्नांपैकी ठळक प्रश्न पुढीलप्रमाणे होते : ( १ ) ' शांतता आणि सुव्यवस्था ' यांचे रक्षण. ( २ ) जमीनमालकीहक्कांची पुनर्रचना आणि जमीनदार. ( ३ ) शेतकरी व कामगार संघटना. ( ४ ) संस्थानांतील चळवळी. ( ५ ) सार्वत्रिक शिक्षण. ( ६ ) मुस्लिम लीगचा ' राष्ट्रवाद '. ( ७ ) प्रांतीयता. ( ८ ) राष्ट्रीय विकासाची योजना. ( ९ ) काँग्रेस अंतर्गत संघर्ष– मुख्यतः खरे, नरिमन व सुभाषचंद्र बोस यांच्या नावाशी निगडित.

**( १ ) ' शांतता आणि सुव्यवस्था ' :** निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे, सत्तेवर येताच बिहार व संयुक्त प्रांतांच्या सरकारांनी राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षा झालेल्या जुन्या कैद्यांची मुक्तता करण्याचे ठरवले. परंतु तसे केल्याने प्रांताच्या शांततेला बाध येईल असे त्या प्रांताच्या गव्हर्नरांचे मत पडले. तेव्हा त्यांनी गव्हर्नर-जनरलच्या सल्ल्याने आपल्या विशिष्ट अधिकाराचा वापर करून कैद्यांची मुक्तता रद्द करण्याचे ठरवले. या दोन्ही प्रांतांतील मंत्र्यांनी सर्व कैद्यांच्या वैयक्तिक मुलाखती घेऊन, त्यांना सोडल्यास शांततेला मुळीच धोका नाही याची खात्री करून घेतली. गव्हर्नरांचा निर्णय म्हणजे आपल्या कारभारात ढवळाढवळ आहे असे मंत्रिमंडळांनी ठरवले व आपापले राजिनामे सादर केले.

या वादात गांधी, गव्हर्नर-जनरल व काँग्रेस वर्किंग कमिटी सर्वत्र ओढले गेले. गांधींनी पुढील निवेदन प्रसिद्ध केल्यावर राजिनामे मागे घेण्यात आले : ' माझे असे मत आहे की, कैद्यांची प्रकरणे फेरतपासून पाहण्यात मंत्रिमंडळांच्या अधिकारावर अतिक्रमण करावे असा हेतू नव्हता असे आश्वासन देण्यास गव्हर्नरांना मोकळीक असली तर आणीबाणी टाळली जाऊ शकते... उलटपक्षी, गव्हर्नरांनी बोलावणे पाठविल्यानंतर गव्हर्नरांकडून त्यांना मिळणारी आश्वासने समाधानकारक वाटतात की नाही ते ठरविण्याची मोकळीक वर्किंग कमिटी मंत्रिमंडळांना देईल अशी मला आशा आहे– ' ( इं. अॅ. र., १९३८, I, पृ. ६५-६९, पृ. ३०७–३११ ).

**( २ ) जमीन मालकीहक्क पुनर्रचना व जमीनदार :** जमीन मालकीहक्कांची पुनर्रचना घडवून आणण्याबद्दलही काँग्रेस वचनबद्ध होती. सी. शंकरन् नायर यांच्यासारख्या पुढाऱ्यांनी गांधीवादामध्ये ' टॉलस्टॉय-लेनिन यांचा कम्युनिझम् ' आहे अशी टीका पूर्वी केलीच होती. आता काँग्रेस सत्तेवर आल्यामुळे सर्वच जमीनदारांना स्वतःच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी संघटित व्हावे असे वाटू लागले होते.

या विचारसरणीला अनुसरून दरभंगा येथे १० डिसेंबर १९३८ रोजी एक बैठक भरविण्यात आली. तीत ' ऑल इंडिया लँड होल्डर्स फेडरेशन 'ची स्थापना झाली. तत्पूर्वी, मे १९३८ मध्ये, एक सभा घेऊन, काही फेरबदल न करताच युनायटेड प्रॉव्हिन्सेस टेनन्सी ॲक्ट अंमलात आणला गेला तर " सविनय कायदेभंगा "ची चळवळ उभारण्याची अवधच्या जमीनदारांनी नोटिस दिली होती, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे (इं. ॲ. र., I, पृ. २४). जमीनदार व काँग्रेस यांच्यात कूळ-कायद्याच्या मसुद्यावर कोणतीच तडजोड निघू न शकल्यामुळे बिहारमध्ये तर विधिमंडळच महिनाभर स्थगित ठेवावे लागले होते.

दरम्यानच्या काळात शेतकरी चळवळीचा जोर व व्याप खूपच वाढला होता. शेतकरी व मालक यांच्या परस्परविरोधी हितसंबंधांत सुवर्णमध्य काढण्याचा काँग्रेसने प्रयत्न चालवला होता. तरी शेतकरी व जमीनदार यांच्यात मारामारीचे प्रसंग घडतच होते. २१ एप्रिल १९३९ रोजी दरभंग्याला झालेल्या कुळे व जमीनदार यांच्यातल्या दंगलीने गंभीर स्वरूप धारण केले व त्यात कित्येक शेतकरी जखमी झाले.

जमीनमालकांचे म्हणणे विचारात घेतल्याशिवाय कोणताही कूळकायदा या प्रांतात लागू केला जाणार नाही असे आश्वासन मुंबईच्या मुख्यमंत्र्यांनी देऊन टाकले (इं. ॲ. र., १९३८, II, पृ. ३). संयुक्त प्रांतातही, तेथील शिक्षणमंत्र्यांनी बनारस जिल्ह्यातील एका छोट्या परिषदेत ' काँग्रेस सरकारला जमीनदारी पद्धत नष्ट करण्याची इच्छा नाही ' असे सांगितल्याचे वृत्त प्रसृत झाले (इं. ॲ. र., १९३८, I, २१) पेच तेव्हा उद्भवला. कूळकायद्याच्या संदर्भातील वाद दोन्ही बाजूंकडून एखाद्या लवादाकडे सोपविला जावा अशीही सूचना त्या प्रांतात करण्यात आली.

पूर्वीच्या स्वराज्य पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यातील भूमिकेचीच आठवण करून देणारी ही चाल होती. शेतकरी व जमीनदार या दोघांच्या हितसंबंधांचा न्याय्य सुवर्णमध्य गाठण्याचे तत्त्वच त्यात मांडण्यात आले होते.

**( ३ ) शेतकरी व कामगार संघटना :** काँग्रेस अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी १० जुलै १९३७ रोजी शेतकरी संघटनांत भाग घेण्याच्या बाबतीत पुढील मार्गदर्शक तत्त्व घालून दिले. ते म्हणाले, ' जेथे खऱ्याखुऱ्या शेतकरी संघटना अस्तित्वात आहेत तेथे आपण त्यांच्याशी सहकार्य केले पाहिजे. अशा संघटना स्थापन करण्याला आपल्याला विरोध करता येणार नाही. कारण आपली गाऱ्हाणी दूर करून घेण्यासाठी संघटना करणे हा शेतकऱ्यांचा हक्क आहे यात शंका नाही.

' शेतकऱ्यांच्या ज्या संघटना राजकीयदृष्ट्या प्रतिगामी आहेत त्या खऱ्या अर्थाने शेतकरी संघटनाच नसल्यामुळे त्यांच्याशी सहकार्य करणे शक्य नाही. ज्या किसान

संघटनांच्या व्यासपीठांचा उपयोग काँग्रेसला विरोध करण्यासाठी करून घेतला जात आहे त्या संघटनांशी आम्हाला काहीच कर्तव्य नाही.

'किसान संघटनांशी सहकार्य करीत असतानासुद्धा एक मूलभूत ध्येय आपल्यापुढे असले पाहिजे. देशाच्या ग्रामीण भागामध्ये काँग्रेस पक्षच एक किसान संघटना बनेल यासाठी आपण झटले पाहिजे. उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात आपण काँग्रेसचे या दिशेने परिवर्तन घडवून आणले नाही तर आपला व शेतकरी समाजाचा संबंध जिवंत राहणार नाही' (इं. अॅ. र., १९३७, I, पृ. २२०–२२१).

इतरत्र नेहरूंनी असे मत व्यक्त केले की, 'काँग्रेस ही एक राष्ट्रीय संघटना आहे, व ती तशीच राहिली पाहिजे. त्यामुळे तिला नेहमीच शेतकरी किंवा कामगारांच्या वर्गीय हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करता येणार नाही. एक ट्रेड युनियन किंवा किसान सभा म्हणून कार्य तिला करता येणार नाही. प्रत्यक्षात मात्र जेथे काँग्रेसचे व शेतकरी वर्गाचे संबंध घनिष्ठ आहेत तेथे काँग्रेस किसान सभेसारखेच कार्य करीत आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, काँग्रेसचा प्रामुख्याने शेतकऱ्यांची संघटना बनण्याकडे कल आहे आणि हा कल पुढेही टिकून राहण्याची शक्यता आहे. पण, काँग्रेस ही राष्ट्रीय संघटना आहे, आणि आकस्मिक एक मोठा बदल घडून येऊन तिचे व्यक्तिमत्त्व आमूलाग्र पालटत नाही तोवर तिचे नेतृत्व मध्यमवर्गाकडे, त्यातही कनिष्ठ मध्यमवर्गाकडे राहणे, अपरिहार्य आहे (इं. अॅ. र., १९३७, I, पृ. २२५; शिवाय पाहा, इं. अॅ. र., १९३७, II, पृ. ३६२–३६६).

परंतु जसजशी अ. भा. किसान चळवळ वाढू लागली तसतसे काँग्रेस व किसान सभा यांच्यातील संघर्षही वाढू लागले. १९३७ ते १९३९ या वर्षांत असे झगडे ही एक नित्याची बाब होऊन बसली. किसान सभेच्या इतिहासात असे लिहिलेले आढळते की सर्व देशभर मोर्चे व सभा घेण्यात आल्या. शिलाँग, पाटणा, लखनौ, लाहोर, कराची, पुणे, नागपूर, कटक, मद्रास, इत्यादी ठिकाणी झालेल्या चळवळींत सुमारे एक लक्ष लोकांनी भाग घेतला होता. तामिळनाडूमध्ये 'सरकारी कूळ हितरक्षण समितीच्या खंडविषयक शिफारशींना पाठिंबा देण्यासाठी' असे मोर्चे काढण्यात आले होते (इं. अॅ. र., १९३८, I, पृ. ३५४; इं. अॅ. र., १९३७, I, पृ. ३८६–३९१).

काँग्रेस गोटात यामुळे थोडीफार खळबळ उडाली असावी असे पुढील पुराव्यावरून म्हणता येते. सरोजिनी नायडू यांनी १६ जुलै १९३८ रोजी बंगालमधील एका ताग गिरणी कामगारांच्या सभेत, अध्यक्षपदावरून, मजूरांनी अगदी सहजासहजी अविचारीपणे संप करू नये असा उपदेश केला (इं. अॅ. र., १९३८, II, पृ. ३). १४ एप्रिल १९३८ रोजी 'निदर्शने उठताबसता केल्याने ती फार सवंग व निरर्थक बनल्या'ची टीका करून जवाहरलाल नेहरूंनी आपली नाराजी प्रकट केली (इं. अॅ. र., १९३८, II,

पृ. १८ ). शिवाय, ' किसानांनी काँग्रेस मंत्रिमंडळांच्या सुरळीत चाललेल्या कारभारात उगीचच अडथळे निर्माण करू नयेत ' असा त्यांनी सल्ला दिला ( इं. ॲ. र., १९३८, I, पृ. १७ ). संयुक्त प्रांतात भरलेल्या एका राजकीय संमेलनप्रसंगी जमलेल्या पन्नास हजार शेतकऱ्यांपुढे बोलताना नेहरूंनी त्यांना सांगितले की, ' शेतकऱ्यांनी राजकारण समजावून घेण्याचा प्रयत्न करावा, उगीचच चार धूर्त पुढाऱ्यांच्या मागे आंधळेपणाने जाऊ नये ' ( इं. ॲ. र., १९३८, II, पृ. ३२ ). फेब्रुवारी १९३८ च्या हरिपुरा काँग्रेस-मध्ये ' किसान सभा ' या विषयावर पुढील ठराव संमत केला गेला : ' शेतकऱ्यांचा संघटना करण्याचा, किसान सभा स्थापन करण्याचा अधिकार काँग्रेसला पूर्णपणे मान्य आहे. परंतु काँग्रेसच्या मूलभूत तत्त्वांना बाधक असतील अशा कोणत्याही चळवळीशी वा त्या चळवळींचे नेतृत्व करणाऱ्या संघटनांशी काँग्रेसला सहकार्य करता येणार नाही. आणि या किसान सभांचे सभासद होऊन काँग्रेसच्या ध्येयधोरणांना विरोधी वातावरण निर्माण करण्यात त्या सभांना मदत करणाऱ्या काँग्रेसजनांचीही गय केली जाणार नाही ( इं. ॲ. र., १९३८, I, पृ. ३०२ ).

अ. भा. काँग्रेस कमिटीने जून १९३९ मध्ये पुढील ठराव संमत केला : ' काँग्रेसच्या कोणत्याही सभासदाने भारताच्या कोणत्याही शासकीय प्रांतात संबंधित प्रांतिक काँग्रेस कमिटीची पूर्वसंमती घेतल्याशिवाय स्वतः कसल्याच प्रकारचा सत्याग्रह करू नये किंवा सत्याग्रहाची चळवळ संघटित करू नये. ' या ठरावाला किसान सभेचे नेते स्वामी सहजानंद सरस्वती यांनी कडाडून विरोध केला ( इं. ॲ. र., १९३९, I, पृ. ३२ ).

अ. भा. काँग्रेस महासमितीच्या दुसऱ्या एका बैठकीत, २९ सप्टेंबर १९३८ रोजी, वर्गकलहाचा धिक्कार करणारा आणि ' नागरिक स्वातंत्र्या 'च्या संरक्षणावर भर देणारा एक ठराव संमत करण्यात आला होता. त्या ठरावात असे म्हटले होते : ' नागरिक स्वातंत्र्याच्या नावाखाली लोक व काँग्रेसजनसुद्धा खून, दरोडे, लुटालूट आणि हिंसक पद्धतीचा वर्गकलह माजवताना दिसतात. कित्येक वृत्तपत्रांनी हिंसाचार व असत्य यांच्या बाजूने मोहीमच उघडलेली दिसते. या मोहिमेचा उद्देश वाचकांना हिंसक कृत्ये करण्यास उद्युक्त करून जातीय दंगे घडवून आणण्याचा दिसतो. म्हणून काँग्रेस जनतेला सावध करीत आहे की, नागरिक स्वातंत्र्यामध्ये लोकांना हिंसक कृत्ये करण्यास उत्तेजन देणे किंवा धादांत खोटा प्रचार करणे या गोष्टींचा समावेश होत नाही. तेव्हा, काँग्रेसचे नागरिक स्वातंत्र्याबद्दलचे धोरण जरी पूर्वीसारखेच राहणार असले तरी, काँग्रेस आपल्या आजवरच्या परंपरेशी सुसंगती राखून काँग्रेस मंत्रिमंडळांनी जनतेच्या जीवित-वित्ताचे रक्षण करण्यासाठी योजलेल्या उपायांना पाठिंबा देईल ' ( इं. ॲ. र., १९३८, II, पृ. २७८–२७९ ).

गांधी अर्थातच काँग्रेसच्या बाजूचे होते. नागरिक स्वातंत्र्यासंबंधीचा वरील ठराव

संमत झाला त्या वेळी बऱ्याच कॉंग्रेस सदस्यांनी सभात्याग केला होता. 'एक दुर्दैवी सभात्याग' या हरिजनमधील लेखात या सभात्यागावर टीका करताना गांधी म्हणतात, 'या सभात्यागाने एक चांगली गोष्ट साधली आहे. कॉंग्रेस आता पूर्वीसारखी एकसंध राहिलेली नाही ही गोष्ट त्याने स्पष्ट झाली. कॉंग्रेसच्या तत्त्वप्रणालीवर व रचनात्मक कार्यक्रमावर– विशेषतः खादी व दारूबंदीवर—विश्वास नसलेल्या व्यक्ती आणि गट तिच्यात आहेत हेच त्या सभात्यागाने दाखवून दिले.

'अशा स्थितीत जगातील सर्वात जास्त अनुभवी व अत्यंत सुसंघटित षड्यंत्राशी (ब्रि. साम्राज्याशी) निकराचा लढा देणारी एक एकात्म युद्धसज्ज संघटना म्हणून काँग्रेसचे अस्तित्व संपुष्टात येईल असे म्हटले पाहिजे (हरिजन, खंड ६, पृ. २८७).

वरील युक्तिवादाचा उदार अन्वयार्थ लावायचा म्हटला तर, भावी काळात भारतीय स्वातंत्र्यासाठी कराव्या लागणाऱ्या लढ्यावर दृष्टी ठेवून संघटनेची एकसंधता व सामर्थ्य यांच्यात फूट पडू नये अशी गांधींची इच्छा होती; त्याच वेळी शासनयंत्रणेच्या साहाय्याने खेडेगावात शिरून आणि तेथील आर्थिक जीवनाची पुनर्घटना करून त्या लढ्यासाठी भक्कम तयारी ते करू पाहात होते. परंतु कॉंग्रेस सरकारे दिवसेंदिवस दोन परस्परविरोधी हितसंबंधांतील "मध्यम" मार्ग काढण्याकडे अधिकाधिक झुकू लागली होती. याच्या जोडीला, लवकरच, गांधींनी पुरस्कारलेल्या मार्गापेक्षा वेगळ्याच मार्गाने देशाची आर्थिक पुनर्रचना करू पाहणारे आर्थिक नियोजन करण्याचे कॉंग्रेसने ठरवले.

१९३९ च्या उत्तरार्धात महायुद्धाचा भडका उडेपर्यंत कॉंग्रेसजन व गांधी यांमधील अंतर्विरोध ठळकपणे उघड झाला नाही. मध्यंतरीच्या काळात गांधींनी कॉंग्रेस सरकारांशी आणि कॉंग्रेसमधील पांढरपेशा शिक्षित वर्गाशी जास्तीत जास्त सहकार्य करण्याचा प्रयत्न केला. पांढरपेशा शिक्षित वर्गाशी त्यांचे कधीच पूर्णपणे सूत जमले नव्हते. आताही त्यांच्यातील अंतर संपूर्णपणे नष्ट झाले नाही.

१९३७ ते १९३९ या वर्षांत कामगारांच्या उग्र चळवळी झाल्या. १९२० च्या असहकाराच्या मोहिमेनंतरच्या काळात झालेल्या चळवळींसारखे या कामगार आंदोलनांचे स्वरूप नव्हते; त्या चळवळी गांधीप्रणीत सत्याग्रहमार्गावर विश्वास ठेवून, सत्याग्रही शिस्त अंगी बाणविण्याच्या उद्देशाने जणू चालविल्या गेल्या होत्या. उलट या काळातील कामगार चळवळींचा सत्याग्रह मार्गावर विश्वास नव्हता. १९३७ मध्ये कलकत्त्याच्या नागरिकांमध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त मुदतीचा मोठा संप झाला. त्याचप्रमाणे १९३८ च्या नोव्हेंबरमध्ये मुंबईच्या गिरणीकामगारांनी संप केला तेव्हा तर गोळीबारही करावा लागला. मे १९३९ मध्ये दिग्बोईच्या तेल कारखान्यात संप झाला. त्याच वर्षी सेरामपूर (बंगाल) चे ताग कामगार संपावर गेले. यांपैकी बंगालखेरीज अन्य दोन्ही प्रांतांत कॉंग्रेस अधिकारारूढ होती. संपपरिस्थिती हाताळताना या सरकारांनी अवलंबि-

लेले धोरण व उपाय गांधींनी अहमदाबाद संपात वापरलेल्या मार्गापेक्षा फारच भिन्न होते.

त्या वेळचे कॉंग्रेस अध्यक्ष श्री. सुभाषचंद्र बोस यांनी स्वतःच कॉंग्रेस संघटनेतील वाढत्या तीव्र दुफळीकडे देशाचे लक्ष वेधून घेतले. फेब्रुवारी १९३८ मध्ये हरिपुरा येथील कॉंग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना आपल्या भाषणाच्या शेवटी ते म्हणाले, ' आपल्यापुढे सध्या एक गंभीर परिस्थिती उभी आहे. कॉंग्रेसमध्येच डावे-उजवे असे मतभेद आहेत. त्यांकडे आता दुर्लक्ष करून चालणार नाही... कॉंग्रेस हीच जनतेचा लढा चालवू शकेल अशी देशातील सर्वशक्तिमान संघटना आहे. तीत डावे-उजवे गट असतीलही पण भारताच्या मुक्तीसाठी झगडणाऱ्या सर्व साम्राज्यशाहीविरोधी गटांचे कॉंग्रेस हे सामान्य व्यासपीठ आहे... सर्व डाव्या गटांना मी विशेषत्वाने आवाहन करतो की, त्यांनी आपली सर्व साधने आणि सामर्थ्य एकवटून कॉंग्रेसचे लोकशाहीकरण करावे व तिची अत्यंत व्यापक अशा अधिष्ठानावरील साम्राज्यशाही-विरोधी संघटना म्हणून पुनर्घटना करावी...

' शेवटी मी तुमच्या व माझ्याही भावना व्यक्त करण्यासाठी म्हणेन की, साऱ्या भारताची अशी आशा आणि नम्र प्रार्थना आहे की, गांधीजींनी पुढील अनेक वर्षे आमच्यातच राहावे. त्यांना गमावणे भारताला परवडणारे नाही; निदान या घडीला तर नाहीच नाही. कडवटपणा व द्वेष यापासून आमचा लढा मुक्त ठेवण्यासाठी ते आम्हाला हवे आहेत. भारताच्या स्वातंत्र्यासाठी ते आम्हाला हवे आहेत– आणि शेवटी साऱ्या मानवजातीसाठीही ते आम्हाला हवे आहेत. कारण आम्ही केवळ भारतासाठीच लढत नसून साऱ्या मानवजातीसाठीच लढत आहोत ' ( इं. ॲ. र., १९३८, I, पृ. ३४८ ).

( ४ ) **संस्थानांतील चळवळी :** १९२३–१९२८ या काळापेक्षा १९३७–१९३९ ही वर्षे आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण सत्याग्रहामुळे वेगळी ठरतात.* देशभर विखुरलेल्या व एतद्देशीय राज्यांच्या अंमलाखाली असलेल्या सुमारे पाचशे संस्थानांत राजेशाहीच्या जागी प्रातिनिधिक जबाबदार राज्यपद्धती सुरू व्हावी यासाठी हा सत्याग्रह करण्यात आला.

१९३५ च्या सुधारणांनुसार ब्रिटिश अंमलाखालील हिंदुस्थान व संस्थानिकांच्या ताब्यातील हिंदुस्थान यांचे एक संघराज्य बनवावे असे सुचविण्यात आले होते. ब्रिटिश

* या वर्षात काही किरकोळ स्वरूपाचे, फारसे महत्त्व नसलेले इतर काही सत्याग्रह झाले. ते सर्व कॉंग्रेसजनांनी केलेले नव्हते. ' ओम्-मंडळी ' सत्याग्रह ( कराची ), व ' अंधार कोठडी–स्मारक ' सत्याग्रह ( कलकत्ता ), ही अशी उदाहरणे आहेत.

हिंदुस्थानातील प्रजेला अधिकच, काही विशिष्ट प्रमाणात, प्रातिनिधिक सरकारे मिळाली होती. संस्थाने त्या दृष्टीने खूपच मागासलेली होती. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत संघराज्य करण्याच्या कल्पनेला काँग्रेस व इतर पक्षांनी कडाडून विरोध केला होता.

१९३७–१९३९ या वर्षांत (राजस्थानमधील) सिकर, त्रावणकोर, म्हैसूर, हैद्राबाद इत्यादी ठिकाणी संस्थानिकांच्या अनिर्बंध राज्यसत्तेविरुद्ध चळवळी झाल्या. तसेच ओरिसामधील ढेंकानाल, तालचेर व रणपूर या संस्थानांतही उग्र स्वरूपाची आंदोलने झाली. काँग्रेसने या संस्थानी प्रजेच्या आंदोलनांबद्दल आपली सहानुभूती स्पष्ट शब्दांत व्यक्त केलेली असली तरी एकंदरीत पक्ष म्हणून काँग्रेसचा कल या आघाडीवरील गंभीर लढे टाळण्याकडेच होता.

अशा संस्थानी प्रजांच्या चळवळीत कित्येक वेळा स्थानिक काँग्रेसजनांनी स्वतःहूनच पुढाकार घेतला. हैद्राबादमध्ये ही चळवळ आर्यसमाजाने सुरू केली. परंतु बहुतेक प्रसंगी गांधींचा हे प्रसंग टाळण्याकडेच कल असे. ब्रिटिश हिंदुस्थानातील प्रजा थोड्याफार प्रमाणात का होईना, सत्याग्रहाचा उद्देश व तंत्र यांच्याशी परिचित होती. संस्थानी प्रजेला या गोष्टी अगदीच नवीन होत्या. त्यामुळे, गांधींच्याच सांगण्यावरून, मेवाड व हल्लीच्या मध्य प्रदेशातील राजनांदगाव व छुईकदान येथील सत्याग्रह स्थगित करण्यात आले.

राजकोट संस्थानात गांधी स्वतःच वैयक्तिकरीत्या चळवळीत गुरफटले गेले. चळवळीतील गतिमानता नष्ट होऊन ती कोंडीत सापडली तेव्हा कोंडी फोडण्यासाठी गांधींनी, मागे अहमदाबाद संपप्रकरणी केले होते तसे, उपोषण सुरू केले. त्यामुळे चळवळीला गती आली; पण तिचे स्वरूप विकृत झाले. या सत्याग्रहात सामान्य जनतेने गंभीरपणे भाग घेतला नाही. सत्याग्रहाला व्यक्तिशः गांधीजी आणि संस्थानी राजवट यांच्यातील संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले. तेथील जनता व तिचे स्थानिक पुढारी श्री. वल्लभभाई पटेल हे पूर्णपणे बाजूला सारले गेल्यासारखे झाले.

हरिपुरा येथील काँग्रेस अधिवेशनाचे वेळी व काँग्रेस वर्किंग कमिटीच्या ११ ते १६ डिसेंबर १९३८ या काळात वर्ध्याला झालेल्या बैठकीत संस्थानी प्रजेच्या चळवळीसंबंधी काँग्रेस धोरण स्पष्ट करण्यात आले (इं. ॲ. र., १९३८, II, पृ. २९९). भावनगर प्रजापरिषदेच्या अध्यक्षीय भाषणात श्री. वल्लभभाई पटेल यांनी तर अशी प्रच्छन्न धमकीच दिली की, 'संस्थानिकांनी प्रजेचे खरेखुरे हितरक्षक झाले पाहिजे. इंग्लंडच्या बादशहाचे पावलावर पाऊल टाकून त्यांनी राजा व प्रजा यांचा संघर्ष कायमचा टाळण्यासाठी उपाय शोधले पाहिजेत. तसे न केल्यास संघर्ष अटळ आहे' (इं. ॲ. र., १९३९, I, पृ. ३२). बडोदा संस्थान प्रजापरिषदेच्या १५ व्या अधिवेशनाच्या वेळी श्री. पटेल असेही म्हणाले की, 'जोपर्यंत लोकनियुक्त विधिमंडळे संस्थानांतही स्थापन केली जात नाहीत व तेथील राज्यकारभार पूर्णपणे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या

संमतीने व पसंतीने होत नाही तोपर्यंत संघराज्याची भाषा करण्यात काही अर्थ नाही' (इं. ॲ. र., १९३८, II, पृ. २१).

संस्थानिक हे ब्रिटिश नाचवीत असलेले कागदी घोडे आहेत असे मत गांधींनी प्रथम १९०९ साली व पुन्हा १९१५ साली व्यक्त केले होते, याची येथे आठवण करून देणे योग्य होईल. ब्रिटिश सरकारची मर्जी आहे तोवरच ते राजे. स्वतःचे राज्य टिकवण्याचे सामर्थ्य संस्थानिकांजवळ नव्हते. संस्थानांच्या प्रश्नाबद्दल काँग्रेस वर्तुळामध्ये काहीसे औदासिन्य प्रथमपासूनच दिसून येत होते त्याचे हे कारण होते. ब्रिटिशांबरोबर असणाऱ्या झगड्याचा जर निकाल लावता आला तर संस्थानांचा प्रश्नच उरणार नाही असे काँग्रेसचे मत होते.

गांधींनी १९४२ मध्ये अमेरिकन वार्ताहर श्री. लुई फिशर यांना एक मुलाखत दिली होती. तेव्हा ते म्हणाले होते की, जर शेतकऱ्यांनी जमिनीचा "ताबा घेतला" तर मालक "सहकार्य" करतीलच. त्यावर, जमीनदार असे करतील का, याविषयी श्री. फिशर यांनी दाट शंका प्रदर्शित केली. तेव्हा गांधी म्हणाले, 'मालक पळून जाऊन सहकार्य करतील' (फिशर, १९४२, पृ. ९०–९१). गांधींची या उद्गारांमागील भूमिका आणि संस्थानिकांच्या संदर्भातील काँग्रेसची वृत्ती यात एक साम्य आहे.

(५) **सार्वत्रिक शिक्षण :** काँग्रेस सरकारांपुढील अनेक तातडीच्या प्रश्नांपैकी शिक्षण हा एक अत्यंत निकडीचा प्रश्न होता. दारिद्र्याच्या प्रश्नाच्या खालोखाल शिक्षणाच्या प्रश्नाला महत्त्व होते. या वेळी गांधींनी अगदी दूरवरच्या खेड्यापर्यंत योग्य प्रकारचे शिक्षण पोचवता येईल असा एक विधायक मार्ग सुचवला. या शिक्षण पद्धतीला प्रथम 'वर्धा-पद्धती' व पुढे 'बेसिक-एज्युकेशन' किंवा 'नई तालीम' म्हणण्यात येऊ लागले.

या बेसिक पद्धतीत मुलाला शाळेत असतानाच एखादा हस्तव्यवसाय शिकावा लागे. यातील वैशिष्ट्य असे की, हा हस्तव्यवसाय मुख्यतः पुस्तकी असलेल्या शिक्षणाला कृत्रिमरीत्या जोडलेला एक भाग असणार नव्हता; तर सारे शिक्षणच त्या मूलोद्योगाच्या अनुषंगाने देण्याची ही योजना होती. ही पद्धत बऱ्याच प्रमाणात पीटर क्रोपोट्किन किंवा जॉन ड्युईसारख्या शिक्षणतज्ज्ञांनी प्रसृत केलेल्या कल्पनांशी मिळतीजुळती होती.

पण त्यात एक मोठा फरकही होता. हिंदुस्थान गरीब असल्यामुळे आवश्यक तितक्या शाळा चालवणे सरकारला आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नव्हते. खर्चाचा बराचसा भाग मुलांनी निर्मिलेल्या वस्तूंच्या विक्रीतूनच भागविला जावा अशा प्रकारे गांधींनी आपली योजना बनवली होती. शाळेतील वरच्या वर्गांच्या बाबतीत ही गोष्ट विशेषत्वाने लागू होती. ड्यूईसारख्या शिक्षणतज्ज्ञांनी शरीर व मन यांच्या शिक्षणाचे साधन म्हणून हस्तोद्योगाची

शिफारस केली होती. गांधींना मात्र शाळा हे केवळ शिक्षणासाठी शिक्षण देण्याचे स्थान असावे हे मान्य नव्हते. शिक्षण पूर्ण केल्यावर मुलगा मिळवता बनेल असे शिक्षण शाळेत मिळावयास हवे, अशी त्यांची भूमिका होती. शिकण्याच्या ओघात हस्तोद्योगामध्ये प्राविण्य प्राप्त करून घेणे व्यवहारात त्याला उपयोगी पडणार होते ( इं. अॅ. र., १९३७, II, पृ. ४५१–४५८ ).*

'हिटलर लष्कराच्या सामर्थ्यावर आपले उद्दिष्ट साध्य करीत आहे तर ते स्वतः त्यांचे उद्दिष्ट शांततेच्या मार्गाने साध्य करीत आहेत ' ( इं. अॅ. र., १९३८, I, पृ. १८ ), असे उद्गार गांधींनी काढल्याचे वृत्त आहे.

नॅशनल लिबरल फेडरेशनने या बेसिक पद्धतीला जोरदार विरोध केला. त्यांनी १९३७ मध्ये पुढील आशयाचा ठराव संमत केला. 'या निर्णयाचे फेडरेशनला भय वाटते... प्राथमिक शिक्षण जवळजवळ स्वावलंबी करण्याचे धोरण संपूर्णपणे अव्यवहार्य आहे. या शिक्षणपद्धतीत मुलांनी हस्तोद्योगांतून उत्पन्न मिळवावे यावर भर दिला जातो आणि संस्कारग्रहणाला, बौद्धिक–सांस्कृतिक विकासाला गौणत्व दिले जाते. ही पद्धत अशीच चालू ठेवली तर देशाची परागती होईल, असे या फेडरेशनचे मत आहे, ( इं. अॅ. र. १९३७, II, पृ. ३७६ ). पुढच्याच वर्षी फेडरेशनच्या अध्यक्षांनी वर्धा-पद्धतीचा उल्लेख पुढीलप्रमाणे केला : 'शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने वर्धा-पद्धती अगदीच अयोग्य आहे याबद्दल तुम्ही माझ्याशी सहमत व्हाल असे मला वाटते. शिक्षणाला अगदी प्राथमिक अवस्थेपासून एक प्रकारचे कडवे " लष्करी " वळण लावणे चूक आहे. मला व तुम्हा सर्वांनाच आपल्या स्वतःच्या व शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांना गिरणीतले मजूर बनवायचे नाही. " फॅक्टरी अॅक्ट "मुळे मालकावर काही बंधने तरी असतात. या पद्धतीत मुलांच्या कामावर कसलीच बंधने नाहीत हे वर आणखी. शिक्षण आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण होऊ शकते हा या देशातील अजब शोध दिसतो. मला असे वाटत होते की, जो पक्ष जनतेचे प्रातिनिधित्व करीत असल्याचा दावा सांगतो त्याच्या तरी ही गोष्ट लक्षात यायला हवी होती की, शैक्षणिक समान संधीच्या पायावरच आर्थिक समान संधीची उभारणी करता येते. शिवाय उच्च प्रतीच्या शिक्षणाचा हिशेब रुपये-आणे-पैत करता येणार नाही ' ( इं. अॅ. र., १९३८, II, पृ. ३७३ ).

---

*' नयी तालीम ' शिक्षण व्यवस्थेची कल्पना थोडक्यात पण अत्यंत उत्तम प्रकारे इ. डब्ल्यू. आर्यनायकम् यांच्या ' दि स्टोरी ऑफ ट्वेल्व्ह इयर्स ' ( १९५०, हिंदुस्थानी तालीमी संघ, वर्धा ) या पुस्तकात दिलेली आहे. आचार्य कृपलानींचे ' दि लेटेस्ट फॅड : बेसिक एज्युकेशन ' १९४६; सी. जे. वार्के यांचे ' दि वर्धा स्कीम ऑफ एज्युकेशन ' २ री आवृत्ती, १९४६ आदी पुस्तकेही पाहावीत.

मुस्लिम लीगचाही या पद्धतीला विरोधच होता. पण त्यांची कारणे अगदी वेगळी होती. त्यांच्या मते ही पद्धती अ-मुस्लिम होती; इतकेच नव्हे तर मुस्लिम संस्कृतीला मारक होती. ऑल इंडिया मुस्लिम एज्युकेशनल कॉन्फरन्सच्या अध्यक्षस्थानावरून श्री. फजलुल हक यांनी बेसिक शिक्षणपद्धतीवर 'या पद्धतीमुळे शाळांचे रूपांतर आश्रम किंवा कारखाने यांत होईल' अशी टीका केली. त्यांची पुढे अशीही सूचना होती : '...इस्लाममध्ये ऐहिक व आध्यात्मिक विकास अविभाज्य मानलेला असल्याने सर्वच शाळांतून मुस्लिम शिक्षकांचे प्रमाण पुरेसे असले पाहिजे. त्यामुळे मुस्लिम मुलांच्या मनांचा विकास पूर्णतः अ-मुस्लिम वातावरणात होण्याचे तरी थांबेल. तसेच मुसलमान मुलांवर संगीत शिकण्याची व 'वंदे मातरम्' म्हणण्याची सक्ती करण्यात येऊ नये. कारण या दोन्ही गोष्टी इस्लामच्या तत्त्वाविरुद्ध आहेत.' (इं. ॲ. र., १९३८, II, पृ. ४३८).

मुस्लिम लीगने १९३९ मध्ये पीरपूरच्या राजेसाहेबांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिमांच्या शैक्षणिक प्रश्नांवर अहवाल तयार करण्यासाठी एक समिती नेमली. ८ एप्रिलला या समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला. वर्धा पद्धतीवर त्यात फार महत्त्वाची टीका केलेली आढळते. त्यात असे म्हटले आहे की, 'वर्धा पद्धती ही भारतातील निरनिराळ्या धर्मांच्या अतीत असल्याचा दावा करण्यात येतो. पण वस्तुतः इतर सर्व धर्मांच्या जागी "गांधीवाद" या नव्याच धर्माची प्रस्थापना करणे हे या पद्धतीचे ध्येय दिसते.' हा अहवाल पुढे असेही म्हणतो, 'आम्ही अहिंसेच्या तत्त्वप्रणालीचा कोणत्याही प्रकारे धिक्कार करीत नाही. परंतु शैक्षणिक पद्धतीत इतरही राजकीय तत्त्वप्रणाली शिकवण्यास वाव असला पाहिजे असे आम्हाला वाटते. अगदी लहानपणापासून अहिंसा तत्त्वाच्या श्रेष्ठत्वाचाच संस्कार मुलांमुलींवर झाला तर, वांशिक श्रेष्ठत्वाच्या तत्त्वप्रणालीच्या दृढ संस्कारांमुळे काही सर्वंकष हुकूमशाही राष्ट्रांत झालेल्या दुष्परिणामांसारखेच या गोष्टीचेही दुष्परिणाम होतील यात शंका नाही. एखाद्या राजकीय पक्षनेत्याच्या सिद्धांतप्रणालीवर सारी शिक्षणपद्धती आधारणे ही गोष्ट सर्वंकष हुकूमशाहीतच शोभून दिसेल. शिक्षणाच्या मूलतत्त्वांच्या विरोधी अशी ही गोष्ट आहे. शिक्षण म्हणजे एका विशिष्ट "धर्मा"चे संस्कार देणे असे होईल. प्राथमिक शिक्षणाच्या एका विशिष्ट पद्धतीतून दोन ( हिंदू व मुसलमान ) राष्ट्रांना एकत्र आणून त्यातून एकच एकात्म संस्कृती निर्माण करावी हाही शिक्षणपद्धती स्वीकारण्याबद्दलच्या आग्रहाचा सरळसरळ गर्भित उद्देश आहे. राष्ट्रातील सर्व तरुणांना कॉंग्रेसच्या कळपात ओढण्यास त्यामुळे सोपे जाणार आहे' ( इं. ॲ. र., १९३९, I, पृ. ४७५ ).

तत्पूर्वी अ. भा. मुस्लिम लीगच्या डिसेंबर १९३८ मध्ये पाटण्याला भरलेल्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. महंमद अली जीना यांनी वर्धा-पद्धती आणि विद्यामंदिर-

पद्धती यांबद्दल पुढील उद्‌गार काढले : ' फार खोलवर विचार करून व विशिष्ट अंतःस्थ हेतू मनात ठेवूनच या पद्धतींचा पुरस्कार करण्यात येत आहे. यामागे गांधींची धूर्त बुद्धी आहे. मुळात जे ध्येय उराशी बाळगून काँग्रेसने प्रस्थान ठेवले होते ते ध्येय या गांधींनीच नष्ट केले व काँग्रेसचे रूपांतर केवळ हिंदूंच्या जातीय संघटनेत करून सोडले. हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन व प्रसार करण्याच्या हेतूनेच त्यांनी ही गोष्ट केली ' ( इं. ॲ. र., १९३८, II, पृ. ३४५ ).

बेसिक पद्धतीवर झालेल्या या दोन अगदी भिन्न प्रकारच्या टीका सोडल्या तरी या शिक्षणपद्धतीचा अंगीकार करण्यात अंतर्गत स्वरूपाच्या अडचणीही होत्या. सात प्रांतांतील काँग्रेस सरकारांनी ही पद्धती स्वीकारली होती. परंतु ती प्रत्यक्षात आणण्याचे काम ज्या अधिकाऱ्यांना करावयाचे होते त्यांपैकी कित्येकांचा तिच्यावर किंवा तिच्यामुळे होणाऱ्या सामाजिक क्रांतीवर विश्वास नव्हता. या पद्धतीचे अंतिम उद्दिष्ट स्पष्ट करताना गांधींनी लिहिले होते, ' सूत-कताई किंवा कापूस पिंजणे यांसारख्या ग्रामीण हस्तोद्योगांच्या माध्यमातून दिले जाणारे प्राथमिक शिक्षण ही एका निःशब्द पण मूलग्राही सामाजिक क्रांतीची सुरुवात ठरावी अशीच त्यापाठची योजना आहे. शहरे व खेडी यांच्यातील संबंधाला निकोप व नैतिक अधिष्ठान त्यामुळे प्राप्त होईल. सांप्रतच्या असुरक्षिततेतून उद्भवणाऱ्या अनिष्ट परिणामांपैकी काहींचे उच्चाटन करण्याला आणि वर्गावर्गांतील विषारी संबंध काही प्रमाणात निवळण्यास त्यामुळे खूपच साहाय्य होईल. दिवसेंदिवस नष्ट होत चाललेली आमची खेडी त्यामुळे बचावतील. त्यामुळे या समाजरचनेत ' आहेरे ' व ' नाहीरे ' ही अत्यंत कृत्रिम विभागणी उरणार नाही. प्रत्येकाला जीवनवेतन मिळण्याची निश्चितता लाभेल, म्हणजे प्रत्येकाचा स्वातंत्र्यावरील हक्कही अबाधित राखला जाईल, अशा अधिक न्याय्य समाजरचनेचा पाया घातला जाईल. विशेष म्हणजे, हे सर्व एखाद्या भयंकर, रक्तलांच्छित वर्गयुद्धाशिवायच किंवा भारता-सारख्या खंडप्राय देशाचे यांत्रिकीकरण करण्यासाठी लागणाऱ्या अतिप्रचंड भांडवली खर्चाशिवायच होईल. शिवाय, परदेशी यंत्रसामुग्रीवर किंवा परदेशीयांच्या तांत्रिक कौशल्यावर असहाय्य व अगतिक होऊन अवलंबून राहावे लागणार नाही. इतकेच नव्हे तर कोणत्याही प्रकारच्या खास प्राविण्यावर अवलंबून राहावे न लागल्याने या योजनेत लोकच आपले भवितव्य घडवतील ' ( सिलेक्शन्स, क्र. ८३४ ).

बेसिक शिक्षणाच्या या पैलूमुळेच त्यावर नेमस्तांनी किंवा मुस्लिम लीगने केलेल्या टीकेपेक्षा अधिक सूक्ष्मतर टीका होण्याची शक्यता होती. बेसिक शाळांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यास सरकारी वर्तुळातही विरोध होता. आणि खरोखरच स्वातंत्र्यप्राप्ती-नंतर जेव्हा काँग्रेस सरकारांजवळ पैसा होता व तो हवा तसा खर्च करण्याची सत्ता होती तेव्हा काँग्रेस सरकारांनी मोठमोठ्या इमारती व इतर साधनसामुग्रीवर तो हवा

तसा खर्च केला. त्यामुळे बेसिक शाळा मार्गभ्रष्ट झाल्या. या औदार्याखाली त्या गुदमरून गेल्या. त्यांचे स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट कोठल्या कोठे लुप्त झाले. तो आदर्श अव्यवहार्य आहे असेच मानण्यात येऊ लागले.

काँग्रेस अधिकारांवर आल्यानंतर देशाच्या निरनिराळ्या भागांत काही अत्यंत खर्चिक शाळा काढण्यात आल्या ही गोष्टही मोठी लक्षात घेण्यासारखी आहे. यांतील बहुतेक शाळा इंग्लंडमधील पब्लिक स्कूलच्या धर्तीवर सुरू केल्या गेल्या. राज्यकर्ते, प्रशासक, व्यापारी, उद्योगपती, इत्यादिकांचा जो एक वर्ग स्वातंत्र्योत्तर काळात उदयास आला त्यांनी आपली मुले "चांगल्या शिक्षणासाठी" या शाळांत किंवा आधीच असलेल्या इंग्रजी "कॉन्व्हेन्ट" शाळांत पाठवली, बेसिक शाळांत पाठवली नाहीत. थोडक्यात असे म्हणता येईल की, गांधींच्या नव्या शिक्षणपद्धतीवर प्राणघातक आघात बाहेरच्या कोणी केला नाही; तो आमच्या आम्हीच केला.

दरम्यान, शैक्षणिक क्षेत्रात गांधीवादी आदर्शावर विश्वास ठेवणारे कार्यकर्ते देशाच्या कानाकोपऱ्यात एकाकीपणे झगडतच राहिले. दुसरे महायुद्ध सुरू होऊन काँग्रेसने सत्तात्याग केल्यानंतर बेचाळीसच्या चले-जाव चळवळीत या कार्यकर्त्यांना पुन्हा तुरुंगात जावे लागले.

( ६ ) **मुस्लिम लीगचा 'राष्ट्रवाद'** : सत्तेवर असताना काँग्रेसला अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागले. त्यांपैकी मुस्लिम लीगने घेतलेल्या पवित्र्यामुळे निर्माण झालेली समस्या राजकीयदृष्ट्या सर्वांत गंभीर होती असे मानण्यात येते.

खिलाफत चळवळ ओसरल्यानंतरच्या काळात काही मुसलमान काँग्रेसपासून दूर गेलेले होते, काही काँग्रेसशी एकनिष्ठ राहिलेले होते, व काहींनी वेगवेगळ्या रंगांचे राष्ट्रवादी पक्ष स्थापन केले होते. मुस्लिम लीगने मात्र सतत काँग्रेसला विरोध करण्याचेच धोरण ठेवले होते.

मुसलमानांचे हितसंबंध वेगळे आहेत आणि त्यांची जपणूक करण्यासाठी त्यांना विशेष संरक्षण देण्याची गरज आहे यावर अनेक मुस्लिम पुढाऱ्यांनी व संघटनांनी भर दिला होता तरी देशातील इतर पक्षांशी व जमातींशी समझौता करण्याची गरज आजपर्यंत सर्वांनीच मानली होती. मुसलमानांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, त्यांच्या मागण्या पुढे मांडणाऱ्या वेगवेगळ्या पक्षांमध्ये मतभेद होते, पण त्यांपैकी कोणीही मुसलमानांचे एक वेगळे राष्ट्र संघटित करावे असे म्हटले नव्हते. काँग्रेसने सत्ताग्रहण केल्यानंतर ही नवीच मागणी पुढे आली.

एखाद्या समाजाला समान शत्रू उपस्थित होतो तेव्हा त्या समाजात राष्ट्रवादाची भावना परिपुष्ट होते हे राजकीय क्षेत्रातील "राष्ट्रवादा"चे वैशिष्ट्यच आहे. वास्तविक

मुस्लिम समाज कधीच एकसंध नव्हता. अर्थात हिंदूंचीही तीच गोष्ट होती. पण ब्रिटिश साम्राज्यशाहीला विरोध करण्याच्या प्रक्रियेतून हिंदू समाज एका राष्ट्रात हळूहळू संघटित होत होता; मग कॉंग्रेस, सशस्त्र क्रांतिकारक, नेमस्त, अशा कोणत्याही पक्षात का तो असेना. सर्वांनाच राष्ट्रीय अस्मिता मूर्त करण्याची निकड वाटत होती. परकीय सत्तेखाली आपण चिरडले जात आहोत या अनुभूतीतून एक संपन्न व समृद्ध सांस्कृतिक उत्थान घडून आले होते. पण त्याचे कूळ "हिंदू" होते हे ओळखण्यात चूक होता कामा नये.

अशा रीतीने, एकीकडे, हिंदूंचे संघटन एका "राष्ट्रा"त होत असताना एक जमात या दृष्टीने मुसलमान मात्र वेगळेच राहिले होते. सय्यद अहमद यांसारख्या काही पुढाऱ्यांनी अंतर्गत सुधारणा करण्याचा, विशुद्ध, वैराग्यशील, धर्मपरायणता जागृत करून तिच्याद्वारे मुसलमानांना एकसंध करण्याचा प्रयत्न केला. असे असले तरी, राष्ट्रवादाच्या उत्कर्षामुळे घडून येणाऱ्या संघटनांपासून सामान्यतः मुस्लिम समाज दूरच राहिला होता.

मुस्लिम लोकांचे एकसंध संघटन करण्याची संधी १९३७ च्या घटनांनंतर चालून आली आहे हे ज्यांनी ओळखले अशा सर्व पुढाऱ्यांत श्री. महंमद अली जीना हे सर्वांत जास्त दूरदृष्टीचे होते; कार्यवाहीच्या दृष्टीनेही ते सर्वात प्रभावी ठरले यात शंका नाही. एके काळी ते एकात्म भारतीय राष्ट्रीयत्वाचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यापासून स्पष्टपणे वेगळे होऊन त्यांनी आता साऱ्या मुसलमानांना एका वेगळ्या "राष्ट्रा"त संघटित करण्याच्या ध्येयाला स्वतःला वाहून घेतले. भारतीय राष्ट्र ब्रिटिश सत्तेच्या विरोधातून निर्माण झाले, तर १९३७–३९ या काळातील कॉंग्रेस राजवटीच्या विरोधातून मुस्लिम राष्ट्रवादाचा उदय झाला असे म्हणणे अतिसरळ वाटले तरी त्यात बरेच तथ्य आहे. किमानपक्षी, मुस्लिम राष्ट्रवादाची निर्मिती प्रत्यक्ष व्यवहारात तरी कॉंग्रेस राजवटींना शत्रुस्थानी ठेवून केली गेली हे नक्की.

श्री. महंमद अली जीनांनी अनेक आघाड्यांवर कॉंग्रेसवर हल्ला केला. आपण कॉंग्रेस नष्ट करण्याइतका जबरदस्त टोला देऊ शकू किंवा नाही याच्या फिकीरीत न पडता त्यांनी आपले हल्ले अविरत चालू ठेवले.पहिल्या महायुद्धाच्या काळात अरबस्तानात टी. इ. लॉरेन्सने अंगिकारलेली युद्धनीतीच जिनांनी अंगीकारली होती असे म्हणता येईल. आपण मध्य अरबस्तानातील तुर्कांची सत्ता नष्ट करू शकत नाही हे लॉरेन्सला निश्चित माहीत होते. परंतु आपण एकसारखे हल्ले करीत राहिलो आणि जखम सारखी वाहती ठेवण्यात यशस्वी झालो तर तुर्की राज्यसत्तेला आपले पाय परत भक्कम रोवता येणार नाहीत ही गोष्ट त्याने ओळखली होती.

जिनांची युद्धनीती याच्याही पुढे एक पाऊल जाणारी होती. कॉंग्रेसने मुस्लिम जनते-

पुढे मैत्रीचा हात पुढे करावा यालाही जिनांची तयारी नव्हती. हिंदू व मुस्लिम यांच्यात एक मानसिक भिंत उभी करण्यात त्यांना यश आले. मुस्लिम जनतेत वेगळा राष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी काँग्रेसविरुद्धच्या लढ्यात त्यांनी जे पवित्रे टाकले त्यांची थोडक्यात रूपरेषा पुढे दिली आहे.

या संदर्भात एका डावपेचाकडे येथेच लक्ष वेधणे इष्ट ठरेल. हा डावपेच राजकीयदृष्ट्या फारच महत्त्वाचा ठरला. मुस्लिम लीग सोडून दुसरी कोणती संघटना मुसलमानांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करू शकते ही गोष्ट मान्य करायलाच त्यांनी नकार दिला. काँग्रेसमध्ये अनेक मुसलमान असतील, अनेक राष्ट्रीय मुसलमानांनी स्वतःच्या जमियत-उल-उलेमा-इ-हिंद, अहरार परिषद किंवा शिया परिषद नावाच्या वेगळ्या संघटना स्थापन केल्या असतील, पण या संघटनांची कोणत्याही प्रकारे दखल घेण्यास जीनांनी नकार दिला. या संघटनांतील मुसलमानांना एक वेगळ्या निष्ठा असलेला गट म्हणून त्यांनी ओळख द्यायचेच नाकारले. अशा मुसलमानांना सुट्या व्यक्ती म्हणून वागविले, त्यांची " हस्तक ", " बाहुली " म्हणून बदनामी चालविली. काँग्रेसबद्दल, ती एक केवळ हिंदूंच्या हितसंबंधांची प्रातिनिधिक संघटना आहे असा त्यांनी धोशा लावला. तिच्या वतीने केला जाणारा अन्य कोणताही दावा मानायला जीना तयार नव्हते.

जीनांनी आपल्या वरील मतांचा सतत प्रचार केला. ' काँग्रेस म्हणजे जिच्याशी युद्ध करावयाचे आहे किंवा वेळप्रसंगी डावपेच म्हणून शांततेची बोलणी करावयाची आहेत अशी शत्रु-संघटना ' ही भावना मुस्लिम लोकांवर ठसवून त्यांच्या ठायी एक राष्ट्रवाद मूर्त करण्यात जीना यशस्वी झाले. या संबंधात त्यांनी दाखविलेल्या अद्वितीय चिकाटीमुळेच मुस्लिम राष्ट्र अस्तित्वात आले. हिंदू जसे एके काळी ख्रिश्चन, जैन, शीख किंवा आदिवासी यांच्यापासून वेगळे उठून दिसत नव्हते तसेच त्यापूर्वी मुसलमान ही हिंदी जनसागरात लोप पावलेली एक जमात होती. सांस्कृतिकदृष्ट्या पृथगात्म असूनही जैन, शीख, आदी जमातींतून राष्ट्रे उदयास आली नाहीत. पण जीनांच्या कर्तृत्ववान नेतृत्वामुळे मुसलमानांचे ' राष्ट्र ' निर्माण झाले.

काँग्रेस राजवटीचा विरोध जीनांनी कसा चालविला होता याचा आता आपण थोडक्यात इतिहास पाहू. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आपल्या धार्मिक श्रद्धांचा विचारही मनात न आणता त्या वेळी मुस्लिम व मुस्लिमेतर लोक अनेक संघटनांमध्ये एकत्र काम करीत होते. कामगार संघटना, शेतकरी संघ, किसान सभा, जमीनमालक संघ, चेंबर्स ऑफ कॉमर्स, ही त्याची काही उदाहरणे आहेत. खास मुसलमानांच्या संघटनांमध्ये प्रजा पार्टी, अहरार परिषद, जमियत-उल-उलेमा, काँग्रेस

नॅशनॅलिस्ट मुस्लिम्स, शिया कॉन्फरन्स आदी संघटनांचा समावेश होतो.

मुस्लिम लीगची पहिली आणि अत्यंत महत्त्वाची मागणी अशी होती की, वरील सर्व संघटनांना बाजूला ठेवून, केवळ एका मुस्लिम लीगलाच भारतातील मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संघटना म्हणून मान्यता मिळावी. त्यांच्या मते काँग्रेसला तर याबाबत काडीइतकाही अधिकार नव्हता. कारण ती केवळ हिंदूंच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारी संघटना होती. श्री. असफ अली हे काँग्रेसमधील राष्ट्रीय पातळीवरचे पुढारी होते. ते मुसलमान होते. त्यांनी एकदा असे म्हटले, 'एकूण ग्रामीण कर्जांपैकी सुमारे ३३ °/० कर्जे ( म्हणजे सुमारे ३०० कोटी रुपये ) मुसलमानांनी घेतलेली आहेत. त्यावर सरासरी ९ दराने व्याजाचा हिशेब केल्यास सर्व मुसलमानांना केवळ व्याजापोटी दरसाल २७ कोटी रुपये द्यावे लागतात, असा हिशेब निघतो. यांपैकी ७५°/० तरी रक्कम वेळेवर दिली जात नाही. अशा रीतीने वर्षानुवर्षे साचलेल्या ओझ्यामुळे असंख्य मुसलमान शेतकरी भूमिहीन बनतात. ' इंडियन ॲन्युअल रजिस्टरच्या एका लेखकाने वरील उद्‌गार उद्‌धृत करून म्हटले की, यांसारख्या प्रश्नांबाबत लीग आणि जीना उदासीन आहेत असे दिसते ( इं. ॲ. र., १९३८, I, पृ. ५८ ).

ही खरीच गोष्ट होती. मुसलमानांचे ' सांस्कृतिक ' हितसंबंध जपण्यावरच लीगचा भर होता. आर्थिक हितसंबंध तिने उचलून धरलेच तर ते धनिक वा मध्यमवर्गीयांचेच विशेषेकरून असत. कायदेमंडळातील मुस्लिम सभासद, स्वाभाविकपणेच, मुसलमानांचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित राखतील असे मुळी गृहीतच धरलेले होते. परस्परविरोधी आर्थिक हितसंबंधांनी मुसलमान समाज चिरफाळलेला नव्हता असाच त्याचा गर्भितार्थ होता. पण आपण आधीच पाहिले आहे की, मुसलमान वा हिंदू कोणाच्याच बाबतीत ही गोष्ट खरी नव्हती.

लखनौ येथील मुस्लिम लीगच्या अधिवेशनात जीनांनी अशी तक्रार केली की, ' अ. भा. मुस्लिम लीग ही निश्चितपणे व निर्विवादपणे भारतातील मुसलमानांच्या व इतर अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचे व हक्कांचे परिणामकारकरीत्या संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध असलेली संघटना आहे. तेच तिचे मूलभूत व मुख्य तत्त्व आहे. काँग्रेसने मात्र मुसलमानांशी जनतासंपर्क साधण्याच्या मिषाने मुसलमानांच्यात दुही माजवून त्यांना दुबळे करण्याचा व शेवटी नष्ट करण्याचा प्रयत्न चालवला आहे. तसेच मुस्लिमांच्या मान्यवर नेत्यांपासून मुसलमान जनतेला दूर नेण्याचाही काँग्रेसचा प्रयत्न आहे ' ( इं. ॲ. र., १९३७, II, पृ. ४०४ ). या संबंधात एक मोठा गमतीचा योगायोग दिसून येतो. नेमस्त पुढारी श्री. चिमणलाल सेटलवाड यांचीही काँग्रेसविरुद्ध हीच तक्रार होती. डिसेंबर १९३७ च्या नॅशनल लिबरल फेडरेशनच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले होते, ' मला अशी भीती वाटते की मुस्लिम लीगकडे दुर्लक्ष करून

व मुस्लिम पुढाऱ्यांना बगल देऊन सरळसरळ एकदम मुसलमान जनतेकडे जाण्याचा काँग्रेसने एक प्रकारे लीगला भडकावले आहे. अशा प्रयत्नांनी मुस्लिम समाजात अधिकच दुही माजेल. त्यामुळे हिंदू व मुसलमान जमातींत सन्माननीय तडजोड घडवून आणण्यामध्ये जास्तच अडचणी निर्माण होतील (इं. ॲ. र., १९३७, II, पृ. ३७०).

असो. जीना आणि काँग्रेसचे पुढारी– गांधी, राजेंद्रप्रसाद, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस– यांची जी अनेक वेळा बोलणी झाली त्यांतून जीनांच्या पुढील चौदा मागण्या आहेत असे दिसून आले (इं. ॲ. र., १९३७, I, पृ. २२९–२३०; इं. ॲ. र., १९३८, I, पृ. ३५९–३७६; इं. ॲ. र., १९३८, II, पृ. २८४–२८६). या सर्व मागण्यांची सविस्तर चर्चा राजेंद्रप्रसाद यांनी आपल्या 'इंडिया डिव्हायडेड' (१९४६) या पुस्तकात केली आहे. १९३८ मध्ये या मागण्या सामान्यतः पुढीलप्रमाणे होत्या :

१. मुस्लिम लीगने १९२९ मध्ये उपस्थित केलेले चौदा मुद्दे मान्य व्हावेत.

२. काँग्रेसने विभक्त मतदारसंघ निर्माण करणाऱ्या 'कम्युनल अवॉर्ड'ला असलेला विरोध काढून घ्यावा. तसेच त्यात राष्ट्रवादाचा धिक्कार आहे असा प्रचार करण्याचे थांबवावे.

३. निरनिराळ्या प्रांतांत मुसलमानांना सरकारी नोकऱ्यांत किती टक्के जागा मिळाव्यात हे कायद्याने ठरवावे व त्याचा घटनेतच अंतर्भाव करावा.

४. मुसलमानांचा व्यक्तिगत कायदा व संस्कृती यांचे रक्षण केले जाईल अशी कायद्यात हमी असावी.

५. शहीदगंज मशिदीचा प्रश्न काँग्रेसने हाती घ्यावा व तिची मालकी मुसलमानांना मिळवून देण्यासाठी आपले नैतिक वजन खर्च करावे.

६. ठराविक वेळी बांग देण्याच्या व इतर धार्मिक विधी पार पाडण्याच्या मुस्लिमांच्या अधिकारांत कोणत्याही कारणाने अडथळा आणला जाऊ नये.

७. मुसलमानांना गाईची कत्तल करण्याची मुभा असावी.

८. ज्या प्रांतांमध्ये आज मुसलमानांची संख्या जास्त आहे त्या प्रांतांतील लोकसंख्येचे प्रमाण भौगोलिक फेरवाटणीने किंवा अन्य मार्गांनी बदलले जाऊ नये.

९. 'वंदे मातरम्' या गीताचा त्याग करावा.

१०. मुसलमानांना उर्दू ही राष्ट्रभाषा व्हावी असे वाटते. तिचा उपयोग कमी केला जाणार नाही आणि तिच्या स्थानाला धक्का पोचणार नाही याची कायद्याने घटनेतच हमी देण्यात यावी.

११. 'कम्युनल अवॉर्ड'च्या मुळाशी असलेल्या तत्त्वांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मुसलमानांचे प्रतिनिधित्व ठरविले जावे.

१२. तिरंगी झेंडा बदलून तरी टाकावा किंवा मुस्लिम लीगच्या झेंड्यालाही त्याच्या-इतकाच दर्जा मिळावा.

१३. मुस्लिम लीगला भारतातील मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक व अधिकृत संघटना म्हणून मान्यता मिळावी.

१४. शक्य तेथे संमिश्र मंत्रिमंडळे असावीत.

मुस्लिम लीगच्या मागण्यांचा वरीलप्रमाणे सारांश काढून काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू जिनांना पाठविलेल्या पत्रात पुढे म्हणतात, '... याखेरीज असेही सांगण्यात आले आहे की, तुम्ही व बाबू राजेंद्रप्रसादांनी १९३५ मध्ये जो समझौता मान्य केला होता त्याने आज मुसलमानांचे समाधान होईनासे झाले आहे. इतकेच नव्हे तर, त्या प्रकारच्या कोणत्याच उपायाने त्यांचे इतःपर समाधान होण्याचा संभव नाही. असेही म्हटले गेले आहे की, मागण्यांची वर दिलेली यादी पूर्ण नसून तीमध्ये वेळोवेळी आणखीही "मागण्यां"ची भर घातली जाईल, (इं. ॲ. र., १९३८, II, पृ. ३६९–३७०).

अशा प्रकारे मागण्या लवचिक ठेवणे डावपेचाच्या दृष्टीने अर्थातच जास्त फायद्याचे होते. त्यामुळे एक तर विरोधी पक्षाला कायम झुलवत ठेवता येते व दुसरे म्हणजे तात्पुरता उपाय म्हणूनसुद्धा कसलीच तडजोड केली नाही तरी चालू शकते. वर दिलेल्या सर्व मागण्या काळजीपूर्वक पाहिल्या असता त्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दलित मुस्लिम किंवा मुस्लिमेतर लोकांच्या फायद्याचा काहीच भाग नाही हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. वरील मागण्या केल्यानंतर काही दिवसांतच, मुसलमानांसाठी एक "मायभूमी" असावी अशी नवीच मागणी करण्यात आली. भारताचा पूर्व व पश्चिमे-कडील काही भाग व दक्षिण भारताच्या मध्यातील काही भाग (हैद्राबाद संस्थान) मिळून ही "मायभूमी" असावी असेही सांगण्यात आले (इं. ॲ. र., १९३९, I, पृ. ३६६–३७१).

पाटणा येथे डिसेंबर १९३८ मध्ये भरलेल्या अ. भा. मुस्लिम लीगच्या अधि-वेशनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणामध्ये जीनांचे अंतिम ध्येय स्पष्टपणे मांडलेले दिसते. त्या वेळी त्यांनी पुढील महत्त्वाची विधाने केली : 'मुस्लिम लीगने अत्यंत निकराने केलेल्या प्रयत्नांमुळे ती हळूहळू भारतीय मुसलमानांची बळकट संघटना झाली आहे. पण आपल्यापुढे एक फारच मोठी कामगिरी उभी आहे. आतापर्यंत आपण फक्त मुसलमानांना झोपेतून जागे करण्याचे काम केले आहे. त्यांच्या ठिकाणी पृथगात्म नैतिक व सांस्कृतिक जाणीव निर्माण केली आहे. राजकीय जागृती करण्याचे काम आता करावयाचे आहे. आपणास हे कबूल करावे लागेल की, सांस्कृतिक व राजकीय जागृतीचे सारभूत वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रीयत्वाची जाणीव; ती हिंदूंमध्ये पुष्कळ प्रमाणात बिंबलेली

आढळते. माझी अशी इच्छा आहे की, ही राष्ट्रभावना मुसलमानांतही, हिंदूंपेक्षा जास्त नाही तरी निदान त्यांच्याइतकी तरी, निर्माण झाली पाहिजे. केवळ संख्याबळ वाढून फारसा उपयोग नाही ' ( इं. अॅ. र., १९३८, II, पृ. ३४५ ).

या संबंधात अधिक तपशिलात जाण्याचे आपणास कारण नाही. एवढेच सांगितले म्हणजे पुरे की, जीनांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम लीगने कॉंग्रेस सरकाराविरुद्ध, सर्व भारतीय मुस्लिमांच्या वतीने लीगने वेळोवेळी केलेल्या मागण्या कॉंग्रेस सरकारांनी पूर्ण केल्या नाहीत ही एकच तक्रार सारखी चालू ठेवली. कॉंग्रेस राजवटीखाली त्या त्या प्रांतातील मुसलमानांचा छळ होत आहे असा गंड पद्धतशीरपणे निर्माण करणाऱ्या प्रचाराचा मुसलमानांत ऐक्यभावना निर्माण होण्यात भरीव हातभार लागला. त्याबरोबरच मुस्लिम समाजात कार्य करणाऱ्या इतर संघटनांचा प्रभाव कमीकमी होत गेला. एखाद्या दलित, पीडित समाजाला, मग तो शेतकऱ्यांचा असो वा कामगारांचा असो किंवा कोणत्याही धार्मिक निष्ठांचा असो, स्वतःची दुःखे आपल्यातील दुर्बलतेमुळे किंवा दोषांमुळे निर्माण झालेली नसून इतरांच्या पापामुळे निर्माण झालेली आहेत असे कोणी सांगितले तर त्यावर चटकन विश्वास ठेवावासा वाटतो. कारण मग आधी आत्मनिरीक्षण व सुधारणा करण्याची गरज उरत नाही. असे प्रतिपादन लोकांच्या भावना प्रक्षुब्ध करायला उपयोगी पडते. हा विचार मनात ठेवूनच जीनांनी कॉंग्रेस केवळ हिंदू संघटना असल्याचे खोटेच भूत निर्माण केले. तसेच मुसलमानांना केवळ त्यांच्या मुस्लिम धर्मामुळेच कॉंग्रेस दडपून टाकत आहे असाही भास जिनांनी निर्माण केला. यापुढे मुसलमानांना अन्य भूमिकेतून एकत्र आणणाऱ्या इतर सर्व संघटना निष्प्रभ ठरल्या.

वरील परिच्छेदात ' खोटेच भूत ' हे शब्द मुद्दामच वापरले आहेत. कारण सांस्कृतिकदृष्ट्या हिंदू धर्माशी निगडित व केवळ हिंदूंपुरत्याच मर्यादित अशाच हित-संबंधांचा पाठपुरावा कॉंग्रेसने कधीच केला नव्हता. किंबहुना, हिंदू महासभेने म्हटल्या-प्रमाणे, कॉंग्रेसने नेमके याच्या उलटच वर्तन केलेले होते. कॉंग्रेसचा कल म्हणून कशाकडे असेल तर तो, एकीकडे श्रीमंत व मध्यमवर्गीय व दुसरीकडे पददलित कष्टकरी लोकांचे हितसंबंध यांचा सुवर्णमध्य काढण्याकडे होता. केवळ पददलित किंवा शेतकरी समाजाचे हितसंबंध जपण्यास कॉंग्रेसने नकारच दिला होता. गांधींनी हळूहळू पण सततपणे कॉंग्रेसला त्या मार्गावर नेण्याचा प्रयत्न मात्र चालविला होता ( सिलेक्शन्स, क्र. ३०२ व प्रकरणे ७ व ८ ).

( ७ ) **प्रांतीयतेचे रक्षण :** कॉंग्रेस राजवटींच्या काळात आपापल्या प्रांतातील पांढरपेशा शिक्षित व्यावसायिक वर्गाचे हितसंबंध जपण्यावरील शासनाचा भर उत्तरोत्तर वाढत गेलेला आढळतो. या मुद्द्याचा जरा बारकाईने विचार करणे अवश्य आहे.

बिहार विधिमंडळात १४ एप्रिल १९३८ रोजी एका काँग्रेस सभासदाने पुढील आशयाचा बिनसरकारी ठराव मांडला : सरकारी मदतीने चालणाऱ्या सर्व उद्योगधंद्यांत सर्व पातळ्यांवर किमान ८० % जागी फक्त बिहारी माणसांच्याच नेमणुका केल्या जाव्यात यासाठी सरकारने परिणामकारक उपाय योजावेत. या ठरावाला इतर अनेक सभासदांनी जोरदार पाठिंबा दिला. यावर संबंधित मंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, ' या ठरावामागील भावनेबद्दल सरकारला पूर्णतया सहानुभूती वाटत असली तरी सरकार कायदा करून कारखानदारांवर त्यांच्याकडील नोकऱ्यांत बिहारी माणसांचे प्रमाण वाढविण्याची सक्ती करू शकत नाही. उद्योगधंद्यांत बिहारी माणसांचे प्रमाण कमी असेल तर त्याला मुख्यतः बिहारी लोकच जबाबदार आहेत. बाहेरचे भांडवलदार येथे येऊन परिस्थितीचा फायदा घेतात. बिहारी लोक तेवढे उद्योगशील व धाडसी नाहीत हे उघडच आहे. कोळशांच्या खाणीसारखे उद्योग दीर्घ मुदतीच्या कराराने परकीय लोकांना दिलेले आहेत; तर साखरेसारखे उद्योग ' संरक्षित ' असल्याने त्यातही बिहारी लोकांचे नोकरीतील प्रमाण वाढविण्याची सक्ती करता येत नाही. टाटांच्या पोलाद कारखान्यासारख्या काही उद्योगधंद्यांत थोडेफार दडपण आणता येईल, पण तेसुद्धा अकुशल कामे करणाऱ्या मजुरांपुरतेच. त्या उद्योगांची अशी तक्रार आहे की बिहारी लोकात कुशल कामगार मिळतच नाहीत ' ( इं. ॲ. र., १९३८, I, पृ. २११ ).

काँग्रेस सत्तेवर येण्यापूर्वीच बिहार सरकारने तीन निरनिराळी परिपत्रके काढून ' सरकारी नोकऱ्यांतील बिहारी व बंगाली लोकांच्या संख्येतील विषमता नष्ट करावी ' असा आदेश दिलेला होता. याबाबत बिहारी लोक व बिहार सरकार यांचे असे म्हणणे होते की, निरनिराळ्या नोकऱ्यांत बंगाली लोक फारच जास्त होते. बिहारी लोकांना त्यांचा रास्त हिस्सासुद्धा मिळत नव्हता ( प्रसाद, १९३९, पृ. २४ ). * या दृष्टीने बिहार सरकारने असा एक नियम केला की, जे बिहारमध्ये जन्मलेले नाहीत किंवा ज्यांची मातृभाषा बिहारी नाही त्यांनी बिहारमध्ये स्थायिक झाल्याचे शिफारसपत्र घेतले पाहिजे; तरच त्यांना बिहार सरकारमध्ये किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नोकरी मिळेल, शिक्षण घेता येईल, अगर सरकारी कंत्राटे मिळतील. यामागील तत्त्व असे की, बिहारची भूमी बिहारी लोकांची असून तीत बाहेरच्या लोकांना वाटा मिळू नये. अर्थात

* बंगालमध्ये नोकरी करणाऱ्या व रोजगारीने काम करणाऱ्या बिहारी लोकांच्या प्रमाणाबद्दलचे एक मौलिक टिपण इंडियन ॲन्युअल रजिस्टरमध्ये आढळते. पण अर्थातच बिहार सरकारला त्याच्याशी कर्तव्य नव्हते. ' बिहारच्या भूमीवर ' किती बंगाली होते याच गोष्टीत बिहार सरकारला रस होता ( पाहा इं. ॲ. र., १९३८, II, ९३–९७ ).

काही ठिकाणी खास गुणांची किंवा कौशल्यांची आवश्यकता आहे असे सरकारला वाटल्यास सरकारी मर्जीनुसार अपवाद करण्याची मोकळीक सरकारने आपल्याकडे ठेवली होती.

काँग्रेस अधिकारारूढ झाल्यानंतरसुद्धा ही 'मुलकी प्रमाणपत्रे' देण्याची पद्धत चालूच राहिली. 'अशी शिफारसपत्रे घेणे ही गोष्ट बंगाली लोकांच्या दृष्टीनेच फायद्याची आहे' अशा शब्दांत बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी तिचे समर्थन केले (इं. ॲ. र., १९३८, I, पृ. २३). या नियमाची अंमलबजावणी अत्यंत लहरी व जाचक पद्धतीने केली जाते अशा तक्रारी होऊ लागल्या तेव्हा काँग्रेस वर्किंग कमिटीने पुढाकार घेऊन 'बंगाली-बिहारी प्रश्ना'चा अभ्यास करून अहवाल सदर करण्यासाठी राजेंद्रप्रसादांच्या अध्यक्षपदाखाली एक समिती नेमली. चित्तरंजन दासांचे धाकटे बंधू व एक विख्यात कायदेपंडित श्री. पी. आर. दास यांनी या समितीच्या अध्यक्षांकडे एक निवेदन सादर केले. त्यांचा मुख्य दावा असा होता की, भारतातील कोणत्याही सरकारने 'मुलकी प्रमाणपत्रे' देणे ही गोष्टच घटनाबाह्य आहे कारण भारतीय नागरिकत्व एकच, अखंड आहे. म्हणून कोणत्याही प्रांतीय सरकारला मुलकी प्रमाणपत्र देण्याचा अधिकार पोचत नाही. कारण मुलकी प्रमाणपत्र देणे हा नागरिकत्व बहाल करण्याचाच प्रकार आहे.

या व इतरही सर्व प्रश्नांचा समितीच्या अध्यक्षांनी सांगोपांग विचार केला. आपल्या अंतिम शिफारशी सादर करण्यापूर्वी त्यांनी काही अत्यंत महत्त्वाची विधाने केली. त्यांत ते म्हणतात, 'श्री. दास यांनी आपले म्हणणे खरोखरच मोठ्या कळकळीने मांडले आहे. ते म्हणतात की, भारतीय राष्ट्रीयत्व ही एक अखंड गोष्ट असावी असे वाटत असेल तर भारतीयांमध्ये भेद करता कामा नये. असा पक्षपात केला गेल्यास ती गोष्ट काँग्रेसच्या आजपर्यंतच्या इतिहासाशी व धोरणाशी तर विसंगत ठरेलच, पण भविष्यकाळात आपला देश एकसंध बनण्याच्या आशाही त्यामुळे नष्ट होतील. श्री. दास यांच्या भावना मी पूर्णपणे समजू शकतो व माझी त्यांना सहानुभूतीही आहे. भारताच्या वेगवेगळ्या भागांतल्या जीवनपद्धती वेगवेगळ्या आहेत. भारतीय संस्कृतीत कमालीचे वैविध्य आहे. हे तिचे बहुरूपी स्वरूप जतन केले पाहिजे, त्याचे मोल जाणले पाहिजे हे खरे; पण त्याच वेळी भारत हे एका समान ध्येयाने प्रेरित असे समर्थ व अखंड राष्ट्र व्हावे असे आपणास वाटत असेल तर आपली संस्कृती व इतिहास यांची सर्वांना समान असणारी पार्श्वभूमी व परंपरा व आपले एकराष्ट्रीयत्व यांचीही आपण जाणीव ठेवली पाहिजे. त्या एकराष्ट्रीयत्वाची जोपासना केली पाहिजे. सर्वच कुटीर आणि संकुचित प्रांतवादी वृत्तींना आवर घातला पाहिजे. परंतु, आपला प्रांत वेगळा करून मिळाला तर, लोकनियुक्त राजवटीखाली सरकारी नोकऱ्या आणि इतर सवलती यांत आपल्याला अधिक मोठा हिस्सा मिळेल या आशेने, त्याचसाठी, वेगळे प्रांत करून मिळावेत अशी

मागणी उत्तरोत्तर अधिकाधिक जोर करीत आहे, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आजवर मागास असलेले गट व जमाती शिक्षणाच्या बाबतीत प्रगत होत आहेत व आपला नोकऱ्याचाकऱ्यांतील रास्त वाटा मागू लागल्या आहेत ही वस्तुस्थितीही ध्यानात घेतली पाहिजे. तसे त्यांकडे दुर्लक्ष करणे इष्टही नाही. तसेच सरकारी नोकऱ्या व तत्सम बाबतीत त्या त्या प्रांतातील लोकांचा काही तरी अग्रहक्क आहे ही गोष्टही नाकारता येणार नाही ' ( कित्ता, पृ. २०–२१ ). *

राजेंद्रप्रसाद समितीचा अहवाल मिळाल्यानंतर त्याचा समग्र अभ्यास करून काँग्रेस वर्किंग कमिटीने ११ ते १४ जानेवारी १९३९ च्या बैठकीमध्ये बार्डोली येथे पुढील निर्णय घेतला :

' ( १ ) भारतीय संस्कृतीची संपन्न विविधता आणि निरनिराळ्या प्रांतांत दिसून येणारे जीवनवैचित्र्य यांचे रक्षण केले पाहिजे; इतकेच नव्हे तर विविधता आणि वैचित्र्य यांची जोपासना केली पाहिजे असे या समितीचे मत असले तरी, आपल्या संस्कृतीतील भिन्नतेच्या मागे असलेली एकात्मता व आपल्या ऐतिहासिक वारशामागील सामान्य पार्श्वभूमी तसेच आपले एकराष्ट्रीयत्व यांना सतत उत्तेजन देत राहिले तरच भारत हे एक ध्येयप्रेरित, बलशाली व स्वतंत्र राष्ट्र बनेल. म्हणूनच ही समिती सर्व प्रकारच्या फुटीर व संकुचित प्रांतीय प्रवृत्ती खच्ची करू इच्छिते. असे असले तरीही, समितीचे असे मत आहे की, एखाद्या प्रांतातील नोकऱ्या व तत्सम बाबींमध्ये वाटा असण्याचा त्या प्रांतातील लोकांचा काही एक रास्त अधिकार असून तो दुर्लक्षिता येणार नाही.

' ( २ ) नोकऱ्यांच्या संदर्भात समितीचे असे मत आहे की, भारताच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या माणसाला दुसऱ्या कोणत्याही भागात नोकरी करण्यात कसलाच प्रतिबंध नसावा. नोकरीत भरती केली जात असताना त्या व्यक्तीच्या ठिकाणी योग्य पात्रता व कार्यक्षमता आहे हे पाहणे तर आवश्यक आहेच– उच्च श्रेणीतील नोकऱ्यांच्या बाबतीत व तज्ज्ञ आणि विशेषज्ञ यांच्या बाबतीत याच कसोट्या विशेष महत्त्वाच्या आहेत– पण त्याखेरीज इतरही काही गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. त्या अशा :

( अ ) त्या प्रांतातील निरनिराळ्या जमातींना रास्त प्रतिनिधित्व मिळावे.

( ब ) शक्य तो मागासलेल्या जातीजमातींना उत्तेजन द्यावे. म्हणजे त्यांचा विकास होऊन ते लोक राष्ट्रीय जीवनात पूर्णपणे भाग घेऊ शकतील.

( क ) सर्व प्रकारच्या नोकऱ्यांत त्या त्या प्रांतातील लोकांना प्राधान्य दिले जावे. वैयक्तिक पातळीवर अधिकाऱ्यांना आपापल्या लहरीनुसार भिन्न भिन्न नियम लावता येऊ नयेत म्हणून हे प्राधान्य केव्हा व कोणास द्यावयाचे यासंबंधी प्रांतिक सरकारांनी नियम

* जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा.

म. रा. ग्रं. सं. ग्रंथालय प्र १०४ / १ मंत्रालय

तयार करावेत असे ही समिती सुचवू इच्छिते. सर्व प्रांतांतील नियम साधारणपणे सारखेच असावेत अशी या समितीची शिफारस आहे.

'(३) प्रत्यक्ष बिहारबद्दल म्हणायचे तर तेथे मूळचे बिहारी व बंगाली बोलणारे पण बिहारमध्येच जन्मलेले आणि तेथे स्थायिक झालेले यांत कसलाच भेदभाव केला जाऊ नये. वास्तविक ' बिहारी ' या शब्दात वर वर्णिलेल्या दोन्ही प्रकारांचा समावेश झाला पाहिजे. नोकऱ्या किंवा तत्सम बाबतीत या दोन प्रकारच्या लोकांना पूर्णपणे एकाच प्रकारची वागणूक दिली जावी. मात्र या ' बिहारी ' लोकांना इतर लोकांपेक्षा अधिक प्राधान्य देण्यास हरकत नाही.

'(४) मुलकी प्रमाणपत्रे देण्याची पद्धत रद्द करावी. ज्यांना नोकरीसाठी अर्ज करावयाचा असेल त्यांनी आपण त्याच प्रांतात स्थायिक आहोत असे लिहावे. मात्र नेमणूक करण्यापूर्वी त्यांचे हे विधान पडताळून स्वतःचे समाधान करून घेण्याचा त्या त्या सरकारला हक्क राहील.

'(५) एखाद्या ठिकाणी आपण स्थायिक झालो आहोत, त्या प्रांताला आपण आपले घर मानले आहे असा पुरावा त्या व्यक्तीने सादर केला पाहिजे. हे ठरविण्या-साठी वास्तव्याचा काळ, घराची व जमिनीची मालकी व तदनुषंगिक इतर गोष्टी पाहिल्या जाव्यात. या सर्व गोष्टींचा सामग्र्याने विचार करूनच निर्णय घेतला जावा. मात्र त्या प्रांतात जन्मलेले असणे किंवा तेथे सलग १० वर्षे वास्तव्य असणे या गोष्टी पुरेशा मानल्या जाव्यात.

'(७) कोणत्याही प्रांतात व्यापार-उदीम करण्याला कोणालाच अटकाव नसावा. एखादी कंपनी किंवा कारखाना चालविणाऱ्यांनी शक्य तेथे स्थानिक लोकांची नेमणूक करून जनतेशी संपर्क प्रस्थापित करावा हे इष्ट आहे; परंतु प्रांतिक सरकारांनी कंपनीला या बाबतीत सूचना किंवा शिफारशी केल्यास त्याचा भलताच अर्थ निघण्याची शक्यता असल्याने तसे करणे टाळावे.

'(८) शैक्षणिक संस्थांमध्ये जागा मर्यादित असतील तर त्याला त्याच प्रांतातील निरनिराळ्या जमातींसाठी जागा राखून ठेवण्यास हरकत नाही. मात्र राखीव जागांचे प्रमाण लोकसंख्येच्या दृष्टीने रास्त असेच असावे. अशा संस्थांत प्रवेश देताना प्रांतीय नागरिकांना प्राधान्य द्यावे.'

वरील सर्व शिफारशी काळजीपूर्वक वाचल्यास असे दिसून येते की, त्यांवरून यापुढे ' लोकनियुक्त राष्ट्रीय सरकार 'च्या अधिकारकक्षेत येणाऱ्या काही लाभांबाबत भारतीय नागरिकांत पक्षपात होणार होता. हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतांचा विकास सारखाच झालेला नव्हता हेच वरील गोष्टीचे कारण होते यात शंका नाही. परंतु विकासाची पातळी समान करण्याचा हाच सर्वोत्तम मार्ग होता किंवा कसे, हा प्रश्न

विचारता येण्यासारखा आहे. मुसलमानांतील शेतकरी व कारागीर यांच्याबरोबर त्यांच्यातील सुविद्य श्रेष्ठी वर्गाचादेखील सरसकट "मागासलेले" या सदरात समावेश करण्याची प्रथा पडली होती. हिंदू-मुसलमानांत बरोबरी व ऐक्यभाव निर्माण करण्यासाठी काँग्रेसने मुसलमानांतील श्रेष्ठींशी, त्यांना झुकते माप देणारे, निरनिराळे करार-मदार (उदाहरणार्थ, १९२४ चा बंगाल करार) वेळोवेळी केले होते. प्रत्यक्ष अनुभव मात्र असा आला की त्यामुळे फुटीर वृत्ती व वेगळेपणाची भावना यांना उत्तेजनच मिळाले.

मुस्लिमांच्या संदर्भातील हा अनुभव पाठीशी असूनसुद्धा वरील शिफारशींच्या रूपाने एका नव्याच जातीयवादाला (प्रांतिवादाला) जवळजवळ घटनात्मक मान्यता दिली जात होती, याचे आश्चर्य वाटते. या शिफारशींच्या अनुरोधाने वेगवेगळ्या प्रांतांत जन्मलेल्या किंवा विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांच्या 'पुढारलेले' व 'मागासलेले' अशा दोन जाती करण्यात येऊन त्यांपैकी मागासलेल्यांना नोकरीधंद्यांच्या बाबतीत खुल्या स्पर्धेत संरक्षणाची आवश्यकता आहे असे मान्य करण्यात आले.

गांधींनीही संरक्षणाचे समर्थन केले होते. पण दलित व पीडित असे अस्पृश्य, शेतात किंवा कारखान्यात पिळून निघणारे शेतमजूर व कामगार, किंवा कारखानदारी व व्यापार वाढल्याने नष्टप्राय झालेले हस्तोद्योग करणारे कारागीर यांच्यासाठी गांधींनी संरक्षण मागितले होते (सिलेक्शन्स, क्र. ३२५, ३९८; हरिजन, खं. २, पृ. २०४). तशा प्रकारचे संरक्षण मागणे नैतिकदृष्ट्या समर्थनीय म्हणता येत होते. पण सर्वच मुस्लिमांना त्यांची एक वेगळी जमात आहे म्हणून झुकते माप वा संरक्षण मिळावे ही मागणी, किंवा या शिफारशींनुसार सरसहा काही भौगोलिक विभागांना व तेथील माणसांना, त्यांच्यातील आपापसांतील आर्थिक–सामाजिक भेदाभेद लक्षात न घेता, सरसकट 'मागासलेले' म्हणून संरक्षण देण्याची मागणी यांचे समर्थन करणे फार कठीण होते.

काँग्रेस शासनाची डोकेदुखी ठरलेल्या या प्रश्नाबाबत व्यक्तिशः गांधींचे काय विचार होते हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, म्हणजे वरील प्रश्न उद्भवल्यानंतर सुमारे नऊ वर्षांनी, गांधींनी एक लेख लिहिला. त्यात त्यांनी म्हटले आहे, 'बिहार हा बिहारी लोकांकरता आहे, यात शंकाच नाही. पण तो साऱ्या हिंदुस्थानकरताही आहेच. जी गोष्ट बिहारची तीच गोष्ट आपल्या संघराज्यातील इतर प्रांतांचीही आहे. भारतात पाकिस्तानी ज्या अर्थाने आज परकीय ठरेल किंवा उलटपक्षी पाकिस्तानात भारतीय जसा परकीय ठरेल त्या अर्थाने कोणाही भारतीयाला बिहारमध्ये परकीय मानता येणार नाही. अडचणी व मनस्ताप टाळावयाचा असेल तर आपल्याला हा फरक लक्षात ठेवणे आवश्यक आहे. तेव्हा, भारतीय संघराज्यातील कोणालाही बिहारमध्ये स्थायिक होण्याचा अधिकार आहे;

मात्र त्यांनी त्या अधिकाराचा उपयोग बिहारी लोकांना स्वतःच्याच भूमीतून हुसकून काढण्यासाठी करता कामा नये. '

येथे गांधी कोणत्या ' बिहारी ' लोकांचा उल्लेख करीत आहेत? त्यांना बिहारमधील श्रमिक अभिप्रेत आहेत का? हे मजूर अन्याय्य स्पर्धेमुळे "हुसकले" जात होते काय? की, गांधींच्या मनात नवीनच उदयास येणारे शहरी, पांढरपेशे, व्यावसायिक बुद्धिजीवी होते? हे बिहारी बुद्धिजीवी, आणि तसे पाहिले तर भारताच्या सर्व भागांतील बुद्धिजीवीदेखील, श्रमिकांच्या जिवावरच जगत होते. या बुद्धिजीवी वर्गाची (त्याच्या ऐतखाऊपणाबद्दल) गांधींनीच पूर्वी कडक निर्भर्त्सना केली नव्हती काय? (सिलेक्शन्स, क्र. २३८). परंतु त्यांच्या वरील विवेचनावरून असे दिसते की, त्यांनी या दोन वर्गांना येथे एकत्र करून ' बाहेरून ' येणारा या दोघांचे शोषण करतो असे मानले आहे. त्याच लेखात गांधी पुढे लिहितात, ' ...ही एक अट जर प्रत्यक्षात अंमलात आणली गेली नाही तर अ-बिहारी भारतीयांकडून बिहारी लोक बाहेर फेकले जातील अशा एका परिस्थितीची कल्पना करता येते. म्हणून आपल्याला अशा निष्कर्षावर यावे लागते की, बाहेरून बिहारमध्ये स्थायिक होण्यासाठी जो कोणी येईल त्याने बिहारचीच सेवा केली पाहिजे, आपल्या जुन्या राज्यकर्त्यांप्रमाणे लोकांची पिळवणूक करता कामा नये ' (सिलेक्शन्स, क्र. ५४४).

वरील विवेचन करताना क्षणभर एक गोष्ट गांधींच्या ध्यानातून निसटलेली दिसते. ती अशी की, बिहारमध्येच जन्मलेली व बिहारमध्येच आयुष्यभर राहणारी व्यक्तीसुद्धा बाहेरून येणाऱ्या माणसाइतकीच इतर बिहारी लोकांची पिळवणूक करू शकते. तसेच अ-बिहारी माणूस तेथील लोकांची पिळवणूक करण्याकरताच येईल असेही नाही. पिळवणूक न करता प्रामाणिक उद्योग करून आपले पोट भरण्याचे अन्य मार्ग त्याला उपलब्ध असतील.

एक गोष्ट गांधींनी अनेक वेळा स्पष्टपणे सांगितली होती. त्यांच्या कल्पनेतले स्वराज्य जनताजनार्दनाने स्वतःच मिळवावयाचे होते. क्रांतीची सुरुवात उच्च किंवा मध्यम वर्गांच्या पुढाकारानेच करावी लागणार होती हे खरे. तरी स्वतंत्र भारतात मात्र त्या वर्गांनी गरिबांची सेवा करण्याचे मान्य केले तरच त्यांना स्थान राहावयाचे होते.* परंतु

* ' म्हणून मी माझा उद्देश स्पष्टपणे मांडतो. परकीयांच्या जोखडातून सर्वार्थांनी संपूर्ण स्वातंत्र्य मिळवावयाचे आणि तेही कोटी कोटी मूक जनतेसाठी. म्हणून जनतेच्या हिताआड येतील असे सर्व हितसंबंध एक तर दुरुस्त केले पाहिजेत, आणि दुरुस्त करणे शक्य नसेल तर ते लयास गेले पाहिजेत ' (सिलेक्शन्स, क्र. ३२४; तसेच ७ वे व ८ वे प्रकरण संपूर्ण पाहावे).

प्रस्तुत संदर्भात मात्र त्यांनी (एकाच प्रांतातील) या दोन वर्गांत– त्यांच्या हितसंबंधांत-मूलतः कसलाच संघर्ष नाही असा "राष्ट्रवादी" दृष्टिकोण घेतलेला दिसतो. किंबहुना तशा अर्थाचे स्पष्ट विधान त्यांनी मार्च १९३४ मध्ये केले होते (**सिलेक्शन्स**, क्र. ३०२).

राष्ट्रवादी मनोवृत्तीचा त्यांच्या मनावर असा अर्धामुर्धा संस्कार राहिला होता आणि त्यामुळेच बहुधा त्यांना काही वेळा गोष्टी स्पष्टपणे आकलन होत नसाव्यात. पुढे, १९४७ मध्ये, 'प्रांतीय प्रश्नां'संबंधीचा वरील लेख लिहिला त्या सुमारासच, एका प्रार्थनेनंतरच्या भाषणात गांधी असेही म्हणाले की, 'केवळ हिंसेवरच भांडवलशाही समाजरचनेची उभारणी होऊ शकते; मग त्या समाजाच्या बुडाशी असलेले हिंसेचे अधिष्ठान उघड असेल किंवा प्रच्छन्न असेल. अहिंसक समाजरचनेत हिंसेमुळे प्राप्त झालेल्या लाभांचा त्यागच करावा लागतो. तरच त्या समाजाचे अहिंसक पद्धतीने रक्षण करता येते' (**सिलेक्शन्स**, क्र. १६२).

असो. इतके खरे की, बिहार सरकारला नोकऱ्याचाकऱ्या, सवलती इत्यादींवरून वरील उपाययोजना सुचवीत असताना गांधी भिन्नवर्गीयांचे समान राष्ट्रीय हितसंबंध असतात, त्यांच्या परस्परविरोधी हितसंबंधांतून एक राष्ट्रवादी सुवर्णमध्य काढता येतो या भूमिकेच्या जास्तीत जास्त जवळ आले, आणि श्रमिकांच्या हितसंबंधांनाच अग्रक्रम मिळायला पाहिजे या त्यांच्या भूमिकेपासून जास्तीत जास्त दूर गेले, असे म्हणता येईल. काँग्रेसनेत्यांशी आपली एकवाक्यता टिकून राहावी म्हणून, अशा प्रकारे, आटोकाट प्रयत्न करूनसुद्धा थोड्याच कालावधीत राष्ट्रीय नियोजन व दुसऱ्या महायुद्धातील सहभाग या दोन प्रश्नांवर गांधी व काँग्रेस नेते यांतील तीव्र व मूलभूत मतभेद उघड झालेच.

(८) **राष्ट्रीय नियोजन :** १९३८ मध्ये सुभाषचंद्र बोस यांची काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांनी हरिपुरा येथे केलेल्या भाषणात काँग्रेसच्या आजपर्यंतच्या धोरणाशी व कार्यक्रमाशी विसंगत सूर दिसून आले. त्यांच्या भाषणाचा मुख्य भाग अर्थातच देशांतर्गत प्रश्नांशीच निगडित होता. परंतु समकालीन जगात कार्यकारी असणाऱ्या निरनिराळ्या राजकीय शक्तिप्रवाहांच्या संदर्भात भारतीय राजकारणाचा आढावा घेऊन त्यांनी एक नवाच पायंडा पाडला. या संदर्भात त्यांनी आर्थिक पुनर्रचनेचा जो कार्यक्रम सुचविला तो १९२१ पासून काँग्रेसने अंगीकारलेल्या कार्यक्रमापेक्षा खूपच वेगळा होता.

केंद्रीय सरकार अत्यंत बळकट असण्याची आवश्यकता सुभाषचंद्रांनी प्रतिपादली. त्यांच्या योजनेप्रमाणे आर्थिक–सामाजिक पुनर्रचनेची सर्व जबाबदारी केंद्रीय सत्ताच उचलणार होती. आपले म्हणणे स्पष्ट करताना ते म्हणाले, 'पुनर्रचनेबाबत बोलायचे तर आपल्यापुढील मुख्य प्रश्न दारिद्र्य नष्ट करण्याचा आहे. तसे करण्यासाठी आपल्याला

आपली जमीनमालकीहक्क रचना ( त्यात जमिनदारीही आलीच ) समूळ बदलली पाहिजे. शेतकऱ्याला कर्जमुक्त केले पाहिजे आणि त्याला सहज व स्वस्तात पतपुरवठा होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. उत्पादक व उपभोक्ते या दोघांनाही लाभदायक ठरेल अशा रीतीने सहकारी चळवळीचा विकास केला पाहिजे. जमिनीपासून जास्तीत जास्त उत्पन्न मिळावे म्हणून सर्व शेती शास्त्रीय ज्ञानावर व तंत्रांवर आधारली पाहिजे. परंतु केवळ शेतीसुधारणा करून आर्थिक प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी औद्योगिक विकासाची एक समग्र योजना सरकारी मालकी व नियंत्रणाखाली हाती घेणे आवश्यक आहे. जुन्याच्या जागी एक नवी औद्योगिक व्यवस्था निर्माण केली पाहिजे. जगभर सुरू झालेल्या विराट परिमाण उत्पादनपद्धतीच्या ( मास प्रॉडक्शन ) आघातापुढे आणि देशावरील परकीय अंमलाखाली जुनी उद्योगव्यवस्था कोलमडली आहे. आधुनिक कारखानदारीच्या स्पर्धेत टिकू शकतील अशा कोणत्या पारंपरिक उद्योगांचे पुनरुज्जीवन करता येईल आणि कोणत्या क्षेत्रात विराट परिमाण उत्पादनपद्धतीचा अवलंब श्रेयस्कर ठरेल याचा नियोजन मंडळाला काळजीपूर्वक विचार करावा लागेल. आधुनिक कारखानदारी आणि तिच्यातून उद्भवणाऱ्या अनिष्ट गोष्टी आपणास कितीही आवडल्या नाहीत आणि आपण त्यांची कितीही निंदा केली तरी, आपली आत्यंतिक इच्छा असली तरीही आपण आता कारखानदारीपूर्व युगात परत जाणे शक्य नाही. तेव्हा नवीन कारखानदारी-करणाशी मिळते घेऊन त्यातून उद्भवणाऱ्या अनिष्टांची संकटे जास्तीत जास्त निराकरण करण्याचा आपण प्रयत्न करावा हे उत्तम. एकीकडे हे करीत असतानाच ज्या क्षेत्रात कारखानदारी उत्पादनाच्या स्पर्धेत ग्रामोद्योग टिकू शकतील अशी क्षेत्रे शोधून त्यांत त्यांचे पुनरुज्जीवन घडवून आणण्याच्या शक्यता अजमावल्या पाहिजेत. भारतासारख्या देशात ग्रामोद्योगांना नेहमीच खूप वाव राहणार आहे. विशेषतः शेतीशी संबंधित असलेले उद्योग, सूतकताई व हातमाग या उद्योगांच्या वाढीला कायमचा वाव आहे.

'शेवटचा मुद्दा. आज ना उद्या सरकारला नियोजन मंडळाच्या सल्ल्यानुसार आपल्या देशातील शेती व इतर सर्वच उद्योगधंद्यांचे म्हणजेच सर्व उत्पादनाचेच सामाजीकरण करण्याची एक सर्वगामी योजना स्वीकारावी लागेल. यासाठी जे जादा भांडवल लागेल ते देशी किंवा परकीय कर्जे उभारून किंवा चलन फुगवटा करून उभारावे लागेल' ( इं. ॲ. र., १९३८, I, पृ. ३४१–३४२; इं. ॲ. र., I, पृ. ७५–७६ ).

हे विचार खूपच नवीन होते. ते काँग्रेस वर्तुळातील सर्वसामान्य विचारप्रवाहांच्या विरुद्ध असले तरी अनेक काँग्रेसजनांची आतून त्या विचारांना सहानुभूती होती. ही मान्यता उघडपणे प्रकट होण्यास आणखी काही वर्षे जावी लागली हे मात्र खरे.

सुभाषचंद्र बोसांनी जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय योजना समिती स्थापन केली. विख्यात पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ मेघनाद साहा या समितीचे एक सभासद

होते. अ. भा. ग्रामोद्योग मंडळाचे श्री जे. सी. कुमारप्पा व बंगालमधील 'खादी प्रतिष्ठान'चे श्री. सतीशचंद्र दासगुप्ता यांचाही समितीमध्ये समावेश होता. ग्रामोद्योगी विचारांचे प्रतिनिधित्व त्यांच्याकडे होते.

थोड्याच दिवसांत या दोन गटांत तीव्र मतभेद निर्माण झाल्याच्या बातम्या ऐकू येऊ लागल्या. या मुद्दयावर प्रकाशित असा फारसा पुरावा उपलब्ध नाही. परंतु, नियोजन समितीच्याच एका सभासदाकडून त्यावेळी मिळालेल्या माहितीनुसार, घडलेल्या काही गोष्टी येथे नमूद करणे अनुचित ठरणार नाही.

श्री. मेघनाद साहा यांनी ३१ ऑगस्ट १९३९ रोजी 'विश्वभारती' या त्रैमासिकाच्या संपादकांना एक पत्र पाठवले (ते अप्रकाशितच राहिले). त्या पत्रात ते म्हणतात, 'उद्योगधंद्यांच्या सामाजिक परिणामांचा मी खूप खोलवर विचार केला आहे. विचारपूर्वक माझे असे ठाम मत झाले आहे की, या युगामध्ये मोठ्या उद्योगांना पूरक म्हणूनच ग्रामोद्योगांची भरभराट होऊ शकेल; त्यांना स्वतंत्र स्थान नाही. फारशा तपशिलात न शिरता, आजच्या उद्योगव्यवस्थेची एखाद्या प्रचंड वृक्षाशी तुलना करता येईल. मूलभूत व मोक्याचे उद्योग म्हणजे या वृक्षाची मुळे व खोड. वीज व अन्य औद्योगिक चलनशक्ती निर्माण करणारे उद्योग, लोखंड व पोलाद उद्योग, पायाभूत रसायनांचे उत्पादन करणारे उद्योग, वाहतूक-व्यवस्था अशी त्यांची उदाहरणे देता येतील. ग्रामीण व मध्यम उद्योग म्हणजे या वृक्षाच्या फांद्या व पाने होत. आता एखाद्या झाडाची पाने गळत असतील तर कोणताही शहाणा माळी पानांना पाणी घालणार नाही. तो बुंध्याशी पाणी घालून ते मुळापर्यंत पोचेल अशी दक्षता घेईल. मुळांना दिलेले पाणी आपोआपच पानांपर्यंत पोचेल व त्यांना टवटवी येईल हे त्याला माहीत असते.

'आज आपल्या ग्रामोद्योगांची भरभराट होत नाही; कारण आपली उत्पादनतंत्रे तीच जुनाट आहेत आणि विकासाचा आजचा राजमार्ग सोडून आपण आडमार्गाने वाटचाल करीत आहोत... "ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करा" आणि "खेड्यांकडे चला" या घोषणा देऊन आपण या खंडप्राय देशातील लोकांच्या जीवन व संस्कृती यांच्या विकासाशी जीवघेणा खेळ खेळत आहोत.'

२० सप्टेंबर १९३९ रोजी वर्ध्यास होणाऱ्या बैठकीत राष्ट्रीय नियोजन समितीच्या कुटिरोद्योग उपसमितीच्या विचारासाठी सादर केलेल्या निवेदनात याविरुद्धचा दृष्टिकोण व्यक्त झालेला आहे. त्यात म्हटले आहे : 'उपलब्ध असलेले सर्व मनुष्यबळ व सर्व पशुबळ कामाला लावून झाल्यानंतर वीज किंवा तत्सम शक्ती वापरायला हरकत नाही. परंतु उपलब्ध मनुष्यबळ व पशुबळ कामाला लागेल असा संभव नजिकच्या भविष्य-काळात तरी दिसत नाही. काही उद्योगधंदे असे आहेत की जेथे विजेवर किंवा वाफेवर चालणारी यंत्रे वापरलीच पाहिजेत. त्या उद्योगधंद्यांत वीज वा बाष्पशक्ती वापरण्यास

कोणाचीच हरकत नाही. पण ग्रामोद्योगांच्या क्षेत्रात मात्र कोणतीही यांत्रिक शक्ती वापरण्यापूर्वी आधी सर्व मनुष्यबळ व पशुबळ यांचा वापर झालेला असला पाहिजे.'

असे म्हणतात की, ही दोन्ही मते गांधींच्या पुढे ठेवून त्यांचे वैयक्तिक मत विचारण्यात आले होते. त्यावर गांधींनी असा सल्ला दिला की, या दोन्ही गटांनी काही समान गृहीतकृत्ये आधाराला घेऊन आपापल्या स्वतंत्र योजना तयार कराव्या. दोन गृहीतकृत्ये अशी ठरविण्यात आली: (१) भारताने आपल्या विकासासाठी परकीय कर्जांवर मुळीच अवलंबून राहावयाचे नाही. देशात असलेला सर्व पैसा– सरकारी, सार्वजनिक, किंवा खाजगी– राष्ट्राच्या कामासाठी वापरावयाचा. राष्ट्राच्या गरजे-प्रमाणे वापरण्यासाठी तो उपलब्ध करून देण्याचे सर्वांचे कर्तव्य मानले होते. (२) एक निश्चित जीवनमान गाठणे हे उद्दिष्ट म्हणून स्वीकारावयाचे होते. आपापल्या योजनांद्वारे दोन्ही गटांनी साधारणतः तुल्यबल अशा काळात ते उद्दिष्ट गाठावयाचे होते.

पर्यायी योजनेच्या तुलनेने कुमारप्पा–दासगुप्ता योजनेस वरील उद्दिष्ट गाठण्यास फारच अधिक काल व खर्च लागणार असल्याचे आढळून आले तर, सार्वजनिक कार्यातून निवृत्त होण्यापूर्वी, चरखे बनविण्यात येत असलेले लाकूड वाचविण्यास, किमान जळण म्हणून ते राखून ठेवण्यास त्यांना आवडेल असे उद्गार या प्रसंगी गांधींनी काढल्याचे सांगतात.

या नियोजन समितीने कामाला सुरवात केली व कित्येक महत्त्वाचे अभ्यासपूर्ण अहवाल तयार केले. परंतु त्यातून काही भरीव निष्पन्न होण्यापूर्वीच भारत दुसऱ्या महायुद्धात ओढला गेला. नंतर लढाई संपली तेव्हा देशात "आधुनिकीकरणा"बद्दल फार उत्साह होता. गांधींच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमावर विश्वास ठेवणारे काही थोडे उत्साही लोक होते हे खरे, परंतु एकंदरीने काँग्रेसने रशिया किंवा अमेरिका यांचे नमुने पुढे ठेवूनच आपल्या विकासयोजना तयार केल्या. भावुकतेच्या पातळीवर गांधींच्या कार्यक्रमाबद्दलची निष्ठा कधीमधी जागृत होई; पण ती तेवढ्यापुरतीच. प्रत्यक्षात, काँग्रेसने १९३७ मध्ये सत्ता हाती घेतल्यापासूनच गांधींच्या कार्यक्रमाचा व देशाच्या अर्थ-कारणाचा संबंध सुटला असेच म्हटले पाहिजे. १९४७ मध्ये सत्तांतर होऊन ब्रिटिश निघून गेल्यावर काँग्रेसच्या हाती देशाचे राज्य आले त्यानंतर तर ही दरी अधिकच रुंद झाली.

(९) **अंतर्गत संघर्ष :** गांधी व काँग्रेस यांच्यातील संबंधांचा इतिहास आरंभापासून शेवटपर्यंत एकत्रित पाहिल्यास एक गोष्ट ठळकपणे लक्षात येते. आपले आणि काँग्रेस-मधील पांढरपेशा वर्गाचे मतभेद तीव्र व खोल झाले आहेत असे गांधींना वाटले त्या वेळी त्यांचा कल कृतिशील राजकारणापासून बाजूला सरण्याकडे असे. मात्र तरीही

आपल्या सहकाऱ्यांपासून ते पूर्णपणे दूर जात नसत. सरळ सरळ स्वतःच्या मूलभूत तत्त्वांविरुद्ध असणाऱ्या गोष्टींखेरीज बाकी सर्व गोष्टींत त्यांची मते स्वीकारावीत आणि त्यांच्याशी घनिष्ठता कायम ठेवावी अशी त्यांची मनापासून इच्छा असे. त्यामुळे पुष्कळ प्रसंगी मतभेदांकडे दुर्लक्ष केले जाई. पण त्यातून कधी कधी, उदाहरणार्थ १९२४ च्या कायदेमंडळ प्रवेशासारख्या प्रसंगी, ते आपली प्रियतम तत्त्वे दडपून टाकून मतभेद दूर केल्याचे दृश्य निर्माण करीत नव्हते ना अशी शंका येते.

काँग्रेसमध्ये आढळणाऱ्या या कायम स्वरूपाच्या पण काहीशा प्रच्छन्न तणावाच्या जोडीला मधून मधून असे प्रश्न निघत की त्यांत सारी संघटना गोवली जात असे. यांपैकी काही प्रश्न पक्षांतर्गत शिस्तीसंबंधी असत. असा एक प्रश्न मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. ना. भा. खरे यांच्यासंबंधी उपस्थित झाला होता ( इं. ॲ. र., १९३८, II, पृ. ३४–३८ ). परंतु काही प्रश्न व त्यामुळे निर्माण होणारे ताण अधिक गंभीर स्वरूपाच्या मतभेदांमुळे निर्माण होत. काँग्रेसने अधिकारग्रहण करून प्रत्यक्ष शासनास सुरुवात केल्यानंतर असे मतभेद प्रकट झाले.

वर उल्लेखलेल्या हरिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात सुभाषचंद्रांनी युरोप एका भयंकर महायुद्धाच्या काठावर उभा आहे, अशी धोक्याची सूचना दिली होती. भारताला स्वातंत्र्य मिळवावयाचे असेल तर, त्यांच्या मते, त्याने ही संधी गमावून चालणार नव्हते. बोसांच्या एतद्विषयक सर्व कल्पना त्यांनी गांधींशी केलेल्या पत्र-व्यवहारात स्पष्ट झालेल्या दिसतात. या वेळी काँग्रेसने ब्रिटिश सत्तेकडे स्वातंत्र्याची जोरदार मागणी करून ब्रिटिश सरकारची कोंडी करावी असे त्यांचे मुख्य म्हणणे होते. गांधींचे मन वळवण्याचा त्यांनी वरील पत्रांतून बराच प्रयत्न केलेला दिसतो. ३१ मार्च १९३९ रोजी लिहिलेल्या एका पत्रात सुभाषचंद्रांनी लिहिले, ' गेले कित्येक महिने मी माझ्या मित्रांना सांगत आलो आहे की, युरोपमध्ये वसंत ऋतूत गंभीर आणीबाणीची परिस्थिती निर्माण होणार असून ती तीन-चार महिने टिकणार आहे. आताची आंतरराष्ट्रीय स्थिती आणि आपल्या देशाची अंतर्गत स्थिती यांचा विचार केल्यानंतर सुमारे आठ महिन्यांपूर्वीच माझी अशी खात्री झाली आहे की, संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रश्न धसाला लावण्याची हीच वेळ आहे. आमच्या व राष्ट्राच्या दुर्दैवाने तुम्हाला एवढी आशा वाटत नाही. काँग्रेसचा अधःपात होईल, ती भ्रष्ट होईल या चिंतेने तुम्हाला पछाडले आहे. शिवाय हिंसेचा उद्रेक होईल हा बागुलबोवा तर तुम्हाला कायमचाच भिववीत असतो.

' सर्व हिंदुस्थानची एकंदर स्थिती पाहता आज देश पूर्वीपेक्षा जास्त भ्रष्ट आहे असे मला मुळीच वाटत नाही. शिवाय माझे असेही मत आहे की, देशात हिंसाचारही आता खूपच कमी आहे.

'या किंवा असल्याच किरकोळ कारणांनी आपण आपली निर्वाणीची राष्ट्रीय मागणी स्पष्ट व अंतिम स्वरूपात ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे मांडण्यात चालढकल करू नये. एक तर आजच्या परिस्थितीत ब्रिटिश सरकार आपली मागणी लढा दिल्याशिवायच मान्य करील, किंवा लढ्याची वेळच आली तर सद्यःस्थितीत तो फार दिवस लांबणे शक्य नाही. लढ्याचा तडकाफडकी निकाल लागेल याबद्दल मला इतकी खात्री वाटते व मी इतका आशावादी आहे की, आपण सर्वांनी धीर धरून नेट लावल्यास जास्तीत जास्त अठरा महिन्यांच्या आत संपूर्ण स्वराज्य आपणास मिळेलच मिळेल असे मला वाटते' (**सुभाषचंद्र बोस, १९६२, पृ. १३८–३९;** त्रिपुरी येथील अध्यक्षीय भाषण, इं. ॲ. र., १९३९, I, पृ. ३२५–३२७).

देशाच्या परिस्थितीबद्दल गांधींचे मत मात्र अगदीच वेगळे होते. त्यांच्या मते अहिंसेचे वातावरण समाधानकारक प्रमाणात अस्तित्वात असल्याचे कोणतेच चिन्ह दिसत नव्हते. उलट अनेक आघाड्यांवरील स्थिती जास्तच निराशाजनक होती. रणपूर येथील संस्थानी प्रजेच्या चळवळीत, कानपूर येथील मुसलमानांतील शिया व सुनी झगड्यात, व इतरत्रही हिंसेने चांगलेच डोके वर काढले होते. खुद्द काँग्रेसमध्येच तोतया सभासदांचे भूत निर्माण झाले होते, आणि लुच्चेगिरी आणि बेशिस्त सर्वत्र माजली होती. अशा परिस्थितीत काँग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ हाती घेतल्यास हिंसाचाराला ऊत येईल व जनतेतील अहिंसक प्रवृत्तींना एकत्र आणणेही कठीण जाईल असे गांधींचे मत होते.

गांधी व बोस यांच्यातील मतभेद अशा रीतीने तीव्र होत गेले. काँग्रेसमधील वरिष्ठ नेतृत्व सामान्यतः सुभाषचंद्रांऐवजी गांधीजींची बाजू घेई. अर्थात या वेळीही वरिष्ठ नेत्यांना गांधींची अहिंसाविषयक मते खरोखरच पटली होती किंवा काय, हा प्रश्नच आहे. ते कसेही असले तरी, १९३९ च्या त्रिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी सुभाष–गांधी मतभेद अत्यंत तीव्र झाले होते यात शंका नाही.

निवडणुकीच्या प्रचाराची मोहीम चालू असताना व स्वतः अध्यक्षस्थानी असताना सुभाषबाबूंनी वरिष्ठ नेतृत्वावर असा जाहीर आरोप केला की, ब्रिटिशांनी १९३५ च्या ॲक्टान्वये पुढे मांडलेल्या संघराज्याच्या योजनेस त्यांची मान्यता असून ब्रिटिश सरकारशी तहनामा करण्याची त्यांची मनातून इच्छा आहे. सबळ व विश्वसनीय पुरावा नसताना असा आरोप करणे म्हणजे स्वतःच्या सहकाऱ्यांवर अन्याय करण्यासारखे होते. तसा पुरावा असता तर वर्किंग कमिटीच्या अपराधी सभासदांना योग्य ते शासन करायला हवे होते, आणि पुरावा नसेल तर आरोप मागे घ्यायला हवा होता.

असे असूनही ती निवडणूक सुभाषचंद्रांनीच जिंकली. त्या वेळी गांधींनी पुढे

येऊन असे विधान केले की, सुभाषचंद्रांचा विजय म्हणजे त्यांच्या ( गांधींच्या ) विचारांचा व वैयक्तिकरीत्या त्यांचा स्वतःचाच पराभव आहे. काँग्रेस वर्किंग कमिटीत त्यांच्या मताचे जे सभासद होते त्यांनी राजीनामा देऊन बाहेर पडावे असा गांधींनी त्यांना सल्ला दिला. त्यांनी बोसांनाही असे सुचवले की, त्यांनी स्वतःची एकसंध वर्किंग कमिटी तयार करावी. त्या कमिटीत त्यांनी ज्यांच्यावर गंभीर आरोप केले होते–व जे सिद्ध केले नव्हते व मागेही घेतले नव्हते– अशा सभासदांना घेऊ नये. उलट सुभाषचंद्रांनी संमिश्र वर्किंग कमिटीचा आग्रह धरला. त्रिपुरीला त्यांनी असा ठरावही पास करून घेतला की कोणत्याही वर्किंग कमिटीची नेमणूक होण्यापूर्वी गांधींची मान्यता घेतलीच पाहिजे.

गांधी-बोस यांच्या नंतरच्या पत्रव्यवहारावरून असे दिसते की गांधींना या ठरावाची ( पुढे यालाच 'पंत-ठराव' असे म्हणण्यात येऊ लागले ) पूर्वकल्पना नव्हती. तो संमत झाल्याचे कळल्यानंतर गांधींनी सुभाषचंद्रांना लिहिले, 'जो जो मी त्याचा अधिकाधिक विचार करतो तो तो माझ्या मनात त्याबद्दल अधिकच तिटकारा निर्माण होत आहे.' त्यामुळे त्यांनी बोसांना तो ठराव लक्षात न घेता स्वतःच्याच पसंतीची वर्किंग कमिटी बनविण्याची आग्रहाची विनंती केली. काही दिवस गोष्टी अशाच लोंबकळत राहिल्या. शेवटी सुभाषचंद्रांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर लवकरच, मे १९३९ मध्ये, त्यांनी काँग्रेसपक्षान्तर्गत डाव्या लोकांचा गट संघटित केला. काँग्रेसचे पुढील अधिवेशन अबुल कलम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली रामगढ येथे भरले होते. बोसांनीही १४ मार्च १९४० रोजी त्याच जागी अ. भा. तडजोड-विरोधी परिषदेचे अधिवेशन भरवले.

तो सर्व काळच मोठा खळबळजनक आणि दुःखद होता. खळबळजनक अशासाठी की, युरोपातील राष्ट्रे पुन्हा एकदा महायुद्धाच्या वादळात सापडली होती; आणि उद्वेग-जनक अशासाठी की, काँग्रेस नेत्यांतील मतभेद कित्येक वेळा राजकीय पातळीवरून वैयक्तिक पातळीवर घसरत चाललेले दिसत होते.

ज्यांवरून मतभेद विकोपाला पोचले होते ते मुद्दे मात्र बरेचसे अस्पष्टच होते. एका बाजूला सुभाषचंद्र आणि त्यांचा समाजवादी राष्ट्रवाद होता. त्यांच्या दृष्टीने सत्याग्रहाचे सामर्थ्य मर्यादित होते. दुसऱ्या बाजूला गांधीजी आणि त्यांचे विभिन्न प्रवृत्तींचे सहकारी होते. त्यांच्यातले काही सहकारी आता घटनात्मक मार्गाकडे झुकू लागले होते. काहींना राजकीय शस्त्र म्हणून सत्याग्रह मान्य असला तरी त्याची आर्थिक बाजू स्वीकारावयास ते तयार नव्हते.

यांखेरीज भिन्नभिन्न वैचारिक छटा असलेले लोक होतेच. जवाहरलाल नेहरूंची तऱ्हा आणखीच वेगळी होती. त्यांचा राजकीय कल 'समाजवाद' व 'प्रजासत्ताकवाद' यांच्याकडे झुकणारा होता. एक सुसंस्कृत मार्ग म्हणून त्यांची अहिंसेला मान्यता होती.

पण त्या मार्गाचे राजकीय परिणाम त्यांना स्पष्ट झालेले नव्हते. त्या मार्गाने गेल्यास काय घडणार नाही हे स्पष्ट होते; पण काय घडून येईल ते त्यांना तितकेसे स्पष्ट नव्हते. पण त्यांची निष्ठा मात्र अहिंसेच्या बाजूला, किंबहुना गांधींच्या नेतृत्वालाच होती. कारण लढ्यामध्ये जनतेचे प्रतिनिधित्व करण्याचे व जनतेला मार्गदर्शन करण्याचे त्यांचे कौशल्य सिद्ध झालेले होते. मौ. आझादसुद्धा याच गटातले होते. गांधींच्या सर्व विक्षिप्त गोष्टी ते खपवून घेत होते; कारण त्यांनाही भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अगदी आघाडीवर असलेल्या या पुढाऱ्याबद्दल अत्यंत आदर होता.

भारताच्या राष्ट्रीय संघटनेमध्ये अशी दुफळी पडली होती हे विचित्र वाटते. पण असे होणे एका दृष्टीने स्वाभाविक होते. बाह्य वा अधिक बलाढ्य शक्तिप्रवाहांच्या दबावामुळे तीव्रता येत नाही तोवर पक्षातले भेद बुजल्यासारखे वाटतात. सर्व जगाबरोबर हिंदुस्थानही महायुद्धात ओढला गेला तेव्हा परिस्थितीच्या रेट्याने पक्षांतर्गत मतभेदांना धार चढली.

## महायुद्ध, काँग्रेस आणि गांधी

**( अ ) प्रथमावस्था :** युद्धाला तोंड फुटल्यानंतर ब्रिटिश सरकारने हिंदुस्थान दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात सहभागी असल्याचे जाहीर केले. देशातील जनतेची, जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांची, लोकनियुक्त मंत्रिमंडळांची संमती न घेताच परस्पर निर्णय घेतल्याने काँग्रेस वर्किंग कमिटीने त्याला जोरदार विरोध केला. विरोधामागे इतरही कारणे होतीच. युद्धमग्न राष्ट्र म्हणून सरकारने निरनिराळे अनेक वटहुकूम काढले; गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमध्ये दुरुस्ती केली; व इतरही अनेक उपाययोजना करण्यात आल्या. या सर्वांचा परिणाम प्रांतिक सरकारांचे अधिकार अत्यंत मर्यादित व संकुचित होण्यात झाला. या सर्व नव्याने लादलेल्या बंधनांमुळे हिंदी जनतेच्या हित-संबंधांवर घातक आघात झालेला होता. हे सर्व, अर्थातच, भारतीय जनतेच्या जाहीर इच्छा–आकांक्षा हेतुपूर्वक डावलूनच करण्यात आले होते.

काँग्रेस वर्किंग कमिटीने ब्रिटिश सरकारला असे आवाहन केले की, सरकारने आपले युद्ध करण्यामागचे हेतू निःसंदिग्ध शब्दांत जाहीर करावेत आणि सद्यःपरि-स्थितीत ते हिंदुस्थानला कसे लागू केले जाणार आहेत ते स्पष्ट करावे ( **काँग्रेस बुलेटिन, अ. भा. काँग्रेस कमिटीतर्फे प्रकाशित**, अलाहाबाद, २५ सप्टेंबर, १९३९, पृ. ९, २३ ).

याच सुमारास व्हाइसरॉय व गांधी यांची एक मुलाखतही झाली. त्यानंतर गांधींनी काढलेल्या पत्रकात ते म्हणतात, ' व्हाइसरॉयने जे देऊ केले ते आणि काँग्रेसची मागणी यांतील मुख्य व निर्णायक महत्त्वाचा मतभेद पुढीलप्रमाणे आहे : व्हाइसरॉयांचे म्हणणे

असे की, भारताचे अंतिम भवितव्य काय असावे हे ब्रिटिश सरकारच ठरवील. काँग्रेसचे मत नेमके याच्या उलट आहे. काँग्रेसचे असे ठाम मत आहे की, कोणत्याही बाह्य दडपणाशिवाय स्वतः हिंदी जनतेनेच आपले भवितव्य ठरवावे. हीच खऱ्या स्वातंत्र्याची एकमेव कसोटी आहे...

'संरक्षणाबद्दल बोलायचे तर स्वतःच समाधानकारक व्यवस्था करणे ही उघडच स्वतंत्र भारताचीच मुख्य जबाबदारी आहे हे निश्चित... सर्व देश माझ्यामागे येण्यास तयार असेल तर चोर, दरोडेखोर किंवा तत्सम लोकांपासून जनतेच्या जीवित-वित्ताचे रक्षण करण्यासाठी एक अंतर्गत पोलिसदल ठेवण्यापलीकडे वेगळी संरक्षणाची व्यवस्था मला नको असे मी म्हणेन. राष्ट्ररक्षणाच्या बाबतीत निःशस्त्र व शांतताप्रिय भारत साऱ्या जगाच्या सदिच्छेवरच अवलंबून राहील. पण मी हे मान्य करतो की, माझी ही कल्पना म्हणजे सध्या तरी एक स्वप्नच आहे' (**हरिजन**, खं. ७, पृ. ४४९).

व्हाइसरॉयनीही एक जाहीरनामा काढला. तो अत्यंत असमाधानकारक असल्याने काँग्रेस वर्किंग कमिटीने प्रतिकाराचे 'पहिले पाऊल' म्हणून २३ ऑक्टोबर १९३९ च्या बैठकीत काँग्रेसच्या सर्व मंत्रिमंडळांनी राजीनामा द्यावा असा ठराव केला (**काँग्रेस बुलेटीन**, ९ डिसेंबर, १९३९, पृ. ३). या ठरावाची लवकरच अंमलबजावणीही करण्यात आली. मुस्लिम लीगने सर्व मुसलमान व इतर अल्पसंख्याक लोकांना २२ डिसेंबर १९३९ हा काँग्रेस मंत्रिमंडळांच्या राजीनाम्याचा दिवस 'मुक्तता दिन' व 'आभार-प्रदर्शन दिन' म्हणून साजरा करण्याचा आदेश दिला (काँग्रेस सरचिटणीसांचा अहवाल, **इं. ॲ. र.**, १९४०, I, पृ. २६१).

अहिंसेवरील आपल्या निष्ठेविषयी काँग्रेसने एकदा पक्का निर्णय करायला हवा असे व्यक्तिशः गांधींना आजवर वाटले नव्हते इतक्या तीव्रतेने वाटत होते. घटनात्मक हक्क पदरात पाडून घेण्याच्या व आर्थिक पुनर्रचनेच्या मुद्द्यांवरून गांधींच्या म्हणण्याशी बहुतेक काँग्रेसजन कमीअधिक प्रमाणात सहमत होते. देशाच्या संरक्षणाचा प्रश्न आजवर उद्‌भवला नव्हता. आता मात्र काँग्रेस व गांधी यांच्यातील संबंधांच्या कसोटीची वेळ आली होती. गांधींशी सहकार्य करावयाचे किंवा त्यांच्या सहकार्याने चालावयाचे म्हणजे काय ते काँग्रेसजनांनी स्पष्टपणे समजावून घेण्याचा प्रसंग उद्भवला होता.

गांधी आपल्या 'हरिजन' साप्ताहिकाचा उपयोग मुख्यतः आपल्या विचारांसंबंधी लोकांत योग्य ती जाण निर्माण करण्याकडे करीत असत. एका शांततावादी मिशनऱ्याशी झालेल्या संभाषणात गांधीजी म्हणाले होते, 'लष्करशाहीवर उभ्या असलेल्या आधुनिक समाजामध्ये सर्व व्यवहार केंद्रीभूत करण्यास जे महत्त्वाचे स्थान आहे तेच चरखा व हस्तोद्योग या विकेंद्रित व्यवहारांना माझ्या अहिंसावादी समाजरचनेत आहे... हिंदुस्थानात जोपर्यंत अहिंसा हे केवळ राजकीय लढ्याचे शस्त्र मानले जात आहे तोपर्यंत

जागतिक शांततेसाठी भारत काहीच भरीव कार्य करू शकणार नाही' (हरिजन, खं. ७, पृ. ४४७). 'चरखा' नावाच्या एका अग्रलेखात त्यांनी लिहिले, '... राष्ट्राचे अहिंसक पद्धतीने रक्षण करावयाचे असेल तर, बाहेरून होणाऱ्या आक्रमणाच्या वेळी किंवा अंतर्गत बंडाळीच्या वेळी लोकांना स्वतःच्या पायावर उभे राहता आले पाहिजे अशी समाजाची रचना असली पाहिजे... ऐच्छिक सहकार्याच्या आधारे प्रतिष्ठित व शांततापूर्ण जीवन साकार केलेल्या लहान लहान गावसमाजांना घेऊनच अहिंसक समाजाची उभारणी केली जाऊ शकते. जो समाज हिंसेला हिंसाचाराने उत्तर देण्याची अपेक्षा ठेवतो व त्या दृष्टीने तयारी करतो त्या समाजातले जीवन एक तर अत्यंत अनिश्चित, अस्थिर बनते; किंवा त्या समाजात संरक्षणासाठी मोठमोठी शहरे व दारूगोळ्याची कोठारे निर्माण करावी लागतात. आज युरोपची जी स्थिती दिसत आहे त्यावरून तेथील मोठाली शहरे, राक्षसी कारखाने आणि प्रचंड शस्त्रागारे ही अन्योन्याश्रयी आहेत व ती एकमेकांशिवाय तगून राहूच शकणार नाहीत असा निष्कर्ष काढणे चूक होणार नाही' (**हरिजन**, खं. ७, पृ. ४१०, ४११, ४१८; 'द डिसेंशन्ट्स्', **हरिजन**, खं. ७, पृ. ४१८, हा लेखही पाहा), '... गेली वीस वर्षे मी सारखे सांगत आलो आहे की, चरख्याशिवाय सत्याग्रह सुरू करता यावयाचा नाही' (इं. ॲ. र., १९४०, I, पृ. २३०).

त्यांच्या काही लेखांवरून असे दिसते की, याबाबत काँग्रेसचे मतपरिवर्तन घडवून आणण्यात गांधी फारसे यशस्वी झाले नाहीत. ३० सप्टेंबर १९३९ रोजी त्यांनी लिहिले आहे, 'अहिंसा हाच मानवाला सर्वनाशापासून तारणारा एकमेव मार्ग आहे अशी अक्षय निष्ठा काँग्रेसने या अत्यंत महत्त्वाच्या क्षणी शपथपूर्वक व्यक्त करावी, अशी माझी इच्छा होती. पण त्यासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीचे मन वळवण्यात मला यश आले नाही. देशाचा सन्मान अभंग राखण्यासाठी युद्धदेवतेला शरण जाण्याऐवजी जनता स्वतःच्या क्लेश भोगण्याच्या असीम सामर्थ्यावर विश्वास ठेवील अशी मला अजून आशा आहे' (**हरिजन**, खं. ७, पृ. ३८५). '...काँग्रेसने जर आज सर्वच जगाने धारण केलेली तीच निकामी शस्त्रायुधे धारण केली तर ती गर्दीत हरवून जाईल' (उपरोक्त, पृ. ३०४).

(ब) **काँग्रेस धोरणाचा पुनर्विचार** : हिंदुस्थानातील राजकीय परिस्थितीची कोंडी तशीच राहिली, पण युरोपीय रंगमंचावर विद्युत्वेगाने घटना घडत गेल्या. बदललेली जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन हिंदुस्थानातील कोंडी फोडण्याच्या हेतूने काँग्रेसने नवा पवित्रा घेतला.

हिंदुस्थानला स्वातंत्र्य देणे हाच येथील राजकीय पेच सोडविण्याचा एकमेव उपाय आहे असे आपण मान्य करीत असल्याचे ब्रिटनने जाहीर करावे; त्या दिशेने एक

सुरुवातीचे पाऊल म्हणून केंद्रीय कायदेमंडळातील सर्व लोकनियुक्त सभासदांच्या विश्वासातले एक हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन करावे (या राष्ट्रीय सरकारने जबाबदार प्रांतिक सरकारांचे घनिष्ठ सहकार्य मिळवायचे होते); असे केल्यास 'देशाच्या संरक्षणाच्या संघटने'त काँग्रेस आपल्या सर्व शक्तीनिशी सहकार्य देईल, असे आपले नवे धोरण काँग्रेसने जाहीर केले (इं. ॲ. र., १९४०, II, पृ. १७६–१७७).

श्री. राजगोपालाचारी हे या नव्या धोरणाचे जनक होते. वर्किंग कमिटीमधील बहुसंख्य लोकांची या ठरावास अनुकूलता मिळवण्यात राजाजींना यश आले होते. १९ जुलै १९४० रोजी मद्रास येथे भरलेल्या एका जाहीर सभेत त्यांनी सांगितले की, 'कोणत्याही परिस्थितीत हिंसेचा मार्ग वर्ज्य आहे असे भारताने जाहीर केले तर देशाच्या वतीने शासनाची सूत्रे प्रत्यक्षात हाती घेण्याचा आपला अधिकार सोडून देण्याशिवाय काँग्रेसला पर्याय राहणार नाही.' पुढे २२ जुलै १९४० रोजी वृत्तपत्रांना दिलेल्या एका निवेदनात त्यांनी म्हटले होते की, 'आम्ही मागत असलेले स्वातंत्र्य देऊ करण्याचा अर्थ ब्रिटनने आपल्या सर्व युद्धयोजना सोडून द्याव्यात असा होत नाही' (इं. ॲ. र., १९४०, II, पृ. ८०).

वर्किंग कमिटीने वर्धा येथे मान्य केलेल्या या ठरावाला अ. भा. काँग्रेसने २७-२८ जुलै १९४० रोजी पुणे येथे भरलेल्या बैठकीत संमती दिली. या वेळी अध्यक्ष मौ. अबुल कलम आझाद यांनी एक महत्त्वाचे निवेदन केले. बहुमत ठरावाच्या बाजूने होते. मात्र अब्दुल गफारखान, राजेंद्रप्रसाद, प्रफुल्लचंद्र घोष, आचार्य कृपलानी व शंकरराव देव अजूनही गांधींच्या भूमिकेवर दृढ होते. आपल्या भाषणात मौ. आझाद पुढे म्हणाले, 'रामगडला आपण जमलो होतो त्याला जेमतेम साडेचार महिने झाले आहेत. परंतु या लहानशा काळातसुद्धा जगाचा चेहेरामोहरा पालटलेला आहे. हा बदल केवळ बाह्यांगामध्येच झाला आहे असे नव्हे तर या काळातल्या घटनांनी सर्व निष्ठा व श्रद्धा ढवळून टाकल्या आहेत. अशा परिस्थितीत आपणात बदल घडून न येणे अशक्य आहे. म्हणून आपल्या भूमिकेची फेरतपासणी करून आपल्या धोरणामध्ये काय बदल करणे आवश्यक आहे याचा विचार करणे आपले कर्तव्य ठरते.

'काँग्रेस वर्किंग कमिटीचे दोन निर्णय आपणापुढे मांडावयाचे आहेत. त्यांपैकी एक वर्धा-निवेदन म्हणून प्रसिद्धी पावला आहे. त्यात काँग्रेसच्या मूलभूत धोरणांचाच पुनरुच्चार असल्याने त्यात नवीन असे काही नाही; तरी परंतु आता जमलेली सभा ही काँग्रेसची प्रातिनिधिक सभा असल्याने त्याचा विचार करणे हे आपले कर्तव्य आहे.

'गेल्या जूनमधील वर्ध्याच्या बैठकीतच म. गांधींनी अहिंसेचा प्रश्न पहिल्या प्रथम काढला असे नाही. तो त्यांनी दोन वर्षांपूर्वीही काढला होता. सप्टेंबर १९३८ मध्ये अ. भा. काँग्रेस कमिटीची बैठक दिल्लीला भरली होती. त्या वेळी भरलेल्या वर्किंग कमिटीच्या

बैठकीतच गांधींनी असे सुचविले होते की, काँग्रेसने गेली वीस वर्षे अंतर्गत ध्येयधोरणां-बाबत जसे अहिंसेचे तत्त्व लागू केलेले होते तसेच ते आता इतर क्षेत्रांतही लागू करावे.

' त्याच वेळी, स्वतंत्र झाल्यावर हिंदुस्थान हिंसेचा आश्रय सोडून देईल आणि आक्रमणाविरुद्ध रक्षण करण्यासाठीसुद्धा सैन्य ठेवणार नाही असे काँग्रेसने जाहीर करावे, असे गांधीजींचे म्हणणे होते. अंतर्गत बंडाळी वा परकीय आक्रमण या दोन्ही बाबतींत काँग्रेसने पूर्णपणे अहिंसेवरच अवलंबून राहावे असे त्यांचे मत होते. सर्व जगाला अहिंसेचा संदेश देणे हे आपले कार्य आहे असे गांधीजींना वाटत होते; पण स्वतःच्या देशबांधवांनाच जर ते अहिंसा पटवून देऊ शकले नाहीत तर इतर जगाला ती पटवून देणे कसे शक्य होते? प्रत्यक्ष काँग्रेस वर्किंग कमिटीला ही भूमिका स्वीकारणे अशक्य वाटले. तिने आपल्या अडचणी गांधीजींपुढे मांडल्या. म्युनिच कराराने युद्ध लांबणीवर पडल्याकारणाने त्या वेळी या प्रश्नाला आजच्यासारखे गंभीर व तातडीचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते.

' गेल्या सप्टेंबरमध्ये युद्ध सुरू झाले तेव्हा गांधीजींनी हा मुद्दा पुन्हा उपस्थित केला. पुढे नोव्हेंबरमध्ये ते व्हाइसरॉयना भेटायला गेले त्या वेळी त्यांनी धोरणाच्या बाबतीत काँग्रेसला मार्गदर्शन करण्याच्या जबाबदारीतून स्वतःला मुक्त करावे व आपले अहिंसेचे धोरण एकट्यानेच पुढे चालविण्यास अनुमती द्यावी, अशी मला व वर्किंग कमिटीच्या इतर सभासदांना विनंती केली. परंतु गांधीजींनी हा निर्णय लांबणीवर टाकावा म्हणून कमिटीने त्यांचे मन वळवले. रामगढला गांधीजींनी तोच मुद्दा पुन्हा तिसऱ्यांदा काढला. काँग्रेसमधील इतरही उणीवांचा, दौर्बल्यांचा त्यांनी ऊहापोह केला व स्वतःस जबाबदारीतून मोकळे करावे अशी पुन्हा विनंती केली. गांधीजींची ही विनंती वर्किंग कमिटीला धक्का देणारी होती. त्या वेळीही गांधीजींना मी हा निर्णय पुढे ढकलण्यास भाग पाडले. नाही तर रामगढ अधिवेशनाच्या वेळीच आजची आणीबाणी उपस्थित झाली असती.

' यावरून आपल्या लक्षात आलेच असेल की, हा प्रश्न गेली दोन वर्षे सतत विचाराधीन आहे. गेल्या जूनमध्ये आम्ही जेव्हा वर्ध्याला जमलो होतो तेव्हा गांधीजींनी अशी इच्छा प्रदर्शित केली की, आंतरराष्ट्रीय परिस्थिती अत्यंत नाजूक होत चालली असून या महत्त्वाच्या मुद्द्यावर निर्णय घेणे आणखी लांबणीवर टाकणे बरोबर नाही; तेव्हा काँग्रेसने एकदा या प्रश्नावर आपली भूमिका पक्की करावी. त्या वेळीसुद्धा गांधींनी ही बाब पुढे ढकलावी यासाठी त्यांचे मन वळवण्याचा मी खूप प्रयत्न केला. हा निर्णय घेण्यात काय अडचणी होत्या व त्यामुळे कोणती संकटे येण्याचा संभव होता हे मला माहीत असल्यामुळेच मी तसे केले. गांधीजींच्यासारखीच पूर्ण अहिंसावादी भूमिका घ्यावी अशी प्रत्येक काँग्रेसजनाची इच्छा आहे... पण आपण ढळढळीत वस्तुस्थितीकडे

कानाडोळा करू शकत नाही. शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांनी फ्रान्स, हॉलंड, बेल्जियम किंवा नॉर्वेचे स्वातंत्र्य रक्षिता आले नाही हे आपल्याला माहीत आहे. परंतु सशस्त्र प्रतिकारातली निष्फळता लक्षात आली तरी, मानवी स्वभाव शस्त्रबळावरचा आपला अवलंब सोडण्यास तयार नाही हेही आपणास दिसतेच आहे. त्यामुळे आपण शस्त्रबळाची कास सोडली तर ती चूक ठरेल. महात्माजींना साऱ्या जगाला अहिंसेचा संदेश द्यावयाचा आहे. तेव्हा त्यांनी अहिंसेचा प्रचार करावा हे त्यांचे कर्तव्यच आहे. परंतु भारतीय राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून आपण या राष्ट्रसभेत जमलो आहोत, हे आपल्याला विसरून चालणार नाही. राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याची प्रतिज्ञा केलेला काँग्रेस हा एक राजकीय पक्ष आहे; जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे काम करणारी ती संस्था नाही... आमच्यापैकी बहुतेकांना असे वाटले की, देशात फार मोठी बंडाळी माजली किंवा आपल्या राष्ट्रावर आक्रमण झाले तरी कोणत्याही प्रकारच्या हिंसेचा आश्रय न करता त्यांचा आम्ही अहिंसेनेच प्रतिकार करू असे घोषित करण्यातली गंभीर जबाबदारी स्वीकारण्याएवढी आपली तयारी झालेली नाही. मात्र स्वातंत्र्य जिंकून घेण्याच्या लढ्यात गेली वीस वर्षे काँग्रेसच्या धोरणात अहिंसेचे जे स्थान आहे तेच यापुढेही राहावे याबद्दल आमच्या कोणाच्याच मनात मुळीच संदेह नाही. या धोरणापासून रेसभरही ढळणे म्हणजे काँग्रेसची राजकीय आत्महत्याच ठरेल असे आम्हा सर्वांनाच वाटते ' ( काँग्रेस बुलेटिन, ७ सप्टेंबर १९४०, पृ. २–५ ).

( क ) **वैयक्तिक कायदेभंग :** काँग्रेसच्या या नव्या पवित्र्याला ब्रिटिश सरकारकडून अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. ७ ऑगस्ट, १९४० रोजी केलेल्या भाषणात व्हाइसरॉयनी, कार्यकारी मंडळावर काही प्रातिनिधिक भारतीय व्यक्तींना घ्यावयास आपण तयार आहोत असे सुचविले. तसेच युद्धविषयक सल्ला देण्यासाठीसुद्धा एक सल्लागार मंडळ स्थापन करण्यात येणार होते. परंतु काँग्रेसने उपस्थित केलेल्या राजकीय मागणीचा त्यांच्या भाषणात काहीच उल्लेख नव्हता. व्हाइसरॉयनी सुचविलेल्या सर्व गोष्टी प्रशासकीय व्यवस्थेच्या अंतर्गत हाती घ्यावयाच्या बाबी होत्या.

त्यानंतर अ. भा. काँग्रेस कमिटीची बैठक पुन्हा १५–१६ सप्टेंबर १९४० या दिवशी मुंबईला भरली. त्या वेळी जवाहरलाल नेहरूंनी सत्याग्रहाचा ठराव मांडला व वल्लभभाई पटेलांनी त्याला अनुमोदन दिले. त्या ठरावात म्हटले होते : ' भारतातील राजकीय कोंडी फोडण्याकरता व स्वातंत्र्यसंपादनाचा हेतू पुढे रेटण्यासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीने, म. गांधींचे सहकार्य गमावण्याचा धोका पत्करून, ब्रिटिश सरकारचे सहकार्य मिळविण्यासाठी हात पुढे केला होता... परंतु तो झिडकारला गेला... म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी अ. भा. काँग्रेस कमिटी

आता काँग्रेसने कोणती प्रत्यक्ष ( जन-आंदोलनात्मक ) कृती करावी याविषयी मार्गदर्शन करण्याची गांधीजींना विनंती करीत आहे...

'काँग्रेसच्या अहिंसावादी धोरणाबद्दल अलीकडे विनाकारण काही गैरसमज निर्माण झाला आहे. हा गैरसमज बहुधा गेल्या काही दिवसांत काँग्रेसने केलेल्या ठरावांमुळे निर्माण झाला असावा. त्या ठरावांत काहीही म्हटलेले असो, अ. भा. काँग्रेस कमिटी आपले धोरण येथे पुन्हा स्पष्ट करू इच्छिते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यापुरताच नव्हे तर त्या मार्गाची अंमलबजावणी करणे शक्य आहे तेथवर, नंतर स्वतंत्र हिंदुस्थानातही, अहिंसेनेच व्यवहार करण्याचे काँग्रेसचे धोरण राहील. स्वतंत्र भारत जगाच्या निःशस्त्रीकरणासाठी आपले सर्व वजन खर्ची घालील व या बाबतीत जगाला उदाहरण घालून देण्यास नेहमीच सिद्ध राहील' ( इं. ॲ. र., १९४०, II, पृ. २१२–२१३ ).

वरील ठरावाचा आशय मुख्यतः त्यांचाच होता हे नंतर केलेल्या भाषणात गांधींनी स्पष्ट केले. मात्र प्रत्यक्ष ठरावाचा मसुदा करण्याचे काम नेहरूंनी केले होते. अहिंसेवरील तत्त्वनिष्ठेची काँग्रेसची भाषा प्रामाणिक असली तर काँग्रेसने असा ठराव करणे अनिवार्य होते असे नेहरूंना वाटले ( इं. ॲ. र., १९४०, II, पृ. २१९ ). या वेळी गांधींनी आपल्या नेतृत्वाच्या बदल्यात नेहरू व इतर काँग्रेसचे पुढारी यांच्याकडून जबर किंमत घेतली हे उघड आहे. परंतु हा समझोताही अल्पायुषीच ठरला.

सुमारे महिना असा गेला. त्यानंतर गांधींनी भाषणस्वातंत्र्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. स्वतः गांधींनी अत्यंत काळजीपूर्वक निवड केलेल्या स्वयंसेवकांना देशाच्या निरनिराळ्या भागात पायी फिरून प्रचार करण्याचा आदेश देण्यात आला. सत्याग्रहींनी ठिकठिकाणी सभा घेऊन पुढील आशयाचे भाषण करून, त्याचा अर्थ व त्यातून निष्पन्न होणारी कृती लोकांना समजावून द्यावी अशी अपेक्षा होती. भाषणाचे मुख्य सूत्र असे होते :

'ब्रिटिशांनी चालविलेल्या युद्धात तनाने वा मनाने मदत करणे चुकीचे आहे. कोणत्याही युद्धाचा अहिंसक मार्गांनी प्रतिकार करणे हीच खरी योग्य कृती होय' ( काँग्रेस बुलेटिन, ८-१-१९४२, पृ. ८७ ).

सत्याग्रहाचे हे पर्व सुमारे पंधरा महिने चालू होते. नंतर एक गोष्ट गांधींच्या लक्षात आली. त्यांची अहिंसाधिष्ठित भूमिका मनापासून पटल्याने, ब्रिटिश सरकारला देऊ केलेले सहकार्य मागे घेऊन, त्यांनी काँग्रेसचे नेतृत्व करावे असे आवाहन करणारा ठराव काँग्रेसश्रेष्ठींनी संमत केला असे त्यांना वाटत होते; पण ते खरे नव्हते हे आता त्यांच्या लक्षात आले. ३० डिसेंबर १९४१ रोजी काँग्रेसच्या अध्यक्षांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात गांधीजी म्हणतात, 'माझ्या असे लक्षात आले आहे की, मुंबई ठरावाचा अर्थ लावण्यात मी मोठीच घोडचूक केलेली आहे. सध्या चालू असलेल्या

महायुद्धात किंवा पुढे होणाऱ्या कोणत्याही युद्धात भाग घेण्याचे, मुख्यतः अहिंसेवरील तिच्या निष्ठेतून, यापुढे काँग्रेस नाकारणार आहे असा मी त्या ठरावाचा अर्थ लावला होता. परंतु ठरावाचा मी लावलेला अर्थ बहुतेक सभासदांना मान्य नाही; अहिंसेच्या तत्त्वापोटी युद्धात सहकार्य नाकारले पाहिजे असे नाही, असे त्यांचे मत आहे, हे मला दिसून आले आहे. त्यामुळे मला आश्चर्याचा धक्का बसला. मुंबई ठराव मी पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचून पाहिला. तेव्हा मला आढळून आले की, त्या भिन्न अर्थ लावणाऱ्या सभासदांचेच म्हणणे बरोबर आहे. मी काढलेला अर्थ त्या ठरावातून निघण्यासारखा नव्हता, त्या ठरावाला झेपण्यासारखा नव्हता...

'म्हणून माझी आपणास अशी विनंती आहे की मुंबई ठरावान्वये माझ्यावर टाकलेल्या जबाबदारीतून आपण मला मुक्त करावे. माझ्या अर्थाने अहिंसेवर विश्वास असणाऱ्या, मी घालीन त्या अटींचे पालन करण्याची तयारी असणाऱ्या, व ज्यांची मी निवड करीन अशा काँग्रेसजन व इतर व्यक्ती यांना घेऊन मला भाषणस्वातंत्र्यासाठी सुरू केलेला सत्याग्रह चालू ठेवला पाहिजे' ( **काँग्रेस बुलेटिन**, ५-२-१९४२, पृ. २ ).

काँग्रेसच्या अध्यक्षांनी गांधींची ही विनंती मान्य केली व त्यांना त्यांच्या जबाबदारीतून मुक्त केले. त्याचे स्पष्टीकरण त्यांनी असे दिले : 'युद्धाला आमचा विरोध राजकीय भूमिकेवरून आहे तर गांधीजींचा विरोध विशुद्ध अहिंसेपोटी आहे. अहिंसेची किंमत देऊन आणि युद्धात सहभागी झाले पाहिजे या शर्तीवर स्वातंत्र्य देऊ केले तर ते स्वातंत्र्य आपणास नको अशी आपली भूमिका गांधीजींनी मागेच जाहीर केली आहे. पण ही त्यांची ( काँग्रेस अध्यक्ष, मौ. आझादांची ) किंवा त्यांच्या सहकाऱ्यांची भूमिका नव्हती. कोणत्याही वेळी, कोणत्याही मार्गाने मिळाले तरी स्वातंत्र्य स्वीकारण्यास ते तयार होते; मग त्या वेळी जगात शांतता असो, युद्धाच्या छाया पसरलेल्या असोत, किंवा प्रत्यक्ष युद्ध चालू असो' ( इं. ॲ. र., १९४२, I, पृ. २८० ).

काँग्रेस अध्यक्षांच्या वरील समर्थनाच्या उत्तरात गांधींनी आपले विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते युद्धात भाग घेऊन योग्य प्रकारचे स्वातंत्र्य मिळू शकणार नव्हते. अत्यंत दरिद्री व्यक्तीही जेथे भरभराट पावू शकेल असे खरे स्वराज्य समाजाच्या आर्थिक व्यवहारात अहिंसेचा अंगीकार केल्यानेच पदरी पडू शकणार होते. आणि केवळ अशाच समाजाचे रक्षण अहिंसेने करता येणार होते. सर्व जगाच्या सदिच्छेवर आपल्या स्वराज्याचा इमला सुरक्षित राहू शकणार होता.

आपल्या भाषणात गांधी म्हणाले, 'मौ. आझादांनी मला एकदम आकाशाएवढा मोठा करून सोडले, ते मला यत्किंचितही रुचले नाही. मनोराज्यात जगणारा मी कोणी स्वप्नाळू नाही. तुमच्यासारखाच, चारचौघांसारखाच मी एक हाडामासाचा माणूस आहे आणि माझे पाय जमिनीवर पक्के रोवलेले आहेत.

'तसे नसते तर गेली वीस वर्षे आपण मिळून कार्य करू शकलो नसतो. अहिंसा हा माझा धर्म आहे. तो माझा प्राण आहे. परंतु "धर्मश्रद्धा" या स्वरूपात मी अहिंसा भारतापुढे ठेवलेली नाही. किंबहुना सहज अनौपचारिक संभाषणात कोणाकोणाजवळ मी अहिंसेची शिफारस त्या अर्थाने केली असेल तेवढीच. एरवी मी लोकांत जाऊनही तिचा धर्मश्रद्धा म्हणून प्रचार केलेला नाही. राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी वापराव-याची राजकीय साधनपद्धती म्हणूनच मी काँग्रेसपुढे अहिंसा ठेवली. ती एक नवी साधन-पद्धती असेल, पण त्यामुळे तिचे राजकीय स्वरूप नष्ट होत नाही. काँग्रेसच्या दीर्घ वापरा-तून मला परिचित झालेले सर्व सनदशीर घटनात्मक मार्ग चोखाळून झाल्यावर, ते अपयशी ठरल्यावर मी या साधनपद्धतीचा दक्षिण आफ्रिकेत प्रथम वापर केला. व्यापारी, मजूर, फेरीवाले, इत्यादी रूपांत द. आफ्रिकेत स्थायिक झालेल्या हिंदी लोकांच्या निव्वळ राजकीय अस्तित्वाचा प्रश्न होता. त्या लोकांच्या दृष्टीने तो जीवनमरणाचाच प्रश्न होता. तो प्रश्न सोडवीत असताना मला अहिंसेचा मार्ग सुचला. तेथे केलेल्या निर-निराळ्या मार्गांचा अवलंब हे एखाद्या द्रष्ट्याचे किंवा स्वप्नाळू माणसाचे काम नव्हते. प्रत्यक्षात असलेल्या राजकीय प्रश्नांना अगदी व्यावहारिक पातळीवरून तोंड देताना सुचलेले ते उपाय होते. एक राजकीय पद्धत या दृष्टीने त्यात नेहमीच बदल होणार, किंवा तिला वेगळे वळण द्यावे लागणार, किंवा क्वचित दुसऱ्या एखाद्या अधिक चांगल्या पद्धतीसाठी ती सोडूनही द्यावी लागणार हे उघडच आहे. त्यामुळे आज आपण आपले धोरण बदलू नये असे जेव्हा मी तुम्हाला म्हणतो तेव्हा तेही राजकारणी शहाणपणाच्या दृष्टीनेच म्हणत असतो. माझ्या राजकारणी अंतःप्रज्ञेच्या आधारे मी हा सल्ला देत आहे. अहिंसेने आपल्याला मागच्या काळात काम दिलेले आहे. स्वातंत्र्याकडे जाण्याचा कितो तरी मार्ग आपण अहिंसेच्या सहाय्याने चालून येऊ शकलेलो आहोत. या वेळी अहिंसेच्या मार्गाचा त्याग करण्याचा विचार करणे ही एक मोठी चूक ठरेल हेही मी राजकारणी माणसाच्या भूमिकेतूनच सांगत आहे. आजपर्यंत मी काँग्रेसचे नेतृत्व केले ते एक राजकारणी व्यक्ती म्हणूनच केले आहे. माझी पद्धत केवळ थोडी नवी आहे म्हणून तिच्यावर धार्मिकतेचा शिक्का मारणे योग्य ठरणार नाही....

'अहिंसेमुळेच आपण पूर्वी कधीही नव्हतो इतके स्वातंत्र्याच्या जवळ आलो आहोत. स्वातंत्र्याच्या मोबदल्यातसुद्धा आपण तिचा त्याग करण्याचे धाष्टर्य करू नये. कारण तसे करून मिळणारे स्वराज्य हे खरे स्वराज्य असणार नाही. स्वराज्य मिळविल्या-नंतर आपण काय करणार हा खरा प्रश्न नसून, अमूक एका परिस्थितीत आपण स्वराज्य मिळविण्यासाठी अहिंसा सोडणार काय हा खरा प्रश्न आहे. मी पुन्हा विचारतो की, अहिंसेचा त्याग करून खरे स्वराज्य मिळेल असे आपणास खरोखरच वाटते काय? माझ्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे आपल्यातील अत्यंत मूक व गरीब माणसाचे स्वराज्य. ते

आपल्याला युद्धात सहभागी होऊन मुळीच मिळणार नाही' (**कॉंग्रेस बुलेटिन**, ५-५-१९४२, पृ. १३–१७).

कॉंग्रेसपासून गांधींचा मार्ग भिन्न होण्याची वेळ आली होती हे उघडच आहे. आपल्या अटी त्यांनी अनेकदा पुन्हा पुहा सांगितल्या होत्या.त्या अटींचा नेहमी अर्धवटच स्वीकार केला गेला होता. एखाद्याची भूमिका पटली नसली तरी प्रगल्भ मनाने ती समजून घेतल्यानंतर ज्या निष्ठेने ती अंगीकारता येते त्या गुणवत्तेची निष्ठाही गांधींचा स्वीकार करण्यामागे नव्हती. कॉंग्रेसने भविष्यात आपण कोणत्या तात्त्विक भूमिकेतून वागणार आहोत ते पक्के ठरवावे असे या वेळी गांधींनी आवर्जून सांगितले; कारण भारताचेच नव्हे तर साऱ्या जगाचेच भवितव्य अंधःकारमय असल्याचे त्यांच्या दृष्टीला दिसत होते (पाहा गांधींचे भाषण, **इं. ॲ. र., १९४१, II, पृ. १९५**)

(ड) **"छोडो भारत" चळवळ :** मार्च, १९४२ च्या आरंभीच रंगून पडले. तेव्हा हिंदुस्थानातील पेचावर एक राजकीय तडजोड मनात योजून ब्रिटिश सरकारने सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांना इकडे पाठविले. 'जपानने आघाडी मारल्यामुळे हिंदुस्थान ज्या आणीबाणीच्या परिस्थितीत सापडला होता त्या पार्श्वभूमीवर परकीय आक्रमणाच्या संकटापासून स्वतःच्या भूमीचे रक्षण करण्यासाठी हिंदुस्थानातील सर्व शक्ती एकवटाव्यात अशी ब्रिटिशांची इच्छा आहे असे निवेदन प्रसृत केले गेले' (**गांधी, पृ. ४७३**). परंतु क्रिप्स योजना हिंदुस्थानातील कोणत्याच पक्षाला मान्य न झाल्याने क्रिप्स निराश होऊन हात हालवीतच इंग्लंडला परत गेले. तेथे गेल्यावर त्यांनी आपल्या शिष्टाईला कोणत्या परिस्थितीत अपयश आले याचा वृत्तांत ब्रिटिश पार्लमेंटला सादर केला (**इं. ॲ. र., १९४२, I, पृ. २१९–२६५**).

यानंतर थोड्याच दिवसांत गांधींना इंग्लंडहून एक तार आली. या तारेला उत्तर देताना त्यांनी ब्रिटिशांनी भारतातून तत्काळ निघून जावे या मागणीचा प्रथमच उच्चार केला (**हरिजन, खं. ९, पृ. २१६**).

कॉंग्रेसला गांधींची सर्व तत्त्वप्रणाली मान्य नव्हती तरीदेखील काही कालावधीनंतर जवाहरलाल नेहरूंसकट सर्वांना आपल्या बाजूला वळविण्यात ते यशस्वी झाले. (कॉंग्रेसच्या मागणीप्रमाणे) ब्रिटिशांनी हिंदुस्थानवरचे आपले राज्य खरोखरच सोडून दिले तर देशात अनागोंदी माजण्याची शक्यता होती. 'या अनागोंदीचे रूपांतर जीवघेण्या यादवी युद्धात किंवा अनावर दरोडेखोरीत होईल अशीही शक्यता आहे' हेही गांधींनी मान्य केले; परंतु गांधींना अशी आशा वाटत होती की, 'त्यातूनच हिंदुस्थान हे राष्ट्र असल्याचा आज जो एक केवळ खोटा आभास आहे त्या जागी खरोखरच एक अस्सल राष्ट्र आकारास येईल' (**हरिजन, खं. ९, पृ. १६६**).

जवाहरलाल नेहरूंच्याबद्दल गांधींनी लिहिले, 'रशिया व चीन यांच्याशी नेहरूंचा प्रत्यक्ष वैयक्तिक संबंध असल्यामुळे त्या राष्ट्रांपुढे आ वासून उभ्या असलेल्या सर्वनाशाच्या संकटाचे दु:ख मला जाणवते त्यापेक्षा नेहरूंना अधिक तीव्रतेने जाणवते... त्या दु:खावेगात साम्राज्यशाहीशी असलेले आपले जुने भांडण विसरून जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नाझींच्या किंवा फॅसिस्टांच्या विजयाची माझ्यापेक्षाही त्यांना जास्त भीती वाटते. मी यावरून त्यांच्याशी दिवसच्या दिवस वाद घातला. त्यांनी माझ्याशी ज्या भावनोत्कटतेने वाद घातला त्याचे मी वर्णन करू शकत नाही. पण वस्तुस्थितीत अनुस्यूत असलेल्या तर्काने शेवटी त्यांच्यावर मात केली. भारताच्या स्वातंत्र्याच्या अभावी वरील दोन्ही राष्ट्रांचे स्वातंत्र्यही धोक्यात सापडणार हे त्यांच्या स्पष्टपणे लक्षात आले तेव्हाच त्यांनी माझे म्हणणे मान्य केले' (पत्र., पृ. १६–१७).

सार्वत्रिक कायदेभंग करून स्वातंत्र्य हस्तगत करण्याचा आपला निर्धार व्यक्त करण्याचे काँग्रेसने ठरविले तर दोन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होत होते: एक प्रश्न पुरेशा तयारीचा होता. दुसरा प्रश्न महायुद्धातील दोस्त राष्ट्रांच्या न्याय्यपणाशी निगडीत होता. सत्याग्रहाच्या चळवळीमुळे फॅसिस्ट राष्ट्रांना मदत होणार होती काय, हाही प्रश्न विचारात घ्यावा लागणार होता. या दोन्ही प्रश्नांची उत्तरे गांधींनी आपल्या भाषणांतून व लेखांतून देण्याचा प्रयत्न केला. सार्वजनिक कायदेभंग सुरू होण्याची शक्यता आहे असे कळल्यावर वृत्तपत्रकार गांधींच्या मुलाखतीसाठी येऊ लागले; त्यांना दिल्या जाणाऱ्या मुलाखतींतूनही गांधी या प्रश्नांची उत्तरे लोकांपुढे मांडू लागले.

ब्रिटिश अंमलाखालील आजच्या (गांधींच्या शब्दांतील) 'बुद्ध्याच निर्माण केलेल्या अराजका'पेक्षा ते गेल्यानंतर माजेल ते अराजक अधिक वाईट ठरणार नाही काय? असे एका वृत्तपत्रप्रतिनिधीने गांधींची मुलाखत घेताना त्यांना विचारले. त्यावर गांधींनी उत्तर दिले, 'हा प्रश्न अगदी योग्य आहे. गेली बावीस वर्षे मी नेमक्या याच विचाराने माझ्या कृतींवर, मागण्यांवर मर्यादा घालीत आलो आहे. परकीय सत्तेचे जोखड झुगारून देण्याइतके अहिंसक सामर्थ्य देशात निर्माण होण्याची मी वाट पाहात होतो. परंतु आता माझ्या दृष्टिकोणात बदल झाला आहे. आता मला असे वाटते की, यापेक्षा अधिक थांबणे परवडणारे नाही. मी जर असाच थांबून राहिलो तर कदाचित मला कल्पांतापर्यंत वाटच पाहावी लागेल. देशाची जशी तयारी व्हावी म्हणून मी ईश्वराची प्रार्थना करीत आलो व कार्य करीत आलो तशी ती कधीच होणार नाही, आणि मध्येच आपल्या सर्वांनाच ग्रासू पाहणाऱ्या या ज्वाळा मला घेरतील आणि त्यात सगळ्याचीच राखरांगोळी होऊन जाईल. यामुळे मी आता असे ठरवले आहे की, धोका निश्चित असला तरी तो पत्करूनही जनतेला गुलामगिरीशी लढा देण्यास सांगावे. परंतु विश्वास बाळगा, माझ्या मनाची ही तयारीसुद्धा एका अहिंसावादी माणसाच्या ठिकाणी

आढळणाऱ्या अढळ श्रद्धेतूनच झालेली आहे. मनाच्या कानाकोपऱ्यातसुद्धा हिंसेचा लवलेश नाही. गेली पन्नास वर्षे मी जे अहिंसेचे जाणीवपूर्वक आचरण करीत आलो ते मला या आणीबाणीच्या वेळी दगा देणार नाही, हीच एक जाणीव माझ्या मनात ओतप्रोत भरून राहिलेली आहे. लोकांच्यात माझ्याइतकी अहिंसा नाही, पण माझे अहिंसा व्रत त्यांना मदत करील. बुद्धयाच निर्माण केलेल्या अराजकानेच आम्ही वेढलेले आहोत, त्यात गुरफटलेलो आहोत. ब्रिटिशांनी आपले राज्य काढून घेतल्यानंतर, किंवा त्यांनी आपले न ऐकल्यामुळे आपण त्यांचे राज्य धाब्यावर बसवून दिल्यावर जे अराजक निर्माण होईल ते आजच्या अराजकापेक्षा निश्चितच वाईट नसेल अशी माझी खात्री आहे. आणि शेवटी एक गोष्ट खरीच की, निःशस्त्र लोक करून करून कितीसा भयंकर हिंसाचार करणार व कितीसे अराजक माजवणार ? माझी अशी निष्ठा आहे की, त्या अराजकातूनच शुद्ध अहिंसेचा उदय होईल; परंतु एका संभाव्य परचक्राला तोंड देण्याच्या मिषाने आज चाललेल्या भयंकर हिंसाचाराकडे निष्क्रीयपणे पाहणे मला जमणार नाही. तसे केल्याने माझ्या ठिकाणच्या अहिंसानिष्ठेची मला लाज वाटेल. माझी अहिंसा अधिक कणखर आहे' (हरिजन, खं. ९, पृ. १८४).

काँग्रेसवर अवलंबून न राहता, आपल्या योजना कार्यवाहीत आणण्यासाठी शुद्ध अहिंसावादी लोकांची वेगळी संघटना न उभारण्याचे स्पष्टीकरण गांधींनी पुढीलप्रमाणे दिले : 'एक सोयीचा लाभदायी मार्ग म्हणून मी अहिंसेची शिफारस काँग्रेसला केली ही एक चांगलीच गोष्ट केली हे माझे मत आजही कायम आहे. राजकारणात अहिंसा आणायची तर यापेक्षा वेगळे मी काही करू शकलो नसतो. जीवननिष्ठा म्हणून अहिंसा मान्य आहे अशाच लोकांना एकत्र घेऊन निघायचे म्हटले असते तर त्या संघटनेचा मीच पहिला आणि शेवटचा सभासद ठरलो असतो. मी स्वतः अपूर्णच आहे. माझ्यासारख्या अपूर्ण स्त्री-पुरुषांना घेऊन मी निघालो. अज्ञात, अथांग सागरात नाव लोटून द्यावी तसा निघालो. आमची नाव अजून किनाऱ्याला लागलेली नाही, परंतु ईश्वरकृपेने ती तुफानांना टक्कर देण्याइतकी मजबूत ठरली आहे' (हरिजन, खं. ९, पृ. ११६).

या सत्याग्रहामुळे महायुद्धातील लोकशाहीवादी राष्ट्रांच्या प्रयत्नांत अडथळा येईल काय ? हा दुसरा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा होता. त्याचे उत्तर काँग्रेस वर्किंग कमिटीने १८ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे केलेल्या ठरावात फारच सुंदर रीतीने दिले आहे. त्या ठरावात म्हटले आहे :

'दिवसागणिक घडणाऱ्या घटनांवरून, व आज भारतीय जनता ज्या अनुभवांतून जात आहे त्यावरून भारतातून ब्रिटिश राज्य ताबडतोब नष्ट झाले पाहिजे हे सर्व काँग्रेसजनांचे मत बरोबर असल्याचेच दिसून येते. उत्तमातले उत्तम का असेना, पण

परकीय राज्य म्हणजे एक पापच. जित प्रजेच्या जिव्हारी झालेली व सतत वाहणारी ती एक जखम होय. पण केवळ यामुळेच हिंदुस्थानातील इंग्रजी राज्य तत्काळ संपुष्टात यावे असे नाही; पारतंत्र्याच्या बंधनात जखडलेला भारत स्वतःचेही परिणामकारकरीत्या रक्षण करू शकत नाही की माणुसकीची राखरांगोळी करणाऱ्या युद्धखोर शक्तींचा प्रहार करणाऱ्यांच्या बाजूने आपले वजन टाकून युद्धाचा कल बदलू शकत नाही. ते सामर्थ्य प्राप्त करता यावे म्हणून ब्रिटिशांनी येथून तत्काळ जायला हवे आहे. भारताचे स्वातंत्र्य केवळ भारताच्याच हितासाठी आवश्यक आहे असे नाही, तर साऱ्या जगाच्या सुरक्षिततेसाठी, नाझीझम, फॅसिझम, लष्करशाही नष्ट करण्यासाठी, आणि एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करण्याचा प्रकारच संपुष्टात येण्यासाठी भारत स्वतंत्र झाला पाहिजे.

'महायुद्धाला सुरुवात झाल्यापासून सरकारला शक्य तो अडचणीत न आणण्याचे धोरण काँग्रेसने अवलंबिले आहे. सत्याग्रह निष्प्रभ ठरण्याचा धोका पत्करून, सत्याग्रहाच्या चळवळीला मुद्दामच केवळ प्रतीकात्मक स्वरूप दिले गेले. अडचणीत न टाकण्याच्या धोरणाला धरून केलेल्या या कमालीच्या तर्कशुद्ध वर्तनाचे चीज केले जाईल, लोकप्रतिनिधींच्या हाती खरी सत्ता दिली जाईल आणि मानवी स्वातंत्र्य लोप पावण्याच्या अवस्थेत आहे अशा वेळी जगाच्या पाठीवर मानवी स्वातंत्र्य मूर्त करण्यासाठी आमच्या सर्व सामर्थ्यानिशी युद्धात भाग घेण्यासारखी परिस्थिती निर्माण केली जाईल अशी आम्हाला आशा वाटत होती. निदान, हिंदुस्थानच्या मानगुटीभोवतीची पकड जास्तच आवळली जाईल असे तरी ब्रिटन काही करणार नाही अशी आमची अपेक्षा होती.

'परंतु या सर्व आशांचा चक्काचूर झाला. ब्रिटिशांची हिंदुस्थानकडे पाहण्याची दृष्टी मुळीच बदललेली नाही हे अयशस्वी झालेल्या क्रिप्स योजनेने स्पष्ट दाखवून दिलेले आहे. भारतावरील ब्रिटिश पकड मुळीसुद्धा सैल करण्याची सरकारची बिलकुल तयारी नाही हेही त्यावरून दिसून आले. सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांच्याबरोबर बोलणी चालू असताना राष्ट्रीय मागणीला अनुसरून अगदी किमान गोष्टी तरी मिळाव्यात यासाठी काँग्रेसच्या प्रतिनिधींनी आटोकाट प्रयत्न केला. तो अर्थातच निष्फळ ठरला. लोकांत इंग्लंडबद्दल झपाट्याने तीव्र तिरस्कार निर्माण होण्यात या निराशेचा परिणाम झाला. या मनोवस्थेत जपानला मिळत गेलेल्या विजयांनी लोकांना समाधान वाटू लागले. जनमानसाला हे जे वळण मिळाले आहे त्याची अत्यंत गंभीर दखल काँग्रेस वर्किंग कमिटी घेते; कारण लोकांतील ही भावना वेळीच आवरली गेली नाही तर जपानी आक्रमणाचा प्रतिकारशून्य स्वीकार करण्यात तिची अपरिहार्य परिणती होईल. या समितीचे असे मत आहे की, कोणत्याही आक्रमणाचा प्रतिकार झालाच पाहिजे. आक्रमकापुढे शरण जाण्याने भारतीय जनतेचा अधःपात होईल व तिची गुलामगिरी

चालूच राहील. मलाया, ब्रह्मदेश किंवा सिंगापूर या देशांमध्ये आलेला अनुभव येथे येऊ नये यासाठी काय करावे याची काँग्रेसला चिंता आहे. जपानी किंवा कोणत्याही परकीय सत्तेच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी लोकांत शक्ती निर्माण करण्याची तिची तीव्र इच्छा आहे.

' ब्रिटनबद्दल भारतीय जनतेत असलेल्या या कटू भावनेचे सदिच्छेमध्ये काँग्रेस रूपांतर करू शकेल. त्यामुळे ब्रिटनबरोबरच हिंदुस्थानही जगातील निरनिराळ्या राष्ट्रांचे व तेथील जनतेचे स्वातंत्र्य टिकविण्यात सक्रीय भाग घेऊ शकेल. त्यासाठी येतील ती संकटे झेलण्यास व पडतील ते कष्ट करण्यास आमचा देश तयार आहे. परंतु भारताला स्वातंत्र्याचा प्रकाश मिळेल तरच हे सर्व घडून येऊ शकेल.

' भारतातून ब्रिटिश सत्ता काढून घ्यावी या मागणीमागे इंग्लंडला किंवा त्याच्या दोस्त राष्ट्रांना त्रास द्यावा किंवा त्यांच्या युद्धकार्यामध्ये अडचणी आणाव्या किंवा भारतावर आक्रमण करण्यास जपानला उत्तेजन द्यावे किंवा चीनवर शत्रुराष्ट्रांचे अधिक दडपण पडावे असा आमचा मुळीच उद्देश नाही. तसेच दोस्त राष्ट्रांचे संरक्षणसामर्थ्य कमी करावे अशीही काँग्रेसची इच्छा नाही. म्हणून जपानी आक्रमण परतवून लावण्यासाठी वा चीनचे रक्षण करण्यासाठी दोस्त राष्ट्रांची इच्छा असेल तर हिंदुस्थानात त्यांचे लष्करी तळ आहेत तसेच ठेवण्यास काँग्रेस सहज मान्यता देईल...

' मात्र आमचे हे आवाहन व्यर्थ ठरल्यास सध्याच्या स्थितीचा काँग्रेसला अत्यंत गंभीरपणे विचार करावा लागेल. कारण दिवसेंदिवस परिस्थिती बिघडत चालली असून भारताची स्वरक्षणाची इच्छा, निग्रह व सामर्थ्य कमी कमी होत चालले आहे. अशा वेळी, काँग्रेसला नाखुषीने का होईना, राजकीय हक्क व स्वातंत्र्य यासाठी तिने १९२० पासून कमावलेल्या सर्व अहिंसक सामर्थ्यानिशी झगडा करण्याशिवाय गत्यंतर राहणार नाही. अशा प्रकारच्या या विशाल लढ्याचे नेतृत्व अर्थात गांधीजीच करतील ' ( **काँग्रेस बुलेटिन**, १-९-१९४२, पृ. ५–७ ).

त्यानंतर ७ ऑगस्ट, १९४२ रोजी अ. भा. काँग्रेस कमिटीची बैठक मुंबईत भरली होती. तेथे सत्याग्रहासंबंधीचे सूचनापत्रक तयार करण्यात आले ( याबद्दलची सविस्तर माहिती **गांधीज कॉरेस्पॉन्डन्स वुइथ द गव्हर्नमेंट १९४२-४४**, पृ. ३५६ -३६०, या पुस्तकात आलेली आहे. ) सरकारने मात्र घाई करून दुसऱ्याच दिवशी, ८ ऑगस्टला, सर्व पुढाऱ्यांना अटक करून तुरुंगात टाकले.

पुढारी व जनता यांची अशा प्रकारे ताटातूट होताच देशाच्या निरनिराळ्या भागांत लोक बंड करून उठले. रेल्वेमार्ग व तारा यांच्यावर हल्ले झाले. निःशस्त्र लोक पोलिस चौक्यांवर चालून गेले. मिदनापूरसारख्या भागात राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्याचे घोषित करण्यात आले. अत्यंत क्रूर दडपशाहीचा वरवंटा फिरूनसुद्धा हे ' राष्ट्रीय सरकार '

तीन वर्षे राज्य करीत होते. पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत सोडून राहिलेल्या भारतामध्ये या काळात ज्या क्रांतिकारक घटना घडल्या त्यांचा साद्यंत इतिहास ' रेबेल इंडिया ' ( १९४६ ) या पुस्तकात दिला आहे.

भारताच्या निरनिराळ्या भागांत या सर्वच काळात सामान्यजनांनी जे धैर्य व जो पराक्रम दाखविला तो केवळ अभूतपूर्व असा होता. हजारो निःशस्त्र स्त्री-पुरुष शिस्तबद्ध रांगा करून पोलिस चौकीचा ताबा घेण्यास जाऊ लागले की भारतीय पोलिस त्यांच्यावर बंदुका चालवीत असत. त्या गोळीबारात बरेच स्वयंसेवक मारले जात व कितीतरी लोक जखमी होत. तेवढ्यापुरता किंचित थांबून मोर्चा सतत पुढे जाई. अशाच एका मोर्चात एका ठिकाणी राष्ट्रध्वज घेऊन जाणारी एक वृद्ध स्त्री गोळ्या लागून मृत्यू पावली; परंतु तिने निशाण सोडले नाही. मोर्चा निघाल्यापासूनच ती निशाण घेऊन आघाडीवरच होती. कारण तिच्यासारखी वृद्ध माणसे असताना तरुण रक्त सांडणे बरोबर नाही, असे तिचे मत होते. दुसऱ्या एका ठिकाणी एका स्वयंसेवकाला पाठीच्या कण्यात गोळी लागून तो बेशुद्ध पडला. थोड्या वेळाने शुद्धीवर आल्यावर तशा अवस्थेतही खरडत खरडत तो पोलिस चौकीवर पोचलाच. चौकीच्या लाकडी चौकटीवर हात ठेवून शेजारीच उभ्या असलेल्या आपल्या सहकाऱ्याला तो म्हणाला, ' नायकाला जाऊन सांग की आम्ही चौकी सर केली. ' एवढे बोलून त्याने प्राण सोडले ( **मित्रा आणि चक्रवर्ती**, १९४६, पृ. २५ ).

या पराक्रमाच्या गोष्टी कर्णोपकर्णी होत साऱ्या देशभर पसरल्या. ' गोळ्या छातीवर झेला ' हा गांधींचा संदेशही देशभर पोचला. मिदनापूरला कित्येक ठिकाणी असे झाले की चौकीवर येणाऱ्या लोकांवर हुकुमाची ताबेदारी म्हणून पोलिस गोळीबार करीत व ताबडतोब चौकी सोडून निघून जात. चौकीवर चालून येणारे लोक हे ' गांधींचे सैन्य ' आहे आणि त्यांचा हेतू वाईट नाही हे त्यांना कळत होते, असेच म्हणाना. हे स्वयंसेवक देशासाठी प्राणत्यागास सिद्ध झालेले आहेत हेही त्या शिपायांना कळत असेल... काही असो, गोळीबार करून ते निघून जात हे मात्र खरे. पोलिस निघून गेल्यानंतर स्वयंसेवक चौकीचा ताबा घेत. त्या वेळी कित्येकदा त्यांना चौकीत शिपायांनी टाकून दिलेल्या बंदुका व दारूगोळाही सापडत असे. परंतु कोणत्याही प्रकारच्या शस्त्रास्त्रांचा उपयोग गांधींनी निषिद्ध मानला असल्याने स्वयंसेवक त्या बंदुका मोडून तोडून जवळपासच्या डबक्यात टाकून देत असत.

सर्व देशभर गांधींचे व एकट्या गांधींचेच नाव निनादत राहिले. जनतेने रागाच्या भरात क्वचित कोठे रेल्वेमार्ग उद्ध्वस्त केले तरी लोकांच्या जिवाशी खेळ केले नाहीत. या अत्यंत आणीबाणीच्या व उद्रेकाच्या काळात आणखी एक मुद्दाम लक्षात घेण्या-

सारखी गोष्ट म्हणजे, कोणत्याही गोऱ्या माणसाला कसलीच इजा पोचली नाही. सामान्य भारतीयाप्रमाणे तोही अगदी सुरक्षित होता. काही गोऱ्या माणसांना बंगालमधील 'राष्ट्रीय सरकार'ने तुरुंगवासाची व क्वचित फाशीची शिक्षा दिल्याची हकीगत मागाहून बाहेर आली. परंतु त्या व्यक्तींनी वैयक्तिकरीत्या भारतीय स्त्रियांवर बलात्कार किंवा तत्सम भयंकर अपराध केलेले होते.

विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, पूर्वीच्या निरनिराळ्या चळवळींच्या तुलनेत या वेळी लोकांनी अत्यंत असामान्य धैर्य दाखवले. तसेच गांधींखातर त्यांनी दाखवलेला संयमही ठळकपणे नजरेत भरण्यासारखा होता.

बंगाल प्रांतात मिदनापूर भागात जे घडले त्या प्रकारच्या घटना बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र व इतरत्रही घडल्या. या सर्वच ठिकाणी एक गोष्ट हळूहळू दिसून आली. निःशस्त्र स्वयंसेवकांवर गोळीबार करण्याच्या हुकुमाची तामिली करावी लागणाऱ्या भारतीय पोलिस दलात एक प्रकारची खळबळ निर्माण झाली. व्यक्तिशः त्यांचा स्वतःचा जीव केव्हाच धोक्यात नसे. त्यामुळेच की काय, आज्ञापालन केल्यानंतर त्यांच्या मनात अपराधीपणाची जाणीव निर्माण होत असावी.

त्या वेळी हिंदुस्थानातील वेगवेगळ्या भागांत घडत असलेल्या गोष्टींचे अचूक व वास्तव चित्र काढणे इतिहासकाराच्या दृष्टीने फार कठीण आहे हे कबूल करावे लागेल. जेथे वस्तुतः एका व्यक्तीने पराक्रम गाजविला तेथे तो समुदायाच्या नावावर सांगितला गेला; काहींनी मध्येच लढ्यातून काढता पाय घेतला त्याकडे दुर्लक्ष झाले, असे प्रकार झाले आहेत. एकंदरीत १९४२ च्या लढ्याचे भारतीय व्यक्तीच्या मनातील चित्र अद्भुत, भव्योदात्त व रोमांचकारी असे आहे. ते काहीसे अतिशयोक्त व एकांगी असले तरी या सर्वांत एक गोष्ट निर्विवाद आहे.

जनता बंड करून उठली व तिने आपल्या कल्पनेप्रमाणे गांधींच्या आदेशाचे — करा वा मरा— पालन केले. या सर्व काळात मिळून साठ हजारांहून जास्त लोक पकडले गेले, अठरा हजार लोकांना निरनिराळ्या मुदतींच्या तुरुंगवासाच्या शिक्षा झाल्या, ९४० लोक गोळ्यांना बळी पडले व १६३० माणसे जखमी झाली. इतके होऊनसुद्धा लोकांनी सूड घेण्यासाठी कोणालाही ठार मारल्याची नोंद नाही (**मित्रा आणि चक्रवर्ती**, पृ. ७). जनतेची हिंसा केवळ सरकारी मालमत्तेची मोडतोड करण्याइतकीच मर्यादित होती. त्याच्या पलीकडे लोक गेले नाहीत. सरकारच्या बाजूने मात्र चळवळ दडपून टाकण्यासाठी शक्य ते सर्व अनन्वित प्रकार करण्यात आले व युद्धसामग्रीच्या पुरवठ्यात खंड पडू नये म्हणून झपाट्याने पावले उचलण्यात आली (**टकर**, १९५०, पृ. ८१).

या चळवळीतून एक गोष्ट स्पष्ट झाली. 'चले जाव' आंदोलन सुरू होण्यापूर्वी लोकांच्या मनात असलेली असहायता किंवा जपानच्या विजयाबद्दल वाटणारी छुपी

आदराची भावना समूळ नष्ट झाली. लौकिक अर्थाने ही चळवळ अयशस्वी झाली हे खरे असेलही, पण लोकांचे नीतिधैर्य परत आले. इतकेच नव्हे तर ते वाढलेही. आणि हेही थोडे नव्हते.

दरम्यानच्या काळात तुरुंगात बंदिवान झालेले राजकीय कार्यकर्ते जवळजवळ युद्ध संपेपर्यंत तुरुंगातच राहिले. नंतर काही काळ तरी राजकीय रंगमंचावर भारतीयांच्या हातात पुढाकार राहिला नाही असे दिसते.

## आझाद हिंद सेना

ज्यांचा १९४५–१९४६ मधील भारतीय राजकारणावर बराच मोठा प्रभाव पडला अशा इतर काही घटना आग्नेय आशियामध्ये 'चले जाव' किंवा 'छोडो भारत' चळवळ सुरू होण्यापूर्वीच घडून आल्या.

युद्ध सुरू होण्याच्या थोडेच दिवस आधी सरकारकडे स्वातंत्र्याची निर्वाणीची मागणी करावी यासाठी काँग्रेसला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न सुभाषचंद्र बोसांनी केला होता हे वाचकांना आठवत असेलच. या ना त्या कारणाने त्या वेळी सुभाषचंद्रांची अशी खात्री झाली की, काँग्रेसचे पुढारी स्वातंत्र्याचा लढा करण्यास तयार होत नाहीत. ते केवळ 'घटनात्मक सुधारणावादी' बनलेत, असा त्यांचा पक्का ग्रह बनला (सुभाषचंद्र बोस, पृ. २३). काँग्रेस नेत्यांनी अर्थातच अहिंसेचे कारण पुढे केले होते. गांधींकडे सुभाषबाबू अतिशय आदरभावनेने पाहात व त्यांना आपले पुढारी मानीत. गांधींच्या अहिंसा तत्त्वाची व काँग्रेसची पूर्वीच फारकत झाली असली तरी यामध्ये फरक पडला नव्हता.

शेवटी स्वातंत्र्यलढा पुकारण्याची तीव्र आवश्यकता गांधींनाच पटवून देण्याचा सुभाषचंद्रांनी यत्न केला होता. त्यांनी गांधींना लिहिलेल्या या पत्रांचा पूर्वी उल्लेख आलेला आहेच. सुभाषचंद्रांनी गांधींना पुन्हा विनंती केली की, 'याबाबत माझी इतकी खात्री पटली आहे की, त्यासाठी मी कोणताही त्याग करावयास सिद्ध आहे. आपण या लढ्याला सुरुवात करणार असाल तर मी मोठ्या आनंदाने माझ्या सर्व सामर्थ्यानिशी आपणास मदत करायला येईन.' आपणास जर असे वाटत असेल की, दुसऱ्या एखाद्या अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला हा लढा अधिक चांगल्या प्रकारे लढता येईल तर मी आनंदाने बाजूला होईन. पण गांधींना ते पटले नाही. उत्तरादाखल त्यांनी लिहिले, 'आपला देश आजच्याइतका अहिंसक वृत्तीचा पूर्वी कधीच नव्हता हे तुमचे म्हणणे मला मुळीच पटत नाही. सार्वत्रिक अहिंसक सत्याग्रह चळवळीला योग्य असे वातावरण मला आज कोठेच दिसत नाही. पुरेसे पाठबळ असल्याशिवाय दिलेले अंतिमोत्तर निरुपयोगीच नव्हे तर दुरुपयोगी ठरते.'

या सर्व प्रकारामुळे सुभाषचंद्र निराश झाले असले किंवा त्यांच्यात कडवटपणा निर्माण झाला असला तर ती गोष्ट अनपेक्षित नव्हती. कारण त्यांच्या दृष्टीने सर्वोत्तम संधी वाया घालविली जात होती. देशातील राजकीय स्थितीचे विश्लेषण करताना त्यांनी प्रसंगवशात आपल्या या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या मते, 'काँग्रेस पक्षातील बरपांगी अंतर्गत वाटणाऱ्या या झगड्याच्या तळाशी वास्तविक वर्गकलहच आहे... त्यांना (उजवे) नेहमी अशी भीती वाटते की एकदा लढा सुरू झाला की नेतृत्व त्यांच्या हातातून निसटून जाईल (सुभाषचंद्र बोस, १९६२, पृ. २३७). मनाच्या अत्यंत कडवट अवस्थेत त्यांनी २५ नोव्हेंबर १९३९ रोजी लिहिले आहे, 'आजच्या वर्किंग कमिटीने प्रत्यक्ष कृतीला सुरुवात केलीच तरी डाव्या गटाला एकसारखी भीती वाटत राहील की, मध्येच "चौरीचौरा" किंवा "हरिजन चळवळ" किंवा तसलीच विघ्ने नवीन रूपात उपस्थित होतील व आपल्या चळवळीला सामर्थ्य, गती व विस्तार प्राप्त होत आहे असे दिसताच चळवळ मागे घेतली जाईल' (सुभाषचंद्र बोस, १९६२, पृ. २१८).

कालांतराने काँग्रेसने सुभाषचंद्रांवर शिस्तभंगाचा इलाज केला. ते बंडखोर बनले आणि काही काळ राजकीयदृष्ट्या विजनवासात गेले. ब्रिटिश सरकारचा अत्यंत कडक पहारा असूनसुद्धा जानेवारी १९४१ मध्ये हिंदुस्थानातून निसटून जाण्यात ते यशस्वी झाले. देशाबाहेर पडल्यानंतर त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रथम जर्मनी व नंतर जपानचा सशस्त्र पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला.

इंडियन नॅशनल आर्मी— आझाद हिंद सेना— चा गाभा आग्नेय आशियामध्ये तयार होताच. २ जुलै १९४३ रोजी सिंगापूरला आल्याबरोबर त्यांनी प्रथम या सैन्याची पुनर्घटना केली. हे सर्व झाल्यानंतर, ६ जुलै १९४४ रोजी रंगूनहून देशबांधवांसाठी केलेल्या संदेशवजा भाषणात त्यांनी गांधींबद्दलचा आपला अतीव आदर व्यक्त केला. त्या भाषणात गांधींना उद्देशून ते म्हणाले, 'भारताबाहेर राहणाऱ्या भारतीयांच्या दृष्टीने, देशात आज जी जागृती दिसते तिचे जनक आपणच आहात... ऑगस्ट १९४२ मध्ये आपण असीम धैर्य दाखवून "चले जाव"ची घोषणा केल्यामुळे देशाबाहेर असणाऱ्या देशभक्त भारतीयांना व भारतीय स्वातंत्र्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या परकीय मित्रांना आपल्याबद्दल वाटणारा आदर शतगुणित झाला आहे...

'योगायोगाने हिंदुस्थानातील आमचे देशबांधव स्वतःच्याच प्रयत्नांनी आपली दास्यातून मुक्तता करून घेण्यात यशस्वी झाले किंवा सुयोगाने ब्रिटिश सरकारने तुम्ही केलेला "चले जाव" ठराव मान्य केला व ते निघून गेले तर आमच्याइतका आनंद कोणालाच होणार नाही. मात्र वरीलपैकी कोणतीच गोष्ट होणारी नाही, आणि शेवटी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र संघर्ष करण्याशिवाय गती नाही या भूमिकेतून आम्ही पाऊल

उचलीत आहोत. भारतीय स्वातंत्र्याचे शेवटचे युद्ध सुरू झाले आहे. आझाद हिंद सैन्याच्या तुकड्या आज भारतभूमीवरच पराक्रम गाजवीत आहेत. अपार कष्ट व संकटे सोसूनही त्या हळूहळू का होईना, पण सातत्याने पुढे सरकत आहेत. भारतभूमीवरून शेवटचा ब्रिटिश माणूस हाकलून देऊन दिल्लीतील व्हाइसरॉयच्या बरावर आमचे राष्ट्रीय तिरंगी निशाण लागेपर्यंत आमची ही लढाई चालूच राहणार...

'हे राष्ट्रपित्या, भारताच्या स्वातंत्र्याच्या या पवित्र लढाईत आम्ही तुझ्या सदिच्छा आणि आशीर्वाद मागत आहोत. जयहिंद!' (चतर्जी, १९४७, पृ. २१७).

अन्नधान्य, शस्त्रास्त्रे व वाहने यांची कमालीची कमतरता सोसून आझाद हिंद सेना पूर्व सीमेवर लढत राहिली. मात्र ब्रेप्याचा जपानी फौजांचा निर्णय आधीच झाला होता, परिणामी त्यांच्याकडून मिळणारी मदतही कमी होत गेली. परिणाम असा झाला की, २६ एप्रिल १९४५ रोजी रंगून पडले तेव्हा आझाद हिंद फौजेतील बहुतेकांनी दोस्त राष्ट्रांच्या सैन्यापुढे शस्त्रत्याग करण्याचे ठरवले. सुभाषचंद्रांच्या काही जिवलग मित्रांनी, थोडे त्यांच्या इच्छेविरुद्धच, त्यांना ब्रह्मदेश सोडावयास उद्युक्त केले. तेथून ते अज्ञात ठिकाणी निघून गेले (टकर, १९५०, पृ. ५०–७२).

आझाद हिंद सैन्यातील अधिकाऱ्यांवर खटले भरले जाण्यापूर्वी भारतात आझाद हिंद सैन्याच्या पराक्रमी लढतीची फारच थोडी माहिती पसरलेली होती. प्रत्यक्षात ५ नोव्हेंबर १९४५ रोजी दिल्लीला खटला सुरू झाला तेव्हा त्यांच्या वीरगाथेचे एक एक पान उलटू लागले. सारा देश मग अपूर्व उत्साहलहरींनी आणि सैनिकांबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीने व आदराने उचंबळून गेला. ३ जानेवारी १९४६ रोजी आझाद हिंद सैन्यातील सर्व प्रमुख अधिकाऱ्यांना मुक्त करण्यात आले. पुढे ब्रिटिश सेनाप्रमुखांनी इतर लोकांना झालेल्या दीर्घ मुदतीच्या शिक्षा खूपच कमी केल्या.

या संबंधात कलकत्त्यात थोडीफार दंगल झाली. त्याचा विचार आपण पुढे करू. दरम्यान आझाद हिंद सेनेची कहाणी सर्वतोमुखी झाली तसतसा पोलिस दल व भारतीय आरमार दल या संघटनांत असंतोष धुमसत असल्याची चिन्हे प्रकट होऊ लागली. त्या घटनांचा थोडा सविस्तर विचार पुढील विभागात केला आहे. [ज्या वाचकांना आझाद हिंद सैन्यावरील खटल्याची साद्यंत माहिती हवी असेल त्यांनी कृपा करून इं. ॲ. र., १९४५, II, पृ. १९४–१९८, पाहावे. तसेच टकर, १९५०, ४ व ५ ही प्रकरणेही त्यांना उपयुक्त वाटतील.]

## १९४४ ते १९४६ : संभ्रमावस्था

**(अ) गांधींची हालचाल :** युद्ध जसजसे लांबत गेले तसतसा भारतावर भयंकर आर्थिक

ताण पडत गेला. १९४३ साली बंगालमध्ये भयंकर दुष्काळ पडला. त्यात अधिकृत सरकारी आकडेवारीप्रमाणे पंधरा लक्ष माणसे मृत्युमुखी पडली. बिगरसरकारी मताप्रमाणे ही संख्या वरील आकड्याच्या सुमारे तिप्पट किंवा जास्त होती. सर जॉन वुडहेड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने तयार केलेल्या अहवालाचा सारांश इंडियन ॲन्युअल ( रजिस्टर १९४५, II, पृ. ३४६–३४९ ) मध्ये पाहावयास मिळतो. ( शिवाय **संथानम्**, १९४४ आणि **शिवस्वामी आणि इतर**, १९४५ पाहा. )

या सर्व काळात अधिकारी वर्गातील लाचलुचपत व अकार्यक्षमता, दप्तरदिरंगाई याबद्दलही जनतेच्या फार मोठ्या प्रमाणावर तक्रारी होत्या. काँग्रेस सरकारांनी राजीनामा दिल्यावर बहुतेक प्रांतांत गव्हर्नरांची राजवट सुरू झालेली होती. गव्हर्नरांच्या राजवटीखाली सर्वच देश लाचलुचपत व गैरकारभार यांच्या कर्दमात जणू लोटला गेला होता. युद्ध चिघळत गेल्याने दडपशाहीला निर्दयतेची धार चढलेली होती. तशाही परिस्थितीत भारतीय जनतेने जो कणखर निश्चयीपणा दाखवला तो अर्थगर्भ होता. नेतृत्व मिळाले असते तर कोणत्याही क्षणी बंडाळी माजावी अशीच त्या वेळची स्थिती होती.

आग्नेय आशियातून जपान्यांनी दोस्त राष्ट्रांचा, विशेषतः ब्रिटनचा, धुव्वा उडविल्याच्या घटनेनंतर भारतीय सैन्यातही असंतोष पसरू लागला होता. ' चले जाव ' चळवळीत निःशस्त्र स्वयंसेवकांवर कराव्या लागलेल्या गोळीबारामुळे भारतीय पोलिस दलही बिथरलेले होते.

ही एकंदर स्थिती पाहून ब्रिटिशांना भारतीय राजकारणातील कोंडी नष्ट करावी असे वाटू लागले. सरकारला असे वाटू लागण्यास आणखीही कारणे असण्याची शक्यता आहे. पुढे एका ठिकाणी आपण त्यांचाही विचार करणार आहोत.

याच सुमारास गांधी तुरुंगात मलेरियाने आजारी पडले. सरकारने ही संधी साधून ६ मे १९४४ रोजी त्यांना मुक्त केले. आजारातून उठून पुण्याला विश्रांती घेत असतानाच त्यांनी व्हाइसरॉयना भारताच्या राजकीय स्थितीवर एक उपाय सुचविला. अत्यंत त्रडतर सार्वत्रिक दुष्काळाची स्थिती व त्यामुळे लोकांमध्ये आलेली भयानक असहायता यामुळे गांधींचे मन पिळवटून निघाले होते. त्यांनी २७ जुलै १९४४ रोजी लॉर्ड वॅव्हेल यांना पाठवलेल्या पत्रात लिहिले :

' बदललेल्या परिस्थितीत ऑगस्ट १९४२ च्या ठरावानुसार सार्वत्रिक सत्याग्रह करणे उचित ठरणार नाही; तेव्हा तो ठराव रद्द समजला जावा आणि सरकारच्या युद्धविषयक सर्व प्रयत्नांना काँग्रेसने संपूर्ण सहकार्य करावे असे काँग्रेस वर्किंग कमिटीला सांगण्यास मी तयार आहे. मात्र, ब्रिटिश सरकारने भारताला तत्काल स्वातंत्र्य देत असल्याचे घोषित करावे व केंद्रीय कायदेमंडळाला जबाबदार असणारे राष्ट्रीय सरकार स्थापन करावे ही त्याची पूर्वशर्त आहे. युद्ध चालू असेपर्यंत भारतावर कसलाही आर्थिक

ताण न पडता लष्करी हालचाली आहेत तशाच चालू राहाव्यात. ब्रिटिश सरकारची समझौता करण्याची इच्छा असेल तर पत्रव्यवहाराऐवजी बोलणी व्हावीत असे मी सुचवीन' (इं. अॅ. र., १९४४, II, पृ. १८२).

वरील मागणी अर्थातच फेटाळली गेली. इंग्लंडमधील लोकमत मात्र पाच वर्षांच्या युद्धामुळे जुनी चाकोरी सोडून नवीन वळणाने वाहू लागले होते. 'डेली वर्कर'मध्ये रॉयल एअर फोर्समधील चाळीस अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांनी पुढील आशयाचे पत्र प्रसिद्ध झाले : 'राष्ट्रीय सरकार स्थापन करावे या गांधींच्या सूचनेकडे सरकारने दुर्लक्ष केले ही गोष्ट आमच्या मते अविचाराची झाली. गांधींच्या सूचनेप्रमाणे राष्ट्रीय सरकार अस्तित्वात आणले असते तर इतर राष्ट्रांच्या जोडीने हिंदुस्थानातील कोट्यवधी माणसांची शक्ती युद्धात आपल्या बाजूने खऱ्या अर्थाने उभी झाली असती' (इं. अॅ. र., १९४४, II, पृ. १७८).

याच सुमारास गांधींनी मुस्लिम लीगशी तडजोड करण्याच्या दृष्टीने जिनांची भेट घेण्याची तयारी दर्शविली. त्यासाठी त्यांनी जुलै ते सप्टेंबर १९४४ या काळात अनेक प्रयत्न केले. पण तेही अयशस्वी ठरले. (या दोघांतील संपूर्ण पत्रव्यवहारासाठी पाहा : इं अॅ. र., १९४४, II, पृ. १३५–१५२). गांधी जीनांना फाजील महत्त्व देत आहेत असा आरोप कित्येक राष्ट्रीय पुढाऱ्यांनी केला. परंतु याबाबत प्रयत्न करणारे गांधी एकटेच नव्हते, ही एक गमतीची गोष्ट आहे. या प्रसंगी मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारख्या ज्येष्ठ कम्युनिस्ट पुढाऱ्यानेही पुढील प्रकारचे पत्रक प्रसिद्ध केले होते :

'गांधी-जीना बोलण्यातून यापेक्षा वेगळे काही निष्पन्न होईल असे केवळ मनोराज्यातच कल्पिले जाऊ शकत होते. परिस्थितीकडे जरा चिकित्सक व वास्तववादी दृष्टिकोणातून पाहणाऱ्यांना ही बोलणी फिसकटल्याची वार्ता अनपेक्षित नव्हती.

'पण ही बोलणी फिसकटली म्हणजे काही फार मोठी राजकीय आपत्ती येऊन कोसळली आहे असे नव्हे. उलट, अशा रीतीने एक फार मोठा भ्रम दूर झाल्याने आता पुढील घटनात्मक वाटचालीचा प्रश्न व्यवहार्य भूमिकेतून चोखाळणे शक्य झाले आहे. परंतु ब्रिटिशांच्या खालोखाल ही गोष्ट मुख्यतः जीनांवरच अवलंबून आहे. त्यांनीच आता हिंदू भारताशी तडजोड करण्याची कल्पना सोडून दिली पाहिजे. आता तरी त्यांच्या लक्षात यायला हवे की हिंदू भारत येथील मुस्लिमांची स्वयंनिर्णयाची मागणी कधीच मान्य करणार नाही.

'गांधी व जीना यांच्यामधील या लांबण लागलेल्या वाटाघाटींत जीनांनी जे प्रश्न उपस्थित केले, त्या सर्वांना गांधींनी टाळाटाळीची उत्तरे दिली. परंतु, काँग्रेस व हिंदुमहासभा या दोन हिंदू संघटना व त्यांचे पित्ते यांना बाजूला ठेवून रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी, शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन, दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर संघटना आणि इतर

गट या सर्वांची एक लोकशाही आघाडी केली तर जीनांच्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देता येतील. वरील प्रकारची लोकशाही आघाडी मुस्लिमेतर कष्टकरी जनतेचे प्रतिनिधित्व करील. त्यांचीच या देशात बहुसंख्या आहे.

' अशा प्रकारच्या सर्व पक्षोपपक्षांची एक संघटना करण्यात जीनांनीच पुढाकार घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो. ही परिषद भारताच्या भावी घटनेचा सर्वसंमत खर्डा तयार करील आणि लोकशाही संघटनांच्या संमिश्र हंगामी सरकारच्या हाती ब्रिटिशांनी सत्ता सुपूर्द करावी अशी मागणी करील. इंग्लिश लोक सत्ता देण्यास कितीही नाखूष असले तरी सर्व जातीजमातींतून आलेल्या बहुसंख्य लोकांच्या या प्रातिनिधिक संयुक्त आघाडीने केलेल्या मागणीला नकार देण्यास त्यांना कारण सापडणार नाही. जुने पक्ष व त्यांचे पुढारी यांनी सगळा घोळ केला आहे. आपल्याला आजची निराशा झटकून टाकायची असेल आणि संभाव्य यादवी टाळावयाची असेल तर आपण एका नव्या मनूला जन्म दिला पाहिजे ' ( इं. ॲ. र., १९४४, II, पृ. १५७ ).

यानंतर गांधींनी आणखी एक पाऊल उचलले. ते अपेक्षित असेच होते. आपल्या रचनात्मक कार्यक्रमाच्या साहाय्याने देशात अहिंसक समाजरचनेचा पाया घालण्याचा त्यांचा मनोदय होता. रचनात्मक कार्यक्रमाची आवश्यकता समजावून देण्याचा त्यांना कधीच कंटाळा नसे. परंतु का कोणास ठाऊक, त्यांच्या अनुयायांकडूनही त्यांना या बाबतीत प्रगल्भ व समंजस प्रतिसाद कधीच मिळाला नाही.

सप्टेंबर १९४४ मध्ये सेवाग्रामला भरलेल्या अ. भा. चरखा संघाच्या अधिवेशनापुढील त्यांच्या भाषणाच्या वृत्तांतात म्हटले आहे : ' कित्येक वर्षांपूर्वीच त्यांनी काँग्रेसला चरख्याचा संदेश दिलेला होता, काँग्रेसने तो स्वीकारला होता, पण मनापासून मात्र स्वीकारला नव्हता. याच्याकडून आपल्याला काही काम करून घ्यावयाचे असेल तर याच्या चक्रमपणाला थोडीफार मान्यता दिलीच पाहिजे असा, कदाचित, काँग्रेसजनांनी त्यांच्या बाबतीत विचार केला असावा. काँग्रेसजनांनी मग त्यांनी दिलेल्या घोषणेची अगदी यांत्रिकपणे री ओढत म्हटले होते " चरखा चला चलाके लेंगे स्वराज्य लेंगे । " ' ( इं. ॲ. र., १९४४, II, पृ. १८४ ).

गांधीवाद्यांच्याबद्दल त्यांचे उद्गार असे होते : ' त्यांच्यातील पुष्कळांनी त्यांच्यावरच्या ( गांधीवरच्या ) निष्ठेपोटी चरख्याचा स्वीकार केला होता. निष्ठा असणे चांगले होते, पण निष्ठेला त्यांनी बुद्धीची जोड द्यावी अशी त्यांची इच्छा होती. म्हणजे मग चरख्याबद्दल शंका घेणाऱ्यांचे ते स्वतःच्या ताकदीवर समाधान करू शकले असते... आज चरखासंघ ही अत्यंत केंद्रीभूत संस्था बनलेली होती. उद्या ती सर्वस्वी विकेंद्रित होणार होती....

चरखा संघाचे काम योग्यरीत्या केले असते तर काँग्रेसचा संदेश खेडोपाडी

पोचविण्यासाठी वास्तविक काँग्रेसजनांनी चरखा संघाची मदत व मार्गदर्शन मागितले असते; परंतु चरखा संघ काँग्रेसकडे मदतीच्या अपेक्षेने पाहात आहे असे केविलवाणे दृश्य त्यांना पाहावे लागत होते. वास्तविक त्यांना ( चरखा संघाच्या कार्यकर्त्यांना ) किती तरी वेळा त्यांनी विनविले होते की, त्यांनी राजकारण विसरून चरख्यावरच त्यात गर्भित असलेल्या सर्व गोष्टींसह आपले सर्व लक्ष केंद्रित करावे. खादीकार्य हेच एकमेव खरे सात्त्विक राजकारण आहे असे त्यांचे मत होते. ज्या गावांनी चरख्याचा संदेश आत्मसात केला असेल ती स्वातंत्र्याच्या प्रकाशाने न्हाऊन निघणार होती. चरख्याच्या मागोमाग खेड्यांतील इतर उद्योगही आपोआप सुरू होतील; बेसिक शिक्षण सुरू होईल आणि त्यामुळे लोकांची बुद्धी तेजस्वी होत जाईल, असे त्यांचे सांगणे होते. वस्तुतः बेसिक शिक्षण पद्धतीमागे, सर्व शारीर गुणसंपदेच्या, शक्तींचा उपयोग विद्यार्थ्यांच्या बुद्धीचे तेज वाढण्याकडे व्हावा हीच कल्पना होती. त्यांच्या नंतरनंतरच्या सर्व कल्पना– ग्रामोद्योग, मूलोद्योग, बेसिक शिक्षण— त्यांना चरख्यासंबंधी सूक्ष्म विचार करतानाच सुचलेल्या होत्या. त्यांच्या दृष्टीने चरखा म्हणजे जीवनाचे तत्त्वज्ञान होते, अहिंसेचे जिवंत प्रतीक होते ( इं. ॲ. र., १९४४, II, पृ. १८४ व पुढे ).

**( ब ) मर्जी राखण्याचे धोरण :** २१ नोव्हेंबर १९४४ रोजी राजकीय बंदिवानांची संख्या दहा हजारांहून थोडी अधिक होती. ते सर्वजण बंदिवासातच राहिले. दरम्यान देशाच्या पुढाऱ्यांशी चर्चा करण्याचा आपला मनोदय व्हाइसरॉयनी सिमल्याहून जाहीर केला. त्यानंतर जून १९४५ मध्ये काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांना तेवढे मुक्त करण्यात आले. व्हाइसरॉयबरोबरच्या या बोलण्यांना गांधी स्वतः व्यक्तिगत निमंत्रित म्हणून उपस्थित होते. ही बोलणी काही आठवडे चालली व १४ जुलै १९४५ रोजी ती असफल झाल्याचे घोषित करण्यात आले ( इं. ॲ. र., १९४५, I, पृ. २३९–२५० ). ही बोलणी फिसकटल्याचा सर्व दोष मुस्लिम लीगने घेतलेल्या आडमुठ्या भूमिकेला असल्याचे काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझाद यांनी स्पष्टपणे सांगितले.

असे असूनही मुस्लिम लीगबरोबर काही तडजोड साधण्याचे प्रयत्न चालूच राहिले, पण ते निष्फळ ठरले. अखिल भारतीय हिंदू महासभेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत २०–२१ जानेवारी १९४५ रोजी बोलताना श्यामाप्रसाद मुखर्जी म्हणाले, ' राजाजी-योजनेचा गांधींनी जोरदार पुरस्कार करूनही त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. कारण मुळातच ती असत्याशी तडजोड होती. आता आम्ही असे ऐकतो की, काँग्रेस-लीग तडजोडीचे प्रयत्न भुलाभाई देसाई यांच्यामार्फत अजूनही चालूच आहेत. तडजोडीच्या योजनेचा तपशील अधिकृतपणे अजून कळलेला नाही. आजच्या घटनेने मुसलमानांना दिल्या आहेत त्यापेक्षा किंवा लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा त्यांना प्रांतिक वा

केंद्रीय कायदेमंडळात, मंत्रिमंडळात देऊ करून व हिंदूंच्या हक्कांचा सौदा करून काँग्रेसचे प्रवक्ते हिंदू-मुस्लिम प्रश्न कधीही सोडवू शकणार नाहीत असे मी रोखठोकपणे सांगू इच्छितो ' (इं. अॅ. र., १९४५, I, पृ. २९८; शिवाय देसाई-लियाकत अली करारासाठी इं. अॅ. र., १९४५, II, पृ. १४५ पाहा).

दरम्यान लिबरल पुढारीही स्वस्थ बसले नव्हते. दिल्लीला तेजबहादूर सप्रू यांच्या अध्यक्षतेखाली एक ' समझौता समिती ' स्थापन करण्यात आली. ८ एप्रिल १९४५ रोजी या समितीने भारताची भावी घटना कशी असावी याचे चित्र मांडण्याचा प्रयत्न केला. ' घटना समिती, भावी केंद्रीय कायदेमंडळ व मंत्रिमंडळ यांत ( अस्पृश्य वगळून इतर ) हिंदू व मुस्लिम यांना समान प्रतिनिधित्व देण्याचे तत्त्व त्यांनी गृहीत धरलेले होते. त्याच वेळी मुस्लिम लीगने संयुक्त मतदार संघ व अखंड भारत या दोन गोष्टींना मान्यता द्यावी अशी शर्त त्यांनी घातली होती ' ( इं. अॅ. र., १९४५, I, पृ. ३१०; व कॉन्स्टिट्यूशनल प्रपोझल्स ऑफ सप्रू कमिटी, १९४५ )

( क ) **निदर्शने आणि काँग्रेस :** एकीकडे निरनिराळ्या मतांचे भिन्नभिन्न पुढारी अडचणींतून मार्ग काढण्यात गुंतले असताना सारा देश मात्र एका विशेष स्वरूपाच्या निदर्शनांनी ढवळून निघाला होता. १९४२ मध्ये नेतृत्वाच्या अभावी जनतेने कशी चळवळ केली हे आपण मागे पाहिलेच आहे. त्या वेळी लोकांनी त्यांच्या कुवतीप्रमाणे गांधींच्या अहिंसेच्या शिस्तीत राहण्याचा प्रयत्नही केला होता. १९४५ मध्ये जेव्हा काँग्रेस भरली तेव्हा जनतेने दाखविलेल्या अतुलनीय पराक्रमाबद्दल व धैर्याबद्दल तिचे फार कौतुक केले गेले. ' कोणत्याच प्रकारचे नेतृत्व किंवा मार्गदर्शन नसतानाही लढा देऊन सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावे अशा एका प्रकरणाची भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात जनतेने भर घातली ' याबद्दल लोकांचे अभिनंदन झाले ( इं. अॅ. र., १९४५, I, पृ. ८९ ).

परंतु आझाद हिंद सैन्यावरील खटल्याच्या संबंधात भारताच्या निरनिराळ्या भागांत लोकक्षोभ प्रकट होऊ लागला तेव्हा काँग्रेसने त्या घटनेचे मोकळ्या मनाने स्वागत केले नाही. काँग्रेसची वृत्ती द्विधा व लोकांना नैतिक उपदेश करण्याची राहिली. सरकारने आझाद हिंद फौजेतील सैनिकांवर खटले भरण्यास सुरुवात केली तेव्हा, उघडच, ब्रिटिश सरकारला उद्देशून केलेल्या एका ठरावात पुढील शब्दयोजना होती : ' देशाच्या स्वातंत्र्यासाठी, **कितीही चुकीच्या मार्गाने का होईना,*** झटल्याबद्दल या अधिकाऱ्यांना, स्त्रियांना व पुरुषांना शिक्षा झाल्यास ती एक मोठी शोकांतिका होईल ' ( इं. अॅ. र., १९४५, I, पृ. २३८ ).

---

* जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा.

स्वातंत्र्यसैनिकांचा अशा प्रकारे काँग्रेसने छुपा धिक्कार केलेला असूनही, सर्व देश नोव्हेंबर १९४५ ते मार्च १९४६ या काळात लोकांनी आपण होऊन केलेल्या सहानुभूतिदर्शक प्रक्षोभक निदर्शनांनी ढवळून निघाला. फेब्रुवारी १९४६ मध्ये कलकत्त्यात एक आठवडाभर गंभीर स्वरूपाची दंगल माजली. सरकारी कार्यालयांच्या आवारात प्रवेशबंदी करणाऱ्या सरकारी हुकुमाविरुद्ध विद्यार्थ्यांनी मोर्चे काढले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काहीजण ठार व कित्येकजण जखमी झाले. विद्यार्थ्यांनी प्रतिहल्ला केला नाही; पण ते मागेही फिरले नाहीत. शहराच्या काही भागांत मात्र प्रक्षुब्ध लोकांनी ट्रॅम्स, बसेस व लष्करी मोटरींना आगी लावल्या. या वेळीसुद्धा मालमत्तेचा विध्वंस केल. गेला तरी माणसांना इजा केली गेली नाही.

मुंबईमध्ये फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात आरमारातील खलाशी संपावर गेले. नंतर त्यांनी जवळजवळ बंडच पुकारले. मद्रासमध्येही आझाद हिंद सेनेला सहानुभूती दाखविण्यासाठी निदर्शने झाली. त्याच कारणाने जबलपूर येथे २७ फेब्रुवारी १९४६ रोजी पोलिसांनी शांततापूर्ण संप केला ( इं. ॲ. र., १९४६, I, पृ. २६९, २८५, ३२८, ३२९ ). बिहारमधील पोलिससुद्धा बहुतेक याच कारणासाठी संपावर गेल्याचे वृत्त होते ( टकर, १९५०, प्रकरणे ६, ७ व २१ ).

मालमत्तेची थोडीफार हानी झाली असली तरी निदर्शनांच्या वेळी पुष्कळ वेळा लोकांनी दाखविलेले निश्चल धैर्य व निर्धार यावरून एकंदर समाजामध्ये अहिंसक मनोवृत्ती व धैर्य कितपत रुजले होते हे दिसून येते. योग्य मार्गदर्शन करणारे नेतृत्व लाभल्यास अत्यंत प्रक्षोभक प्रसंगातसुद्धा आपण उत्तुंग नीतिधैर्य दाखवू शकतो हे अशिक्षित व रांगड्या माणसांनी दाखवून दिले. गांधींच्या उदात्त कार्यामध्ये सहभागी होऊन लोकांचे नेतृत्व करण्यासाठी मुद्दाम धडे गिरवले होते अशी माणसेसुद्धा अनेक वेळा अगदी सामान्यजनांनी वा कच्च्या डोक्याच्या तरुणांनी गाठलेली उंची गाठू शकले नाहीत, मग भले त्यांनी ज्या मुद्द्यावरून चळवळ केली तो तितका " उदात्त " नसो.

राजकीयदृष्ट्या अनिश्चित व बांझोटा ठरलेला कालखंड लोकक्षोभाच्या उद्रेकांनी भूतकाळात जमा झाला. जणू तृषार्त भूमीची तहान त्यांनी भागवली होती. इतकेच की लोकक्षोभाच्या या महापुरात आलेले पाणी गढूळ होते व क्वचित काही ठिकाणी वेगवान प्रवाहांनी संयमाचे व अहिंसेचे बांध फोडले होते. स्वातंत्र्याच्या या उत्कट ऊर्मींचा आणि क्लेश भोगण्याच्या मानसिक तयारीचा मान करून या लोकक्षोभाला संघटित, विराट व अहिंसक लढ्याचे रूप द्यायला अहिंसेच्या शिस्तीत वाढलेला, अहिंसक लढ्याचे तंत्र शिकलेला कोणी पुढे येत नाही याची रुखरुख लोकमानसात दाटून राहिली. " चले जाव " मागणीच्या संदर्भात गांधी म्हणाले होते की, ब्रिटिश गेल्यानंतर, समजा, हिंसा व अराजक माजले तर त्या हिंसेतूनच " शुद्ध अहिंसे "चा उदय होईल अशी

शक्यता आहे. परंतु १९४५–४६ च्या या अत्यंत आणीबाणीच्या व महत्त्वाच्या कालखंडात योग्य नेतृत्व पुढे आले नाही. " हिंसक चळवळीचा अभाव " असे अहिंसेला अकरणात्मक, निष्क्रीय स्वरूप काँग्रेसच्या नेतृत्वाखाली प्राप्त झाले. एक प्रकारे यात काँग्रेसचा पराभव होता.

काँग्रेसांतर्गत दृष्टीने पाहता गांधी व काँग्रेसचे नेतृत्व यांतील मतभेद अधिक तीव्र व रुंद करणारी परिस्थिती या सगळ्यातून आकार घेत होती. काँग्रेसमध्ये स्वराज्य पक्षाचे वर्चस्व होते तेव्हा या दोघांत दरी निर्माण होण्यास सुरुवात झाली. १९३७ ते १९३९ या काळात काँग्रेसने सत्ताग्रहण केले व युद्धात भाग घेण्याचे ठरवले तेव्हा हे मतभेद चांगलेच तीव्र झाले. आता तर ते त्याहीपेक्षा खोलवर चरत गेले.

## ब्रिटिशांची तडजोडीची योजना

नेमक्या याच क्षणी ब्रिटिशांनी भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्याचा निर्धार करून भारतातील राजकीय पक्षांशी तडजोडीची बोलणी करण्याचा प्रयत्न केला. प्रथम ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांचे एक प्रातिनिधिक मंडळ भारतात पाठविण्यात आले. त्यापाठोपाठ प्रत्यक्ष तडजोड करण्याचे अधिकार देऊन एक 'कॅबिनेट मिशन'—तीन मंत्र्यांची समिती—पाठविण्यात आले. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, १९४२ ची चळवळ होऊनसुद्धा काँग्रेसला निर्णायक विजय मिळाला होता असे म्हणता येत नाही. अधिक कडव्या व बलवत्तर दंडुकेशाहीने, काही अपवाद वगळता, सहा-एक महिन्यांतच जनतेचा उठाव मोडून काढला होता. १९४५ मध्ये काँग्रेस पुन्हा लढ्याचे पाऊल उचलण्याच्या मनःस्थितीत नव्हती. वास्तविक आता युद्ध संपल्यामुळे स्वातंत्र्यासाठी चळवळ सुरू करण्यात कोणतीच नैतिक हरकत नव्हती. कदाचित जुलमी राजवट आणि गैरकारभारातून पडलेला भीषण दुष्काळ यामुळे सारी जनताच क्षीण, विकलांग झाली होती हेही लढा सुरू न करण्याचे एक कारण असेल. मागे गांधींनी व्हाइसरॉयना पाठवलेल्या पत्रात या कारणाची स्पष्ट सूचना असल्याचे वर येथे सांगितलेच आहे. (शिवाय पाहा, पत्र., १९४४–४७, पृ. १३९–१५४.) पण सर्व प्रतिकूलतेवर मात करून लोकांनी १९४५ मध्ये उग्र निदर्शने केली हेही आपण पाहिलेच आहे. शिवाय त्या वेळी जनतेच्या उत्साहाला योग्य असे अहिंसक वळण लावण्याचे धैर्य व साहस कोणत्याही पुढाऱ्याने केले नाही हेही आपण पाहिलेच आहे.*

---

* गांधींनी १९३० मध्ये मिठाचा सत्याग्रह सुरू करून त्या वेळच्या लोकक्षोभाला असे वळण दिले होते. त्या वेळी सशस्त्र क्रांतिकारकांच्या उठावांच्या पार्श्वभूमीवर गांधींनी ती कृती केली होती.

काँग्रेसची ही दुर्बलता लक्षात यायला ब्रिटिश सरकारला मुळीच वेळ लागला नाही. त्यामुळे स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्याची तयारी दर्शविताना ब्रिटिश सरकारने काँग्रेसला एकमेव राष्ट्रीय संघटनेचा दर्जा न देता या देशातील अनेक लहानमोठ्या राजकीय पक्षांपैकीच एक अशी तिची संभावना केली. वास्तविक हा दर्जा काँग्रेसला नाकारता आला असता; पण तिने तसे केले नाही.

जवाहरलाल नेहरूंनी २ मार्च १९४६ रोजी झाशीला केलेल्या भाषणात ब्रिटिश सरकारला बजावले : ' अत्यंत निकडीचा ( स्वातंत्र्याचा ) प्रश्न सोडविण्यात कॅबिनेट मिशनला अपयश आले तर सर्व राष्ट्र हादरून सोडील असा कल्पनातीत तीव्र व विध्वंसक राजकीय उद्रेक या देशात झाल्याशिवाय राहाणार नाही ' ( इं. ॲ. र., १९४६, I, पृ. ४६ ). नेहरूंची ही भाषा आवेशपूर्ण होती यात शंकाच नाही. पण तिच्यामागे हिंसक किंवा अहिंसक अशा कोणत्याच प्रकारचे बळ नव्हते हेही खरे आहे. म्हणूनच ब्रिटिश सरकार काँग्रेसला इतक्या हीन दर्जापर्यंत लोटून देऊ शकले. या वेळी सरकारने भारतातील इतर राजकीय पक्षांना दाखविलेली प्रलोभनेही मोठी मोहक होती.

त्यानंतरच्या प्रदीर्घ वाटाघाटींत काँग्रेसने प्रथम विरोध व नंतर शरणागती पत्करावी असे बऱ्याच वेळा झाले. प्रत्येक वेळी काँग्रेसचा हल्ला ब्रिटिश सरकारने चुकविला. काँग्रेस हा हिंदुस्थानातील इतर पक्षांप्रमाणेच एक पक्ष आहे, आणि येथील अल्पसंख्याकांचे हित पाहणे ही आपली विशेष जबाबदारी आहे या भूमिकेला ब्रिटिश सरकार अगदी घट्ट चिकटून राहिले. काँग्रेसवर पिछाडीवरून हल्ला करून तिला नामोहरम करण्याची ही खरोखर नामी युक्ती होती. ज्या ज्या वेळी काँग्रेसने आपली पिछाडी निर्धोक करण्यासाठी मुस्लिम लीगशी तडजोड करण्याचा प्रयत्न केला त्या त्या वेळी काँग्रेसचा ब्रिटिशांवरील हल्ला क्षीण होई. राजकीय डावपेचात काँग्रेसच्या पुढाऱ्यांपेक्षा ब्रिटिश सरकार अधिक सरस ठरले यात काहीच शंका नाही. त्याचा परिणाम होऊन यथावकाश पुरेशी किंमत न देताच मुस्लिम लीगच्या पदरात पाकिस्तानचे फळ पडले.

हिंदी राष्ट्रवादी शक्तींनी जय तर मिळविला नव्हताच पण लढा करण्याची आशाही १९४५ साली सोडून दिल्यासारखी होती. नेमक्या अशा वेळी राष्ट्रवादी शक्तींशी अखेर समझौता करण्याचे ब्रिटिश सरकारने का ठरविले असावे हे सांगणे कठीण आहे. परदेशात, स्वतःच स्थापन केलेल्या ' स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकार 'चे प्रमुख असताना सुभाषचंद्र बोसांनी या कोड्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचे येथे विवेचन करणे प्रस्तुत ठरेल असे वाटते.

हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी १९४५ मध्ये काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांना तुरुंगातून मुक्त केले. अतिपूर्वेकडील जपानचे युद्ध चालू असूनसुद्धा जुलै १९४५ मध्ये काँग्रेसबरोबर बोलणी करण्याची त्यांनी तयारी दाखवली. या संबंधात आझाद

हिंद रेडिओवरून बोलताना सुभाषचंद्र बोस म्हणाले, ' अतिपूर्वेत हाती घ्यावयाच्या भावी मोहिमांसाठी आवश्यक ती मनुष्यबळाची कुमक ब्रिटिश सरकारला आता इंग्लंडमध्ये मिळू शकत नाही. याची काही निश्चित कारणे आहेत. पहिले असे की, गेली सुमारे पावणेसहा वर्षे अनेक आघाड्यांवर लढत राहिल्यामुळे त्यांची अतोनात मनुष्यहानी झाली आहे. ब्रिटिश लोक युद्धाला अगदी कंटाळले आहेत. अशा वेळी युरोपातील प्रदेशापेक्षा अधिक बिकट प्रदेशात दीर्घकाळपर्यंत युद्ध करीत राहणे त्यांना नको आहे. दुसरे असे की, पहिल्या महायुद्धात इंग्लंडची आर्थिक स्थिती फार बिघडली नव्हती. पण या युद्धाने इंग्लंडचे दिवाळे निघाले आहे. युद्धसामग्रीच्या प्रचंड मागणीमुळे सर्व ब्रिटिश उद्योगधंद्यांना त्यांची जवळपास सर्व उत्पादनशक्ती युद्धसाहित्याच्या निर्मितीसाठी वापरावी लागत आहे. अमेरिकन उद्योगधंद्यांची स्थिती तशी झालेली नाही. त्यामुळे युद्धकाळात ब्रिटनने तत्पूर्वीच्या बाजारपेठा गमावल्या असून त्या अमेरिकेने काबीज केल्या आहेत. दीर्घकाळ युद्ध चालू असताना ही प्रक्रिया अशीच घडत राहिली तर दोस्त राष्ट्रांचा विजय होऊनसुद्धा इंग्लंडच्या हातून युद्धपूर्व काळातला बराचसा परदेशी व्यापार जाईल व आर्थिक विनाश ओढवेल. त्यांच्या कामगारांना सैन्यामधून किंवा इतर युद्धजन्य सेवांमधून काढून तत्काळ शांततेच्या काळातील उद्योगधंदे सुरू करण्याची निकड आहे. अतिपूर्वेमध्ये ब्रिटिश सैन्यानिशी प्रदीर्घ काळ युद्ध लढणे व स्वदेशात शांततेच्या काळातील उद्योगधंदे सुरू करणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साधणे इंग्लंडला केवळ अशक्य आहे.

' अजूनही काँग्रेस तीन वर्षांपूर्वीच्या " चलेजाव " ठरावाला वचनबद्ध आहे. त्या वेळेपासून स्वातंत्र्यासाठी " जिंकू किंवा मरू " हेच भारतीयांचे ब्रीदवाक्य झालेले आहे. आपल्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहावयाचे तर कोणीही काँग्रेसवाला लॉर्ड वेव्हेल यांच्या योजनेकडे ढुंकूनसुद्धा पाहू शकत नाही, मग तिचा स्वीकार करण्याची गोष्टच दूर. असे असूनही प्रत्यक्षात मात्र कित्येक काँग्रेसजन व पुढारीही त्या योजनेचा विचार करताना दिसतात. याचे कारण असे की, युरोपमध्ये व ब्रह्मदेशात अँग्लो–अमेरिकन सैन्याला मिळालेल्या विजयामुळे सबंध भारतभर पराभूततेची छाया पसरली आहे...

' भारतात राहणाऱ्या माझ्या देशबांधवांनो, ब्रिटिश साम्राज्यशाहीशी तुम्ही सशस्त्र युद्ध करू शकत नसाल तर निदान आपल्या या शत्रूशी तडजोड करायला विरोध करून किंवा त्याच्या बाजूने साम्राज्यवादी युद्ध लढण्याचे नाकारून आपला नैतिक प्रतिकार तरी चालू ठेवा. या प्रसंगी मी महात्मा गांधींना, काँग्रेस कार्यकारिणीच्या अध्यक्षांना, तिच्या सभासदांना, तसेच त्यांच्यामागे उभ्या असलेल्या कोट्यवधी भारतीय स्त्री-पुरुषांना विनंती करू इच्छितो की, या अत्यंत नाजुक क्षणी आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे चुकीचे निदान तुम्ही करू नका. परिस्थितीचे मूल्यमापन करताना थोडीशी चूक झाली तर भारतीय राजकारणाची पावले चुकीची पडतील. भारत अजून पराभूत झालेला नाही. आम्ही उभे आहोत.

सध्याची आंतरराष्ट्रीय स्थिती आम्हाला प्रतिकूल आहे असे नाही. हळूहळू ती आम्हाला अधिकाधिक अनुकूलच होत आहे. असे असताना आता तडजोडीची बोलणी कशासाठी ? ज्या योजनेला तीन वर्षांपूर्वी समजूनउमजून नकार दिला त्या योजनेचा आता स्वीकार करावयाचा ?...

'भारतातील माझ्या बंधुभगिनींनो, बोलणी पुढे ढकलावीत ही जीनांची सूचना लॉर्ड वेव्हेल यांनी का फेटाळली हे तुमच्या अजून लक्षात येत नाही ? बाहेरून बघणाऱ्या आम्हाला हा मामला अगदी स्वच्छ दिसत आहे. इंग्लंडमधील सार्वत्रिक निवडणूक ५ जुलैला आहे. हुजूर पक्षाला भारताचा प्रश्न निवडणुकीत येऊ द्यावयाचा नाही. यामुळेच त्यांनी निवडणुकीला फक्त एकच महिना राहिलेला असताना ही "वेव्हेल-योजना" आमच्यापुढे टाकली आहे. मजूर पक्षाला निर्विवाद बहुमत मिळेल किंवा नाही हे कोणालाच सांगता येणार नाही. मात्र ५ जुलैनंतर पार्लमेंटमध्ये त्या पक्षाचे सामर्थ्य खूपच वाढलेले असेल हे नक्की. हुजूर पक्षाला अशी भीती वाटते की, मजूर पक्ष सत्तेवर आला आणि त्याआधी भारताचा प्रश्न सुटलेला नसला तर तो पक्ष हा प्रश्न सोडविण्याचा आणखी एक प्रयत्न नक्कीच करील. व्यक्तिशः मी सौदेबाजीवर मुळीच विश्वास ठेवत नाही; कारण माझ्या दृष्टीने भारताच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत कसलीच तडजोड शक्य नाही' ( चक्रवर्ती, १९४७, पृ. २७५–२७८ ).

सिमला येथे व्हाइसरॉयनी भारतीय स्वातंत्र्याची पहिली योजना सादर केली त्यानंतर थोड्याच काळात महायुद्ध संपले. त्या योजनेतून काही निघाले नाही. आपण मागे पाहिल्याप्रमाणे लॉर्ड वेव्हेल यांची योजना फिसकटण्याचे खापर मौलाना आझादांनी जीनांच्या डोक्यावर फोडले. त्यानंतर इंग्लंडच्या सार्वत्रिक निवडणुकीत मजूर पक्षाचा विजय झाला, आणि तडजोडीची आणखी एक नवी योजना भारतापुढे मांडण्यात आली.

या संदर्भात, मजूर सरकारने भारतीयांच्या हाती सत्ता देण्याचा ठराव केला त्या वेळी चर्चिलनी केलेल्या भाषणातील काही भाग उद्धृत करणे अप्रस्तुत ठरणार नाही. ६ मार्च १९४७ रोजी विरोधी पक्षाचे नेते म्हणून पार्लमेंटमध्ये भाषण करताना चर्चिल म्हणाले, 'पूर्व आशियामधील जपानी सामर्थ्याचा उदय, अमेरिकन आरमाराची आपल्याच किनाऱ्याकडे माघार, "प्रिन्स ऑफ वेल्स" व "रिपल्स" बोटींची जलसमाधी, सिंगापूरची शरणागती, या व अशा प्रकारच्या कित्येक घटनांमुळे जपानी आक्रमणापासून भारताचे रक्षण करण्याचे कोणतेच खात्रीलायक साधन आमच्या हाती नव्हते. आमचे बंगालच्या उपसागरातील, किंबहुना बहुतेक हिंदी महासागरावरीलही आरमारी प्रभुत्व निकालातून निघाले होते. बंगाल किंवा मद्रास प्रांतावर जपानी हल्ला होऊन त्या प्रांतांची कधी राखरांगोळी होईल याचा काहीच नेम नव्हता.

'त्या वेळी, स्वाभाविकपणेच, भारतीय लोकांनाच त्यांच्या भूमीचे रक्षण करण्य

साठी संघटित करण्याचा उत्तम मार्ग कोणता हा प्रश्न अत्यंत तीव्रतेने उपस्थित झाला... क्रिप्स योजनेमागे मुख्यतः हा हेतू होता... परंतु ही योजना ज्यांच्यापुढे मांडली गेली त्या राजकीयदृष्ट्या जागृत वर्गांनी ती फेटाळून लावली. उलट गांधी-नेहरू यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने देशात बंडाळी माजवली. ब्रह्मदेशात लढणाऱ्या आमच्या सैनिकांना रसद व कुमक पोचविण्याच्या कामात जास्तीत जास्त अडथळे आणावेत आणि जपान्यांना त्यांच्या चढाईत मदत पोचवावी याच हेतूने ही बंडाळी माजवलेली होती. म्हणून त्या वेळच्या ब्रिटनमधील संमिश्र राष्ट्रीय सरकारने कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना सरसकट अटक केली आणि त्यांपैकी बहुतेकांना युद्ध संपेपर्यंत तुरुंगांतच डांबून ठेवले...

'भारतातील तथाकथित राजकीयदृष्ट्या जागृत वर्गांच्या हाती सत्ता देण्याचे आपण म्हणत आहोत. ही माणसे तकलादू आहेत. काही वर्षांत या लोकांचा मागमूसही शिल्लक राहणार नाही.

'कालच सर स्टॅफोर्ड क्रिप्स व इतरांनी या सभागृहात ब्रिटनच्या आर्थिक व लष्करी दौर्बल्यावर फारच भर दिला. ते म्हणतात, भारतामध्ये आणखी १५–२० वर्षे आपण भले मोठे सैन्य कसे ठेवू शकणार ?... हा खरोखर फार गंभीर मुद्दा आहे... आपले व्यवहार जबाबदारीने, सन्मानपूर्वक, माणुसकी जतन करून मिटविण्यास नैतिक व लष्करी दृष्ट्या आपण असमर्थ आहोत असा आपला निर्णय असला तर आपण जागतिक संघटनेकडे मदत, निदान सल्ला मागू शकत नाही काय ? आज अशी संघटना मूर्त झाली आहे आणि आपल्यापैकी पुष्कळजण शांततापूर्ण प्रगती, स्वातंत्र्य, इतकेच नव्हे तर मानवजातीला मोक्ष प्राप्त करून देणारी संस्था म्हणून तिच्याकडे पाहात आहेत... काही झाले तरी ब्रिटिश राष्ट्राच्या उभारीला ग्रहण लागले असताना वरील पैलूंकडे दुर्लक्ष केले जावे असे मला वाटत नाही' (इं. ॲ. र., १९४७, I, पृ. १७१–१७२).

## कॅबिनेट मिशन योजना

**(अ) योजनेची रूपरेखा :** निर्णय घेण्याचे अधिकार देऊन मजूर सरकारने पाठवलेले 'कॅबिनेट मिशन' ६ मार्च १९४६ रोजी भारतात आले. भारतातील राज्यकीय पक्षांना प्रथम हंगामी सरकार स्थापण्यास व नंतर देशासाठी घटना बनविण्यासाठी एक घटनासमिती भरविण्यास मदत करावी हा कॅबिनेट मिशनचा उद्देश होता. या दोन गोष्टी झाल्यानंतर ब्रिटिश पार्लमेंट हिंदुस्थानच्या शासनाची सर्व सूत्रे भारतीयांच्या हाती सोपविणार होती.

घटनासमितीसंबंधीही एक योजना मिशनने बरोबर आणली होती. भारतातील प्रांत अ, ब आणि क गटात विभागले जाणार होते. पैकी अ गटात हिंदूंचे बहुमत असलेले प्रांत होते व राहिलेल्या ब आणि क दोन गटांत मुस्लिम बहुमताचे प्रांत होते.

घटना समितीच्या सुरुवातीच्या बैठकांत संघराज्याशी निगडित विषयांची चर्चा करावयाची होती. या विषयांत संरक्षण, परदेशी घडामोडी व दळणवळण यांचा समावेश होता. या प्रश्नांवर एकमत झाले म्हणजे वर दिल्याप्रमाणे तीन गट वेगवेगळे होणार होते. प्रत्येक गटात एकाहून अधिक प्रांत होते. नंतर प्रत्येक गटाने अंतर्गत व स्थानिक प्रश्नांच्या संदर्भात घटनेचा दुसरा भाग तयार करावयाचा होता.

( ब ) **हंगामी सरकार :** सत्तांतराची पहिली पायरी म्हणून ब्रिटिश सरकारने भारत सरकारचे कामकाज हिंदी लोकांच्या हाती देण्याचे ठरविले. यासंबंधी गांधींनी आपले मत अगदी ठामपणे व्हाइसरॉयना कळवले. १३ जून १९४६ रोजी पाठविलेल्या एका पत्रात गांधी लिहितात, ' एक काँग्रेसने दिलेली नावे तरी स्वीकारा, किंवा मुस्लिम लीगने दिलेली तरी घ्या. पण कृपा करून परस्परविरुद्ध गोष्टींचे मिश्रण करू नका. किंवा तशा प्रयत्नात देशाच्या राजकीय वातावरणात भयानक स्फोट घडवून आणू नका ' ( पत्र., १९४४-१९४७, पृ. २०६ ). या मंडळाचे एक सभासद क्रिप्स यांना त्याच दिवशी पत्र पाठवून गांधींनी कळवले, ' काँग्रेस किंवा लीग यांपैकी एकीचीच तुम्हाला निवड करावी लागेल. आज काँग्रेसचा तर उद्या लीगचा अनुनय करण्यात तुमचे दिवस जात आहेत; हे चालणार नाही. तुम्ही एक सरळ सत्याची बाजू घ्या. किंवा स्पष्टपणे ब्रिटिश हितसंबंधी धोरणाच्या दृष्टीने आवश्यक ती भूमिका घ्या. यांपैकी कोणत्याही कृतीसाठी तेवढेच शौर्य दाखविण्याची आवश्यकता आहे. ( किता, पृ. २०७ ).

या कॅबिनेट मिशनपुढे कम्युनिस्ट पक्षाने १५ एप्रिल १९४६ रोजी हंगामी सरकारच्या स्थापनेविषयी केलेले निवेदन काहीसे उद्बोधक आहे. त्यात म्हटले होते : ' काँग्रेस व मुस्लिम लीग यांना सरकारमध्ये समान प्रतिनिधित्व असावे आणि इतर अल्पसंख्याकांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे अशी काँग्रेस व लीगने परस्परांत तडजोड करावी ही गोष्ट उत्तम, असे आम्हाला वाटते ! ' ( इं. ॲ. र.; १९४६, I, पृ. २२० ).

' पाच मुस्लिम लीगी, पाच काँग्रेसी, एक शीख व एक हिंदी ख्रिश्चन किंवा ॲंग्लो-इंडियन असे प्रतिनिधित्व दिल्यास, आणि महत्त्वाच्या खात्यांची लीग व काँग्रेसमध्ये समसमान वाटणी ' केल्यास मुस्लिम लीग आपण होऊन मंत्रिमंडळ बनविण्यात सहभागी होण्यास तयार होती. मात्र ' पुढेमागे होणाऱ्या घटनांमुळे वरील सूत्रात कोणताही बदल करण्याचा हक्क मुस्लिम लीगच्या कार्यकारिणीने स्वतःकडे राखून ठेवला आहे ' असेही मुस्लिम लीगच्या ठरावात म्हटले होते ( बॅनर्जी व बोस, १९४६, पृ. ८५४ ).

( क ) **घटना समिती व गांधी :** भारतासाठी एक घटना समिती असावी ही कल्पना

प्रथम १९३६ च्या फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात मांडली गेली होती. स्वसामर्थ्याने स्वराज्य अगदी जवळ आणल्यानंतरच यासंबंधीचा निर्णय करता येईल, असे त्या वेळी गांधींनी आपले मत दिले होते. महायुद्धाच्या आरंभकाली काँग्रेसने ब्रिटिश सरकारकडे घटना समिती स्थापण्याची स्पष्ट मागणी केली होती. त्या वेळी गांधी म्हणाले होते, 'इतर अनेक गोष्टींबरोबरच जवाहरलाल नेहरूंनी मला घटना समितीच्या मागणीचे काय परिणाम होतील याचा विचार करण्यास भाग पाडले आहे. प्रथम जेव्हा ही मागणी त्यांनी काँग्रेसच्या ठरावात आणली तेव्हा नेहरूंचे लोकशाही तंत्राचे ज्ञान आपल्यापेक्षा खूपच जास्त आहे हे लक्षात घेऊन मी गप्प बसलो. पण तेव्हाही मी साशंक होतो. परंतु परिस्थितीने माझे मत बदलले आहे. आता कदाचित मीच त्यांच्यापेक्षा जास्त उत्साही आहे. कारण, जवाहरलालला दिसत नसेल कदाचित, पण मला त्यातून जनतेचे राजकीय व इतरही शिक्षण करण्याचा, त्याबरोबरच आपले जातीय झगडे नष्ट करण्याचाही मार्ग दिसत आहे' (इं. ॲ. र., १९३९, II, पृ. २३८, २४७).

कॅबिनेट मिशनच्या योजनेतील नियोजित घटना समितीच्या रचनेत मात्र गांधींना फुटीरपणाची बीजे दिसली. प्रांतांची गटवार विभागणी हे त्यांच्या मते संकटाला आमंत्रणच होते. म्हणून त्यांनी कॅबिनेट मिशनने मांडलेल्या योजनेतील एका कलमावर मोठाच भर दिला. कारण भविष्यात जर वाईटात वाईट होण्याची वेळ आलीच तर वरील कलमाचा आधार घेता आला असता. या कलमात असे स्पष्ट म्हटले होते की, कोणतीच गोष्ट कोणावरच सक्तीने लादली जाणार नाही. त्या वेळी अस्तित्वात असलेली प्रांतिक स्वायत्तता लक्षात घेऊन गांधींनी वरील कलमाचा असा अर्थ लावला की, या कलमाचा आधार घेऊन एखाद्या प्रांताला कोणत्याही गटात जाण्याचे नाकारता येईल.

गांधींच्या प्रभावाखाली काँग्रेस कार्यकारिणीने २४ मे १९४६ रोजी पुढील ठराव केला : 'कॅबिनेट मिशनच्या निवेदनात प्रत्येक प्रांत स्वायत्त असून, "अवशिष्ट अधिकार" प्रांताकडे आहेत या मूलभूत तत्त्वाचा पुनरुच्चार केलेला आहे. प्रांतांना गट करण्याचे स्वातंत्र्य राहील असेही त्यात म्हटले आहे. परंतु निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, प्रांताचे प्रतिनिधी गटात विभागले जातील, आणि हे गट "आपापल्या गटांतील प्रांतांसाठी प्रांतिक घटना तयार करतील; इतकेच नव्हे तर जोडीला त्या गटासाठी वेगळी गट-घटनाही असावी की काय हेही ठरवतील." वरील दोन तरतुदींमध्ये चांगलीच विसंगती आहे. दुसऱ्या विधानाने प्रथम म्हटलेल्या प्रांतिक स्वायत्ततेच्या तत्त्वाला हरताळच फासला आहे. **मिशनच्या विधानांचे शिफारसवजा स्वरूप कायम राहावे या उद्देशाने*** व निवेदनातील दोन विधानांत सुसंगतता आणण्याच्या

दृष्टीने काँग्रेस कार्यकारिणी त्यातील पंधराव्या कलमाचा अर्थ पुढीलप्रमाणे लावीत आहे : " प्रथम प्रत्येक प्रांत आपणाला ज्या गटात घातलेले आहे त्या गटात **जायचे की नाही*** ते ठरवील. अशा रीतीने, राज्यघटना कशी करावयाची, कोणत्या तत्त्वांनुसार करावयाची, ती अंमलात कशी आणावयाची या सर्व बाबतींतले सर्व अंतिम अधिकार घटना समितीला असले पाहिजेत; या अर्थाने घटना समिती ही सार्वभौम असली पाहिजे "' (बॅनर्जी आणि बोस, १९४६, पृ. १६६).

कॅबिनेट मिशनने २५ मे १९४६ रोजी पाठविलेल्या पत्रात वरील ठरावाला असे उत्तर दिले की, 'ज्या गटात त्यांचा समावेश केला आहे त्यात जायचे की नाही हे ते ते प्रांत आधी ठरवतील, असा काँग्रेसने केलेल्या ठरावात १५ व्या परिच्छेदाचा अर्थ लावला आहे. कॅबिनेट मिशनला अभिप्रेत असलेल्या अर्थाशी काँग्रेसने लावलेला अर्थ जुळत नाही.

'प्रांतांचे निरनिराळे गट करण्यामागील हेतू सर्वांना माहीत आहेच. प्रांतांचे विशिष्ट प्रकारे पाडलेले गट हे मिशनच्या योजनेचे एक मूलभूत आवश्यक वैशिष्ट्य आहे व सर्व पक्षांच्या संमतीनेच त्यात बदल करता येईल' (किन्ना, १६९–१७०).

यावर गांधींनी आपला मतभेद पुढीलप्रमाणे व्यक्त केला : 'पण प्रांतांचे काय? पंजाब हीच एक ज्यांची मातृभूमी आहे त्या शीखांनी स्वतःच्या इच्छेविरुद्ध सिंध, बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत यांच्याबरोबर आपले लग्न लावून घ्यायचे की काय? तसेच वायव्य सरहद्द प्रांताने त्याला ब गटात घातले असल्याने आपल्या इच्छेविरुद्ध पंजाबला स्वतःला बांधून का घ्यावे? आसाम वास्तविक हिंदूंची बहुसंख्या असलेला प्रांत आहे, पण त्याला क गटात घातला आहे म्हणून त्याने त्यास मान्यता द्यावी? मिशन योजना ऐच्छिक स्वरूपाची आहे तर प्रांतांचे स्वातंत्र्य अबाधित राहिलेच पाहिजे...कोणत्याही प्रांताला एखाद्या गटात सामील होण्याचे स्वातंत्र्य असावे. तसेच गटातून बाहेर पडण्याचेही स्वातंत्र्य असावे. म्हणजे स्वायत्ततेचे रक्षण अधिक पक्केपणाने होईल. मिशन योजनेच्या पंधराव्या परिच्छेदात हे स्वातंत्र्य कायम ठेवलेले आहे. तो परिच्छेद असा आहे : " प्रांतांना गट बनविण्याचे व त्या त्या गटाचे (संयुक्त) विधि-मंडळ व कार्यकारी मंडळ बनविण्याचे स्वातंत्र्य असावे. प्रत्येक गटाने कोणते विषय गट-पातळीवर सामायिकपणे हाताळायचे तेही ठरविण्याचे स्वातंत्र्य असावे." तसेच या परिच्छेदाने दिलेले स्वातंत्र्य १९ व्या परिच्छेदाने मिशन योजनेच्या प्रवर्तकांनी काढून घेतलेले नाही हे स्पष्ट आहे. कारण काय करावे याविषयीच्या सूचना त्यांनी विचारार्थ पुढे ठेवलेल्या आहेत (" प्रपोज " हा शब्द हेच दर्शवतो; त्यात आदेश दिलेला

---

* जाड टसा प्रस्तुत लेखकाचा.

नाही ). घटना समितीचा अध्यक्ष पहिल्या बैठकीत प्रांतांच्या प्रतिनिधींना त्यांना गट करण्याचे तत्त्व मान्य आहे की नाही हे विचारील; त्यांना ते तत्त्व मान्य असेल तर त्या त्या प्रांताला आपला विशिष्ट गटातील समावेश मान्य आहे की नाही हे पाहील असे यात गृहीत धरलेले आहे, असा याचा अर्थ होतो. हे स्वातंत्र्य व प्रत्येक प्रांताची १५ ( ५ ) ने दिलेली स्वायत्तता मग अबाधित राहील.

'वरील दोन परिच्छेदांमधील वरकरणी दिसणारी विसंगती टाळण्याचा आणि या योजनेत आमच्यावर सक्ती होत आहे हा आरोप नाशावित करण्याचा दुसरा कोणताच उपाय मला दिसत नाही. सक्तीचा आरोप आल्यास या, उदात्त हेतूने प्रेरित योजनेचा चेहरामोहरा पार बदलून जाईल. म्हणून गटविषयक कलमाने व प्रांतांना लहरीप्रमाणे गटांमध्ये विभागून देण्याच्या योजनेमुळे बिथरून गेलेल्या सर्वांना मी सांगेन की, मी लावलेला अर्थ बरोबर असेल तर बिथरण्याचे काहीच कारण नाही ' ( कित्ता, पृ. १७४–१७५; **हरिजन**, खं. १०, पृ. १५२–१५३ ).

मुस्लिम लीगने आपली भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट केली : ' आपणासमोर असलेल्या प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेऊन, हिंदुस्थानच्या घटनात्मक प्रश्नाचे शक्य असल्यास शांततापूर्ण मार्गाने उत्तर शोधून काढण्याची प्रामाणिक इच्छा असल्याने, तसेच मुस्लिम बहुसंख्य असलेल्या सहा प्रांतांचा सक्तीने ब आणि क गटांत समावेश केला आहे त्या अर्थी मिशनच्या योजनेत पाकिस्तानच्या निर्मितीचे तत्त्व व पाया अंगभूतच आहेत हे जाणून, कॅबिनेट मिशन योजनेत अंतर्भूत असलेल्या घटना बनविण्याच्या यंत्रणेचा स्वीकार करून ती राबविण्यात सहकार्य द्यायला मुस्लिम लीग तयार आहे. कॅबिनेट मिशनला सहकार्य देताना मनात आम्हाला अशी आशा आहे की, त्यातून अंतिमतः पूर्णतः सार्वभौम असलेले पाकिस्तान अस्तित्वात येईल आणि या उपखंडातील प्रमुख राष्ट्रांना व इतरही लोकांना स्वातंत्र्य देण्याने उद्दिष्ट पूर्णत्वाला जाईल ' ( बॅनर्जी आणि बोस, १९४६, पृ. १९१ ).

कॅबिनेट मिशनची योजना ऐच्छिक आहे व ती स्वीकारावयाची की नाही याचे स्वातंत्र्य प्रांतांना आहे या मुद्द्यावर काँग्रेस ठाम आग्रही राहिली. अखेरीस मिशनशी सहकार्य करावयाचे आश्वासन लीगनेही मागे घेतले; आणि मुस्लिम ' राष्ट्रा 'चा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य करून घेण्यासाठी " प्रत्यक्ष कृती "ची मोहीम सुरू केली. २९ जुलै १९४६ रोजी मुस्लिम लीगने हा " प्रत्यक्ष कृती "चा ठराव केला. त्याचा काही भाग असा : ' मिशनची योजना काँग्रेसने स्वीकारली आहे, पण ती स्वीकृती सशर्त आहे. योजनेतील कलमांचा अन्वयार्थ आपला आपण लावणार या शर्तीवर काँग्रेसने स्वीकृती दिली आहे. कॅबिनेट मिशनने व व्हाइसरॉयनी १६ व २५ मे रोजी वादग्रस्त कलमांचा अधिकृत अर्थ जाहीर केला आहे. तो काँग्रेसने लावलेल्या अर्थाच्या विरुद्ध

आहे. काँग्रेसने आपल्याकडून असे स्पष्ट केले आहे की, केवळ घटना समितीत सहभागी होण्यास आपण बांधलेले आहोत; पण कॅबिनेट मिशनच्या योजनेतील कोणत्याच मूलभूत तत्त्वांना वा शर्तींना तिने बांधून घेतलेले नाही. तसेच ज्या शर्तींवर व गृहीतकृत्यांवर घटना समिती स्थापन करण्यात येईल त्या शर्ती व ती गृहीतकृत्ये धाब्यावर बसवून सर्वस्वी वेगळे निर्णय घेण्याचा घटना समितीला अधिकार राहील, कारण घटना समिती ही सार्वभौम सभा असेल असेही काँग्रेसने जाहीर केलेले आहे' (**किस्त्ता**, पृ. ३५६).

'काँग्रेसच्या हटवादीपणामुळे व ब्रिटिश सरकारने मुस्लिम जनतेचा विश्वासघात केल्यामुळे लीग आज रोजी ठराव करून कॅबिनेट मिशन व व्हाइसरॉय यांच्या १६ मे १९४६ च्या संयुक्त निवेदनात अंतर्भूत असलेली योजना फेटाळून लावत आहे. घटनात्मक मार्गांनी तडजोड करून हिंदुस्थानच्या भवितव्याचा पेच शांततापूर्णरीत्या व घटनात्मक मार्गाने सोडविण्याचे मुस्लिम हिंदुस्थानचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. या दिशेने प्रयत्न करण्यास आता जागा उरली नाही. ब्रिटिशांशी छुपे संगनमत करून हिंदुस्थानात केवळ सवर्ण हिंदूंचे राज्य स्थापण्याचा काँग्रेसचा हट्ट आहे. न्यायबुद्धी व सभ्यता यांच्या आधारे नाही, तर सत्तेच्या राजकारणाच्या केवळ पाशवी सामर्थ्याच्या जोरावर या देशात निर्णय घेतले जातात, असे नुकत्याच घडलेल्या घटनांनी दाखवून दिले आहे. स्वतंत्र व पूर्णतया सार्वभौम पाकिस्तान तत्काळ प्रस्थापित करण्याखेरीज अन्य कशानेही हिंदुस्थानातील मुसलमानांचे समाधान होणार नाही, ही गोष्ट आता निर्विवाद स्पष्ट झाली आहे. मुस्लिम लीगच्या अनुमतीशिवाय हंगामी केंद्रीय सरकार स्थापण्याचा प्रयत्न झाल्यास किंवा कोणतीही अल्प मुदतीची वा दीर्घ मुदतीची घटना लादण्याचा प्रयत्न झाल्यास हिंदी मुसलमान त्याचा कडवा प्रतिकार करतील. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्यावर मुस्लिम लीगच्या कार्यकारिणीची आता अशी खात्री पटली आहे की, आजच्या ब्रिटिश गुलामगिरीतून व उद्याच्या संभाव्य सवर्ण हिंदूंच्या प्रभुत्वातून मुक्त होण्यासाठी, आपला मान राखण्यासाठी, आणि पाकिस्तान हस्तगत करून आपले न्याय्य हक्क पदरात पाडून घेण्यासाठी मुस्लिम राष्ट्राने "प्रत्यक्ष कृती"चा मार्ग चोखाळण्याची वेळ आलेली आहे.

'म्हणून ही कार्यकारिणी मुस्लिम राष्ट्राला असे आवाहन करीत आहे की, त्यांनी एकजुटीने मुस्लिम लीग या त्यांच्या एकमेव प्रातिनिधिक पक्षामागे उभे राहून सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी ठेवावी' (**किस्त्ता**, पृ. ३५८–३५९).

वरील प्रत्यक्ष कृतीचा ठराव करीत असतानाच जीनांनी स्पष्ट केले की 'मिशन-बरोबरील बोलण्याच्या वेळी प्रथमपासून शेवटपर्यंत मुस्लिम लीगने समंजस देवाण-घेवाणीची वृत्ती ठेवली. संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्यासाठी लीगने पाकिस्तानच्या पूर्ण सार्वभौमत्वाचा काँग्रेसच्या वेदीवर बळी देण्याची सिद्धता केली. संरक्षण, परराष्ट्रीय संबंध व दळणवळण ही तीन खाती लीगने स्वेच्छया संघराज्याच्या हाती सोपविली, आणि तसे करण्यात

लीगची चूक होत नव्हती. आपल्या मागण्यांना एवढी मुरड घालून मुस्लिम लीगने अत्यंत उच्च प्रतीची मुत्सद्देगिरी प्रकट केली.' ते पुढे म्हणाले, ' रक्तपात व यादवी युद्ध टाळणे हेच एकमेव उद्दिष्ट आमच्यापुढे होते याबाबत कोणीही जबाबदार व्यक्ती माझ्याशी सहमतच होईल. रक्तपात व यादवी या गोष्टी टाळल्याच पाहिजेत. दुसऱ्या प्रमुख पक्षाबरोबर शांततापूर्ण तडजोड निघत असली तर पाहावे या आमच्या चिंतेतूनच आम्ही वरील तीन विषय केंद्राकडे सोपवून मर्यादित पाकिस्तान घेण्यास तयार झालो ' ( इं. ॲ. र., १९४६, II, पृ. १७८ ).

' मुस्लिम लीगने केलेल्या ठरावामुळे वाटाघाटींचे मार्ग बंद झाले नाहीत काय ? ' असे विचारता जीना म्हणाले, ' इतर राष्ट्रे काय करीत आहेत ते पाहा. ॲटम बॉम्बसारख्या शस्त्रांनी एकीकडे नखशिखांत हत्यारबंद होत असताना दुसरीकडे ही राष्ट्रे वाटाघाटी व चर्चा करीतच आहेत ना ? बोलणी चालू असताना दुसरीकडे त्यांची युद्धाची तयारी चालूच आहे ना ? ' ( इं. ॲ. र., १९४६, II, १८१ ).

### प्रत्यक्ष कृती

" प्रत्यक्ष कृतीला "ला किंवा " पाकिस्तानसाठी "च्या युद्धाला १६ ऑगस्ट १९४६ रोजी कलकत्ता येथे तोंड लागले. पहिल्या फेरीसाठी कलकत्ता हे शहरच निवडण्याची काही कारणे होती. बंगालचे सरकार लीगच्या हातात होते. प्रत्यक्ष कृतीच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून मुख्यमंत्र्यांनी सर्व वरिष्ठ हिंदू पोलिस अधिकाऱ्यांची कलकत्त्याबाहेर बदली केली होती. २४ मोक्याच्या जागांपैकी २२ मुस्लिमांकडे व २ ॲंग्लो-इंडियन अधिकाऱ्यांकडे होत्या. त्या दिवसांत पेट्रोल मिळणे फार कठीण होते; तरी लीगच्या मंत्र्यांच्या नावाने खूपच जादा कुपने देण्यात आली होती ( खोसला, पृ. ४६ व पुढे ).

१६ ऑगस्ट रोजी संघटितरीत्या लोक झुंडीने हातात काठ्या, सुरे, गज इत्यादी हत्यारे घेऊन मनगटशाहीचे प्रदर्शन करीत, घरांना, दुकानांना आग लावीत, ती लुटत रस्त्याने हिंडू लागले. चकमकी उडाल्या. हिंदू लोक अशा प्रकारच्या सुसंघटित हल्ल्याला तोंड देण्याच्या तयारीत नव्हते. पोलिस काहीच करीत नाहीत हे लक्षात आल्यावर तेही संघटित झाले व त्यांनी प्रतिहल्ला चढविला. हिंदूंच्या वस्तीतील सर्व म्युनिसिपल बागांना लावलेल्या लोखंडी जाळ्या, सळ्या तोडून काढून त्यांचाच वापर शस्त्रे म्हणून करण्यात आला. या दंगलीच्या वेळी पोलिसांनी काहीही केले नाही, ही फझलुल हक्क या एका प्रमुख मुस्लिम लीगच्या आमदाराचीच तक्रार होती ( खोसला, पृ. ३०६–३०९ ).

कलकत्त्याला झालेल्या या भयानक कत्तलीचे छायाचित्रांसह काही वृत्तान्त प्रसिद्ध झाले आहेत. या कत्तलीत सुमारे सहा हजार माणसे ठार झाली. बंगालमधील या

दंगलीचा व नंतर पंजाब, उत्तर प्रदेश व इतरत्रही झालेल्या दंगलींचा वस्तुनिष्ठ व सर्वात सदसद्‌विवेकपूर्ण वृत्तान्त श्री. गोपालदास खोसला यांच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रसिद्ध झालेल्या 'स्टर्न रेकनिंग' या पुस्तकात सापडतो. दुसऱ्या एका पुस्तकात वरील दंगलीच्या शिवाय स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही झालेल्या दंगलीचा वृत्तांत समाविष्ट आहे. पंजाबमधील हकीगतींचा वृत्तांत 'मुस्लिम लीग अटॅक ऑन सिख्स अँड हिंदूज् इन पंजाब, १९४७' या नावाने शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक समितीने १९५० मध्ये अमृतसरहून प्रसिद्ध केला आहे. उलट, १९४६ व १९४७ या संपूर्ण कालखंडात पूर्वविभागाचे लष्करी प्रमुख असलेल्या लेफ्टनंट जनरल सर फ्रॅन्सिस टकर यांनी लिहिलेल्या वृत्तान्तासारखे उघड उघड पक्षपाती वृत्तान्तही उपलब्ध आहेत.

कलकत्त्याची लढाई निर्णायक ठरली नाही. मृत झालेल्या लोकांत जवळजवळ निम्मे मुसलमान असतील. या परिणामासाठी मुख्यमंत्र्यांची तयारी नसावी. म्हणून शहरातील दंगली कमी करण्यात आल्या व जेथे कमी विरोध होईल अशा ठिकाणी आक्रमणाचा मोर्चा वळविण्यात आला. नोआखली व तिपेरा जिल्ह्यांत लोकवस्तीची विभागणी ८०% मुसलमान व २०% हिंदू अशी होती; परंतु जवळजवळ तीन-चतुर्थांश जमीन व संपत्ती हिंदू मालगुजारांच्या हातात होती. या जिल्ह्यांत पूर्वीही शेतकऱ्यांच्या चळवळी झाल्या होत्या. या असंतोषाचे रूपांतर जातीय दंगलीत करणे तौलनिक दृष्ट्या सोपे होते. १५ ऑक्टोबर १९४६ मध्ये नोआखलीत दुसऱ्या लढाईला सुरुवात झाली (बोस, १९५३, पृ. २९२–३०४). लष्करातील निवृत्त मुसलमान सैनिक रॉकेल व पेट्रोलचे डबे बरोबर घेऊन (वास्तविक या दोन्ही वस्तूंवर त्या वेळी नियंत्रण होते) हिंदूंची घरे लुटत, मागे उरेल ते पेटवून देत व युद्धकाळात नीतिबंधने गळून पडली असता स्त्री-पुरुषांवर साधारणतः युद्धकाळात होतात तसे अत्याचार करीत मोकाट फिरू लागले. नोआखली दंगलीचे आणखी एक राजकीय वैशिष्ट्य म्हणजे सक्तीने केलेले सार्वत्रिक धर्मांतर होय. मेलेल्या व पळून गेलेल्यांखेरीज इतर सर्व लोकांना सार्वजनिकरीत्या मुसलमान करण्यात आले. ७ नोव्हेंबर १९४६ रोजी गांधी नोआखलीत पोचेपर्यंत हा धर्मांतराचा सपाटा चालू होता. दरम्यान, नोआखलीतली दंगल सुरू झाल्यानंतर पंधरवड्याच्या आत बिहारमधील हिंदूंनी त्या प्रांतातील १४% मुसलमानांवर प्रतिहल्ला चढवला. परंतु नोआखली व बिहार येथील हल्ल्यांत फरक होता. नोआखलीतील दंगली योजनाबद्ध होत्या; तेथे सुमारे ३०० माणसे मारली गेली,* दहा हजार माणसे निर्वासित झाली,

---

* काही ठिकाणी घरांतील सर्व लोकांना उभे करून त्यांच्यासमोर घरातील कर्त्या पुरुषांची मान तोडून त्याला ठार मारल्याची, नंतर इतरांना भरपूर मारहाण करण्यात आल्याची, व मग त्यांना मुसलमान करून घेण्यात आल्याची प्रकरणे घडली.

तर आर्थिक नुकसानीचा आकडा कित्येक कोटींत गेला. उलट बिहारने केवळ **'आंधळा सैतानी सूड'** घेतला. तेथे सुमारे पाच हजारांपेक्षा जास्त लोक ठार मारले गेले. संपत्ती लुटण्यापेक्षा तिचा विध्वंस करण्याकडे अधिक भर होता. कित्येक ठिकाणी तर मुसलमान घरे सोडून गेल्यानंतर कित्येक आठवड्यांनी जाळपोळ केलेली आढळली (खोसला, पृ. ७७–८६; इं. ॲ. र., १९४६, II, पृ. २००–२१४; गढ मुक्तेश्वर दंगलीसाठी पाहा– इं. ॲ. र., १९४६, II, पृ. २१५; **टकर**, पृ. १७०–२०३; टकर यांनी या प्रकरणांना दिलेली नावेही बोलकी, त्यांचा पक्षपात उघड करणारी आहेत : 'पूर्व बंगालमधील गडबड', 'बिहारमध्ये मुस्लिमांची हत्या', 'गढमुक्तेश्वरची कत्तल...')

हिंदुस्थानातील सर्व पुढाऱ्यांपैकी फक्त गांधींनीच ओळखले की, पाकिस्तान-साठीचे युद्ध खरोखरीच नेटाने सुरू झाले आहे. इतर पुढाऱ्यांना मात्र असे वाटत होते की, अजूनही मुस्लिम लीगशी तडजोड करणे शक्य आहे. गांधींची खात्री होती की, प्रत्यक्ष कृतीचा हा पवित्रा मुसलमानांतील वरिष्ठ नेतृत्वाच्या आदेशानेच घेण्यात आलेला आहे. हिंदुस्थानातील कित्येक भू-प्रदेशात मुस्लिमेतरांची नावनिशाणीही राहू द्यावयाची नाही हा या दंगलींचा उद्देश आहे, अशी त्यांची भावना होती (बोस, १९५३, पृ. ६९). त्यामुळेच खून, लुटालूट व जाळपोळीच्या जोडीला सार्वत्रिक धर्मांतर व स्त्रियांवरील सार्वत्रिक बलात्कार व अत्याचार या घटना घडत होत्या. बलात्कार झालेल्या किंवा "बाटलेल्या" स्त्रीला परत समाजात न घेण्याची हिंदू समाजाची आजवरची प्रथा होती. एकदा बंगालमधील बऱ्याच मोठ्या भागातून हिंदू नामशेष झाले म्हणजे सार्वमत घेण्याची वेळ आलीच तर उरलेले लोक नक्कीच पाकिस्तानच्या बाजूने मत देतील ही आशा मुस्लिम लीगच्या मनात असावी हा विचार गांधींच्या मनात होता. किंबहुना पूर्वी राजाजी योजनेवर चर्चा चालू असतानाच, सार्वमत घ्यायचे असेल तर ते फक्त मुसल-मानांचेच घेतले जावे त्यात अल्पसंख्य हिंदूंना कोणताच वाव नसावा असे जीनांनी अगदी स्पष्टपणे सांगितले होते.

पाकिस्तानसाठीचे युद्ध नोआखलीत वेगळेच वळण घेऊ लागले आहे असे गांधींना वाटले. तेव्हा त्यांनी तत्काळ लढाईच्या खाईत प्रवेश केला. त्यांचे उद्दिष्ट स्पष्ट होते : बहुसंख्याक मुस्लिमांना पुढे सामोरे जाऊन, त्यांनी आपल्या शेजाऱ्यांना सुखाने राहू दिले पाहिजे ही गोष्ट त्यांना पटवून देणे हा त्यांचा उद्देश होता. नोआखलीतील मुसलमानांची सेवा केल्यास त्यांच्या ठिकाणच्या विश्वबंधुत्वाच्या जाणीवेला व भावनेला आपण यशस्वी-रीत्या आवाहन करू शकतो, हे त्यांना दाखवून द्यावयाचे होते.

हिंदूंपासून त्यांनी शौर्याची अपेक्षा केली. पळ न काढता प्रत्येक हिंदूने आपापल्या ठिकाणी हिंदू म्हणूनच निर्भयपणे राहावे असे त्यांचे आवाहन होते. कोणत्याही प्रकारचे दडपण आले तरी आपली धर्मनिष्ठा सोडू नका, असा त्यांचा आदेश होता. ज्या लोकांना

आपली बायकामुले जिल्ह्यात ठेवण्याचे धारिष्ट्य नसेल त्यांनी त्यांना सुरक्षित जागी पाठवावे, याला गांधींची संमती होती. पण देशाची सेवा करण्याचे धाडस असणाऱ्यांनी मरणाचे संकट पत्करूनसुद्धा आपल्या स्थानावर अढळ राहिले पाहिजे असे गांधी सांगत.

नोआखलीतील हिंदू हे पांढरपेशे, व्यावसायिक व मालमत्तावान आहेत ही गोष्ट गांधींच्या स्पष्टपणे लक्षात आली. त्यांनी हिंदूंना आवर्जून सांगितले की, देवानेच त्यांची सर्व मालमत्ता, संपत्ती काढून घेतली आहे, आणि त्यांनी आपल्या जीवनाची फेरमांडणी करण्याची ही नामी संधी वाया घालवू नये ( बोस, १९५३, पृ. १४२–१४३, १४७–१४९ ). हिंदूच काय, पण कोणीही आपल्या वैध मालमत्तेचे अहिंसेने नक्कीच रक्षण करू शकेल. पण त्यासाठी ती मालमत्ता प्रथम त्याने अहिंसक मार्गाने—कोणाचेही शोषण न करता—मिळवलेली असली पाहिजे. खाजगी भांडवलासारखी हिंसेने मिळवलेली कोणतीच संपत्ती अहिंसेने रक्षिता येणार नाही. अहिंसेचे पालन करावयाचे तर अशा संपत्तीचा त्याग करणे आवश्यकच होते. नोआखलीतील हिंदूंना हा आपला विचार समजावून, पटवून देण्याचा गांधींचा प्रयत्न होता ( बोस १९५३, पृ. ९८, १४४ ).

हिंदू महासभेचे सेक्रेटरी व अध्यक्ष यांनी ५ डिसेंबर १९४६ रोजी गांधींची भेट घेतली असता त्यांनी पुन्हा स्पष्टपणे सांगितले की, हिंदूंनी दृढपणे आपल्या जागेवर राहावे आणि वेळच आली तर धैर्याने व स्वेच्छेने मृत्यूला सामोरे जावे, असे त्यांचे हिंदूंना सांगणे होते. ' काही झाले तरी मी पाकिस्तानच्या निर्मितीला स्वतः होऊन संमती देणार नाही. मला पाकिस्तानची निर्मिती थोपवून धरता आली नाही व येथील सर्व हिंदू निघून गेले तरी मी एकटा येथे राहीन. त्या वेळीही मी माझ्या धार्मिक आचारांमध्ये काडीमात्रही बदल करणार नाही. ' त्या वेळी महासभेचे अध्यक्ष श्री. एन्. सी. चतर्जी म्हणाले की, त्यांची ही योजना सर्वसामान्य व्यक्तींच्या शक्तीपलीकडची होती. तेव्हा पूर्व बंगालमधील हिंदूंची सुरक्षिततेच्या दृष्टीने वेगळीच खेडी वसविण्यास काय हरकत होती ? तसे करणे म्हणजे मुस्लिम लीगच्या द्विराष्ट्रवादी भूमिकेस मान्यता देण्यासारखे होते, असे त्यावर गांधींनी उत्तर दिले. ते पुढे म्हणाले, ' प्रथम काही लोक मृत्यूला असे सामोरे गेले तर अशा शूर व्यक्ती शतगुणित होतील. लोक समजतात तसा मी दिव्य कल्पना पाहणारा द्रष्टा नाही. मी ध्येयवादी आहे हे निश्चित पण माझा ध्येयवाद व्यवहार्य आहे असा माझा दावा आहे. '

आणि मग गांधींनी एक कबूली दिली. ती फार अर्थगर्भ आहे. आपण इतक्या तातडीने बंगालमध्ये का आलो याचे कारण देताना ते म्हणाले, ' माझे अहिंसेचे तत्त्व अपयशी ठरत होते. अपयशी माणसाचे मरण मला नको आहे. मला यशवंत व्हावयाचे आहे... परंतु अपयश घेऊन मरावे लागेल हेही शक्य आहे ( बोस, १९५३, पृ. ९६–९७ ).

अशा प्रकारे देशाच्या फाळणीवरून सुरू झालेल्या युद्धात, एकराष्ट्रवादी शक्तींच्या बाजूने, ज्या जागी बांध फुटला होता तेथेच गांधींनी आपला मोर्चा बांधला.* या घटनांकडे "पाकिस्तानची लढाई" म्हणून पाहणारे, त्यांचे खरे स्वरूप ओळखणारे ते एकटेच होते. काँग्रेसच्या पुढाऱ्यांना तर गांधी काय करीत आहेत हे मुळी समजलेच नाही. त्यापैकी एकाने तेवढी नंतर अशी कबुली दिली की, गांधींच्या मार्गाने या युद्धाचे पारडे आपण एकराष्ट्रवादी भूमिकेच्या बाजूला फिरवू शकू अशी आशा पल्लवित ठेवण्याइतका निर्भयपणा त्यांच्याजवळ नव्हता.

दरम्यान गांधींनी आपले कार्य, त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, 'भारतातील वरिष्ठ नेत्यांपैकी कोणाच्याही सहकार्याशिवाय' आपल्याच मार्गाने एकाकीपणे चालू ठेवले.

## हंगामी सरकार

कॅबिनेट मिशनच्या योजनेप्रमाणे संपूर्ण सत्तांतरापूर्वी एक हंगामी केंद्रीय सरकार स्थापावयाचे होते. या हंगामी सरकारचा वा मंत्रिमंडळाचा दर्जा काय असावा, त्याचे सभासद कोणत्या तत्त्वांवर निवडावेत या बाबतीत व्हाइसरॉय व काँग्रेस पुढारी यांच्यात थोडीफार बोलणी झाली होती. या सरकारला 'वसाहतीच्या सरकार'चा दर्जा देण्यास लॉर्ड वेव्हेल तयार नव्हते. (त्या परिस्थितीत इंग्लंडच्या राजाप्रमाणे केवळ 'घटनात्मक प्रमुख' अशी त्यांची भूमिका झाली असती.) जीनांचे विचार या बाबतीत अगदी स्पष्ट होते. त्यांच्या मते 'हंगामी सरकार' हे संमिश्र सरकार किंवा संमिश्र मंत्रिमंडळ मुळीच ठरणार नव्हते. ते केवळ १९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टप्रमाणे नेमलेले गव्हर्नर जनरलचे कार्यकारी मंडळ असणार होते (इं. ॲ. र., १९४६, II, पृ. २७६). नोआखलीत असताना 'आनंदबझार पत्रिका' या वृत्तपत्राच्या संपादकाला मुलाखत देताना गांधींनी सांगितले की, 'हंगामी सरकार बनविण्यासाठी काँग्रेसला ब्रिटिश सरकारने दिलेले आमंत्रण स्वीकारावे हा प्रस्ताव त्यांचाच होता. तरी काँग्रेसच्या हाती खऱ्या अर्थाने अद्याप सत्ता आली नव्हती हे त्यांना कबूल करावयास हवे; आडमार्गाने सत्ता बळकावणाऱ्या सत्ताधाऱ्यांसारखी काँग्रेसची स्थिती होती' (बोस, १९५३, पृ. ७०).

जीनांनी टोमणा मारला की, 'काँग्रेसने तर ब्रिटिशांना हिंदुस्थानातून चालते होण्यास सांगितले आहे. मग आता ती आत्मसन्मान न गमावता १९१९ च्या कायद्याखाली प्रस्थापित होत असलेले हंगामी सरकार बनविण्याचे आमंत्रण कसे स्वीकारू

---

*बिहारसाठी गांधींनी एक कार्यक्रम सुचविला होता. त्याच्या तपशिलासाठी पाहा—बोस, १९५३, पृ. १०३–१०४.

शकते ?' ( इं. ॲ. र., १९४६, II, १८४ ).

ते असो व्हाइसरॉयने सरकार बनविण्यासाठी दिलेले निमंत्रण काँग्रेसने १२ ऑगस्ट १९४६ रोजी स्वीकारले. या सरकारने प्रत्यक्ष अधिकारग्रहण २ सप्टेंबर, १९४६ रोजी केले. हंगामी सरकार बनविण्याच्या निर्णयामुळे मुस्लिम लीगने १६ ऑगस्टला " प्रत्यक्ष कृती "ची मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला. दंगल माजविल्यानंतरसुद्धा, मुस्लिम लीगने हंगामी सरकारात यावे यासाठी काँग्रेस उत्सुक होती. वास्तविक, मागे १३ जून १९४६ रोजी गांधींनी व्हाइसरॉयना पाठविलेल्या पत्रातील सल्ल्याच्या बरोबर विरुद्ध ही गोष्ट होती. त्यानंतर कित्येक दिवसांनी, ८ मे १९४७ रोजी, त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांना पाठविलेल्या पत्रातही गांधींनी आपले पहिलेच मत पुन्हा मांडले होते. या पत्रात गांधी लिहितात, ' या हंगामी सरकारमध्ये एक तर फक्त काँग्रेस वा तिने निवडलेली माणसेच असावीत, किंवा मुस्लिम लीग वा तिने निवडलेली माणसेच असावीत. दोघांचेही अर्धवट प्रभुत्व आणि संघभावनेचा व बरोबरीने काम करण्याचा अभाव ही आजची स्थिती देशाला अपायकारक आहे, निश्चितच अहितकारक आहे. या स्वरूपामुळे दोन्ही पक्ष आज आपापल्या जागा टिकविण्यासाठी धडपड करण्यात आणि ' तुम्हांला राजी राखण्यात शक्तिक्षय करून घेत आहेत ' ( बोस, १९५३, पृ. २१९ ).

या घटना नंतरच्या आहेत. प्रत्यक्षात काँग्रेसने वरील निमंत्रण स्वीकारल्यानंतर थोड्याच दिवसांत मुस्लिम लीगही हंगामी सरकारात सामील झाली; तीन काँग्रेस मंत्र्यांनी राजीनामे दिले व त्या जागांवर लीगचे लोक आले. अल्पावधीतच अंतर्गत संघर्षामुळे हे संयुक्त मंत्रिमंडळ मोठ्याच अडचणीत आले.

संयुक्त मंत्रिमंडळात मंत्री म्हणून निवड झालेले लीगचे गझनफरअली खान अधिकारपद ग्रहण करण्याआधी १९ ऑक्टोबर १९४६ रोजी म्हणाले, केवळ काँग्रेसी व्यक्तींचे सरकार केंद्रात अधिकारावर येताच देशाच्या निरनिराळ्या भागांत झालेल्या दंगलीवरून, त्यांचे खरे प्रतिनिधी ज्यात नाहीत असे कोणतेही सरकार हिंदुस्थानातील दहा कोटी मुसलमान जुमानणार नाहीत, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली आहे. हंगामी सरकारमध्ये काम करताना आमच्यापुढे केवळ दोन उद्दिष्टे राहतील. हिंदुस्थानातील कोणतेच सरकार मुस्लिम लीगच्या सहकार्याशिवाय सुरळीत कारभार करू शकणार नाही ही गोष्ट काँग्रेसला पटविणे, व लीग हीच मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था आहे हे स्पष्ट करणे, ही ती दोन उद्दिष्टे होत. सरकारातील सहभाग ही आमच्या " प्रत्यक्ष कृती "चीच दुसरी आघाडी आहे. ज्या कोणत्या आघाडीवर आम्हाला पाठविण्यात येईल त्या जागी आम्ही जीनांच्या आज्ञा अगदी काटेकोरपणे पाळू ' ( इं. ॲ. र., १९४६, II, पृ. २७० ).

पुढे मीरत येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात विषयनियामक समितीपुढे

संमिश्र मंत्रिमंडळाच्या कारभाराविषयी आपले अनुभव सांगताना जवाहरलाल नेहरूंनी अत्यंत परखड शब्दांत सांगितले की, ‘ लीगने प्रवेश केल्यापासून केंद्रीय सरकारमधील वातावरण अत्यंत तणातणीचे झाले आहे. काँग्रेस मंत्र्यांना दोन वेळा राजीनामा देण्याची गोष्ट करावी लागली आहे. आमची सहनशीलता झपाट्याने संपुष्टात येत आहे. गोष्टी अशाच घडत राहिल्या तर मोठ्या प्रमाणावर गंभीर स्वरूपाचा संघर्ष अपरिहार्य ठरेल ’ ( इं. ॲ. र., १९४६, II, पृ. ४७ ).

‘ काँग्रेस व लीग यांच्या भूमिका परस्परविरुद्ध टोकांच्या असल्यामुळे काँग्रेस व लीग यांचे संमिश्र सरकार मुळीच शक्य नाही. असे संमिश्र सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न झालाच तर त्यातून सर्वनाश ओढवेल ’ असे प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेलांचे मत होते ( इं. ॲ. र., १९४६, II, पृ. २४६ ). परंतु पुढे जेव्हा मुस्लिम लीगचे मंत्री घेतले गेले तेव्हा त्यांनी एक वेगळीच भूमिका मांडली : ‘ काँग्रेसला राजीनामा देऊन बाहेर पडायला लावावे हा आज जे काही चालले आहे त्याचा उद्देश आहे. पण आम्ही सत्ता सोडण्याचा, लीगच्या सापळ्यात सापडण्याचा सुतराम् संभव नाही ’ ( इं. ॲ. र., १९४६, II, पृ. ४८ ).*

दरम्यान, ब्रिटिश सरकारने कोंडी फोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांच्याकडून व्हाइसरॉयना व भारतीय पुढाऱ्यांना चर्चा करण्यासाठी इंग्लंडला बोलावणे करण्यात आले. ‘ हिंदुस्थानातील दोन प्रमुख पक्षांत काही समझौता होऊ शकतो काय हे पाहणे ’ हा या चर्चेचा उद्देश होता. कारण, या दोन पक्षांत एकवाक्यता झाली म्हणजे मगच सर्व पक्षांच्या सहकार्याने घटनासमितीचे कामकाज सुरळीतपणे चालू शकणार होते ’ ( इं. ॲ. र., १९४६, II, पृ. ४९ ).

नेहरू व पटेल यांनी १७ नोव्हेंबर १९४६ रोजी व्हाइसरॉयना कळविले की, ‘ नवीन राजकीय बोलणी करण्यासाठी व्हाइसरॉयनी दिलेले निमंत्रण स्वीकारावयाचे नाही असे काँग्रेसने ठरविले आहे. ’ परंतु गंमत अशी की, शेवटी, ॲटलींनी व्यक्तिशः

---

* या सुमारास ( म्हणजे जानेवारी १९४७ मध्ये ) पटेलांनी गांधींना पुढील पत्र पाठविले होते : ‘ मला सत्तेला चिकटून राहावयाचे आहे हा आरोप अगदी खोटा आहे. जवाहरलाल नेहरू वारंवार सरकारमधून बाहेर पडण्याच्या पोकळ धमक्या देत असतात. वास्तविक त्यामुळे काँग्रेसची प्रतिष्ठा कमी होते, शासनयंत्रणेचे नीतिधैर्य खचते. म्हणून मी नेहरूंच्या या गोष्टीला विरोध केला. राजीनामा द्यायचाच असेल तर तसा पक्का निर्णय घेतला पाहिजे. राजीनामा देण्याच्या नुसत्याच धमक्यांनी व्हाइसरॉयपुढे आम्ही हसे करून घेतले आहे. ते आता आमच्या धमक्यांना मुळीच भीक घालत नाहीत ’ ( गांधीजी, १९५७, पृ. २०६ ).

दिलेल्या निमंत्रणाचा मान राखून, व 'ब्रिटिश योजनेत कोणताही बदल केला जाणार नाही' हे आश्वासन मिळाल्यावर, २९ नोव्हेंबर १९४६ रोजी इंग्लंडला जायचे नेहरूंनी ठरवले (इं. अॅ. र., १९४६, II, पृ. ४९-५०, २९९-३००). १ डिसेंबर १९४६ रोजी नेहरू, जीना, लियाकतअली खान व बलदेवसिंग यांच्यासह व्हाइसरॉय इंग्लंडला गेले. लंडनला पोचल्यावर, 'समोर असलेले प्रश्न कितीही मौलिक का असेनात, आणि आपापसात काहीही मतभेद का असेनात, शांततापूर्णरीत्या व सहकार्याच्या मार्गानेच प्रश्न सोडवू असा हिंदुस्थानने निर्धार केला पाहिजे' असे नेहरूंनी जाहीर केले (कित्ता, पृ. ५२).

'इंग्लंडमध्ये परस्परांची समज पटविण्याचे किंवा समझौता घडवून आणण्याचे कोणतेही प्रयत्न झाले किंवा मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींना कोणतीही स्पष्टीकरणे वा आश्वासने दिली गेली, तरी काँग्रेस व लीग यांच्यातील खरी तडजोड भारतातच घडून येऊ शकेल,' असे पटेलांचे मत होते (कित्ता, पृ. ५२).

मध्यंतरीच्या काळात वायव्य सरहद्द प्रांतात हजारा येथे फार भयंकर दंगली उसळल्या. थोड्याच काळात वायव्य सरहद्द प्रांताच्या इतर भागांत व पंजाबमध्ये त्या पसरल्या. "पाकिस्तानचे युद्ध" आता पश्चिम आघाडीवर सुरू झाले होते. या दंगलींच्यावर जीनांनी अशी तोड सुचविली, 'भारताच्या निरनिराळ्या भागांत झालेल्या अमानुष कत्तली लक्षात घेता, केंद्रातील व प्रांतातील सत्ताधाऱ्यांनी लोकसंख्येच्या अदलाबदलीचा प्रश्न तातडतोब हाती घ्यावा, असे माझे मत आहे. अल्पसंख्याक फारच थोड्या संख्येने जेथे आहेत तेथे बहुसंख्याक जमातींनी निर्घृणपणे त्यांची कत्तल केल्याच्या घटना अलीकडे घडल्या आहेत. त्यांची पुनरावृत्ती टाळण्याचा तोच एक मार्ग आहे' (कित्ता, पृ. २९६).

## घटना समिती

घटना समिती सार्वभौम नाही असे जीनांचे मत होते. 'कोणत्याही निवेदनामुळे वा वीरश्रीच्या देखाव्याने तिचे रूपांतर सार्वभौम सभेत होणार नाही... ब्रिटिश सरकारने नियुक्त केलेल्या व्हाइसरॉयने बोलविलेल्या घटना समितीला एका सार्वभौम सभेचे रूप देण्याची काँग्रेसची भाषा हा "उचलली जीभ लावली टाळ्याला" अशातला प्रकार आहे. पं. जवाहरलाल नेहरूंच्या बालिश आणि वीरश्रीपूर्ण वक्तव्यांमुळे काही घटना समिती सार्वभौम होत नाही खचित' (कित्ता, १६८).

१६ मे रोजी केलेल्या निवेदनातील प्रांतांचे गट करण्यासंबंधीच्या विधानाचा अर्थ काय करावयाचा हा काँग्रेस व कॅबिनेट मिशन यांच्यातील मतभेदाचा मुख्य मुद्दा होता. याच कारणामुळे मुस्लिम लीगनेही प्रथम दिलेली स्वीकृती नंतर मागे घेतली

होती, हे वाचकांच्या लक्षात असेलच.

ब्रिटिश सरकारने ६ डिसेंबर १९४६ रोजी एक पत्रक काढले. त्यांनी पुढील खुलासा केला : 'कॅबिनेट मिशनने सुरुवातीपासूनच अशी भूमिका घेतलेली आहे की, सर्वांच्या संमतीने निर्णयाची दुसरी पद्धत ठरली नसेल तेथे गट-बैठकीतील निर्णय साध्या बहुमताने घेतले जातील. मुस्लिम लीगने हा अन्वयार्थ स्वीकारला आहे. परंतु काँग्रेसने वेगळा दृष्टिकोण पुढे मांडला आहे. त्यांचे म्हणणे असे की, कॅबिनेट मिशनच्या एकंदर योजनेचा साकल्याने विचार करता, एखाद्या गटात जावयाचे किंवा नाही हे ठरविण्याचा व आपल्या प्रांतापुरती वेगळीच घटना करण्याचा हक्क प्रांतांना मिळतो.

'ब्रिटिश सरकारने घेतलेल्या कायदेतज्ज्ञांच्या सल्ल्यानंतर, १६ मे च्या निवेदनाचा कॅबिनेट मिशन प्रथमपासूनच सांगत असलेला अर्थच बरोबर असल्याचे नक्की झाले आहे. हिंदी जनतेला राज्यघटना तयार करता येण्याच्या दृष्टीने १६ मेच्या योजनेचा तो भाग, कॅबिनेट मिशनने लावलेल्या अन्वयार्थासह, बंधनकारक म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. तिचा असा स्वीकार केल्यासच ब्रिटिश सरकार ती पार्लमेंटला सादर करण्यास तयार असेल. तेव्हा त्या कलमाचा मिशनने लावलेला अर्थ घटना समितीतील सर्व पक्षांनी स्वीकारणे आवश्यक आहे.

'१६ मेच्या निवेदनातील इतर कलमांचा अर्थ लावण्याच्या बाबतीत मतभेद होण्याची शक्यता उघड आहे. मुस्लिम लीग घटना समितीत भाग घेऊ शकत नसेल तर काँग्रेसप्रमाणेच अन्वयार्थाचे सर्व प्रश्न निर्णयासाठी फेडरल कोर्टापुढे नेण्यास तसेच त्या कोर्टाचा निर्णय स्वीकारणे बंधनकारक मानण्यास मुस्लिम लीग संमती देईल, अशी ब्रिटिश सरकारला आशा वाटते. म्हणजे मग संघराज्याच्या घटना समितीचे व गटवार घटना समित्यांचे कामकाज कॅबिनेट मिशनच्या योजनेला अभिप्रेत असल्याप्रमाणे चालू शकेल.

'परंतु, मुस्लिम लीगला आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्याचा मार्ग खुला व्हावा या दृष्टीने, ब्रिटिश सरकारची काँग्रेसला अशी विनंती आहे की, तिने आत्ताचा जो वादाचा मुद्दा आहे त्या बाबतीत मिशनचा अन्वयार्थ स्वीकारावा. कॅबिनेट मिशनला अभिप्रेत असलेला अर्थच बरोबर आहे याची अशी खात्री झाली असतानाही हा मुद्दा फेडरल कोर्टाकडे न्यावा असे घटना समितीला वाटत असल्यास तिने तो लवकरात लवकर त्या कोर्टापुढे उपस्थित करावा. त्या परिस्थितीत त्या कोर्टाचा निकाल येईपर्यंत गट-समित्यांच्या बैठका तहकूब ठेवणे बाजवी होईल.

'कामकाजाच्या पद्धतींवर एकवाक्यता असल्याखेरीज घटना समितीला आपल्या कार्यात यश येईल हे कधीच शक्य नाही. भारतातील एका मोठ्या लोकसमूहाचे प्रतिनिधी ज्या घटना समितीत नाहीत अशा समितीने घटना बनवली तर, त्यांच्या इच्छेविरुद्ध

कोणत्याही प्रांतावर ती घटना लादण्याचा विचार ब्रिटिश सरकार अर्थातच करू शकणार नाही. देशाच्या कोणत्याही भागावर बळजबरीने काँग्रेस अशी घटना लादू इच्छित नाही असे काँग्रेसनेही म्हटले आहे' (इं. ॲ. र., १९४६, II, पृ. ३०१–३०२).

वरील विधानावर जीनांनी अशी शंका काढली की, 'समजा, फेडरल कोर्टाचा निर्णय ब्रिटिश सरकारने लावलेल्या अर्थाच्याविरुद्ध गेला, तर ब्रिटिश सरकार घटना समितीचे काय करणार? घटना समितीचे कार्य कोर्टाच्या निवाड्यानुसार, म्हणजेच ब्रिटिश सरकारच्या अन्वयार्थाच्या विरुद्ध जाऊन चालणार काय? तसे असेल तर मुस्लिम लीग ते कधीच मान्य करणार नाही...... बाहेरून कोणी दडपण आणावे, हस्तक्षेप करावा हे आम्हाला नको आहे. परंतु, पाशवी बहुमत असलेल्यांना सगळा लचांड गिळंकृत करणे शक्य होऊ नये अशी व्यवस्था या योजनेत नक्कीच हवी. या घटना समितीने स्वतःला सार्वभौम समजून निर्णयामागून निर्णय घ्यावे व नंतर बिचाऱ्या अल्प-संख्य मुस्लिम समाजाला आणि ब्रिटिश सरकारला पेचात पकडावे— खरा धोका इथेच आहे' (किन्ना, पृ. ३१५–३१६).

ब्रिटिश मंत्रिमंडळाने वरीलप्रमाणे खुलासा केल्यानंतर ५–६ जानेवारी १९४७ रोजी काँग्रेस कमिटीची बैठक भरून तीत कॅबिनेट मिशन योजनेतील दीर्घ मुदतीच्या योजनेचा भाग स्वीकारण्याचे ठरले. त्या वेळी केलेल्या ठरावातील काही भाग पुढे उद्धृत केला आहे : 'काँग्रेसच्या नोव्हेंबरमधील मीरत अधिवेशनानंतर या देशात झालेल्या घटना, ६ डिसेंबर १९४६ रोजी ब्रिटिश सरकारने केलेले निवेदन, २२ डिसेंबरला काँग्रेस कार्यकारिणीने केलेले निवेदन, या सर्वांचा एकत्रित विचार करून ही अ. भा. काँग्रेस कमिटी काँग्रेसजनांना पुढील आदेश देत आहे...

'...केव्हाही वादाचा मुद्दा उपस्थित झाला की फेडरल कोर्टाकडे निवाड्यासाठी जाण्याची काँग्रेसने नेहमीच तयारी दाखविलेली आहे. परंतु सरकारने केलेल्या खुलाशांच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाबाबत आता फेडरल कोर्टाकडे जाण्याने कसलाच हेतू साध्य होणार नाही. कारण कोर्टाने दिलेला निर्णय बंधनकारक मानू, अशी उभय पक्षांची संमती असेल तरच कोर्टाकडे जाण्यात काही अर्थ आहे...

'सर्व पक्षांच्या सदिच्छेच्या पाठिंब्याने घटना समितीचे कार्य सुरू होऊन तिने स्वतंत्र भारताची घटना तयार करावी, यासाठी ही कार्यकारिणी अत्यंत उत्सुक आहे. त्यामुळे मध्यंतरी कॅबिनेट मिशनच्या योजनेतील कलमांचे भिन्न अन्वयार्थ लावण्यावरून निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी ब्रिटिश सरकारने लावलेल्या अर्थाप्रमाणे समितीचे व गटांचेही कार्य चालावे याला काँग्रेस मान्यता देत आहे' (इं. ॲ. र., १९४७, I, पृ. ११४–११५).

वरील ठरावाला 'कॅबिनेट मिशनच्या १६ मे च्या निवेदनाचा ब्रिटिश सरकारने

६ डिसेंबर रोजी काढलेल्या पत्रकान्वये लावलेला अर्थ काँग्रेसला मान्य नाही ' अशी उपसूचना श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांनी मांडली. ही उपसूचना १०२ विरुद्ध ५४ मतांनी फेटाळली गेली. श्री. जयप्रकाश नारायण यांनी या उपसूचनेला पाठिंबा दिला होता. ठरावावरील शेवटच्या भाषणात नेहरू म्हणाले, ' आपण देशात प्रचंड लढा उभारून आपले हेतू साध्य करून घेऊ शकतो या श्री. जयप्रकाश नारायण यांच्या बोलण्याशी मी सहमत आहे. परंतु आपल्यात अंतर्गत दुबळेपणा आलेला आहे. तो प्रथम दूर केला पाहिजे. राज्यकर्त्यांशी संघर्ष असेच त्या लढ्याचे स्वरूप राहिले पाहिजे असे नाही. वेगळ्या प्रकारेही संघर्ष करता येईल. म्हणूनच काँग्रेसला प्रथम आपले स्थान बळकट करण्याची इच्छा आहे ' ( इं. ॲ. र., १९४७, I, पृ. ११४–११५ ).

मध्यंतरी ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची पहिली बैठक श्री. सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या बैठकीत राजेंद्रप्रसाद यांची कायमचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी ११ डिसेंबरपासून अध्यक्ष म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

## गांधी आणि घटना समिती

या सर्व काळात गांधी नोआखलीसारख्या, दिल्लीहून पोचणे अवघड व वेळ लागणाऱ्या अशा ठिकाणी होते. त्यामुळे प्रसंगविशेषी त्यांचा घेतलेला सल्ला सोडला तर, सर्व बोलणी काँग्रेसचे पुढारीच करीत होते. गांधींनी नोआखलीत पाकिस्ताननिर्मितीच्या विरुद्ध जे युद्ध—होय, युद्धच; गांधींची अहिंसा व मुस्लिम लीगची हिंसा यांच्यातले ते युद्धच होते—चालविले होते त्यात त्यांचे हात मजबूत करावेत इतका रस त्या कामात कोणाला नव्हता. किंवा झपाट्याने बदलत जाणारी परिस्थिती व नित्य घडणाऱ्या नव्या नव्या घटना यांमुळे तिकडे लक्ष देण्यास कोणालाच वेळ झाला नाही असे म्हणा.

काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक ८ ते १२ डिसेंबर १९४६ या दरम्यान भरली होती. इकडे घटना समितीचे अधिवेशनही नुकतेच चालू झाले होते. त्या वेळी काँग्रेस कार्यकारिणीने २४ मे १९४६ च्या ठरावातली आपली जुनीच भूमिका पुन्हा उचलून धरणारा ठराव केला. त्याप्रमाणे, कॅबिनेट मिशनच्या १६ मेच्या निवेदनाचा अर्थ बरोबर लावला तर ' गट निर्माण करणे अनिवार्य आहे असे होत नाही ' असे पुन्हा एकदा म्हटले होते. ' फेडरल कोर्टाचा निर्णय मुस्लिम लीगवर बंधनकारक राहणार नाही ' या मुस्लिम लीगच्या कार्यकारिणीच्या निर्णयाकडे अंगुलिनिर्देश करून या ठरावात पुढे म्हटले होते की, ' तसेच त्यांनी हिंदुस्थानची फाळणी करण्याची मागणीही चालूच ठेवली आहे... हे सर्व कॅबिनेट मिशनच्या योजनेच्या विरुद्ध आहे... नव्याने घडलेल्या

घटनांचा विचार करून काँग्रेसजनांना योग्य तो आदेश देण्याच्या हेतूने अ. भा. काँग्रेस महासमितीची तातडीची बैठक दिल्ली येथे घेण्यात येत आहे ' ( इं. ॲ. र., १९४६, II, पृ. १२९ ).

जानेवारीत भरलेल्या या काँग्रेस महासमितीच्या बैठकीत ब्रिटिश सरकारने लावलेल्या अर्थाप्रमाणे काम करण्यास काँग्रेसने स्वीकृती दिली हे आपण मागे पाहिलेच आहे. या दोन्ही ठरावांच्या मागे एक छोटी कहाणी आहे. ती मी माझ्या दुसऱ्या पुस्तकात सांगितली आहेच. पण प्रस्तुत संदर्भात पुन्हा सांगतो.

प्रतिपक्षाशी वागण्याचा गांधींचा नेहमीच एक डाव असे. विरोधी पक्षाची योजना ते प्रथम स्वीकारीत. त्या योजनेला पेलणारा आणि काँग्रेसच्या ध्येयधोरणे व उद्दिष्टे यांच्याशी अधिकात अधिक सुसंगत असा स्वतःचा अर्थ त्या योजनेत मग भरीत. ब्रिटिशां-बरोबर काय किंवा जीनांबरोबर काय, गांधी नेहमी याच पद्धतीने बोलणी करीत. बोलणी अयशस्वी झाली आणि अहिंसक असहकार करावा लागलाच तर बोलणी फिसकटण्याच्या अपयशाची जबाबदारी प्रतिपक्षावर राहावी अशी त्यांची पद्धती असे. कॅबिनेट मिशनशी चाललेल्या बोलण्यांची स्थितीही काहीशी अशीच होती. परंतु या वेळी मात्र बोलण्यांकडे पाठ फिरवून काँग्रेसने वनवास पत्करण्याची वेळ आली होती असे वाटत होते.

वरील ८ डिसेंबरच्या बैठकीपूर्वी गांधींचा सल्ला घेण्यासाठी पाठविण्यात आलेल्या वर्किंग कमिटीच्या सभासदाच्यामार्फत त्यांनी पुढीलप्रमाणे सल्ला कळविला : ' मुस्लिम लीगने बहिष्कार घातल्यास कॅबिनेट मिशनच्या १६ मेच्या निवेदनाच्या आधारे घटना समिती भरविली जाऊ नये, या बाबतीत माझे मन निःशंक आहे. काँग्रेस व मुस्लिम लीग या दोन प्रमुख पक्षांचे सहकार्य कॅबिनेट मिशनला नक्कीच अभिप्रेत आहे. त्यामुळे कोणत्याही एका पक्षाने बहिष्कार पुकारला तर त्या योजनेनुसार घटना समिती भरणे औचित्याला धरून होणार नाही. लीगच्या बहिष्कारास न जुमानता घटना समिती भरवा-वयाची झाल्यास, प्रथम काँग्रेसशी सल्लामसलत करून एक वेगळे निवेदन प्रसृत करून त्या आधारे ती भरवावी लागेल; तरच ते योग्य होईल. काँग्रेस कितीही बलाढ्य असली तरी आज घटना समिती ब्रिटिश सरकारच्या पुढाकारानेच केवळ भरू शकते ही गोष्ट आपण काही झाले तरी लक्षात घेतलीच पाहिजे.

' लीगचा बहिष्कार असताना घटना समिती भरली आणि ब्रिटिश सरकारचे तिला अगदी खुबीचे सहकार्य लाभले तरी ती उघड वा प्रच्छन्न, पण ब्रिटिश लष्करी संरक्षणाच्या आश्रयानेच भरेल. माझ्या मते, त्या परिस्थितीत आपल्याला समाधानकारक घटना कधीच करता येणार नाही. आपल्या मनाने कबूल केला काय किंवा न केला काय, अशा घटना समितीस मान्यता देण्याने सर्व जगाला आपला दुबळेपणा दिसणार आहे.

'या परिस्थितीत घटना समिती न भरविणे म्हणजे जीना किंवा मुस्लिम लीग यांना शरण जाण्यासारखे आहे असे म्हटले जाईल. या आरोपाची मला दिक्कत वाटत नाही. कारण आपली ही कृती दौर्बल्याची नव्हे तर सामर्थ्याची निदर्शक असेल. कारण ती परिस्थितीत गर्भित असलेली तर्कसिद्ध कृती आहे.

'ब्रिटिश सरकारची दखल न घेता आपण आपली स्वत:ची घटना समिती भरवू शकू एवढे सामर्थ्य व प्रतिष्ठा आपल्यापाशी असेल तर स्वतंत्र घटना समिती भरविणे ही योग्य कृती ठरेल. त्यासाठी आपल्याला मुस्लिम लीग, इतर राहिलेले राजकीय पक्ष व संस्थानिक यांचे सहकार्य मिळवावे लागेल. तसे झाल्यास, यापैकी काहींनी सहभाग नाकारला तरी या घटना समितीची बैठक अनुकूल जागी आपण घेऊ शकू. उदाहरणार्थ कॉंग्रेस अमलाखालील प्रांत व संस्थानिक एवढेच कदाचित घटना समितीत येतील. पण यात अप्रतिष्ठा नाही व ही गोष्ट वस्तुस्थितीला धरून होईल' (घोष, १९५३, पृ. ९४–९५). हा सल्ला ४ डिसेंबरला एका व्यक्तीकडून प्रफुल्लचंद्र घोष यांच्याकडे व त्यांच्यामार्फत कॉंग्रेस कार्यकारिणीकडे पोचविण्यात आला.

वरील पत्रावरून एक गोष्ट स्पष्ट होते. कॉंग्रेस श्रेष्ठींपैकी बहुतेक कोणाच्या लक्षात न आलेली एक गोष्ट गांधींच्या निश्चितपणे लक्षात आली होती. ती अशी की, ब्रिटिश सरकारला आपले म्हणणे मान्य करायला लावण्याइतके अजून कॉंग्रेसचे सामर्थ्य नव्हते. मात्र या वेळी कॉंग्रेसला एक संधी होती. गांधींच्या मार्गाने गेल्यास कॉंग्रेसला अपयश आले असते तरी त्यांतून कॉंग्रेसचे सामर्थ्य वाढले असते. तिची सदसद्विवेक बुद्धी अकलंकित राहिली असती.

या मार्गातील धोकाही मोठाच असल्याने त्या वेळचे कॉंग्रेस अध्यक्ष आचार्य कृपलानी, नेहरू व शंकरराव देव समक्ष गांधींना भेटण्यासाठी २७ डिसेंबर १९४६ रोजी नोआखलीत आले.

बऱ्याच विचारविनिमयानंतर गांधींनी वरील तिघांजवळ एक निवेदन दिले. हे निवेदन पुढे दिले आहे. या ठिकाणी गांधींनी कॉंग्रेसच्या राजकारणातील काही मूलभूत सिद्धांतांचा विचार केला आहे. अंतिमतः जनतेचे हित कशात आहे हे लक्षात घेऊन अजूनसुद्धा घटना समितीतून बाहेर पडावे असे गांधींना वाटत होते. ते असो. प्रथम आपण त्यांचे निवेदन पाहू :

'साठ वर्षांच्या आपल्या अव्याहत कारकीर्दीत कॉंग्रेस नेहमीच सर्व जमातींचे— हिंदू, मुसलमान व इतर—प्रतिनिधित्व, व तेही उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात करीत आली आहे. तसेच या काळात उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात ती सामान्य जनतेची प्रतिनिधी बनत गेली आहे. कॉंग्रेसमध्ये, प्रथमपासूनच, काही दांभिक व्यक्ती घुसलेल्या आढळतात; ही वस्तुस्थिती इतर गुणांच्या जोडीला कॉंग्रेसच्या ठिकाणी वरील दोन गुण

आहेत याची एक प्रकारची पावती आहे. सर्व जमातींचे व जनतेचे खरेखुरे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांना आपण काँग्रेसमध्ये फारच अल्पमतात पडलो आहोत असे वाटत असेल तर त्यांनी आपला निषेध कणखरपणे दाखवून काँग्रेसबाहेर पडावे व काँग्रेसबाहेरून त्यांनी जनतेचे नेतृत्व करावे. तसे केले तरच ते राष्ट्राचे खरे सेवक ठरतील. म्हणून या अत्यंत आणीबाणीच्या नाजूक परिस्थितीत कार्यकारिणीने पुढील तीन मुद्दे मांडून लंबीरपणे काँग्रेसला योग्य, निःसंदिग्ध मार्गदर्शन केले पाहिजे असे माझे मत आहे :

( १ ) घटना समितीवर बहिष्कार टाकण्याची वेळ कदाचित आता टळून गेली असेल. तरी पण काँग्रेसची भूमिका निःसंदिग्धरीत्या स्पष्ट करण्याचा बहिष्कार हाच सर्वोत्तम मार्ग आहे असे मला अजूनही वाटते.

( २ ) कॅबिनेट मिशनने व कायदेआझम जीना यांनी संयुक्तपणे लावलेला अन्वयार्थ स्वीकारून मिशनची योजना मान्य करणे हा त्या खालोखाल चांगला मार्ग आहे.

( ३ ) एक गोष्ट अत्यंत स्पष्ट पाहिजे. ती अशी की, काँग्रेसने कोणतीही भूमिका घेतली तरी वैयक्तिकदृष्ट्या काँग्रेसच्या एखाद्या सभासदाला, किंवा एखाद्या गटाला, किंवा एखाद्या प्रांतालासुद्धा ही भूमिका मान्य नसल्यास त्यांना काँग्रेसच्या भूमिकेपासून फुटून निघण्याची मोकळीक असली पाहिजे. आणि त्या गटाची वा प्रांताची ही भूमिका स्वीकारून त्या गटाला वा प्रांताला उघडपणे काँग्रेस मार्गदर्शन करू शकली पाहिजे. आपण कोणत्याही गटावर वा प्रांतावर सक्ती करणार नाही या कॅबिनेट मिशनच्या भूमिकेशी हे धोरण सुसंगत ठरेल.

'याचा परिणाम असा होईल की, अ गट कॅबिनेट मिशनच्या धोरणानुसार आपली घटना पूर्णपणे तयार करील. गटातून फुटून निघतील अशी ज्या प्रांतांबद्दल आपली अपेक्षा आहे ते प्रांत वगळून ब आणि क गटांना, जशी जमेल तशी, आपापली घटना तयार करावी लागेल. पूर्वेकडील आसाम, पश्चिमेकडील वायव्य सरहद्द प्रांत, शिखांचा पंजाब व कदाचित बलुचिस्तान हे फुटून निघतील अशी अपेक्षा आहे.

'ब्रिटिश सरकार अशा वेळी एखादी वेगळीच घटनासमिती बोलवील वा दुसऱ्याच एखाद्या घटना समितीला मान्यता देईल, हीही शक्यता आहे. त्यांनी तसे केले तर ते स्वतःची कायमची बदनामी करून घेतील! कॅबिनेट मिशनच्या निवेदनाशी प्रामाणिक राहून घटना तयार केली की बाकी सर्व नशिबावर सोपवून ब्रिटिश शासन व सैन्य येथून कायमचे काढून घेण्यास ब्रिटिश सरकार वचनबद्ध आहे.

'काँग्रेसने ही भूमिका घेतल्यास जीनांनी लावलेल्या सापळ्यात पाय टाकल्यासारखे होईल असे काहींना वाटण्याचा संभव आहे. पण ते तसे नाही. परंतु जीनांना जर तसे वाटले तर त्यांना पाकिस्तान निर्माण करण्यासाठी सर्वमान्य व अनाक्रमक असे सूत्र उपलब्ध करून दिल्याबद्दल सारे जग काँग्रेसला धन्यवाद देईल. जीनांच्या श्रद्धेशी संपूर्ण-

वर्णे जुळतो म्हणून सत्याच्या मार्गावरून काँग्रेस माघार घेऊ शकत नाही.

'अशा रीतीने तयार झालेली घटना सर्व भारतासाठी असेल; ज्यांनी घटना समितीवर बहिष्कार टाकला होता त्यांना त्या घटनेचा स्वीकार करावासा वाटल्यास तो कसा करता येईल याची स्पष्टता करणारे एक निश्चित कलम त्यात असेल' (इं. ॲ. र., १९४६, II, पृ. १२८–१३०).

अ. भा. काँग्रेस कमिटीला गांधींचा हा सल्ला मानवला नाही व त्यांनी कॅबिनेट मिशनचाच अर्थ स्वीकारला, हे स्पष्टच आहे. ही बातमी त्या रात्री रेडिओवरून प्रसृत करण्यात आली व एका गृहस्थाने ती गांधींच्या छावणीत आणली. प्रस्तुत लेखकाने स्वतःच ती बातमी गांधींना सांगितली. त्या वेळी, 'यह तो मेरा खातमा हो गया' असे गांधीजी म्हणाल्याचे प्रस्तुत लेखकाला स्पष्ट आठवते आहे.

काँग्रेसचे पुढारी आणि गांधी यांच्यात घनिष्ठ सहकार्य कायम होते तरी त्यांच्या राजकीय भूमिकांमधील दरी रुंदावत होती, ही गोष्ट घटना समितीच्या संदर्भातल्याच आणखी एका मुद्द्यावरून दिसून येते.

आसाम विधिमंडळाचे दोन सभासद १५ डिसेंबर १९४६ रोजी गांधींना भेटायला आले होते. त्यांच्यात बरीच दीर्घ चर्चा झाल्यानंतर एक निवेदन तयार करण्यात आले. हे निवेदन स्वतः गांधींनी पाहून दुरुस्त केले व शेवटी ते त्या सभासदांच्या हाती देण्यात आले. हे सर्व निवेदनच पुढे दिले आहे :

'१५ डिसेंबर १९४६ रोजी सकाळी श्री. बारडोलाई यांच्यातर्फे दोन आसामी मित्र, श्री. विजयचंद्र भगवती व श्री मोहिंद्र मोहन चौधरी गांधींना भेटले. घटना समितीच्या संदर्भात गटामध्ये सामील होण्यासंबंधी आसामने काय करावे असे त्यांनी गांधींना विचारले. आसामच्या दृष्टीने हा जीवनमरणाचा प्रश्न होता. बंगालबरोबर गट करण्याची त्याची तयारी नव्हती. उलट, आसाम गटाबाहेर राहिला तर ते मुस्लिम लीगच्याच पथ्यावर पडेल, असे काही लोकांनी त्यांना सांगितले होते. तसेच, सर्व भारताच्या स्वातंत्र्याच्या व प्रगतीच्या आड आसाम येत असल्यास ते चालू देता येणार नव्हते, इत्यादी. यासंबंधी त्यांनी वर्किंग कमिटीकडून मार्गदर्शनाची मागणी केली होती. परंतु तिच्याकडून काहीच स्पष्ट मार्गदर्शन मिळत नाही असे वाटल्यावरून ते गांधींचा सल्ला मागण्यासाठी नोआखलीला आले होते.

'त्यांच्या प्रश्नावर गांधींनी उत्तर दिले, "या बाबतीत निर्णय करण्यास मला क्षणाचाही विलंब लागणार नाही. माझी मते अगदी स्पष्ट आहेत. मी आतबाहेर सगळा काँग्रेस-मयच आहे. काँग्रेसची आज जी घटना दिसते ती मुख्यतः मीच तयार केलेली आहे. काँग्रेस कार्यकारिणीकडून जर कोणताच स्पष्ट आदेश मिळत नसेल तर आसामने गटात मुळीच जाऊ नये असे मी बारडोलाईंना सांगितले. आसामने आपला विरोध नोंदवावा

आणि घटना समितीतून बाहेर पडावे. असे करणे हा एक प्रकारे काँग्रेसविरुद्ध तिच्याच भल्यासाठी केलेला सत्याग्रह ठरेल.

' " चूक असो वा, बरोबर असो, पण फेडरल कोर्टाचा निर्णय मान्य करण्याचे काँग्रेसने ठरवले आहे. हा जुगार फार अंगाशी येणार आहे. फेडरल कोर्टाचा निर्णय काँग्रेसच्याविरुद्ध जाईल अशी मला जवळजवळ खात्री वाटते. याचे सरळ आणि साधे कारण असे की, आपण कॅबिनेट मिशनच्या विधानांच्या अर्थाबद्दल कायदेशीर सल्ला घेतलेला आहे असे ब्रिटिश सरकार सांगते. तो त्यांच्या बाजूला आहे. फेडरल कोर्ट झाले तरी ब्रिटिशांनीच बनविलेले. ते पक्षपाती न्यायासन आहे. आपल्या भूमिकेशी सुसंगत राहावयाचे तर काँग्रेसला त्या कोर्टाचा जो काही निर्णय होईल तो मानलाच पाहिजे. या वेळी जर आसाम स्वस्थ बसेल तर त्याचा सर्वनाश झालाच म्हणून समजा. जे आसामला नको आहे ते करायला त्याला कोणीच भाग पाडू शकत नाही. आसामने स्वायत्त राज्य म्हणून स्वतंत्रपणे उभे राहिले पाहिजे. आजही आसाम बऱ्याच अंशी स्वायत्त आहेच. पण यापुढे तो संपूर्ण स्वायत्त व स्वतंत्र झाला पाहिजे. तुमच्यापाशी एवढे धैर्य, साहस व निग्रह आहे की नाही हे मला माहीत नाही. ते तुम्हीच चांगल्या प्रकारे सांगू शकता. पण तुम्ही जर अशी घोषणा करू शकलात तर ती उत्तम गोष्ट होईल. घटना समितीची निरनिराळ्या गटांत विभागणी होण्याची वेळ आली की लगेच उभे राहून तुम्ही म्हणावयाचे, ' सज्जनहो, आसाम सभात्याग करीत आहे. ' बस्स. भारत स्वतंत्र व्हायला तेवढी एकच शर्त आहे. प्रत्येक घटकास स्वतः-बद्दलचा निर्णय स्वतःच घेण्याची व कृती करण्याची मुभा असली पाहिजे. आसाम या बाबतीत इतरांना धडा घालून देईल अशी मी आशा बाळगून आहे. शीखांनासुद्धा माझे हेच सांगणे आहे. पण तुम्हा आसामी लोकांची स्थिती खूपच चांगली आहे. तुमचा स्वतंत्र असा सबंध प्रांत आहे. उलट शीख म्हणजे एका प्रांतातील एक जमात आहे. अर्थात मला असे वाटते की, व्यक्तीलासुद्धा स्वतःच्या मताप्रमाणे वागण्याचा हक्क आहे, जसा माझाही तो हक्क आहे. "

' प्रश्न : पण, हिंदुस्थानची घटना बनविण्याचे काम आसामसाठी थांबवले जाऊ शकणार नाही. आसामला भारताचा मार्ग रोखून धरण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे आम्हाला सांगण्यात आले आहे.

' उत्तर : पण तसे करण्याची आवश्यकताच नाही. म्हणूनच मी म्हणतो की, मला काहीच कळेनासे झाले आहे. इतकी वर्षे झाल्यानंतरसुद्धा या साध्या गोष्टी लोकांच्या का लक्षात येत नाहीत? आसाम बाहेर पडेल तर तो भारताचा मार्ग अडवणार तर नाहीच उलट स्वातंत्र्याच्या मार्गावर तो भारताचे नेतृत्व करील.

' प्रश्न : मुस्लिम लीगने असे म्हटले आहे की, घटना समिती जी घटना तयार

करील ती प्रांतांवर त्यांच्या इच्छेविरुद्ध लादता येणार नाही. म्हणून, जर काही भागांनी ती मान्य केली नाही तर इंग्लिश पार्लमेंट अशा घटनेला संमती देणार नाही.

'या प्रश्नाने गांधी चांगलेच संतापले. " ब्रिटिश सरकार कोण ठरवणार? इंग्लंडच्या किंवा आणखी कोणाच्या तरी कृपेने आपल्या भूमीवर स्वातंत्र्य अवतरणार आहे अशी आमची समजूत असेल तर आम्ही फार मोठ्या भ्रमात आहोत. ते स्वातंत्र्य असणार नाही. आम्ही शतखंडित होऊ. खरोखर आपण स्वातंत्र्य व असहाय परावलंबित्व यांमध्ये गोते खात आहोत. कॅबिनेट मिशनची योजना सुवर्णमध्यावर आहे. तिला आपण योग्य प्रकारे राबविले तर स्वातंत्र्याचे पूर्ण फुललेले पुष्प आपल्याला पाहावयास मिळेल, पण जर आपली चूक झाली तर सगळा मोहोर गळून जाईल.

' " हे पक्के लक्षात ठेवा की, लीगने घेतलेली भूमिका अगदी बरोबर आहे. जर ते बाहेर राहतील तर घटना समिती त्यांच्यावर आपली घटना लादू शकणार नाही. या बाबतीत ब्रिटिश सरकारला या किंवा त्या बाजूने काही करायला मुळीच वाव नाही.

' " घटना समितीच्या कार्यात ब्रिटिश सरकार ढवळाढवळ करू शकत नाही. मुस्लिम व इतरेजन यांच्या बहुसंख्य पाठिंब्याने घटना तयार केली आणि त्यात ब्रिटिश पार्लमेंटने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तर तुम्ही तिचा हस्तक्षेप ठोकरून लावू शकता. सत्ता तुमच्या हातात असेल. अशाच प्रकारची काहीशी गोष्ट नुकतीच आयर्लंड-मध्ये झालेली आहे. शिवाय डी व्हॅलेरा तर काही अहिंसक कार्यकर्ते नाहीत. भारताची स्थिती आयर्लंडपेक्षा खूपच चांगली आहे. आयर्लंडपेक्षा भारतात ब्रिटिश सरकार आपल्या शब्दाला जास्त बांधलेले आहे. आपण पुरेशा अक्कलहुशारीने वागलो नाही तर मात्र आपण आपला फायदा गमावून बसू. मला वाटते, आज आपण तेच करीत आहोत.

' " आसामने स्वतःचे भवितव्य स्वतःच घडवले तर बाकीचा हिंदुस्थानही ते करू शकेल. नाही तरी तुम्हाला केंद्रीय सरकारच्या घटनेशी काय करायचे आहे? तुम्ही तुमची वेगळी घटना करावी. ते पुरेसे आहे. आणि तसेच म्हणावयाचे तर आजही तुमच्या घटनेचा पाया तयार आहेच.

' " १९३५ च्या घटनेची किंमत मी कधीच कमी लेखलेली नाही. ती प्रांतांच्या स्वायत्ततेवरच आधारलेली आहे. लोकांमध्ये क्षमता असली तर तिचा खूप विकास होऊ शकेल; तिच्यात तेवढी ताकद आहे. आसामच्या डोंगरी प्रदेशातील आदिवासी लोक तुमच्याबरोबर आहेत. कित्येक मुसलमानही तुमच्याच बाजूचे आहेत. तुम्ही न्यायबुद्धीने चोख व्यवहार केलात तर बाकीचेही तुम्हाला येऊन मिळतील. तसे होण्या-साठी तुम्ही लहान-सहान मतभेद, किरकोळ भांडणे व मत्सरीपणा टाकून देऊन दुबळे-पणाचा त्याग केला पाहिजे. आसाममध्ये जसे खूप सामर्थ्य आहे तसा बराच दुबळेपणा आहे. मला आसाम माहीत आहे. "

'त्यावर "तुमच्या आशीर्वादाने आम्ही काँग्रेसबाहेर पडूनही हा लढा देऊ" असे ते दोघे म्हणाले.

'गांधीजी पुढे म्हणाले, "१९३९ मध्ये, मंत्रिमंडळांनी राजीनामा द्यावा असे ठरले तेव्हा सुभाषचंद्रांनी आसामबाबत त्या निर्णयास विरोध केला होता. त्यांच्या मते आसामची गोष्ट वेगळी होती. त्या वेळीच मी बारडोलाईंना म्हटले होते की, सुभाषचंद्रांच्या बोलण्यात बरेच तथ्य आहे. तसेच, मंत्रिमंडळांनी सत्तात्याग करावा या योजनेचा मीच जनक होतो तरी, त्या वेळीही मी असेच सांगितले होते की, आसामला वाटत नसेल तर तेथील मंत्रिमंडळाने बाहेर पडू नये. परंतु आसामने सत्तात्याग केला. खरोखर ती चूकच झाली."

'त्यावर ते दोघे आसामी मित्र म्हणाले, "पण त्या वेळी ( काँग्रेस अध्यक्ष ) मौलानासाहेबांनी आसामचा अपवाद करता येणार नाही असे सांगितले होते."

गांधी म्हणाले, 'अपवाद करण्याचा प्रश्नच नव्हता. लोकांनी म्हटले असते की, 'आसामने बंडखोरी केली आणि तीसुद्धा सौजन्यपूर्णरीत्या.' परंतु आपल्यात गुलामगिरीची वृत्ती मुरलीय. आपण काँग्रेसकडे पाहतो आणि आपल्या मनात येते की, आपण तिच्या मागोमाग गेलो नाही तर तिचा विनाश ओढवेल. मी तर असेही म्हणतो की, एखादा प्रांतच नव्हे तर एखादी व्यक्तीसुद्धा काँग्रेसविरुद्ध बंड करू शकेल. अशा वेळी ती व्यक्ती सत्याच्या बाजूने असेल तर तिच्या बंडामुळे काँग्रेसची सेवाच होईल. मी स्वतः तसेच केले आहे. काँग्रेसला तिची आजची प्रतिष्ठा सुखासुखी लाभलेली नाही. मला आठवते, बहुधा ते १९१८ साल असावे, प्रांतिक काँग्रेसचे अधिवेशन अहमदाबादेस भरले होते. कै अब्बास तय्यबजी अध्यक्ष होते. सर्व ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती. त्या वेळी अलीबंधू पूर्णपणे माझ्या बाजूचे झाले नव्हते. ते नंतर माझ्या बाजूला येऊन मिळाले. कै. विठ्ठलभाई पटेल हजर होते. मी असहकाराचा ठराव मांडला. वास्तविक मी त्या वेळी कोणाच्या खिसगणतीतही नव्हतो. त्या वेळी पुढील घटनात्मक प्रश्न उपस्थित झाला : अखिल भारतीय पातळीवर काँग्रेसने निर्णय घेतला नसताना एखाद्या प्रांतिक अधिवेशनात निर्णय घेता येतो काय ? मी म्हणालो, येतो. मी असेही सांगितले की, प्रांतिक अधिवेशनच काय पण एकटी व्यक्तीसुद्धा काँग्रेसचे धोरण ठरविण्याबद्दल पुढाकार घेऊ शकते, व ते काँग्रेसच्या फायद्याचेही असू शकते. सर्व ज्येष्ठांचा विरोध असूनही माझा ठराव संमत झाला. त्यामुळे पुढे याच आशयाचा ठराव कलकत्ता अधिवेशनात मांडण्याचा मार्ग खुला झाला. एका प्रांतिक अधिवेशनाने धारिष्ट्य दाखवून असा क्रांतिकारक ठराव केलेला पाहून सारा देश अवाक् झाला.

'"आम्ही सत्याग्रह सभा काँग्रेसच्या बाहेर स्थापली होती. त्यात नंतर मला हॉर्निमन, सरोजिनी देवी, शंकरलाल, उमर सोभानी आणि ( अत्यंत मिस्किल व खोड्याळ असे ) सरदार पटेल येऊन मिळाले. मी आजारी होतो. त्याच वेळी रौलट ॲक्ट संमत

झाला. मी खवळून गेलो. मी सरदारांना म्हटले की, त्यांच्या मदतीशिवाय मला काहीच करता येणार नाही. त्यांनी मदत करण्याचे मान्य केले. पुढील गोष्टी तुम्हाला माहीतच आहेत. ते बंडच होते. पण ते विधायक, निकोप बंड होते. आता आपण ६ एप्रिल ते १३ एप्रिल असा सप्ताह साजरा करतो. त्या पहिल्या असहकारातूनच नवा भारत जन्मास आला. तो असहकार हे काँग्रेसविरुद्ध बंडच होते; पण त्याने काँग्रेसचा फायदाच झाला. ही सर्व उदाहरणे तुमच्यापुढे आहेतच.

' " आतापर्यंतचा सगळा वेळ मी तुमची मने कणखर व्हावीत म्हणूनच प्रयत्न करीत आहे. तुम्ही धीट व्हावे म्हणूनच हे सर्व सांगितले आहे. या वेळी जर तुम्ही बरोबर वागला नाहीत तर आसाम संपलाच म्हणून समजा. बारडोलाईना सांगा की माझ्या मनात मुळीसुद्धा संदेह नाही. माझ्या मनाचा निर्णय झालेला आहे. आसामने काही झाले तरी आपले स्वत्व गमावता कामा नये. सारे जग विरुद्ध गेले तरी आसामने आपल्या स्वत्वाचे रक्षण केलेच पाहिजे. तसे होत नसेल तर मी म्हणेन की, आसाममध्ये माणसे आहेत पण पौरुष नाही. बंगालने आसामवर कोणत्याही प्रकारे प्रभुत्व गाजवावे ही सूचना उद्धट-पणाची आहे. "

' " गांधींच्या आशीर्वादाने आम्ही काँग्रेसविरुद्ध बंड केले आहे असे लोकांना सांगावे काय ? " असे त्या मित्रांनी विचारले.

' " ईश्वराच्या कृपेची भाषा करा, " गांधी म्हणाले. " ती जास्त लाभदायी असते. लोकांना सांगा की आसाम आपले स्वत्व गमावणार नाही; योग्य मार्गावरून ढळणार नाही. त्या गांधीने आम्हाला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही त्याचे ऐकणार नाही. " '

## पुढील घटनांची वाटचाल

**( अ ) उद्दिष्ट बदलले :** एकीकडे काँग्रेसमधील लोकांना कॅबिनेट मिशनच्या योजनेसंबंधी मार्गदर्शन करीत असताना गांधींचे नोआखलीतील कार्य चालूच होते. सर्वत्र अंधःकार पसरला असल्याची कबुली मात्र ते देत.

नोआखलीनंतर बिहार व बिहारनंतर पंजाबमध्ये दंगली झाल्या.* मुस्लिम लीगने

* पहा, इं. अॅ. र., १९४७, I, ६–८ मार्च १९४७ च्या बैठकीतील वर्किंग कमिटीचा ठराव, पृ. ११८; अध्यक्षांचा अहवाल, पृ. १२४; रावळपिंडी, मुलतान, अमृतसर, कलकत्ता, नोआखली, बिहार इत्यादी ठिकाणच्या दंगलींबद्दलचा नेहरूंचा अहवाल, पृ. १३४.

बिहारमधील ' कत्तली 'चे मोठेच भांडवल केले– त्यात अर्थात खूपच अतिशयोक्ती होती. गांधींचे काँग्रेसजनांना व सर्व वृत्तपत्रांना असे सांगणे होते की, त्यांनी केवळ पुराव्यावर पारखून घेतलेल्या सत्यालाच प्रसिद्धी द्यावी.

बिहारमधील दंगलीसंबंधी प्रांतिक मुस्लिम लीगच्या जनरल सेक्रेटरीने पाटण्याहून ' द ऑफिशियल स्टेटमेंट अँड रेझोल्युशन ऑफ बिहार प्रॉव्हिन्शियल मुस्लिम लीग ऑन द बिहार मॅसॅकर ऑफ १९४६ ' या शीर्षकाचे एक चोपडे प्रसिद्ध केले. त्यात ' द बिहार स्टेट किलिंग, १९४६ : व्हॉट द हिंदू काँग्रेस फॅसिझम हॅज डन इन बिहार ? ' या शीर्षकाखाली पुढील ' घटना ' दिल्या :

( १ ) ५०,००० पेक्षा जास्त मुसलमान कत्तलीत ठार मारण्यात किंवा जिवंत जाळण्यात आले.

( २ ) सुमारे ५ लक्ष मुसलमान निर्वासित झाले.

( ३ ) अमूल्य ग्रंथालये, दुर्मिळ हस्तलिखिते, अनेक सांस्कृतिक स्मारके, कित्येक मशिदी व कुराणाच्या प्रती भस्मसात झाल्या.

( ४ ) हजारो लोकांना सक्तीने हिंदू करून घेतले व त्यांच्यावर गुलामगिरीचे लाजिरवाणे जिणे लादले.

( ५ ) मुसलमानांची कोट्यवधी रुपयांची मालमत्ता नष्ट केली.

( ६ ) ठार मारलेल्यांपैकी ८०% स्त्रिया व मुले होती.

याउलट नोआखलीतील दंगलीबद्दल गांधींनी असे म्हटले होते की, ठार मारलेल्यांच्या संख्येचे जे आकडे प्रसृत झाले त्यात अतिशयोक्ती झाली आहे यात शंका नाही ( बोस, १९५३, पृ. ६९ ). प्रत्येक घरात जाऊन शक्य तितकी अचूक माहिती गोळा करण्याची सूचना त्यांनी आपल्या स्वयंसेवकांना दिली होती. जेथे शक्य असेल तेथे ते स्वतःच जाऊन खातरजमा करून घेत ( **कित्ता**, पृ. २३८ ).

मुस्लिम लीगने बिहारमधील दंगलींचा आपल्या प्रचारासाठी उपयोग केला यात तक्रार करण्यासारखे काही नाही. कारण प्रत्येक लढाईत शत्रुपक्षाच्या खऱ्याखोट्या क्रूरपणाच्या गोष्टी सांगूनच स्वपक्षातील सैनिकांचा त्वेष टिकवून धरला जातो. या बाबतीत पाश्चिमात्य सुसंस्कृत राष्ट्रांचे वर्तनसुद्धा असेच होत असते.

एकीकडे देशभर दंगली उसळल्या होत्या आणि दुसरीकडे स्वातंत्र्यासाठी काँग्रेस, ब्रिटिश सरकार व मुस्लिम लीग यांच्यात वाग्युद्ध चालू होते. सत्तांतर व्हावयाचे तर आधी काँग्रेस व मुस्लिम लीग यांनी आपापसात समझोता केला पाहिजे याचा ब्रिटिश सरकारने आग्रह धरला; त्या दिशेने दडपण आणले. कॅबिनेट मिशनच्या योजनेतला प्रांतांचे गट करण्याचा भाग ही, संघराज्यात्मक केंद्र सरकारचा देखावा ठेवून देशाचे ऐक्य अभंग ठेवल्याचे नाटक करीत असतानाच, प्रत्यक्षात पाकिस्तान प्रस्थापित

करण्याचीच अंगभूत यंत्रणा होती. कारण संकल्पित केंद्रसरकारला प्रांतांच्या किंवा प्रांतांच्या गटांच्या अंतर्गत कारभारात दखल देण्याचा मुळीच अधिकार नव्हता. या सर्व प्रकरणी काँग्रेसच्या सदसद्विवेकबुद्धीला बोचणी लागलेली होती. काँग्रेसच्या चुका, दुबळेपणा यांची कबूली देण्यास गांधी नेहमीच तयार असत. पण आपले दोष दूर करून आपली भूमिका व संघटना पक्की करून आगेकूच करण्यासाठी गांधी अशा परखड व जाहीर आत्मपरीक्षणाचा उपयोग करून घेत ( बोस, १९५३, पृ. १६६ व पुढे ). उलट-पक्षी, मुस्लिम लीगला सदसद्विवेकबुद्धीची असली काही बोचणी नव्हती. त्यांनी सर्वच गोष्टींचा पाकिस्तानची मागणी पदरात पाडून घेण्यासाठी प्रभावीपणे उपयोग करून घेतला.

ब्रिटिश सरकारने कॅबिनेट मिशन योजनेच्या रूपाने केलेल्या आव्हानाने, मिशनने लावलेल्या अर्थासह शब्दशः व पूर्णतया १६ मेचे निवेदन स्वीकारण्याच्या ब्रिटिश सरकारच्या आग्रहाने एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट मात्र साधली : त्यामुळे काँग्रेस पुढाऱ्यांचे लक्ष त्यांच्या ( मूळ ) उद्दिष्टापासून ढळले. अंतिम सत्तांतरासाठी प्रतिपक्षाने घातलेल्या पूर्वशर्तींच्या जाळयात ते पूर्णपणे गुरफटून गेले. ब्रिटिश डावपेचांच्या दृष्टीने हे यश महत्त्वाचे होते.

काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या धरसोडपणामुळे आपल्या पायाखालची वाळू सरकू लागल्याचे गांधींच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी ' ब्रिटिशांनी आधी चालते व्हावे ' हा मुद्दा धसाला लावण्याच्या मूळ उद्दिष्टावर काँग्रेस पुढाऱ्यांचे लक्ष खिळवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला. आपापसात समझोता करण्यासाठी काँग्रेस व मुस्लिम लीग यांना मोकळे सोडले पाहिजे, ब्रिटिश सरकारने मध्ये तोंड घालण्याचे कारण नाही, अशी त्यांची भूमिका होती. ब्रिटिशांनी ताठर भूमिका घेतली. त्यांचे म्हणणे असे की, येथील अल्पसंख्याकांचे हित पाहणे ही त्यांची विशेष जबाबदारी आहे. आणि गांधींचा सल्ला डावलून, काँग्रेसने सामान्यतः ब्रिटिशांचा हा दावा मान्य केला.

२४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड वेव्हेल यांच्या हातून व्हाइसरॉय म्हणून लॉर्ड माउंटबॅटन यांनी सूत्रे हाती घेतली. ३१ मार्चला त्यांची व गांधींची भेट झाली. त्या वेळी गांधींनी सुचविले की, हंगामी सरकारची पुनर्घटना करावी व ते सर्वस्वी मुस्लिम लीगच्या हातात द्यावे. लीगने नकार दिल्यास त्याच शर्तीवर काँग्रेसला निमंत्रण देण्यात यावे. ( **मेनन**, १९५७, पृ. ३५२–३५३ ). माउंटबॅटन यांचे ब्रिटिश सल्लागार तर गांधींच्या या म्हणण्याने बिचकून गेलेच; पण काँग्रेसचे पुढारीही बिचकले. देशाचे विभाजन करा-यचीच वेळ आली तर बंगाल आणि पंजाबच्या फाळणीची मागणी करावयाची असा त्या वेळपर्यंत वल्लभभाई पटेलांचा निर्णय झालेला होता. ( **मेनन**, १९५७, पृ. ३५३–३५५ ). गांधींच्या वरील योजनेला पटेलांचा विरोध होता. केंद्रीय सरकार मुस्लिम लीगकडे गेल्यास घटना समितीचे सुरळीत चाललेले कार्य नष्ट करण्याची आयतीच संधी, त्यांच्या मते,

लीगला मिळणार होती.

एकंदरीत, घसरगुंडी थांबविण्यासाठी टाकलेला गांधींचा हा नवा पवित्रा फसला. उलट, वेगळ्या पाकिस्तानखेरीज दुसऱ्या कशानेच मुस्लिम लीगचे समाधान होणार नसेल तर बंगाल व पंजाबची फाळणी व्हावी या मताला काँग्रेसमध्ये जास्त जास्त पाठिंबा मिळू लागला. काँग्रेसबाहेरील लोकमतही त्याच भूमिकेकडे झुकत होते.

दरम्यान पंजाबमध्ये दंगली चालूच होत्या. २० मार्च १९४७ रोजी काढलेल्या अधिकृत सरकारी पत्रकाप्रमाणे, 'पंजाबमधील अलीकडील दंगलींमध्ये २०४९ लोक ठार व ११०३ लोक गंभीर जखमी झाले' ( इं. अॅ. र., १९४७, I, पृ. ४८ ). पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी दंगलग्रस्त भागाला भेट दिली. त्यांनी अत्यंत त्वेषपूर्ण भाषेत लोकांच्या अधःपतनाचा धिक्कार केला. रक्तपात, क्रौर्य व नीचपणा यांच्या दर्शनाने ते इतके व्यथित झाले की, आपली राजकीय उद्दिष्टे कोणती आहेत याचा त्यांना विसर पडला असावा असे वाटावे. कदाचित त्यांच्या मनात दुसऱ्याही एका गोष्टीचे शल्य असावे. बंगाल, बिहार किंवा पंजाबमधील दंगली काबूत आणण्याच्या कामी काँग्रेस संघटना अयशस्वी ठरली होती, आणि शांतता रक्षणासाठी सैन्य बोलवावे लागले होते. या जातीय दंगली अशाच चालू राहिल्या तर सैन्यात व प्रशासन यंत्रणेत जातीय पक्षपाती भूमिकेची लागण झाल्याशिवाय राहणार नाही असाही एक धोका होता. आतापर्यंत तरी लष्कर जातीयवादापासून मुक्त होते. पण पिसाटपणा असाच फैलावत गेला आणि सैन्यातील शीख, हिंदू, मुसलमान यांचे सगेसोयरे दंगलीत होरपळून निघण्याची शक्यता वाढत चालली असता सैनिक या भावनेपासून किती काळ मुक्त राहू शकणार होते, असा प्रश्न होता.

**( ब ) फाळणीचे समर्थन :** काँग्रेसने गांधींना डावलल्यानंतर माउंटबॅटननी नेहरूंना व काँग्रेस कार्यकारिणीला आपल्या बाजूला ओढण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. देशाची फाळणी करून विश्वासार्ह व एकनिष्ठ असे सैन्य व प्रशासनयंत्रणा असलेली दोन राष्ट्रे निर्माण केली नाहीत तर भारताची चीनप्रमाणे लहान लहान छकले उडतील; हिंदुस्थानात ६०० हून जास्त संस्थाने होती ती, कदाचित, त्या परिस्थितीत सार्वभौमत्व पुकारतील, असे त्यांचे मुख्य प्रतिपादन असावेसे दिसत होते.

काँग्रेस व लीग यांच्यात काहीच एकमत झाले नाही तर इंग्रज त्यांना योग्य वाटतील त्या घटकांच्या हातात सत्ता देऊन निघून जाणार ही गोष्ट माउंटबॅटननी ध्वनित केली. सुरुवातीच्या काळात हिंदुस्थानातील दोन्ही भागांनी वसाहतींचे स्वातंत्र्य स्वीकारून ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये राहण्याचे ठरवले तर सत्तांतर नीटपणे व निर्विघ्नपणे पार पाडता येईल असा एक पर्याय पुढे ठेवण्यात आला ( **मेनन**, १९५७, पृ. ३५९ ).

ही योजना नेहरूंना समंजस वाटली. पण ती साकार होण्यात दोन अडथळे होते;

निदान माउंटबॅटनना तरी तसे वाटले. एक म्हणजे, असे "कुरतडलेले" पाकिस्तान जीना मान्य करणार नाहीत अशी शक्यता होती. दुसरी अडचण गांधींची होती. ते एकदम अनपेक्षित मार्गाने या योजनेला खो घालतील अशी शक्यता होती.

तेव्हा व्हाइसरॉय मोठ्या सावधानतेने पावले टाकत गेले. फाळणीच्या योजनेला संमती दिली तर जून १९४८ च्या आधीही सत्तांतर करता येईल असे मधाचे बोट त्यांनी लावले. हंगामी सरकारमध्ये मुस्लिम लीगच्या मंत्र्यांच्या असहकाराचा अनुभव फारच कडवट असल्यामुळे काँग्रेस पुढाऱ्यांना व्हाइसरॉयने दाखविलेले आमिष फारच विलोभनीय वाटले. मुस्लिम लीगच्या जाचक सहवासातून जास्तीत जास्त लवकर सुटका करून घेण्याची त्यांना घाई झाली होती. काँग्रेस पुढारी अशा मनःस्थितीत असतानाच माउंटबॅटननी त्यांना 'गांधीजी विरुद्ध गेले तर कसे?' असा सूचक प्रश्न विचारला. त्यावर वल्लभभाई पटेलांनी 'जो काही निर्णय होईल तो गांधीजी एकनिष्ठपणे मानतीलच' असे सांगितल्याचे कळते (कॅंम्बेल व जॉन्सन, १९५२, पृ. १०४).

व्हाइसरॉयनी जीनांशी अगदी वेगळाच युक्तिवाद लढविला. फाळणी झाली तर जीनांनी किंवा लीगने स्वप्नातसुद्धा कल्पिला नसेल इतका त्यांचा फायदा होणार होता. पण यदाकदाचित बंगालच्या व पंजाबच्या फाळणीवरून काही खळखळ केलीच तर त्यावर तोडगा म्हणून व्हाइसरॉयनी चर्चिल यांजकडून जीनांना एक पत्र घेऊन ठेवले होते. त्या पत्रात चर्चिलनी जीनांना स्पष्ट बजावले होते की, 'फाळणी स्वीकारणेच बरे; कारण त्यावरच त्यांचे, त्यांच्या आकांक्षांचे जीवनमरण अवलंबून होते' (किन्त्ता, पृ. ९७).

**(क) गांधींचा एकाकी लढा :** माउंटबॅटन व गांधी यांची आणखी एक भेट मे १९४७ च्या पहिल्या आठवड्यात झाली. त्या वेळपावेतो माउंटबॅटननी सर्व काँग्रेस पुढाऱ्यांना आपलेसे करून घेतले होते. त्या भेटीनंतर दोनच दिवसांनी प्रस्तुत लेखक गांधींना भेटला असताना पुढील संभाषण झाले. *

**गांधीजी :** 'मिस्टर गांधी, आज काँग्रेस तुमच्या बाजूला नसून माझ्या खिशात आहे' असे सांगण्याचे धाष्ट्र्य काल माउंटबॅटननी दाखवले.

मी : मग आपण काय उत्तर दिलेत?

**गांधीजी :** मीही जोरात सांगितले, 'पण सारा हिंदुस्थान अजून माझ्याच बाजूला आहे.'

त्या प्रवासात असतानाच गांधींनी गाडीतून व्हाइसरॉयना एक पत्र पाठविले. त्या

* हे संभाषण सर्वांत प्रथम लुई फिशर यांच्या 'गांधी : हिज लाइफ अँड मेसेज फॉर दि वर्ल्ड' (सिग्नेट की-बुक, १९५४, पृ. १७१) या पुस्तकात प्रसिद्ध झाले.

पत्रात त्यांनी, इंग्रजांनी हिंदुस्थानातून निघून जाण्याच्या आपल्या कर्तव्याला जागावे, अन्य चिंता करू नये, ही गोष्ट व्हाइसरॉयना पटविण्याचा अखेरचा निकराचा प्रयत्न केला होता. हे पत्र असे होते :

पाटण्याला जाताना गाडीतून, ८-५-१९४७

प्रिय मित्र,

गेल्या रविवारी झालेल्या आपल्या भेटीत मी जे बोललो त्याचा आढावा घ्यावा व वेळेअभावी मी जे बोललो नाही तेही आपल्याला थोडक्यात सांगावे हे बरे होईल असे माझ्या मनात आले.

( १ ) उलट बाजूने कोणी काहीही म्हणो, हिंदुस्थानची फाळणी करण्यात कोणत्याही प्रकारे सहभागी झाल्यास ती ब्रिटिशांची फार मोठी घोडचूक होईल असे मला वाटते. फाळणी व्हायचीच असेल तर ती, ब्रिटिश निघून गेल्यानंतर उभय पक्षांत जी तडजोड होईल तीमुळे किंवा हिंदू-मुसलमानांतील सशस्त्र लढ्याचा ( जो कायदेआझम जीनांना, त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे वर्ज्य आहे ) परिणाम म्हणून होऊ दे. प्रतिस्पर्धी पक्षांत मतभेद झाल्यास ते सोडविण्यासाठी एक लवाद-कोर्ट स्थापन करून अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची हमी देता येईल.

( २ ) दरम्यान हंगामी सरकारमध्ये केवळ कॉंग्रेसची किंवा कॉंग्रेसने सुचविलेली माणसे घ्यावीत अगर केवळ मुस्लिम लीगची वा तिने सुचविलेली माणसे घ्यावीत. परस्परांच्या सहकार्याच्या व सांघिक भावनेअभावी आज दुहेरी नियंत्रण अस्तित्वात आले आहे व ते देशाला अत्यंत घातक आहे. दोन्ही पक्ष आपापल्या जागा टिकविण्याचा प्रयत्न करण्यात व तुम्हाला राजी राखण्याच्या प्रयत्नात आपली सर्व शक्ती खर्च करीत आहेत. सरकारमध्ये संघभावना नसल्यामुळे त्याचे नीतिधैर्य खचत जाते आणि कार्यक्षम व चोख शासनासाठी प्रशासनयंत्रणा निःपक्षपाती व सचोटीची लागते तशी ती राहू शकत नाही.

( ३ ) आजच्या अवस्थेत सरहद्द प्रांतात ( किंवा खरे म्हणजे कोणत्याही प्रांतात ) सार्वमत घेणे फारच धोक्याचे आहे. आज लोक जसे आहेत तसे त्यांच्याकडून काम घेतले पाहिजे. ते काही असो डॉ. खानसाहेब तेथे मुख्यमंत्री असताना त्यांना धाब्यावर बसवून काही करू नये, करता येणार नाही असे मला वाटते. अर्थात हा सर्व परिच्छेद फाळणी करावयाची म्हटली तरच लागू पडतो.

( ४ ) बंगाल व पंजाबची फाळणी ही कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी निखालस चूक आहे. शिवाय त्यामुळे मुस्लिम लीग उगीचच डिवचली जाईल. ब्रिटिश येथून निघून गेल्यानंतर ही किंवा इतरही दुरुस्ती होऊ शकेल. मात्र उभय पक्षांच्या संमतीने जे ठरेल त्याची अंमलबजावणी अर्थातच ब्रिटिश सत्ता असताना होऊ शकेल. ब्रिटिश

हिंदुस्थानात असेपर्यंत देशात शांतता राखण्याची जबाबदारी मुख्यतः त्यांची आहे असेच मानले पाहिजे. पूर्ण करता येणार नाहीत किंवा पूर्ण करू नयेत अशा आशा-आकांक्षा जागृत करण्यातून जो दबाव उत्पन्न झाला आहे त्याच्या ताणाखाली ब्रिटिश शासनयंत्रणा ठिसूळ बनत चालल्याचे दिसते. पुढील तेरा महिन्यांत अशा ( अवास्तव ) आशा-आकांक्षांना मुळीच जागा नाही. सर्वांची मने ब्रिटिश सत्तेच्या निर्गमनावर केंद्रित केली तर हा काळ खूपच कमी करता येईल व ती गोष्ट फायद्याची होईल. इतर सर्व गोष्टी बाजूस ठेवून आपण आणि आपण एकटेच हे करण्यास समर्थ आहात.

( ५ ) आरमारी युद्धातील निर्विवाद प्राविण्य लक्षात घेऊन आपल्यावर जी जबाबदारी ( दुसऱ्या महायुद्धात ) टाकण्यात आली होती ती मोठी होती यात शंका नाही. पण आजच्या आपल्या कामापुढे ती जबाबदारी काहीच नाही. मताची एकाग्रता व विचारांचा स्पष्टपणा या गुणांनीच आपल्याला यश मिळवून दिले आहे. आजच्या कामात त्या गुणांची फारच अधिक आवश्यकता आहे.

( ६ ) अराजकाचा वारसा मागे ठेवून जाऊ नये असे आपणास वाटत असेल तर आपल्या निवडीच्या एका पक्षाच्या हाती ( संस्थानांसह ) संपूर्ण हिंदुस्थानचे राज्य आपण सोपवायला हवे. मुस्लिम लीगचे बहुमत असलेले प्रांत व काही संस्थाने यांनी घटना समितीत सहभाग दिलेला नसला तरी, घटना समितीला साऱ्याच देशाच्या शासनासाठी व्यवस्था करावयाची आहे.

( ७ ) पंजाब व बंगालची फाळणी करावयाची नाही याचा अर्थ तेथील अल्प-संख्याकांकडे दुर्लक्ष करावयाचे असे नाही. या दोन्ही प्रांतांत त्यांची संख्या भरपूर आहे. आपल्याकडे लक्ष वेधून घेण्याइतके सामर्थ्यही त्यांच्यात आहे. लोकनियुक्त सरकारांना जर त्यांचे समाधान करता आले नाही तर सत्तांतराच्या आधीच्या मधल्या काळात तेथील गव्हर्नरांनी सक्रिय हस्तक्षेप करावा.

( ८ ) संस्थाने सार्वभौम होऊ शकतात व स्वतंत्र भारतास उपद्रव देऊ शकतात असा प्रभुत्वाचे ( पॅरामाउंट्सी ) हस्तांतर होऊ शकत नाही या सिद्धांताचा अर्थ असेल तर तो एक दुष्ट सिद्धान्त आहे. भारतात ब्रिटिश जी जी सत्ता गाजवीत होते ती ती सर्व सत्ता त्यांच्या वारसदारांच्या हाती आपसूक गेली पाहिजे. म्हणजेच, ब्रिटिश हिंदुस्थानातील लोकांइतकेच संस्थानातील लोकही स्वतंत्र भारताचे नागरिक झाले पाहिजेत. आजचे लहान-मोठे संस्थानिक म्हणजे ब्रिटिश सरकारने आपल्या प्रतिष्ठेसाठी निर्माण केलेली किंवा खपवून घेतलेली बाहुली आहेत. संस्थानिक आपल्या प्रजेवर जी अनिर्बंध सत्ता चालवितात तो ब्रिटिश साम्राज्यावरील सर्वांत काळाकुट्ट डाग आहे असे कदाचित म्हणता येईल. विश्वस्ताला असतात तेवढेच किंवा घटनासमिती देईल तेवढेच अधिकार नव्या राजवटीत संस्थानिकांना असतील. अर्थातच त्यांना वेगळे सैन्य ठेवता येणार नाही.

शस्त्रास्त्रांचे कारखानेही चालवता येणार नाहीत. त्यांच्यापैकी ज्यांच्या ठिकाणी मुत्सद्द्याचे, शासकाचे गुण असतील त्यांचा लाभ नव्या प्रजासत्ताकास झाला पाहिजे. त्यांच्या गुणांचा उपयोग संस्थानातील व एकंदरीने सारी प्रजा यांच्या भल्यासाठी झाला पाहिजे. संस्थानांचे काय करावे हे मी येथे फक्त सूचित केले आहे. ते कसे करता येईल हे या पत्रात सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

( ९ ) असाच काहीसा अवघड पण इतकी गुंतागुंत नसलेला प्रश्न सनदी प्रशासकांचा आहे. त्या लोकांना आतापासूनच येणाऱ्या नवीन राजवटीशी जुळवून घ्यायला शिकवले पाहिजे. त्यांनी कोणत्याच पक्षाची बाजू घेता कामा नये. जातीयतेचा सूक्ष्म जरी अंश त्यांच्यात असला तर तो अत्यंत कठोरपणे निपटून काढला पाहिजे. त्यांच्यामधील इंग्लिश मंडळींच्या हे ध्यानात आणून दिले पाहिजे की, त्यांची स्वामिनिष्ठा नव्या राजवटीलाच असली पाहिजे; ती जुन्या राजवटीला म्हणजे इंग्लंडला असता कामा नये. तसेच, आपण राज्यकर्ते व म्हणून कोणी तरी श्रेष्ठ असल्याची भावना सोडून त्यांनी जनतेचे खरे सेवक असल्याची भावना मनात रुजवली पाहिजे.

( १० ) गेल्या मंगळवारी सुमारे पावणेतीन तास माझी कायदेआझम जीना यांच्याशी मनमोकळी चर्चा झाली. उभय जमातींनी हिंसा वर्ज्य मानावी यासाठी करावयाच्या संयुक्त निवेदनाविषयी आम्ही बोललो. अहिंसेवरील आपल्या श्रद्धेविषयी ते खूप आग्रही दिसले. ही गोष्ट मला सुखद होती. हा मुद्दा त्यांनी नंतर वृत्तपत्रांना द्यावयाच्या पत्रकाच्या मसुद्यातही जोर देऊन मांडला आहे.

( ११ ) आम्ही देशाची फाळणी आणि पाकिस्तान याबद्दलही बोललो. माझा पाकिस्तानला विरोध असल्याचे मी त्यांना पुन्हा सांगितले व असे सुचवले की, त्यांनी नुकत्याच घोषित केलेल्या अहिंसेवरील श्रद्धेला जागून त्यांच्या विरोधकांची मने दांडगाईने नव्हे तर केवळ युक्तिवादानेच जिंकण्याचा त्यांनी प्रयत्न करावा. परंतु पाकिस्तानचा प्रश्न वाटाघाटींसाठी खुला नाही अशी त्यांची ठाम भूमिका दिसली. तर्कदृष्ट्या, अहिंसेवर विश्वास ठेवणाऱ्याला कोणताच प्रश्न, अगदी ईश्वराच्या अस्तित्वाचा प्रश्नही चर्चेबाहेरचा असू शकत नाही.

या पत्राचे पहिले आठ परिच्छेद राजकुमारी अमृत कौर यांनी पाहिले आहेत. त्याचा आशय त्या नेहरूंना सांगणार होत्या. नेहरूंच्या हस्ते हे पत्र मी आपणास पोचते करावे असे ठरले होते. पण मी दिल्लीत असताना पत्र पूर्ण झाले नाही. ते मी आगगाडीतच पूर्ण करीत आहे.

आपण व लेडी माउंटबॅटन दीर्घ परिश्रमानंतर लाभलेल्या विश्रान्तीचा आनंद उपभोगत असाल अशी आशा करतो.

आपला,

मो. क. गांधी

फाळणीच्या मामल्यातून ब्रिटिशांना बाहेर काढण्याचा गांधींनी आणखी एक प्रयत्न करून पाहिला. फाळणीच्या सूचनेमुळे बंगालमध्ये खूप प्रक्षोभ निर्माण झाला होता. भारताची फाळणीच करावयाची तर बंगालचे दोन तुकडे करावेत म्हणजे हिंदूंची बहुसंख्या असलेल्या भागाला भारतात राहता येईल या बाजूने लोकमत आधीच तयार झाले होते. बंगालचे मुख्यमंत्री श्री. सुऱ्हावर्दी यांनी एक नवीन योजना पुढे मांडली. पूर्व व पश्चिम बंगाल मिळून एक वेगळेच राष्ट्र करावे, अशी ती योजना होती. गांधींनी ही योजनाही काळजीपूर्वक तपासली. तीत त्यांना थोडी आशा दिसली. सुऱ्हावर्दी खरेच मनापासून ही योजना मांडत असले तर त्यांना विधिमंडळातील हिंदू सभासदांची मनेही वळवावी लागणार होती. तसे करण्यापूर्वी दंगली थांबवणे भाग पडेल व एका दृष्टीने लीगच्या द्विराष्ट्रवादाला चांगलीच धडक मिळेल, असे गांधींना वाटले.

परंतु ही योजना यशस्वी झाली नाही. सुऱ्हावर्दींना 'सर्व संमती'ने स्वतंत्र बंगाल स्थापावयाचा आहे याचा अर्थ गांधींनी असा केला की, प्रथम हिंदू व मुस्लिम आमदार व मंत्रिमंडळ स्वतंत्ररीत्या स्वतंत्र बंगालच्या बाजूने आपला कौल देतील व मग स्वतंत्र बंगाल अस्तित्वात येईल. सुऱ्हावर्दींना हा अर्थ मुळीच अभिप्रेत नव्हता. हा सर्व इतिहास अधिक सविस्तरपणे प्रस्तुत लेखकाच्याच 'माय डेज् वुइथ गांधी' ( १९५३, पृ. २२७–२३७ ) या पुस्तकात दिलेला आहे.

## गांधी व काँग्रेस पुढारी

माउंटबॅटन यांची योजना नेहरू व इतर पुढाऱ्यांना पटल्यानंतर ( तिचा स्वीकार करण्याआधी ) ते गांधींचा सल्ला घेण्यासाठी गेले नसतीलच असे नाही. फाळणी हे भारतीय पेच-प्रश्नाचे अगदी समाधानकारक उत्तर असल्याचे आम्हाला मान्य नाही; तरी प्राप्त परिस्थितीत आम्ही ते स्वीकारीत आहोत अशी लेखी कबुली देण्यासाठी माउंटबॅटननी त्यांचे मन वळवले होते. अशी स्वीकृती दिल्यानंतर असेही ठरले होते की, नेहरू व पटेल यांनी मिळून ही गोष्ट वर्किंग कमिटीच्या इतर सभासदांच्या गळी उतरवावी (कँपबेल-जॉन्सन, १९५७, पृ. १००). ही २ जून १९४७ ची गोष्ट. दुसऱ्याच दिवशी काँग्रेस अध्यक्ष आचार्य कृपलानींनी व्हाइसरॉयना कळवून टाकले की, वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांना ही योजना साधारणपणे मान्य आहे.

नेहरूंच्या म्हणण्याप्रमाणे या स्वीकृतीमुळे निदान "युद्ध" तरी थांबणार होते. उलट गांधींच्या मते त्यामुळे युद्धाला खरी सुरुवात होण्याचीच शक्यता जास्त होती. एक घरगुती व अंतर्गत प्रश्न फाळणीमुळे आंतरराष्ट्रीय बनणार होता. त्यामुळे कोणत्याही राष्ट्राला त्यात वाटेल तसे नाक खुपसता येणार होते. त्यामुळे गांधींचा सल्ला असाच

असण्याची शक्यता होती की, कॉंग्रेसने धीर सोडू नये. स्वतः ते नोआखलीत जे काय करीत होते, आणि नंतर विहार व पंजाबमध्ये जाऊनही जे कार्य करण्याची त्यांची इच्छा होती, तेच कार्य कॉंग्रेसनेही करावे अशीच त्यांची इच्छा असणे स्वाभाविक होते. काही ठिकाणी तटबंदीला भगदाडे पडली असली तर प्रथम ती भरून काढायला हवी होती व नंतर, भविष्यकाळात, स्वातंत्र्ययुद्धाला पुन्हा वेगळ्याच आघाडीवर सुरुवात करणे आवश्यक होते.

परंतु कॉंग्रेस पुढाऱ्यांना एवढी आशा आणि धीर नव्हता. त्यांना अशी भीती वाटत असावी की, सद्यःस्थितीत सविनय कायदेभंगाची चळवळ जातीय विद्वेषाच्या वणव्यात सापडेल. त्या गोंधळातून व अराजकातून पुन्हा शांतता व सुव्यवस्था कशी प्रस्थापित करता येईल हे त्यांना स्पष्ट होत नव्हते. गांधींनी याला कदाचित असे उत्तर दिले असते की, वास्तविक हिंदुस्थानने स्वातंत्र्याची किंमत चुकवण्याइतके कष्ट व त्याग अजून केलेलाच नाही. जर्मनांनी युद्धाच्या आरंभी मारलेल्या मुसंडीपुढे इंग्लंड प्रथम मागे हटले, त्याने स्वतःची नीट तयारी केली व मग आक्रमक पवित्रा घेतला. त्याचप्रमाणे प्राप्त परिस्थितीत माघार घेऊन नवे मोर्चे बांधावेत आणि समाधानकारक तयारी झाल्यावर योग्य प्रकारची कायदेभंगाची चळवळ हाती घ्यावी असे गांधी म्हणाले असते. नोआखलीत आपण नेमके हेच करीत आहोत असे गांधी बहुधा म्हणाले असते. आज मुस्लिम जनता तीव्रतेने शत्रुत्व करीत असली तर योग्य प्रकारे त्या जनतेची सेवा करून तिचे शत्रुत्व संपुष्टात आणता येईल व भविष्यकाळातील चढाईच्या वेळी तिचा अडथळा होणार नाही अशी दक्षता घेता येईल. खरोखर नोआखली किंवा बिहार दोन्ही टिकाणी गांधी एकाकीपणे नेमके याचसाठी प्रयत्नांची शर्थ करीत होते.

परंतु आता आपण ज्या काळाचा विचार करीत आहोत त्या वेळेपर्यंत कॉंग्रेसने सामूहिक चळवळीचे साधन म्हणून अहिंसेला फाटा दिला होता असे म्हटले तरी चालेल. १९३७ पासूनच कॉंग्रेसचे राजकारण दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात लिबरल किंवा मवाळ वळणाने जाऊ लागले होते. त्यात अधूनमधून किरकोळ चळवळी व सततच्या वाटाघाटी यांची भर होती इतकेच. परंतु आता मात्र मुस्लिम लीगचे राजकीय डावपेच व ब्रिटिश साम्राज्यशाहीने घेतलेले पवित्रे यामुळे कॉंग्रेस कोंडीत सापडली होती.

अशा काहीशा असहाय्य अवस्थेत कॉंग्रेस नेते आपल्या निर्णयास गांधींची मान्यता मिळविण्यासाठी अखेरीस त्यांच्याकडे आले असावेत. गांधींच्या चाणाक्ष बुद्धीला ते आवाहन करीत नव्हते. त्यांचे आवाहन गांधींच्या करुणेला होते.

कॉंग्रेस वर्किंग कमिटीने देशाच्या फाळणीची योजना १२–१६ जून १९४७ च्या दरम्यान मान्य केली. १४–१५ जूनला अ. भा. कॉंग्रेस कमिटीची बैठक बोलावून तीत

हा ठराव बहुमताने संमत करून घेण्यात आला. त्या प्रसंगी निरनिराळ्या पुढाऱ्यांनी केलेल्या भाषणांतील उतारे उद्धृत करणे या संदर्भात उद्बोधक ठरेल.

काग्रसचे अध्यक्ष कृपलानी म्हणाले, ' आज मला असे वाटत आहे की, त्यांचे— सत्रेस्वी निर्भय गांधींचे— म्हणणे बरोबर असून माझीच भूमिका चुकीची आहे. पण मग मी त्यांच्याबरोबर कसा नाही ? याचे कारण असे की, त्यांनाही अजून जनसंमर्दाच्या पातळीवर हा प्रश्न सोडविण्याचा मार्ग सापडलेला नाही असे मला वाटते... ते म्हणतात की, साऱ्या भारताच्या वतीने हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रश्न ते बिहारमध्ये सोडवीत आहेत. तसे असेलही. पण त्यांच्या कार्यातून हिंदू-मुस्लिम ऐक्य कसे निर्माण होत आहे ते उमगत नाही. अहिंसक असहकाराच्या वेळी दिसत होते तसे अंतिम उद्दिष्टाप्रत घेऊन जाणारे निश्चित टप्पे तर आज मुळीच दिसत नाहीत. शिवाय, दुर्दैवाने, गांधीजी धोरणे आखून देऊ शकत असले तरी ती धोरणे प्रामुख्याने दुसऱ्यांनीच अमलात आणायची आहेत; आणि आज तरी हे दुसरे लोक त्यांच्या विचारसरणीशी सहमत नाहीत ' ( इं. ॲ. र., १९४७, I, पृ. १२५ ).

गोविंद वल्लभ पंत म्हणाले, ' ऐक्य टिकविण्याचा काँग्रेसने आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्या प्रयत्नांनाही मर्यादा होतीच. त्यापलीकडे जाणे शक्य नव्हते. जून ३ ची योजना मान्य करणे किंवा आत्मघात करून घेणे या दोनच पर्यायांतून निवड करावयाची होती. इच्छा नसताना ( मुसलमान ) लोकांना संघराज्यात एकत्र राखण्यात शक्ती फुकट घालवण्यापेक्षा जून ३ ची योजना मान्य करणे आम्हाला जास्त योग्य वाटले ' ( किता, पृ. १२९ ).

अबुल कलम आझाद म्हणाले की, ' गोविंद वल्लभ पंतांच्या मताशी न सहमत नव्हते. त्यांच्या मते जून ३ च्या योजनेपेक्षा कॅबिनेट मिशनची योजना जास्त चांगली होती. ते नेहमीच असे म्हणत आले होते की, मे १६ ची योजनाच आपल्या प्रश्नावरील सर्वोत्तम तोडगा आहे.* त्यांचे अजूनही तसेच मत होते. ' ते पुढे असेही म्हणाले की, ' आताचा निर्णय बरोबर नव्हता; पण काँग्रेसपुढे दुसरा पर्याय नव्हता. काँग्रेसपुढे एक योजना स्वीकारायची व दुसरी नाकारायची असा पर्याय नव्हता. आजची अत्यंत अनिश्चितता व घरंगळ तशीच राहू द्यावयाची काय असा तिच्यापुढील खरा प्रश्न होता. त्यातच दुर्दैवाने देशात अव्यवस्था व दंगल माजली होती, ती कशी थांबवावयाची ही दुर्दैवी समस्या होती. मुस्लिम लीगचा आडमुठेपणा काहीही करण्याच्या आड येत होता. या सर्व गोष्टी विचारात घेतल्यावर प्रश्न तातडीने निकालात काढला पाहिजे या निर्णयावर वर्किंग कमिटी आली होती व तिने ३ जूनची योजना स्वीकारली होती. ' आपल्या

* पाहा, आझाद, १९५९, पृ. १४२-१४५.

भाषणाच्या शेवटी ते म्हणाले, ' ही फाळणी केवळ हिंदुस्थानच्या नकाशाची फाळणी असून, भारतीयांची मने एकात्म भारताशीच एकनिष्ठ आहेत. ही फाळणी अल्पायुषी ठरेल, याची मला खात्री आहे ' ( किस्ता, पृ. १२९-१३० ).

पाकिस्तानच्या कल्पनेविरुद्ध लढलेल्या पठाणांचा व राष्ट्रीय मुसलमानांचा काँग्रेस विश्वासघात करीत आहे याचे आपणास फार वाईट वाटते, असे अब्दुल घनी म्हणाले. पंजाब किंवा बंगालमध्ये सार्वमताची मागणी का केली गेली नाही अशीही त्यांनी पृच्छा केली. त्यांना एक वेळ यादवी युद्ध चालले असते पण प्रश्नाच्या अन्याय्य सोडवणुकीला त्यांची तयारी नव्हती. शेवटी ते म्हणाले, ' जीनांच्या, व त्यांच्याबरोबरच हिंदुस्थान हिंदूंचा व पाकिस्तान मुसलमानांचा असे म्हणणाऱ्यांच्या पदरात जय टाकू नका. अशाने आपल्या घरातच तुम्ही असंख्य परके निर्माण करून ठेवाल ' ( किस्ता, पृ. १३१ ).

पुरुषोत्तमदास टंडन यांनी असा शेरा मारला, ' काँग्रेस वर्किंग कमिटीने ही योजना आत्यंतिक निराशेतून व दुबळेपणापोटी स्वीकारली होती. त्याच वेळी ही राष्ट्रे भविष्यात एक होतील अशी आशा ते व्यक्त करीत होते. हा अप्रामाणिकपणा होता. त्यांनी पूर्वी ब्रिटिशांचा प्रतिकार केलेला होता आणि तसा तो पुन्हा करता येणार होता. " कोणावर सक्ती न करण्या "च्या आपल्या धोरणापासून काँग्रेस मागे येऊ शकत नाही असे ही योजना स्वीकारणाऱ्यांचे म्हणणे होते. तर मग जी संस्थाने स्वतंत्र होऊ इच्छित होती त्यांचे ते काय करणार होते ? किंवा मुसलमान बहुसंख्य असलेले अनेक छोटे मोठे प्रदेश पाकिस्तानात जाण्याची इच्छा करतील, त्यांचे ते काय करणार होते ? ' इतके बोलून टंडनजींनी, काँग्रेस महासमितीने ही योजना अजिबात फेटाळून लावावी, असे सुचविले.

जवाहरलाल नेहरूंचे भाषण पुढीलप्रमाणे होते : ' एकंदर परिस्थिती अशी होती की, देशातील शासनव्यवस्था कोलमडली होती. सुव्यवस्था निर्माण करू शकेल अशी कोणतीच अधिसत्ता देशात राहिलेली नव्हती... जेथे ब्रिटिश अधिकारी मुखत्यार होते तेथे सर्वांत जास्त दंगली होत होत्या. त्यामानाने हिंदू किंवा मुसलमान अधिकाऱ्यांच्या हाताखालील प्रदेशांत तुलनेने शांतता होती. लोकांचे जीवितवित्त रक्षिण्याच्या दृष्टीने हंगामी सरकार काही करू शकत नव्हते. अराजक व गोंधळाच्या दिशेने झपाट्याने होत असलेली वाटचाल थोपविणे हे सर्वांत निकडीचे काम होते... सामर्थ्यवान केंद्रीय सरकार स्थापून देशाचे खंबीर शासन करणे, नागरिकांना जीवितस्वातंत्र्याची हमी देणे हे पहिले कर्तव्य होते. बाकी सर्व प्रश्न गौण होते... ' भाषणाच्या शेवटी ते म्हणाले, ' भारतीयांची मने आज भंगली आहेत. पण भारताची मूलभूत एकता नष्ट झालेली नाही. ही भंगलेली मने आपण कशी सांधणार आहोत ? फाळणीची योजना स्वीकारूनच फक्त हा दुरावा दूर करता येणार आहे ' ( किस्ता, पृ. १३३ ).

वल्लभभाई पटेल म्हणाले, ' १६ मेच्या योजनेत एक खोच होती. कोणत्याही एका पक्षाने सहकार्य देण्याचे नाकारले तरी ती योजना अंमलात येणार नव्हती. ती श्वेतपत्रिका म्हणजे लवादाने लादलेला निर्णय होता... हिंदुस्थानची फाळणी कोणालाच आवडणारी नाही. फाळणी होणार याचे त्यांनाही अत्यंत दुःख होते. पण विदारक वास्तवाची दखल सर्वांनी घ्यायला हवी होती. आजची त्यांची लढाई ब्रिटिशांशी नव्हती... या देशावर राज्य करण्याची आता त्यांची मुळीच इच्छा नव्हती. हिंदुस्थान स्वतंत्र होण्याची ही संधी होती. जवळजवळ तीन-चतुर्थांश भारताचा विकास करून घेण्याची त्यांना संधी मिळणार होती. ते स्वातंत्र्यासाठी झगडले होते आणि देशाचा जास्तीत जास्त मोठा भाग स्वतंत्र व समर्थ करणे हे त्यांचे काम होते... ही संधी ते गमावणार होते का? वर्किंग कमिटीने घेतलेल्या निर्णयाखेरीज इतर निर्णय घेणे अपायकारक तर होतेच पण त्यामुळे सर्व जगात काँग्रेसचे हसे होणार होते' (इं. ॲ. र., १९४७, I, पृ. १३५–१३६).

गांधींच्या जीवनातील हा एक नाजूक व निर्णायक क्षण होता. गेली पंचवीस वर्षे काँग्रेस संघटनेच्या माध्यमाद्वारे त्यांनी देशाचे राजकीय नेतृत्व केले होते. त्या नेतृत्वाचे तीन-तेरा वाजण्याची वेळ आली होती.

काँग्रेसमधील काँग्रेस-समाजवादी पक्षाला हाताशी धरून वेगळा मार्ग चोखाळणे हा एक उपाय होता. आपल्या नेतृत्वाचे नवे माध्यम म्हणून गांधींना त्या पक्षाचा उपयोग करून घेता आला असता. तसे करणे नैतिकदृष्ट्या चूक ठरले नसते. कारण हा पक्ष काँग्रेसच्या पोटात वाढलेला होता. पण त्यासाठी समाजवादी पक्षाने, एक तर त्यांच्या अहिंसक तत्त्वज्ञानाचा अंगीकार करणे आवश्यक होते, किंवा निदान गांधी नेतेपदी असेपर्यंत तरी अहिंसेच्या शिस्तीत राहणे आवश्यक होते. तशी शक्यता फारच कमी होती. समाजवाद्यांचे मन हिंसा की अहिंसा यांमध्ये हेलकावत होते हे तर एक कारण होतेच; पण काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते गांधींना पूर्ण कृतिस्वातंत्र्य देणार नाहीत अशीही त्यांची भावना झाली असण्याची शक्यता होती.

असो. गांधी काय करू शकले असते त्याची गोष्ट आपण करीत आहोत. काँग्रेस महासमितीच्या त्या निर्णायक बैठकीत गांधींनी प्रत्यक्षात काय भूमिका घेतली ते पुढे निवेदन करीत आहे.

काँग्रेस पुढाऱ्यांचा असहायपणा गांधींना जाणवला. त्यांची भूमिका खरी करायची तर सत्याग्रहाचे साहस करणे हा एकच पर्याय त्यांना शिल्लक होता. त्या सत्याग्रहाचे स्वरूप काय असावे हे त्या वेळच्या लोकांच्या मनाच्या राजकीय कलावर अवलंबून राहिले असते. प्राथमिक तयारी म्हणून एखादा ठसठशीत रचनात्मक कार्यक्रम घ्यायचा आणि मग लागलीच एक तीव्र सत्याग्रह मोहीम करायची असे करता आले असते. पण

एक गोष्ट मात्र खरी की, हा कार्यक्रम पूर्णपणे अहिंसक असणे आवश्यक होते. काँग्रेसच्या हाती राजकारणाची सूत्रे परत घेणे हे उद्दिष्ट त्यातून साध्य व्हावयास हवे होते. त्या वेळेप्रमाणे मुस्लिम लीग, वा ब्रिटिश, वा दोघांच्या हाती संयुक्तपणे राजकारणाची सूत्रे जाऊ देऊन चालणार नव्हते.

अहिंसेच्या मार्गावर आपण सर्वस्वी एकाकी आहोत असे त्या दिवसांत गांधींना वाटू लागले होते. नेहरू, पटेल आदी गांधींच्या जुन्या सहकाऱ्यांप्रमाणेच फाळणीला विरोध असणाऱ्यांचाही अहिंसेवर वेताचाच विश्वास होता. त्यामुळेच बहुधा फाळणीस विरोध करणाऱ्या नव्या अनुयायांना उचलून धरण्याऐवजी ज्येष्ठांनाच पाठिंबा देणे बरे असे गांधींना वाटले असावे. निदान या जुन्या सहकाऱ्यांना त्यांचा मार्ग जास्त सवयीचा तरी होता. त्यामुळे पुन्हा कधी प्रभाव पाडून त्यांना अहिंसेकडे वळवणे सोपे जाण्याची शक्यता होती. इतरांच्या बाबतीत तशी खात्री नव्हती.

अशा प्रकारे गांधी या वेळी आपल्या संपूर्ण राजकीय आयुष्यातला एक अत्यंत विलक्षण निर्णय घेण्यास प्रवृत्त झाले. आपले स्थान व अधिकार यांचा सर्वस्वी हविर्भाग देऊन स्वतःच्या हाताखाली लहानाचे मोठे झालेल्या काँग्रेस पुढाऱ्यांना, त्यांना त्यांच्या बुद्धीप्रमाणे स्वतंत्र मार्गाने जाण्याचे स्वातंत्र्य त्यांनी दिले. सामूहिक क्षेत्रात अहिंसेचे उपयोजन करण्याची योग्य वेळ येईतो ते शांतपणे वाट पाहणार होते. ती संधी घेता यावी म्हणून दरम्यान ते स्वतःची व समाजाची तयारी करणार होते. केवळ औपचारिक राजकीय स्वातंत्र्याने आपले बहुतेक महत्त्वाचे प्रश्न सोडविले जाऊ शकत नाहीत हे भान झाल्यावर जनतेची जी उत्तरोत्तर घोर निराशा होणार होती त्या निराशेतून अहिंसक कृतीसाठी योग्य असे वातावरण निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. सार्वत्रिक जन-आंदोलनासाठी अनुकूल परिस्थिती ऑर्डर देऊन निर्माण करविता येत नाही. शांतपणे धीर राखून वाट पाहणे आवश्यक होते. अखेरीस गांधींनी स्वतःपुरता असा निर्णय घेतला.

१४ जून १९४७ रोजी भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीपुढे बोलताना गांधी म्हणाले, ' अ. भा. काँग्रेस कमिटीला कार्यकारिणीने केलेला ठराव मान्य करण्याचा किंवा फेटाळण्याचा हक्क होता. पण या विशिष्ट प्रसंगी काँग्रेस कमिटीने या ठरावाला दुरुस्त्या वगैरे सुचवून फाटे फोडू नयेत असा त्यांचा सल्ला राहील. फाळणीची योजना स्वीकारल्यास काँग्रेसची हानी होईल असे अ. भा. काँग्रेस महासमितीला तीव्रतेने वाटत असेल तर तिला हा ठराव फेटाळून आपली जुनी भूमिका घेता येणार होती. हा ठराव महासमितीने फेटाळला तर महासमितीला आजचे नेतृत्व बाजूला सारून नवे नेते निवडावे लागणार होते. नवी काँग्रेस वर्किंग कमिटी निवडूनच भागणार नव्हते, तर सरकारात जाण्यासाठीही नवे नेते निवडावे लागणार होते. ठरावाच्या विरोधकांच्या हाताशी नेत्यांचा असा नवा संच असेल तर मग महासमिती तिची इच्छा असल्यास हा ठराव फेटाळू शकत होती.

सध्या कार्यकारिणीत असलेली माणसे जुनी व कसलेली होती. आतापर्यंत काँग्रेसने जे मिळवले होते ते सर्व या जुन्या पुढाऱ्यांचे कर्तृत्व होते. खरोखर ही माणसे काँग्रेसचा कणा होती. अशा परिस्थितीत आजच्या आणीबाणीच्या प्रसंगी त्यांना काढून टाकणे जवळपास अशक्य होते; आणि शक्य असले तरी ते कृत्य अविचाराचे होणार होते... कधीकधी चुकीच्या गोष्टींतूनही चांगले निपजते. प्रभू रामचंद्राला त्याच्या पित्याच्या चुकीमुळे वनवासात जावे लागले होते. पण त्या वनवासातून दुष्ट रावणाचे, म्हणजे जगातील अनिष्टाचे पारिपत्य साधले... त्यांना अशी आशा होती की, ज्याप्रमाणे मातीतून सोने काढतात त्याप्रमाणे, ही काँग्रेस कमिटी या सदोष योजनेतून काही तरी चांगले काढण्याइतकी ताकदवान ठरेल. काँग्रेसचा पाकिस्तानला विरोध होता. आणि देशाच्या फाळणीला सातत्याने दृढपणे विरोध करणाऱ्यांपैकीच ते एक होते. तरी ते देखील अ. भा. काँग्रेस कमिटीने हा ठराव स्वीकारावा असेच विनविण्यासाठी उभे होते ' ( कित्ता, पृ. १२६–१२७ ).

आणि अशा रीतीने शेवटी हिंदुस्थानची फाळणी झाली.

## एकाकी प्रवास

काँग्रेस पुढाऱ्यांनी अखेरीस घेतलेल्या निर्णयाबद्दल ( या निर्णयाच्या जबाबदारीतला आपला वाटा ते नाकारीत होते हे उघड दिसते ) गांधींनी काँग्रेसच्या वरील ऐतिहासिक बैठकीनंतर थोड्याच दिवसांत असे म्हटले, ' बंदूक छातीवर रोखली गेल्यामुळेच केवळ हिंदुस्थानने फाळणी पत्करली असे म्हणणे गैर होणार नाही. ' मुस्लिम लीग व जीना यांनी बजावलेल्या भूमिकेच्या संदर्भात गांधीजी म्हणाले, ' काँग्रेस व शीख यांना हिंदुस्थानच्या फाळणीला मान्यता देण्यास भाग पाडण्याचे काम लीगने केले. जी गोष्ट मुळात वाईट आहे तिला संबंधित पक्षांनी मान्यता दिली म्हणून काही ती चांगली ठरत नाही, मग मान्यता देण्याची प्रत्येकाची कारणे भिन्न का असेनात. जीनांना जेवढे हवे तेवढे मिळाले नाही यातही आपण समाधान मानण्यासारखे काही नाही. त्यांना एक सार्वभौम राज्यसत्ता हवी होती. ते त्यांचे उद्दिष्ट पूर्णपणे सफल झाले आहे ' ( बोस, १९५३, पृ. २४६–२४७ ). ब्रिटिशांच्या संदर्भात एका संध्याकाळी ते म्हणाले, ' माणसाला स्वतःची फसवणूक करण्याची कला उत्तम अवगत असते. या बाबतीत इंग्रजांचा नंबर पहिला. राजकीय व आर्थिक कारणांनी यापुढे हिंदुस्थानला दास्यात ठेवणे चुकीचे ठरणार आहे याचा त्यांना शोध लागला म्हणून ब्रिटिश येथून जात आहेत. त्यांचे जाणे म्हणूनच प्रामाणिक आहे. माणूस प्रामाणिक राहूनही आत्मवंचना करू शकतो हे मान्य व्हावे. आपण सोडून गेल्यानंतर भारताच्या लेखी अराजक वाढून

ठेवलेले असेल तर अराजकाचा धोका ठेवून आपण भारत सोडू शकत नाही या त्यांच्या समजुतीत आत्मवंचना आहे. दोन संघटित सैन्यांच्या लढाईचे हिंदुस्थान हे रणक्षेत्र बनवून जायला मात्र त्यांना कोणतीच खंत वाटत नाही. एका जमातीच्या लोकांना दुसऱ्या जमातीच्या लोकांविरुद्ध लढविण्याच्या धोरणावर शिक्कामोर्तब करून मग इंग्रज परत चालला आहे' (**किस्ता**, पृ. २४८).

काँग्रेस पुढाऱ्यांबद्दल त्यांचे असे मत होते: 'पुढाऱ्यांनी अगदी शेवटचा उपाय म्हणून फाळणीचा स्वीकार केला. आपण चूक करीत आहोत असे त्यांना वाटत नव्हते. सर्व देश दंगलीच्या खायीत लोटण्यापेक्षा फाळणी बरी असे त्यांना वाटले. फाळणी पत्करून देशाला अत्यंत आवश्यक असलेली शांतता व स्थैर्य आपण मिळवून देत आहोत अशी त्यांची आशा होती.'

आणि शेवटी गांधींनी आपली वैयक्तिक भूमिका मांडली: 'त्यांचे मत अगदीच वेगळे होते. सर्व देशाची राखरांगोळी झाली तरी चालेल पण हिंसेपुढे एक इंचभर-सुद्धा नमणे नको असे त्यांचे मत त्यांनी सांगितले होते.' अहिंसा ही त्यांची जीवन-निष्ठा होती. काँग्रेसच्या दृष्टीने ती फक्त एक धोरणाची म्हणून गरज वाटेल तेव्हा बाजूला सारण्याची बाब होती. काँग्रेसप्रणीत भारतीय स्वातंत्र्याचा लढा अहिंसे-वरील निष्ठेवर आधारलेला आहे असे मानण्यात आपली चूक झाली हे त्यांनी कबूल केले. ते म्हणतात, 'माझी समजूत होती की आपला लढा अहिंसेवर आधारलेला आहे. परंतु प्रत्यक्षात तो एक केवळ निःशस्त्र प्रतिकार होता. निःशस्त्र प्रतिकार हे मूलतः दुबळ्यांचे शस्त्र आहे. जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा तेव्हा त्याची स्वाभाविक परिणती सशस्त्र प्रतिकारात होते' (**हरिजन**, खं. ११, पृ. २५३).

अ. भा. काँग्रेस कमिटीच्या १४ जूनच्या सभेमध्ये गांधींनी स्वतःच्या भावना दडपून टाकल्या होत्या तरी त्यांचे मन निष्क्रीय नव्हते. नंतरही ते फाळणी रद्द करण्या-साठी निरनिराळे उपाय सुचवीत होते. मात्र या पुढच्या काळात त्यांचे आवाहन पुढाऱ्यांना नसून प्रत्यक्ष भारतीय जनतेला होते.

वरील बैठकीच्या दुसऱ्याच दिवशी, म्हणजे १५ जून रोजी ते म्हणाले, 'देशातील हिंदू, मुसलमान, शीख व इतर जमातींचे लोक अजूनही एकत्र येऊन व्हाइसरॉयची ३ जूनची योजना मोडीत काढू शकतील. काँग्रेस व लीग यांमधील समझोत्याची त्यात केवळ नोंद केलेली आहे. हा समझोताही वास्तविक पाहता त्या दोन्ही पक्षांना आवडलेला नाही. आपल्याला देशाचे विभाजन पसंत नाही हे काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. पंजाब व बंगालची फाळणी व्हावयाची असल्यामुळे कायदे-आझम जीनांनाही त्या योजनेबद्दल फारसा उत्साह राहिलेला नाही. कोणत्याही बाजूने पाहिले तरी मला असे वाटते की, सभोवार पसरलेल्या दाट अंधारातून मार्ग काढण्याचा

एकच उपाय आहे, तो म्हणजे सर्व पक्षांनी एकत्र येऊन आणखी संघर्ष आणि रक्तपात थांबेल अशी एक योजना आखावी ' ( **हरिजन**, खं. ११, पृ. २०३-२०४ ).

फाळणीविरुद्धच्या मोहिमेचे नेतृत्व करावे असे एका पत्रकाराने त्यांना सुचविले. त्यावर त्यांनी उत्तर दिले, ' लोकमतच त्यांच्याविरुद्ध होते, तर त्यांनी काय लोकांवर सक्ती करायची होती ?... इतकी उघड असूनही ही गोष्ट पत्रलेखकाला कशी दिसत नव्हती ? सारा देश, निदान त्यातला शिक्षित, जागृत वर्ग फाळणीच्या बाजूने होता. निदान सर्व मुस्लिमेतर जनता जरी त्यांच्या मागे असती तरी फाळणी रद्द करून घेण्याचा काही मार्ग काढता आला असता, असे म्हणण्याचे ते धाडस करायला तयार होते.... परंतु आज ते एक " गयाबीता " पुढारी बनले होते, किंवा तसे मानले जात होते ही गोष्ट निःसंकोचपणे मान्य करायला त्यांची तयारी होती ' ( **हरिजन**, खंड ९, पृ. २०२ ).

अशाच एका अत्यंत निराशेच्या क्षणी त्यांनी अहिंसेच्या दृष्टिकोणातून सर्वोच्च अशी एक उपाययोजनाही सुचविली. अर्थात ही सूचना प्रत्यक्षात अंमलात येणे अशक्य आहे हे त्यांनी तात्काळ ओळखले. १३ जुलै १९४७ रोजी ते म्हणाले, ' मुस्लिम लीग आणि काँग्रेस यांनी एकत्र येऊन व्हाइसरॉयच्या मध्यस्थीशिवाय निर्णय घेण्याचा एक सहज व सोपा उपाय आहे. या बाबतीत लीगने पुढाकार घ्यायला हवा. पाकिस्तानची निर्मिती थांबवावी असे मी मुळीच म्हणत नाही. ती गोष्ट वादातीत आहे असेच आपण समजू या. एकमत झाल्याशिवाय बाहेर पडावयाचे नाही असे ठरवून सर्वजण– दहापेक्षा जास्त प्रतिनिधी नकोत– एका झोपडीत स्वतःस कोंडून घेऊ शकतील. मी असे म्हणण्याचे धाष्टर्य करतो की, हिंदुस्थानचे तुकडे करून दोन सारख्या दर्जाची राष्ट्रे निर्माण करून स्वातंत्र्य बहाल करणाऱ्या ब्रिटिश पार्लमेंटपुढील बिलापेक्षा असे काही घडले तर ते अगणित पटीने अधिक चांगले होईल... पण— आणि हा पण लहानसहान नाही—मी अशक्य कोटीतील गोष्टच बोलत आहे असे दिसते. ब्रिटिश हस्तक्षेपाने डाव साधल्यावर आता मुस्लिम लीग प्रतिस्पर्ध्याकडे येईल आणि भावाभावांमध्ये किंवा मित्रांमध्ये व्हावा तसा सर्वसंमत समझोता करील अशी अपेक्षा कशी बाळगता येईल ? ' ( हरिजन, खं. ११, पृ. २४१ ).

त्यानंतर गांधीजींनी पुन्हा एक असाच हताश प्रयत्न केला. या वेळी भारतीय जनतेला त्यांनी आवाहन केले : ' स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेले अगणित हिंदू व त्यांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून लढ्यात उतरलेले इतरेजन धोका डोळसपणे पाहतील का ? आम्हाला नव्या राष्ट्रात सैन्य नको किंवा निदान संघराज्यातील किंवा पाकिस्तानमधील आमच्या मुस्लिम बांधवांविरुद्ध ते आम्ही कधी वापरणार नाही असे शपथेवर सांगण्याइतके ते मनाने मोठे बनतील का ? हिंदू व त्यांचे सहकारी यांनी दाखवलेल्या गेल्या तीस वर्षांच्या दुबळेपणाचे सुंदर अशा सामर्थ्यात रूपांतर करायला

मी त्यांना ( या सूचनेद्वारा ) सांगत आहे. प्रश्नाची अशी मांडणी करण्यातच, कदाचित, त्याची वैय्यर्थता उघड करून दाखविण्यासारखे आहे. पण मानवी मूर्खपणाचे रूपांतर ईश्वरकृपेने शहाणपणात होते ही गोष्ट याआधीही कदाचित घडल्याचे माहीत असेल. परस्परांशी तंटा करून आत्मनाश करून घेण्यास सिद्ध असलेल्या दोन फळ्यांमध्ये सैन्याची अत्यंत धोकेबाज विभागणी करण्यास अनुमती दिलेल्या सर्व पक्षांच्या भल्यासाठी हा प्रयत्न करून पाहण्यासारखा आहे ' ( किन्ता, पृ. २४१–२४२ ).

## १५ ऑगस्ट, १९४७

हिंदुस्थानची फाळणी अजून व्हायचीच होती. त्याआधी एक आठवडा गांधी पुन्हा बंगालमध्ये गेले. अर्धवट बुजलेल्या जखमांची मलमपट्टी करण्याचे काम करण्यासाठी ते परत आले होते.

१५ ऑगस्टच्या विशेष प्रसंगी रेडिओवरून प्रसारित करण्यासाठी त्यांचा संदेश मागायला भारत सरकारचा एक प्रसिद्धी अधिकारी गांधींकडे आला. ' देण्यासारखा कोणताच संदेश आपल्यापाशी नाही, अंतःकरण पार सुकून गेलेय, ' अशा तिखट शब्दांत त्यांनी त्या अधिकाऱ्यास वाटेला लावले. ११ ऑगस्टला बी. बी. सी. चा प्रतिनिधी वरील कामासाठीच सोदपूर छावणीत त्यांच्याकडे आला होता. त्याचा निरोप घेऊन प्रस्तुत लेखक गांधींकडे गेला असता ते उत्तरले, ' हे लोक माझ्याकडे का येत आहेत ? त्यांना म्हणावे, जवाहरलाल नेहरूंकडे जा. ' हा निरोप प्रस्तुत लेखकाने जेव्हा त्या प्रतिनिधीला सांगितला तेव्हा तो म्हणाला की, ' साऱ्या हिंदुस्थानच्या वतीने महात्मा गांधींखेरीज दुसरा कोण बोलू शकतो ? ' त्याने पुढे असेही सांगितले की या संदेशाचे अनेक भाषांत भाषांतर होऊन तो सर्व जगभर प्रसारित करण्यात येईल. हे ऐकल्यावर गांधीजींनी एक लहानसे चिटोरे उचलले व त्यावर लिहिले, ' या मोहाला मी बळी पडता कामा नये. मला इंग्रजी येते हे त्यांनी विसरले पाहिजे. '

मुस्लिम लीग सरकारकडून ज्यांच्या हाती राज्यसूत्रे येणार होती ते पश्चिम बंगालचे मंत्री वरील प्रसंगाच्या आदल्याच दिवशी गांधींना भेटावयास आले होते. त्या वेळी गांधीजी उशीला रेलून पडले होते. १५ ऑगस्ट हा दिवस कसा साजरा करावा, याविषयी त्यांनी गांधींचा सल्ला विचारला. तेव्हा ते एकदम ताठ बसले व काही त्वेषाने म्हणाले, ' सर्वत्र आग भडकलीय, गोरगरीब अन्नवस्त्रावाचून मरताहेत... ही काय उत्सव करण्याची वेळ आहे ? ' आत्मशुद्धीसाठी उपोषण करा, प्रार्थना करा आणि चरख्याला—गोरगरीबांच्या कल्याणाला—वाहून घ्या, हाच आपला सल्ला असल्याचे त्यांनी सांगितले ( बोस १९५३, पृ. २५६ ).

हिंदुस्थान १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. बंगाल व पंजाबमधील विभाजनाच्या रेषा थोड्याच दिवसांत जाहीर करण्यात आल्या. आणि पिसाट हिंसेचे थैमान सुरू झाले. सुमारे १ कोटी लोक देशांतर करून दुसरीकडे राहावयास गेले. मानवी इतिहासात एवढी माणसे एकाच वेळी स्थलांतर करीत असल्याचे हे पहिलेच उदाहरण होते. या वेळी झालेल्या भीषण हत्याकांडात सुमारे ६ लक्ष माणसे ठार मारली गेली असावीत असा अंदाज आहे ( मेनन, १९५७, पृ. ४१७, ४३५ ).

देशाचे सैन्य व सारी शासनसंस्थाच हतबल झाली होती. या क्षणी सत्तेवर आरूढ झालेल्या राजकीय पक्षांनी गांधींची अहिंसा आचारातूनच नव्हे तर विचारातूनही झटकून टाकली होती.

असे भारताला स्वराज्य मिळाले.

## स्वातंत्र्यप्राप्तीनंतर

गांधी एकाकीपणे अहिंसेचा संदेश सांगत होते. त्यांची निष्ठा अधिक तेजस्वी झाल्यासारखी दिसत होती. जी अपयशे आली होती ती साधकांच्या—अहिंसा पालन करणाऱ्यांच्या—कमअस्सलपणाचा परिणाम होती. अहिंसा तत्त्वाचा तो दोष नव्हता ( हरिजन, खं. ११, पृ. २०५ ).

१५ ऑगस्टनंतर थोड्याच दिवसांनी कलकत्त्यामध्ये पुन्हा एकवार भयंकर जातीय दंगल उसळेल अशी चिन्हे दिसू लागली. गांधींच्या वैयक्तिक प्रभावामुळे १५ ऑगस्टपूर्वी काही काळ दंगल थोपविण्यात यश आले होते. परंतु सुमारे पंधरा दिवसांतच तिची चिन्हे पुन्हा दिसू लागली. दोन मुसलमान तरुण गांधींच्या डोळ्यांदेखत बॉम्बस्फोटात ठार झाले. दंगलीचा प्रसार होऊ नये म्हणून गांधींनी आमरण उपोषण आरंभले.

ही वार्ता ऐकताच बंगालचे गव्हर्नर श्री. राजगोपालाचारी ताबडतोब त्यांची भेट घेण्यासाठी आले. गांधींनी उपोषण मागे घ्यावे म्हणून त्यांची समजूत काढण्याचा बराच प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे असे होते की, दंगल शमविण्यासाठी नवे सरकारसुद्धा गांधींइतकेच कृतनिश्चयी आहे. परंतु सरकारला थोडी संधी मिळणे आवश्यक आहे. त्यावर गांधींनी विचारले, ' मग दरम्यानच्या काळात मी काय करू ? नागरिक म्हणून माझे काही कर्तव्य आहे की नाही ? '

त्यानंतर राजाजींनी एकदम एक सूक्ष्म पण तिरकस मुद्दा उपस्थित केला. त्यांनी असे सूचित केले की, हे उपोषण करण्यात गांधींचा अहंकार होता. काही दिवसांपूर्वी मिळालेल्या यशाची धुंदी गांधींना चढली होती आणि त्यांना असे वाटू लागले होते की, जनतेवरील आपल्या वैयक्तिक वजनामुळे आपण जे करू शकतो ते सरकारला करता येत

नाही. त्यावर गांधी काही क्षण स्तब्ध राहिले. नंतर शांतपणे म्हणाले की, अशा सूक्ष्म गर्वभावनेतून त्यांनी उपोषण सुरू केलेले नव्हते. कलकत्त्यातील सुजाण लोकांना जागृत करून त्यांना शांततेसाठी कार्यप्रवण करणे हा त्या उपोषणाचा हेतू होता. सत्प्रवृत्ती नेहमीच हेलकावे घेत असते. दुष्प्रवृत्तींचे नेमके याच्या उलट असते. जर त्यांचे उपोषण सज्जनांच्या हृदयाला भिडू शकत नसेल तर मरणे त्यांना अधिक पसंत होते. *

उपोषण सुरू झाले. थोड्याच दिवसांत अकल्पित गोष्टी घडून येऊ लागल्या. सर्वच जातीजमातींचे पुढारी क्रियाशील झाले व शांतता स्थापन झाली. मध्यंतरी गांधींच्या आवाहनाला साद देऊन सचिन मित्र व स्मृतीश बॅनर्जी यांसारखी काही तरुण मंडळी हृदयपरिवर्तन करून त्यांना शांत करण्याच्या उद्देशाने प्रक्षुब्ध मुसलमानांच्या गर्दीला सामोरी गेली. दोघेही सुरामारीने भयंकर जखमी झाले. तर त्यांचे दुसरे काही तरुण सहकारी फारशी इजा न होता गर्दीतून बाहेर पडू शकले. वरील दोघांच्या मृत्यूची वार्ता गांधींना कळताच त्यांना एक वेगळाच आनंद झाल्यासारखे दिसले : शांततेसाठी अत्युच्च मूल्य देणाऱ्या तरुणांचा भारतात अभाव नाही हेच त्या दोघांनी दाखवून दिले होते.

अशा रीतीने बंगालमध्ये शांतता प्रस्थापित झाल्यानंतर गांधींनी पंजाबकडे जाण्याचे ठरवले ( **मनू गांधी**, १९६२, पृ. १०७ ). पंजाबच्या वाटेवर असताना ते थोडा वेळ दिल्लीत थांबले होते. मात्र, स्वतंत्र भारताच्या पंतप्रधानांना गांधींनी पश्चिम पाकिस्तानात जाण्यात फार धोका आहे असे वाटले. शिवाय दिल्लीतही त्यांची उपस्थिती अत्यंत आवश्यक होती ( **किंत्त**, पृ. २५९ ).

असे दिवस जात राहिले.

दरम्यान पश्चिम पाकिस्तानातून अधिकाधिक निर्वासित येऊ लागले. तसे दिल्लीचे वातावरण फार स्फोटक बनले. दररोज प्रार्थनेनंतर गांधी आपल्या श्रोत्यांना नवभारताच्या निर्मितीसाठी स्वतःला वाहून घेण्याचे आवाहन करीत होते. एखाद्या साधुपुरुषाचे प्रवचन ऐकायला जातात तसे लोक गांधींच्या प्रार्थनासभांना येत होते. परंतु आता त्यांच्या आवाजातील मोहिनी संपल्यासारखी वाटत होती. स्वतःच पुढे होऊन एखादी गोष्ट करण्याची जनतेची सवय नाहीशी झाली होती; लोकांनी आपला सर्व भार आता सरकारवरच टाकला असल्याचे दिसत होते. शांतारक्षणासाठी स्वतः प्रयत्न करण्याऐवजी ' सैन्य हेच त्यांचे नवे दैवत बनले होते ' ( **किंत्त**, ७५ ).

स्वातंत्र्यपूर्व काळातील अहिंसापालनाचा परामर्श घेताना एक दिवस ते म्हणाले, ' ही अस्सल अहिंसा आहे असे मी दीर्घकाळ मानीत आलो. पुढे मला दिसून आले

---

* ' सत्याग्रहामधील उपोषणाचे स्थान ' यासाठी याच प्रकरणाला जोडलेले परिशिष्ट पाहा.

की, हिंदी लोकांनी पाळलेली अहिंसा म्हणजे केवळ दुर्बळांचा शस्त्रहीन प्रतिकार होता. हिंसा करण्याची इच्छा नव्हती असे नाही. हिंसा करण्याची हिंमत व कुवत त्यांच्यापाशी नव्हती. असे असल्यामुळेच, लक्षावधी नंग्या व भुकेल्या लोकांना अन्नवस्त्राचा पुरवठा करण्याचा तातडीने विचार करण्याऐवजी, आज हिंसा करण्याची मोकळीक मिळताच, हिंदुस्थानची ही दोन छकले एकमेकांचा गळा घोटण्यात दंग झाली आहेत ' ( हरिजन, खं. ११, पृ. २५१ ).

कित्येक वेळा गांधी अत्यंत अधीर होत. ' काँग्रेस पक्ष कारखानदारीकरणाच्या मोठमोठ्या योजना हाती घ्याव्यात या बाजूचा आहे असे दिसते. पिळून टाकणाऱ्या दारिद्र्यापासून या योजना लोकांना मुक्ती देतील असे त्यांना मुळीच वाटत नव्हते. गिरणीतून निघालेल्या कापडावर जसा त्यांचा विश्वास नव्हता तसाच गिरण-संस्कृतीवरही त्यांचा विश्वास नव्हता. राष्ट्राच्या खऱ्या स्वातंत्र्याच्या आड उभे असलेले अडथळे लष्कराच्या सहाय्याने दूर करता येतील यावर त्यांचा विश्वास नव्हता... सभोवती पसरलेल्या वणव्यामध्ये आपण पाय रोवून घट्ट उभे राहिले पाहिजे असे त्यांना वाटत होते ' ( **कित्ता**, पृ. १९४ ).

अशा रीतीने गांधी धीर धरून योग्य क्षण येण्याची वाट पाहात राहिले. नवीनच मिळालेल्या स्वातंत्र्याची नशा यथावकाश ओसरल्यानंतर सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्या-शिवाय राजकीय स्वातंत्र्य म्हणजे नुसते फोलकटच आहे हे लोकांच्या लक्षात येणारच होते. ती स्वातंत्र्ये मिळवणे फार कठीण होते; कारण त्यांत भावनोद्दीपनाचा गुण नव्हता. अहिंसेच्या मार्गावरील पुढचे पाऊल टाकण्यापूर्वी परिस्थिती अनुकूल होण्यासाठी शांतपणे वाट पहाणे आवश्यक होते.

वरील सर्व काळात त्यांना देशातील अगदी तातडीच्या प्रश्नांचा विसर पडला होता असे नाही. दिल्लीत जमातीय संबंध तंग होत चालले होते. १३ जानेवारी १९४८ रोजी त्यांनी आपल्या शेवटच्या उपोषणास आरंभ केला. लोकप्रिय पुढाऱ्यांनी व ज्यांच्या हाती सरकारची सूत्रे होती त्यांनी ताबडतोब जागे होऊन जातीय सुसंवाद साधण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत म्हणूनच हा उपास होता.

याच सुमारास या ना त्या कारणांनी गांधी मुसलमानांच्या हितसंबंधांची काळजी बाजवीपेक्षा जास्त घेतात, त्यासाठी ते हिंदूंच्या रास्त हितसंबंधांचा बळी देण्यास मागेपुढे पाहात नाहीत असा समज लोकात पसरत होता. २० जानेवारी १९४८ रोजी एका तरुणाने त्यांच्या प्रार्थनेच्या वेळी एक बॉम्ब टाकला. सुदैवाने कोणालाच काही इजा झाली नाही.

आपल्याला ठार मारण्यासाठीच तो बॉंब टाकला होता याचे भान गांधींना झाले तेव्हा मृत्यूची समीपता त्यांच्या मनाला जाणवली व आपली अर्धवट राहिलेली कामे

तातडीने पूर्ण केली पाहिजेत असे त्यांना तीव्रतेने वाटू लागले. या त्यांच्या शेवटच्या दिवसांचे अतिशय सुंदर व हृदयस्पर्शी चित्रण आपल्याला मनू गांधी यांच्या 'लास्ट ग्लिम्प्सेस ऑफ बापू' या पुस्तकात पाहावयास मिळते. आपल्या दारात उभा ठाकलेला मृत्यू हे आपल्यापुढील सर्वोच्च आव्हान आहे असे गांधीजींना वाटत होते, ही गोष्ट ते पुस्तक वाचताना आपणास स्पष्ट दिसून येते. बॉंब टाकल्यानंतर शेवटच्या दहा दिवसांतील क्षणन् क्षण गांधींनी आपली जीवननिष्ठा पुनर्घटित करण्याकडे वापरला.

२६ जानेवारी हा आजवर संपूर्ण स्वातंत्र्य संपादन करण्याची प्रतिज्ञा पुनः प्रज्वलित करण्याचा दिवस म्हणून पाळला गेला होता. त्या दिवसाने त्या प्रतिज्ञेची गांधींच्या मनात उजळणी झाली असावी. कदाचित त्यात आपल्या नव्या कर्तव्याची हाक त्या दिवशी ऐकू आली असेल. पायाखालून काळाची वाळू भरभर निसटून जात होती. आपल्या जीवनातील नव्या अंतिम साहसासाठी गांधींनी कंबर कसली. फेब्रुवारी महिन्याच्या दोन तारखेला दिल्लीतील गाशा गुंडाळून सेवाग्रामला परत जाण्याचा त्यांचा बेत ठरलेला होता. तेथे गेल्यावर आश्रमाची व्यवस्था नीट लावून मग पुन्हा एकदा सर्व देशाची यात्रा करावयाची होती. या यात्रेत जनतेच्या हृदयाची सर्व प्रकारची स्पंदने कळून घ्यावयाची होती. मगच पुढील पाऊल कोणते टाकावयाचे याचा विचार करता येणार होता.

२९ जानेवारी १९४८ रोजी त्यांनी, काँग्रेसने आता आपण होऊनच विसर्जित व्हावे असा सल्ला देणारे निवेदन लिहून काढले. काँग्रेसचे राजकीय उद्दिष्ट साध्य झाले होते. काँग्रेसजनांनी लोकांत जाऊन जनतेला स्वराज्यासाठी सुशिक्षित व सुसंघटित करण्याची आता वेळ आली आहे असे गांधींना वाटत होते.

परंतु दैवाने दुसरेच काही तरी ठरवले होते. ३० तारखेला प्रार्थनेसाठी जात असताना एका तरुणाने त्यांना गोळ्या घालून ठार मारले! आपल्या या कृत्याने समर्थ व आक्रमक राष्ट्र निर्माण करण्यामधील हिंदूंच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आपण दूर करीत आहोत अशी त्याची कदाचित समजूत असावी.

## उपसंहार

सामान्य जनतेच्या पकडीत राज्यसत्ता यावी यासाठी गांधीजींनी सर्व आयुष्यभर अविश्रांत श्रम केले. सामान्य स्त्री-पुरुष सुसंघटित होऊन स्वराज्य मिळवू शकतील व त्याचे रक्षणही करू शकतील असे एक शस्त्र त्यांना अहिंसेच्या तत्त्वापासून घडवावयाचे होते. स्वराज्य संपादनाच्या व रक्षणाच्या प्रयत्नांतूनच त्यात भाग घेणारा प्रत्येकजण वैयक्तिकदृष्ट्या क्रमाक्रमाने परिपूर्ण होत जाणार होता.

आपल्या ध्येयाच्या पूर्तीसाठी त्यांनी भारतातील जास्तीत जास्त लोकशाहीनिष्ठ

अशी काँग्रेस ही संघटना माध्यम म्हणून निवडली; काँग्रेसशी संबंध असलेल्या दीर्घ कालावधीत त्यांनी काँग्रेसचा पाया विशाल व भक्कम केला. परंतु त्यांच्याकडे आकर्षित झालेले लोक त्यांची तत्त्वप्रणाली पटली म्हणून त्यांचे अनुयायी बनले नव्हते. त्यांच्या ठिकाणचे साहस व धैर्य, आणि या देशातील कोट्यवधी जनतेशी असलेली त्यांची आध्यात्मिक एकरूपता यांमुळे ही माणसे त्यांच्याभोवती गोळा झाली होती. जीवननिष्ठा म्हणून अहिंसेचे त्यांना आकर्षण कधी वाटले नाही. त्यांच्या दृष्टीने हिंस्र रक्तपाताचा अभाव आणि सुसंस्कृत रीतीने विरोध करण्याचा एक सभ्य मार्ग एवढाच अहिंसेचा अर्थ होता. आपल्या या नायकाबरोबर त्यांनी प्रवास केला, परंतु भारताच्या भवितव्याला आकार देण्याची सत्ता हाती येईल असे दिसताच ते त्याला सोडून गेले. त्यांच्या या नायकाला उत्तरोत्तर अधिकाधिक एकाकीपण येत गेले होते. अखेरच्या दिवसांत त्यांच्या मनाला ज्या गीतांनी धीर मिळत असे त्यांपैकी 'अॅकला चालो रे!' हे टागोरांचे गीत होते

परंतु एकाकीपणाचे भय त्यांना कधी नव्हते. एकलेपणाच्या कुशीत त्यांच्या मनाला सांत्वना लाभत होती. नवभारतातील नव्या कर्तव्यांचे आव्हान स्वीकारून ते कालपर्यंतच्या सहकाऱ्यांनी चालविलेल्या उपेक्षेच्या कोषातून बाहेर पडू पाहात होते अशा क्षणी एका पावन शुक्रवारी दैवाने त्यांना गाठले, आणि ओठांवर ईश्वराचे नाव असतानाच ते धरतीमातेच्या मांडीवर चिरनिद्रा घेत पहुडले!

आधुनिक काळातील अहिंसेचा सर्वांत थोर दूत, अशा रीतीने, देशाने त्यांची श्रद्धा झिडकारल्याच्या क्षणी मृत्यू पावला. या शोकांतिकेचा परमोच्च बिंदू म्हणजे, त्यांच्या त्यावेळपर्यंतच्या सहकाऱ्यांनी केलेल्या व्यवस्थेनुरूप त्यांचा पार्थिव देह तोफा वाहून नेणाऱ्या लष्करी रणगाड्यावरून नेण्यात आला, व त्याला बाँबर विमानांनी मानवंदना दिली.

कदाचित त्यांच्या हौतात्म्याने देव्हाऱ्यात जाऊन पडलेले अहिंसेचे बी पुन्हा रुजून वर येईल. परंतु त्या वेळी सॉक्रेटिस किंवा गांधीजी यांसारखे एकटेदुकटे महात्मेच केवळ अहिंसेचे वाहक नसतील, तर ते बी कोट्यवधी आत्म्यांच्या हृदयात अंकुरेल व बहरेल आणि दुःखी, कष्टी, असंतुष्ट, अविश्रान्त व भीतिग्रस्त मानवतेची सांत्वना करील, त्यांना बळ देईल.

## संदर्भ-ग्रंथ

**आझाद, मौलाना अबुल कलम**

१९५९ इंडिया विन्स फ्रीडम, मुंबई, ओरिएंट लाँगमन्स.

बंद्योपाध्याय, नरेन्द्रनाथ

तारकेश्वर सत्याग्रह संग्राम ( बंगाली ), कलकत्ता, समर लाहिरी.

बॅनर्जी, अनिलचंद्र व बोस, दक्षिणारंजन

१९४६ दि कॅबिनेट मिशन इन इंडिया, कलकत्ता, ए. मुखर्जी.

बोस, निर्मलकुमार

१९५३ माय डेज वुइथ गांधी, कलकत्ता, मेरिट पब्लिशर्स.

१९५७ सिलेक्शन्स फ्रॉम गांधी, अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.

१९५८ गांधीजी की चान ( बंगाली ), कलकत्ता, सर्वोदय प्रकाशन समिती.

बोस, सुभाषचंद्र

सुभाष बोस ( १९३९-४० ), कलकत्ता ब्लॉक ऑफिस.

१९४७ इंपॉर्टंट स्पीचेस अँड रायटिंग्ज ऑफ सुभाष बोस, लाहोर.

१९६२ क्रॉसरोड्स, मुंबई, आशिया पब्लिशिंग हाउस.

कॅम्पबेल-जॉन्सन, ॲलन

१९५२ मिशन वुइथ माउंटबॅटन, लंडन, रॉबर्ट हेल.

चतर्जी, ए. सी.

१९४७ इंडियाज स्ट्रगल फॉर फ्रीडम, कलकत्ता, चक्रवर्ती, चतर्जी अँड कंपनी.

काँग्रेस बुलेटिन

इंडियन नॅशनल काँग्रेसतर्फे प्रकाशित.

देसाई, महादेव हरिभाई

१९५१ ए राइचस स्ट्रगल, अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.

फिशर, लुई

१९४३ ए वीक वुइथ गांधी, लंडन, जॉर्ज ॲलन ॲन्ड अनविन.

गांधी, मनू बेन

१९६२ लास्ट ग्लिम्प्सेस् ऑफ बापू, दिल्ली, शिवलाल अगरवाल अँड कंपनी.

गांधी, मो. क.

१९४० ॲन ऑटोबायोग्राफी, ऑर दि स्टोरी ऑफ एक्स्पेरिमेंट्स वुइथ ट्रूथ

२ री आवृत्ती, अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.

स्पीचेस् अँड रायटिंग्ज, ४ थी आवृत्ती, मद्रास, जी. ए. नटेसन अँड कंपनी.

१९५७ लेटर्स टु सरदार वल्लभभाई पटेल, अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.

**गांधीजी सेव्हंटीफिफ्थ बर्थ-डे व्हॉल्यूम**

**घोषल स्वर्णकुमार**

तारकेश्वर सत्याग्रहेर इतिहास ( बंगाली ), कलकत्ता, लेखक.

**गुरूका-बाग काँग्रेस एन्कायरी कमिटी रिपोर्ट**

१९२४ सेक्रेटरी, गुरूका-बाग काँग्रेस एन्कायरी कमिटी

**इंडियन ॲन्युअल रजिस्टर**

संपादक : एन्. एन्. मित्रा, व नंतर नृपेंद्र कृष्ण मित्रा, कलकत्ता. ( १९१९ ते १९४७ पर्यंतचे खंड. )

**जयकर, एम. आर.**

१९५८ दि स्टोरी ऑफ माय लाइफ, खंड १ ला, १८७३ ते १९२२, मुंबई, आशिया पब्लिशिंग हाउस.

**खोसला, गोपालदास**

( वर्ष दिलेले नाही. ) स्टर्न रेकनिंग.

**कृपलानी, जे. बी.**

१९४७ दि लेटेस्ट फॅड : बेसिक एज्युकेशन, २ री आवृत्ती, मुंबई, व्होरा ॲन्ड कंपनी.

**मजुमदार, आर. सी.**

१९६१ थ्री फेझेस ऑफ इंडियाज स्ट्रगल फॉर फ्रीडम, मुंबई, भारतीय विद्याभवन.

**मेनन, व्ही. पी.**

१९५७ दि ट्रॅन्सफर ऑफ पॉवर इन् इंडिया, कलकत्ता, ओरिएंट लाँगमन्स.

**मित्रा बेजन आणि चक्रवर्ती, फणी**

१९४६ रेबेल इंडिया, कलकत्ता, ओरिएंट बुक कंपनी.

**नायर, सी. शंकरन्**

१९२३ गांधी ॲंड अनार्की, २ री आवृत्ती, मद्रास, टागोर ॲंड कंपनी.

**पाल, बिपिनचंद्र**

१९२० नॉन-कोऑपरेशन : फोर लेक्चर्स, कलकत्ता, दि इंडियन बुक क्लब.

**पेशावर एन्क्वायरी कमिटी रिपोर्ट**

१९३० अलाहाबाद लॉ जर्नल प्रेस ( इंडियन नॅशनल काँग्रेसकरता ), अलाहाबाद.

**रिपोर्ट ऑफ दि कमिशनर्स अपॉइंटेड बाय दि पंजाब सब्-कमिटी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस**

१९२० लाहोर.

राजेंद्रप्रसाद
१९३९ बेंगाली-बिहारी क्वेश्चन, इश्यूड बाय दि ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी, अलाहाबाद, किताबिस्तान.
१९४६ इंडिया डिव्हायडेड, मुंबई, हिंद किताब.
१९४९ ( अ ) सत्याग्रह इन् चंपारण, अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.
१९४९ ( ब ) महात्मा गांधी अँड बिहार : सम रेमिनिसेन्सेस, मुंबई, हिंद किताब.

राव, जी. बी. कृष्ण
१९२२ दि चिराला-पेराला ट्रॅजेडी, मद्रास, गणेश अँड कंपनी.

रोलाँ, रोमाँ
१९२४ महात्मा गांधी, न्यूयॉर्क, दि सेंच्युरी कंपनी.

रॉय-चौधरी, पी. सी.
१९५५ गांधीज फर्स्ट स्ट्रॅगल इन इंडिया, अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.

संथानम्, के.
१९४४ दि क्राय ऑफ डिस्ट्रेस, नवी दिल्ली, दि हिंदुस्थान टाइम्स.

सन्याल, प्रमथनाथ
तारकेश्वर ( बंगाली ), डाक्का, लेखक.

सप्रू, तेजबहादूर, जयकर, एम. आर., अय्यंगार, एन्. गोपालस्वामी, जगदीश प्रसाद आणि इतर
१९४५ कॉन्स्टिट्यूशनल प्रपोझल्स ऑफ दि सप्रू कमिटी, मुंबई, पद्मा पब्लिकेशन्स.

शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक समिती
१९५० मुस्लिम लीग अटॅक ऑन सिख्स् अँण्ड हिंदूज् इन् पंजाब इन १९४७, अमृतसर.

सीतारामय्या, बी. पट्टाभी
१९४६ दि हिस्टरी ऑफ दि इंडियन नॅशनल कॉंग्रेस, खंड १, १८८५–१९३५.
१९४७ खंड–२ ( १९३५–१९४७ ) मुंबई, पद्मा प्रकाशन.

शिवस्वामी, के. जी., शास्त्री, के. के., चंदी, टी. एस., नायडू, एम. ई.,

**शास्त्री, टी. व्ही. एस. आणि इतर**

१९४५ फूड, फॅमिन ॲण्ड न्युट्रिशनल डिसीझेस इन त्रावणकोर ( १९४३–४४ ), कोईमतूर, सर्व्हिंडिया केरळ रिलीफ सेंटर.

**सोमण, आर. जे.**

१९५७ पीसफुल इंडस्ट्रियल रिलेशन्स : देअर सायन्स ॲन्ड टेक्निक अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.

**टागोर-गांधी कॉरस्पाँडन्स**

अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिंग हाउस.

**तेंडुलकर, डी. जी.**

१९५० ' महात्मा ' आठ खंड, मुंबई, विठ्ठलभाई के. जव्हेरी आणि डी. जी. तेंडुलकर.

**टकर, सर फ्रॅन्सिस**

१९५० व्हाइल मेमरी सर्व्हज, लंडन, कॅसेल ॲड कंपनी.

**वार्के, सी. जे.**

१९४० दि वर्धा स्कीम ऑफ एज्युकेशन, मुंबई, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

परिशिष्ट

# सत्याग्रह आणि उपोषण*

उपोषण हा राजकीय जोरजबरदस्तीचा प्रकार आहे असे पुष्कळांना वाटते. आगाखान पॅलेसमध्ये नजरकैदेत असताना गांधीजींनी उपोषण केले होते. त्या वेळी भारत सरकारच्या गृहखात्याच्या सचिवाने ' राजकीय धाकदपटशाचा एक प्रकार ' असे त्या उपोषणाचे वर्णन केले होते. गांधीजींनी मात्र त्याचे वर्णन ' आर्त प्रेमाने प्रेरित होऊन केलेली कृती ' व ' सत्याग्रहाचा एक अविभाज्य घटक ' असेच केले होते.

अर्थात सगळी उपोषणे एकाच प्रकारची नसतात. पं. रामरखा, जतीन दास व टेरेन्स मॅक्स्विनी यांनी उपोषण करून प्राणत्याग केला. त्यांच्या देशबांधवांनी हुतात्मा म्हणून त्यांचा गौरवही केला. १९३२ मध्ये गांधीजींनी हिंदूंनी आपल्या समाजरचनेत सुधारणा करून तथाकथित ' अस्पृश्य ' जातींना न्याय्य वागणूक दिली नाही तर आमरण उपोषण करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्यांच्या निश्चयामुळे हिंदू जगतात खळबळ माजली व योग्य त्या सुधारणा घडवून आणून लोकांनी गांधीजींचे प्राण वाचविले. १९४७ मध्येही कलकत्त्यात यादवी माजली होती तेव्हा त्यांनी उपोषण केले होते. हेही उपोषण यशस्वी झाले. वर वर्णिलेल्या दोन प्रकारच्या उपोषणांमधील फरक जाणून घेणे आवश्यक आहे.

सर्वांत मोठा फरक, कदाचित, उपोषणामागील उद्दिष्टाने पडतो. पं. रामरखा, जतीन दास किंवा टेरेन्स मॅक्स्विनी यांचा उद्देश प्रतिपक्षाचे मतपरिवर्तन करण्याचा नव्हता. प्रतिपक्षाशी त्यांचे युद्ध चालू असताना ते तुरुंगात बंदिस्त झाले होते. पण तेथे त्यांना त्यांच्या मते घृणास्पद वागणूक दिली जात होती. ते अपमानित जिणे जगण्याचे त्यांनी नाकारले. स्वाभिमान व प्रतिष्ठा राखण्याचा दुसरा कोणताच मार्ग शिल्लक उरला नाही, तेव्हा प्राणत्याग करून त्यांनी आपला मान व प्रतिष्ठा राखली. स्वातंत्र्यासाठी झुंजणाऱ्या या पराक्रमी वीरांचे मरण हे जपानी सैनिक करतात तशा हाराकिरीच्या जातीचे होते.

---

* ' दि मॉडर्न रिव्ह्यू 'च्या ऑक्टोबर, १९५० च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखात किरकोळ फेरफार करून. —लेखक.

उलट वर उल्लेखलेली गांधींची उपोषणे अगदीच वेगळ्या प्रकारची होती. सत्याग्रही स्वयंसेवकाचा उद्देश प्रतिपक्षावर जबरदस्ती करण्याचा नसून त्याचे हृदयपरिवर्तन करण्याचा असतो. सप्टेंबर १९४७ मध्ये गांधींनी कलकत्त्याला उपोषण केले तेव्हा त्यांच्या काही मित्रांनी सांगितले की, त्यात त्यांचे प्राण गेले तरी या उपोषणामुळे ज्या गुंडांमुळे ती दंगल उद्भवली होती त्यांच्यावर काडीइतकाही परिणाम होणार नाही. जे सत्याग्रहाला शत्रूच मानत असतील त्यांच्याविरुद्ध उपोषण करता येणार नाही हे गांधीजींनाही मान्य होते. त्यापूर्वीसुद्धा, नोआखलीमध्ये अनेक प्रसंगी ते म्हणाले होते की, स्थानिक हिंदूंवर अत्याचार करणाऱ्या मुसलमानांविरुद्ध ( त्यांची सुधारणा करण्यासाठी ) ते उपोषण करू शकत नव्हते. त्याचे स्पष्टीकरण हेच होते. मुसलमानांची समजूत घालण्याचा प्रयत्न करणे, याबरोबरच त्यांची अनेक प्रकारे शक्य तेवढी सेवा करणे त्यांच्या हाती होते. गांधीजी आपले मित्र आहेत असे तेथील मुसलमानांना वाटेल असे त्यांच्यात या मार्गाने परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करणे त्यांच्या हाती होते. मुसलमान त्यांना मित्र मानू लागल्यावरच योग्य प्रसंगी गांधीजींना मुसलमानांविरुद्ध उपोषण करण्याचा अधिकार प्राप्त होऊ शकत होता. बिहारमध्ये मुसलमानांना काँग्रेस शासनाकडून न्याय्य वागणूक मिळत नाही अशा बातम्या भराभर येऊ लागल्या तेव्हा नोआखली सोडून गांधी बिहारला गेले. आपण मुसलमानांचे इतर कोणाहीइतकेच सच्चे मित्र आहोत याविषयी मुसलमानांची त्यांना खात्री पटवून द्यावयाची होती.

मुस्लिम लीगचे मंत्रिमंडळ अधिकारावर असतानाच्या वर्षभरात हिंदूंनी खूपच मानहानी व विटंबना सहन केली होती. स्वातंत्र्य मिळून सत्ता काँग्रेस पक्षाच्या हाती आल्यावर, आपल्याला मिळालेल्या वागणुकीचा सूड हिंदूंनी घेतला. त्या वेळीही गांधींनी कलकत्त्यातील मुसलमानांची मैत्री संपादण्याचा प्रयत्न केला. त्यामागचे कारणही हेच होते. मुसलमानांची मी जर पुरेशी सेवा केली, त्यांची मैत्री जोडली तर बंगालच्या मुसलमानांविरुद्ध उपोषण करण्याचा प्रेमाधिकार आपल्याला प्राप्त होईल असे गांधीजींचे म्हणणे होते. हिंदूंशी एकरूप असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध उपोषण करण्याचा त्यांना अधिकार आधीच प्राप्त झाला होता.

कलकत्त्याला सप्टेंबरमध्ये केलेल्या उपोषणाच्या वेळी स्वतः गांधीजींच्याही स्पष्टपणे लक्षात आले होते की, कदाचित दंगल निर्माण करणाऱ्या समाजविरोधी घटकांना आपल्या उपोषणाचे काहीच वाटणार नाही. तेव्हा कोणी तरी त्यांना विचारले की, अशा परिस्थितीतही प्राणांतिक उपोषण कशासाठी ? गांधीजींनी त्यावर असे स्पष्टीकरण केले की, त्यांच्या हिंदू व मुस्लिम मित्रांविरुद्ध ते उपोषण होते. शिवाय, समाज काही केवळ गुंडांचा बनलेला नसतो. त्यांत चांगली माणसे पुष्कळच असतात. परंतु साधारणतः चांगली गोष्ट सुप्त राहते. निष्क्रिय राहून या चांगल्या प्रवृत्ती एक प्रकारे दुष्प्रवृत्तींना मदतच करीत असतात.

सज्जनांनी स्वतःचा प्रभाव पाडून दुष्टांशी सक्रिय असहकार पुकारला पाहिजे. असहकाराचे शस्त्र हुशारीने व जोमदारपणे वापरल्यास दुष्ट शेवटी एकाकी पडतील. तसे झाल्यावर प्राणत्याग करण्याचा आपला निर्धार आपण परत घेऊ असे त्यांचे म्हणणे होते.

असे असले तरी एक प्रश्न उरलाच. समाजातील चांगल्या प्रवृत्ती केवळ अशा अधूनमधूनच, विशेषतः गांधींसारख्या एखाद्या थोर नेत्याचे प्राण पणाला लागल्यानंतरच आपला प्रभाव पाडणार असतील तर अशा तात्कालिक लाभासाठी प्राण खर्ची घालणे सार्थ ठरेल काय ? गांधीजींनी यावर असे मत दिले की, समाजातील सत्प्रवृत्ती अशा तात्पुरत्याच जागविता येणार असतील तर खरोखरच आजच्या जगात ते निरुपयोगीच होते; आणि मग जगण्यापेक्षा मरणातच त्यांना समाधान होते. कदाचित त्यांच्या मृत्यू-नंतर त्यांच्या निकट सहवासात आलेल्या व्यक्ती तरी कायमच्या दक्ष व क्रियाशील होतील. अशा रीतीने समाजात सुप्त असलेल्या सत्प्रवृत्ती आपला आळस झटकून कार्यक्षम झाल्या तर त्यांचा मृत्यू सार्थकी लागणार होता. तसे झाल्याने दुष्प्रवृत्ती एकाकी पडल्या असत्या. एक सत्याग्रही व्यवहारात जास्तीत जास्त एवढ्याचीच अपेक्षा करू शकतो असे गांधींचे म्हणणे होते.

आपल्या मित्रांना दुप्पट जोमाने कार्य करण्यास प्रवृत्त करणे किंवा त्यांचे मत-परिवर्तन घडवून आणणे या उपोषणामागील हेतूंमुळे सत्याग्रह्याचे उपोषण, पं. रामरखा, जतीन दास किंवा टेरेन्स मॅक्स्विनी यांना ज्यामुळे अमरत्व प्राप्त झाले त्या दुसऱ्या प्रकारच्या उपोषणाहून भिन्न ठरते. अर्थात हे दुसऱ्या प्रकारचे उपोषणही श्रेष्ठ प्रकारचेच आहे. एक प्रकारचे उपोषण हे सत्याग्रहाचा घटक भाग आहे; दुसऱ्या प्रकारच्या उपोषणाला अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे धैर्य व एखाद्या उच्च ध्येयासाठी सर्वस्वाचा होम करण्याची तयारी लागते, पण ते उपोषण वेगळ्या श्रेणीत मोडते.

□ □

प्रकरण ९ वे

# गांधी आणि लेनिन*

मानवजातीला सर्व बाजूंनी ग्रासून टाकणाऱ्या निराशामय अंधःकारातही काही माणसे अशी असतात की जी भोवतालच्या काळोखाशी झुंज देऊन आपले स्वत्व, आपला आत्मा सभोवतालच्या काळोखाने काळवंडून जाऊ देत नाहीत. तो लखलखीत ठेवतात. आजच्या युगातल्या अशा व्यक्तींमध्ये सभोवतालच्या अंधाराशी यशस्वीपणे झुंज दिल्याच्या खुणा अंगावर वागविणाऱ्या दोन व्यक्ती आपणास दिसतात. त्यांनी किती अपार यातना भोगल्या याची साक्ष त्या दोघांची जीवने देतात. लेनिन आणि गांधी हेच ते दोन महात्मे. सत्याचा अविश्रांत शोध घेण्याच्या बाबतीत व गरीब आणि पददलित मानवतेबद्दल असलेल्या उत्कट जिव्हाळयाच्याबाबतीत दोघांत खूपच साम्य आहे. मात्र तरीही आंतरिक श्रद्धा व दृष्टिकोण याबाबत ते एकमेकांपासून जास्तीत जास्त दूर आहेत.

लेनिन व गांधी या दोघांच्याही मते जगातील दुःखे बव्हंशी अन्याय्य समाजरचनेमुळेच निर्माण झालेली आहेत. ही रचना एका वर्गाच्या श्रमावर दुसऱ्या वर्गाला जगू देते. त्यामुळे केवळ शोषितांचीच जीवने कोळपतात असे नाही तर त्यांच्या जिवावर जगणाऱ्या लोकांचेही नैतिक अधःपतन होते. माणसाला जर आपल्या सुप्त गुणांचा पूर्ण व मुक्त आविष्कार करण्याची संधी मिळावयाची असेल तर ही समाजरचना नष्ट केली पाहिजे. गांधी व लेनिन यांचे या बाबतीत एकमत आहे. परंतु या कार्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण व ते साध्य करण्यासाठी वापरावयाची साधने यांच्याबाबतीत हे दोघे एकमेकांपासून खूपच दूर जातात.

लेनिनचे असे मत होते की, पिळवणूक करणाऱ्या लोकांच्या हाती आज राजकीय सत्ता असल्यानेच सामाजिक व आर्थिक दृष्टींनी अन्याय्य असलेली समाजव्यवस्था टिकून राहिली आहे. क्रांती घडवून श्रमणाऱ्यांच्या हाती सत्ता हस्तांतरित केली तर आजच्या रचनेत शक्य होणारे अन्याय्य शोषण अशक्य करून टाकणारी समाजरचना ते निर्माण

---

* हा लेख १९३२ मध्ये तुरुंगात लिहिला. तो प्रथम २८ जुलै, १९३३ रोजी 'व्हॉइस ऑफ यूथ 'मध्ये प्रसिद्ध झाला. येथे तो शक्य तो मूळाबरहुकूम दिला आहे.

करू शकतील, म्हणून राज्यसत्तेवर श्रमिक वर्गाची हुकूमशाही प्रस्थापित करणारी राज्यक्रांती करण्याच्या लक्ष्यावर लेनिनचे सर्व लक्ष केंद्रित झाले होते. त्याचा असा विश्वास होता की, राज्यसत्ता अशा हुकूमशाहीखाली आली म्हणजे मालकीहक्कसंबंधांची मूलग्राही पुनर्घटना करता येईल; योग्य शिक्षणाने माणसाचा जीवनाबद्दलचा सारा दृष्टिकोणच बदलता येईल. दुसऱ्याच्या श्रमांवर जगण्याची, शोषण करण्याची लालसा पूर्वी मोठ्या प्रमाणावर दिसे तिला अजिबात वाव राहणार नाही.

गांधींचा दृष्टिकोन अगदीच वेगळा आहे. लेनिनच्या योजनेत आवश्यक असणाऱ्या सत्तेच्या केंद्रीकरणाला व त्यात अनुस्यूत असलेल्या शक्तीला गांधीजींचा मूलभूत विरोध आहे. त्यांचे मत असे आहे की, वरील प्रकारच्या सक्तीमुळे मुकाटपणे गोष्टी मान्य करण्याचा, निष्क्रियतेचा सामान्य मनुष्यस्वभावाचा पैलू तसाच कायम राहील. असहाय्यपणे स्वीकार करण्याच्या वृत्तीवरच आजची भांडवलशाही रचना उभारलेली आहे असे गांधींचे मत होते. राज्यसत्तेच्या हातातील अधिसत्ता ही खरी समस्या नाही. राज्यसत्तेचे अस्तित्व शक्य करणारा माणसाचा स्वभाव हीच त्यांच्या मते खरी समस्या आहे. राज्यकर्ते राज्य करू शकतात याचे कारण प्रजाजन हिंसेला नेहमीच भीत असतात हेच आहे. म्हणून, त्यांच्या मते, आपल्या मनात खोल दडून बसलेली ही भीती आपण टाकली, तसेच त्याच वेळी आपण आपल्या हातांनी कष्ट करून आपले उदरभरण केले तर आपण आपला स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क उपभोगू शकू. त्यामुळेच त्यांचे सर्व प्रयत्न मानवी व्यक्तित्वात आवश्यक ते बदल घडवून आणण्यावर केंद्रित झालेले दिसून येतात. दोन मार्गांनी हे परिवर्तन घडवून आणण्याची त्यांची कल्पना आहे. एका बाजूने आर्थिक व सामाजिक रचनात्मक कार्यक्रम अमलात आणून तर दुसरीकडे अन्याय व शोषण यांविरुद्ध क्रमाक्रमाने वाढत जाणारा अहिंसक असहकार करून ते हे परिवर्तन घडवून आणू इच्छितात.

श्रमिक जनतेने स्वतःच्या व आपल्याशी समरस झालेल्या इतरांच्या प्रयत्नाने सामाजिक जीवन संपूर्णतः बदलून त्याची पुनर्रचना केल्यानंतर जीवनाचा घाट कोणता राहणार आहे? गांधीजी म्हणतात की, संपत्ती, सत्ता आणि सामाजिक दर्जा यांतील विषमता शक्य तेवढी कमी केली जाईल. पण ही मानवनिर्मित विषमता पूर्णपणे नष्ट झाली तरी निसर्गनिर्मित विषमता राहीलच. ही विषमता जर समाजाला लाभदायक असेल तर तीत ढवळाढवळ करण्याचे काहीच कारण नाही. मात्र या विषमतेचा उपयोग एखादा विशेषाधिकारसंपन्न वर्ग निर्माण करण्यासाठी होऊ नये. निसर्गतः निर्माण होणाऱ्या विषमतेमुळे कोणाची पिळवणूक होऊ नये म्हणून आणखी काही तरी केलेच पाहिजे. ते असे की, आपल्या अंगी असलेला कोणताही विशेष गुण आपल्या वैयक्तिक लाभासाठी न वापरता समाजासाठी त्याचा उपयोग करण्याची प्रेरणा प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी

निर्माण केली पाहिजे. जी गोष्ट व्यक्तींची तीच राष्ट्रांचीही. प्रत्येक राष्ट्राने आपली साधन-सामुग्री व गुणसंपदा अखिल मानवतेच्या सेवेसाठीच वापरली पाहिजे. सामाजिक मालकी व विश्वस्त वृत्ती या ध्येयावर लोकांची निष्ठा निर्माण करणे हे सत्याग्रहाच्या साहाय्याने व्यक्तींची किंवा समाजांची मने बदलावयास निघालेल्या सर्वांचे उद्दिष्ट असले पाहिजे.

लेनिन व गांधी यांच्या साधनांमध्ये असलेला वर निर्दिष्ट केलेला फार मोठा फरक हा वस्तुतः त्या दोघांच्या मानवी इतिहासातील व्यक्तीच्या भूमिकेकडे पाहण्याच्या मूलभूत फरकातून निर्माण झालेला आहे. लेनिनचे असे ठाम मत होते की, काही विरळ अपवाद वगळल्यास, बहुतेक माणसे परिस्थितीने घडत असतात. त्यामुळे त्यांना नीतिमान बनवावयाचे असेल तर ज्यामुळे अमूक एक विशिष्ट नैतिक आचारसंहिता पाळणे बंधनकारक बनेल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. म्हणून लेनिनचा प्रयत्न त्याला पाहिजे होती तशी समाजरचना निर्माण करण्याकडे होता. परंतु आंधळी सक्ती व आंधळ्या सवयी यांवर आधारलेल्या चांगल्या जीवनावर गांधीजींचा मुळीच विश्वास नव्हता. अशा नीतिमत्तेच्या आचरणातून माणसातील सर्वोत्तम गुण विकसित होणे शक्य नाही असे गांधीजींचे मत होते. आंतरिक परिवर्तनातून खरा शुभद बदल घडून येतो. म्हणून, व्यक्तींमध्ये आधीच घडून आलेल्या परिवर्तनाचा समुच्चयाने घडलेला आविष्कार असे सामाजिक बदलाचे स्वरूप असले पाहिजे. तीच सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची रीत असली पाहिजे. बाह्यतः दिसून येणारा कोणताही बदल अंतर्मनात झालेल्या विकासाचा आविष्कार, त्याचा निदर्शक असला पाहिजे. गांधीजी व लेनिन यांच्यातील फरक आपल्याला थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल : माणूस आज आहे तसाच तो नेहमी राहणार असे गृहीत धरून लेनिन आपली योजना आखतो; तर माणूस कसा असावा किंवा कसा बनू शकेल यावर गांधीजी आपली योजना उभारतात.

मानवतेला फार चांगले दिवस येणार आहेत अशी आशा पल्लवित करणारा लेनिन हा महापराक्रमी योद्धा होता. क्रौर्य किंवा बेकारी कोणाच्या वाट्याला येत नाहीत, सर्व माणसे प्रेमाने नांदत आहेत, प्रत्येकजण स्वतःच्या गुणांचा व लायकीचा उपयोग मानवजातीच्या सेवेसाठीच करीत आहे अशा एका भावी नंदनवनाचे स्वप्न पाहण्यात त्याचा आत्मा गढून गेला होता. आपल्या मनात फुलणारी ही महान आशा प्रत्यक्षात येण्याची काही शक्यता आहे काय, हे जाणून घेण्यासाठी लेनिन मानवी इतिहासाची पाने उलटू लागला. कारण तसा तो फार वस्तुनिष्ठ होता. आजवरच्या मानवी इतिहासात त्याला असे आढळून आले की नियतीची वाटचाल अप्रतिहतपणे त्याच्या मनातील आशा पूर्ण होण्याच्या दिशेनेच चालू आहे. निसर्गनियमानेच आपल्या आशा पूर्ण होणार आहेत हा नियतिवाद मनात पक्का ठसल्यामुळेच लेनिनने आपल्या मार्गात येणारे

अडथळे दूर करण्यासाठी अत्यंत निर्घृण व संहारक शस्त्रांचा बिनदिक्कत वापर केला. हा मार्ग आज अत्यंत हिंसामय व द्वेषपूर्ण असला तरी हे विध्वंसक शस्त्र टाकून देता येईल किंवा कदाचित तलवारी मोडून त्यांचे नांगर करता येतील—कारण नव्या जगात माणसाचा द्वेष करण्याचे माणसाला काहीच कारण नसेल– असा सुदिन नक्कीच उगवणार आहे अशी त्याची खात्री होती, परंतु तसा दिवस उजाडेपर्यंत मात्र आपल्याला हिंसा व रक्तपात यांतूनच जावे लागणार आहे, कारण तोच इतिहासाचा अटळ नियम आहे. आपल्या हृदयातील कामनांच्या तेलावर पेटवलेल्या दिव्याच्या प्रकाशात आकाशाच्या काळ्याभोर घुमटाची विस्मृती होऊन जिद्दीने ऐरणीवर घाव घालीत राहणाऱ्या लोहारासारखी लेनिनची अवस्था होती. त्या श्रमिकाच्या हृदयात आळीपाळीने उचंबळून येणाऱ्या प्रेमाची किंवा धगधगत्या द्वेषाची कशाचीच दिक्कत त्या चमचमणाऱ्या निर्लेप ताऱ्यांना नव्हती.

तर गांधीजी एक यात्रिक बनून आपल्या मार्गावर अखंड वाटचाल करीत आहेत. त्यांच्या या प्रवासाला शेवट आहे असे दिसत नाही. दूरवर दिसणारा प्रकाश कर्तव्य-कठोरपणे त्यांना आपल्याकडे बोलावीत आहे. ते मार्गदर्शन स्वीकारून तेही हातातील काठीच्या साहाय्याने मार्गक्रमण करीत आहेत. त्यांच्या हृदयात आशा प्रज्वलित झाली आहे. त्या आशेला ते शरण आहेत; कारण तीच एक गोष्ट त्यांच्या हातची आहे. अंत:करणात खोल कोठे तरी गांधीजींना याची जाणीव आहे की, सर्व जगाला सुखमय करणारा काळ येणार आहे किंवा नाही याची चौकशी करणे हे आपले कामच नाही. अंतर्बाह्य शुद्ध असलेल्या ऊर्मींना शरण जाणे आणि तसे करून परमेश्वराने आपल्यावर सोपविलेली कामगिरी बजावणे एवढेच या क्षणी त्यांनी करावे अशी अपेक्षा आहे याची त्यांना कल्पना आहे. ‘कुंभारा’च्या ईश्वरीय हातातील केवळ एक मातीचा गोळा होऊन राहणे, हे त्यांचे ध्येय आहे. म्हणूनच ते खऱ्या नम्रपणे सांगू शकतात की, ‘परमेश्वराची म्हणजेच मानवतेची सेवा करणे’ हेच माझे काम आहे.

गांधीजींचा असा विश्वास आहे की ईश्वरी योजनेचे ज्ञान आपणाला होऊ शकत नाही. अंतिम निधान कोणते असावे हे ठरविण्याच्या बाबतीत माणसाच्या हाती त्याने जरासुद्धा अधिकार दिलेला नाही; साधनांवरही माणसाला अंशतःच अधिकार आहे. आणि प्रेम हे ते साधन आहे. मानवी जीवनाला सर्व बाजूंनी दडपून टाकणाऱ्या अन्यायाच्या दडपणाच्या कचाट्यातून जीवन मुक्त करण्यासाठी आपल्या सभोवतीच्या सृष्टीचे ‘प्रेम’ या साधनाचा उपयोग करून परिवर्तन घडवून आणण्याचे रहस्य आपल्याला अवगत झाले आहे असा गांधीजींचा दावा आहे. अन्यायावर आधारलेली सध्याची समाजरचना नष्ट करण्यासाठी अत्यंत निकराने अहिंसात्मक असहकाराचे युद्ध करीत असतानाच, ज्यांच्याशी आपण युद्ध करीत आहोत त्या आपल्या शत्रूंवर आपण

स्वतःवर करतो तसेच प्रेम करावे हे ते रहस्य होय. शोषित व शोषक यांचा अन्योन्य संबंध बदलणे हे आपले उद्दिष्ट आहे. हे संबंध बदलले की नव्या संबंधांमुळे, सर्वांच्या सहप्रयत्नांनी विद्यमान समाजरचना नष्ट होईल. मग या नव्या संबंधांवर आधारित नवसमाज निर्माण होईल. जुलमी सत्ताधीशाविरुद्ध मनात मुळीच द्वेष न बाळगता झुंज द्यावी, त्याच्या ठिकाणीही जे सुप्त मनुष्यत्व आहे त्यावर प्रेम करावे, त्याची प्रतिष्ठा राखावी असे सांगून गांधीजी आपणास एक अत्यंत कठीण साहस करण्यास आव्हान देत आहेत. हाच सर्वांत उदात्त मार्ग आहे, आणि म्हणून तो पूर्णपणे आचरताना कष्टाला मागेपुढे पाहू नका असे गांधीजी सांगत आहेत. सर्व अन्यायांचे परिमार्जन करण्यासाठी अहिंसक असहकाराच्या मार्गाचा शोध घेण्यात गांधी आपली प्रतिभा पणाला लावीत आहेत. त्यातून काय फळ यायचे ते त्यांनी ईश्वराधीन ठेवले आहे.

परंतु आपण दुबळे आहोत. उत्तुंग शिखरे चढून जाण्याचे आव्हान आपल्याला पेलत नाही. आपले सामर्थ्य तोटके पडते. साधनांच्या शुचितेबद्दलचा गांधींचा टोकाचा आग्रह पाहिला म्हणजे आपण आपल्या दुर्बलतेमुळे निराश होतो. मग आपण त्यांच्याकडे वळून त्यांना विचारतो की, मनावर सर्व बाजूंनी अंधाराचे दडपण पडलेले असताना आशा व स्वप्न यांनी धुंद होण्यात काय चूक आहे ? त्यावर गांधीजींचे उत्तर असे आहे : 'स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्यांच्या कष्टांवर जगावयाचे सोडून स्वकष्ट व प्रेम यांवरच जगणे माणूस पसंत करील असा दिवस केव्हा तरी मानवतेच्या जीवनात येईल ही श्रद्धा निश्चितच बाळगली पाहिजे.' दरम्यानच्या काळात ते आपल्याला साधन-शुचितेबद्दल दक्ष राहायला सांगतात. स्वसामर्थ्य पाहून पुढचे पाऊल कोणते टाकावयाचे ते ठरवण्यास सांगतात. विश्वबंधुत्व आणि सर्वांचे हित साधण्याच्या दिशेने एकाग्र चित्ताने वाटचाल करावयास सांगतात.

अधिक निग्रही व कणखर असलेल्यांच्या कानात गांधीजी हळूच अधिक निष्ठुर सत्य सांगतात अशा निवडक लोकांना ते सांगतात की त्या दिव्य दिवसाचे आश्वासन म्हणजे आपल्या लेकरांनी आपण योजलेल्या मार्गावरून वाटचाल करावी म्हणून ईश्वराने पुढे ठेवलेले आमिष आहे. परंतु जर त्याच्या मनात आले तर आपल्या सर्व आशा-आकांक्षा, सुखे व आनंद तो एका क्षणात नष्ट करून आपल्या सर्वांना अतीव दुःखाच्या खाईत लोटून देऊ शकतो. कारण तो सर्वांत मोठा हुकूमशहा आहे. तेव्हा आपले कर्तव्य एवढेच की, कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता आपले नेमून दिलेले काम सतत अविश्रांतपणे करीत राहावे व परिणामांची पर्वा न करता मानवी जीवन कोळपून टाकणाऱ्या शक्तींशी प्राणपणाने झुंजावे. ज्या मार्गावरून जगन्नाथाचा रथ जाणार आहे त्यावर नेमलेल्या कामगारासारखे आपण आहोत. रथयात्रेसाठी रस्ता दुरुस्त राखणे हेच आपले काम.

आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याबद्दलचे गांधीजींचे विचारही असेच आहेत. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळावे, येथील लक्षावधी भुकेल्या लोकांना अन्नवस्त्र मिळावे असे त्यांना वाटते. परंतु त्यांच्या मते ही या भारतभूमीची केवळ बाह्य लेणी, सौभाग्यालंकार आहेत. ही वस्त्रे लेवून ती तयार होणार आहे ती मात्र मानवतेची हाक येताच मृत्यूला, आपल्या चिरप्रियकराला आलिंगन देण्यासाठी. गांधीजी नेहमीच म्हणत, 'तशीच वेळ आली तर साऱ्या मानवतेसाठी भारताला बलिदान करता यावे म्हणूनच मला भारत स्वतंत्र व्हायला हवा आहे; राष्ट्रवादाचा माझा अर्थ हा आहे.'

हे खरोखर ऊर फाडून टाकणारे विचार आहेत. पण गांधीजी आपली अशी समजूत काढतात की, माणसाच्या अंतरंगात वास करणारे सामर्थ्य आणि धैर्य हीसुद्धा अमर्यादच आहेत. देहासक्ती हे सर्व भयाचे मूळ आहे. आपल्या देहाबद्दलचे ममत्व त्यजून सर्वशक्तिमान असलेल्या ईश्वरात आपण स्वतःचे अस्तित्व मिसळून टाकले तर प्रेमाचा संदेश प्रसृत करण्याच्या कामी आपले सामर्थ्य कधीच तोकडे पडणार नाही.

कधीकाळी नंदनवन अवतरणार आहे असे स्वप्न आपल्या सहकाऱ्यांपुढे गांधीजी रंगवीत नाहीत; दीर्घ यात्रेत रस्त्यावर लागणारे खाचखळगे आणि बोचणारे काटेकुटे यांची कल्पना देतात. स्वतः जो मार्ग ते धुंडाळत आहेत तोच आपल्यालाही अनुसरण्यास ते सांगत आहेत. मानवतेच्या जीवितासाठी, कल्याणासाठी प्राणार्पण करण्याचा मार्ग ते दाखवीत आहेत. या मार्गावर परमेश्वर स्वतःच तळपत्या तलवारीचे रूप घेऊन आपल्या डोक्यावर टांगलेला राहातो. त्या सर्वशक्तिमान ईश्वराला शरण जाणे हेच आपल्या जीविताचे एकमेव साध्य आहे. आपली वैयक्तिक सुखदुःखे अगदी कस्पटासमान व निरर्थक ठरतात. जन्म आणि मृत्यू आपल्या एकाकी आणि प्रदीर्घ प्रवासातील मैलांचे दगड होऊन जातात.

आपण ज्यांना क्लेश व दुःखे मानतो व स्वभावतःच ज्यांच्यापासून अंग चोरून घेतो ती शाश्वत आहेत ही स्वीकृती गांधीजींमध्ये आंतरिक विकृतीतून आलेली नाही. प्रकाश आणि अंधार, जीवन आणि मृत्यू ही त्या एकाच विश्वव्यापी ईश्वराचे घटक आहेत, आणि ईश्वराचा त्या सर्व घटकांसहच केवळ आपण स्वीकार करू शकतो, हे ज्ञान गांधींच्या त्या स्वीकृतीमागे आहे. परंतु गांधीजींच्या विचारप्रणालीतील या पैलूमुळे, शरीरश्रम व क्लेश यांचे त्यांनी परम तत्त्व बनविल्यामुळे कविमनाच्या टागोरांची स्वभावतः गांधींच्या चळवळीविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया झाली. गांधींच्या 'असहकारा'च्या राजकीय चळवळीमुळे सर्व देश आत्मताडनाच्या विकृतीच्या महापुरात बुडून जाईल या शक्यतेने टागोरांचे एरवी शांत, धीरगंभीर असणारे मनही अधूनमधून बेचैन होत असे. परंतु व्यक्तिशः गांधीजींच्यात आत्मताडनाच्या विकृतीचा लेशमात्रही नाही. कारण आपल्या दोषांची परमेश्वरापुढे विनम्र कबुली दिल्याने त्यांच्या आत्म्याला विलक्षण निर्मळता व

झळाळी प्राप्त झालेली आहे. मानवाबद्दल वाटणाऱ्या अपार प्रेमातूनच त्यासाठी भोगाव्या लागणाऱ्या क्लेशांची भलावण करण्याचे सामर्थ्य गांधीजींना लाभलेले आहे. उदराचे कवच फोडून मूल जन्म घेते तेव्हा आई समाधानाने व आनंदाने अपार वेदना भोगते. त्या ( अविकृत ) शौर्याची आणि गांधीजींच्या शौर्याची जात एक आहे.

गांधीजींचे तत्त्वज्ञान अशा प्रकारे आशेचा फुलोरा नसलेले, रोमांच निर्माण व्हावेत अशा यशाची भुलावण न दाखविणारे असूनसुद्धा, मृत्यूच्या कोठडीची वाट दाखवीत असताही हजारो माणसे त्यांच्यामागे जाताना दिसतात हे कसे, असे कोणी विचारील. त्यांच्या तत्त्वज्ञानाने गांधीजींचे देवरूप धारण केल्यामुळेच लोक त्याकडे खेचले जात आहेत असे म्हणावे लागते. आणि कदाचित यातच आपल्याला भारताच्या आधुनिक क्रांतीचे, मानवी जीवनात महान क्रांती करणाऱ्या मानवेतिहासातील इतर चळवळींचेही मूलभूत व अंतःस्थ रहस्य सापडेल. रशियाचे आजचे स्वरूप लेनिनच्या व्यक्तिमत्त्वाशिवाय स्पष्ट करणे शक्य नाही. ख्रिश्चन धर्मप्रसाराचे स्पष्टीकरण येशूचे व्यक्तिमत्त्व वगळल्यास करता येणार नाही. तद्वतच भारतातील सत्याग्रह चळवळीचे स्वरूप त्या चळवळीच्या जनकाचे व्यक्तिमत्त्व समजावून घेतल्याशिवाय कळणार नाही.

मानवाच्या प्रत्येक वेदनेने ज्याचे हृदय सहकंपित होते असा, ईश्वराने दाखविलेल्या मार्गाने निग्रहाने निघालेला एकाकी यात्रिक; सर्व दुःखांत व कष्टांत सहभागी होण्याचा निर्धार असलेला आणि मानवतेला चिरडून टाकणारे अडथळे दूर करण्यासाठी आत्मार्पण करण्यास नेहमीच सिद्ध असलेला साधक; क्षणिक लाभासाठी विश्वबंधुत्वाच्या ध्येयाचा विश्वासघात करावयास तयार नसलेला मानव— खरोखर त्यांच्यापुढे असलेल्या तात्त्विक ध्येयाच्या ताऱ्यापेक्षा गांधीजींचे हे स्वरूप व व्यक्तिमत्त्वच माणसांना जास्त आकर्षक वाटते. उदात्त ध्येयांचा प्रकाश अशा महात्म्यांच्या व्यक्तिमत्त्वातून आमच्यापर्यंत येतो तेव्हाच त्यांच्या दीप्तीने आमचे जीवनपथ उजळून निघतात.

असे महात्मे भूतलावर आहेत अशा वेळी जिवंत असणे हे आमचे मोठे भाग्य आहे. त्यांची जीवने ही मानवी आत्म्याच्या महान सामर्थ्याची साक्षी असतात. त्यामुळे आपल्या श्रद्धा बळकट होतात, व आपल्याला या जगाची नव्याने पुनर्रचना करण्याची स्फूर्ती व सामर्थ्य दोन्ही मिळतात.

□ □

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती
मंडळ ग्रंथालय
मुंबई-४०० ०३२.
रजिस्टर नंबर
९५

प्र/१०४/१